श्रीदासराम ग्रंथमाला : पुष्प ३७

# श्रीदासराममहाराज चरितामृत

ॐ

लेखक
**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

प्रकाशक
**श्री.रामचंद्र कृष्णाजी पाटील**

द्वितीय आवृत्ति    सांगली    इ. स. २०११

* प्रकाशक

**श्री.रामचंद्र कृष्णाजी पाटील**
'श्रीदासराम निकेतन', तासगांव - चिंचणी रोड,
तासगांव.

* **प्रथम आवृत्ति** : इ. स. २००३
(प्रकाशन दिन १२-२-२००३)

* **द्वितीय आवृत्ति** : इ. स. २०११
* **प्रकाशन दिन** : गुरुवार दि.२७-१०-२०११
कार्तिक शुद्ध प्रतिपदा, शके १९३३
(दीपावली पाडवा)

* **मुद्रक**
श्री. अनिल अजित लोखंडे
श्रीदासराम ऑफसेट, सांगली.

* **मुखपृष्ठ व अक्षर जुळणी**
श्री. अनंत अजित लोखंडे

* **स्वागत मूल्य**
रुपये १००/-

© **श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**

* **चरित्र मिळणेचे ठिकाण**
'श्रीरामनिकेतन', श्री. बापूरावजी केळकर वाडा,
गांवभाग, सांगली ४१६ ४१६.
दूरभाष - (०२३३) २३३२४६३
भ्रमणध्वनी - ०९८२२००७५२८

## प्रकाशकाचे मनोगत

एखाद्याचे जीवन ग्रंथरूपाने जो प्रकाशात आणतो त्याला त्या ग्रंथाचा प्रकाशक म्हणतात. ती. प. पू. श्री. रामराय गोविंद केळकर तथा श्रीदासराममहाराज यांचे सारे जीवनच मुळी प्रकाशमय होते. ते प्रकाशात आणण्यास मी खरा पात्रही नाही आणि तशी माझी योग्यताही नाही. पण केवळ श्रीदासराममहाराजांचे पोटी माझा जन्म झाला ही खरी माझ्या भाग्याची गोष्ट आहे आणि ही एकच गोष्ट या ग्रंथाचा प्रकाशक म्हणून चार शब्द लिहिण्याला कारणीभूत आहे.

हे श्रीदासराममहाराजांचे चरित्र ''श्रीदासराममहाराज चरितामृत'' या नांवे आमच्या श्रीदादांच्या अंतरंगातील एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साधक प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिले आहे. प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी हे चरित्र लिहावे अशी मी त्यांना विनंति केली होती. या चरित्र लेखनासाठी श्रीदादांनी लेखन केलेल्या अनेक लहान मोठ्या वह्या, श्रीदादांचे लेखन, इतर ग्रंथ वा नियतकालिकात जे आले त्यांचे संदर्भ, आवाहन केल्याप्रमाणे श्रीदादांच्या भक्तांकडून आलेल्या आठवणी-अनुभव वगैरे सर्व साहित्य प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचेकडे दिले. या उपलब्ध करून दिलेल्या सर्व साहित्याचा यथायोग्य वापर करून डॉ. आपटे यांनी हे चरित्र लिहिले आहे. श्रीदादांचे जीवन हेच मुळात अलौकिक व अद्भुत आहे. ते शब्दांद्वारे जसे व्यक्त करता येणे शक्य होते, त्याप्रमाणे ते शब्दांमध्ये व्यक्त करून लेखकाने श्रीदादांना साकार केले आहे. तसेच श्रीदादांच्या प्रकाशित व अप्रकाशित लेखनाची नोंदही डॉ. आपटे यांनी साक्षेपाने घेतली आहे. आणि हे करताना लेखकाच्या सुविद्य पत्नी-पुत्र सौ. माया आपटे व नारायण यांनी फार मोठे सहकार्य केले आहे.

श्रीदादांचे प्रस्तुतचे चरित्र वाचून, श्रीदादांच्या जीवनचरित्राचा बराचसा उलगडा मला झाला. तथापि त्यांच्या संपूर्ण जीवनचरित्राची उकल त्यांचेच कृपेने या जन्मात तरी व्हावी, अशी महाराजांचे चरणी प्रार्थना आहे.

केळकर घराण्यात ही कीर्तनाची परंपरा भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे कृपाशीर्वादाने आली. आमच्या श्रीमामांनी इ.स.१९२४ ते १९६२ अखेर ३८ वर्षे अखंड कीर्तन केले तर इ.स.१९६२ ते २००१ अखेर ३९ वर्षे श्रीदादांनी अखंड कीर्तन केले.

श्रीमामांचा व श्रीदादांचा हा परमार्थ बिनसुट्टीचा असा होता. श्रीतात्यासाहेबमहाराजांनी साक्षात्काररूपाने प्रगट होऊन श्रीमामांना अखंड कीर्तनाची आज्ञा दिली तर भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकर महाराजांनी साक्षात्काररूपाने प्रगट होऊन श्रीदादांना नाद-प्रकाश-रूपाने कानडीतून बोध केला आणि हे खरे श्रीमामांचे व श्रीदादांचे चरित्र आहे व हे सारे त्या महाराजांचे वैभव आहे.

''जीवा शिवाचा संयोग । हाचि माझा राजयोग'' असे प.पू. स्वामी स्वरूपानंद म्हणतात. याप्रमाणेही आमचे श्रीदादा राजयोगी होते. राजयोग हा मनाच्या प्रसन्नतेवर अवलंबून असतो असे आमचे श्रीदादा कीर्तनात सांगावयाचे ''देखे अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चिता ।। तेथ रिघणे नाही समस्ता । संसार दु:खा'' या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीप्रमाणेही आमचे श्रीदादा हे राजयोगी होते. लहानपणापासून त्यांची सेवा अनेक माणसे अनेक प्रकारांनी करीत. यात श्री. माणिक गोसावी, श्री. नामदेव कुलकर्णी, प्रा.डॉ.के.वा.आपटे, श्री. भरतकाका फाटक, श्री. वसंतराव बापट, श्री. शरदकाका आपटे, श्री. बाळासाहेब गोखले, श्री. शशिकांत ग. मायदेव, श्री. सुरेश म. जोशी, श्री.मधुसूदन परचुरे, श्री. रामभाऊ साळुंखे, श्री. बापूसाहेब पटवर्धन, श्री. दत्तोपंत कुलकर्णी असे अनेक त्यांचे भक्त होते. तर अलीकडच्या काळात श्री. दत्तात्रय कर्णेकर, श्री. सुधाकर रेगोडकर, श्री. सतेज केळकर, श्री. अमित कदम, श्री. अरविंदराव पीतांबरे, श्री. बजरंग हडदरे, श्री. डी.के.पाटील, श्री. संजय पाटील, श्री. मधुकर काटकर, श्री. प्रसन्न गोखले, श्री. सुनील केळकर, श्री. बाळासाहेब लोखंडे, श्री. चंद्रशेखर पट्टणशेट्टी, श्री.नंदकुमार कुलकर्णी अशी कितीतरी नावे आहेत. यांनी अगदी अंत:करणापासून त्यांची सेवा केली. हे मला विसरता येणार नाही. आणखी एका गोष्टीचा उल्लेख याच ठिकाणी करतो. आमच्या श्रीमामांचेपासून तो आत्तापर्यंत जी सेवा त्यांनी अंगीकृत केली ती आजही सुरू आहे अशा आमच्या अंबुमावशी वाटवे यांच्या निष्ठेला तोड नाही, एवढेच मला म्हणता येईल.

भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या कृपाशीर्वादा-प्रमाणे आमचे श्रीदादा हे वयाच्या पाचव्या वर्षापासून कीर्तन करीत. इ.स.१९६२ पासून २००१ पर्यंत त्यांनी अखंड ३९ वर्षे कीर्तन केले. या



काळात श्रीदादांनी अशी काही उत्कृष्ट कीर्तने केली की या महात्म्यांनी आम्हाला अगदी कीर्तनाचे वेड लावले. आदले दिवशी ज्या महात्म्यांनी मंदिरात येऊन कीर्तन केले आणि बुधवार दि. २५-७-२००१ रोजी कीर्तन करण्यासाठी जायला निघाले पण त्यांचे अंगात त्या दिवशी ताकद नव्हती म्हणून बाहेर येऊ शकले नाहीत, पण ''अरे, कीर्तनाची वेळ झाली. आपण कीर्तनाला जायचे नाही का ?'' हा एवढाच आणि एकच प्रश्न सारखा विचारून अखंड कीर्तनाच्या अनुसंधानात ज्या महात्म्यांनी बाहेर पडवीत झालेल्या कीर्तनाची आरती आपल्या हाताने घेतली, त्या आमच्या श्रीदादांनी सायंकाळी ७-४० वा. आपले महाप्रयाण केले व ते आत्मस्वरूपात विलीन झाले.

अशा या महात्म्यांनी-आमचे श्रीदादांनी-अनेक लोकांना जी खूण दाखवली व ती त्यांना पटली त्यामुळे अनेक लोकांनी अनेक महात्म्यांनी अनेक प्रकारांनी त्यांचे उतराई होण्यासाठी जे जे केले त्यावरुन त्यांची श्रीदादांचेवर असलेली श्रद्धा-निष्ठा दिसून येते. त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

''श्रीदासराममहाराज चरितामृत'' हा ग्रंथ साकार होण्यामागे अनेक-अनेकांचे सहकार्य लाभले आहे. सगळ्यांचा उल्लेख करणेही कठिण आहे. या ग्रंथाची कच्ची मुद्रिते तपासण्याच्या कामी माझे सगळे भाऊ आणि भावजया, मुले, सुना यांनीही सहकार्य केले. विशेष उल्लेख करावयाचा म्हणजे आमचे श्री. बाळासाहेब गोखले, प्रा. डॉ. के. वा. आपटे, श्री. नारायण आपटे, श्री. सुनील केळकर, श्री. मधुकर काटकर यांनी आत्यंतिक परिश्रम घेतले आहेत. या ग्रंथातील छायाचित्रांचे बाबतीत श्री. सुधाकर रेगोडकर व श्री. दीपक केळकर यांनी खूप तसदी घेतली. श्री दासराम ऑफसेट या प्रेसचे मालक श्री. लोखंडे व त्यांचे चिरंजीव व प्रेसमधील कर्मचारी यांनी काळ-वेळेकडे न पाहता या ग्रंथाचे काम अत्यंत परिश्रमपूर्वक व चांगल्या तऱ्हेने केले आहे. या सर्वांचाच मी ऋणी आहे.

शेवटी आमचेसाठी श्रीदादांनीच श्रीपरमेश्वराकडे जे मागणे मागितले आहे ते येथे उद्धृत करीत आहे :-

नातू आणि पणतू परमार्थी व्हावे । हेच असे जीवी माझ्या देवा ।।१।।
मागणे मागतो तुजलागी देवा । केशवा माधवा नारायणा ।।२।।
दासरामाचे हे ऐकोनी वचन । जाहले प्रसन्न पितृदेव ।।३।।

हे जे काही आमचेसाठी श्रीदादांनी मागितले व हे ऐकून श्रीमामा प्रसन्न झाले, त्यातला काही ना काही भाग आमचे आत मुरावा अशी प्रार्थना माझे पितृदेव श्रीदादा व मातृदेवता सौ.वहिनी यांना करीत आहे. घडले तर ते त्यांचेच कृपेने घडणार आहे. शेवटी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व ती. प. पू. श्रीमामामहाराज केळकर या त्रैमूर्तींचे चरणी शतश: लोटांगण घालून याच ठिकाणी थांबतो.

।। राजाधिराज श्रीसद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

सांगली

श्रीदादांचा कृपाभिलाषी,
चंद्रशेखर रा.केळकर



## द्‌वितीय आवृत्ति
## प्रकाशकाचे मनोगत

माझे पितृदेव ती.प.पू.श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरित्र श्रीदासराममहाराज चरितामृत या नांवे आमच्या श्रीदादांच्या अंतरंगातील एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साधक प्रा.डॉ.के.वा.आपटे तथा आमचे ती.केशवकाका यांनी लिहिले व ते २००३ मध्ये प्रकाशित झाले आहे.

'थोर महात्मे होऊन गेले चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा ।।' या उक्तीप्रमाणे श्रीदादांचे चरित्र आपण डोळ्यांनी पाहिले आहे त्यामुळे ते पुन्हा पुन्हा वाचताना आत्यंतिक आनंद होतो व श्रीदादांच्या चरित्रातले अनेक अनेक पैलू प्रकर्षाने जाणवतात व भावतात. आणि असे चरित्र लेखन केले आहे आमच्या ती.केशवकाकांनी. खरोखर आपल्या समोर श्रीदादांना प्रत्यक्ष उभे केले आहे. यासाठी त्यांनी फार कष्टही घेतले आहेत. हे चरित्र म्हणजे ती.केशवकाकांची श्रीदासराममहाराजांचेवर असलेल्या आत्यंतिक निष्ठेची परिणती आहे.

आता हेच श्रीदादांचे जीवनचरित्र त्यामध्ये आणखी काही साहित्याची भर घालून आणि अनेक छायाचित्रे आपल्या श्रद्‌धेला भावणारी अशी घालून दुसरी आवृत्ति आता प्रकाशित होत आहे. ही दुसरी आवृत्ति सर्वांग सुंदर अशी झाली आहे. या सर्वांग सुंदर स्वरूपात ही आवृत्ति प्रकाशात आणणे कामी ज्यांनी याला श्रद्‌धायुक्त सहकार्य केले आहे त्यांचे तर आपलेवर अनंत उपकार आहेतच पण या कामी आत्तासुद्‌धा आपली प्रकृति बरी नसताना आमच्या ती.केशवकाकांनी जे श्रम घेतले आहेत त्याला तोड नाही. श्रीदादांचे सगळे साहित्य प्रकाशात आले पाहिजे ही एकच तीव्र इच्छा त्यांचे अंत:करणात आहे आणि याला तितकेच सहकार्य करीत आहेत. ती.प.पू.श्रीदादांचे नातू श्री.दीपक केळकर व प्रा.डॉ.के.वा.आपटे यांचे चिरंजीव प्रा. नारायण केशव आपटे यांनीही या कामी खूपच कष्ट घेतले आहेत. या सर्वांनाच भगवान श्रीसद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचा आशिर्वाद प्राप्त व्हावा अशी भगवान श्रीसद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती.प.पू. श्रीमामामहाराज केळकर, माझे पितृदेव

ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणी शतश: प्रार्थना आहे.

शेवटी आमचेसाठी श्रीदादांनीच श्रीपरमेश्वराकडे जे मागणे मागितले आहे ते येथे उधृत करीत आहे.

नातू आणि पणतू परमार्थी व्हावे । हेच असे जीवी माझ्या देवा ।।१।।
मागणे मागतो तुजलागी देवा । केशवा माधवा नारायणा ।।२।।
दासरामाचे हे ऐकोनी वचन । जाहले प्रसन्न पितृदेव ।।३।।

शेवटी ती.प.पू.भगवान श्रीसद्‌गुरु श्रीदासरामहाराज व मातोश्री ती.प.पू.सौ. सीतावहिनी यांना तुमच्या साऱ्या लेकरांना सांभाळा व त्यांचे वर कृपा करा एवढीच एक प्रार्थना करतो व त्यांचे चरणी शतश: लोटांगण घालून येथेच थांबतो.

।। राजाधिराज श्रीसद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।

श्रीदादांचा कृपाभिलाषी,

सांगली

***चंद्रशेखर***

(चंद्रशेखर रामराय केळकर)



# लेखकाचे निवेदन

काही संत असे असतात की अगदी बालपणापासूनच त्यांच्या जीवनात परमार्थाची प्रवृत्ति जागृत झालेली असते. याचे प्राचीन काळातील ठळक उदाहरण म्हणजे भक्त प्रल्हाद होय. असाच एक प्रल्हाद आधुनिक काळात होऊन गेला. या अर्वाचीन प्रल्हादाचे आयुष्य सांगली या गावी व्यतीत झाले, आणि तो इ.स.२००१ मध्ये ब्रह्मरूप होऊन गेला. या आधुनिक प्रल्हादाचे लौकिक नाव होते राम गोविंद केळकर. ते याच नावाने आपली सही करीत. त्यांनी स्वत:साठी 'दासराम' ही मुद्रिका वापरली आहे. इतरे जन त्यांना निरनिराळ्या नावांनी संबोधीत. श्रीदासराममहाराज हे आपल्या वयाच्या पाचव्या वर्षापासून कीर्तने करीत. ती ऐकून भारावून गेलेले श्रीरामानंदमहाराज खटावकर हे सत्पुरुष त्यांना 'प्रल्हाद' म्हणत. श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर व श्रीमहादबामहाराज पाटील यांनीही श्रीदासराममहाराजांना 'प्रल्हाद' म्हटले होते. श्रीदासराममहाराजांचे मातापिता त्यांना 'रामजी' असे म्हणत. त्यांचे मित्र वगैरे त्यांना 'राम' म्हणत. एक भक्त तर त्यांना ''रामा'' असे संबोधी. काही जण त्यांना 'रामभाऊ' अथवा 'रामराय' म्हणत. इतरे जन त्यांना 'महाराज' म्हणीत. श्रीदासराममहाराजांचे चिरंजीव त्यांना ''दादा'' असे संबोधीत. त्यामुळे श्रीदासराममहाराजांचे ''दादा'' हेच घरगुती नाव प्रचारात आले. तेच नाव ''श्रीदादा'' या स्वरूपात प्रस्तुत पुस्तकात उपयोजिले आहे.

श्रीदादा हे कुणाला ज्ञानेश्वर अथवा तुकाराम यांचे अवतार वाटत, तर इतर काही जणांना ते दत्तात्रय, शिवशंकर अथवा विष्णूचा अवतार भासत. एक गोष्ट निश्चित की श्रीदादा हे पूर्व जन्मीचे योगी होते आणि मागील जीवनात अपूर्ण राहिलेले साधन पूर्ण करण्यास ते या जगात अवतरले होते. ही गोष्ट श्रीशंकरमहाराज मिरीकर आणि श्रीगुरुलिंगगीतेतील वचने यावरून अगदी स्पष्ट होते. आणि प्रपंचात राहूनच त्यांनी परमार्थाची परमोच्च पदवी चालू जीवनात प्राप्त करून घेतली.

आपले पितृदेव श्रीमामामहाराज यांचे आज्ञेनुसार श्रीदादा नित्य हरिकीर्तन करीत. तसे करताना ''जयंत्या पर्वे महोत्सव । असंभाव्य चालवी वैभव । जे देखता स्वर्गीचे देव । तटस्त होती ।।'' हे समर्थ रामदासस्वामींचे

वचन सत्य करीत, ‘‘देवाचे वैभव सांभाळावे’’ हे समर्थ रामदासस्वामींचे वचनही त्यांनी प्रत्यक्षात आणले.

श्रीदादा हे आपल्या घरी-राममंदिरामध्ये-नित्य कीर्तन करतात; तसेच कुणी आग्रहाने बोलावले तर बाहेरचे ठिकाणीही कीर्तन /निरूपण/ प्रवचन करतात, तसेच त्यांनी अनेक आध्यात्मिक ग्रंथही लिहिले आहेत. ही माहिती सर्वसाधारणपणे इतरेजनांना होती. तथापि त्यांच्या संपूर्ण जीवनाचा आलेख सर्वांनाच माहीत होता असे नाही. श्रीदादांचे चरित्र हे अलौकिक आणि अद्‌भुत आहे. त्यांचे करवी अनेक चमत्कार घडले आणि प्रत्यक्ष त्यांच्या जीवनातही अनेक अपूर्व प्रसंग घडले. अशा श्रीदादांचे संपूर्ण जीवन हे इतरांना कळणे शक्य दिसत नाही. तथापि फूल ना फुलाची पाकळी या न्यायाने श्रीदादांच्या चरित्राचा जितका भाग कळू शकतो त्याचा मागोवा घेतला जाऊन तो श्रीदादांच्या भक्तमंडळींपुढे पुस्तकरूपाने यावा, अशी श्रीदादांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांना इच्छा झाली. ते श्री. शरद आपटे यांचेबरोबर दि. २६-२-२००२ रोजी माझे घरी आले. व त्यांनी श्रीदादांचे चरित्र मी लिहावे अशी सूचना मला केली. श्रीदादांचे विषयी मला परमादर असल्याने ती सूचना मी लगेच मान्य केली. श्रीदादांचे चरित्र लिहिण्यास उपयोगी पडणारे साहित्य त्यांनी मला उपलब्ध करुन दिले. त्यामध्ये श्रीदादांनी लेखन केलेल्या सुमारे १५० वह्या व डायऱ्या, ज्यांमध्ये श्रीदादांनी व इतरांनी नोंदी केल्या होत्या अशी सात लेजर बुके, श्रीदादांचे प्रकाशित ग्रंथ, श्रीदादांचे लेखन ज्या काही अन्य ग्रंथांत व नियतकालिकांत आले होते तो भाग, श्रीदादांची माहिती काही ग्रंथांत व नियतकालिकांत आली होती, ते सर्व त्यांनी मला उपलब्ध करून दिले. श्रीदादांच्या चरित्रविषयक काही टिप्पणांचा संग्रह मी करून ठेवला होता. श्री. चंद्रशेखरअण्णांनी काही माहिती तोंडी सांगितली व काही लेखी दिली, तसेच त्यांनी लिखित आवाहन करून भक्तमंडळींकडून काही आठवणी इत्यादि गोळा केल्या होत्या, त्यांच्या पाच फाईली झाल्या होत्या. या सर्वांचा यथायोग्य वापर करून, मी यथाशक्ति व यथामति चरित्राचा कच्चा मसुदा तयार करण्यास दि. ९-३-२००२ पासून प्रारंभ केला व तो दि. ९-६-२००२ रोजी पूर्ण झाला. जसजसे प्रकरणवार चरित्र कच्च्या स्वरूपात लिहून होत



होते, तसतसे त्याचे वाचन करून, माझी पत्नी सौ. माया आपटे, बी. ए., हिंदी सनद, आणि चिरंजीव श्री. नारायण आपटे, एम्. कॉम्., सेट्, यांनी आपले अभिप्राय सांगत काही सूचना केल्या. त्यांतील योग्य त्या सूचना अमलात आणल्या. संपूर्ण चरित्राचा कच्चा मसुदा मी श्री.चंद्रशेखरअण्णा यांना वाचण्यास दिला. त्यांनी तो अत्यंत काळजीपूर्वक वाचला व काही सूचना केल्या; त्यांचाही उपयोग चरित्र लेखनात केला गेला. नंतर संपूर्ण चरित्राची मुद्रणप्रत तयार करून मी ती दि.२३-११-२००२ रोजी श्री.चंद्रशेखरअण्णा यांचे स्वाधीन केली. त्यानंतर दि.२-१२-२००२ पासून चरित्राचे मुद्रण सुरू झाले. सौ. माया, चि. नारायण व माननीय श्री.चंद्रशेखरअण्णा या तिघांचाही मी आभारी आहे.

श्रीदादांचा पत्रव्यवहारही बराच होता. परंतु त्याचा उपयोग प्रस्तुत चरित्रासाठी करता आला नाही, ही रुखरुख मात्र मनाला आहे. हा पत्रव्यवहार यथावकाश स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावयास हवा असे वाटते.

श्रीदादांच्या चरित्रात जो काही भाग प्रत्यक्ष प्रकरणात घालणे इष्ट वाटले नाही पण जो भाग चरित्रात येणे आवश्यक वाटले, तो भाग त्या त्या प्रकरणांचे अंती पुरवणी या स्वरूपात जोडला आहे. श्रीदादांच्या भक्तभाविकांना श्रीदादांच्याबद्दल काय वाटते हे कळावे म्हणून चरित्र संपल्यावर भक्तभाविकांचे अनुभव/आठवणी दिलेल्या आहेत. श्रीदादांचेवरून केले गेलेले जे काव्य उपलब्ध झाले ते त्यानंतर दिलेले आहे.

श्रीदादा हे आपले सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना ‘चालते बोलते ब्रह्म’ म्हणीत. तेच शब्द श्रीदादांच्या बाबतीतही वापरता येतात. आपले देहधारी स्वरूप सोडून श्रीदादा आता ब्रह्मरूप झालेले आहेत. तरी ते जगदाकाररूपाने, आपल्या ग्रंथरूपाने आणि स्मृतिरूपाने आपल्या जवळ आहेतच. ही चरित्ररूप सेवा त्यांनी गोड करून घ्यावी. अशी श्रीदादांची प्रार्थना करून हे निवेदन संपवितो.

सांगली

-के. वा. आपटे

## द्वितीय आवृत्ति
## लेखकाचे निवेदन

श्रीदादांच्या इ.स.२००१ मधील निर्वाणानंतर श्रीदासराममहाराज चरितामृत या ग्रंथाची प्रथम आवृत्ति ही इ.स.२००३ मध्ये प्रकाशित झाली होती. ती लौकरच संपून गेली. या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचे बेत होत होते. परंतु काहीना काही कारणाने ते काम लांबणीवर पडले. चालू इ.स.२०११ मध्ये आज दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आला आहे. ही गोष्ट लेखक आणि प्रकाशक या दोघांनाही आनंदाची आहे. कारण संतचरित्रांच्या आवृत्ति निघणे हे जरा अवघडच असते.

श्रीदासराममहाराज चरितामृत या ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीत काही कारणाने काही भाग येऊ शकला नव्हता. तो सर्व भाग या द्वितीय आवृत्तीत अनेक परिशिष्टांच्या स्वरूपात दिलेला आहे. त्यामुळे श्रीदादांच्या विषयींच्या माहितीत बरीच भर पडली आहे. सर्व परिशिष्टांतील सर्व मजकूर श्रीदादांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव प.पू.चंद्रशेखर अण्णा यांच्या नजरेखालून गेलेला आहे.

आणखी असे :- या चरित्राच्या पहिल्या आवृत्तीसाठी अनेक फोटो उपलब्ध झालेले नव्हते. श्रीदासराममहाराजांचे नातू मा.दीपकराव चंद्रशेखर केळकर यांनी पुष्कळ प्रयत्न व खटपट करून अनेक दुर्मिळ फोटो एकत्र केले. हे सर्वच फोटो या दुसऱ्या आवृत्तीत देणे आवश्यक वाटल्याने ते सर्व फोटो या आवृत्तीत संगृहीत केलेले आहेत. या फोटोंनी या द्वितीय आवृत्तीला एक भरीव स्वरूप आणि शोभा आलेली आहे यात संदेह नाही.

खेरीज व्यक्तिनाम सूची, ग्रंथनाम सूची आणि ग्रामनाम सूची अशा आवश्यक असणाऱ्या तीन सूचीही या आवृत्तीत आहेत.

अशाप्रकारे अनेक परिशिष्टे, सूची आणि असंख्य छायाचित्रे यांनी मंडित झालेली श्रीदासराममहाराज चरितामृत ग्रंथाची ही दुसरी आवृत्ति अनेक दृष्टींनी संस्मरणीय आणि भक्त भाविकांना संगृहणीय झाली आहे यांत मला मुळीच शंका नाही. ही आवृत्ति भक्तभाविकांना पसंत पडो आणि लौकरच तिचे पुनर्मुदण करण्याचा योग येवो, अशी इच्छा येथे व्यक्त केल्याशिवाय मला रहावत नाही.

प्रस्तुत ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या माझ्या निवेदनात मी श्रीदादांच्या



विपुल पत्रव्यवहाराचा उल्लेख केला होता. आणि सांगावयास आनंद वाटतो की त्या पत्रव्यवहाराचे स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध करण्याचे मा. दीपक केळकर यांनी ठरविले आहे. तेही लौकरच मूर्त स्वरूपात येऊन वाचकांप्रत पोचो अशी प्रार्थना आहे.

श्रीदादा हे 'चालते बोलते ब्रह्म' होते. आता जरी ते देहधारी स्वरूपात आपणांपुढे नसले तरी जगद्रूप, ग्रंथरूप आणि स्मृतिरूप या स्वरूपात आहेतच. श्रीदासराममहाराज चरितामृताची ही दुसरी आवृत्ति त्यांनी गोड करून घ्यावी, अशी त्यांची प्रार्थना करून हे निवेदन समाप्त करतो.

सांगली

**के.वा.आपटे**

## ॐ उपोद्घात ॐ

भारतात असंख्य साधुसंत होऊन गेले, आत्ता वर्तमानकाळी आहेत, आणि भविष्यकाळातही होतील. ज्याने परमात्म्याचा/परब्रह्माचा/परमेश्वराचा साक्षात्कार आपल्या जीवनांत करून घेतला तो जीवन्मुक्त पुरुष म्हणजे संत होय. अशा संतांपैकी काहींनी प्रपंचात राहूनच परमार्थ केला. त्यातील काहींनी उपदेश, कीर्तन, प्रवचन, निरूपण, संभाषण वा लेखन यांतील एक अथवा अनेक मार्गांनी परमार्थ जागता ठेवला आणि परमार्थाचा मार्ग मुमुक्षु साधकांना दाखवून दिला. अशा संत महात्म्यांची चरित्रे लिहिण्याचा उपक्रम प्राचीन काळापासून चालत आलेला आहे.

आत्मसाक्षात्कारामुळे संतांचे जवळ विशिष्ट सामर्थ्य आलेले असते. त्याच्यामुळे काही चमत्कार घडले अशी नोंद त्यांच्या चरित्रात येते. या चमत्काराबद्दल काहींचे मन साफ नसते. पण अशा चमत्कारांना नावे ठेवणे हे योग्य ठरत नाही. कारण या चमत्कारांचे अनुभव लोकांना आलेले असतात आणि त्यांच्या पुरते ते खरेच असतात. म्हणून संत चरित्रातील चमत्कार ''हे सुद्धा आदरपूर्वक स्वीकारावयास हवेत; त्या दंतकथा आहेत म्हणून त्यांची टिंगल-टवाळी करू नये'', असे स्वामी तपस्यानंदांनी म्हटले आहे. (''These too are to be respectfully received and not pooh-poohed as mere cock and bull stories'' (Swami Tapasyananda, Shri Vallabhacharya, His Life, Religion and Philosophy, First Impression, Mylapore, Madras, 90).तेव्हा संतांचे चरित्रात चमत्कारांना एक विशिष्ट स्थान असतेच, हे मान्य करता येण्यासारखे आहे. चमत्काराखेरीज अन्य प्रकारांनीही संतांचा इतर लोकांवर प्रभाव पडू शकतो हेही लक्षात घ्यावयास हवे.

संतचरित्रांचा उपयोग काय असाही एक प्रश्न उद्‌भूत होऊ शकतो. त्याचे उत्तर असे की अनेक दृष्टींनी संतचरित्रे ही उपयोगी ठरू शकतात :-

१) संतचरित्रे पठण केल्याने पावित्र्य प्राप्त होते, असे ''होईन पवित्र चरित्र पठणे'' या वचनावरून कळून येते. २) संतचरित्रे वाचून संतांच्या गुणांचे अनुकरण करण्याकडे व्यक्तीची प्रवृत्ति होऊ शकते. ३) भाविकाच्या मनातील ईश्वरविषयक भक्ति संतचरित्रे वाचल्याने वाढू शकते. ४) विशिष्ट



साधनाने संत हे सिद्‌ध झाले हे संतचरित्रावरून कळल्यावर, संत-प्रणीत साधन करण्याकडे वृत्ति वळू शकते. ५) इतरांच्या गुणांचे संतानी कौतुक केले हे संतचरित्रावरून कळते. दुसऱ्याच्या गुणांची प्रशंसा ही किती महत्वाची आहे, हे ''हौ टू विन फ्रेंड्स ॲण्ड इन्फ्लुएन्स पीपल'' या डेल कार्नेजी या अमेरिकन लेखकाच्या पुस्तकावरून चांगलेच कळून येते. तेव्हा इतरांच्या गुणांचे कौतुक करण्याकडे माणसाची प्रवृत्ति होऊ शकेल. ६) सर्व परिस्थितीत संत समतोलपणाने वागले, ते स्वस्थ व समाधानी राहिले, हे संतचरित्रावरून कळते. ही किमया त्यांनी कशी साधली ती जाणून घेण्याची इच्छा होऊ शकते. ७) संतांनी ईश्वरभक्ति व नीतिमत्ता यांचा पुरस्कार केला; हे त्यांच्या चरित्रावरून कळते. त्यामुळे धार्मिक व नैतिक विचारांचा बोध वाचकाला होण्याची शक्यता आहे. असे संतचरित्राचे अनेक उपयोग होऊ शकतात.

संतचरित्रे वाचून ज्यांच्या मनावर काही परिणाम घडला अशी दोन उदाहरणे येथे प्रस्तुत करता येतील :-

पुणे येथे राहणारे श्री. सतीश खेडकर यांनी श्रीदासराममहाराजकृत श्रीज्ञानेश्वर स्तोत्र व अन्य लघु ग्रंथ हे पुस्तक इ.स.१९९७ मध्ये प्रकाशित केले. त्यातील 'प्रकाशकाचे मनोगत' मध्ये ते सांगतात :- ''मी एक विज्ञानाचा विद्यार्थी, आणि काम करतो संगणक क्षेत्रात. जिज्ञासा म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज आणि श्रीज्ञानेश्वरी हा ग्रंथ यांचा परामर्श घेणारी मराठी साहित्यातील एक दोन पुस्तके वाचली. आणि मी स्तिमित झालो. श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत जे तत्त्वज्ञान सांगितले आहे ते आचरणासाठीच, आणि आपण ते आचरणात आणण्याचा मनोमन प्रयत्न का करू नये या निष्कर्षाप्रत मी आलो. या वाचनाचा परिणाम मी श्रीज्ञानेश्वरांचा भक्त बनण्यात झाला.''

डॉ. अरविंद बावडेकर हे कॅन्सर रोगाचे मुंबईतील सुप्रसिद्‌ध सर्जन. त्यांना स्वत:लाच पोटात कॅन्सर झाला. तो बरा झाल्यावर ते एकदा मिरजेस आले होते. ''कॅन्सर : माझा सांगाती'' (मुंबई, दुसरी आवृत्ति, १ जानेवारी २००२) या पुस्तकात ते लिहितात :- ''माझ्या कॅन्सरच्या ऑपरेशननंतर काही महिन्यांनी मी मिरजेला इनामदार कुटुंबीयाकडे गेलो होतो. तिथे 'श्रीब्रह्मचैतन्यगोंदवलेकरमहाराज:चरित्र आणि वाङमय' हे के.वि.बेलसरे यांचे पुस्तक माझ्या हाती आले. .... सहजच मी पुस्तक वाचायला सुरवात

केली. आणि मग ते खाली ठेवावं असं वाटलं नाही. (पृ.१५४) ......महाराजांच्या मते समाजाला दोन प्रकारच्या माणसांची आवश्यकता असते. त्यांच्या अस्वस्थ मनाला शांत करण्यासाठी संतांची आणि त्यांच्या शारीरिक वेदना दूर करण्यासाठी वैद्य अथवा डॉक्टरांची. हे वाचलं आणि एकदम मनात आलं, म्हणजे माझाही ह्या श्रीक्षेत्र गोंदवल्याशी काही संबंध असावा. ....केवळ कुतूहल म्हणून मी गोंदवल्यास पोहोचलो. (पृ.१५५) ....महाराजांच्या समाधीपुढे उभा होतो. ....माझ्या मनातली तळमळ व अस्वस्थता शांत झाली. मी इथं येऊन काम करायचं ठरवलं (पृ.१५६).'' आणि मग डॉ.बावडेकर गोंदवले येथील 'चैतन्य रुग्णालय' मध्ये काम करू लागले.

अशी अनेक उदाहरणे असू शकतील. ती लेखननिविष्ट नसल्याने आपणापर्यंत पोचू शकली नसतील.

तेव्हा संतचरित्रे उपयुक्त ठरू शकतात असे मानण्यात अडचण नाही.

अशा प्रकारे संतचरित्रे उपयुक्त ठरत असल्याने येथे एका थोर संताचे चरित्र वाचकांपुढे मांडले आहे. हे संत म्हणजे श्रीदासराममहाराज अथवा श्रीदादामहाराज हे होत.

A



## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | **प्रकाशकाचे मनोगत** | **१** |
| | **द्वितीय आवृत्ति : प्रकाशकाचे मनोगत** | **५** |
| | **लेखकाचे निवेदन** | **७** |
| | **द्वितीय आवृत्ति : लेखकाचे निवेदन** | **१०** |
| | **उपोद्घात** | **१२** |
| प्रकरण | | पृष्ठांक |
| **१.** | **असे होते पूर्वज** | **१** |
| **२.** | **योगी जगी जन्मला** | **११** |
| | **(पुरवणी)** | **२६** |
| **३.** | **सातारा येथील साक्षात्कार आणि गुरुतृतीया** | **३०** |
| | **(पुरवणी)** | **४४** |
| **४.** | **गुरुलिंग-जंगम प्रगटले** | **४८** |
| **५.** | **दादा सिद्धपदी गेले** | **५७** |
| **६.** | **श्रीदादांची नोकरी आणि गुरुलिंगगीता जयंती** | **७१** |
| | **(पुरवणी : श्रीगुरुलिंगगीतेतील तत्त्वज्ञान, साधन व साक्षात्कार)** | **८३** |
| **७.** | **श्रीदादांच्या नोकरीची इतिश्री** | **८७** |
| **८.** | **पितृछत्र हरपले** | **९८** |
| **९.** | **श्रीदादांची नित्यकीर्तन निष्ठा** | **१०९** |
| | **(पुरवणी १ : वायुलहरीतील तत्त्वज्ञान)** | **११९** |
| | **(पुरवणी २ : श्रीमामा आणि श्रीदादा)** | **१२१** |
| **१०.** | **श्रीदादांचा मान पहिला** | **१२३** |
| **११.** | **कीर्तनात पांडुरंग नाचला** | **१३४** |
| **१२.** | **श्रीदादांची साठी-शांति व निंबरगी यात्रा** | **१४५** |
| | **(पुरवणी)** | **१५४** |
| **१३.** | **सौ. सीतावहिनींचे निर्याण** | **१५६** |
| | **(पुरवणी)** | **१६४** |
| **१४.** | **संतसहस्रनाम** | **१७१** |
| **१५.** | **श्रीदादांची मुलाखत** | **१८४** |
| **१६.** | **नाम आणि नामस्मरण** | **१९६** |
| | **(पुरवणी : श्रीदासराम गाथा : विषय परिचय)** | **२०८** |
| **१७.** | **श्रीदादांचा दुसरा अमृतमहोत्सव** | **२१२** |
| **१८.** | **प्रपंचातील श्रीदादा** | **२२८** |

| | | |
|---|---|---|
| १९. | परमार्थातील श्रीदादा | २४३ |
| | (पुरवणी : श्रीदादांचे रामनिकेतन) | २५६ |
| २०. | भक्त-भाविकांना आलेले अनुभव | २६० |
| | (पुरवणी) | २७२ |
| २१. | श्रीदादांचे लेखन | २७८ |
| | (पुरवणी : श्रीदादांचे अप्रकाशित लेखन) | २८९ |
| २२. | श्रीदादांची कीर्तने | २९१ |
| | (पुरवणी :श्रीदादांचे इ.स.१९५२ मधील एक कीर्तन) | ३०५ |
| २३. | श्रीदादांचे महानिर्वाण | ३१८ |
| २४. | श्रीदादांचे महानिर्वाणानंतर | ३२८ |
| २५. | भाविक-भक्तांच्या आठवणी-अनुभव | ३३७ |
| २६. | श्रीदादांचेवरील काव्यसंपदा | ३७९ |

*****

| | | |
|---|---|---|
| २७.परिशिष्ट – १ | भक्तानी सांगितलेले अनुभव | १ |
| २८.परिशिष्ट – २ | श्रीदादांचे काही अनुगृहीत भक्त | ३ |
| २९.परिशिष्ट – ३ | श्रीदादांचेविषयी आदर असणारी अनुगृहीतेतर मंडळी | ६ |
| ३०.परिशिष्ट – ४ | श्रीदादांचे भेटीस आलेले महनीय | ९ |
| ३१.परिशिष्ट – ५ | श्रीदादांचे शुभहस्ते झालेले कार्यक्रम | १५ |
| ३२.परिशिष्ट – ६ | श्रीदादांची तीर्थक्षेत्री/पावनस्थानी झालेली कीर्तने | १७ |
| ३३.परिशिष्ट – ७ | श्रीदादांचे तुला-समारंभ | १९ |
| ३४.परिशिष्ट – ८ | श्रीदादांच्या पाद्यपूजा | २१ |
| ३५.परिशिष्ट – ९ | श्रीदादांच्या पादुका असणारी स्थाने | २४ |
| ३६.परिशिष्ट – १० | संजीवन लहरी (त्रैमासिक), मुंबई | २५ |
| ३७.परिशिष्ट – ११ | श्रीदादांचे प्रकाशित साहित्य | २७ |
| ३८. | श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम् | २९ |
| ३९. | श्रीदासराम-अष्टोत्तर-शत-नाम-स्तोत्रम् | ३१ |
| ४०. | साधकोपयोगी ग्रंथ | ३३ |
| ४१. | श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची | ३५ |
| ४२. | चरित्रातील ग्रंथ नाम सूची | ३७ |
| ४३. | चरित्रातील ग्राम नाम सूची | ४१ |
| ४४. | चरित्रातील व्यक्ती नाम सूची | ४५ |

*****

## प्रकरण १

# असे होते पूर्वज

श्रीदादा यांनी अवतार घेतला केळकर नामक कुळात. हे कूळ मूळ कोंकणातले. केळकर या वंशाचे गोत्र शांडिल्य, वेद ऋग्वेद, शाखा शाकल, सूत्र आश्वलायन, आणि तीन प्रवर आहेत :- शांडिल, असित आणि देवल. या वंशाच्या पंचवीस शाखा आहेत. या वंशातील बरेचसे पुरुष हे शिक्षित असून,ते अनेक व्यवसाय करणारे होते व आहेत. काहीजण लेखक, कवि, तसेच संशोधक होते. अनेक स्त्रियाही उच्च शिक्षित आहेत. केळकरकुळातील लोक गोवा, कोंकण, महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात येथपर्यंत पसरलेले आहेत.

या कुळाला केळकर हे नाव कसे पडले याबद्दल मतभेद आहेत. केळकर हे आडनाव दुसऱ्या एकाद्या आडनावावरुन निघाले अगर या कुळाच्या मूळ वास्तव्याच्या गावास 'कर' हा शब्द लागून रुढ झाले, असे दिसत नाही. रत्नागिरी तालुक्यात 'केळ्ये' नावाचा एक गाव आहे; पण त्या ग्रामनामावरुन केळकर हे नाव सिद्‌ध झाले असे मानण्यास जुन्या लेखावरुन किंवा माहितीवरून काहीही आधार मिळत नाही. असे असले तरी एक शक्यता अशी दिसते :- 'कदलीकर' (केलीकर - केलकर - केळकर ) या शब्दावरून केळकर शब्द साधता येतो.

बहुतेक सर्व केळकर घराण्यांचा मूळ गाव 'नेवरे' अथवा त्या गावचा ''वाडा ढोकमळे'' हाच होय. त्यापूर्वी ''सोमेश्वर'' अथवा ''कोतवडे'' हा रहाण्याचा गाव होता, असे कोणी म्हणतात; पण या म्हणण्याला काही आधार मिळत नाही. नेवरे किंवा वाडा ढोकमळे येथून केळकर कुटुंबे रत्नागिरी जिल्ह्यातील भिन्न ठिकाणी रहावयास गेली. आणि आपल्या वस्तीची ही नवीन गावे म्हणजेच आपली मूळ गावे असे सांगू लागली.

केळकर कुळाचा कुलस्वामी सोमेश्वर आणि कुलस्वामिनी बंदिजाई याच या कुळाच्या मुख्य कुलदेवता दिसतात. तथापि पुढे केळकर कुटुंबाची जसजशी स्थलांतरे होत गेली, तसतशी त्या त्या गावच्या देवतांची गणना कुलदेवतांमध्ये केली जाऊ लागली.

केळकर कुळाचा सामान्य कुलाचार पुढीलप्रमाणे आहे :- देवाचे

दिवाळीस कुलदेवतांना आणि ग्रामदेवतांना नैवेद्य दाखविणे, आणि वर्षातून एकदा बोडण भरणे. प्रत्येक वर्षी बोडण भरणे जमले नाही तर घरात एकादे मंगल कार्य झाले की बोडण भरणे. तसेच नवरात्रात देवापुढे दिवा लावून, फुलांची माळ बांधणे. तथापि पुढे ग्रामांतरानंतर स्थलपरत्वे अथवा अन्य काही कारणांनी विशिष्ट आचार काही केळकर कुटुंबात शिरले.

कारणपरत्वे केळकर कुटुंबे निरनिराळ्या स्थळी वसतीस गेली. त्यांतील एक घराणे आचरे या गावी रहावयास गेले. या आचरे केळकर कुळातच श्रीदादांचा जन्म झाला. आचरे हे गाव रत्नागिरी जिल्ह्यातील मालवण तालुक्यात समुद्राच्या खाडीचे काठावर वसलेले आहे. (आचरे हे गाव आता सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेले आहे). हे आचरे गाव त्रिंबक या गावापासून तीन चार मैलांवर आहे. या आचरे गावात रामेश्वराचे देवालय आहे. या देवालयात दररोजचा मंत्रपुष्प म्हणण्याचे काम केळकर घराण्याकडे होते.

आचरे घराण्याचा मूळ पुरुष केशव या नावाचा होता. तो प्रथम त्रिंबक या गावी रहात होता. शके १६५० चे सुमारास तो अथवा त्यांचे पुत्र हे आचरे गावी रहावयास गेले असावेत असे दिसते. आचरे गावात वसतीस आल्यावर या घराण्यात पुढील कुलदेवता मानल्या जाऊ लागल्या :- रामेश्वर, रवळनाथ, पावणाई, ब्राह्मणदेव, गांगो, नवलाई, व सातेरी. तसेच या घराण्याच्या कुळाचारात पुढील फरक पडला :- देवदिवाळीचे दिवशी सोमेश्वर आणि बांदेश्वरी या देवतांना नैवेद्य दाखवण्याची प्रथा पडली. येथेच हे सांगण्यास हरकत नाही की श्रीदादांना श्रुत झालेल्या श्रीगुरुलिंगगीतेतील पंचेचाळीस आणि त्रेसष्ट या पदांमध्ये या कुलदेवतांतील काहींचा उल्लेख येतो. आचरे घराण्यातील गंगाधर नावाचा पुरुष हा सांगली गावी रहावयास आला. आणि सांगलीच्या या केळकर कुटुंबात पुढे अनंत-व्रत, हनुमान व्रत, असे काही आचार शिरले.

सांगलीत वास्तव्यास आलेल्या गंगाधर या गृहस्थाचे पूर्वज आणि श्रीदादांपर्यंतचे वंशज यांचा वंशवृक्ष पुढीलप्रमाणे आहे :-



| | | | |
|---|---|---|---|
| १ | | केशव | |
| २ | | महादेव | |
| ३ | | गोपाळ | |
| ४ | श्रीधर | गोविंद | आबा |
| ५ | रामचंद्र | विठ्ठल | गंगाधर |
| ६ | | | अनंत |
| ७ | | गोविंद | |
| ८ | | **राम (श्रीदादा)** | |

आचरे येथील केळकर घराण्याच्या पाचव्या पिढीतील गंगाधर गोविंद हे गृहस्थ सांगलीस वास्तव्यास आले. त्यांनी सांगली हे गाव का निवडले याची कारणे ज्ञात नाहीत. तथापि या निवडीमागे दोन कारणे असावीत असे वाटते :- (१) थोरले चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन हे मिरजेच्या पातीतून वेगळे झाले आणि त्यांनी इ.स. १८०० ते १८०५ चे सुमारास सांगली हे गाव आपल्या संस्थानचे राजधानीचे गाव केले. त्यावेळी बाहेरून लोक सांगलीत येऊ लागले. कारण त्यावेळी होतकरु पुरुषांना येथे धनार्जनास व उपजीविकेस वाव होता. (२) सांगली हे गाव धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचे होते. एका बाजूला औदुंबर व ब्रह्मनाळ आणि दुसऱ्या बाजूला हरिपुर व नरसोबाची वाडी या तीर्थ क्षेत्रांच्या मध्ये सांगली गाव येते. हरिपुर हे त्या काळी सांगलीचे हद्दीत येत असे. या हरिपुर गावी कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांचा संगम असल्याने सांगली हे गाव पुण्यक्षेत्र मानले जाई. सांगलीच्या गावभागात कृष्णानदीवर विष्णुघाट आहे. या घाटाच्या गावाकडील बाजूस पूर्वी चिंच, इत्यादि वृक्षांचे बन होते. या ठिकाणी पूर्वी सप्तर्षींनी तप केले म्हणून या बनाला 'तपोवन' हे नाव पडले असे म्हणतात. याच तपोवनात माध्व संप्रदायातील उत्तरादि मठाचे वैष्णव स्वामी सत्यव्रततीर्थ यांचे वृंदावन (समाधी) आहे.त्यामुळे माध्व संप्रदायात

सांगली हे गाव पुण्यक्षेत्रच मानले जाई. आणखी असे :- रामदास स्वामींच्या पंचायतनातील आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर हे काही काळ सांगलीत रहात होते. तेव्हा शक्यता अशी आहे की आनंदमूर्तींना भेटण्यासाठी समर्थ रामदास स्वामीसुध्दा सांगलीला आले होते आणि त्यांनी वर उल्लेखिलेल्या तपोवनाला भेट दिली होती. तसेच, रामानंद स्वामींनी वैष्णवधर्माचा प्रचार व प्रसार करण्यास भारतभर यात्रा केली होती; त्यावेळी ते कृष्णा नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने सांगलीला येऊन गेले. अशाप्रकारे, याच दोन कारणांनी गंगाधर हे सांगली गावाकडे आकृष्ट झाले असावेत आणि त्यांनी आपल्या वस्तीस सांगली हे गांव निवडले असावे.

गंगाधर गोविंद हे धार्मिक होते. परंतु त्यांना अध्यात्माची/परमार्थाची किती गोडी होती हे काही आज ज्ञात नाही. तथापि जुन्या पिढीतील प्रथेप्रमाणे ते दैनंदिन स्नान-संध्या, गायत्री मंत्राचा जप व अन्य काही जप-जाप्य करीत असावेत असे समजण्यास हरकत दिसत नाही. गंगाधर गोविंद यांचे थोडेफार मराठी शिक्षण झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वती असे होते. त्या काळात 'कवडी' ही कवडी मोलाची नसून, मोलाची मानली जात असे. गंगाधर हे कवड्यांचा व्यापार करीत अशी माहिती मिळते. या व्यापारात त्यांनी बरीच कमाई केली असावी असे दिसते. कारण पुढे त्यांच्या अनंत नावाच्या पुत्राने सांगलीतील गावभागात आपले स्वत:चे मोठे घर बांधले.

गंगाधर गोविंद यांना एकच पुत्र झाला. त्याचे नाव अनंत असे ठेवण्यात आले. अनंतरावांचा जन्म इ.स.१८६० मध्ये झाला. अनंतरावांचे दोन विवाह झाले :- (१) त्यांची प्रथम पत्नी राधा नावाची होती. तिचे माहेरचे नाव यमू. तिचे वडिल परशुराम फडके हे हरिपुर गावी रहात होते. सौ.राधाला गोविंद आणि गंगू अशी दोन अपत्ये झाली. (२) अनंतरावांच्या द्वितीय पत्नीचे नाव लक्ष्मी असे होते तिचे माहेरचे नाव कृष्णा. तिचे पिताजी जनार्दन कृष्ण आगरकर हे तासगाव नावाचे गावात रहात होते. या लक्ष्मीला काही अपत्य झाले नाही.

अनंतरावजींचे शिक्षण त्यावेळच्या मराठी व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत झाले होते. शिक्षणानंतर ते सांगलीतच एज्युकेशनल इन्सपेक्टरचे ऑफिसमध्ये हेडक्लार्क म्हणून काम करीत होते. ते हिशेबात फार प्रवीण होते असे सांगितले जाते. त्यांनी एकंदर तीस वर्षे नोकरी केली व नंतर त्यांनी पेन्शन घेतली. ते



थोडीफार सावकारीही करीत. ते सात्विक असून शिस्तीचे भोक्ते होते. स्वभावाने मात्र ते जरा कडकच होते. ''सत्त्वशील आचारशील । मातृभक्त विचारशील । व्यवहारी अतिकुशल । कडवी शिस्त ।।'' असे अनंतरावजींचे विषयी सांगितले गेले आहे.

अनंतरावांची आईवर फार भक्ति होती. त्यांच्या आईला भात फार आवडे. तिची इच्छा पूर्ण करण्यास अनंतरावजींनी बेळगावजवळील कलखांब येथे थोडीशी भातशेती विकत घेतली. त्यांनी स्वत:चे घर बांधले, आणि आपल्या मातोश्रीच्या स्मृतिप्रीत्यर्थ आपल्या घराजवळील एका विहिरीचा जीर्णोद्धार केला. तसेच त्यांनी सांगलीतील गणपतीचे देवस्थानास चार बिघे जमीन दिली.

अनंतरावजी हे धार्मिक आणि आध्यात्मिक प्रवृत्तीचे पुरुष होते. सांगलीत रहाणाऱ्या श्री. लक्ष्मण दीक्षित यांचेकडून त्यांनी पार्थिव पूजेचे व्रत घेतले होते. अनंतराव प्रत्येक दिवशी संध्या तसेच पार्थिव पूजा करीत आणि ॐ नम: शिवाय या षडक्षरी मंत्राचा दैनिक बारा हजार इतका जप करीत, आणि सोमवारचा उपवासही करीत. काही दिवस त्यांनी घरी वैश्वदेवही केला. पुढे लक्ष्मण दीक्षितांनी देह ठेवल्यानंतर, त्यांची समाधि अनंतरावांनी विष्णुघाटावर बांधवून घेतली. त्या समाधीची ते रोज पूजा करत. तसेच लक्ष्मण दीक्षितांची पुण्यतिथीही अनंतरावजी लक्ष्मण दीक्षितांचे घरी साजरी करीत. त्या प्रसंगी ब्राह्मण भोजनाचे वेळी ते पद्यात गुंफलेले लक्ष्मण दीक्षितांचे चरित्र म्हणत. हे चरित्र चाळीस कडव्यांचे असून, ते त्यांनीच रचलेले होते.

अनंतरावजींची द्वितीय पत्नी ही गोंदवलेकरमहाराजांची अनुगृहीत होती. ती वरचेवर गोंदवल्यास जात असे. तिच्याबरोबर अनंतरावसुद्धा गोंदवले गावी जात. पुढे त्यांच्यावर गोंदवलेकरमहाराजांची मर्जी बसली. गोंदवलेकरमहाराज हे आग्रह करून अनंतरावजींना गोंदवल्यास ठेवून घेत. गोंदवलेकरमहाराजांचेबद्दल अनंतरावांना अत्यंत आदर वाटे. त्यांनी गोंदवलेकरमहाराजांचे वर्णन करणारे २१ कडव्यांचे एक काव्य रचलेले आहे.

आध्यात्मिक वृत्ति असणारे अनंतराव हे टेंबेस्वामी व त्यांचे अधिकारसंपन्न शिष्य दीक्षितस्वामी यांचेकडेसुद्धा अधूनमधून जात. त्या दोघांनी एकेक रुपया प्रसाद म्हणून अनंतरावजींना दिला. हे दोन्ही रुपये आजही

केळकरांचे घरी जपून ठेवलेले आहेत.

चिमड संप्रदायाचे प्रवर्तक श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर यांचे पट्टशिष्य श्रीहणमंत पांडुरंग ऊर्फ तात्यासाहेबमहाराज कोटणीस हे मुधोळहून बेळगांव, तेरदळ अशी स्थलांतरे करीत शेवटी सांगलीत येऊन स्थिरावले. त्यांची इ.स. १९०१ पासून सांगलीमध्ये नित्य कीर्तने सुरू झाली. तेव्हा अनंतरावजी कोटणीसमहाराजांच्या कीर्तनास जाऊ लागले. पुढे त्यांनी कोटणीसमहाराजांचेकडून पारमार्थिक मार्गदर्शन घेतले व त्यानुसार ते साधनही करीत. कोटणीसमहाराज आपल्या कीर्तनात विश्रांतीचे वेळी अधूनमधून ''मौज दिसती रे'' हे पद अनंतरावजींना म्हणण्यास सांगत. कोटणीसमहाराजाविषयीचा आदर आणि भक्ति व्यक्त करणारे अनंतरावजींचे पद्य पुढीलप्रमाणे आहे :-

अज्ञ जना ताराया संतां येणे असे हरी वदले ।
सद्यस्थिति ही पहाता सांप्रत तैसे महंत मज गमले ॥१॥
गुरु अंजनीच दृष्टि स्थिर करताना घडे हा अवतार ।
हनुमंत नाम साजे जन उद्धरण्या आलेचि साचार ॥२॥
विद्वत्ता बहु असूनी वर्तन साधे कितीतरी वानू ।
भूतदया अति तरती ज्ञानी शोभती जसा नभी भानू ॥३॥
गुरु सेवारुपाने हीना दीना प्रमोद हा करती ।
छत्तीस वर्षे ऐसे कीर्तन चाले गुरुकृपेवरती ॥४॥
शके अठराशे सत्तिशी विभूती मासीच कृष्ण षष्ठीसी ।
सोमवार शुभ पाहुनी गुरुनाथे घातलेची पाठीशी ॥५॥
हीन दीन मी असता गुरुराये मज कृपेची करि धरले ।
भवव्याधि ही निरसुनी अनंताला अनंतची केले ॥६॥

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे इ. स. १९२४ मध्ये निर्वाण झाले. कोटणीसमहाराजांच्या आज्ञेनेच अनंतरावजींचे चिरंजीव गोविंद हे नित्य कीर्तन करू लागले. आपल्या पुत्राच्या कीर्तनात अनंतरावजी झांज वाजवून साथ करीत, ही गोष्ट स्मरणीय आहे.

अनंतरावजींना पुढे घशाचा कॅन्सर झाला. त्यांचे चिरंजीव गोविंद व सून सौ. इंदिरा हे त्यांचे औषधपाणी पहात आणि त्यांची सेवा शुश्रूषा करीत. इ.स. १९३४ च्या आषाढ महिन्यात श्री. अनंतरावजींनी देह ठेवला. देह



ठेवण्यापूर्वी त्यांनी एक हजार रुपये दान म्हणून ब्राह्मणांना दिले. या वर्षी आषाढ शुक्ल एकादशी ही दोन दिवस होती. एकादशीच्या पहिल्या दिवशी अनंतरावांनी आपल्या चिरंजीवाचे कीर्तनात ''शंकरा अंत करावा बरवा'' हे स्वरचित पद विश्रांतीचे वेळी म्हटले. पुढे ते पडून राहिले. त्यावेळी श्री. अंतोबा म्हैसकर यांनी अनंतरावांना विचारले, ''नाना, आठवण आहे ना ?'' त्यावेळी अनंतरावजींनी ॐ नमः शिवाय हा मंत्र उच्चारला. अशाच स्थितीत दुसऱ्या एकादशीच्या दिवशी सोमवारी अनंतरावांना घोर लागला. तरी त्यांचे हातामध्ये जपाची माळ फिरत होती. सकाळी ६ वाजता त्यांच्या हातातून माळ गळून पडली. आणि सकाळी ८ वाजता, भ्रूमध्यावर दृष्टि ठेवून, शिवस्मरण करीत अनंतरावांनी देहत्याग केला.

अनंतरावजींचे चिरंजीव गोविंद. त्यांचा जन्म शके १८१२ मध्ये झाला. गोविंदाला घरचे लोक बापू म्हणत. पुढे बाहेरचे लोक त्यांना बापूराव म्हणू लागले. गोविंदाची बहीण गंगू नावाची होती. तिचा विवाह सांगलीतीलच लक्ष्मण केशव पटवर्धन यांच्याशी झाला. सौ. गंगूताईंना नारायण आणि हरि या नावाचे दोन पुत्र होते. ते गोविंदांना मामा नावाने हाका मारीत. त्यामुळे गोविंदांचे चिरंजीव राम ऊर्फ श्रीदादा हेही आपल्या पित्याला मामा म्हणू लागले आणि मग गोविंदांचे मामा अथवा मामामहाराज असे नाव प्रचारात आले.

पूर्वीच्या इंग्रजी सात इयत्तांपर्यंत म्हणजेच पूर्वीच्या मॅट्रिकपर्यंत बापूरावजींचे शिक्षण झाले. याच काळात त्यांनी ड्रॉइंगची थर्ड ग्रेड परीक्षाही दिली व तीत ते उत्तीर्ण झाले. या शैक्षणिक काळात बापूरावजींनी शरीर सुदृढ करण्याकडेही लक्ष पुरविले. त्यांना सूर्यनमस्कार हा व्यायामाचा प्रकार आवडत असे. रोज ते सूर्यनमस्कार घालीत. सूर्यनमस्कारांची संख्या पुढे वाढत वाढत बाराशे सूर्यनमस्कार रोज घालण्याइतकी त्यांची प्रगति झाली. याच काळात भल्या पहाटे उठून कृष्णा नदीत स्नान करणे, पाण्यातच उभे राहून संध्यावंदन करणे, गायत्रीमंत्र जपणे इत्यादि धार्मिक आचारही मामा पाळीत होते. तसेच त्यांना बालपणापासून परमार्थाची आवड होती. तेव्हा अंगी वैराग्य बाणावे म्हणून गोमूत्रात तयार केलेली भाकरी आणि कडूलिंबाच्या रसाचे पान असा रूक्ष आहारही बापूरावांनी काही दिवस केला.

शिक्षण संपल्यावर बापूरावजींनी प्रथम काही दिवस सांगलीच्या मुन्सफ

कोर्टात उमेदवारी केली. दरम्यानच्या काळामध्ये सांगलीत सिटी हायस्कूल ही नवीन शिक्षण संस्था सुरू झाली. या शाळेत बापूरावजींनी शिक्षकाची नोकरी पत्करली. ते सायन्स इत्यादि विषय शिकवीत. पुढे ते या संस्थेचे आजीव सदस्य झाले. आणि काही काळानंतर ते आजीव सभासद मंडळाचे अध्यक्षही झाले. उत्तम शिक्षक म्हणून ते विद्यार्थ्यांना प्रिय होते.

बालपणापासून बापूरावजी भाविक होते. त्यांची ज्ञानेश्वरमहाराजांचे वर नितांत निष्ठा होती. ''ज्ञानेश्वर माऊली'' असे ते भजनही करीत. अशा परिस्थितीत लग्न करुन प्रपंचाच्या जंजाळात न सापडता परमार्थ करावा अशी त्यांची इच्छा होती. तसे ते घरी बोलूनही दाखवीत. पण बापूरावजींची ही कल्पना त्यांच्या मातापित्यांना आवडणे शक्य नव्हते. कारण गोविंद हा त्यांचा एकुलता एक मुलगा होता. त्याचा विवाह होऊन सूनमुख पहावयास मिळावे आणि आपला वंशवेल वाढावा अशी त्यांची इच्छा होती. म्हणून मातापिता बापूरावजींना विवाह करण्याचा आग्रह करीत होते. त्यामुळे बापूरावजी मोठ्या पेचात सापडले होते. या पेचातून सुटण्याची एक युक्ति त्यांना सुचली. ते एकदा वडिलांना म्हणाले, ''नाना, माझ्या मनात लग्न करण्याचा विचार नाही. तुम्ही तर विवाहाचा आग्रह धरला आहे. या स्थितीत मला असे वाटते :- मी आळंदीस जातो. तेथे ज्ञानेश्वरमहाराजांना कौल लावतो. ज्ञानेश्वरमहाराज जसा कौल देतील त्याप्रमाणे मी वागेन.'' बापूरावजींची ज्ञानेश्वरांवरील भक्ति अनंतरावांना माहीत होती व तो खरे सांगेल ही त्यांची खात्री होती. म्हणून अनंतरावांनी मामांची सूचना मान्य केली.

बापूरावांनी आळंदीस प्रयाण केले. तेथे त्यांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथाची पारायणे सुरू केली. मामांची निष्ठा पाहून एक दिवस ज्ञानेश्वरमहाराज मामांच्या पुढे साक्षात् प्रगट झाले. मामांचा संकल्प ओळखून ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना आदेश दिला, ''गोविंदा, घरी परत जा. आईवडिलांच्या इच्छेप्रमाणे प्रपंच कर आणि प्रपंचात राहूनच परमार्थ कर. तुझा परमार्थ पूर्ण होईल असा तुला माझा आशीर्वाद आहे.'' ज्ञानेश्वरमहाराजांचे हे वचन मामांनी प्रमाण मानले आणि ते सांगलीस परत आले. मामा उत्तम चित्रकार होते. ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना ज्या स्वरूपात दर्शन दिले त्या स्वरूपात त्यांनी ज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र काढले. हे रेखाचित्र आजही केळकरांच्या घरी देव्हाऱ्याचे वरचे बाजूस लावलेले



दिसून येते. या चित्राचे वर्णन श्रीदादांनी पुढीलप्रमाणे केले आहे :-

> काषायांबर पादुकाही चरणी मंदील तो मस्तकी ।
> कर्णी कुंडल नी गळ्यात झळके रुद्राक्षमाळा निकी।
> हातामाजी कमंडलू नि बरवा शोभे भला दंड तो ।
> गोविंदापुढती प्रकाशरुप जे त्या ज्ञानीया वंदितो ॥

सांगलीस परतल्यावर मामांनी ज्ञानेश्वरमहाराजांचा आदेश अनंतरावजींना सांगितला. तो ऐकून त्यांना आनंद झाला. लगोलग त्यांनी मामांच्यासाठी मुली पाहण्यास प्रारंभ केला. कागवाड गावी नागेश सिद्धेश्वर फाटक रहात होते. त्यांची रंगू नावाची मुलगी अनंतरावांनी मामांचेसाठी वधू म्हणून निश्चित केली. यथावकाश मामांचा विवाह सोहळा संपन्न झाला. आणि चि.सौ. कां. रंगू ही सासरी इंदिरा झाली आणि याच नावाने ती सासरच्या घरात प्रतिष्ठित झाली.

विवाहबद्ध होऊन मामा प्रपंचात पडले खरे, पण ते प्रपंचाकडे फारसे लक्ष देत नसत. त्यांनी धार्मिक ग्रंथांचे वाचन सुरू केले. ज्ञानेश्वरीचे जोडीने समर्थ रामदासस्वामींचा ग्रंथराज दासबोध, आनंदरामायण, इत्यादि ग्रंथ त्यांच्या पठणात आले. या वाचनाने एक गोष्ट मामांच्या लक्षात आली की अधिकारी सद्गुरु केल्यावाचून परमार्थाचा प्रारंभ व त्यातील प्रगति होत नाही. सुदैवाने असे सद्गुरु त्यावेळी सांगलीत होते. तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे संत रोज सांगलीत कीर्तने करीत होते. आपल्या वडिलांनी-अनंतरावांनी-तात्यासाहेबमहाराजांचा अनुग्रह घेतला आहे, हे मामांना माहीत होते. मामाही त्यांचे कीर्तनास जात असत. कोटणीसमहाराजांचे मार्गदर्शन घेण्याचे मामांनी मनाशी निश्चित केले.

मग एक दिवस मामा तात्यासाहेब कोटणीसमहाराजांकडे गेले आणि त्यांनी त्यांना विनविले, ''महाराज, मला परमार्थ करण्याची इच्छा आहे. आपण अनुग्रह करून मला मार्गदर्शन करावे.'' तेव्हा कोटणीसमहाराज म्हणाले, ''बापूरावजी, तुमचे पूर्वनियोजित गुरु चिमड पीठावर आहेत. त्यांचेकडून तुम्ही उपदेश घ्या. पुढे काही अडचण वाटली तर मजकडे या.'' कोटणीसमहाराजांच्या आदेशाप्रमाणे मामा चिमड या गावी गेले आणि चिमड पीठाचे अधिपति श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचा अनुग्रह त्यांनी घेतला. चिमडहून सांगलीस

परत आल्यावर मामांनी पारमार्थिक साधना निश्चयाने सुरू केली. पूर्वी रात्री ते कोटणीसमहाराजांचे कीर्तनास जात. आता मात्र रात्रीचा बराच वेळ मामा सांप्रदायिक साधन करण्यात व्यतीत करू लागले.

### प्रकरण १ : संदर्भ

१) केळकर कुल वृत्तांत, संपादक - सी. वि. केळकर, य. न. केळकर, पुणे, १९५२, पृ. ११, १३, ३११, ३२६, ६१२-६१७, ६३३-६४७.
२) थोरले चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांचे चरित्र, लेखक - गो. न. कुंटे, सांगली, १९७१, पृ. ३३, ३६-३७.
३) अनंत गंगाधर केळकरकृत पद्यावली, प्र. रा. गो. केळकर, सांगली, १९७३, पृ. १-४.
४) रामानंद संप्रदाय और साहित्य, लेखक-आर्. एस्. प्रजापति, आगरा, १९८४, पृ.२८.
५) फूल चैतन्याचे, ले. प्रकाश भावे, सांगली, १९९५.

## प्रकरण २

# योगी जगी जन्मला

(इ.स.१९२०-१९३३)

श्रीबापूरावजी आणि सौ. इंदिरा या नवविवाहित दांपत्याचे वैवाहिक जीवन सुखासमाधानाने चालू झाले. यथावकाश सौ. इंदिराबाईंना दिवस गेले. योग्य वेळी त्यांनी एका कन्येला जन्म दिला. ही कन्या म्हणजे लक्ष्मीचा अवतार होती असे मानले जाते.'या केळकरांचे घरात पुढे रामाचे प्रस्थ वाढणार आणि लक्ष्मीला-संपत्तीला- येथे महत्व दिले जाणार नाही', असा जणु विचार करून ही कन्या अकालीच निजधामास गेली. सौ. इंदिराबाईना अतिशय दुःख झाले.

सौ. इंदिराबाईंचे मामा श्री. महादेव रानडे हे कुरुंदवाड गावी रहात होते. त्यांचे आपल्या भाचीवर फार प्रेम होते. आपल्या भाचीचे पहिले अपत्य निवर्तल्यामुळे ती फार शोकात आहे हे कळताच त्यांनाही वाईट वाटले. हे श्री. रानडे औरवाड गावी रहाणाऱ्या वजीरबाबा या अवलिया साधूचे भक्त होते. ते वजीरबाबांचेकडे गेले व त्यांनी वजीरबाबांना सर्व हकिकत सांगितली. तेव्हा वजीरबाबा म्हणाले ''महादेवा, तुझ्या भाचीची मुलगी ही लक्ष्मी होती. आपल्या आईच्या पोटी पुढे एक विष्णुभक्त जन्मास येणार म्हणून ती निघून गेली. शोक करू नको असा तुझ्या भाचीला माझा निरोप सांग. आता मी एक खारीक देतो. ती तुझ्या भाचीला खाण्यास दे. तिच्या प्रभावाने तुझ्या भाचीला विष्णुभक्त असा पुत्र होईल. तो दीर्घायुषी होऊन आईला दिलासा देईल. तेव्हा तुझ्या भाचीने आता पुत्रजन्माची वाट पहावी.'' असे बोलून वजीरबाबांनी इंदिरामातेला देण्यास प्रसाद म्हणून एक खारीक दिली. सौ.इंदिराबाईंनी ती खारीक खाल्ली. यथावकाश त्या गर्भवती झाल्या.

श्रीदादांचे वेळी गर्भवती असतानाच सौ. इंदिराबाईंना तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचा अनुग्रह प्राप्त झाला. मातेच्या भावभावना इत्यादींचे संस्कार हे गर्भस्थ बालकावर होतात, असे आपल्याकडे मानले जाते. प्रल्हाद, अभिमन्यु ही उदाहरणे दिली जातात. सौ. इंदिराबाईंना जो अनुग्रह मिळाला आणि त्यामुळे गर्भस्थ बालकावर काय परिणाम झाला, हे सांगताना गोविंददर्शन या आपल्या ग्रंथात श्रीदादा लिहीतात :- '' माता इंदिरा भाग्यवंत।

पतिव्रता निष्ठावंत । तिजला अनुग्रह प्राप्त । हनुमत्प्रभुचा ।। शिरी आला सद्गुरु हस्त । बालराम असे गर्भात । तो निजगर्भ अनाहत । कानी पडला ।।.'' पुढे कोटणीसमहाराजांच्या अनुग्रहानंतर सौ. इंदिराबाईंनी नित्य साधन करण्यास प्रारंभ केला तसेच तुकाराममहाराजांचे नित्य पाठाचे बारा अभंग रोज म्हणण्यास सुरवात केली.

सातवा महिना लागताच सौ. इंदिराबाई प्रसूतीसाठी कुरुंदवाड गावी आपल्या महादेव मामांचे घरी गेल्या, आणि सातव्याच महिन्यात शके १८४२, श्रावण वद्य षष्ठी, गुरुवार दि. ६-८-१९२० या शुभ दिवशी रात्री दोन वाजून दहा मिनिटांनी सौ. इंदिराबाई प्रसूत झाल्या आणि त्यांनी एका पुत्ररत्नाला जन्म दिला. हे पुत्ररत्न म्हणजेच राम गोविंद केळकर ऊर्फ श्रीदासराम ऊर्फ श्रीदादा. पुराणे सांगतात की कृष्णाचा अवतार होण्यापूर्वी दाशरथि रामाचा अवतार झाला. श्रावण वद्य अष्टमी हा भगवान कृष्णाचा जन्म दिवस. त्या दिवसापूर्वी श्रावण वद्य षष्ठी रोजी ''रामाचा'' जन्म झाला, हा एक योगच आहे.

श्रीदादांचा जन्म अधिक श्रावण मासात झाला. हा अधिक श्रावण मास हा सांगली पंचागाप्रमाणे होता. कुरुंदवाड संस्थानचे अधिपति हे केरूनाना छत्रे यांचे पंचांग वापरीत; त्या पंचांगानुसार तो महिना अधिक श्रावण नसून भाद्रपद महिना होता. भाद्रपद महिन्यात कुरुंदवाड संस्थानाधिपति पटवर्धन यांचे घरी गणेशचतुर्थीचा उत्सव होता. त्या उत्सवात कीर्तन करण्यास तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे सांगलीहून कुरुंदवाडास आले होते. त्याच वेळी सौ. इंदिराबाईंचे श्वशुर अनंतरावजी हे नातवाचे मुख पहाण्यास कुरुंदवाडला आले होते. याच वेळी कोटणीसमहाराज कुरुंदवाडी आले आहेत हे कळताच अनंतरावजी त्यांच्याकडे गेले आणि म्हणाले, '' महाराज, मला नातू झाला आहे. त्याला आशीर्वाद देण्यास आपण आमचे घरी यावे.'' त्यांची विनंती मान्य करून कोटणीसमहाराज हे सौ.इंदिराबाईंचे मामाचे घरी गेले. बाळाला महाराजांच्या मांडीवर ठेवण्यात आले. '' आहेच मुळी हा बाळ आमचा,'' असे उद्गार काढून कोटणीसमहाराजांनी आपला अमृतकृपाहस्त बाळाच्या मस्तकावरून फिरविला, आणि बाळाच्या दृष्टीला दृष्टि भिडवून, त्यांनी दृष्टिद्वारा बाळावर कृपानुग्रह केला. या वेळी बाळाचे वय फक्त चौदा




दिवसांचे होते. (येथेच एका गोष्टीची आठवण येते :- निंबरगीकर-महाराजांनाही वयाचे पाचवे दिवशी काडसिद्धांचा कृपानुग्रह झाला होता). वयाचे चौदावे दिवशीच कोटणीसमहाराजांचा कृपानुग्रह मिळण्यास श्रीदादांची पूर्व पुण्याई किती जबरदस्त असली पाहिजे याचे सहजच अनुमान करता येते. आणि ''शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते । अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।।'' या भगवद्गीतेतील (६.४१-४२) या श्लोकांची स्मृति येते.


नंतर कोटणीसमहाराजांनी अनंतरावांना विचारले, ''बाळाचे नाव काय ठेवले आहे?'' ''नामकरण अद्यापि केलेले नाही,'' असे अनंतरावांनी उत्तर दिले. तेव्हा कोटणीसमहाराज म्हणाले,'' अनंतराव, या बाळाचे नाव ''राम '' असे ठेवा.'' मग महाराज आणखी बोलले, ''आमचा हा राम अगदी बालपणापासून हरिकीर्तन करू लागेल.'' असे आशीर्वचन उच्चारून कोटणीसमहाराज तेथून निघून गेले.

वरील प्रसंगानंतर यथावकाश बाळाचे बारसे थाटामाटाने झाले, आणि कोटणीसमहाराजांच्या आदेशाप्रमाणे बाळाचे राम हे नाव ठेवण्यात आले. त्यानंतर रामाची जन्मपत्रिका करून घेण्यात आली. ती पुढील प्रमाणे आहे.

**जन्मांग चक्र**



## राशि चक्र




योनि :- अश्व, गण :- देव, वर्ण :- क्षत्रिय, नाडी :- आद्य

ज्या तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी श्रीदादांना कृपानुग्रह दिला, ते होते चिमड या पारमार्थिक सांप्रदायातले. या चिमड सांप्रदायाबद्दल/पंथाबद्दल श्री. पां. वि. कुलकर्णी लिहितात, '' हा मार्ग मानवाचा आहे. मानवधर्म असे त्यास म्हणता येईल. त्यामुळे हा विश्वसंप्रदाय ठरतो. मानवाच्या कल्याणार्थ मार्गदर्शन करणारा हा पंथ आहे.''

कोटणीसमहाराजांची गुरुपरंपरा अशी होती :- कोटणीसमहाराजांचे गुरु होते रामचंद्रावजी यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज. चिमडमहाराज हे रघुनाथप्रिय साधुमहाराजांचे शिष्य. साधुमहाराजांना निंबरगीकरमहाराजांचा अनुग्रह होता. निंबरगीकरमहाराजांचे सद्गुरु काडसिद्ध. काडसिद्ध हे मरुळसिद्धांचे शिष्य, आणि मरुळसिद्धांचे गुरु रेवणसिद्ध. चिमड सांप्रदायाचा प्रारंभ सिद्धापासून झाल्याने, त्याला श्रीदादा सिद्ध संप्रदाय असेही एके ठिकाणी म्हणतात. या सिद्ध संप्रदायात श्रीदादांना स्थान मिळाले. म्हणून ते दीपलक्ष्मी मासिकातील आपल्या लेखात सांगतात की अशा परंपरेतच सहजगत्या माझा जन्म झाल्याने ही परंपरा सहजच मला लाभली आहे, हे माझे फार मोठे भाग्य आहे. या सर्व परंपरेची कृपा मजवर आहेच. तशीच ती अखंड राहो ही प्रार्थना.

सौ. इंदिराबाई रामाचे प्रसूतीनंतर तीन महिने कुरुंदवाडात राहिल्या आणि मग राम बाळासह त्या सांगलीस सासरी परतल्या. राम बाळ हळु हळु वाढू लागला. बाळाचा जन्म सातव्या महिन्यात झाला असल्याने, बाळाची प्रकृति अशक्तच होती. सातवे वर्ष लागेपर्यंत श्रीदादा जेवणही घेत नसत.



सौ.इंदिराबाई लहान रामाची रोज दृष्ट काढीत.श्रीदादा मोठे झाल्यावरही अनेकदा मातोश्री इंदिराबाई श्रीदादांची दृष्ट काढीत. विशेषत: श्रीदादांचे कीर्तन वगैरे झालेले असले की त्या हमखास दृष्ट काढीत. श्रीदादांचा वार्षिक वाढदिवसही त्यांचे मातापिता आवर्जून साजरा करीत. त्यांचा हा उपक्रम बरीच वर्षे चालू होता.

श्रीदादांना तिसरे वर्ष लागले. त्यावर्षी म्हणजे इ.स. १९२३ साली मामांनी तात्यासाहेब कोटणीसमहाराजांना आपल्या घरी भोजनाचे आमंत्रण दिले. एकदोन मंडळीसह कोटणीसमहाराज जेवणास आले. त्यावेळी श्री दादांचे बाबतीत काय घडले हे श्रीदादा स्वत:च असे सांगतात:- '' दंगा करू नको काही । ऐसे सांगते तया आई। हे साचले हृदयी । दासरामाच्या ।। रामजी बाजूस उभा राहून । प्रेमे पाहातसे न्याहाळून। आनंद मावेना पूर्ण । बोलता न ये ।। दासरामे नमस्कारिता। कर ठेविला त्याचे माथा। ऐसी ही अद्भुत सत्ता । हनुमंताची ।।'' (गोविंददर्शन, पृ.५). यावेळी कोटणीसमहाराजांची जी मूर्ति श्रीदादांच्या मनात ठसली, ती तशीच कायम राहिली, असे श्रीदादा कधी कधी आपल्या कीर्तनात सांगत.

श्रीदादांचे लहानपणीचे छंद म्हणजे देवाची पूजा आणि आरती करणे. हे पाहून मामांनी श्रीदादांना पूजेसाठी कोटणीसमहाराजांच्या पादुका, विठोबारखुमाईची मूर्ति आणि रामाची मूर्ति या दिल्या. श्रीदादा त्या मूर्तीची पूजा आणि आरती करीत, तसेच एकादा पदार्थ स्वत: खाण्यापूर्वी तो विठोबाच्या मूर्तीच्या तोंडाला प्रथम लावून मग श्रीदादा तो खात.

कोटणीसमहाराजांचे इ.स.१९२४ मध्ये निर्याण झाले. त्यांच्या निर्याणानंतर त्यांच्याच आज्ञेने मामा आपल्या घरी नित्य कीर्तन करू लागले. कीर्तनाचे वेळी श्रीदादा कधी स्वस्थ बसून कीर्तन ऐकीत तर कधी झांज वाजवून साथ करीत तर कधी कीर्तनासाठी उभे असणाऱ्या मामांच्या भोवती प्रदक्षिणा घालीत.

श्रीदादांचा लहानपणीचा बसलेला असा एक फोटो उपलब्ध आहे. तो येथे मुद्दाम दिलेला आहे.

आपल्या वयाच्या पाचव्या वर्षापासून श्रीदादा साधनास बसू लागले.

हे साधन श्रीदादांचे मनात त्यांचे वयाचे चौदावे दिवशी कोटणीसमहाराजांनी संक्रमित केले होते. तसेच, कोटणीसमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे श्रीदादा वयाच्या पाचव्या वर्षीपासूनच हरिकीर्तन करू लागले. प्रारंभीच्या या हरि कीर्तनात ''नमो गुरुनाथा नमो हनुमंता'' हे पद श्रीदादा नमनासाठी घेत. ब्रह्म, माया, साधन, साक्षात्कार असले विषय त्यांच्या कीर्तनात येत.

कीर्तनाचे जोडीने भजनही पुढे श्रीदादांनी सुरू केले. दर शनिवारी मारुतीची पूजा करून हे भजन केले जाई. तसेच पालखीही काढली जाई. भजन, पालखी इत्यादी कार्यक्रमांत श्रीदादांचे सवंगडी भाग घेत. हे सर्व पाहून मामांनी श्रीदादांना कीर्तनात वापरण्यास एक लहान वीणा आणि एक छोटी पालखी दिली. या दोन्ही वस्तु आजही श्रीदादांच्या घरी जपून ठेवल्या आहेत.

वयाच्या सातव्या वर्षी श्रीदादांचा उपनयन समारंभ मोठ्या थाटाने पार पडला. या समारंभात जे मातृभोजन झाले त्यातच श्रीदादांनी प्रथम जेवण घेतले. त्यानंतर त्यांनी नियमितपणे जेवण करण्यास प्रारंभ केला.

श्रीदादा हे पूर्वजन्मीचे योगी होते. आणि चालू जन्मी त्यांना कोटणीसमहाराजांचा अनुग्रह मिळाला होता. या दोहोंचा जणु परिपाक म्हणून श्रीदादांना वयाच्या सातवे वर्षीच ''आत्मयाची काव्यस्फूर्ति'' झाली, आणि त्यांची पारमार्थिक काव्यरचना सुरू झाली. श्रीदादांना जो पहिला अभंग स्फुरला तो गुरूचे महत्त्व सांगणारा होता. हा अभंग असा आहे :– गुरूचा पंखा असावा वरती । डंका गाजे त्रिजगती ।।१।। गुरुकृपेचे असावे छत्र । श्रीराम हालवितो सूत्र ।।२।। रामनामी रंगलिये वाणी । हेची लावण्याची खाणी ।।३।। राम म्हणे नका धरु शंका । एक हलवा गुरुपंखा ।।४।।

उपनयनानंतर लगेच श्रीदादा शाळेत जाऊ लागले नाहीत. प्रकृति अशक्त असल्याने, वयाच्या आठव्या वर्षी त्यांचे नांव शाळेत घालण्यात आले. गावभागातील श्रीदादांचे घराशेजारीच जवळ म्युनिसिपालिटीची ''शाळा नं.२'' ही शाळा होती. त्या शाळेत श्रीदादांच्या शालेय शिक्षणाचा प्रारंभ झाला. या शाळेविषयी श्रीदादांना आदर वाटे. म्हणून पुढे श्रीदादांनी या शाळा नं.२ ची आरती केली. ती त्यांच्या आरतीसंग्रह ग्रंथात पृष्ठ २८ वर आलेली आहे.

श्रीदादांना नववे वर्ष लागले. तेव्हा साधनाचे जोडीने श्रीदादांनी



दैनिक १३००० इतका रामनामाचा जप सुरू केला. रामनवमी, हनुमानजयंती अशा विशेष दिवशी अथवा पर्वकाळी श्रीदादा १३०० इतका जप अधिक करीत. तसेच प्रवासाला जायचे असल्यास, तत्पूर्वीही श्रीदादा हा अधिक जप करीत. आपला शंभर कोटि जप पूर्ण व्हावा अशी इच्छा एकदा त्यांनी व्यक्त केली होती.

श्रीदादा लहान असताना, एकदा काही कारणाने मामांना परगावी जावे लागले. त्यावेळी घरातील कुलदेवतांची पूजा करण्याचे काम श्रीदादांकडे आले. एकदा असे झाले की अजाणता त्यांनी सोवळे न नेसताच पूजा केली. असे तीन दिवस घडले. चवथे दिवशी कुलदेव रामेश्वर प्रगट झाले व ते श्रीदादांना म्हणाले, ''रामा, अशी ओवळ्याने केलेली पूजा मला आवडत नाही. तू माझ्या भक्ताचा मुलगा आणि स्वत: भक्त आहेस म्हणून मी तुला काही करत नाही. पण यापुढे असे करू नकोस.'' श्रीदादा सकाळी झोपेतून उठत असताना हा प्रकार घडला. तितक्यात श्रीमामा परगावहून परत आले. श्रीदादांनी त्यांना घडलेला प्रकार सांगितला. तेव्हा मामा म्हणाले, ''रामजी, घाबरू नकोस. रामेश्वर कृपाळु आहेत. ते आपणास काही करणार नाहीत.''

श्रीदादांच्या राहत्या घराच्या पुढील भागात श्री.बाबाण्णा सोनार या नावाचे एक सदाचारी भाविक गृहस्थ रहात असत. खटाव गावचे श्रीरामानंद–महाराज हे वरचेवर बाबाण्णांचे घरी येत. श्रीदादा लहानपणी अधून मधून कीर्तने करीत. त्यांचे एक कीर्तन ऐकण्याचा योग रामानंदमहाराज खटावकरांना आला. ते कीर्तन ऐकून रामानंदमहाराज चकित आणि आनंदित झाले. हा बालक राम पुराणातील प्रल्हादाप्रमाणे कीर्तन करतो असे त्यांना वाटून गेले आणि म्हणून ते श्रीदादांना 'प्रल्हाद' या नावाने संबोधू लागले.

रामानंदमहाराज बाबाण्णांचे घरी विवेकसिंधु, परमामृत, दासबोध इत्यादीपैकी कोणत्यातरी ग्रंथावर प्रवचन करीत. ही प्रवचने ऐकण्यास श्रीदादा अधून मधून जात. श्रीदादा प्रवचनास गेले की रामानंदमहाराज आपले प्रवचन आटोपते घेत व श्रीदादांना कीर्तन करण्यास सांगत. ते म्हणत, ''प्रल्हादा, तुझे कीर्तन मला फार आवडते.''

रामानंदमहाराजांचे समोर असेच एकदा श्रीदादांचे कीर्तन चालू होते. अचानक अपूर्व सुवास सुटला. कीर्तन संपल्यावर जमलेल्या लोकांनी

रामानंदमहाराजांना विचारले, ''महाराज, आता कीर्तनात अचानक सुगंध सुटला होता. तो का बरे ?'' त्यावर रामानंदमहाराज म्हणाले, ''या प्रल्हादाच्या चिमड संप्रदायाचे आद्य प्रवर्तक निंबरगीकरमहाराज हे कीर्तनात ''सिद्धानंद'' हे रूप धारण करून प्रगट झाले होते. त्यांच्या आगमनामुळे सुवास सुटला होता.''

असेच एकदा श्रीदादा रामानंदमहाराजांचे दर्शनास गेले होते. त्या वेळी रामानंदमहाराज सहजपणे श्रीदादांना म्हणाले, ''प्रल्हादा, तुझी कीर्तने चांगली होतात. तुला अभंगही स्फुरतात. मला असे विचारावेसे वाटते की तू संतवचनांचे हृद्गद ग्रंथरूपाने सांगशील काय?'' श्रीदादा उत्तरले, ''महाराज, आपल्या व माझ्या वडिलांच्या आशीर्वादाने आणि कोटणीसमहाराजांच्या कृपेमुळे हे काम मजकडून होईल.'' तिथून उठून श्रीदादा घरी आले. त्यांना स्फूर्ति आली, आणि त्यांनी एका बैठकीतच १३ अध्याय व १६९ ओव्या असणारा ग्रंथ दासबोधाच्या धर्तीवर लिहिला आणि त्याला 'रामदासबोध' असे नांव दिले. यावेळी श्रीदादांचे वय फक्त नऊ वर्षांचे होते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी वयाच्या १५/१६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी रचली तर श्रीदादांनी वयाचे नववे वर्षी रामदासबोध लिहिला. हा रामदासबोध ग्रंथ पुढे दि. १५-८-१९९५ रोजी श्री. बजरंग रामराव हडदरे या भक्ताने श्रीदादांच्या अमृतमहोत्सवी वर्षात प्रकाशित केला. या प्रकाशनाला दिलेल्या आशीर्वादात श्रीदादा लिहितात, ''भगवान श्रीसद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या परम कृपेने अगदी लहानपणी माझे हातून 'श्रीरामदासबोध' हा ग्रंथ लिहिला गेला. हा श्रीरामदासबोध म्हणजे रामाने केलेला बोध नव्हे तर दासरामास झालेला बोध आहे. या दृष्टीने यातील विषयाकडे आपण पहावे. हे श्रीसद्गुरूचे बोधामृत आहे की जो बोध भेटला की साधन करावे लागत नाही, ते सहज साधन होते, आणि तो साधक सहज लीलया उद्धरून जातो अशी स्थिति आहे.'' हा रामदासबोध म्हणजे ''सद्गुरूंचे बोधामृत जाण'' असे या ग्रंथातील तेराव्या अध्यायातील पंधराव्या ओवीमध्ये श्रीदादांनी सांगितले आहे.

रामदासबोध हे आपले ग्रंथरूप लेखन श्रीदादांनी आपल्या वडिलांना - मामांना - दाखविले. ते वाचून मामांनी श्रीदादांचे फार कौतुक केले. त्यानंतर श्रीदादांनी हा लघु ग्रंथ रामानंदमहाराजांना दाखविला. तो पाहून आणि वाचून



रामानंदमहाराज अत्यंत खूष झाले. या ग्रंथात श्रीदादांनी साधनाचे थोडे वर्णन केले होते. ते वाचून रामानंदांनी श्रीदादांना विचारले, ''प्रल्हादा, साधनाचे वर्णन करणारे अभंग तू रचशील काय?'' ''तात्यासाहेबमहाराजांच्या कृपेने हेही कार्य माझे हातून होईल,'' असे श्रीदादांनी उत्तर दिले. घरी आल्यावर श्रीदादांना 'साधनाचे अभंग' स्फुरू लागले. हे साधनाचे अभंग श्रीदासरामगाथा या श्रीदादांच्या अभंगसंग्रहात पृ.३६९ - ३७२ वर आलेले आहेत. या साधनाचे अभंगांचे संदर्भात श्रीदादा आपल्या अन्य एका अभंगात म्हणतात :- ''रामानंदमहाराज बोलिती माते । करी अभंग ते साधनाचे ।।१।। हनुमंत सद्गुरुराये नवल केले । अबोल वदविले निज कृपे ।।''. आणखी एका आपल्या अभंगात श्रीदादा सांगतात :- ''साधनाचे अभंग करी । रामानंद बोले कुसरी ।। राम सांगे तयाप्रती । असो आशीर्वाद प्रीती ।। हनुमंत सद्गुरु कृपे । घडे अशक्य अपापे ।। हनुमंत कृपा वाणी । बोल बोलिले वदनी ।। दासराम कर जोडून । लेई लेणे सद्गुरु वचन ।।''

वयाच्या नवव्या वर्षी श्रीदादांनी रामदासबोध रचला, याचे इतरांनाही फारच कौतुक वाटले. ते इतके की श्री.गणपतराव कानिटकर आणि त्यांचे बंधु श्री. विनायकराव कानिटकर या बंधुद्वयाने ओवी वृत्तात रामदासबोधाचे ''माहात्म्य'' रचले. गणपतराव कानिटकरांनी रचलेल्या माहात्म्य वर्णनात असा एक उल्लेख येतो :- या रामदासबोधाची श्रीदादांनी लिहिलेली वही अचानकपणे सापडेनाशी झाली. घरात कितीही शोधाशोध केली तरी वही सापडली नाही. परंतु पुढे काही काळाने ती अचानकपणे सापडली (एकोणीसशे एकतीसात । ग्रंथ झालासे गुप्त । शोधोनि थकले समस्त । परी तो सापडला नसे की ।। योगायोग अपूर्व जाण । संशयविरहित सांगतो खूण । एकोणीसशे सदतीसात ग्रंथ धन्य । पौषमासी सापडला ।।)

रामानंद-महाराजांच्या पठणात ''श्रीज्ञानदेव आज्ञापत्र'' या शीर्षकाखाली काही ओव्या होत्या. त्या श्रीदादांना फारच आवडल्या. त्या त्यांनी लिहून घेतल्या. नंतर यथावकाश श्रीदादांनी त्या ओव्यांचे स्पष्टीकरण करणारी एक टीका रचली. श्रीदादांच्या टीकेसह हे श्रीज्ञानदेव आज्ञापत्र श्रीदादांच्याच 'वायुलहरी' या ग्रंथात प्रकाशित झाले.

रामनंदमहाराजांचेबद्दल श्रीदादांना फार आदर वाटे. या आदराच्या

पोटीच श्रीदादांनी रामानंदमहाराजांचे संक्षिप्त गद्य चरित्र लिहिले. तसेच आपल्या ''श्रीसाधुचरितामृतकथासार'' या ग्रंथात रामानंदांचे चरित्र वर्णन करणारा एक ओवीबध्द अध्यायही लिहिला. रामानंदमहाराजांचे हे गद्य चरित्र आणि श्रीसाधुचरितामृतकथासार हे दोन्हीही ''परमार्थसार व अन्य ग्रंथ'' यामध्ये प्रकाशित झालेले आहेत.

श्रीदादांचे इकडे प्राथमिक शिक्षण चालूच होते. शाळेत एकदा असा प्रसंग घडला :- एका व्रात्य मुलाने श्रीदादांची खोडी काढली. परंतु ''राम मला मारतो,'' अशी तक्रार मात्र त्याने हेडमास्तरांच्याकडे केली. श्री. चिंचणीकर हे हेडमास्तर होते. त्यांना हे दोन्ही विद्यार्थी कसे आहेत हे माहीत होते. त्यांनी तक्रार करणाऱ्या मुलाला बोलावून घेतले आणि ते त्याला म्हणाले, ''राम असे कधीच करणार नाही. तू खोटी तक्रार केली आहेस.'' तेव्हा त्या मुलाने आपण खोटे बोललो हे कबूल केले.

शाळेतील श्रीदादांचे काही सवंगडी आणि गल्लीतील मुले होळीचा सण साजरा करीत. ही मुले होळीसाठी शेणी वगैरे मागण्यास आली की, श्रीदादा त्यांना २५ शेणी, ५ लाकडे, आणि एक रुपया देत. श्रीदादांनी आपल्यात सामील व्हावे असे ही मुले म्हणत. तेव्हा श्रीदादा त्यांना सांगत, ''तुम्ही अचकट विचकट उखाणे म्हणता आणि तोंडावर हात घेता हे मला आवडत नाही. म्हणून मी तुमच्यांत सामील होणार नाही.'' तेव्हा मुले म्हणाली, ''राम, निदान होळीची पूजा करण्यास तरी तू ये. त्यावेळी आम्ही स्वस्थ बसू.'' श्रीदादा म्हणाले, ''ठीक आहे. मी होळीची पूजा करतो. दुसरे दिवशी तुम्ही मला खाज्याचा प्रसाद मात्र आणून द्या.'' मुलांनी तसे केले.

शाळेतील शिक्षण चालू असताना, श्रीदादा एकदा मामांना म्हणाले, ''मामा, तुम्ही रोज कीर्तन करता. तुम्ही देव पाहिला आहे. तुम्ही मला रामाचे दर्शन करवून द्या.'' प्रथम मामा गप्पच बसले. तेव्हा श्रीदादांनी एक दिवस न जेवण्याचा सत्याग्रह केला. ते पाहून आणि श्रीदादांची योग्यता जाणून श्रीमामा म्हणाले, ''रामजी, येत्या शनिवारी तुला रामाचे दर्शन होईल.'' ते ऐकून श्रीदादांना फार आनंद झाला. तो शनिवार उजाडला. श्रीदादा व त्यांचे मित्र यांनी कमानी उभ्या करुन, त्यावर फुलांच्या माळा घातल्या. देवापुढे कुंड्या ठेवून पणत्या लावल्या. प्रसादाची व्यवस्था केली. अशाप्रकारे 'रामा' च्या



स्वागताची सिद्धता झाली. मामांनी 'रामा'ची प्रार्थना केली की त्याने ''रामजी''ला दर्शन द्यावे. संध्याकाळी अंगणात घराच्या छपरावर वानर जमले. मामा म्हणाले, ''रामाचे वानर सैन्य पुढे आले आहे. आता लवकरच राम येईल.'' अंगणात मुलांनी भजन सुरू केले. थोड्याच वेळात पश्चिम दिशेला नौकेत बसलेले व हातामध्ये धनुष्यबाण घेतलेले राम आणि लक्ष्मण दिसू लागले. मुलांना आनंदी आनंद झाला. सर्वांनी रामाची आरती केली व प्रसाद वाटला.

वरील प्रसंग घडून गेल्यावर काही दिवस लोटले. श्रीदादांनी मामांना विचारले, ''मामा, आपल्या देव्हाऱ्यात राम-सीतेच्या मूर्ति आहेत. ते खरे आहेत काय ?'' मामांनी होकारात्मक उत्तर दिले. त्याची प्रचीति पुढे श्रीदादांना अशी आली :- एके रात्री सोप्यातील देव्हाऱ्यापुढे श्रीदादा झोपले असताना, त्यांना मध्येच जाग आली. त्यांना कुणाच्या तरी बोलण्याची कुजबूज ऐकू आली. शेजारी झोपलेल्या मामांना उठवून श्रीदादांनी प्रश्न केला, ''मामा, कोण बरे बोलत आहे ?'' मामांनी उत्तर दिले, ''रामजी, देव्हाऱ्यातील राम व सीता एकमेकाशी बोलत आहेत.''

श्रीदादांच्या कीर्तन, भजन, पालखी इत्यादीमध्ये भाग घेणाऱ्या मुलांना ''राम हा आपल्यापेक्षा फार वेगळा आहे,'' असे वाटत असे. एकदा त्यातील काही मुले श्रीदादांना म्हणाली, ''राम, तू देवाचे भजन वगैरे करतोस. तू आम्हांला देव दाखवशील काय ?'' ''हो, चला,'' असे सांगून श्रीदादांनी त्या मुलांना गावाबाहेर नेले आणि वर आकाशात पहाण्यास सांगितले. वर पाहिल्यावर मुले म्हणाली, ''शंकर, मारुति, राम, गणपति यांच्या मूर्तीसारख्या आकृति आम्हांस दिसत आहेत.''

याच सुमारास कोटणीसमहाराजांचे-आपल्या गुरूचे-वर्णन करणारा पोवाडा श्रीदादांना स्फुरला. कोटणीसमहारांचे अधिकारी चिरंजीव श्रीबाबूरावजी कोटणीस यांना श्रीदादांनी तो पोवाडा दाखविला. श्रीबाबूरावजींना तो फार आवडला; त्यांनी तो पोवाडा पत्रकरूपाने छापून प्रसिद्ध केला. तसेच त्यांनी आपल्या 'कैवल्यधाम' या मंदिर-निवास-स्थानात श्रीदादांच्या पोवाडा- गायनाचा कार्यक्रम केला. त्यावेळी सांगली संस्थानातील शिक्षणाधिकारी श्री.गोखलेसाहेब यांच्या हस्ते श्रीदादांना एक चांदीचा पेला

बक्षीस म्हणून देण्यात आला. श्रीदादांच्या पोवाडा- गायनाचा एक कार्यक्रम कुरुंदवाडच्या सरकारी राजवाड्यात झाला. तेथे उपस्थित असणाऱ्या श्रीमंत राणीसाहेबांनी पारितोषिक म्हणून चांदीचे पाच बंदे रुपये श्रीदादांना दिले.

एकदा सहज श्री दादांच्या मनात आले.'' मला तात्यासाहेबमहाराजांनी अगदी बालपणी दृष्टिद्वारा कृपानुग्रह केला आहे. व त्याप्रमाणे आपण साधन करीत आहोत. पण ते बरोबर होते की नाही, हे जाणून घ्यावयास हवे.'' मग त्यांनी त्या बाबतीत मामांना प्रश्न केला. पण मामांनी त्यांना काहीच सांगितले नाही. याचे कारण असे:- साधन हे अधिकारी सद्गुरुकडून कळते. आणि स्वत:च्या गुरूने किंवा सद्गुरूच्या संप्रदायातील अन्य कोणा अधिकारी व्यक्तीने साधन सांगण्याची आज्ञा दिलेली नसेल तर साधनाविषयी अधिकारी व्यक्तीने सुद्धा काही सांगू नये असा दंडक आहे. आता मामा जरी अधिकारी सत्पुरुष होते तरी त्यांना साधन सांगण्याची आज्ञा झालेली नव्हती. म्हणून मामा श्रीदादांना म्हणाले,'' रामजी, मी कधी उपदेशानुग्रह देत नाही हे तुला माहीत आहेच. तात्यासाहेबमहाराजांचे चिरंजीव श्रीबाबूरावजी हे मात्र उपदेश-अनुग्रह करतात. आपण दोघेही त्यांच्याकडे जाऊ. तु तुझा प्रश्न त्यांना विचार.'' मग ते दोघेही श्रीबाबूरावजींकडे गेले. श्रीदादांनी त्यांना साधनास बसून दाखविले. ते पाहून श्रीबाबूरावजी बोलले, '' रामभाऊ, तुम्ही करता ते साधन अगदी बरोबर आहे. असेच चालू ठेवा.'' या प्रसंगाचे वर्णन श्रीदादांनी आपल्या श्रीगोविंदर्शन या ग्रंथात पुढीलप्रमाणे केले आहे:- ''हनुमत्कृपेकरून । माझे बालपणापासून। चालिले जे साधन । ते न्यून की खरे ।। म्हणोनीया एकवेळ । पिताजींना आदरे पुसिले । तव ते म्हणाले । प्रेम भरे ।। आपण दोघे जाऊन । विचारू बाबूरावजी लागून । ते गुरुपुत्र महान । म्हणोनी ।। बाबूरावजींना विचारिले । बैसोनी दाखविले । तव ते म्हणाले । ऐसेची चालू दे ।।''

कसे कोण जाणे लहानपणीच श्रीदादांना कुंभक[१] करावा असे वाटू

१. यौगिक प्राणायामात पूरक, रेचक आणि कुंभक, अशा तीन प्रक्रिया आहेत. पूरक म्हणजे विशिष्ट पद्धतीने श्वास आत घेणे. रेचक म्हणजे आत घेतलेला श्वास विशिष्ट पद्धतीने बाहेर सोडणे. आणि कुंभक म्हणजे श्वास शरीरात विशिष्ट पद्धतीने काही काळ रोखून धरणे.



लागले, व ते तसे करू लागले. प्राणायामाचा अभ्यास तरबेज गुरूच्या साक्षात् मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे हे श्रीदादा आपल्या दि.३१-३-१९८३ च्या कीर्तनात सांगत होते. त्यावेळी आपण केलेल्या कुंभकामुळे काय प्रसंग ओढवला हे त्यांनी असे सांगितले :- ''लहानपणी मी श्वास रोखून कुंभक साधण्याचा प्रयत्न करीत असे. एके दिवशी रात्री सौ. आई, मी, व मामा असे तिघे जेवावयास बसलो असताना, माझा श्वास जो वर गेला तेथेच कुंभक होऊन, तो काही केल्या खालीच येईना. हातात घेतलेल्या अन्नाच्या घासासह माझा हात तसाच राहिला. आता काय करावे हे मला काहीच सुचेना. तितक्यात आई म्हणाली, ''रामजी, असे काय करतोस? काय झाले तुला ?'' आईचा प्रश्न मला ऐकू आला पण माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. तेव्हा मलाच काय वाटले कुणास ठाऊक ! मी पाटावरून चट्कन उठलो व बाहेर येऊन अंथरुणावर पडलो. माझे अंग गार पडू लागले. आई आणि मामा दोघेही माझ्या मागोमाग आले. मला काय होत आहे हे त्यांनाही कळेना. त्यांची तारांबळ उडाली. ती मला दिसत होती परंतु मी काहीच करू शकत नव्हतो. चिंताग्रस्त झालेल्या मामांनी तत्काळ मारुतिमंदिराजवळ रहाणाऱ्या पटवर्धन डॉक्टरांना श्रीमती माई भागवत यांचेकडून बोलावणे पाठविले.डॉक्टर आले त्यांनी मला तपासले, पण त्यांनाही काही बोध झाला नाही. तरी त्यांनी माझ्या पाठीतील मणक्यात एक इंजेक्शन दिले. काही वेळ गेला हळुहळु माझा श्वास खाली आला. मग श्वासोश्वास नियमितपणे सुरू झाला. गार पडलेले अंग बेताबेताने गरम होऊ लागले. मग मला बोलताही येऊ लागले. मामांनी मला विचारले, '' रामजी, तुला अचानक काय झाले होते? '' मी सांगितले '' मामा, गेले काही दिवस मी श्वास रोखून धरण्याचा अभ्यास करीत होतो. आत्ता माझा श्वास वरच्यावरच राहिला.'' हे ऐकताच मामांनी मला बजावले, ''रामजी, यापुढे श्वास रोखून धरण्याचा अभ्यास ताबडतोब बंद कर.'' मग मी श्वास रोखून धरण्याचा अभ्यास बंद केला. पण एक सांगावेसे वाटते की त्या स्थितीतही मला आनंदच होत होता.''

श्रीदादा नऊदहा वर्षाचे असल्यापासून त्यांच्यावर श्रद्धा ठेवणारे काही लोक होते. ते आपल्या अडीअडचणीचे वेळी श्रीदादांचेकडून अंगारा मागून नेत. प्रारंभी अंगारा देण्याची श्रीदादांची अशी पद्धत होती :- कोणत्या

कारणासाठी अंगारा पाहिजे हे श्रीदादा विचारून घेत. नंतर अंगारा मागणाऱ्या व्यक्तीला ते कागदावर अंगारा घेऊन ये म्हणून सांगत. नंतर त्या कागदावरील अंगाऱ्यात आपली तर्जनी व अंगठा बुडवून अंगारा हलवीत, त्याचवेळी ते तोंडाने काही मंत्र पुटपुटत. मग कागदाची व्यवस्थित पुडी करून, ते ती पुडी दोनतीनदा आपल्या कपाळास लावत व मग अंगारा मागणाऱ्या व्यक्तीच्या हातात ती पुडी देत. ते पुढे सांगत,'' जर अंगारा उरला तर तो घराच्या कोपऱ्यात फुंकून टाका.'' पुढे पुढे प्रकृतीच्या कारणास्तव हे सर्व करणे श्रीदादांना शक्य होईनासे झाले.तेव्हा ते अंगारा मागणाऱ्या व्यक्तीला म्हणत, ''कागदावर अंगारा घेऊन या व मजपुढे उभे रहा आणि 'भीमरूपी महारुद्रा' हे स्तोत्र संपूर्ण म्हणा व मग अंगाऱ्याची पुडी करून मजकडे द्या.'' नंतर ते ती पुडी आपल्या हातात घेत आणि नंतर ते ती पुडी अंगारा मागणाऱ्या माणसाच्या हातात देत. समजा, अंगारा मागणाऱ्या व्यक्तीला 'भीमरूपी ' हे स्तोत्र येत नसेल, तर ते जवळ असणाऱ्या कोणा तरी माणसाला ते स्तोत्र म्हणण्यास सांगत.

श्रीदादांचा परमार्थ चालू असतानाच ते शाळेतील अभ्यासही करीत होते. यथाक्रम त्यांची मराठी चौथीची परीक्षा आली. पण परीक्षेच्या वेळी श्रीदादा आजारी पडले आणि ते परीक्षेला बसू शकले नाहीत.यावेळी त्यांचे वर्ग शिक्षक बारसवडेकर नावाचे होते आणि हेडमास्तर होते भगवानबापू दुधोंडीकर-कुलकर्णी. भगवानबापूंना श्रीदादांची चांगली माहिती होती. आजारपणामुळे श्रीदादांचे एक वर्ष फुकट जाणार हे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा भगवानबापू श्री.देशपांडे या दिपुटीसाहेबांना भेटले आणि त्यांना सर्व सांगून, त्यांनी श्रीदादाची पुन: परीक्षा घ्यावी अशी विनंती केली. त्या गोष्टीस श्री.देशपांडेसाहेब तयार झाले. परीक्षेपूर्वी भगवानबापू दिपुटीसाहेबांना म्हणाले, ''साहेब, तुम्ही आता ज्या विद्यार्थ्याची परीक्षा घेणार आहात, तो वयाने लहान असला तरी तो कीर्तन फार चांगले करतो. तुम्ही ते ऐकणार काय?'' दिपुटी-साहेबांनाही उत्सुकता वाटली. ते कीर्तन ऐकण्यास तयार झाले. दिपुटी-साहेबापुढे श्रीदादांचे कीर्तन झाले. श्रीदादांचे कीर्तन ऐकून दिपुटीसाहेब अत्यंत खूष झाले. काही किरकोळ प्रश्न विचारून त्यांनी श्रीदादांची परीक्षा घेतली व त्यांना चौथीच्या परीक्षेत पास केले.



ज्या भगवान् बापूंचा वर उल्लेख आला आहे त्यांच्या बाबतीतील एक गोष्ट येथेच सांगणे अनुचित होणार नाही:- श्रीमामांचे निर्वाणानंतर श्रीदादांचे नित्य कीर्तन सुरू झाले. त्यावेळी भगवानबापूंना सांगलीत येऊन रहाण्याचा योग आला. श्रीदादा हे नित्य कीर्तन करू लागले आहेत हे त्यांना कळले. त्यांना फारच आनंद झाला. ते श्रीदादांच्या नित्य कीर्तनाला उपस्थित राहू लागले. आणि नवलाची गोष्ट अशी की एके काळी श्रीदादांच्या शाळेचे वयस्क हेडमास्तर भगवानबापू हे श्रीदादांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांना नमस्कार करीत असत.

मराठी चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर श्रीदादांचा इंग्रजी शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला. इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी श्रीदादांचे नाव जवळच असणाऱ्या सांगली सिटी हायस्कूल या शाळेत घालण्यात आले.

## प्रकरण २ : पुरवणी

(१) सौ. इंदिराबाईंच्या प्रथम कन्येच्या अकाली निधनाबद्दल श्री.न.दा. दिवेकर लिहितात :- '' परी धगधगीत वैराग्य पाहून। म्हणे काय काम येथे राहून। जेथे संपत्तीची मनापासून । चाड नाही ।। जेथे इच्छा नाही वैभवाची । तेथे वस्ती काय कामाची । म्हणोनी त्वरा केली जाण्याची । गेली निघोनी ।।'' (गोविंदचरितमानस, ३/१३२-१३३)

(२) आपली थोरली बहीण लौकर गेली व वजीरबाबांचे आशीर्वादाने आपला जन्म झाला हे श्रीदादांना मोठेपणी कळले. या घटनांचे निर्देश श्रीदादांनी आपल्या लेखनांत पुढीलप्रमाणे केले आहेत:-

(अ) माझे जन्माचे पूर्वी। बहीण गेली पुण्य पर्वी। जिचे पायी आघवी । संपत्ती होती।। मम माता करी रुदन । तिला दुःख झाले दारुण। समाचारे समाधान । होईना तिचे ।। महादेव मामावरी । मळणगावकर कृपा करी । गाठी बांधोनी शिदोरी। औरवाडासी पातले।। वजीरबाबा महानुभाव। तेथे राहती सदैव । धरोनिया सद्भाव । चरणां नमिले ।। सांगती आपुली व्यथा । इंदिरामातेची कथा। प्रसन्नता चित्ता । बाबांच्या आली ।। तेधवा बाबांनी खारीक। मामांच्या हाती दिली बारीक । म्हणती हा प्रसाद एक । मातेसी द्यावा ।। भक्षण करता येईल फळ। सांगतो हे प्रांजळ । पोटी पुत्र लडिवाळ। असे माऊलीच्या ।। तो विष्णु भक्त होईल । हर्ष शोक जाईल । कधी न पस्तावेल । आयुवरी।। माझे मामा सद्गद । झाला बहू आमोद । पावोनिया स्वानंद । खारीक दिली।। पुढे जन्मला दासराम । हनुमत्सद्गुरुकृपा परम। श्रीगुरुलिंग जंगम । वोळले स्वये ।। (गोविंददर्शन )

(आ) वजीरबाबांचिया कृपे जन्म झाला । (दासरामगाथा,पृ.१३५)

(इ) केवळ तव कृपे । दासराम जन्मा आला ।। (वजीरबाबांची आरती, आरतीसंग्रह, पृ.४४)

(३) कुरुंदवाड ग्रामी श्रीदादांच्या चौदाव्या दिवशी त्यांना तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचा अनुग्रह लाभला, इत्यादि घटनांचे वर्णन अन्य ग्रंथात आले आहे तसेच ते श्रीदादांनी आपल्या काही लेखनातही केले आहे, ते येथे पुढे दिले आहे:-

(अ) अनेक जन्मानी हा देह प्राप्त झाला आणि त्यात हनुमंतसद्गुरूंनी कृपा केली (गुरुलिंगगीता,पृ.४३-२)



(आ) श्रीदादांचे पितृदेव सांगतात:- '' असो सिद्धगुरूंचा कृपाकर । पडेल जरी मस्तकावर । तरी आपुले अंतरीचे साधन थोर । प्रगटविती त्याचे अंतरी ।। आपुले अंतरीचे देती । याची आली आम्हा प्रचीती । राम बाळपणापासुनी प्रेम धरूनी चित्ती। कृपाकरे कीर्तन करू लागला ।। (हनुमद्गुरु-चरित्रबोधसार, १०-६३-६४)

(इ)श्रीनीलकंठ भारती चरित्र या ग्रंथाला दिलेल्या आशीर्वादपर शब्दात श्रीदादा लिहितात:- माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर यांचे पोटी माझा औरवाड येथील विदेही साधु श्रीवजीरबाबा यांचे आशीर्वादाने जन्म झाला. भगवान् सद्गुरू श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांनी मला चौदावे दिवशी कुरुंदवाडास आले वेळी घरी येऊन मांडीवर घेतले व मस्तकावर आपला वरद हस्त फिरवून दृष्टिद्वारा कृपानुग्रह केला. व हा राम आमचाच आहे, हा बालपणापासून कीर्तन करू लागेल असा कृपाशीर्वाद दिला.

(ई) गोविंद दर्शन या आपल्या ग्रंथात श्रीदादा सांगतात:- हनुमत्प्रभु आले घरी । प्रकाश उजळला भीतरी । तया भाग्याची सरी। वर्णवेना।। होवोनीया सस्मित वदन। बालका मांडीवर घेऊन । मस्तकी हस्त ठेवून । दृष्टीसी दृष्टि दिलीसे।। प्रेमे बालका कुरवाळून । म्हणती हा बालपणापासून। करू लागेल हरिकीर्तन। वेदांत सांगेल।। जे असे माझे अंतरी । ही प्रभु रामाची कृपा खरी । उमटली बाळाचे अंतरी । काय सांगो ।। म्हणोनी या बालकाचे नाम । अंताजीपंत ठेवा राम । ऐसे बोलून सप्रेम । सांगितले ।।

(उ) तात्यासाहेब कोटणीसमहाराज यांचेवरुन श्रीदादांनी केलेला पोवाडा :-

आधी नमू गणरायांना सरस्वतींना सीतारामांना ज्ञानेश्वर - रामदासांना तुकोबारायांना ।। जीजी ।। मग नमू मूळपीठिकांना रेवणसिद्धांना मरुळसिद्धांना काडसिद्धदेवरायांना देवरायांना ।। जी ।। मग नमू संत महात्म्यांना निंबरगीकरांना साधुमहाराजांना मग नमू रामभाऊमहाराजांना रामभाऊमहाराजांना ।। जी ।। मग नमू संतजनांना संतजनांना संतजनांना योगिराज हनुमंतरावांना रघुनाथांना ।। जी ।। मग नमू बलभीमांना एकनाथांना थोर पुरुषांना वीरयोद्धे शूर पुरुषांना राष्ट्रभक्तांना ।। जी ।। मग नमू थोर पुरुषांना वाडवडिलांना मातापितर मामांना बालरामे केले या कवना लागतसे चरणा ।। जी ।। धन्य धन्य सद्गुरुमूर्ती हनुमंतमूर्ती हनुमंतमूर्ती, तिन्ही लोक प्रेमाने गाती हनुमंताला ।। जी ।। हनुमंत फार प्रेमळ अतिसोज्वळ ज्यांनी घातियेला हो काळ रामनामात ।। जी ।। ज्याने पाजविले अमृत घालुनी मुखात मुखात ।। जी ।। नेती त्याला अंतरीच्या मार्गी एकवीस स्वर्गी एकवीस स्वर्गी नेलेसे त्या

चंद्रभागी दावी मार्गाला ।। जी ।। दया क्षमा शांतीचा पुतळा शांतीचा पुतळा शांतीचा पुतळा जिंकू शके कळिकाळाला ऐसा हनुमंत ।। जी ।। तरी लोक हे वेडे असती हे वेडे असती हे वेडे असती इंगळाच्या अंथरुणी हो झोप हे घेती ।। जी ।। सदा असती हरिभजनात हरिभजनात हरिभजनात आपण घेऊनि लोका पाजत हूं हूं म्हणूनी ।। जी ।। छत्तिस वर्षे केले कीर्तन अमृत घेवून अमृत सेवून लोका पाजुनिया जाण केले गमन ।। जी ।। तया कैचे जन्ममरण जन्ममरण जन्ममरण नाम घेता देवची जाण ।। जी ।। रामकार्य केले हो जाण लंका शोधन अहो मारुनिया रावण दास हनुमान ।। जी ।। हनुमान अवतरला अवतरला अवतरला, संसारात देव जिंकियेला डंका गाजविला ।। जी ।। साधुसंत अजरामर अजरामर अजरामर ज्याचे नाव घेता हो थोर घेताती थोर ।। जी ।। पाण्यामध्ये झोप घेतो कैसा अहो हा मासा अहो हा मासा अहो जाता तयाच्या वंशा तेव्हा कळेल ।। जी ।। माझी वाणी होत अपुरी होत अपुरी होत अपुरी ये या सूर्या काजव्याची सरी काय देवू मी ।। जी ।। त्याचे काय वर्णू मी गुण वर्णू मी गुण वर्णू मी गुण काय असती हो लहान कोण वर्णेल ।। जी ।। सद्गुरुसी जाता हो शरण जाता हो शरण जाता हो शरण, तुटती बंधन बालरामे केले हे कवन अत्युत्प्रेमाने ।।जी।।

## श्रीदासराम-गुरु-परंपरा-नमनम्

नमामि रेवणं सिद्धं जगत: प्रथम गुरुम् ।
सोमेश-पिंडि-संभूतं जगदुद्धारक- प्रभुम् ।।१।।
प्रणौमि मरुळं सिद्धं माया- मोह- विधायकम् ।
रेवण-प्रभुतो जातं तच्छिष्यं वर- दायकम् ।।२।।
शिष्य श्रीकाडसिद्धं तं मरुळ-प्रभु- योगिन: ।
मायाया मर्दनं वंदे गुरुलिंगस्य देशिकम् ।।३।।
शिष्यं श्रीकाडसिद्धस्य भक्त-रक्षण-तत्परम् ।
केशवो वंदते नित्यं गुरुलिंगं गुरुं वरम् ।।४।।
रघुनाथप्रियं साधुं गृहीत-जटिल - व्रतम् ।
स्वरूपं रामदासस्य नमामि नत-मस्तक: ।।५।।
रामचंद्रं गुरुं नौमि रामस्य धृत-तेजसम् ।
अवतारं एकनाथस्य चिम्मड-ग्राम- वासिनम् ।।६।।
हनुमंतमुपासेऽहं शिष्यं रामस्य श्रेष्ठकम् ।
गुर्वाज्ञया प्रकुर्वाणं नित्यं श्रीहरिकीर्तनम् ।।७।।



अनंततनयं गौरं शिष्यं नारायण-प्रभो: ।
अखंडकीर्तने मग्नं गोविंदं प्रणमामि तम् ।।८।।
गोविंदस्य सुतं श्रेष्ठं हनुमत्पाद-सेवकम् ।
इंदिरानंद - दातारं रामे वंदे परं गुरुम् ।।९।।

- के.वा.आपटे.

## प्रकरण २ : संदर्भ

१) गोविंद चरित मानस, ले. न.दा. दिवेकर, सांगली, १९६३, ३. १३२-१३३
२) श्रीगोविंद दर्शन, दासराम, सांगली,१९८८,पृ.३,५,८.
३) आरती संग्रह, सं.डॉ. के.वा.आपटे, सांगली,२००२, प्रथम आवृत्ति, पृ.४४
४) श्रीदासरामगाथा, सं.सौ.श्यामला पटवर्धन, सांगली, १९८८, पृ. १३५,१६०,३६९.
५) श्रीगुरुलिंगगीता, प्र. श्री.वि.सहस्त्रबुद्धे, सांगली, १९८५, ४३.२.
६) भगवद्गीता, ६.४१-४२.
७) हनुमद्गुरुचरित्र बोधसार, ले.गो.अ. केळकर, सांगली, १९३७, १०.६३-६४
८) श्रीनीलकंठभारती चरित्र, ले.शाम पवार, अंबवडे, प्रथमावृत्ति, २२-१२-१९८८, दासराम यांचा आशीर्वाद, पृ. ३
९) श्रीगोविंदर्शन, ले. दासराम, सांगली, १९८८, पृ. ३,५,८.
१०) कर्नाटक महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय, ले. पां.वि. कुलकर्णी, सांगली, १९७८,पृ.२२.
११) दीपलक्ष्मी (मासिक) श्रीमामामहाराज केळकर विशेषांक,सं.रायकर, फेब्रुवारी, १९७१, पृ. २८, ६५
१२) वही क्रमांक ९,१०७
१३) दासराम गौरव ग्रंथ, प्र. धनंजय भावे, कोल्हापूर, १९८०, पृ. ३-६.
१४) श्रीरामदासबोध, प्र.ब.रा. हडदरे, सांगली, १९९७
१५) परमार्थसार व अन्य ग्रंथ, सं. के.वा.आपटे, सांगली,२००२
१६) केशवलिखित दासरामचरित्र टिप्पणे.
१७) वायुलहरी, ले. रा.गो.केळकर, सांगली, आवृत्ति पहिली,१९६९

## प्रकरण ३

# सातारा येथील साक्षात्कार आणि गुरुतृतीया

(इ. स. १९३४ ते १९३८)

श्रीदादा सिटी हायस्कूलमध्ये जाऊ लागले. तरी अद्यापि त्यांच्या अशक्त प्रकृतीत काही फरक पडलेला नव्हता. ही गोष्ट मामांचे मित्र श्री. गंगाधररावजी सिंग यांचे लक्षात आली. सिंग हे व्यायामाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी ठरविले की श्रीदादांचेकडून व्यायाम करवून घेऊन त्यांची प्रकृति सुदृढ करावयाची. या गोष्टीला त्यांनी मामांची संमति घेतली, मग पुढे काय काय घडले हे श्रीदादांच्या शब्दातच वाचू या. ''मला व्यायामाची व फिरण्याची सुद्धा आवड नव्हती. पण काही सूर्यनमस्कार व एक जोर आणि दोन बैठकांपासून दीडशे जोर व तीनशे बैठकांपर्यंत सुमारे चार महिने या गंगाधररावांनी मजकडून व्यायाम करवून घेतला. श्री. पंढरीनाथ मणेराजुरीकर हेही मजबरोबर व्यायाम करण्यास येत असत. कृष्णामाईचे स्नान करून आम्ही दोघे व्यायामास जात असू. यानंतर दोनशे जोर व चारशे बैठका जेव्हा त्यांनी (=गंगाधररावांनी) मला काढण्यास सांगितल्या, तेव्हापासून व्यायाम हा शब्द देखील आपण काढला नाही. कारण तो व्यायाम मला पेलवणे शक्य नव्हते.'' यानंतर श्रीदादांनी व्यायामाला जो रामराम ठोकला तो शेवटपर्यंत.

सिटी हायस्कूलमध्ये शिकत असताना श्रीदादांना काही मित्र लाभले. श्री. गणेशराव केळकर, श्री. हरिभाऊ गाडगीळ, श्री. वि. ह. माईणकर, श्री. ना. द. लिमये, श्री. मनोहर मंगळवेढेकर, इत्यादि. वसंतराव पाटणकर या आपल्या मित्राचा उल्लेख श्रीदादांनी आपण लिहिलेल्या श्रीबाबासाहेब मुजुमदार यांच्या चरित्रात केला आहे. त्यावेळी सिटी हायस्कूलमध्ये असणाऱ्या श्री. केशवराव दीक्षित या शिक्षकांचा उल्लेख श्रीदादा करीत असत. श्री. न. दा. दिवेकर हेही एक शिक्षक तेथेच होते. ते श्रीदादांचे घराजवळच रहात. काही दिवस श्रीदादा त्यांचेकडे शिकवणीस जात असत.

सिटी हायस्कूलमध्ये गेल्यावर संस्कृत, बीजगणित, शरीरशास्त्र असे काही नवीन विषय श्रीदादांच्या अभ्यासात आले. ते शरीरशास्त्राला 'हडूकशास्त्र' असे म्हणत. संस्कृत भाषा ही देववाणी म्हणून तिच्याबद्दल श्रीदादांना आस्था



वाटे. जरी श्रीदादांची संस्कृत भाषेत फारशी प्रगति झाली नाही तरी पुढे इतरांकडून त्यांनी काही संस्कृतमधील काव्य करवून घेतले आणि आपली संस्कृतविषयीची आवड व्यक्त केली.

श्रीदादा ज्यावेळी इंग्रजी शाळेत होते, त्यावेळी इंग्रजी शाळेत इयत्ता ४ ते इयत्ता ७ अशा इयत्ता असत. सातव्या इयत्तेला मॅट्रिक अथवा मॅट्रिक्युलेशन वर्ग म्हटले जात असे. ही मॅट्रिकची परीक्षा मुंबई विद्यापीठ घेत असे.

श्रीदादा सिटी हायस्कूलमध्ये शिकत असताना, त्यांनी अभ्यासासाठी वापरलेल्या काही वह्या आजही उपलब्ध आहेत. इयत्ता चौथी, पाचवी, सहावी, व सातवी, त्या इयत्तांची शाळेतील तुकडी व अभ्यासाचा विषय यांची कव्हरवर नोंद असणाऱ्या या वह्या आहेत. या वह्यांतून केवळ अभ्यासाचे विषयच श्रीदादांनी लिहिले आहेत असे दिसत नाही. तर या वह्यांतून अभ्यासाचे विषयांचे जोडीने श्रीदादांनी आपले पारमार्थिक लेखनही लिहून ठेवलेले आढळून येते. उदा.-दिनांक ३-२-१९३५ तारीख असलेल्या चौथीच्या वहीत ''हातचे का सोडता?'' या निबंधाबरोबरच अनेक अभंग लिहिलेले आहेत. इयत्ता पाचवीच्या वहीमध्ये ''कोटणीसमहाराजांचे स्वभावचित्र'' आहे. इयत्ता सहावीच्या भूगोल आणि निबंधलेखन यांच्या वह्यांमध्ये मराठीतील आठ निबंध आहेत, परंतु भूगोलाच्या वहीमध्ये काही अभंग व मनाचे श्लोक लिहिलेले आहेत. या वहीतील एका पद्याखाली १३-३-३७ अशी तारीखही लिहिलेली आहे. इ.स. १९३६-३७ सालच्या एका वहीत Opening Day Of My School, A Rainy Day in Summer, My Town, Fortune Telling असे चार इंग्रजीतील निबंध व एक पत्र झाल्यावर, उरलेल्या वहीच्या भागात अभंग आहेत. इयत्ता सातवीच्या मराठी विषयाच्या वहीत दोन निबंध असून, तेथे पुढे 'उद्धवरावजी यरगट्टीकर यांचे चरित्र' लिहिलेले आहे. इयत्ता सातवीच्या म्हणजेच मॅट्रिकच्या इंग्लिश काम्पोझिशन विषयाच्या वहीत Cleanliness या विषयावरील इंग्रजी निबंधानंतर अभंग आहेत. इयत्ता सातवीच्या ९-७-१९४० आणि २६-९-४० अशा तारखा असणाऱ्या भूगोल या विषयाच्या दोन वह्या आहेत. या पैकी ९-७-१९४० च्या वहीत भूगोलाच्या दोन प्रश्नांची उत्तरे आहेत. ती तपासणाऱ्या शिक्षकाच्या नावाची आद्याक्षरे आहेत, आणि 'अक्षर वाईट' असा शिक्षकाचा अभिप्राय दिलेला आहे. याच

वहीत ''आत्मसुधा'' हे आध्यात्मिक प्रकरण आणि काही अभंग आहेत. तर २६-९-४० च्या वहीत प्रथम ''जगाचे नैसर्गिक विभाग'' इत्यादि सांगणारा भाग आहे, आणि नंतर काही अभंग आहेत. कव्हरवर इयत्ता क्रमांक लिहिलेल्या असणाऱ्या वह्यांच्या जोडीने श्रीदादांच्या अन्य काही- वही क्रमांक ३२, ३३, ३५, ३९, व ४५ - वह्या आहेत. या वह्यांच्या कव्हरवर इयत्ता लिहिलेली नाही. पण त्यात काही अभ्यासाचे विषय आहेत, तसेच पारमार्थिक लिखाणही आहे. जसे :- वही क्रमाक ३२ मध्ये Stocks and Shares यांवरची गणिते, बीजगणिताची सोडवलेली उदाहरणे असून, त्यानंतर अभंग लिहिलेले आहेत. वही क्रमांक ३३ मध्ये बीजगणित विषयाच्या उदाहरणानंतर 'अलख निरंजन दर्शन', आणि 'नित्यपाठ' अभंग आहेत. वही क्रमांक ३५ मध्ये, बीज-गणिताच्या उदाहरणानंतर ''आत्मसुधा'' हे पुन: लिहिलेले प्रकरण आहे, तसेच काही अभंग आहेत; वही क्रमांक ३९ मध्ये, 'अनत्याचार' या निबंधानंतर अभंग आहेत. आणि भूमितीची काही उदाहरणे व संस्कृतचे मराठीत भाषांतर झाल्यावर काही अभंग वही क्रमांक ४५ मध्ये आहेत.

श्रीदादांच्या अभ्यासाच्या वह्यांतील लेखनाचा भाग वर मुद्दाम तपशीलवार दिला आहे याचे कारण असे की अभ्यासाच्या विषयांपेक्षा साधन तसेच आध्यात्मिक लेखन यांकडेच श्रीदादांचे लक्ष अधिक प्रमाणात होते, हे चट्दिशी लक्षात यावे. साहजिकच एकादी वार्षिक परीक्षा श्रीदादा उत्तीर्ण झाले नसतील तर त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. इ.स. १९३९ सालच्या 'लोकमान्य विद्यार्थी डायरी' (= वही क्रमांक १६) मध्ये श्रीदादांनी केलेल्या काही नोंदींत अशी एक नोंद आहे :- ''या वर्षी परीक्षेत यश आले नाही.'' इ.स. १९३९ मध्ये श्रीदादा मॅट्रिकच्या वर्गात होते आणि पुढे ते त्याच वर्गात राहिले.

श्रीदादा ज्या काळात सिटी हायस्कूलमध्ये शिकत होते त्या काळात त्यांचे साधन, नैमित्तिक कीर्तन आणि आध्यात्मिक लेखन चालूच होते. या खेरीज या काळातच त्यांच्या जीवनात पारमार्थिक दृष्टीने महत्त्वाच्या अशा काही घटनाही घडत होत्या.

घोसरवाड या गावी गोविंदपंत कुलकर्णी, घोसरवाडकर हे एक



अधिकारी संत होते. ते चिमडच्या नारायणमहाराजांचे शिष्य होते. त्यांच्या अंगात हालसिध्दांचा संचार होत असे. इ.स. १९३७ च्या सुमारास गोविंदपंत हे मामामहाराज केळकर यांचेकडे आले होते. त्यांना नमस्कार करण्यास श्रीदादा पुढे गेले. गोविंदपंतांनी श्रीदादांचा हात धरून त्यांना नमस्कार करू दिला नाही. तेव्हा श्रीदादा त्यांना म्हणाले ''महाराज, आपण मला नमस्कार का करू देत नाही?'' यावर श्रीगोविंदपंत उद्गारले, ''अहो रामभाऊ, मला तुमच्या डोळ्यांत आत्मतेज दिसत आहे. तेव्हा तुम्ही मला नमस्कार करू नका.''

श्रीदादांची प्रकृति प्रथमपासूनच बेतात होती. इ.स. १९३७ च्या वैशाख महिन्यात ती बरीच बिघडली. तेव्हा सांगलीतील प्रसिद्ध डॉक्टर देसाई यांना त्यांची प्रकृति दाखविण्यात आली. श्रीदादांची तपासणी झाल्यावर डॉ. देसाई म्हणाले, ''मी आत्ता औषध देतो. औषधाने ते बरे होतील. पण नंतर त्यांना हवापालट करू दे. म्हणजे त्यांची प्रकृति चांगली सुधारेल.'' औषधाने श्रीदादांची प्रकृति सुधारली. मग हवापालट करण्यास कुठे जावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. तो प्रश्न असा सुटला :- मामांची बहीण म्हणजे श्रीदादांची आत्या गंगूताई सांगलीसच होती. तिचे एक नातेवाईक सातारा या गावी रहात होते. सौ. गंगूताई मामांना म्हणाल्या, ''गोविंदा, आपला राम हा हवापालटास सातारला माझ्या नातेवाईकाकडे जाऊ दे.'' ते मामांना पसंत पडले. तेव्हा आपले आतेबंधु नारायण आणि हरि यांना बरोबर घेऊन श्रीदादा साताऱ्यास श्री. वासुदेवराव छापखाने यांचेकडे जाऊन राहिले. हळुहळु त्यांची प्रकृति सुधारत गेली.

सातारा येथे राहात असताना एकदा श्रीदादांचे मनात आले :- ''पूर्वी एकदा मामांनी मला रामाचे सगुण दर्शन घडविले होते. आता कोणत्यातरी पूर्वकालीन संतांचे दर्शन मला व्हावे, व त्यांनी मला काहीतरी बोध करावा.'' ही श्रीदादांची इच्छा लौकरच पूर्ण झाली ती अशी :-

श्रीदादांना दि. २१-५-१९३७ रोजी रात्री एक स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना असे दिसले :- ''नुकताच अरुणोदय झाला आहे. आपण एका डोंगराच्या पायथ्याशी उभे आहोत. डोंगराच्या बाजूंवर गाई चरत आहेत. त्याच वेळी श्रीतुकाराममहाराज हे डोंगराचे माथ्यावरुन खाली उतरून येत आहेत. त्यांना पहाताच श्रीदादांनी त्यांना साष्टांग दंडवत घातले, व ते हात जोडून त्यांचेपुढे

उभे राहिले. तुकाराममहाराजांनी एक अभंग उच्चारून श्रीदादांना बोध केला आणि तुकाराममहाराज अंतर्धान पावले.'' तो अभंग ऐकता ऐकताच श्रीदादांनाही पाठ झाला. व मग जागे झाल्यावर तो अभंग त्यांनी लिहून ठेवला. हा अभंग असा आहे (हा अभंग दासराम गाथा ग्रंथात पृ. ३७७ वर आहे.) :-

करितो वंदन विठ्ठलचरणा । तोचि सत्य जाणा मायबाप ॥१॥
देवाचे आज्ञेने बोलितो मी ज्ञान । जेथे ब्रह्मज्ञान तुच्छ होय ॥२॥
अंतरी बाहेरी होवोनि निर्मळ । म्हणिजे विठ्ठल एकचित्ते ॥३॥
देव आहे एक नव्हेचि अनेक । विठ्ठल राम देख दुजा नाही ॥४॥
उच्चारिता राम होईजे आराम । होसी पूर्ण काम गुरुकृपे ॥५॥
माय बाप राम जगासी आराम । विश्रामाचे धाम मूढ जीवा ॥६॥
बालरामा तूज सांगतो मी खूण । करिजे साधन एकनिष्ठे ॥७॥
देव नाही सोपा देव नाही सोपा । भेटिल्याची खेपा चुकतील ॥८॥
स्वप्नामाजी तुज अभंगप्रसाद । दिलासे आनंद नित्यसेवी ॥९॥
श्रद्धावंत जरी चिंतिती अभंग । तरी होय भंग दुष्ट माया ॥१०॥
आशिर्वाद बोले तुका भाविकासी । चिंतिती मानसी हरिनाम ॥११॥

श्री. गणपतराव कानिटकर यांनी ''कीर्तनानंद मामा'' यांचे चरित्र लिहिलेले आहे. त्यामध्ये पुढील नोंद आहे :- ''यानंतर इ.स. १९३७ साली आषाढी एकादशीस पहाटे श्रीदादांच्या स्वप्नात निंबरगीकरमहाराज आले. महाराजांनी त्यांना काही बोध केला. हा बोध श्रीदादांनी एका अभंगात ग्रथित केला आहे. हा अभंग असा (हा अभंग दासरामगाथा ग्रंथात पृ. ३७६ वर आहे.) :- गुरु नारायणे केला असे बोध... उकलोनी हृद्‌गद दावियेले''(वही ९०). ही नोंद श्री. गणपतरावांनी काही गैरसमजुतीने केली असे दिसते. असे म्हणण्याचे कारण असे :- तुकाराम महाराजांनी स्वप्नात येऊन बोध केला व तो अभंग आपण लिहून ठेवला असे श्रीदादांनी गणपतरावांना सांगितले. यानंतर घडले ते असे :- श्रीदादांनी काही सत्पुरुषांना मनाने प्रार्थना करून मला बोध करा अशी विनवणी केली. त्यांनी केलेला बोध श्रीदादांच्या अंत:करणात प्रगट झाला व तो त्यांनी अभंगात गुंफला, अशी नोंद स्वत: श्रीदादांनी वही क्रमांक ४१ मध्ये केली आहे. या प्रसंगी प्रथम निंबरगीकरमहाराजांनी बोध केला. तसे श्रीदादांनी बहुधा गणपतरावांना सांगितले. तुकाराममहाराज ज्याप्रमाणे श्रीदादांच्या स्वप्नात आले होते, त्याप्रमाणे निंबरगीकरमहाराजही



श्रीदादांच्या स्वप्नात आले होते, अशी गणपतरावांची गैरसमजूत झाली. पण त्यावेळी प्रत्यक्षात घडले ते असे :- तुकाराममहाराजांच्या बोधासह, आणि नऊ संतानी श्रीदादांना केलेले बोध श्रीदादांच्या मनात प्रगट झाले, व ते नऊ बोध त्यांनी अभंगात बद्ध केले आणि मग तुकाराममहाराजांचा बोध व हे नवीन नऊ बोध यांना श्रीदादांनी 'सद्‌बोधदशक' असे नाव दिले. यानंतर वही क्रमांक ४१ मधील श्रीदादांची नोंद असे सांगते :- दि. ११-६-१९३७ रोजी पहाटे श्रीदादांना स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज व आणखी एक सत्पुरुष दिसले. या दुसऱ्या सत्पुरुषांनी ''निंबरगीकरमहाराज निंबरगीकरमहाराज असे ज्यांना तुम्ही म्हणता तो मीच आहे'', अशी स्वत:ची ओळख करुन दिली. नंतर निंबरगीकरमहाराज श्रीदादांना म्हणाले,''रामा, तुझे हे सद्‌बोध-दशक जो कोणी भाविक वाचेल तो भगवद्‌भक्त होईल.''

सातारा येथे काही दिवस राहिल्यावर श्रीदादांची प्रकृति चांगलीच सुधारली. मग श्रीदादा सांगलीस परत आले. सांगलीस परत आल्यावर श्रावण वद्य अष्टमी, गोकुळअष्टमी, इ.स. १९३७ रोजी पहाटे ५-५॥ च्या सुमारास श्रीदादांना एक स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे दर्शन झाले. श्रीदादांनी त्यांना साष्टांग प्रणिपात केला. त्याचवेळी कोटणीसमहाराजांचे वर्णन करणारी एक आरती श्रीदादांना स्फुरली. ती म्हणत श्रीदादांनी कोटणीसमहाराजांची आरती केली. त्यावर हास्यवदन करून कोटणीसमहाराजांनी श्रीदादांचेकडे पाहिले. येथे स्वप्न संपले. स्वप्नात स्फुरलेली आरती जागे झाल्यावरही श्रीदादांच्या लक्षात राहिली. ती त्यांनी लिहून ठेवली. ही आरती अशी आहे :-

सद्‌गुरु भक्तीचा डंका गाजवुनी । कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करुनी । गुरुरुपी तन्मय झाले काया संहरुनी ॥१॥
जय देव जय देव जय गुरु हनुमंता । तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता ॥ध्रु॥
राम लीन झाला धन्य तुझे चरणी । ओवाळी आरती तन मन वाहुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीनवाणी ।उरेल माझे पाशी सांगा देव धणी ॥२॥

ही आरती श्रीदादांनी आपले पिताजी मामा यांना म्हणून दाखविली. ती मामांना अतिशय आवडली. म्हणून या आरतीचा समावेश मामांनी आपल्या कीर्तनाचे शेवटी म्हटल्या जाणाऱ्या आरत्यांमध्ये केला. आजही ही आरती नित्य

कीर्तनानंतर म्हटली जाते.

सांगलीत आल्यावर श्रीदादांचे अध्ययन चालू झाले. यावेळी शाळेत घडलेल्या एका प्रसंगाची नोंद फूल चैतन्याचे (पृ. ४१-४२) यां ग्रंथात अशी आहे :- एकदा मराठी विषयाच्या तासाला एक शिक्षक तुकारामाचा एक अभंग शिकवीत होते. त्यांना जो अर्थ योग्य वाटला तो त्यांनी सांगितला. नंतर ते म्हणाले, ''आपल्या वर्गात राम केळकर हा विद्यार्थी आहे. तो अध्यात्मात तरबेज आहे, तो या अभंगाचा गर्भित अर्थ तुम्हांला सांगेल.'' असे बोलून शिक्षकांनी श्रीदादांना आपल्या टेबलाजवळ येण्यास सांगितले. श्रीदादा टेबलाजवळ गेले, त्यांनी शिक्षकांना नमस्कार केला, आणि त्या अभंगाचा गुह्यार्थ स्पष्ट करून सांगितला.

श्रीदादा सिटीहायस्कूलमध्ये शिकत असताना, त्यांच्या वर्गाचे एक हस्तलिखित मासिक काढण्याचे ठरले. या मासिकात ''पहाणेचि दर्शन'' आणि ''पहाणे आले पहाणेपणा'' असे श्रीदादांचे दोन अभंग अंतर्भूत होते. (हे दोन अभंग दासरामगाथा ग्रंथात पृ. २७० आणि १४८ वर आलेले आहेत). या मासिकाच्या प्रकाशनासाठी सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक असणारे शं. के. कानेटकर ऊर्फ कवि गिरिश यांना आमंत्रित करण्यात आले होते. प्रकाशनानंतर हे मासिक चाळताना कवि गिरिशांचे लक्ष वरील दोन अभंगांनी वेधून घेतले. त्यांनी विचारले, ''काय हो, या हस्तलिखितात शिक्षकांचे काही लेखन समाविष्ट आहे काय?'' ''नाही. पण आपणांस असे का वाटले?'' अशी पृच्छा त्यांना केली गेली. तेव्हा गिरिश म्हणाले, ''पहाणेचि दर्शन इत्यादि दोन अभंग हे एकाद्या विद्यार्थ्याने रचले असतील असे वाटत नाही.'' त्यावर कवि गिरिशांना सांगण्यात आले, ''हे अभंग राम केळकर या विद्यार्थ्याचेच आहेत. त्याचे घरी त्याचे वडील रोज कीर्तन करतात. आणि हा रामही लहानपणापासून अध्यात्मात मुरलेला आहे. तो कीर्तनही करतो. त्याचे इतरही अनेक पारमार्थिक अभंग आणि पदे आहेत.'' हे ऐकल्यावर कवि गिरिश चकित झाले. त्यांनी श्रीदादांच्या पारमार्थिक प्रतिभेचे कौतुक केले.

त्या काळी सिटी हायस्कूलचे एक मुद्रित वार्षिकही निघत असे. त्यासाठी काही काव्य द्यावे असे श्री. के. जि. दीक्षित सरांनी श्रीदादांना सांगितले.



तेव्हा श्रीदादांनी ''आत्मबोधप्रत्ययामृत'' हे पासष्ट ओव्यांचे एक छोटेसे प्रकरण दिले. त्यातील काही ओव्या या वार्षिकात प्रकाशित झाल्या. हे संपूर्ण प्रकरण पुढे ''परमार्थसार आणि अन्य ग्रंथ'' या पुस्तकात प्रसिद्ध झाले आहे.

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या निर्याणानंतर त्यांचे एक भक्त श्री. गंगाधरराव सिंग यांनी कोटणीसमहाराजांच्या दहनभूमीवरच 'हनुमान समाधि मंदिर' बांधवून घेतले होते. तेथे कोटणीसमहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त पौष वद्य प्रतिपदा ते पौष वद्य षष्ठी या काळात संध्याकाळी श्रीबापूरावजींची कीर्तने होत. या कीर्तनात कधी कधी गुंडूबुवा हे बुधगावचे विदेही संत उपस्थित रहात असत. इ. स. १९३७ साली कीर्तन संपल्यावर एके दिवशी श्रीबापूरावजी आणि श्रीदादा घरी परत येत असताना, मागच्या बाजूने गुंडूबुवा आले आणि त्यांनी श्रीदादांच्या अंगावर आपली कफनी झटकली, आणि ते उद्गारले ''हे प्वार लई ग्वाड आहे.''

राजकवि साधुदास यांनी लिहिलेले कोटणीसमहाराजांचे चरित्र इ. स. १९३७ साली प्रसिद्ध झाले. परंतु तत्पूर्वी कोटणीसमहाराजांनी दिलेल्या दृष्टांतानुसार श्रीमामांनी 'हनुमद्‌गुरुचरित्रबोधसार' हे कोटणीसमहाराजांचे चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला होता. ते चरित्र लौकर पूर्ण होऊन छापले जावे अशी अंताजीपंत केळकरांची इच्छा होती. पण काही कारणांनी तसे होऊ शकले नाही. पुढे शके १८५८ मध्ये पौष शुद्ध ४ या मकरसंक्रमणाचे दिवशी हे चरित्र पूर्ण करावे अशा बेताने रोज एक अध्याय या प्रमाणे ते पूर्ण झाले. या चरित्राचे शेवटी मामा लिहितात, ''चरित्र लिहावे हा विचार । माझे वडिलांनी सांगितला साचार । अनंत गंगाधर केळकर । ऐसे नाम तयांचे ।। परी तो विचार तैसाचि राहिला । आता त्याचा योग आला । सद्‌गुरुसमाधिकालापासून वहिला । तेरा वर्षांनी लिहिण्याचा ।। श्रीसद्‌गुरूंनी प्रेरणा दिली । विचार पूर्तता होण्याची वेळ आली । तेरा दिवसात सद्‌गुरुंनी करविली । चरित्र रचना संपूर्ण''. या चरित्राचे वैशिष्ट्य म्हणजे कोटणीसमहाराजांच्या साधनमार्गाला धरून हे लिहिले गेले आहे. यात साधना व साक्षात्कार यांचे वर्णन आहे. कोटणीसमहाराजांच्या आध्यात्मिक जीवनाची बाजू यात प्रकर्षाने उलगडून दाखविलेली आहे. म्हणून हे चरित्र प्रकाशित करण्याचे श्रीदादांनी ठरविले. आणि इ.स. १९३७ च्या गणेश चतुर्थीस हे चरित्र त्यांनी प्रकाशित केले. याच ग्रंथाचे पुनर्मुद्रण श्रीदादांची चतुर्थ स्नुषा सौ.

अपर्णा अनिलप्रभु केळकर हिने आपल्या वडिलांच्या स्मृति-प्रीत्यर्थ दि. १३-१२-१९९५ रोजी प्रसिद्ध केले.

याच सुमारास श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने श्रीमामांना काही अभंग स्फुरले. त्यांमध्ये रामनामाचे महत्त्व सांगितले असल्याने, त्यांना श्रीरामपाठ असे नाव देण्यात आले. हे अभंगही अतिशय महत्त्वाचे होते. परंतु प्रसिद्धिपराङ्मुख असणारे मामा हा श्रीरामपाठ प्रकाशित करण्याचा विचारही मनात आणीनात. पण श्रीदादांना ते पसंत नव्हते. हा रामपाठ प्रकाशित करावयाचा असे श्रीदादांनी ठरविले. श्रीदादांच्या आग्रहामुळे मामांनी त्यास संमति दिली. हा रामपाठ म्हणजे 'अमृतकलश' आहे असे उद्गार श्री. न. दा. दिवेकर यांनी काढले आहेत. तर ''बत्तीस अभंगाचे हे पुस्तक आकाराने लहान पण प्रभावाने फार मोठे आहे'', या शब्दांत गोपालनाथ कोटणीसमहाराजांनी या रामपाठाचे महत्त्व आपल्या प्रस्तावनेत सांगितले आहे. हा रामपाठ ग्रंथ श्रीदादांनी रामनवमी, दि. २७-३-३८ रोजी प्रकाशित केला. या रामपाठाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रति लौकरच संपून गेल्या. परंतु दुसरी आवृत्ति काढण्याचा योग लौकर आला नाही. इ.स. १९६३ मध्ये रामपाठाची द्वितीय आवृत्ति मामांचे एक निष्ठावंत भक्त मुंबईचे श्री. स. वि. ऊर्फ नाना जोगळेकर यांनी काढली व ती दिनांक २-२-१९६३ रोजी प्रकाशित झाली. या दुसऱ्या आवृत्तीचे वैशिष्ट्य असे आहे की या रामपाठातील विषय सुसंगतपणे गद्यात मांडणारा उपन्यास प्रारंभी दिलेला आहे. या उपन्यासामुळे रामपाठातील विषय सुलभपणे कळू शकतात.

कोटणीसमहाराजांचे चरित्र लिहिण्याचे काम राजकवि साधुदास यांनी इ.स.१९३७ साली सुरू केले. त्याची सुवाच्य अक्षरातील प्रत श्री. गणपतराव कानिटकर करीत होते. त्या वेळी गणपतराव हे श्रीमामांचे घरी रहात होते. मामांचे त्यांच्यावर पुत्रवत् प्रेम होते, तर 'मम पितया सम गोविंद' असे गणपतराव म्हणीत. साधुदास लिहीत असलेल्या चरित्राच्या शेवटी कोटणीसमहाराजांच्या शिष्यांनी महाराजांचे वरून केलेली पद्यरचना ग्रथित होणार होती. तेव्हा ''या चरित्रासाठी एकादे पद द्यावे'' अशा प्रकारच्या साधुदासांच्या विनंतीला मान देऊन, ''पेठ वसविली सांगली ग्रामी हरिगुणनामाची'' हे पद श्रीदादांनी दिले आणि ते त्या चरित्रात प्रसिद्धही झाले. हे पद श्रीदासरामगाथा या ग्रंथात पृ. १७४ वर आलेले आहे.



साधुदासलिखित चरित्राची सुवाच्य प्रत करीत असताना श्री. गणपतरावांना मामांच्या संदर्भातील पुढील मजकूर आढळला. ''रा. गोविंद अनंत केळकर नावाचे हणमंतरावजींचे एक प्रेमळ शिष्य सांगली येथे रहातात. एका रात्री ते दासबोध वाचीत बसले असता आपल्यापुढे हणमंतरावजी एकदम प्रगट झाल्याचा त्यांना भास झाला. त्यांना आसन देण्याकरता केळकर यांनी इकडे तिकडे नजर टाकली तो खुंटीवर शालजोडी असलेली त्यांना दिसली. तीच त्यांनी हणमंतरावजींना बसावयास दिली. हणमंतरावजी त्या आसनावर बसले आणि केळकर पोथी वाचू लागले. वाचन पुरे झाल्यावर, केळकरांनी हणमंतरावजींना विचारले,''आपले गुणानुवाद कीर्तन करावयाची इच्छा आहे. करीत जाऊ का?'' हा प्रश्न विचारून केळकरांनी हणमंतरावजींच्या पायांवर मस्तक ठेविताच हणमंतरावजींनी केळकरांच्या डोक्यावर दोन्ही हात ठेवले. केळकर उठून उभे राहिले. हणमंतरावजींनी त्यांना नेत्रसंकेताने कीर्तन करण्याची अनुज्ञा दिली, आणि ते तत्काळ अदृश्य झाले''(पृ. ३४५-३४६). हा मजकूर गणपतरावांनी श्रीदादांना सांगितला. तो ऐकताच श्रीदादा चकित झाले. कारण हा प्रसंग मामांनी श्रीदादांना पूर्वी सांगितलेला नव्हता. तेव्हा श्रीदादांनी मामांना या प्रसंगाची हकिकत विचारून घेतली. त्यावरून श्रीदादांना कळले ते असे :- हा प्रसंग इ.स. १९२४ च्या माघ वद्य तृतीयेस घडला होता. त्यावेळी श्रीदादा केवळ चारच वर्षाचे असल्याने मामांनी ही घटना श्रीदादांना सांगितली नव्हती. तसेच मामा हे प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने त्यांनी या प्रसंगाची फारशी वाच्यताही केली नव्हती. माघ वद्य तृतीयेला रात्री मामा दासबोध वाचीत असताना बरोबर १२ वाजता कोटणीसमहाराज मामांचे पुढे साक्षात् प्रगट झाले होते. त्यांनी श्रीमामांना नित्यकीर्तनाची आज्ञा दिली होती. या घटनेत मामा व कोटणीसमहाराज या दोघांचेही माहात्म्य प्रगट होत होते. ते असे :- मामा परमार्थात अधिकारी होते म्हणून कोटणीसमहाराज त्यांचे पुढे प्रगट झाले. तर आपल्या निर्वाणानंतर भक्तासाठी कोटणीसमहाराज प्रगट झाले, यावरुन त्यांचे सामर्थ्य कळत होते. दोघांचे हे महत्त्व इतरांना कळावे या दृष्टीने माघ वद्य तृतीयेस रात्री कोटणीसमहाराजांच्या प्रगट-पर्वात कीर्तन करण्याचे श्रीदादांनी ठरविले आणि त्याच १९३७ सालापासून त्याची अम्मलबजावणी केली. आता माघ वद्य तृतीयेला श्रीदादांनी गुरुतृतीया हे नाव दिले आणि त्या दिवशी

प्रगटकालाचे कीर्तन सुरू केले.

गुरुतृतीयेच्या पहिल्या समारंभाचे वर्णन श्री. गणपतराव यांनी लिहून ठेवले आहे (वही ९०). त्यावरुन असे कळते :- प्रगटकाळाचा हा सोहोळा माघ वद्य प्रतिपदा ते माघ वद्य तृतीया असा तीन दिवसांचा करण्याचे ठरले. त्यासाठी राममंदिरात बरीच आरास करण्यात आली; ती करण्यात गणपतराव कानिटकर, वासुदेवराव अभ्यंकर, नेमगोंडा पाटील यांचा पुढाकार होता. या तीन दिवसात असे कार्यक्रम झाले :- माघ वद्य प्रतिपदा (गुरुप्रतिपदा) :- सकाळी पूजा, आरती, पोथी. दुपारी ४ चे सुमारास ज्ञानेश्वरी; मग मामांचे नित्याचे कीर्तन. कीर्तनोत्तर पालखी आणि मग पंचपदी. रात्री दहानंतर निंबरगीकरमहाराज, चिमडमहाराज, तात्यासाहेबमहाराज, बाबूरावजी कोटणीस यांची पदे म्हणण्यात आली. दोन पदांच्या मधल्या काळात थोडे थोडे भजन केले जाई.

माघ वद्य द्वितीया : सकाळी पूजा, आरती, पोथी. दुपारी ज्ञानेश्वरी व मग मामांचे नित्याचे कीर्तन; नंतर पंचपदी. रात्री गोपाळकाका कोटणीस यांचे कीर्तन झाले. हे कीर्तन गोपाळकाकांनी आपणहून केले.

माघ वद्य तृतीया (गुरुतृतीया) : सकाळी पूजा, आरती, पोथी. दुपारी बारा वाजता महाप्रसाद करण्यात आला. महाप्रसादास बाबूरावजी कोटणीस, गोपाळकाका कोटणीस, नानबा फडणीस हे उपस्थित होते. तसेच आणखी १०० भक्त बोलाविले होते. भोजनानंतर ३-३ ।। वाजता ज्ञानेश्वरी, नंतर ३ ।। ते ५ ।। पर्यंत मामांचे नित्याचे कीर्तन झाले. ५ ।।-७ पर्यंत गोपाळकाका कोटणीस यांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाले. प्रवचनानंतर रात्री ८ ।। पर्यंत रथोत्सव आणि पालखी सोहळा झाला. या सोहळ्यात गंगाधरराव सिंग, पुंडुकाकांचे चिरंजीव वामनराव कोटणीस, सोनोपंत लागू, अनंतराव म्हैसकर इत्यादि मंडळी उपस्थित होती. रात्री ९ ।। ते १२ पर्यंत श्रीदादांचे प्रगटकालाचे कीर्तन झाले. कीर्तनात श्रीदादांनी कोटणीसमहाराजांच्या प्रगट होण्याचे तपशीलवार वर्णन केले. या कीर्तनास श्री. गणपतराव भिरंगी, श्री. दाणेकरी, गणपतराव कानिटकर, इत्यादि भक्तमंडळी उपस्थित होती. कीर्तनानंतर पंचपदी होऊन हा समारंभ समाप्त झाला.

गुरुतृतीयेच्या पहिल्या कीर्तनास श्रीदादांनी तुकाराममहाराजांचा पुढील



अभंग घेतला होता :- रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ।।१।। कुंचे ढाळिती दोही बाही । जवळी राही रखुमाबाई ।।२।। तेथे नाना उपचारी । ऋद्धि सिद्धि ते कामारी ।।३।। हाती घेवोनी पादुका । उभा बंदीजन तुका ।।४।। यानंतर प्रत्येक गुरुतृतीयेच्या या कीर्तनाला श्रीदादांनी आपले निर्याण होईपर्यंत याच अभंगावर कीर्तन केले.

माघ वद्य तृतीयेचा १९३७ चा पहिला कार्यक्रम रात्री सुमारे १ वाजता संपला. हळुहळु या तीन दिवसांच्या सोहोळ्यात इतरांची कीर्तने इत्यादि होऊ लागली. उदा. गुरुतृतीयेच्या दिवशी संध्याकाळी बाबूरावजी कोटणीसमहाराजांचे कीर्तन काही वर्षी झाले.

इ.स. १९३७ नंतर दोन तीन वर्षे गेली. त्यानंतर श्री. बाबू भोपळे या श्रीदादांच्या मित्राचे काही स्नेही रात्रीचे कीर्तन संपल्यावर १ ते ३ या काळात दिमडीवरचे एकतारी भजन करू लागले. त्यानंतर पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांचेही रात्री एकचे पुढे एकतारी भजन सुरू झाले. अशा प्रकारच्या बदललेल्या कार्यक्रमांची नोंद श्रीदादांनी आपल्या इ.स. १९४२ च्या लोकमान्य रोजनिशी (वही ४४-अ) मध्ये पुढील प्रमाणे केली आहे. :- माघ वद्य तृतीया :- सकाळी ६ ते ७ पूजा. ७ ते ९ साधन, आरती. सायंकाळी ५-७ मामांचे नित्याचे कीर्तन. ७-८।। बाबूरावजी कोटणीसमहाराजांचे कीर्तन. रात्री १०-१२ श्रीदादांचे कीर्तन. रात्री १२ ते ३ एकतारी भजन.

गुरुतृतीयेच्या इ.स. १९४३-४४ च्या श्रीदादांच्या कीर्तनानंतर मौजच झाली. बाबू भोपळे यांची मित्रमंडळी व पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची मंडळी एकाच वेळी भजनास आली. त्या वेळी राममंदिरात एका मंडळीचे भजन आणि अंगणात दुसऱ्या मंडळीचे भजन असा थाट झाला. पुढे बाबू भोपळे यांचे भजन करणारे स्नेही इतस्ततः पांगले व मग त्यांचे भजन थांबले. तथापि पांडुरंगमहाराजांची मंडळी येतच राहिली. पांडुरंगमहाराजांच्या निर्वाणानंतरही त्यांचे पट्टशिष्य गोविंदमहाराज कुलकर्णी यांनी रात्री १-३ या काळात भजन करण्याची प्रथा चालू ठेवली, ती आजही चालू आहे.

गुरुतृतीयेच्या श्रीदादांच्या कीर्तनात बरोबर बारा वाजता कोटणीसमहाराजांच्या प्रगटण्याची वेळ साधून गुलालात माखलेली सुवासिक फुले उधळली जातात. नंतर ''हनुमंता घ्या मज पदरी । आता

आलो शरण तुला ।।'' हे भजन सुरू होते. ते चालू असताना देवांना अत्तर लावून गुलाबपाणी शिंपडले जाते. व मग उपस्थित श्रोत्यांनाही अत्तर लावून गुलाव पाणी शिंपडले जाते. यावेळी श्रीदादांचे पुढील पद म्हटले जाते :-

गुरुतृतीया ही गोड किती होय सुखाची ।
जरी गाई कुणी गुणकीर्ती तृप्ती मनाची ।।१।।
हनुमत्प्रभुमहाराज मंदिरी उभा ।
नवलप्रभा दिपवी नभा प्रगटली आभा ।
शोभा ही काय वर्णू आज येथीची ।।२।।

याचवेळी अंगणात सनई व चौघडा वाजत असतो. हा कार्यक्रम सुमारे १२।। वाजता संपतो. त्यानंतर उपस्थितांना शेंगदाण्याची उसळ वा साबुदाण्याची खिचडी व कॉफी/चहा असा प्रसाद वाटला जातो. त्यानंतर रात्री १ ते ३ पर्यंत दिमडीवरील एकतारीचे भजन होते.

गुरुतृतीयेचा वरीलप्रमाणे कार्यक्रम इ.स.१९४८ पर्यंत चालू होता. पण या वर्षी एक महत्त्वाचा बदल झाला. या वर्षी गांधीवधानंतर सांगलीत जाळपोळ झाली. त्यामुळे रात्री संचारबंदी लागू होती. त्यामुळे रात्री ३ नंतर श्रोतेमंडळींना घरी जाणे शक्य नव्हते. तेव्हा श्रीदादांनी ठरविले की रात्रीचा कार्यक्रम सकाळी ६ वाजेपर्यंत चालू ठेवावयाचा. म्हणून रात्री ३-३।। नंतर भजन संपताच ३।। ते ५ पर्यंत ''हनुमद्गुरुचरित्रबोधसार'' या ग्रंथाचे पठण करावयाचे. हे पहिले पठण श्री. विनायकराव कानिटकर यांनी केले. त्यानंतर रथ, पंचपदी, इत्यादि होऊन हा कार्यक्रम सकाळी ६ वाजता संपला. इ.स. १९४८ नंतर हीच पद्धत चालू राहिली. पुढे विनायकराव कानिटकरांचे नंतर श्री. नारायणराव वाटवे, श्री. प्रकाश भावे व त्यांचेनंतर श्री. मोहन भावे हे चरित्रपठण करू लागले.

माघ वद्य तृतीयेदिवशी कोटणीसमहाराजांनी प्रगट होऊन मामांना जी नित्य कीर्तनाची आज्ञा दिली, तिचे महत्त्व आणखी एका दृष्टीने आहे. तेही येथेच सांगणे आवश्यक आहे. कोटणीसमहाराजांनी जी नित्य कीर्तनाची आज्ञा केली, ती आपल्यानंतरही आपल्या घराण्यातील पुरुषांनी पुढे चालवावयाची आहे, अशी मामांची धारणा होती. म्हणूनच मामा श्रीदादांना सांगत, ''रामजी, तुझी प्रकृति अशक्त आहे; तरी माझ्यानंतरही तू नित्य कीर्तन चालूच ठेव. जरी तुला २-२।। तास कीर्तन करणे जमले नाही तरी पाच मिनिटे का होईना तू हा नित्य कीर्तनाचा नेम चालू ठेव.''



या नित्य कीर्तनाविषयी मामांच्या धारणेप्रमाणेच श्रीदादांचीही धारणा होती. आणि ती श्रीदादांच्या लेखनात विविध प्रकारांनी व्यक्त झालेली आढळते. आमच्या केळकर कुळाला नित्यकीर्तनाची सनद मिळाली, नित्यकीर्तन ही आमची मिरासदारी आहे, नित्यकीर्तन हा आमचा भोगवटा आहे, अशी श्रीदादांची भावना होती. म्हणून ते आपल्या अभंगातून सांगतात :

''दासरामा ऐसे लाभले वतन ।''
''हरिकीर्तन हे आमुची मिरासी ।'' (वही १०३)
''हरिकीर्तन हे आम्हांसी साधन ।
दिलेसे वतन भोगवटा ।।'' (वही १२२)
''हनुमंत भगवान आज्ञापिती आपण ।
ते हे हरिकीर्तन आमुचे वंशी ।।'' (वही १२२)
''कीर्तनाची परंपरा । आली माझिया घरा ।।'' (दासराम गाथा, पृ. १५५)

असे असल्यामुळेच मामांच्या निर्याणानंतर श्रीदादांनी आपले नित्य कीर्तन सुरू केले. आणि अलीकडे ते आपल्या कीर्तनांत अनेकदा सांगत, ''माझ्यानंतर चंद्रशेखर हा नित्य कीर्तन चालू ठेवील.'' आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की श्रीदादांच्या निर्याणानंतर दुसरे दिवसापासूनच चंद्रशेखरअण्णांनी नित्यकीर्तन सुरू केले.

## प्रकरण ३ : पुरवणी

श्रीमामांच्या त्रितपमहोत्सवाच्या वेळी, त्यांचा नित्यकीर्तन क्रम कसा सुरु झाला याचे दिग्दर्शन करणारा 'श्रीगुरुतृतीया कथा' हा छोटासा ग्रंथ प्रा. के. वा. आपटे यांनी लिहिला व तो माघ वद्य तृतीया (गुरुतृतीया), शके १८८१, सोमवार दि. १५-२-१९६० रोजी प्रकाशित झाला.

माघ वद्य तृतीया १९२४ रोजी श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस श्रीमामांचे समोर प्रगट झाले. या प्रसंगाचे वर्णन करणारी जी पद्ये उपलब्ध आहेत, ती पुढे दिली आहेत :- (१)

महाराज गुरुतृतीये आले । दर्शन गोविंदा दिधले ।।ध्रु।।
अर्धोन्मीलित दृष्टी जयांची । सहजासनी सजले ।
भक्ता न्यहाळुनि सगुण ब्रह्म ते । हृदयांतरी स्थिरले ।।१।।
चैतन्याचे भव्य मार्ग ते । दासबोधी दाविले ।
कीर्तनसरिता अंतर्यामी । ओघवती चाले ।।२।।
गुरुभक्तांचा प्रणाम घेऊनि । सप्रेमे धाले ।
हनुमंत प्रभु कृपाप्रसादे । त्रिविध ताप हरले ।।३।।
समर्पिता सुमने सुमनांजली । संतोषे ल्याले ।
हस्तद्वय तद्मस्तकी ठेवूनि । अदृश्यचि झाले ।।४।।
श्रीहरिकीर्तन नेम उपासन। अखंड चालविले ।
दासराम हा वंदन करितो । हनुमत्पदकमले ।।५।।

– श्रीदासराम

(२)

माघ वद्य तृतीयेसी रात्री । आविर्भूतचि झाले ।।१।।
निमग्न गोविंद पोथीवाचनी । अवचित दर्शन दिधले ।।२।।
शालजोडी बैसाया दिधली । त्यावरी येऊनि बैसले ।।३।।
नानबासवे येऊनि पूर्वीच । 'वेळ पाच तुज छान' बोले ।।४।।
जणु खुणेस्तव वेळ पाचही । सांगुनी सुहास्य केले ।।५।।
अखंड कीर्तन करी म्हणोनि । आशिर्वच हे वदले ।।६।।
दास मनोहर तद्गुण गायन । करिता तन-मन-धन घाले ।।७।।

– श्री. मनोहर लिमये.



(३)

कवि : परात्पर-हनुमंतम् । भजति च मनसा गुरुवर्यम्
।।१।।
शके बाण-युग-वसु-चंद्र-मिते । आविर्भूतं माघ-
कृष्ण-गुण-भृगु-दिने हनुमंतम् ।।२।।
गोविंदाय पठण-मग्नाय । गुरुं स्वीकृतासनं ब्रुवंतं मंद-मंद-शब्दम् ।।३।।
''कुरु त्वं संतत-हरि-कीर्तनम्'' । तिरोभवंतं आशीर्वचनं मनोहारि दत्वा ।।४।।
सत्यं पूर्ववचः कृतवंतं । अतिदयालुं श्रीरघुनाथो गुरुं परमवंद्यम् ।।५।।

– रघुनाथ नरसिंह ओणकर.

(४)

हनुमंत अवतरला । भक्ताचे साठी प्रगट पै झाला ।।ध्रु।।
शके अठराशे चव्वेचाळीस । माघाची तृतीया रविवारास । भोजना सद्गुरु आले गृहास ।
आनंदी आनंद झाला । गोविंद गुरुपायी विनटुनी गेला ।।१।।
भोजन होता स्वारी वदली । 'सुटते शाळा कोणे वेळी' । 'पाच वाजता सायंकाळी'।
'छान ही वेळचि तुजला'। गोविंदासी बोलिले बोला ।।२।।
उमज होईना या शब्दांचा । अनुभव द्यावा हेतू मनीचा । प्रगट दिन हा तृतीया साचा ।
माघाच्या मध्यरात्रीला । भक्तागृही हा सद्गुरु आला ।।३।।
शके अठराशे पंचेचाळीस । शुक्रवार हा त्या दिवसास । गुरुभक्ताची पुरविली आस ।
कृपा आशीर्वाद दिधला । अखंड कीर्तन ठेवा ठेविला ।।४।।
तृतीया तृतीया ऐसे गाता । सद्भाव वृत्ति प्रगटे चित्ता । काही न राहे दंभ अहंता ।
जय जय जय शब्द बोला । दास विनायक पायी स्थिरावला ।।५।।

– ह.भ.प. विनायकराव कानिटकर

(५)

हनुमान मूर्ति प्रगटली । हनुमान मूर्ति प्रगटली ।।ध्रु।।
भृगुवार मध्यरात्री । माघ वद्य तृतीय तिथी ।
पूर्ण एकांताची स्थिती । फेरी जाहली ।।१।।
एक प्रहर दासबोध । श्रवण भक्तीचा आनंद ।
सेवुनिया कीर्तनाची । सनद दिधली ।।२।।
एकोणीस चोविस सन । स्थूल देह विसर्जन ।
प्रेम-देह प्रगटवून । भेटी दिधली ।।३।।

प्रेमाचे प्रगटीकरण । आनंदाचे उधळण ।
राम गोविंद उभयतांची । वृत्ती रंगली ।।४।।
परम मुक्त हनुमंत । संत शिरोमणी पंत ।
चरणी शरण पांडुरंग । कीर्ती गाईली ।।५।।

– ह.भ.प. पांडुरंगमहाराज ताम्हनकर

(६)

आली गुरुतृतीया । जवळी आली गुरु तृतीया ।।ध्रु।।
प्रतिपदेचा दिन हा आला । आरंभ झाला श्रीसेवेला । स्तवने गाऊया ।।१।।
तृतीयेचा दिन बहुमोलाचा । महाराजांच्या प्रगटण्याचा । दृष्टी कृपेची तया ।।२।।
वद्य माघीच्या मध्यरात्री । दर्शन दिधले महाराजांनी । भावे त्या नमू या ।।३।।
तीन दिसांचा पर्वकाळ हा । पावन करितो सकलजनांना । सुख हे सेवाया ।।४।।
मामांचा अधिकारची मोठा । माहीत असे बालक श्रेष्ठा । चरणा शरण तया ।।५।।
समारंभ हा अतिगोडीचा । लाभ घडो मज तो पहाण्याचा । बहुत वर्षांचा ।।६।।
विनंति करितो सुरेश चरणा । लाभ मिळो आपुल्या सेवेचा । हेचि मागणे तुम्हा ।।७।।

– सुरेश जोशी.

(७)

कृष्णाया विमले तीरे पवित्रे सांगलीपुरे ।
अवसद् हनुमन्नामा साधुः सर्वेषु साधुषु ।।१।।
पुरे तस्मिंश्च विमले केळकरो नाम वंशः ।
तस्मिन् वंशे भवत्येको महान् वै साधुपूरुषः ।।२।।
अनंतस्य सुतो भूत्वा गोविंद इति कीर्तितः ।
निरतः पुण्यकार्येषु निमग्नः साधने ऽमले ।।३।।
प्रतिपत्तो नवम्यन्त उत्तरे माघपाक्षिके ।
सोऽपठद्दासबोधं वै नित्यं यतमनाः खलु ।।४।।
माघकृष्णतृतीयायां मध्यरात्रौ गुरुःस्वयम् ।
वायुवेदवसुचंद्रमिते ऽब्दे शातवाहने ।।५।।
गोविंदस्य पुरः प्रादुर्बभूव हनुमत्प्रभुः ।
किमयं नयनाभास इति गोविंद अंतरे ।।६।।
चिंतयन् पुनरारेभे पुस्तकं पठितुं पुरः ।
पुनर्दृष्ट्वा गुरुं तत्र विस्मयापन्नमानसः ।।७।।



झटित्युत्थाय गोविंदो गुरुसेवापरायणः ।
प्रावारमुपवेष्टुं हि तं जवेनाददाद् गुरुम् ।।८।।
एकेन प्रहरेणैवं समाप्ते ग्रंथवाचने ।
गुरोश्चरणयोः शीर्षं गोविंदः समधत्त वै ।।९।।
न्यस्य तन्मस्तके हस्तौ शिष्यायाज्ञां ददौ गुरुः ।
कीर्तनं कुरु त्वं नित्यमिति ब्रूत्वा तिरोदधे ।।१०।।
गुर्वाज्ञां स शिरोधार्य प्रारेभे नित्यकीर्तनम् ।
हनूमंतं च गोविंदं वंदते बालकेशवः ।।११।।

## प्रकरण ३ : संदर्भ


१) सांगली माहात्म्य, ले. दासराम, सांगली, १९८८, पृ. ७
२) वही क्रमांक ३२,३३,३५,३९,४५,१६,९०,४१.
३) फूल चैतन्याचे, पृ. ४१-४२.
४) श्रीदासराम गाथा, पृ. १४८,२७०,१७४,१५५.
५) हनुमद्‌गुरुचरित्र बोधसार, पृ. २, आणि १३. १२-१४.
६) कै. हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, ले. साधुदास, सांगली. १९३७, पृ. ३४५-३४६.
७) वही ९०, ४४-अ, १०३, १२२, २५, ३०, ३८, ५१, ५९, ७३, ८६, १०, ५०, ३२, ३३, ३५, ३९, ४५, १६, ९०, १२२, १०३.
८) बाबासाहेब मुजुमदार चरित्र, ले. दासराम, सांगली. १९८४, पृ. ३१
९) रामपाठ, गो. अ. केळकर, सांगली. १९३७
१०) केशवलिखित दासराम चरित्र टिप्पणे
११) गोविंदचरितमानस, ६.१४६

प्रकरण ४

# गुरुलिंग–जंगम प्रगटले

(इ.स.१९३९–१९४०)

श्रीदादा ज्यावेळी सिटी हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते, त्यावेळी इ.स. १९३९ साली त्यांनी डायरी लिहिण्याचा उपक्रम केला होता. ही डायरी म्हणजे ''लोकमान्य विद्यार्थी डायरी,१९३९'' (वही क्रमांक १६) होय. या डायरीतील काही नोंदी पुढीलप्रमाणे आहेत : एका स्थळी श्रीदादांनी आपला दैनंदिन कार्यक्रम असा दिला आहे :- सकाळी अभ्यास. नंतर तुकाराममहाराजांचे बारा अभंग म्हणणे. त्यानंतर गीतेचा १५ वा अध्याय आणि गणेशस्तोत्र यांचे पठण. त्यानंतर शिकवणी. मग जेवण आणि झोप. दिवसात वेळ सापडला की जप करणे. दुसऱ्या एका नोंदीत श्रीदादांनी म्हटले आहे की ते सहावी इयत्ता उत्तीर्ण होऊन सातव्या इयत्तेत म्हणजे मॅट्रिकच्या वर्गात गेले. तिसरी नोंद असे सांगते की फाल्गुन शुद्ध १, इ.स. १९३२ पासून फाल्गुन शुद्ध १, इ.स. १९३९ पर्यंतच्या काळात रोज १३००० प्रमाणे एकूण जपसंख्या ३,१७,६४००० इतकी झाली.

श्रीदादांच्या इ.स.१९३९ सालच्या वरील डायरीवरुन आणखी असे कळते की याच सुमारास त्यांच्या मातोश्रींचे – सौ. इंदिराबाईंचे – सख्खे बंधू श्री. वामनराव फाटक ऊर्फ पंडितमामा हे श्रीदादांच्या घरी रहात होते. त्यांचा मुलगा भरत हाही त्यांचे बरोबर श्रीदादांचे घरी रहात होता.

याच इ.स. १९३९ च्या डायरीत पुढील नोंद आढळते. एकदा श्रीदादा, श्रीगंगाधररावसिंग दीक्षित आणि श्रीमामा हे तिघे मिळून, कोल्हापूरजवळच्या सिद्धगिरीवरील काडसिद्धांचे स्थान पहाण्यास गेले. साक्षात् काडसिद्धांचे स्थानी श्रीदादा सकाळच्या वेळेला गेले. त्यावेळी अमृतपिंडीतून काडसिद्धप्रभूंची स्वारी प्रगट झाली. त्यांचे दर्शन होताच श्रीदादांनी काड–सिद्धप्रभूंना नमस्कार केला. तेव्हा काडसिद्धांनी ''सर्वतोपरी अभय व आशीर्वचन दिले.'' मग श्रीदादांनी काडसिद्धांचे चरणांवर लोळण घेतली आणि त्यानंतर काडसिद्ध प्रभु अदृश्य झाले.

आणखी एक नोंद वरील इ.स.१९३९ च्या डायरीत पुढीलप्रमाणे



आहे :- एकदा मामांच्या आज्ञेने श्रीदादा पुन: एकदा श्री. गंगाधरराव सिंग दीक्षित यांचे बरोबर सिद्धगिरीला गेले. तेथे गेल्यावर श्रीदादांना काडसिद्धांच्या दर्शनाची उत्सुकता लागली. त्यावेळी ''दर्शन देईन'' असे शब्द श्रीदादा व गंगाधरराव या दोघांनाही ऐकू आले. श्रीदादा व गंगाधरराव हे नंतर तेथे ध्यानास बसले. पुढे पुजाऱ्याचे आणि गंगाधररावांचे सांगण्यावरुन श्रीदादांनी काड–सिद्धांची आरती केली. त्यावेळी सगळीकडे सुवास दरवळला होता. या वेळी काडसिद्धांची पूजा चालू असल्याने, श्रीदादा व गंगाधरराव यांना काडसिद्धांची मूळ पिंडी दिसली. नंतर मुखवट्यासकट काडसिद्धांचे दर्शन झाले. त्यानंतर श्रीदादांना पुरणपोळीचा प्रसाद मिळाला. संध्याकाळ होताच श्रीदादा आणि गंगाधरराव हे सांगलीस परत निघाले.

वर उल्लेखिलेल्या लोकमान्य विद्यार्थी डायरी १९३९ च्या तेवीस जानेवारी १९३९ च्या पानावर श्रीदादांनी म्हटले आहे की त्यांनी रेवणसिद्ध, मरुळसिद्ध, काडसिद्ध व श्रीगुरुलिंगजंगम निंबरगीकरमहाराज यांची ओवीबद्ध चरित्रे थोडक्यात लिहिली. आणि या चरित्रांना 'सिद्धकथामृतसार' असे नाव दिले. माघ शुद्ध तृतीये दिवशी सिद्धकथामृतसार लिहून झाल्यावर, श्रीदादा देवापाशी गेले आणि त्यांनी देवाला साष्टांग प्रणिपात केला. बरोबर त्याचवेळी एक बैरागी श्रीदादांच्या घराच्या दारात आला, आणि त्याने भिक्षा मागितली. श्रीदादांनी त्याला एक मूठभर तांदूळ भिक्षा घातली. ते तांदूळ बैराग्याने घेतले, आणि ''देव तेरा भला करे'' असा आशीर्वाद देऊन, तो बैरागी अदृश्य झाला. तेव्हा मात्र श्रीदादांचे मनाला चुटपूट लागली. आणि त्यांनी पडवीत दाराजवळ साष्टांग दंडवत घातला. ही गोष्ट सकाळी १० ।। चे सुमारास घडली. या बैराग्याबरोबर एक कुत्रेही आले होते. परंतू ते मात्र अदृश्य झाले नव्हते. त्याला श्रीदादांनी प्रणिपात केला. मग ते कुत्रे निघून गेले.

श्रीगुरुलिंगजंगम निंबरगीकरमहाराजांचे पट्टशिष्य रघुनाथप्रिय साधुमहाराज हे होते. त्यांनी निंबरगीकरमहाराजांचे अगोदरच निर्वाण केले. तेव्हा त्यांना देव करून निंबरगीकरमहाराजांनी त्यांची स्थापना चिमडगावच्या मठात केली. त्यांची पूजा-अर्चा करण्याचे काम श्रीरामचंद्रावजी यरगट्टीकर ऊर्फ चिमडमहाराज करीत होते. दीपावलीचे दिवसांत पांडव पंचमी दिवशी ''साधुमहाराजांचा रथ काढावा'' असे निंबरगीकरमहाराजांनी चिमड महाराजांना

सांगितले. त्याप्रमाणे गुरुद्वादशी ते पांडवपंचमी या दिवसांत चिमड महाराजांनी साधुमहाराजांच्या रथोत्सवाचा सोहळा सुरू केला. या चिमड येथील रथोत्सवास जाण्याचे श्रीदादांनी ठरविले. त्याप्रमाणे वासुदेवराव अभ्यंकर इत्यादि काही मंडळींना बरोबर घेऊन, श्रीदादा इ.स.१९३९सालच्या दिवाळीस चिमडला[१] गेले.

---

१. श्रीदादा ज्या वर्षीच्या दिवाळीतील रथोत्सवास चिमडला गेले, त्याच वर्षीच्या पौष शुद्ध नवमीपासून निंबरगीकरमहाराज श्रीदादांना गुरुलिंगगीतेतील पदे श्रुत करू लागले. आता, श्रीदादा कोणत्या वर्षी चिमडला गेले याबद्दल निरनिराळ्या ठिकाणी भिन्न भिन्न विधाने येतात. त्यांचा विचार येथेच करावयास हवा:- ''इ.स.१९३७ साली श्रीरामभाऊ हे श्री. वासुदेवराव अभ्यंकर, कै. दत्तोपंत लिमये, वगैरे भाविक मुमुक्षूना घेऊन श्रीक्षेत्र चिमडास गेले होते'' (प्रकाशकाचे चार शब्द, पृ.४ श्रीगुरुलिंगप्रसादगीता). याचा अर्थ असा होतो की इ.स. १९३७ पासून श्रीदादांना गुरुलिंगगीता श्रुत होऊ लागली. पण हे विधान संपूर्णपणे चुकीचे आहे. कारण गुरुलिंगगीतेच्या पहिल्या पदाचा दिनांक पौष शुद्ध नवमी, शके १८६१ असा आहे. या शकात ७८ वर्षे मिसळली की इ.स. १९३९ हे साल येते. हे लक्षात घेतले की जेथे १९३८ हे साल श्रीदादांच्या चिमडगमनाचे दिले जाते तेथे काहीतरी समजुतींचा घोटाळा झालेला दिसतो. १९३८ सालचा निर्देश पुढीलप्रमाणे येतो:- ''इ.स.१९३८ च्या पौष शुद्ध नवमीला श्रीदादांना 'येनू इल्लदानू' हे पद निंबरगीकरमहाराजांनी श्रुत केले'' (श्रीगुरुलिंगगीता, प्रकाशकाचे मनोगत, पृ.२). ''१९३८ च्या सालाला। पौष शुद्ध नवमीला'' (फूल चैतन्याचे,पृ.३७) गुरुलिंगप्रसादगीता मिळू लागली.''गुरुलिंगगीता मिळण्यास सुरवात झाली १९३८ मध्ये.'' (श्रीगुरुलिंगप्रसादगीता, प्रस्तावना,पृ.१०). ''इ.स. एकोणीसशे अडतीसमधल्या पौष शुद्ध नवमीस एक अविस्मरणीय घटना घडून आली. या दिवशी भगवान् सद्गुरु निंबरगीकरमहाराज प. पू. दादांचे समोर प्रगट झाले. त्यांनी प.पू. दादांना कानडीतून प्रसादगीतेच्या रूपाने बोध केला'' (अखंड कीर्तनानंद, पृ. ६१-६२). इ.स. १९३८ च्या पौष शुद्ध नवमीस भगवान् सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज प. पू. श्रीदादांचे समोर साक्षात् प्रगट झाले व 'येनू इल्लदानू' इत्यादि कानडी पद उच्चारुन त्यांनी श्रीदादांना बोध केला (प.पू. रामराय केळकर महाराज विशेषांक, साप्ताहिक तुतारी, पृ. १४). इतकेच नव्हे तर श्रीदादांनीच आपल्या एका मुलाखतीत असे म्हटले आहे, ''श्रीनागाप्पाण्णामहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीनिंबरगीकरमहाराजांनी कायेच्या



ज्या वेळी इ.स. १९३९ साली आश्विन-कार्तिक महिन्यात श्रीदादा चिमडच्या रथोत्सवात उपस्थित रहाण्यास गेले, त्या वेळी श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे चिमडमठाचे अधिपति होते. आणि त्यांच्या मातोश्री श्रीमाईसाहेब यरगट्टीकर याही विद्यमान होत्या. पूर्वी एकदा या माईसाहेब सांगलीस रहावयास आल्या होत्या. त्यावेळी त्या मामांच्या कीर्तनास येत. त्यांनी श्रीदादांची एक दोन कीर्तने ऐकली होती. माईसाहेबांना श्रीदादांची कीर्तने फारच आवडली होती. तेव्हा १९३९ सालच्या पांडवपंचमीच्या उत्सवासाठी श्रीदादा आले आहेत, हे पाहून माईसाहेबांनी आपले चिरंजीव श्रीनारायणमहाराज यांना सुचविले ''नारायणा, हा राम कीर्तने फार चांगली करतो. तेव्हा या वर्षीच्या उत्सवात रामाचे एकादे कीर्तन ठेवावे.'' ही सूचना नारायणमहाराजांनी स्वीकारली.

---

- ( मागील पानावरील टीप पुढे चालू ) -

वाचेच्या मनाच्या पलीकडचे नाम त्याचा बोध गुरुलिंगगीतेच्या रूपाने श्रुतिरूपाने १९३८ साली केला (साप्ताहिक तुतारी उपर्युक्त,पृ.२९). हा तुतारीचा अंक निघाला १९८७ साली. तोपर्यंत गुरुलिंगगीता प्राप्त होऊन जवळ जवळ पन्नास वर्षे झाली होती. आणि श्रीदादा काही रोज गुरुलिंगगीतेच्या पहिल्या पदाची तारीख पहात नव्हते. तेव्हा अनवधानाने त्यांचे तोंडून '१९३८ साल' हे शब्द बाहेर पडले असेच मानावे लागते. याचे कारण असे की श्रीदादांनीच गुरुलिंगगीतेच्या पहिल्या पदाचा दिवस''पौष शुद्ध नवमी शके १८६१'' असाच गुरुलिंगगीतेच्या वह्यातून लिखित स्वरूपात नोंदलेला आहे.

गुरुलिंगगीतेची पहिली २४ पदे सातारा येथील ''हंस'' नावाच्या साप्ताहिकात प्रसिद्ध झाली होती. ती देण्यापूर्वी श्री. द. वा. बेडेकर यांचे निवेदन तेथे होते. त्यात त्यांनी म्हटले आहे,''पहिले २१ अभंग हे शके १८६३ मध्ये मिळाले.'' हे श्री. बेडेकरांचे विधान संपूर्णपणे चूक आहे. कारण या २४ अभंगांत असणारे 'सिद्धवचन नीरु कुडी' आणि 'नारायणा अर्थवु बोधि सिदी' या दोन पदांचे बाबतीत ती मिळण्याचा दिनांक 'पौष शुद्ध ११, शके १८६१, दि. २१-१-३९ असा स्पष्टपणे श्रीदादांनी नोंदलेला आहे.'

हा सर्व भाग पाहिल्यावर पुढील निर्णय करावा लागतो :- गुरुलिंगगीतेच्या 'येनू इल्लदानू' या पहिल्या पदाचा शके १८६१ हाच ग्राह्य मानून, त्यात ७८ वर्षे मिसळल्यानंतर येणारा इ.स.१९३९ हाच श्रीदादांच्या चिमड-गमनाचा व गुरुलिंगगीता मिळू लागण्याचा मानावा लागतो. आणि तसेच या चरित्रात केले आहे.

या वर्षीच्या उत्सवात श्रीनिंबरगीकरमहाराजांचे अधिकारसंपन्न नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हेही उपस्थित होते.

कार्तिक प्रतिपदेला सकाळी श्रीदादांचे कीर्तन श्रीनारायणमहाराजांनी आयोजित केले. कीर्तनास नारायणमहाराज, नागाप्पाण्णामहाराज, माईसाहेब इत्यादि परमाधिकारसंपन्न मंडळी उपस्थित होती. श्रीदादांचे कीर्तन ऐकल्यावर श्रीनागाप्पाण्णामहाराज स्वयंस्फूर्तीने उद्गारले, ''अहो, हा राम खरोखरच प्रल्हाद आहे.'' असे म्हणून त्यांनी रामानंदमहाराज खटावकरांनी वापरलेल्या प्रल्हाद या नावाचे दृढीकरण केले. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की हेच प्रल्हाद नाव अधूनमधून गुरुलिंगगीतेतील पदांमध्ये श्रीनिंबरगीकरमहाराजांनी उपयोजिले आहे.

श्रीदादांचे हे कीर्तन नारायणमहाराजांनाही फारच आवडले. त्या दिवशीच्या आपल्या रात्रीच्या कीर्तनात नारायणमहाराजांनी श्रीदादांच्या कीर्तनाची स्तुति केली, इतकेच नव्हे तर आपल्या कीर्तनात श्रीदादांनी ''कापसाचा गोळा हा लोण्याचा गोळा समजून तो मिळेल या आशेवर एक मांजर जगले'', हे जे वाक्य उच्चारले होते, त्याचाच अधिक विस्तार नारायणमहाराजांनी केला.

चिमड येथील उत्सवाच्या या काळात श्रीदादांनी नागाप्पाण्णा-महाराजांचे दर्शन घेऊन त्यांना काही पारमार्थिक शंका विचारल्या. त्यांतील काहींचे समाधान नागाप्पाण्णामहाराजांनी केले. त्यातील एका शंकेचे निरसन करताना, नागाप्पाण्णामहाराजांनी सांगितले, ''सहस्रदळस्थानातून जी प्राणगति खाली भ्रूमध्यस्थानापर्यंत येते ती सरळ खाली न येता डाव्या कानाच्या वरील भागी असणाऱ्या 'दक्षिणशिखा' या स्थानातून खाली येते. या दक्षिणशिखा स्थानात सतत कीर्तन चालू असते.'' हे नागाप्पाण्णामहाराजांचे वचन श्रीदादा कधी कधी सांगत असत. नंतर श्रीनागाप्पाण्णामहाराज श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, तुमच्या उरलेल्या शंकांचे निरसन करून तुम्हाला स्वत: निंबरगीकरमहाराजच बोध करतील.'' येथेच एक गोष्ट लक्षात घ्यावी. यावेळी निंबरगीकरमहाराजांचे निर्याण होऊन ५३-५४ वर्षे उलटलेली होती; अशा स्थितीत ''आता मला निंबरगीकरमहाराज कसा बोध करतील?'' असा उलट प्रश्न श्रीदादांनी नागाप्पाण्णामहाराजांना केला नाही. कारण त्यांचा नागाप्पाण्णामहाराजांचे वर दृढ विश्वास होता, आणि नागाप्पाण्णांच्या-आपल्या



नातवाच्या-वचनानुसार निंबरगीकरमहाराज आपणांस बोध करतील अशी श्रीदादांची खात्री होती.

चिमडमठातील श्रीदादांच्या या वेळच्या मुक्कामात आणखी एक महत्त्वाची गोष्ट घडली. निंबरगीकरमहाराज तंबाकूओढण्यास एक चिलीम वापरीत. ती चिलीम नागाप्पाण्णामहाराजांनी श्रीदादांना निंबरगीकरमहाराजांचा प्रसाद म्हणून दिली. ती मस्तकाला लावून श्रीदादांनी तिचा स्वीकार केला. ही चिलीम आजही केळकरांच्या घरी आहे.

श्रीदादा इ.स. १९३९ मध्ये चिमडला जाण्यापूर्वी श्रावण शुद्ध १०, शके १८६१ रोजी श्रीमामा हे अभ्यंकर, दाणेकरी, इत्यादींना बरोबर घेऊन पंढरपुरला पांडुरंगाच्या दर्शनास गेले होते. तेथे ते एका मठात उतरले. परंतु मामांच्या गळ्यात वारकरी पंथाची माळ नसल्याने, त्यांना त्या मठात कीर्तन करण्याची परवानगी मिळाली नाही. मामांनी फार तर प्रवचन करावे असे त्यांना सुचविण्यात आले. प्रवचनात मामा बोलून गेले, ''ज्या माणसाच्या अंतरात नाममाळा आहे, त्याला बाहेरील तुळशीच्या माळेची जरुरी नाही.'' त्यानंतर मामा वगैरे विठ्ठलाचे दर्शन घेण्यास गेले. तेथून परत येत असताना, कोणीतरी जवळ येऊन मामांच्या गळ्यात फुलांचा हार घातला. मुक्कामी परत आल्यावर पहातात तो हारात मामांना एक तुळशीची माळ सापडली. ही माळ आजही केळकरांचे घरी जपून ठेवलेली आहे. या प्रसंगाची स्मृति म्हणून सांगलीस परत आल्यावर मामांनी प्रत्येक द्वादशीला वारकरी पद्धतीचे निरूपण आपल्या कीर्तनानंतर करण्यास प्रारंभ केला. पुढे दोन तीन वर्षांनी हे निरूपण करण्याचे काम श्रीदादांच्याकडे आले व ते त्यांनी पुढे काही वर्षे चालू ठेवले. त्यानंतर हळुहळु हे निरूपण करणे बंद झाले.

सौ. इंदिरामाता एकदा श्रीदादांना सहज म्हणाल्या, ''रामजी, तू कीर्तन निरूपणात साधनाबद्दल खूप सांगतोस. पण तुला स्वत:ला तरी जमेल का नऊ नऊ तास साधन करायला ?'' आईचा हा प्रश्न श्रीदादांनी गंभीरपणे घेतला. परंतु त्यांनी त्यावेळी काहीच उत्तर दिले नाही. परंतु दुसरे दिवशी श्रीदादांनी असे केले :- सकाळचे सर्व कार्यक्रम उरकल्यावर, श्रीदादा घरातील माडीवरच्या एका निवांत खोलीत मांडी घालून साधनास बसले. दुपारी जेवणासाठीही ते खाली आले नाहीत. मातापित्यांनी तिकडे तात्पुरते दुर्लक्ष केले. हळुहळु

संध्याकाळ झाली. मग मात्र सौ. इंदिरामातेचा जीव श्रीदादांच्या काळजीने खालवर होऊ लागला. त्यांना चैन पडेनासे झाले. श्रीदादा ज्या खोलीत बसले होते, त्या खोलीच्या पुढे जाऊन त्या म्हणाल्या, ''रामजी, तुझ्या साधनाबद्दल माझी आता खात्री पटली आहे. आता तू ऊठ बाबा आणि जेवावयास चल.'' सौ. मातोश्रींचे हे वचन ऐकून श्रीदादांनी आपले आसन विसर्जित केले आणि ते खोलीच्या बाहेर आले.

चिमड येथील १९३९ सालचा रथोत्सव पाहून श्रीदादा सांगलीत आल्यानंतर, एक दोन महिने उलटले नाहीत तोच श्रीदादांच्या आध्यात्मिक जीवनातील सर्वात महत्त्वाचा प्रसंग घडून आला. चिमड येथे श्रीनागाप्पाण्णामहाराजांनी श्रीदादांना दिलेले आश्वासन निंबरगीकरमहाराजांनी प्रत्यक्षात आणले, आणि त्यांनी श्रीदादांना कानडी पदे श्रुत करण्यास सुरवात केली. महाराजांची मातृभाषा कानडी होती.

दिवस होता पौष शुद्ध नवमी, शके १८६१. या दिवशी सकाळपासून ताप आला असल्याने श्रीदादा सोप्यावरील अंधाऱ्या खोलीत बिछान्यावर पडून होते. संध्याकाळची सहाची वेळ झाली. तोच त्या खोलीतील पश्चिमेकडच्या भिंतीतील खांबापुढे निंबरगीकरमहाराज साक्षात् प्रगट झाले. श्रीदादांना 'राम' अशी हाक मारून त्यांनी श्रीदादांचे लक्ष आपणाकडे वेधून घेतले. आणि नंतर निंबरगीकरमहाराजांनी कानडीतील एक पद सावकाश चालीत म्हणण्यास सुरवात केली. हे पद असे होते :- ''येनू इल्लदानू याक नन्न नीनू । सत्य चिदानंदनू आत्मारामा ।।१।। बंदिल्ला जीवात्मा नोडगे वळगे । नादबिंदू तोरिसी तम्मा ।।२।। हिंग हिंग रामा कुडी गुरुनामा । गुरुपदकमलदल्ली भृंग चंद्रमा ।।३।।''. श्रीदादांना कानडी अजिबात येत नसल्याने, त्यांना या पदाचा अर्थ कळला नाही. तरी ते पद ऐकता ऐकता त्यांना पाठ झाले. पदाचे पठण संपताच श्रीदादा उठले. त्यांनी निंबरगीकरमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवून नमस्कार केला. आणि ते वर मान करून पहातात, तो महाराज अदृश्य झालेले होते. महाराजांच्या चरणस्पर्शाने श्रीदादांचा ताप उतरला होता. याच खोलीत श्रीनिंबरगीकर-महाराजांचे अव्यक्त रूपात वास्तव्य झाले ही गोष्ट श्रीदादांना पुढे एकदा प्रचीतीस आली. इ.स.१९६७ मध्ये श्रीदादा रात्री सोप्यावर झोपले होते. त्या रात्री घरातील वीज गेलेली होती. श्रीदादांना रात्री जाग आली. त्यावेळी त्याच खोलीतून



प्रकाश बाहेर येत आहे असे श्रीदादांना दिसून आले.

वरील सर्व घटना श्रीदादांनी व्यवस्थितपणे लिहून ठेवली. आणि पाठ झालेला तो अभंगही त्यांनी उच्चारानुसार देवनागरी लिपीत लिहून काढला. या अभंगापासूनच श्रीदादांना श्रीगुरुलिंगगीता श्रुत होण्यास प्रारंभ झाला. हा अभंग श्रीदादा पुढे रोज म्हणू लागले. या पहिल्या पदाचा के. वा. आपटे यांनी केलेला मराठी पद्यातील अनुवाद असा आहे :- ''अरे काही नाही हे तू तुझे कशाला । सत्य एकलाला चिदानंद आत्मा ।।१।। जीवात्मयालागी जन्म मरण नाही । अंतर्मुख बाळा पाही नाद बिंदुरूपी ।।२।। ऐक ऐक रामा गुरुनाम घेई । गुरुपदकमल ठायी भृंगरूपे राही ।।३।।''

वरील घटनेच्या संदर्भात श्रीदादांनी आपल्या एका अभंगात (दासरामगाथा,पृ.१३५) म्हटले आहे. ''नागाप्पाण्णावचे गुरूलिंगजंगम । बोधिले परम प्रगटोनि।।'', आणि गुरुलिंगगीतेच्या या पहिल्या अभंगाच्या बाबतीत, श्रीदादांचा एक अभंग (दासरामगाथा पृ.१९६) पुढील प्रमाणे आहे :-

कानडी अभंग योगियांचा प्रसाद । देताहे आनंद नारायण ।।१।।
नारायणराव सिद्ध ते समर्थ । पुरविती आर्त जीवीचे या ।।२।।
अभंग उमटला माझिये श्रवणी । दर्शन देवोनि पुनीत केले ।।३।।
कानडीचा नसता मजसी संस्कार । अंतरी विचार दाखविला ।।४।।
पौष शुद्ध नवमी सुवर्णाचा दिन । कानडा भरून राहिलासे ।।५।।
ईश्वर कानडा भक्तही कानडा । किंकर कानडा दासराम ।।६।।

याखेरीज श्रीदादांच्या इतर काही अभंगांतही नारायणराव ऊर्फ गुरुलिंग जंगम ऊर्फ निंबरगीकरमहाराज यांनी आपणांस कानडी भाषेतून अभंग ऐकविले असे उल्लेख आलेले आहेत.

पारमार्थिकदृष्ट्या असे महत्त्वाचे प्रसंग घडत असताना श्रीदादांचे हायस्कूलचे शिक्षण चालू होतेच. या काळात त्यांना मनोहर मंगळवेढेकर नावाचा एक स्नेही लाभला. तो अत्यंत धार्मिक स्वभावाचा होता. श्रीदादांच्या संगतीने तो पुढे मामांच्या कीर्तनासही येऊ लागला. एकदा तो मामांचे कीर्तनात बसला असताना,''स्वरूपदर्शन सत्वरी । झाले त्या,'' असा त्याचा अधिकार होता. परंतु पुढे त्याचे अकाली निधन झाले. तेव्हा श्रीदादांनी त्याचे ओवीबद्ध चरित्र लिहिले व ते शके १८६२ (इ.स.१९४०) मध्ये प्रकाशित झाले.

## प्रकरण ४ : संदर्भ

१) लोकमान्य विद्यार्थी डायरी, १९३९. हीच वही क्रमांक १६ आहे.
२) श्रीगुरुलिंगप्रसादगीता, प्र. वासुदेव ऊर्फ यशवंत चिंतामण जोशी, माधवनगर, १९५३
३) गुरुलिंगगीता, प्र. श्री. वि. सहस्त्रबुद्धे, सांगली, १९८५
४) अखंड कीर्तनानंद, प्रकाश भावे, सांगली, १९८८, पृ. ६१, ६२
५) साप्ताहिक तुतारी, प.पू. रामराय केळकरमहाराज विशेषांक, १९८७, पृ. १४, २९
६) साप्ताहिक हंस, सातारा, वर्ष ११, अंक १५-१७, १९४३
७) वही क्रमांक ७५
८) श्रीदासरामगाथा, पृ. १३५, १९६
९) कै. मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचा अल्प परिचय, ले. रा. गो. केळकर, सांगली. अक्षयतृतीया, शके १८६२, पृ. १६
१०) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत, ले. दासराम, सांगली, १९७३, पृ.१०
११) कैवल्यप्रसाद, प्र. ह. र. कोटणीस, व पां. र. कोटणीस सांगली, १९५९, परिचय, पृ. १२
१२) दीपलक्ष्मी विशेषांक, पृ. १२-१३

### प्रकरण ५

# दादा सिद्धपदी गेले

### (इ.स.१९४१-१९४३)

श्रीदादांना केवळ एकच ''येनू इल्लदानू'' हे पद श्रुत करुन निंबरगीकर-महाराज थांबले नाहीत. त्यांनी आणखीही कानडी पदे श्रीदादांना श्रुत केली. पण महाराज ही पदे केव्हा श्रुत करतील याचा भरवसा नसे. उदा. गुरुवार दिनांक २-१०-१९४१ रोजी श्रीदादा मामांच्या कीर्तनात पेटीची साथ करीत असताना, त्यांना ''समाधान शांतीवु'' हे पद ऐकू येऊ लागले. हे पद फक्त श्रीदादांनाच ऐकू येत होते. दि. २०-९-१९४१ ते ३०-९-१९४१ या काळांत श्रीदादांना कानडीतील आठ पदे ऐकू आली. लगेच त्यांचा मराठी अर्थही निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांच्या मनात स्फुरविला. या आठ पदांपैकी ''जगवू मुट्टीवू'' या पदात महाराजांनी श्रीदादांना सांगितले, ''सर्व जगाला हरिनामाचे मार्गाने पोचव,'' तर ''जगदानुद्धरणादौ'' या पदात महाराज म्हणतात, ''हे रामा, तुझे साधन जवळ जवळ परिपूर्ण झाले असून, पूर्ण साधनापैकी ''शेष'' साधन राहिले आहे. तेव्हा तू जगाचा उद्धार करावयास पाहिजे आहेस.'' या दोन्ही वाक्यांचा मथितार्थ असा झाला की निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना मुमुक्षूंना उपदेशानुग्रह करण्याचा अधिकार दिला. त्याप्रमाणे श्रीदादांनी सर्वप्रथम श्री. माणिक गोसावी यांस अनुग्रह दिला. त्याचे असे झाले :-

श्रीदादांच्या वाड्यात १९४१ साली परशुरामपंत गोखले, श्यामराव आतगूर, श्री. कुलकर्णी, बिडेश गोसावी असे काही गृहस्थ बिऱ्हाडकरु म्हणून रहात होते. त्यातील गोसावी यांचा मुलगा माणिक. तोही सिटी हायस्कूलमध्येच शिकत होता. तो फावल्या वेळात श्रीदादांच्या संगतीत रहात असे; कारण त्याला त्यात समाधान वाटे. कधी कधी श्रीदादा व माणिक हे दोघे एकत्र अभ्यास करीत; कारण श्रीदादाही त्यावेळी सिटी हायस्कूलमध्ये शिकत होते. माणिक बराच वेळ श्रीदादांच्या सहवासात घालवतो, हे त्याच्या घरच्या लोकांना पसंत नव्हते. या गोसावी कुटुंबात श्रीशंकरमहाराज मिरीकर हे सत्पुरुष येत असत. त्यांना एकदा घरच्या सर्वांच्या देखत माणिकने श्रीदादांबद्दल विचारले. तेव्हा मिरीकरमहाराज म्हणाले,''अहो, रामभाऊ केळकर हे पूर्व जन्मीचे महान्

योगी आहेत. आत्ता ते जवळ जवळ सिद्धावस्थेला पोहोचले आहेत.'' हे वचन ऐकल्यावर माणिकच्या घरच्या मंडळींचा विरोध मावळला. या मिरीकरमहाराजांचे संबंधात श्रीदादांचा एक अभंग असा आहे :- ''शंकरमहाराज मिरिकर थोर । येती वारंवार आम्हा घरी ।।१।। मामांना म्हणती तुम्ही एकनाथ । ऐकोनी चकित होती लोक ।।२।। दासरामाचेही कवतुक करिती । आनंद तो चित्ती वर्णवेना ।।३।।'' (दासरामगाथा, पृ.१३७)

श्रीदादांचे संगतीत माणिक बराच वेळ येत असल्याने, त्याला कळले की श्रीदादांना निंबरगीकरमहाराज कानडी पदे श्रुत करीत आहेत. तसेच १९४१ पर्यंत श्रीदादांना श्रुत झालेल्या पदांचा मराठी अर्थही त्याच्या वाचनात आला. त्यातील 'जगवू मुट्टीवू' आणि ''जगदानुद्धरणादौ'' या दोन पदांचा मराठी अर्थ वाचल्यावर माणिकच्या लक्षात आले की निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना उपदेशानुग्रह देण्याची आज्ञा केली आहे. तेव्हा तो श्रीदादांच्या मागे लागला की श्रीदादांनी त्याला अनुग्रह द्यावा. प्रथम प्रथम श्रीदादांनी उपदेश देण्याची टाळाटाळ केली. पण माणिक मात्र हट्टच धरून बसला. त्याचा दृढ निश्चय पाहून श्रीदादांनी त्याला उपदेशानुग्रह दिला. आणि माणिक बिडेश गोसावी हा श्रीदादांचा पहिला शिष्य झाला. यानंतर माणिकची बहीण विमल, राजा गोखले, सुंदरी आतगूर, नामदेव मोरेश्वर कुलकर्णी, पद्मा कुलकर्णी इत्यादि श्रीदादांचे अनुगृहीत झाले. याच सुमारास श्रीदादांचे पंडितमामा आपल्या मुलांसह श्रीदादांच्या घरी रहात होते. त्यांचे पुत्र लक्ष्मण व भरत आणि त्यांची कन्या शरयू हेही श्रीदादांचे शिष्य झाले. नामदेवचा शाळामित्र केशव आपटे होता. नामदेवने त्याला श्रीदादांचे कडे नेले आणि तोही श्रीदादांचा अनुगृहीत झाला.

श्रीदादांचे मामा पंडितराव हे फार हुषार होते. ते श्रीदादांना अनेकदा परमार्थातील शंका विचारीत. ''पंडित मामांच्या शंका मार्मिक असत,'' असे श्रीदादा म्हणत असत. याच पंडित मामांच्या बरोबर श्रीदादा एकादा विटे गावाजवळील रेणागिरी या स्थानातील रेवणसिद्धांचे दर्शनास गेले. श्रीदादा जेव्हा रेवणसिद्धांचे दर्शन घेत होते, तेव्हा सुवास सुटला होता. रेवणसिद्धांचे दर्शन घेऊन दोघेही सांगलीस परत आले. त्याच रात्री श्रीदादांच्या स्वप्नात रेवणसिद्ध आले. रेवणसिद्धांनी श्रीदादांच्या भाल-प्रदेशी विभूति चर्चिली. श्रीदादांनी त्यांना नमस्कार केला. सकाळी जाग आल्यावर, श्रीदादांना



रेवणसिद्धांचे स्तुतिपर आणि त्यांचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग स्फुरू लागले. या अभंगांच्या समूहाला श्रीदादांनी 'रेवणसिद्धपाठ' असे नाव दिले. हा रेवणसिद्धपाठ दासरामगाथ्यात पृ. ४६८-४७२ वर आलेला आहे.

श्रीदादांचे वय इ.स. १९४१-४२ साली २१-२२ वर्षे होते. श्रीदादा यावेळी वयात आले आहेत हे पाहून श्रीदादांच्या मातापित्यांनी त्यांच्या लग्नाचा विचार सुरू केला. ''परमार्थाला प्रपंचाचे कुंपण पाहिजे,'' असा विचार करून श्रीदादांनी आपल्या विवाहाला संमति दिली. आणि श्रीदादा मॅट्रिकच्या वर्गात शिकत असतानाच त्यांचा विवाह झाला.

इचलकरंजी गावचे श्री. बळवंतराव मराठे यांचे मार्फत इचलकरंजीतीलच गोवंडे नावाच्या कुटुंबातील मालती ही वधू श्रीदादांना सांगून आली. श्री. दत्तात्रय गोवंडे आणि त्यांची पत्नी सौ. गिरिजा या पतिपत्नीला सात अपत्ये होती. त्यांमध्ये शेवटचे कन्यारत्न म्हणजे मालती. गोवंडे कुटुंब मोठे होते. त्यामुळे मालतीला लहानपणापासूनच घरची कामे करावयाची सवय लागली होती. घरची स्थिति बेताचीच असल्याने मालतीचे शालेय शिक्षणही बेताचेच झाले होते. ती फायनल परीक्षा उत्तीर्ण झाली होती. मालतीला श्रीमामांनी पाहिले आणि तिला सून म्हणून पसंत केले. आणि हा विवाह करण्याचे निश्चित झाले.

श्रीदादा व मालती यांच्या विवाहाची तिथि निश्चित झाली. आणि हा विवाह मोठ्या थाटामाटाने सांगलीतच पार पडावयाचा होता. पण तो योग आला नाही. त्याला कारण असे घडले :- श्रीबाबूरावजी कोटणीस यांच्या प्रथम पत्नी सौ. जानकीबाई या श्रीदादांना पुत्रवत् मानीत. श्रीदादांचा विवाह ठरला आहे हे कळताच, त्या मामांना म्हणाल्या, ''बापूरावजी, रामच्या विवाहात आम्ही देवक ठेवणार.'' आपल्या एकुलत्या एक चिरंजीवाचे लग्नातील देवक गुरु-घराण्यातील पूज्य व्यक्ति ठेऊ इच्छितात, हे लक्षात घेऊन मामांनी त्या गोष्टीला होकार दिला. पण देवाच्या मनात वेगळेच होते. किरकोळ आजाराचे निमित्त होऊन, सौ. जानकीबाई दि.६-३-१९४२ रोजी कैलासवासी झाल्या. या दुःखद प्रसंगामुळे ठरलेल्या तिथीला हा विवाह करावा की नाही असा मामांना पेच पडला. तथापि गोवंडे मंडळी म्हणाली,''आम्ही आमच्या दूरदूरच्या नातेवाईकांना मुहूर्ताचा दिवस कळविला आहे. आता मुहूर्त बदलला तर तो

बदल त्यांना योग्य वेळी कळविणे शक्य होणार नाही.'' ही अडचण मामांनी लक्षात घेतली आणि मग हा विवाह सांगलीमध्ये न करता, नरसोबाचे वाडीस करण्याचे ठरले. त्यामुळे श्रीदादांचा जो विवाह सांगलीत थाटामाटाने होणार होता, तो नृसिंहवाडीत साधेपणाने साजरा झाला. माघ वद्य ११, शके १८६४ (इ.स.१९४२) या शोभन दिनी हा विवाह संपन्न झाला. विवाह पार पडल्यावर वरात निघाली. यावेळी टांग्यात बसताना श्रीदादांच्या गळ्यातील हार तुटून पडला. क्षणभर श्रीदादा स्तब्ध झाले व मामांना म्हणाले ''मामा, चिमडला माईसाहेब यरगट्टीकरांनी आत्ता देह ठेवला आहे''. आणि ते खरे होते हे सांगलीस परत आल्यावर कळले.

चि. सौ. कां. मालती ही आता सौ. सीता या सासरच्या नावाने ओळखली जाऊ लागली. आणि सौ. सीतावहिनींच्या रूपाने एका सतीचा श्रीदादांचे घरात प्रवेश झाला. सौ. सीताबाई जेव्हा गृहिणी म्हणून केळकरांच्या घरात आल्या, तेव्हा घरी मामा हे श्वशुर, सौ. इंदिराबाई या सासूबाई, श्रीदादा, आणि श्रीदादांचे मामेबंधु भरत ही मंडळी घरी होती. श्री. भरत फाटक हे आपल्या भावजयीला 'वहिनी' म्हणू लागले. आणि वहिनी हेच नाव पुढे इतरांच्या तोंडीही बसले. इतकेच नव्हे तर सौ. सीताबाईंची मुलेही त्यांना वहिनी म्हणूनच हाक मारू लागली. मामा व सौ. इंदिराबाई मात्र त्यांना सीताबाई असे संबोधीत.

सौ. इंदिराबाईंची प्रकृति या सुमारास बेताचीच झाली होती. त्यामुळे घरातील बरीचशी कामे सौ. वहिनींच्या वाट्याला आली. स्वत:चे वय लहान असूनही, वेळच्या वेळी कामे करण्याची सवय लावून घेऊन, सौ. वहिनींनी सर्व कामे समर्थपणे पेलली. त्या भल्या पहाटे उठत, अंगण झाडून सडासंमार्जन करीत व मग सुंदर रांगोळी रेखाटीत. नळाचे पाणी भरणे हेही काम असे. तसेच धुणी-भांडीही घरीच असल्याने, तीही कामे सौ. वहिनींच्याकडे आली. अनेकदा त्या धुणे घेऊन कृष्णा नदीच्या विष्णु घाटावर जाताना दिसत. प्रारंभी सौ. इंदिराबाई स्वयंपाक करीत. पुढे जसजसे त्यांचे वय होऊ लागले तसतसे ते काम त्यांना रेटेना. तेव्हा स्वयंपाकाची जबाबदारीही सौ. वहिनींचे खांद्यावर आली. तसेच घरी येणारे पाहुणे आणि भक्तमंडळी यांचेकडेही त्यांना पहावे लागे. आपल्या पतीचे खाणे-पिणे, कपडे-लत्ते यांकडेही सौ. वहिनींना लक्ष द्यावे लागे. सौ. वहिनी श्रीदादांना तुम्ही असे न म्हणता आपण असे म्हणीत.



मामांचे सकाळचे व संध्याकाळचे नित्यनेमाचे कार्यक्रम असत. त्या त्या कार्यक्रमांसाठी आवश्यक ती पूर्व तयारी करणे, आरती व प्रसाद वेळच्या वेळी तयार ठेवणे या गोष्टीही सौ. वहिनी चोखपणे पार पाडीत. मामांचे नैमित्तिक कार्यक्रम म्हणजे आराधना, रथ, पालखी इत्यादि असत. त्या कार्यक्रमांसाठीही योग्य त्या गोष्टी वेळच्या वेळी करणे यांकडेही सौ. वहिनी लक्ष पुरवीत. मामांच्या दैनिक कीर्तनात मध्यंतरी बुक्का लावून झाल्यावर स्त्री-श्रोत्यांमध्ये प्रसाद वाटला जाई. हा प्रसाद वाटण्याचे कामही सौ. वहिनी मोठ्या उत्साहाने करीत. काही विशेष प्रसंगी अंगावर भरजरी लुगडे व दागिने आणि गोऱ्या मुखावर नाकात शोभिवंत नथ असणारी त्यांची मूर्ति पाहिल्यावर साक्षात् लक्ष्मीच जणु श्रीदादांच्या घरी वावरत आहे असा भास होई.

सर्व कामे उरकून संध्याकाळी मारुतिमंदिरापर्यंत जाऊन सौ. वहिनी भाजी वगैरे आणीत. कीर्तन संपता संपता पडवीवरील कट्ट्यावर येऊन बसत. फावल्या वेळात नित्य नेमाने कीर्तनास येणाऱ्या स्त्रियांची आस्थापूर्वक चौकशी करीत. सौ. वहिनी लौकरच स्त्रियांमध्ये प्रिय झाल्या.

यथावकाश अपत्ये झाल्यावर त्यांची देखभाल करणे हे काम सौ. वहिनींना करावे लागले. मुलांचे खाणे-पिणे, कपडे-लत्ते, आजार, शाळा, इत्यादीकडे त्या लक्ष देत. सर्व कामे करताना ''कंटाळा आला'' असे शब्द सौ. वहिनींच्या तोंडातून कधीही बाहेर पडले नाहीत. सर्व कामे उत्साहाने आणि हसतमुखाने करणे हेच त्यांचे वैशिष्ट्य होते.

श्रीदादांचा विवाह समारंभ पार पडल्यावर त्याच वर्षाच्या मे महिन्यात मामांनी आपल्या रामेश्वर या कुलदेवतेच्या दर्शनास जाण्याचे ठरविले. आचरे या गावी रामेश्वराचे स्थान आहे. घरची सर्वच मंडळी यात्रेला निघाली. वाटेमध्ये कणकवली हे गाव लागले. कणकवलीच्या पुढील घाटातून जाण्यास एक बैलगाडी ठरविण्यात आली. या घाटावर उतरणीला गाडीचे बैल गाडीच्या जुवातून सुटले आणि गाडी घरंगळू लागली . परंतू रामेश्वराचे कृपेने गाडी थांबली. सर्व जण संकटातून निभावले. असे म्हणतात की मानवी जीवनात ईश्वरच संकटे आणतो आणि तोच ती दूर करतो. याचा प्रत्यय सर्वांना आला.नंतर पुढील प्रवासात काही विघ्न, त्रास न होता प्रवास सुखरूप झाला. आचरे गावात

पोचल्यावर रामेश्वरांचे दर्शन इत्यादि सर्व गोष्टी यथासांग पार पडल्या. मग परत निघण्याचा दिवस ठरला. परत जाताना रामेश्वराचा कौल घेण्याची पद्धत आहे. त्याप्रमाणे कौल लावण्यात आला. ''ठरलेल्या दिवशी न जाता दुसरे दिवशी निघावे'' असा रामेश्वरांनी कौल दिला. मामांनी कौल स्वीकारला. दुसरे दिवशी परतीचा प्रवास सुरू झाला. वाटेत या प्रवासी मंडळींना कळले की काल त्या वाटेने गेलेल्या यात्रेकरूंच्या बैलगाडीवर वाघाने हल्ला केला होता. मंडळींनी मनोमन रामेश्वरांचे गुणगान केले. नंतर सर्वजण सुखरूपपणे सांगलीला पोचले.

श्रीमामांचे ऐवजी श्रीदादा हेच द्वादशी दिवशीची निरूपणे इ.स. १९४२ पासून करू लागले होते. या वेळी एकदा त्यांच्या मनात आले की आपण निरूपण करतो खरे पण एकादशीचा उपवास मात्र करीत नाही. तेव्हा त्यांनी एकादशीचा उपवास करण्याचे ठरविले. प्रथम त्यांनी निर्जळी एकादशी करण्यास प्रारंभ केला. हा त्यांचा क्रम नोकरी लागेपर्यंत टिकला. पुढे नोकरीसाठी सहा तास बाहेर रहावयाचे म्हणजे पोटात काहीतरी हवे, असा घरच्या मंडळींचा आग्रह पडला. तेव्हा थोडे उपवासाचे जिन्नस खाण्याचे श्रीदादांनी मान्य केले. अशा प्रकारे उपवासाच्या फराळासह श्रीदादांची एकादशी चालू राहिली.

श्रीदादांची कीर्तन-निरूपणे चांगली होतात अशी प्रसिद्धि परमार्थ-प्रेमींच्या वर्तुळात पसरली होती. त्यामुळे त्यांना कीर्तन-प्रवचनासाठी आमंत्रणे येत. एकदा सांगलीजवळील तुंग गावच्या मारुति-मंदिरात श्रीदादांचे निरूपण ठरले. श्रीदादा आणि अन्य मंडळी एका बैलगाडीतून तुंग गावी जाण्यास निघाली. वाटेमध्ये अचानकपणे बैल उधळले व ते बाजूच्या शेतात घुसले. बैलगाडी कलंडली. गाडीतील बहुतेकांना मुका मार लागला. कशीबशी बैलगाडी सरळ करून मंडळी तुंग गावात पोचली. लागलेल्या मुक्या माराकडे अजिबात लक्ष न देता श्रीदादांनी तीन तास निरूपण केले.

श्रीरामानंदमहाराज खटावकर यांच्या पुण्यतिथिनिमित्त खटाव गावात श्रीदादांचे निरूपण ठरले होते. श्रीदादा व त्यांचे बरोबरची मंडळी खटाव गावाजवळ पोचली. दिवस पावसाळ्याचे असल्याने सर्वत्र चिखल पसरलेला होता. तितक्यात अंधारही पडला. अंधारातच चिखल तुडवीत वेरळा नदी पार करून सर्वजण पलीकडे खटावला पोचले. सगळेजण शिणून गेले होते. परंतु



सांगली गावातच नारायणमहाराज मळणगावकर रहात असत. त्यांनी आपल्या मठात तुकाराममहाराजांच्या बीजेच्या दिवशी श्रीदादांचे निरूपण आयोजित केले. ते महाराजांना फार आवडले. निरूपणानंतर मळणगावकरमहाराज श्रीदादांचे गळ्यात हार घालू लागले. तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''महाराज, मी हार घालून घेत नाही.'' त्यावेळी महाराज बोलले, ''रामभाऊ, हा हार तुमचे माहात्म्य दाखविण्यासाठी आहे.'' महाराज पुढे म्हणाले, ''रामभाऊ, आता यापुढे तुकाराम बीज आणि एकनाथ षष्ठी या दिवशी आमच्या मठात येऊन तुम्हीच निरूपण करावे अशी माझी इच्छा आहे. रामभाऊ, तुम्ही फार भाग्यवान् आहात.'' मळणगावकरमहाराजांच्या इच्छेप्रमाणे श्रीदादांची निरूपणे त्यांच्या मठात होऊ लागली. पुढे काही काळाने मळणगाव-करमहाराजांनी देह ठेवला. तेव्हा त्यांच्या पुण्यतिथि दिवशी सुद्धा श्रीदादांचेच निरूपण मळणगावकरमहाराजांचे मठात होऊ लागले.

याच काळात पुणे येथील नारदमंदिरात कीर्तनाचा एक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात कीर्तन करण्यास येण्याचे आमंत्रण श्रीदादांना आले ते स्वीकारून श्रीदादा पुण्यास गेले व तेथील प्रचंड जनसमुदायापुढे त्यांचे कीर्तन झाले. या कीर्तनास प्रा. गणपतराव करंदीकर हे गृहस्थ उपस्थित होते. त्यांनी पूर्वी सांगलीत तात्यासाहेब कोटणीसमहाराजांची कीर्तने ऐकली होती. त्यांना श्रीदादांचे कीर्तन फारच आवडले. दुसरे दिवशी ते श्रीदादांच्या दर्शनास आले व त्यांचा गौरव करून म्हणाले, ''रामभाऊ, तुमचे कीर्तन ऐकल्यावर मला कोटणीसमहाराजांच्या कीर्तनाची आठवण झाली.''

याच सुमारास श्री. फडके नावाचे एक गृहस्थ विमनस्कपणे गावोगावी फिरत सांगलीत आले. श्रीदादांची कीर्ति ऐकून ते श्रीदादांच्याकडे आले. ते श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, मी माझे गुरूचे हाताखाली योगाचा अभ्यास करीत होतो. माझ्या हातून एक प्रमाद घडला. त्यामुळे माझे गुरु रागावले. त्यांच्या रागामुळे माझ्या डोळ्यांपुढे एक चक्र सतत फिरताना दिसते. त्यामुळे मी अगदी संत्रस्त होऊन गेलो आहे. काय करावे हे कळत नाही.'' श्रीदादा त्यांना म्हणाले, ''फडके, तुम्ही काही दिवस सांगलीतच रहा. तुमच्या त्रासाबद्दल काय करता येते ते पाहू या.'' काही दिवसानंतर फडके श्रीदादांच्याकडे आले. श्रीदादा त्यांना म्हणाले ''फडके, आता तुम्ही तुमच्या गुरूकडे जावा. व त्यांना

शिणवट्यांकडे लक्ष न देता इच्छित स्थळी पोचताच श्रीदादांनी निरूपण सुरू केले आणि ते पहाटेपर्यंत चालू राहिले.

माझा निरोप सांगा की मी तुम्हास हे चक्र काढून घेण्यास सांगितले आहे.'' फडके यांनी तसे केले. आणि मग त्यांचे डोळ्यांपुढे फिरणारे चक्र अदृश्य झाले.

श्रीदादांच्या जीवनात इ.स.१९४३ साली पुढील दोन प्रसंग घडले : श्रीदादा अधूनमधून श्रीबाबूरावजी कोटणीस यांचेकडे जात असत. ते एकदा म्हणाले ''रामभाऊ, तुम्ही आम्ही कैवल्यवैभव या ग्रंथात आलेल्या संतांच्या कूट पदांवर स्पष्टीकरणात्मक टीपा लिहू या.'' श्रीदादांनी होकार दिला. घरी परत आल्यावर त्यांनी अनेक कूटपदांवर टीपा लिहून काढल्या. त्यांतील 'काट्याच्या अणीवर वसती तीन गाव', 'मुंगी उडाली आकाशी', 'पणतू तोंडे भक्षितो पणजा' या कूट अभंगांवरील टीपा श्रीदासरामगौरवग्रंथात पृ. २२-२४ वर उद्धृत केलेल्या आहेत.

पांडुरंगमहाराज ताम्हनकर हेही सांगलीत रहात. ते अधूनमधून श्रीमामा व श्रीदादा यांना भेटण्यास येत. त्यांना श्रीदादांचा श्रेष्ठ पारमार्थिक अधिकार ज्ञात होता. ते एकदा श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, तुम्ही कोणत्यातरी आध्यात्मिक ग्रंथावर स्पष्टीकरणात्मक टीका लिहावी असे मला वाटते.'' त्यांची सूचना अंमलात आणण्याचे श्रीदादांनी ठरविले. आणि आपल्या घरातील ग्रंथसंग्रह व हस्तलिखिते श्रीदादांनी चाळून पाहिली. त्यांना श्रीज्ञानदेवतेहत्तिशी या ग्रंथाची हस्तलिखित प्रत सापडली. हा ग्रंथ तादृश अप्रसिद्ध होता व बराच अवघडही होता. त्यावर टीका लिहिण्याचे ठरवून, श्रीदादांनी यावरील ''सानंद'' टीका लिहून पूर्ण केली. ज्ञानदेवतेहत्तिशीवर दासरामानी सानंद टीका लिहिली ही गोष्ट म्हणजे ''श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी १६ वे वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली तसाच हा चमत्कार म्हटला पाहिजे'' असे गुरुलिंगप्रसादगीता या ग्रंथाचे प्रस्तावनाकार म्हणतात. पुढे सानंद टीकेसह प्रस्तुतचा ग्रंथ पालघर येथील श्रीमंत मातोश्री माईसाहेब दांडेकर यांनी आपले चिरंजीव माणिक यांच्या स्मरणार्थ पुस्तकरूपाने साकार करण्याचे ठरविले आणि हा ग्रंथ दि. १६ मे १९५२ रोजी प्रकाशित झाला. या प्रकाशित ग्रंथात जोगेश्वरीचे मं.रा.टाकीमहाराज यांचे पत्र छापलेले



आहे. त्या पत्रातील महत्त्वाचा मजकूर येथे मुद्दाम उद्धृत केला आहे तो असा :- ''सदर ग्रंथात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी योगमार्गाचे सांगोपांग विवेचन केले असून, त्या मार्गाने जाणाऱ्या अनुगृहीत साधकोत्तमाला तो उत्तम मार्गदर्शक होणार यात शंका नाही. आपली टीका ही त्याचपरी श्रीगुरुकृपेने या मार्गावर चांगलाच प्रकाश पाडणारी अशी झाली आहे. आपण गुरुकृपेस पात्र असल्यामुळे आपल्या हातून श्रीज्ञानेश्वरमहाराजांस संमत अशी टीका निर्माण झाल्यास त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. योगमार्गाचे अवलंबन करणाऱ्यांनी आपल्या या अल्प कृतीचा फायदा घ्यावा अशी मी शिफारस करीत आहे.''

श्रीनिंबरगीकरमहाराज हे इ.स.१९४१ नंतरही श्रीदादांना वेळोवेळी कानडी पदे श्रुत करीत होते. इ.स. १९४३ मध्ये या पदांची संख्या २६ झाली होती, व त्यांचा मराठी अर्थही श्रीदादांना मिळाला होता. या पदांची हकिकत श्री. द. वा. बेडेकर या गृहस्थांना कळली. ही पदे व त्यांचा अर्थ वाचल्यावर वेदमूर्ती द.वा. बेडेकर हे अगदी भारावून गेले. ही पदे व त्यांचे अर्थ प्रकाशित होऊन लोकांचे पुढे आलेच पाहिजेत अशी त्यांची धारणा झाली. त्यावेळी श्री. बेडेकर हे सातारा येथील ''वर्णाश्रम स्वराज्य संघ'' या संस्थेचे प्रचारक होते. या संघाचे त्या काळी ''हंस'' नावाचे साप्ताहिक सातारा येथून प्रसिद्ध होत असे. त्या हंसमध्ये प्रकाशित करण्यास ही कानडी पदे व त्यांचे अर्थ श्री. बेडेकरांनी पाठवून दिले. ते सर्व हंसच्या ११ व्या वर्षाच्या अंक १५-१७ मध्ये इ.स. १८-११-१९४३ ते १६-१२-१९४३ या काळात प्रसिद्ध झाले. हंसमध्ये २६ कानडी अभंगापैकी २४ अभंग प्रकाशित झाले. ''जगवू मुट्टीवू'' आणि ''जगदानुद्धरणादौ'' ही दोन पदे श्रीदादांनी मागे ठेवली होती. तसेच हंसमध्ये ''सिद्धानंदरूपन्ने'', ''ओळगिंतादू'', ''हरवेयू नारायण'', ''प्रगटादा गुरु'' आणि ''मोदलू श्रीसोमेश्वरु'' या पदांचे क्रमांकही सध्या प्रचलित असणाऱ्या गुरुलिंगगीतेतील क्रमांकापेक्षा भिन्न होते. हंसमध्ये या पदांना श्री. बेडेकर यांनी ''परिचय'' जोडला होता, त्यात 'प्रल्हाद (=श्रीदादा)' ची महती गाईली होती. तसेच बहुतेक पदांच्या प्रारंभी त्या त्या पदाचा प्रसंग, वेळ, इत्यादिही दिलेले होते.

श्री.गणपतराव कानिटकर हे साधारण इ.स. १९४२ पर्यंत मामांचे घरी रहात होते. पुढे ते औदुंबरगावी रहाण्यास गेले व तेथे ते देवापुढे कीर्तने करु

तेव्हा त्यांना श्रीरामू माळीमहाराज या संताचे दर्शन झाले. त्यावेळी काय घडले ते श्रीदादांनी एका अभंगात वर्णिले आहे. तो अभंग असा :-

दर्शन हे झाले रामू माळियाचे । समाधान साचे वाटे मज ।।१।।
भिलवडी माझारी स्टेशनात जाता । नवल हे कथा घडो आली ।।२।।
माझे खिशातोनी एक आणा[1] घेती । भक्त ते म्हणती भाग्य असे ।।३।।
जरी कोणी ठेवी रुपये हजार । नाही आण्यावर घेतलेसे ।।४।।
ज्याचा आणा घेती तयाचे कल्याण । निश्चये करुन होत असे ।।५।।
रामू माळियाचा असाची लौकिक । विदेहीच एक आत्मज्ञानी ।।६।।
रामालागी गीता दिली असे कोणी । गणपतरावांनी विचारिले ।।७।।
शंभूने दिली ऐसे रामू बोले । रातिचिया वेळे म्हणा म्हणती ।।८।।
ह्रद्‌गद कळले गणपतराव यासी । आनंद मानसी दासरामा ।।९।।
(दासरामगाथा,पृ.१३६)

श्रीदादांच्या पारमार्थिक जीवनाबरोबर त्यांचे प्रापंचिक जीवनही चालू होते. इ.स.१९४३ पूर्वी श्रीदादा मॅट्रिकचे परीक्षेत अनुत्तीर्ण झाले होते. आता १९४३ सालीही या परीक्षेस बसण्याचे श्रीदादांनी ठरविले. एप्रिल १९४३ मध्ये परीक्षा होती. परीक्षेचे केंद्र सांगलीतील विलिंग्डन कॉलेजमध्ये होते. परीक्षेसाठी श्रीदादा टांग्याने ये-जा करीत. दि. २१-४-१९४३ रोजी पेपर सुटल्यावर श्रीदादा टांग्याने परत येत होते. वाटेतच पाऊस सुरू झाला आणि लहान लहान गाराही पडू लागल्या. निसर्गाच्या त्या चमत्काराने श्रीदादा भारावून गेले. त्यांना दिसले की गारा जमिनीवर पडत होत्या आणि लगेच वितळून जात होत्या. ते पाहिल्यावर तत्काळ श्रीदादांना पुढील पद स्फुरले :-

या गारा पाहू जरा । पावती निर आकारा ।।ध्रु।।
जेथुनिया या आल्या । त्यातचि विरुनि गेल्या ।
भासती ज्या नासती ज्या । पावू मुळी तो थारा ।।१।।
शीतपणे घन होती । उष्णची मिळवी नीरा ।
नीर मिसळे जइ नीरा । पहावे केवि आकारा ।।२।।

१. ''आणा'' हे त्या काळी प्रचलित असलेले एक चार पैशांचे नाणे होते.



लागले. एकदा इ.स. १९४३ चे सुमारास श्रीदादा गणपतरावांचे बरोबर औदुंबरला जाण्यास निघाले. त्या काळी रेल्वेने भिलवडी स्टेशनवर उतरून दोघेही औदुंबरला निघाले होते. ज्यावेळी ते दोघे भिलवडी स्टेशनवर उतरले

शीतरुपे वायुचि हा । उष्णही तोचि उबारा ।
द्रवबिंदू जे झाले । त्याचे मूळ हा वारा ।।३।।
ते होऊन गमतीने । जेथुनी जीवपसारा ।
जीवन ते जीवसृष्टी । दाखवी सार असारा ।।४।।
चराचरा व्यापक हा । अवघा एकचि सारा ।
धन्य हा हरि माझा । दासरामी विस्तारा ।।५।।
(दासरामगाथा,पृ.२८३).

चैतन्याचा वायु हेच सर्वांचे मूळ तत्त्व आहे. त्यापासून सर्व काही झाले आहे. सर्व काही तोच आहे. आणि जीवाने त्या चिद्‌वायूतच मिसळून जावयाचे आहे, हे श्रीदादांचे तत्त्वज्ञान या पदात सहजपणे व्यक्त झाले आहे.

मॅट्रिकच्या परीक्षेत १९४३ साली अनुत्तीर्ण झाल्यावर, त्या परीक्षेला बसण्याचा नाद श्रीदादांनी सोडून दिला. तरी इ.स.१९४३ अखेर श्रीदादा परमार्थाच्या परमोच्च परीक्षेत पास झाले. म्हणजे या वर्षअखेर श्रीदादा हे परमार्थातील अत्युच्च अशा सिद्‌ध-संत या पदवीस पोचले. श्रीदादांच्या जन्मापूर्वीपासूनच्या गोष्टींचे विहंगमावलोकन केले की ही गोष्ट अगदी स्पष्ट होते. श्रीदादा आईच्या गर्भात असताना, त्यांचे आईला कोटणीसमहाराजांचा अनुग्रह लाभला. तत्पूर्वी वजीरबाबा भविष्यवाणी वदले होते. वयाचे चौदावे दिवशी श्रीदादांना कोटणीसमहाराजांचा कृपानुग्रह झाला. वयाचे पाचवे वर्षापासून ते साधन व कीर्तन करु लागले. पौष शुद्‌ध नवमीपासून निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना बोध करण्यास प्रारंभ केला. इ.स.१९४१ साली मिळालेल्या 'जगवू मुट्टीवू' आणि 'जगदानुद्‌धरणादौ' या पदांत 'शेष' साधन राहिल्याचे सांगून निंबरगीकरमहाराजांनी श्रीदादांना जगदोद्‌धार करण्याची आज्ञा दिली. गुरुलिंगगीतेतील अनेक पदांमध्ये श्रीदादांचा परमार्थातील श्रेष्ठ अधिकार निंबरगीकरमहाराजांनी स्वत:च व्यक्त केला आहे. नमुना म्हणून एक ओळ अशी देता येईल :- ''मुक्त दासराम जगदांबरु सद्‌गुरु आदा । नानू नीनू इल्ला तम्मा ब्रम्हानंदू बंदा।।''(८.४). या ओळीचा मराठी अर्थ असा आहे :-

''मी-तू-पणा सरल्याने मुक्त स्थितीत गेलेल्या दासरामापुढे श्रीसद्गुरु प्रगट झाल्याने त्यास ब्रम्हानंद झाला आहे.'' अहंकार गेल्यामुळे श्रीदादा हे साक्षात्कारी संत झाले होते. या गोष्टीला पुष्टिदायक म्हणून पुढील गोष्टींचा निर्देश करता येतो :-

(१) वर सांगितलेली श्री. फडके योगी यांची कथा श्रीदादांची सिद्ध पदवी दाखविते. (२) श्रीदादांचा पहिला शिष्य जो माणिक गोसावी त्याला अनुभव असा आला :- प्रारंभी माणिकचे वडिल श्रीदादांचे वाड्यात रहात होते. पुढे ते काही कारणांनी आपल्या मूळ कर्नाळ या गावी रहाण्यास गेले. श्रीदादांचा वियोग होणार या कल्पनेने माणिक खिन्न झाला. जाताना तो श्रीदादांना म्हणाला ''रामभाऊ, तुम्ही एकदा आमच्याकडे या.'' श्रीदादांनी ते मान्य केले. नंतर एकदा माणिक श्रीदादांचे दर्शनास सांगलीस आला होता. त्यावेळी श्रीदादा त्याला म्हणाले, ''माणिक, काल मी तुझ्याकडे आलो होतो.'' चकित होऊन माणिक म्हणाला ''रामभाऊ काय सांगता ? तुम्ही माझ्याकडे आला होता तर ते मला कसे समजले नाही ?'' त्यावर श्रीदादांनी उत्तर दिले,''माणिक, तुझ्याकडे मी आल्याची खूण तुला सांगतो. ती पटली तर होय म्हण. काल संध्याकाळी तू तुझ्या घराच्या परसात गेलास, माझे स्मरण केलेस, आणि ''ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे । त्या त्या स्थळी हे निज रूप तुझे। मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी। तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही '' हा श्लोक उच्चारून तू मला नमस्कार केलास. त्या वेळी मी तेथे उपस्थित होतो. तुझा नमस्कार मला पोचला.'' हे ऐकताच माणिकला खूण पटली आणि श्रीदादा आपल्याकडे येऊन गेले अशी त्याची खात्री झाली.(३) साधन करताना पवनसिद्धि प्राप्त झाल्यावर, साधकाला कसकसा आत्मसाक्षात्कार होतो, हे श्रीदादांनी स्वत:च्या अनुभवांवरुन आपल्या अनेक अभंगातून स्पष्ट केले आहे. उदा. दासराम गाथा, अभंग क्रमांक ५८, १०३, २२३, २२५, २३४, २३६, २३८, २३९, २४९, २६८, २७२, २७८ इत्यादि. (४) नाद व प्रकाश या स्वरूपात आत्मसाक्षात्कार होतो. या दोहोंचे वर्णन करणारा पुढील अभंग आहे :-

लख् प्रकाशात नील बिंदु दिसे । प्रभा फाकलीसे चहूकडे ।।१।।
एकदम रे पाही अंधकार झाला । बिंदु तो फुटला तया माजी ।।२।।
बिंदु तो फुटला प्रभा ती पडली । तयात सावळी राममूर्ती ।।३।।



रामराय येता तेज ते दाटले । नेत्रात बिंदुले चकाकले ।।४।।
तये प्रभेमाझी विजा झगमगती । रंग उसळती नाना ज्योती ।।५।।
तारे चकाकती आनंद तोलिती । किरण फाकिती चोहीकडे ।।६।।
सूर्य चंद्रगोल हिरे रत्न नीळ । जडित विशाल किरीट ते ।।७।।
किरीटी सुवर्ण असे लखलखीत । ऐशी आकाशात दिव्य मूर्ति ।।८।।
हिरे रत्न मौक्तिकांचे अलंकार । वाद्यांचा गजर काय तेथे ।।९।।
तेज:पुंज राम प्रभु दिसे पाही । डोळा सर्वा ठाई भरलेसे ।।१०।।
हीन दासराम करितो नमन । घेई लोटांगण चरणांवरी ।।११।।

(दासरामगाथा, पृ.५४.)

(५) श्रीदादांनी ज्ञानदेव तेहत्तिशीवर इ.स. १९४३ मध्ये सानंद टीका लिहिली. या टीकेमध्ये त्रिकूट, श्रीहाट, गोल्हाट, औटपीठ, भ्रमरगुंफा या आत्मसाक्षात्कारातील स्थानांचे सहज वर्णन आले आहे. तसेच ज्या सहस्रदळस्थानात पूर्ण आत्मसाक्षात्कार होतो त्याचेही वर्णन आले आहे.

प्रपंचात राहूनच श्रीदादांनी परमार्थातील परमोच्च पदवी प्राप्त करुन घेतली. वरवर पाहिल्यास श्रीदादा दिसत होते अगदी सामान्य संसारी माणसाप्रमाणे. परंतु सुक्या नारळातील खोबऱ्याचा वाळलेला गोटा जसा नारळाच्या करवंटीला सुटून असतो, तसे श्रीदादा संसारात असूनही संसारातून अलिप्त होते. कमलपत्र हे पाण्यात असते, परंतु ते पाण्याचा लेप आपणास लावून घेत नाही. त्याप्रमाणे श्रीदादा प्रपंच्यात वावरत असूनही प्रपंचाचा ताप-ताण, लेप स्वत:ला लावून घेत नव्हते. श्रीदादा शरीराने संसारात वावरत होते, क्रिया करीत होते, परंतु त्यांचे चित्त मात्र चैतन्याच्या अनुसंधानातच असे. पूर्व काळी स्त्रिया नदीवर जाऊन घागरींनी पाणी आणत असत. त्यांच्या डोक्यावर एक घागर असे. खाकेत एक घागर असे. मस्तकावरील घागरीला हाताचा आधार नसे. तरी त्या तरातरा चालत, बरोबरच्या स्त्रियांशी गप्पागोष्टी करीत पण त्यांचे चित्त त्यात नसे. त्यांचे चित्त मस्तकावरील घागरीकडे असे. त्याप्रमाणे श्रीदादा व्यवहारात वावरत असले तरी त्यांचे चित्त सदैव चैतन्यातच रमलेले असे.

जीव हा विकल्पांनी युक्त आहे, तर आत्मा/ब्रह्म मात्र विकल्पांनी रहित आहे. विकल्प कल्पना संपले की समाधिच प्राप्त होते.''सांडी कल्पना

उपाधी/तीच साधूला समाधी'' असे मुक्ताबाईंनी ताटीच्या अभंगात म्हटले आहे. ज्ञानेश्वरांच्या कनिष्ठ भगिनी आणि संतश्रेष्ठ मुक्ताबाईं यांनी आपल्या दुसऱ्या एका अभंगात म्हटले आहे :- ''बोलता चालता देखता ऐकता । ढळेना सर्वथा तेची साधी । ब्रह्मादिक ऐसी समाधि इच्छिती ।।'' अशाप्रकारची सहज समाधि श्रीदादांनी साधली होती. शरीराची कोणतीही क्रिया चालू असो, इंद्रिये आपापली कार्ये करीत असोत, मनात विचार येत असोत, आजूबाजूच्या भोगांमध्ये देह गुंतलेला असो, श्रीदादांचे चित्त मात्र चिद्रूप अशा आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात गढून गेलेले असे. ''नित्य चैतन्यी सततचे चित्त'' अशी दादांची अवस्था असे. ''आयुष्याच्या या साधने । सच्चिदानंद पदवी घेणे ।।'' ही किमया श्रीदादांनी साधली होती. ''चित्त चैतन्यी समरसत । देह प्रपंची वर्तत ।।'' हे श्रीमामांनी हनुमद्गुरुचरित्रबोधसार (१०.२१) या आपल्या ग्रंथात सांगितलेले सिद्ध-पुरुषाचे लक्षण आणि स्वरूप श्रीदादांच्या ठिकाणी पूर्णपणे बांणलेले होते. ''दासराम दिसती प्रपंचात । सामान्य जनापरी दिसत । परी परमार्थी त्यांचे चित्त । जाणत्याला कळतसे ।। देह प्रपंची वर्तत । चैतन्यामाजी वसे चित्त । ऐसे असती साधु संत । खूण पटे ही दासरामी ।।'' (श्रीदासराम गौरव गीत, पृ. १४-१५)

卐卐卐卐卐

### प्रकरण ५ : संदर्भ

१) दासरामगाथा, पृ. १३७, ४६८-४७२, १३६, २८३, ५४
२) हंस साप्ताहिक
३) श्रीदासरामगौरवग्रंथ, पृ. २२-२४
४) वही क्रमांक ४४, ४७
५) श्रीज्ञानदेव तेहत्तिशी, सानंद टीकेसह, दासराम, सांगली. १९५२
६) श्रीगुरुलिंगप्रसाद गीता, प्रस्तावना, पृ. १६
७) श्रीदासरामगौरवगीत, प्र. चं. रा. केळकर, सांगली, १९९९, पृ. १४-१५

❋

## प्रकरण ६
# श्रीदादांची नोकरी आणि गुरुलिंगगीता जयंती
(इ.स.१९४४-१९४९)

मॅट्रिकच्या परीक्षेत इ.स. १९४३ साली अनुत्तीर्ण झाल्यावर, श्रीदादांच्या लौकिक शिक्षणाची इतिश्री झाली. मॅट्रिक उत्तीर्ण नसल्याने महाविद्यालयीन शिक्षणाचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. त्यामुळे श्रीदादा स्वस्थच राहिले. तथापि एका विवाहित तरुण पुरुषाने काही न करता घरी हरि हरि करीत बसणे हे इतरांच्या दृष्टीने अगदी अयोग्य होते. विशेषत: सौ. सीतावहिनींच्या दृष्टीने. अनेकदा त्या ''आपण काही तरी करा आणि थोडे का होईना द्रव्यार्जन करा'', असा लकडा श्रीदादांचे मागे लावीत. सौ. इंदिराबाईंनाही आपला मुलगा काहीच धनार्जन न करता घरी बिनकामाचा रहातो, हे फारसे पसंत नव्हते. त्याही श्रीदादांना ''रामजी, तू काहीतरी कर'' असे म्हणत. परंतु श्रीदादांची पारमार्थिक योग्यता मामांना माहीत असल्याने, ते मात्र या बाबतीत काही बोलत नसत. ''आपला रामजी म्हणजे साक्षात् प्रभु रामचंद्रच आपल्या घरात वावरत आहे'', अशी मामांची धारणा होती. त्यामुळे श्रीदादा घरी स्वस्थ असूनही मामामहाराज मात्र स्वस्थच होते.

आपल्या मुलाच्या काळजीने घेरलेल्या सौ. इंदिराबाई एकदा श्रीदादांची पत्रिका घेऊन श्री. छत्रे ज्योतिषी यांच्याकडे गेल्या. श्री. छत्रे गुरुजींनी श्रीदादांची पत्रिका काळजीपूर्वक पाहिली. मग ते सौ. इंदिराबाईंना म्हणाले, ''मातोश्री, तुमच्या मुलाची पत्रिका चांगली आहे. तथापि त्याच्या पत्रिकेत उत्तम लौकिक शिक्षण, नोकरी, व्यापार-धंदा इत्यादि कसलेच योग मला दिसत नाहीत. परंतु या मुलाच्या पत्रिकेत मला राजयोग मात्र दिसत आहे. त्यामुळे या तुमच्या चिरंजीवाला कडेपर्यंत काही कमी पडणार नाही ही खात्री बाळगा.''

श्रीदादांनी नोकरी करण्याची तयारी दाखवली. ते म्हणाले, ''नोकरी करण्यासाठी काही माझा जन्म नाही. तथापि आत्ता आवश्यकता वाटत आहे म्हणून मी नोकरी करण्यास तयार आहे.'' श्रीदादांची भूमिका कळल्यावर मग इतर लोकांनीच श्रीदादांच्या नोकरीसाठी खटपट सुरू केली. तथापि मॅट्रिक

नापास असणाऱ्याला नोकरी मिळणे हे त्या काळातही अवघडच होते. तथापि श्रीदादांना नोकरी मिळण्याचा योग आला. त्याचे असे झाले :- त्याकाळी सांगली हे संस्थान होते आणि संस्थानच्या एस्टॅब्लिशमेंट विभागाचे अधिकारी श्री. अण्णासाहेब नाईक या नावाचे एक सद्गृहस्थ होते. ते सिटी हायस्कूलचे विद्यार्थी असून ते मामांचे शिष्य होते. त्यांना मामामहाराजांचे बद्दल फार आदर होता. त्यांच्याकडे मामांनी शब्द टाकला. त्यावेळी सांगली संस्थानच्या दिवाणी ऑफिसात कारकूनाची एक जागा रिकामी आहे, हे श्री. नाईक यांच्या लक्षात आले. त्यांनी ताबडतोब त्या रिकाम्या जागी श्रीदादांची कारकून म्हणून नेमणूक केल्याची ऑर्डर काढली. ती ऑर्डर हाती पडताच दिवाणी ऑफिसात कारकून म्हणून श्रीदादा नोकरीत रुजू झाले. आणि दादांच्या अल्पकालीन नोकरीचा प्रारंभ झाला. दिवाणी ऑफिसात इ.स. १९४४ ते १९४७ पर्यंत नोकरी झाल्यावर श्रीदादांची बदली सांगली संस्थानच्याच ट्रेझरी ऑफिसात झाली आणि नोकरीचा राजीनामा देईपर्यंत श्रीदादा हे ट्रेझरी ऑफिसातच नोकरीवर होते.

श्रीदादा हे मनमिळाऊ स्वभावाचे आणि लोकसंग्रही वृत्तीचे असल्याने, ट्रेझरी ऑफिसात आपले सहकारी व अधिकारी यांच्यामध्ये प्रिय बनले. श्रीदादांचे पिताजी हे रोज कीर्तन करतात तसेच श्रीदादाही अधून मधून कीर्तन-निरूपण करतात, हे ट्रेझरी ऑफिसातील सर्वांना लवकरच कळले. तेव्हा त्यांचे अनेक सहकारी श्रीदादांना ''महाराज'' या नावाने संबोधू लागले. विशेष प्रसंगी श्रीदादा आपल्या सहकाऱ्यांना आपल्या घरी कीर्तनास येण्याचे निमंत्रण देत. मग त्यांतील काही जण श्रीदादांच्या घरी येऊन मामांच्या तसेच श्रीदादांच्या कीर्तन-निरूपणास उपस्थित राहू लागले. त्या सर्वांत श्री. चिखलीकर हे एक प्रमुख होते.

श्रीदादांचा विवाह इ.स. १९४२ मध्ये झाला व लगेच केळकर कुटुंबाची रामेश्वर यात्रा पार पडली. परत आल्यावर लौकरच सौ. सीतावहिनींच्या फलशोभनाचा/गर्भाधानाचा सोहाळा पूर्वापार पद्धतीने थाटामाटात पार पाडण्यात आला. त्यानंतर दोन वर्षांनी दि. २३/१०/१९४४ रोजी श्रीदादांच्या प्रथम पुत्राचा जन्म झाला. त्याचे नांव चंद्रशेखर असे ठेवण्यात आले. त्याचे शिक्षण एस.एस.सी. पास इतके झाले. पुढे चंद्रशेखर



यांना सांगली एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयात नोकरी लागली. त्यांचा शैला घारपुरे या मुलीशी प्रेमविवाह झाला. शैलाच्या आईचे नाव सौ. सुशीला आणि वडिलांचे नाव महादेव मोरेश्वर घारपुरे असे होते. ते घारपुरे मामा व मामी या नावांनी ओळखले जात. शैलाचे सासरचे नांव सौ. रोहिणी. चंद्रशेखर व सौ. रोहिणी या जोडप्याची पहिली मुलगी कु. ज्योती अकाली निवर्तली. त्यानंतर या दांपत्याला दीपक व अंजनी अशी दोन अपत्ये झाली. श्री. दीपक हे सध्या शेतकरी सहकारी बँकेत नोकरी करतात. त्यांचाही प्रज्ञा नावाच्या मुलीशी प्रेम-विवाह झाला. प्रज्ञाचे सासरचे नांव सौ. अनुराधा. या जोडप्याला अतुल/पार्थ नावाचा एक पुत्र आहे. कु. अंजनीचा विवाह नुकताच श्री. भूषण खाडिलकर यांच्याशी झाला आहे.

सौ. सीतावहिनींच्या वडिल भगिनी सौ. अंबुताई भावे. काही घरगुती कारणांनी त्या इ.स. १९४४-४५ चे सुमारास श्रीदादांच्या वाड्यात बिऱ्हाड करून राहू लागल्या. नंतर त्यांनी शेजारच्या वझे वाड्यात आपले बिऱ्हाड हलविले. त्यांना धनंजय, प्रकाश व कु. शैला अशी तीन अपत्ये होती. या तीनही अपत्यांनी पुढे श्रीदादांचा अनुग्रह घेतला. नंतरच्या काळात धनंजय भावे हे कोल्हापूरला नोकरीस गेले. त्यांनी ''श्रीदासराम गौरव ग्रंथ'' प्रकाशित केला. प्रकाश भावे हे सिटी हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी करत असत. ते तबला वाजविण्यास शिकले आणि श्रीदादांच्या कीर्तनात ते अधूनमधून तबल्याची साथ करू लागले. त्यांची ''फूल चैतन्याचे'', ''अखंड कीर्तनानंद'', तसेच ''महानिर्वाण'' ही तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. प्रकाश भावे हे शेवटी कॅन्सरने निवर्तले. कु. शैलाचा विवाह श्री. विसुभाऊ भिडे यांच्याशी झाला.

इ.स. १९४४-४५ चे सुमारास श्री. बाळासाहेब गोखले, श्री. शशिकांत मायदेव व त्यांची भगिनी, मधुसूदन परचुरे इत्यादि काही मंडळींनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला.

श्रीदादा हे ट्रेझरी ऑफिसात नोकरी करीत असताना घडलेले काही प्रसंग उल्लेखनीय आहेत. श्री. जोशी या नावाचे गृहस्थ श्रीदादांचे सहकारी होते. त्यांच्या मुलाला टायफॉइड झाला. त्या काळी टायफॉइड हा घातक रोग मानला जाई. ''काय करावे'', असे त्यांनी श्रीदादांना विचारले.

त्यांना एक आध्यात्मिक उपाय सांगितला. तो करताच मुलगा टायफॉइड मधून वाचला.

श्रीनिंबरगीकरमहाराज श्रीदादांना कानडी पदे कोणत्याही स्थळी श्रुत करीत, असे मागे म्हटले होते. त्याचे प्रत्यंतर पुन: एकदा आले. श्रीदादा एके दिवशी ट्रेझरी ऑफिसात काम करीत असताना त्यांना ''रामेश्वर नी'' हे कानडी पद श्रुत झाले.

ट्रेझरी ऑफिसमधील नोकर उशीरा कामावर येतात अशी एक तक्रार कलेक्टरसाहेबांच्या कानावर गेली. एक दिवस ते अचानक तपासणी करण्यास आले. उशीरा आलेल्या सेवकांना त्यांनी तिथल्या तिथे दंड पुकारला. नेमक्या त्याच दिवशी सकाळपासून प्रकृति बरी नसल्याने श्रीदादांना ट्रेझरी ऑफिसात जाण्यास उशीर झाला होता. श्रीदादांनी उशीराचे कारण कलेक्टरसाहेबांना सांगितले. श्रीदादांना दंड करण्याची कल्पना कलेक्टरसाहेबांना रुचली नाही. परंतु फक्त श्रीदादांना दंड न करणे हे बरोबर दिसणार नाही म्हणून सर्वांना वेळेवर येण्याची ताकीद देऊन कलेक्टरसाहेबांनी सर्वांचाच दंड माफ केला.

संस्थानी काळात गणेश दुर्गातील राजवाड्याच्या आतील दिवाण-खान्यामध्ये दरबार हॉलमध्ये गणेशचतुर्थीच्या दिवशी मंगलमूर्ति गणेशाची स्थापना होत असे, व गणपतीपुढे कीर्तने आयोजित केली जात. एके वर्षी श्रीदादांचे कीर्तन ठरविण्यात आले. कीर्तनोत्तर नेहमीच्या प्रथेप्रमाणे सांगली सरकारांचे खाजगी कारभारी श्री. हर्डीकर हे श्रीदादांना कीर्तनाची बिदागी म्हणून एक पैशाचे पाकीट देऊ लागले. तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''साहेब, मी कीर्तनाची बिदागी कधीच घेत नाही. कृपया आपण ही रक्कम गणपतीच्या प्रसादासाठी खर्च करावी अशी माझी विनंति आहे.'' हे ऐकून श्री. हर्डीकर चकित झाले.

श्रीदादांच्या दुसऱ्या पुत्राचा जन्म दि. २३-१२-१९४७ रोजी झाला. त्याला सूर्यकांत असे नाव देण्यात आले. सूर्यकांतांना शिक्षणाची फारशी आवड नसल्याने, त्यांचे लौकिक शिक्षण फारसे झाले नाही. त्यांनी इचलकरंजीच्या डेक्कन स्पिनिंग मिलमध्ये नोकरी पत्करली व ते हळूहळू जॉबर झाले. विनायक लक्ष्मण कुंटे व त्यांची पत्नी पद्मावती यांच्या विजया नामक कन्येशी सूर्यकांतांचा विवाह झाला. विजयाचे सासरचे नाव सौ. सुनीता.



श्रीदादांनी सूर्यकांत व सौ. सुनीता यांना सुनील व कु. सुचिता अशी दोन मुले झाली. सुचिताचा विवाह श्री. अभिजित नातू यांचेशी झाला. तिला वेदांग या नावाचा एक पुत्र आहे. सुनीलचा विवाह नुकताच कु. माधुरी ताम्हनकर हिच्याशी झाला. तिचे सासरचे नांव माधुरी असेच आहे.

घोसरवाडचे सत्पुरुष श्रीगोविंदपंत सांगलीस मामांचेकडे आले होते. तेव्हापासून श्रीदादांचा घोसरवाडशी संबंध आला होता. घोसरवाडला सिद्धनाथांचे मंदिर आहे. त्यात पंच धातूंची मूर्ति होती. ही जूनी मूर्ति बदलून नवीन पंच धातूंच्या मूर्तीची स्थापना इ.स. १९९७ मध्ये करण्यात आली. तत्पूर्वी या देवस्थानाच्या स्थापनेचा द्विशत सांवत्सरिक सोहळा इ.स. १९४७ च्या सुमारास झाला होता. त्या निमित्ताने या देवळात श्रीदादांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी गोविंदपंतांचे चिरंजीव शंकरमामा शिपुरकर उपस्थित होते. त्यांनी श्रीदादांच्या कीर्तनाचे कौतुक केले. या प्रसंगाला उद्देशून वही क्रमांक १०३ मध्ये असणारा श्रीदादांचा अभंग पुढीलप्रमाणे आहे :-

घोसरवाडी माझे जहाले कीर्तन । मागील ते लोण पुढे आले ।।१।।
द्विशत सांवत्सरिक सोहळा । जहाला आगळा काय सांगो ।।२।।
धन्य ते सावित्री धन्य गोविंदनाथ । परंपरा पंथ चाली लीले ।।३।।
दत्तोपंत व्यंकटेश आठवण । ते तरी तल्लीन सिध्द रूपी ।।४।।
हरिकीर्तन हे आमुची मिरासी । महाद्वारी कैसी सेवा झाली ।।५।।
शंकरेची केले थोर कवतूक । भक्ति प्रेम भाक घातलीसे ।।६।।
दासरामा ऐसे लाभले वतन । पूर्ण समाधान दिले देवे ।।७।।

घोसरवाड गावी देवाची पालखी निघते. या पालखी सोहळ्यात श्रीदादांनी एकदा भाग घेतला. घोसरवाडात देवाची पालखी वर्षातून दोन वेळा गाव प्रदक्षिणा करण्यास काढली जाते. एकदा दसऱ्याच्या दिवशी व दुसऱ्यांदा रथसप्तमीच्या दिवशी. या पालखीचा विशिष्ट मार्गही ठरलेला असतो. तो सोडून पालखी इकडे तिकडे जाऊ शकत नाही. दसऱ्याचे दिवशी श्रीदादा पालखी सोहळ्यामध्ये उपस्थित होते. त्यांच्याबरोबर श्री. गजानन मास्तर उदगावकर, श्री. तात्या कुंभोजकर, श्री. दत्तोपंत घोसरवाडकर इत्यादि मंडळी होती. ज्या रस्त्यावरून पालखी जाणार होती, त्या रस्त्याच्या कडेला ही सर्व

मंडळी उभी होती. अचानक देवाची मर्जी फिरली. देवाची पालखी तिरकी जाऊ लागली आणि ती श्रीदादांच्या जवळ आली. श्रीदादांनी पालखीतील देवाला नमस्कार केला. मग पालखी सरळ होऊन आपल्या नियोजित मार्गाने पुढे गेली. हा प्रसंग श्री. दत्तोपंत घोसरवाडकर यांना इतका महत्वाचा वाटला की त्याची नोंद त्यांनी आपल्या आठवणीत पुढीलप्रमाणे केली आहे :- ''एकदा दासराम केळकर दसऱ्याच्या दिवशी घोसरवाडला आले होते. देवाची पालखी निघाली होती. गर्दीतून संभाळून आम्ही बाजूला उभे होतो. तेव्हा हालसिद्धनाथमहाराजांची पालखी अगदी केळकरदादांच्या जवळून पुढे विठोबाला गेली. पुजाऱ्यानी त्यांना भंडारा लावला. खरा भक्त शोधून नाथमहाराजांनी त्यांना दर्शन दिले.'' तसेच हा संस्मरणीय प्रसंग श्रीदादांनी आपल्या वही ११३ मधील अभंगातही नोंदला आहे. हा अभंग असा :-

देवाची पालखी घेवोनी गिरकी । आलीसे तिरकी आम्हाजवळी ॥१॥
सोहळा पहाया गेलो दसऱ्यास । ते दिनी विशेष घडो आले ॥२॥
गजानन मास्तर तात्या कुंभोजकर । घोसरवाडकर दत्तोपंत ॥३॥
मजसवे सारे उभेची बाजूस । चमत्कार खास देवे केला ॥४॥
घोसरवाड ग्रामी दाविली चुणूक । दासरामा भीक प्रेमाचिये ॥५॥

इ.स. १९४६-४७ चे सुमारास श्री वासुदेवराव जोशी आणि त्यांचे बंधु श्री. बापूराव जोशी श्रीदादांच्याकडे येऊ लागले अीण त्यांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. हे दोघेही मामांच्या कीर्तनास येऊ लागले. काही काळाने हे दोघेही बंधु कीर्तन करू लागले.

श्रीदादांची ट्रेझरीतील नोकरी चालू असताना, इ.स. १९४८ साली श्री. गो. वा. केळकर हे भाविक गृहस्थ सांगलीत ट्रेझरी ऑफिसर म्हणून बदली होऊन आले. त्यांचा श्रीदादांशी परिचय झाला. श्रीदादांच्या सांगण्यावरुन ते कधी कधी मामांच्या कीर्तनास येऊ लागले. त्यांना मामांच्या कीर्तन श्रवणाने समाधान मिळू लागले. मामांचे वर्णन करणारा त्यांचा एक लेखही दीपलक्ष्मी मासिकाच्या मामामहाराज केळकर विशेषांकात प्रसिद्ध झाला आहे.

निंबरगीकरमहाराजांनी इ. स. १९३९ पासून श्रीदादांना गुरुलिंगगीतेतील पदे श्रुत करण्यास प्रारंभ केला. इ. स. १९४३ पर्यंत ही पदे सव्वीस झाली होती.



ही पदे मिळत असताना एकदा श्रीदादांनी निंबरगीकर-महाराजांना प्रार्थना केली. ''महाराज, आपण कृपावंत होऊन मला कानडीतून बोध केलात. महाराज, आता माझी आपणास प्रार्थना आहे की आपण माझ्या मुखातून कानडी अभंग वदवावेत.'' महाराजांनी श्रीदादांच्या प्रार्थनेप्रमाणे काही पदे श्रीदादांच्या मुखातून वदविली. इ.स. १९४३ सालानंतरही कानडी पदे श्रुत होण्याचा क्रम चालू राहिला. ही पदे कधी पहाटे, कधी सकाळी, कधी दुपारी तर कधी संध्याकाळी ऐकू येत. काही पदे ही निंबरगीकरमहाराज व सिद्धानंद यांनी साक्षात् प्रगट होऊन उच्चारली तर काही पदे भगवान् शिवाच्या आणि सोमेश्वराच्या अदृश्य रूपातून ध्वनित झाली. 'जगवू मुट्टीवू' हे पद तर श्रीदादांना प्रथम प्रकाशाक्षर स्वरुपात दिसले. आणि नंतर ते ध्वनिरूपाने ऐकू आले. ही गुरुलिंगगीता म्हणजे श्रीदादांच्या पारमार्थिक जीवनातील एक मोठा चमत्कार होता, आणि ती श्रीदादांची पारमार्थिक श्रेष्ठता दाखविणारी होती.

श्रीनागाप्पाण्णामहाराजांच्या वचनाप्रमाणे ''येनू इल्लदानू'' या पदापासून ''छळकोट छळीछी आथा''या पदापर्यंतची गुरुलिंगगीतेतील पदे श्रीदादांना प्राप्त झाली. याच नागाप्पाण्णामहाराजांचे अधिकारी सुपुत्र श्रीगुरुसिद्दप्पामहाराज अधूनमधून श्रीदादांचेकडे येत असत. ''मला श्रीनिंबरगीकरमहाराज कानडी पदातून बोध करतात,'' असे श्रीदादांनी त्यांना सांगीतले, आणि ''आता यापुढे बहुधा ही पदे मिळणार नाहीत,'' असे ते सहज म्हणाले. त्यावर श्रीगुरुसिद्दप्पामहाराज अंत:प्रेरणेने म्हणाले,''रामभाऊ,असे का म्हणता ? या पुढेही तुम्हाला आणखी पदे मिळणार नाहीत हे कशावरून?'' गुरुसिद्दप्पामहाराजांच्या या वचनातील गर्भित अभिप्रायानुसार, पुढे ''रामेश्वरल्ली सोमेश्वरु'' येथपासून ''ॐ जय गुरुलिंगन गीता '' इथपर्यंतची पदे श्रीदादांना श्रुत झाली. अशाप्रकारे इ.स.१९४८ पर्यंत श्रीगुरुलिंगगीतेची एकूण ६५ पदे झाली. ही ६५ पदे श्रीदादा रोज म्हणत. या गुरुलिंगगीतेतील पदांविषयी श्रीदादा आपल्या अभंगात सांगतात:-

नागाप्पांचे वचनापरी । येवोनिया माझे घरी ॥१॥
आपुला हा प्रसाद मेवा। दिला आम्हा जी बरवा ॥२॥
तोचि राहो माझे कंठी । नित्य नेमे नाचो ओठी ॥३॥
हीच सेवा जन्मोजन्मी । दासरामा देई स्वामी ॥४॥

(दासरामगाथा,पृ.१९५)

गुहेमाजी नारायणे । दिली अंतरीची वचने ।।१।।
काय अभंगी प्रसाद । केला कानड्याने बोध ।।२।।
काय जाणोनी मराठी । अक्षरेची ठेवू ओठी ।।३।।
अवघाचि महाराजा । दासरामी कोण दुजा ।।४।।

(दासरामगाथा,पृ.१६७)

गुरुलिंगगीतेतच म्हटल्याप्रमाणे, गुरुलिंगगीता ही बोधामृताची गंगा आहे. (गुरुलिंगगीतामृतबोधगंगा) अथवा गुरुलिंगगीतेच्या आरतीमध्ये म्हटल्याप्रमाणे गुरुलिंगगीता ही ''बोध अमृताची त्रिवेणी सरिता'' आहे. गुरुलिंगगीतेत येणाऱ्या ''जंगम प्रसाद गीता'' या शब्दावरुन कळते की गुरुलिंगगीता हा एक प्रासादिक ग्रंथ आहे. याच्या पठणाने फलप्राप्ति होऊ शकते. ''जर या प्रसाद-वचनांचे तू पठण करशील तर अगणित पुण्य मिळवून तू जगतात धन्य होशील'' (गुरुलिंगगीता,१७.६), या शब्दांत निंबरगीकर-महाराजांनीच श्रीदादांना फलश्रुति सांगितलेली आहे. तेव्हा श्रीदादा ही गीता रोज म्हणत होते यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

गुरुसिद्दप्पामहाराज हे इ.स.१९४८ च्या मे महिन्यात श्रीदादांचेकडे आले होते. त्या वेळी श्रीदादांनी त्यांना सांगितले ''महाराज, आता गुरुलिंगगीतेची ६५ पदे झाली आहेत.'' ते ऐकून गुरूसिद्दप्पामहाराजांना आनंद झाला. ते म्हणाले ''रामभाऊ, तुम्ही फार भाग्यवान् आहात. म्हणून महाराज तुम्हांला बोध करीत आहेत. मी माझ्या पणजोबांना पाहिलेले नाही. तथापि त्यांच्या श्रेष्ठत्वाविषयी माझे वडिल नागाप्पाण्णामहाराज यांचे तोंडून बरेच ऐकले आहे. त्यांचे थोरपण वर्णनापलीकडेच आहे.'' नंतर ते श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, निंबरगीकरमहाराजांचे संदर्भात मला एक पद स्फुरू लागले होते. पण ते काही पुरे होऊ शकले नाही. जेवढे झाले तेवढे मात्र माझ्या लक्षात आहे.'' तेव्हा श्रीदादांनी त्यांना विनंति केली,''महाराज, आपले अपूर्ण पद मला म्हणून दाखवा. मला वाटते की निंबरगीकरमहाराजांचे कृपेने ते आज पुरे होईल.'' गुरुसिद्दप्पामहाराजांनी ते अपूर्ण पद श्रीदादांना म्हणून दाखविले. काही काळ ते दोघेही स्वस्थ बसले. गुरुसिद्दप्पामहाराजांना अचानक स्फूर्ति झाली व त्यांचे ते पद पूर्ण झाले. पूर्ण झालेले हे पद असे :-



नमो नमो गुरुलिंगजंगमेशा ।।ध्रु।।
नामरहितने । नारायण महात्मने ।
भव कडिसो बेगने । निजधामने ।।१।।
करवीरवाशा । श्रीगुरुकाडसिद्धेशा ।
भक्तर भाव दोळवाशा । सर्वेशा ।।२।।
प्रिय रघुवर दाता । बेडिद वरव कोडुवाता ।
चिम्मड मठ दोळिरु वाता । गुरुनाथा ।।३।।
साधुपुरुषने । श्रीगुरुरामचंद्रने ।
साधुराजशिष्यने । चिमडवासने ।।४।।
हिंचगिरीशा । भाऊराव गुर्वेशा ।
श्रीगुरुनाम निवासा । साधकेशा ।।५।।
श्रीनागाप्पाण्णा । गुरु साधन राणा ।
चरणि गुरुसिद्दण्णा । निरंजना ।।६।।

वर दिलेले पद निंबरगीकरमहाराजांच्या प्रेरणेने आणि श्रीदादांच्या इच्छेप्रमाणे शनिवार दि. २९-५-१९४८, वैशाख वद्य षष्ठी, शके १८७० रोजी पूर्ण झाले. आणि श्रीदादांना काय वाटले कोणास ठाऊक ते गुरुसिद्दप्पा-महाराजांना म्हणाले ''महाराज, हे पद गुरुलिंगगीतेत घालण्यास आपण अनुज्ञा द्यावी.'' गुरुसिद्दप्पामहाराजांनी आनंदाने ही परवानगी दिली. दुसरे दिवशी म्हणजे रविवार, वैशाख वद्य सप्तमी, शके १८७०, दि. ३०-५-१९४८ रोजी रामराज्याभिषेक दिन होता. या शुभ दिवशी श्रीदादांच्या गुरुलिंगगीतेच्या स्वहस्ते लिहिलेल्या वहीत हे पद गुरुसिद्दप्पामहाराजांनी स्वहस्ते कानडी लिपीत लिहून दिले. ही वही आजही केळकरांच्या घरी आहे.

यानंतर श्रीदादांच्या मनात ऊर्मि आली की या पुढे आपण गुरुलिंगगीताजयंती दिन साजरा करावा आणि तो सुद्धा वैशाख वद्य सप्तमी या दिवशी. म्हणून ते गुरुसिद्दप्पामहाराजांना म्हणाले ''महाराज, यापुढे आम्ही गुरुलिंगगीतेचा जयंती दिवस साजरा करावयास लागू. आज आपण वैशाख वद्य सप्तमीला आपले हे पद माझ्या वहीत लिहिले असल्याने, वैशाख वद्य सप्तमी हाच गुरुलिंगगीतेचा जयंती दिन मानावा अशी मला प्रेरणा झाली आहे. माझ्या या प्रेरणेस आपण संमति द्यावी.'' श्रीदादांच्या या संकल्पास श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांनी आनंदाने अनुमति दिली. त्याप्रमाणे इ.स.१९४९

च्या वैशाख वद्य सप्तमीपासून गुरुलिंगगीता जयंती साजरी होऊ लागली आणि ती आजतागायत चालू आहे.

गुरुसिद्दप्पामहाराजांचे पद गुरुलिंगगीतेच्या प्रारंभी घालण्यात आले. त्यामुळे आता गुरुलिंगगीतेची ६६ पदे झाली. ही पदे श्रीदादा नेमाने म्हणत त्याप्रमाणे ती सर्व पदे लिहून घेऊन, व.म.बापट, धनंजय भावे, प्रकाश भावे, के.वा.आपटे, वासुदेवराव जोशी, बापूराव जोशी, सावंत फौजदार इत्यादि भक्त म्हणत असत. काही लोकांना श्री.व.म.बापट ही पदे स्वत: लिहून त्यांना देत. सौ. सुमनताई आपटे यांना तर ही कानडीतील ६६ पदे केवळ आठ दिवसात पाठ झाली व ती पदे त्या रोज म्हणू लागल्या. आणि जगाचा अखेरचा निरोप घेईपर्यंत त्यांनी तो नेम टिकवून धरला. मृत्यूपूर्वी त्यांनी आपली कन्या गीतादेवी हिजकडून श्रीगुरुलिंगगीता म्हणवून घेऊन ऐकली. मरणोत्तर सौ. सुमनताई या निबंरगीकरमहाराजांच्या पायाशी जाऊन बसल्या, असे श्रीदादांनी दीपलक्ष्मी मासिकाच्या मामामहाराज केळकर विशेषांकात लिहून ठेवले आहे.

श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांना आश्वासन दिल्याप्रमाणे, इ.स. १९४९ च्या वैशाख वद्य सप्तमीला गुरुलिंगगीताजयंतीचा पहिला कार्यक्रम श्रीदादांच्या घरी झाला. या दिवशी सकाळी ९ वाजता गुरुलिंगगीतेचे पठण श्रीदादांनी स्वत: केले. ज्या चालीमध्ये ही पदे श्रीदादांना ऐकू आली होती त्याच चालीत ही पदे श्रीदादा म्हणत होते. साधारण ९-४५ वाजता हे पठण संपले. त्यानंतर श्रीगुरुलिंगगीतेच्या हस्तलिखित पोथीचे पूजन श्रीदादांनी केले. पूजेनंतर पुढील आरती म्हणत गुरुलिंगगीतेची आरती करण्यात आली :-

निंबरगीश्वर जंगम गुरुलिंगप्रभुनी ।
सिद्धानंद रूपाने गगनी येवोनी ।
प्रल्हादाचे साठी हृदयी प्रगटोनी ।
तेजो नादे केला बोध तया कर्णी ॥१॥
गुरुलिंगप्रसादगीते गुरुलिंगगीते ।
मामुद्धर मामुद्धर मामुद्धर माते ॥ध्रु॥
जंगमप्रसादगीता श्रीगुरुलिंगगीता ।
बोध अमृताची त्रिवेणी सरिता ।



ब्रह्मस्वरूपा ती निरतिशय पूता ।
केशव चित्ती राहो ज्ञान प्रसन्नता ॥२॥

आरती झाल्यावर दहा वाजता रथोत्सवाचा कार्यक्रम होऊन प्रसाद वाटण्यात आला. आजतागायत श्रीगुरुलिंगगीतेच्या जयंतीचा कार्यक्रम याच पद्धतीने साजरा केला जात आहे.

पहिल्या गुरूलिंगगीताजयंतीच्या दिवशी श्रीदादांनी काही भक्तांना भोजनास थांबण्यास सांगितले होते. निंबरगीकरमहाराजांना ज्वारीची भाकरी, कांदा आणि अंबाड्याची भाजी आवडे; म्हणून श्रीदादांनी जेवणात हेच जिन्नस करावयास सांगितले होते.

पहिली दोन तीन वर्षे श्रीगुरुलिंगगीताजयंती ही श्रीदादांच्या घरीच साजरी झाली. नंतर एक वर्षी असे घडले :- वासुदेवराव जोशी व बापूराव जोशी या दोघांनी माधवनगर गावी एक बंगला विकत घेतला व तिथे त्यांनी निंबरगीकरमहाराजांचा फोटो लावला. मग त्यांनी श्रीदादांना विनंति केली ''रामा, आपण आमच्या घरी या वर्षी श्रीगुरुलिंगगीताजयंती साजरी करू या.'' ती विनंति श्रीदादांनी मान्य केली. त्याप्रमाणे व.म.बापट इत्यादि भक्तांना घेऊन श्रीदादा माधवनगरला गेले व तेथे श्रीगुरुलिंगगीताजयंती साजरी झाली.

याच वासुदेवराव जोशी यांच्या मुळे घडलेला प्रसंग श्रीदादा कधीतरी कीर्तनात सांगत वासुदेवरावांची एक कृष्णाबाई नावाची बहीण कुरुंदवाड संस्थानच्या पटवर्धन घराण्याच्या धाकट्या पातीतील श्री. वि.शि.पटवर्धन यांना विवाहात दिलेली होती. एकदा वासुदेवरावांचे बरोबर श्रीदादा कुरुंदवाडला या पटवर्धनांचेकडे गेले होते. तेथे श्रीदादांचे कीर्तन झाले. कीर्तनानंतर पटवर्धन श्रीदादांना म्हणाले,'' महाराज, मी इतके दिवस भक्तीने गणेशाची पूजा -अर्चा करीत आहे. परंतु अद्यापि तरी मला गणेशाचे दर्शन झालेले नाही. महाराज, आपण मोठे आहात. आपण मला गणेशाचा साक्षात्कार घडवून द्यावा, अशी माझी विनंति आहे.'' तेव्हा श्रीदादा त्यांना म्हणाले, ''सरकार, तुम्हाला गणेशाचा साक्षात्कार झालेला आहेच. आता पुन: कसला साक्षात्कार?'' त्यावर चकित होऊन पटवर्धन बोलले ''महाराज, मला साक्षात्कार झाला आहे? केव्हा अणि कुठे? मग मला ते कसे कळले नाही ?'' यावर श्रीदादांनी खुलासा केला, '' सरकार, मी आपणास आठवण

करून देतो. आपण नेहमी गणपतीची पूजा करता. पूर्वी एकदा आपण पूजा करीत असताना देवघरातील विजेचा दिवा गेला. देवघरात संपूर्ण अंधार पसरला. त्यावेळी तुमची नजर गणपतीच्या मूर्तीकडे गेली. तेव्हा तुम्हाला झक् करून प्रकाश दिसला. हा प्रकाश तोच गजाननाचा साक्षात्कार. देवाचा साक्षात्कार प्रकाशरूपानेच होत असतो.'' ही घटना ऐकताच श्री पटवर्धनांना तो सर्व प्रसंग आठवला. मग ते बोलले, '' महाराज, आता मला पुन: प्रकाश का दिसत नाही?'' यावर श्रीदादांनी सांगितले,'' सरकार, त्या वेळची तुमच्या मनाची अवस्था जेव्हा तुम्हांला पुन: प्राप्त होईल, तेव्हा आपणांस पुन: प्रकाशरूपाने गणेशाचा साक्षात्कार होईल.''

卐卐卐卐



## प्रकरण ६ : पुरवणी

## श्रीगुरुलिंगगीतेतील तत्त्वज्ञान, साधन व साक्षात्कार

श्रीगुरुलिंगगीतेची ६६ पदे झाल्यानंतरही श्रीदादांना पुन: पुन: अनेक पदे श्रुत होत गेली. आणि सर्व पदांची एकूण संख्या २२८ इतकी झाली. पहिल्या ६६ पदानंतर मिळालेल्या पदांमध्ये तीन इंग्रजी काव्ये आहेत; उरलेल्या पदांमध्ये गुरुपरंपरा, भजने, विशिष्ट नामांची विशिष्ट आवर्तने इत्यादि भाग आहे. ही पदे म्हणताना मन नादात लुब्ध होऊन जाते. काही पदांत जप करण्यास अक्षरमाला सांगितलेल्या आहेत. त्यांच्या योगाने शंभर, हजार, बारा हजार, व तेरा हजार इतका जप प्रत्यक्ष माळ न वापरता होऊ शकतो.

या अत्यंत महत्वाच्या अशा श्रीगुरुलिंगगीतेत निंबरगीकर–महाराजांनी श्रीदादांना काय सांगीतले हे जाणून घेण्याचे कुतूहल निर्माण होते. ते जाणण्यास मुख्यत: पहिली ६६ पदे व तीन इंग्रजी काव्ये यांचा उपयोग होतो. त्यांचे मराठी भाषांतर उपलब्ध आहे. त्यांचे आधारे या गीतेतील तत्त्वज्ञान, साधन व साक्षात्कार हा भाग संक्षिप्तपणे पुढे दिला आहे :–

### अंतिम सत्य तत्व आणि जगत्

आपल्या सभोवती अफाट विश्व पसरलेले आहे.'' या विश्वाच्या उत्पत्तीला कर्ता असा कोणी नाही; ती हरीचे ठिकाणी कल्पनेने निर्माण झाली आहे. आज जे शब्दाचे स्वरूप दिसते आहे ते वास्तविक आजही नाही किंवा ते कोठून आलेलेही नाही व येणे शक्य नाही. ते चांचल्य धर्माने स्वयंसिद्ध आहे, म्हणून भासमान होते आहे. वाटले तर त्यास आहे म्हणावे नाहीतर नाही म्हणावे.'' विश्वात दिसणाऱ्या नानाप्रकारच्या पदार्थांत आत्मा आहे. विश्वात द्वैत आहे पण आत्म्याचे ठिकाणी द्वैत नाही. या मानवी शरीरात आत्म्याचे स्वरूप हे रामकृष्णगतीत संथ झालेले आहे. आणि आत असणाऱ्या या आत्म्याला वा ''ईश्वराला साक्षी ठेवून अणुरेणु, वृक्ष इत्यादि आपापले कार्य करीत असतात.'' माणूसही स्वत: काही करीत नाही. परमेश्वरच सर्व काही करीत असतो. म्हणून सर्व काही परमेश्वरच आहे.

भासमान होणारे हे विश्व नाहीच. ' हे काही नाहीच आहे', असे

महाराज सांगतात. दिसणारा वा भासणारा प्रत्येक पदार्थ नाहीच. विश्वात सर्वत्र भेद आहे. जीव आणि शिव असाही भेद केला जातो. वस्तुत: 'जीव-शिव नाहीतच.' जीव जन्माला आले व गेले असे वाटते; पण तेही बरोबर नाही. 'जीवात्मा हा उत्पन्न झालेला नाही; त्याला नाशही नाही; कारण तो वस्तुत: आत्मरूपच आहे.'

खरे म्हणजे सर्वत्र व्याप्त असणारा एक आत्मा (=ब्रह्म,शिव,हरि) हा एकमेव सत्य आहे. 'ब्रह्मस्वरूप हे आलेले किंवा झालेले नाही, ते स्वयंसिद्ध आहे.' अस्तित्व हे आत्म्याचे वा ईश्वराचे स्वरूप आहे. 'अस्तित्व म्हणजेच परमेश्वर.' सद्रूपाने शिव सर्वत्र व्याप्त आहे; तो घनदाट , निश्चळ व नि:शब्द आहे. परमेश्वर हीच पूर्ण वस्तु आहे. दृश्यादृश्याचे आत शिव हा आनंदरूपाने आहे.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास :-आत्मा हे एकच तत्त्व सत्य आहे; तो आत्मा सच्चिदानंद आहे. सत्य असा एक चिदानंद आत्मा आहे.

### आचार

जीव हा मुळात आत्मरूप आहे. जीवाने शिवात मिसळून जाणे, हेच त्याच्या जीवनाचे ध्येय आहे. जीवाचे स्वरूप मुळात आनंद आहे. पण चालू जीवनात त्याला सुख दु:ख भोगावे लागते. आणि जे सुख वाटते तेही दु:खरूप होते. एवंच या ''प्रपंचात सुख नाही.'' आता, आत्मप्राप्तीसाठी प्रयत्न करताना, ''द्वैत हे आपल्या नाशाला कारणीभूत आहे'' हे जाणून '' मी-तू-तू-तूझे हे सर्व सोडावयास हवे.'' या जगात आपण शब्दशास्त्राला भुलू नये. ''शब्दशास्त्रांची पोकळ बडबड सोडून कुसंगतीपासून अलिप्त रहावयास हवे.'' चिंता आणि अहंकार हे तापदायक असल्याने ''मनात चिंता करू नये.'' अहंकाररूपी असुर जावयास हवा. मग हळुहळु आसक्ति कमी करावयास हवी. ''मायिक स्वरूपाच्या दुष्ट संगातील प्रेम काढून टाकावयास हवे.'' ईश्वरप्राप्तीसाठी सद्गुरूंचे मार्गदर्शन घेऊन, ''गुरुपदी भ्रमर होऊन गुंग व्हावे.'' आणि ''सर्व संगातून अलिप्त होऊन, गुरूंनी सांगितलेले गोड नामामृत सेवन करावे.''

### साधन

अपात्र मनुष्य गुरुमंत्र मिळूनही कोरडा ठणठणीत रहातो. तेव्हा पात्र



माणसाने गुरूंनी सांगितलेले साधन करावयास हवे. ''साधन केल्याने हा जन्म शेवटचा होतो.'' शिवमंत्र अखंड जपावयास हवा. शिवस्मरणाच्या मार्गाने जीव-शिवांचे ऐक्य होते. महाराज सांगतात, ''नामाची साखर घे आणि परब्रह्माला पहा.'' हे नाम काया आणि वाचा यांच्या पलीकडचे आहे. नाम हे गतिरूप आहे. ज्या गतीवर साधक स्वार होतो ती गति त्याने एकाग्रतेने संथ अशी वहाती ठेवावयास हवी. रामकृष्णहरि हा मंत्रमार्ग धरावयास हवा. या देहात चंद्र-सूर्य-गतीचे ठिकाणी द्वैतरहित होण्याचे दुर्गम ठिकाण-किल्ला-आहे. अशा प्रकारे साधनाने ''चित्त स्वस्थ झाल्यावर मग आत्मवस्तु दिसते. देहात सहस्रदलकमलस्थानी आत्मसाक्षात्कार होत असल्याने, त्या सहस्रार-गिरीवर जावयास हवे.''

### साक्षात्कार

आत्म्याचा साक्षात्कार नाद आणि प्रकाश या स्वरूपात होतो. म्हणून महाराज सांगतात, ''आत वळून आत्म्याला नाद-बिंदु-रूपाने पहा.'' ते पुढे म्हणतात ''वायुगतीचा पूर्ण निरोध करुन, चार देहांचे पलीकडे असलेली चित्प्रभा पहा. दोन भुवयांच्यामध्ये साक्षिरूप आत्म्याला पहा. चिदाकाशात नि:शब्द असे परिपूर्ण ब्रह्म पहा.'' साक्षात्काराचे संबंधात गुरुलिंगगीता आणखी सांगते :- ''रामकृष्णहरिनामाचे ठिकाणी हरित प्रकाशाने शिवात्मा दृग्गोचर होतो. रामकृष्णगतीत असणाऱ्या आकाशात तेजोरूप शिवात्मा अहंकारविरहित अशा वायुरूप गुहेत प्रगट होतो. सूर्य व चंद्र जेथे एक होतात, त्या बिंदुमात्र विवरात जो प्रकाश आहे त्याचे आत अग्निस्वरूप आत्म्याचा लोटच लोट आहे; तेच पीतप्रभायुक्त आत्मतेज आहे. आकाशाचे आत असणाऱ्या वायूचे ठिकाणी आत्मा हा अग्निरूपात तेजाने देदीप्यमान होतो. सहस्रदलस्थानात अग्निस्वरूप आत्म्याचे लोटच लोट दिसतात. सहस्रदलस्थानात आत्म्याचा साक्षात्कार झाला की मनुष्य, 'निरिच्छ व निष्काम' होतो. तो आत्मरूप होऊन जीवन्मुक्त होतो. त्याचे जन्ममरण संपून त्याच्या जीवनाची सार्थकता होते.''

**प्रकरण ६: संदर्भ**

१) श्रीदासराम - गौरव-ग्रंथ.
२) वही क्रमांक १०३,११३.
३) केशवलिखित दासराम चरित्र टिप्पणे.
४) श्रीगुरुलिंगगीता .
५) दीपलक्ष्मी मामामहाराज केळकर विशेषांक.
६) श्रीसिद्धमूर्ती प्राणप्रतिष्ठा घोसरवाड स्मरणिका, सं.सौ. अनुराधा कुलकर्णी,१९९७.
७) श्रीदासरामगाथा, पृ.१९५,१६७.
८) दत्तोपंत घोसरवाडकर यांची आठवण, फाईल ४.

❀

**प्रकरण ७**

# श्रीदादांच्या नोकरीची इतिश्री

(इ.स. १९४९ ते १९५६)

माघ वद्य प्रतिपदा इ.स. १९२४ पासून श्रीमामामहाराजांचे नित्य कीर्तनाचा प्रारंभ झाला होता. या त्यांच्या उपक्रमाला फेब्रुवारी १९४९ च्या माघ वद्य प्रतिपदेला पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. श्रीमामा हे प्रसिद्धिपराङ्मुख असल्याने, पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याच्या संदर्भात ते स्वत: काही करतील हे शक्यच नव्हते. ही गोष्ट श्रीदादा जाणून होते. पण त्यांना रहावत नव्हते. पंचवीस वर्षे एकही दिवस खंड न होता चाललेले मामांचे नित्य कीर्तनाचे व्रत इतरांच्या नजरेपुढे यावयास हवे असे श्रीदादांना मनापासून वाटत होते. म्हणून मामांच्या नित्य कीर्तनाचा रौप्य/रजत महोत्सव साजरा करण्याचे श्रीदादांनी निश्चित केले. आणि मग या रौप्यमहोत्सवाची रूपरेखा मनाशी ठरवून, मग त्यासाठी उपस्थित रहाण्याची विनंति करणारी पत्रे श्रीदादांनी अनेक संतमहंताना पाठविली. पैठणचे नाथमहाराज, गुरुदेव रानडे, मालाडचे केतकरमहाराज, जोगेश्वरी येथील संत मं. रा. टाकीमहाराज, ह.भ.प. सोनोपंत दांडेकर, इत्यादि साधुसंतांचे शुभेच्छा संदेश या निमित्ताने आले. या प्रसंगी श्रीटाकीमहाराजांनी काव्यातून पाठविलेला शुभ संदेश असा होता :-

आजी पूर्ण विसावरी तरि कृपे ही पाच वर्षे भली ।
श्रीमत् सद्गुरूच्या लिले करुनिया भाग्ये तुम्हां लाभली ।
केली कर्णपुटे पुनीत श्रवणे भक्ता जनांची सदा ।
पाजोनी बहु गोड कीर्तनसुधा श्रीबापुजी सर्वदा ।।१।।
बापूजी तरी स्नान आजि बरवे त्रिवेणीच्या संगमी ।
साधा पान तसे करूनि करवा वाखाणिले आगमी ।
जे हे कीर्तन नेम श्रीगुरुवरे प्रगटोनीया दाविले ।
पाळा वंश परंपरे करुनिया व्हा तीन्ही लोकी भले ।।२।।

हा टाकीमहाराजांचा संदेश श्रीदादांना इतका आवडला की तो त्यांनी काचेच्या फ्रेममध्ये बसवून घेतला. आजही हा संदेश केळकरांच्या मंदिरात दिसून येतो.

या रजतमहोत्सवाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या समारंभासाठी

श्रीमामांचे सद्गुरु, चिमडमठाचे अधिपति, श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर हे चिमडहून सांगलीस येऊन जातीने उपस्थित होते. आपले शिष्य मामामहाराज केळकर यांना त्यांनी शुभाशीर्वाद आणि शुभेच्छा दिल्या. आणि या महत्त्वाच्या प्रसंगी श्रीनारायणमहाराज आणि श्रीमामा या गुरुशिष्यांचा एकत्र फोटो काढण्यात आला. हा फोटो आजही राममंदिरात दिसून येतो.

मामांच्या नित्य कीर्तनाच्या या रजतमहोत्सव प्रसंगी कीर्तने, प्रवचने, निरूपणे यांचे आयोजन श्रीदादांनी केले होते. तसेच याच रौप्य महोत्सवात श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांचा सत्कार करून एक विशिष्ट औचित्य साधण्यात आले.

श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराजांच्या कैवल्यधामात इ.स. १९४९ च्या नोव्हेंबर महिन्यात श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ श्रीबाबूरावजींनी आयोजित केला होता. हा कार्यक्रम पैठण येथील श्रीमंत भय्यासाहेब पैठणकरमहाराज यांच्या शुभ हस्ते पार पडला. यावेळी अनेक संतमंडळी कैवल्यधामात एकत्र जमलेली होती. या वेळी श्रीदादाही तेथे जात होते. श्रीदादा उत्तम कीर्तन करतात हे या संतमंडळीना कळले. या संतसज्जनांना श्रीदादांचे कीर्तन/निरूपण ऐकण्याची इच्छा झाली. तेव्हा श्रीलक्ष्मणबुवा निजामपुरकरमहाराजांच्या विनंतीनुसार श्रीभय्यासाहेबमहाराज आणि अन्य साधूंची मांदियाळी श्रीदादांचे घरी त्यांचे निरूपण ऐकण्यास जमली. श्रीदादांचे निरूपण उत्तम झाले. सर्व संतांना ते आवडले. त्यांनी श्रीदादांना धन्यवाद दिले. ह.भ.प.सोनोपंत दांडेकरमहाराजांनी तर श्रीदादांना मिठीच मारली व ते उद्गारले, ''रामभाऊ, तुम्ही निरूपणात बहुत मजा केली.''

वर उल्लेखिलेल्या निरूपणास काही कारणाने मं.रा.टाकीमहाराज हे उपस्थित राहू शकले नव्हते, म्हणून त्यांनी श्री. महादेव दाणेकरी यांचे घरी श्रीदादांचे निरूपण आयोजित केले. आणि टाकीमहाराज त्या निरूपणास उपस्थित राहिले. निरूपण ऐकून टाकीमहाराज प्रसन्न झाले, आणि एक हार आपल्या हातात धरून, ते श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, सोहिरोबानाथांचा प्रसाद म्हणून मी आज हा हार तुमच्या गळ्यात घालणार आहे. तुम्ही हार घालून घेत नाही, हे मला माहीत आहे. परंतु आज तुम्ही नाही म्हणू नका.



यापुढे चढत्या वाढत्या श्रेणीने तुमची कीर्तन-निरूपणे व्हावीत अशी सोहिरोबानाथांची इच्छा आहे.''

याच सुमारास श्रीदादांच्या प्रापंचिक जीवनात एक प्रसंग घडला. दिनांक १८-११-१९४९ या दिवशी श्रीदादांना तृतीय पुत्राचा लाभ झाला. या मुलाचे नाव अनल असे ठेवण्यात आले. श्री. अनल हे पुढे बी. कॉम् झाले. त्यांना सांगली बँकेत लगेच नोकरी लागली. नंतर त्यांनी बँकिंगच्या काही परीक्षाही दिल्या. सध्या ते सांगली बँकेत मोठ्या हुद्द्यावर ऑफिसर आहेत. श्री. वामन गणेश परांजपे आणि सौ. सुशीला परांजपे या जोडप्याच्या पद्मा नावाच्या सुकन्येशी त्यांचा विवाह झाला. पद्माचे सासरचे नाव सौ. अर्चना असे ठेवले गेले. सौ. अर्चना आणि अनल या दांपत्याला दोन मुलीच आहेत. त्यांची नावे प्राजक्ती आणि शारदा. थोरली प्राजक्ती ही इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर व्यवसायातील परीक्षा उत्तीर्ण झाली. ती सध्या कर्नाटकातील बेंगलोर येथे नोकरी करीत आहे. तिचा प्रेमविवाह श्री. मीलन मुळ्ये यांच्याशी नुकताच झाला. धाकटी मुलगी शारदा सध्या उच्च शिक्षण घेत आहे.

मुंबईजवळील पालघर येथे श्रीमंत मातोश्री माईसाहेब दांडेकर रहात होत्या. त्या इ.स.१९५०-५१ चे सुमारास सांगली गावी रहाण्यास आल्या होत्या. त्या काही दिवस मामामहाराजांच्या घरातच मुक्काम करून होत्या. त्यांना मामामहाराजांचे विषयी फार आदर वाटत असे. मामांचे घरी सहज चौकशी करताना त्यांना कळून आले की मामामहाराजांना ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. पण त्यांचा साठीचा सोहळा झालेला नाही. तेव्हा मामामहाराजांचा षष्ट्यब्दपूर्तीचा समारंभ घरगुती स्वरूपात साजरा करू या असे माईसाहेबांनी सुचविले. ती कल्पना श्रीदादांना पसंत पडली. आणि माईसाहेब व श्रीदादा यांच्या पुढाकाराने मामामहाराजांचा षष्ट्यब्दपूर्तीचा सोहळा साजरा करण्यात आला. या समारंभात श्री. वझे गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली सर्व धार्मिक कार्यक्रम यथासांग पार पडले.

श्रीदादांची ट्रेझरी ऑफिसातील नोकरी चालूच होती. पण तीत आता थोडा फरक झाला होता. इ.स. १९४८ नंतर गांधीवधोत्तरच्या काळात भारतातील देशी संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन होण्याचा/करण्याचा धडाका सुरू झाला. दक्षिण महाराष्ट्रातील अनेक संस्थाने महाराष्ट्र राज्यात विलीन होऊ

लागली. त्यातून सांगली संस्थानही सुटले नाही. सांगली संस्थान महाराष्ट्र राज्यात विलीन होताना असे ठरले की पूर्वीचा संस्थानी नोकरवर्ग हा जशाचा तसा महाराष्ट्र सरकारच्या सेवेत सामावून घेतला जाईल. यानुसार श्रीदादांची ट्रेझरीतील नोकरी कायम राहिली, परंतु श्रीदादा आता महाराष्ट्र शासनाचे एक सेवक बनले. तथापि पूर्वीच्या नोकरीत आणि नवीन नोकरीत एक महत्त्वाचा फरक घडला. तो म्हणजे आता नोकरवर्गाच्या परगावी बदल्या होऊ लागल्या.

श्रीदादा आता महाराष्ट्र सरकारच्या सेवेत आल्यावर, ते नियमितपणे जाऊन आपली कर्तव्ये पार पाडू लागले. असेच ते एकदा ट्रेझरी ऑफिसात काम करीत असताना, शुक्रवार दि.३-८-१९५१ रोजी दुपारी बारा वाजता त्यांच्या कानावर एक कानडी पद येऊ लागले. हे पद म्हणजे निंबरगीकरमहाराजांनी श्रुत केलेले ''रामेश्वर नी हृदयांतरली वासिसो'' हे होते. त्यावेळी या पदातील फक्त चारच कडवी श्रीदादांना ऐकू आली. ती श्रीदादांनी लगेच लिहून ठेवली. मग दुसरे दिवशी हेच पद श्रीदादांना ऐकू आले; या नवीन पदात मात्र काही थोडे शब्द वेगळे होते, इतकेच नव्हे तर आता या पदात पाच कडवी होती. हेही पद श्रीदादांनी लिहून ठेवले.

सांगली संस्थान महाराष्ट्र राज्यात विलीन झाल्यावर, हळुहळु संस्थानी नोकरांच्या परगावी बदल्या होण्याचे सत्र सुरू झाले. आणि एके दिवशी बदलीची कुऱ्हाड श्रीदादांचे मस्तकावर येऊन आदळली. सांगलीतील श्रीमामांचे कीर्तनश्रवण सोडून परगावी बदलीच्या ठिकाणी जाणे हे श्रीदादांना पसंत नव्हते. बदली रद्द होऊ शकेल काय याची चाचपणी श्रीदादांनी केली. तेव्हा त्यांना सांगण्यात आले, ''बदली होईल त्या जागी जावयास हवे. बदली नको असल्यास ग्रॅच्युइटी घेऊन सेवामुक्त व्हावे.'' आता खरे सांगायचे म्हणजे मुळात श्रीदादांना नोकरी नकोच होती. त्यात आता बदली होऊन परगावी रहाणे आले तर तिकडे बिऱ्हाड होईपर्यंत एकट्याने रहाणे आपणास जमेल की नाही असे विचार श्रीदादांच्या मनात येऊ लागले. आणि मग सर्व विचार करून श्रीदादांनी आपल्या मनाशी ठरविले की आपण ग्रॅच्युइटी घ्यावयाची आणि नोकरी सोडून द्यावयाची. आपला हा बेत श्रीदादांनी मामांना सांगितला. श्रीमामांना आपल्या मुलाची मन:स्थिति नीट कळत होती. म्हणून मामांनी श्रीदादांच्या बेताला आपली संमति दिली. आणि मामांचे पाठबळ मिळताच श्रीदादांनी ग्रॅच्युइटी



घेऊन, आपल्या नोकरीचे त्यागपत्र दिले.

श्रीदादांनी ऐन तारुण्यात आपली सरकारी नोकरी सोडली, ही गोष्ट साहजिकच इतर माणसांना पसंत पडणे शक्य नव्हते. अद्यापि वय तरुण आहे. पदरात एक बायको व तीन मुले आहेत. अशा स्थितीत नोकरी सोडून श्रीदादा घरी बसून काय करणार? तेव्हा श्रीदादांच्या काही निकटच्या मंडळींनी पुन: खटपट केली, आणि तासगावला पुरवठा खात्यात श्रीदादांना दुसरी नोकरी मिळवून देण्यात आली. आणि तासगावला मामांचे एक नातेवाईक श्री. आगरकर यांचे घर असल्याने, श्रीदादांच्या सुरवातीचा रहाण्याजेवण्याचा प्रश्न सुटेल, असे श्रीदादांना सांगण्यात आले. आता ही नोकरी पत्करली तर मामांचे रोजचे कीर्तन तर अंतरणारच, मग पहिली पेन्शनेबल नोकरी सोडून देऊन आपण काय कमावले, असा विचार साहजिकच श्रीदादांच्या मनात आला. तेव्हा ही नोकरी पत्करावी की नाही? या विचारात श्रीदादा असताना, इतरांच्या आग्रहाचा रेटा श्रीदादांच्या मागे इतका लागला, की त्यांचे मन मोडू नये या एकाच इच्छेने श्रीदादा नवीन नोकरीवर रूजू झाले. जेमतेम चारपाच दिवस श्रीदादा या नोकरीवर गेले. त्या नोकरीतील परिस्थिति अत्यंत चमत्कारिक होती. ती अंगाशी येण्याची शक्यता होती. ती परिस्थिति श्रीदादांना अजिबात रुचली नाही. मनोमनी त्यांनी ठरविले की ही नोकरी ताबडतोब सोडावयाची. रजा मंजूर करवून घेऊन, श्रीदादा सांगलीला आले. या नवीन नोकरीच्या ठिकाणची सर्व चमत्कारिक स्थिति श्रीदादांनी मामांना समजावून सांगितली. व '' तेथे नोकरीत रहाणे हे पुढे त्रासदायक ठरणार आहे'' असे आपले मत त्यांनी मामांना स्पष्टपणे सांगितले. श्रीमामांनी परिस्थितीचा नीट विचार केला आणि नोकरी लगेच सोडण्याच्या श्रीदादांच्या विचाराला आपली अनुमति दिली. मामांची संमति मिळताच श्रीदादांनी सांगलीहूनच नवीन नोकरीचा राजीनामा पाठवून दिला. अशा प्रकारे श्रीदादांच्या जीवनातील नोकरीचा कालखंड संपला. श्रीदादांची व्यवहारातील नोकरी संपली तरी ईश्वराची चाकरी चालूच राहिली.

श्रीमंत माईसाहेब दांडेकर यांचे आपल्या पालघर गावी स्वत:चे घरी 'प्रेमळ विठ्ठल मंदिर' होते व आहे. तेथे कीर्तन करण्यास श्रीदादांनी यावे असा माईसाहेबांचा फारच आग्रह पडल्याने श्रीदादा पालघरास गेले. तेथे त्यांची कीर्तने सुरू झाली.

श्रीदादा पालघरात असताना लक्ष्मणबुवा निजामपुरकर यांनी पाठविलेला एक सद्गृहस्थ श्रीदादांना भेटण्यास आला. त्याला तुकाराममहाराजांच्या एका कूट अभंगाचा अर्थ हवा होता. तो सांगून श्रीदादांनी त्या गृहस्थाच्या मनाचे समाधान केले.

पालघरात माईसाहेबांच्या वाड्यातच श्री.गो.के.सप्तर्षि या शिक्षकांचे बिऱ्हाड होते. श्रीदादा पालघरला जाण्यापूर्वी काही दिवस अगोदर श्री. सप्तर्षि यांच्या पुत्राचे निधन झाले होते. त्यामुळे ते फारच दु:खीकष्टी होते. ते श्रीदादांची कीर्तने ऐकण्यास येऊ लागले. मग हळुहळु त्यांचे दु:ख कमी झाले. पुढे त्यांनी श्रीदादांचेकडून अनुग्रहसुद्धा घेतला.

श्रीदादांचा पालघर गावी मुक्काम असताना, मुंबईहून एक पारशी गृहस्थ श्रीदादांचेकडे अनुग्रह मागण्यास आला. हे पारशी गृहस्थ श्रीदादांना म्हणाले, ''महाराज, मारुतीने स्वप्नात येऊन मला सांगितले आहे की सांगलीचे रामराय केळकर हे सध्या पालघरला आले आहेत. त्यांचेकडून तुला अनुग्रह मिळेल. म्हणून आपला अनुग्रह घेण्यास मी आपणाकडे आलो आहे. कृपया मला अनुग्रह द्यावा.'' हे ऐकल्यावर श्रीदादांनी त्यांना विचारले ''अहो, तुमच्या स्वप्नात मारुति आणखी काही म्हणत होता की नाही?'' ते पारशी गृहस्थ उत्तरले, ''महाराज, तो मारुति 'रघुपति राघव राजाराम पतित पावन सीताराम' असे भजन करीत होता.'' तेव्हा श्रीदादांनी त्यांना सांगितले, ''मारुति तो मंत्रच उच्चारीत होता. तोच मंत्र जपण्यास आता तुम्ही सुरवात करा.''

श्रीदादा इ. स. १९५२ च्या सुमारास तुकाराममहाराजांच्या देहू या गावी गेले होते. तेथे तुकाराममहाराजांचे वंशज श्रीमंत बाबासाहेब देहूकर होते. त्यांनी श्रीदादांचे स्वागत करून त्यांचा आदर सत्कार केला. त्यांनी श्रीदादांचे निरूपणही आयोजित केले. ते निरूपण ऐकल्यावर प्रसन्न झालेले श्रीदेहूकरमहाराज श्रीदादांना म्हणाले, ''अहो रामभाऊ, बिनबिदागीचे कीर्तन-निरूपण तुम्ही करता. मला वाटते तुम्हीच तुकाराममहाराजांचे खरे वंशज आहात. कारण तुम्हीच हरीच्या कीर्तननिरूपणात रंगून गेलेले आहात.''

श्रीमती माई करमरकर या नावाच्या एक बाई मामांचे कीर्तन ऐकण्यास मुंबईहून सांगलीस रहाण्यास आलेल्या होत्या. त्यांचे बिऱ्हाड मामांचे वाड्यातच होते. त्यांना या सुमारास श्रीदादांच्या बाबतीत जो एक अनुभव आला तो



त्यांचे भाचे श्री.स.वि.जोगळेकर यांनी दीपलक्ष्मी मासिकाच्या मामामहाराज केळकर विशेषांकात नोंदवलेला आहे. तो असा :- ''माझी मावशी ती. माई करमरकर ही मामांचे कीर्तन ऐकण्यास, आपल्या मुलांचे पासून दूर येऊन, मामांचे वाड्यात बिऱ्हाड करून राहिली होती. एकदा मी मावशीकडे आलो होतो. त्यावेळी तिने मामांना व दादांना भोजनास बोलावले. काही कारणास्तव दादांना बाहेर जावयाचे होते म्हणून त्यांना मामांचे अगोदर लौकर जेवून घ्यावयाचे होते. तसा निरोप मामांनी मावशीकडे पाठविला. जेवण तयार झाले. मावशीने दादांचे पान मांडले. पण तिच्या मनात विकल्प आला.'' मामांचे आधी दादांना जेवण्यास वाढले तर मामांना उष्टे वाढल्यासारखे होईल.'' तथापि हा विकल्प बाजूस सारून मावशी आतल्या खोलीतून बाहेरच्या खोलीत वाढण्यास आली. तोच तिला दिसले की दादांचेसाठी मांडून ठेवलेले ताट काळ्या मुंगळ्यांनी भरून गेले आहे. मावशी चपापली. मावशी जाणती होती. तिच्या लक्षात आले की मगाशी आपल्या मनात जो विकल्प आला त्यामुळेच हे काहीतरी विपरीत घडले आहे. तिला पश्चाताप झाला. घरात असणाऱ्या मामांच्या फोटोपुढे उभे राहून मावशीने क्षमा मागितली. मग ती दुसरे ताट तयार करून बाहेर आली. त्यावेळी सर्व मुंगळे नाहीसे झाले होते, असे तिला दिसले. तेव्हा मामा व दादा यांच्यात भेद न करण्याचा निश्चय तिने केला.''

गुरुलिंगगीतेची इ.स.१९४८ अखेर ६५ पदे झाली होती. या वर्षी श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांचे सांगलीत पूर्ण झालेले पद प्रथम म्हणावयाचे असे श्रीदादांनी ठरविले. तसेच हंस साप्ताहिकास न पाठविलेली 'जगवू मुट्टीवू' आणि 'जगदानुद्धरणादौ' ही पदे गुरुलिंगगीतेत म्हणावयाची असे श्रीदादांनी ठरविले. या दोन पदांना ६ व ७ असे क्रमांक दिले. तसेच 'ओळगिंतादू' या पदाचा क्रमांक २२, 'सिद्धानंदरूपन्ने' या पदाचा क्रमांक २३, ''मोदलू श्रीसोमेश्वरु'' या पदाचा क्रमांक २५ झाला. ''हरवेयू नारायण वादा'' आणि ''प्रगटादा गुरु'' ही दोन पदे २६ व २७ या क्रमांकाची झाली. त्यानंतर पद क्रमांक २८ म्हणजे ''आडच्यायो पडच्यायो'' पासून ''ॐ जय गुरुलिंगन गीता'' या ६६ व्या पदापर्यंत एक विशिष्ट क्रम श्रीदादांनी निश्चित केला. आणि हाच पदांचा क्रम गुरुलिंगगीता पठण करताना सुरू झाला. सहासष्ट पदांची ही गुरुलिंगगीता अनेकांना पठण करावयास हवी असे. त्यांच्यासाठी श्री. व. म.

बापट हे स्वत:च्या हाताने लिहून गुरुलिंगगीतेच्या प्रती करत. पण हे फार काळ चालणे शक्य नव्हते. तेव्हा श्री. वासुदेवराव जोशी श्रीदादांना म्हणाले, ''रामा, तुम्ही परवानगी दिलीत तर मी संपूर्ण गुरुलिंगगीता प्रकाशित करीन. म्हणजे ही गीता वाचू इच्छिणाऱ्या सर्वांची सोय होईल.'' ही कल्पना सर्वांना पसंत पडून श्रीदादांनी तशी परवानगी दिली. आणि इ.स.१९५३ मध्ये ''श्रीगुरुलिंगप्रसाद-गीता'' ही मुद्रित स्वरूपात उपलब्ध झाली. या पुस्तकात प्रारंभी कानडीतील श्रीदादांना मिळालेली काकडारती व शेवटी शेजारती होती.

श्रीगुरुलिंगगीतेतील पदे श्रीदादांना बहुधा ध्वनिरूपाने ऐकू येत. पण या ध्वनीचे वैशिष्ट्य असे की श्रीदादांच्या जवळ बसणाऱ्या माणसासही हे ध्वनि ऐकू येत नसत. त्याचा पडताळा एकदा श्री. व.म.बापट व श्री. धनंजय भावे यांना आला. म्हणजे त्याचे असे झाले :- दि. २४-१-१९५३ रोजी श्रीदादा आपल्या घरच्या सोप्यावरील अंधाऱ्या खोलीत बसले होते. श्री. बापट व भावे त्यांचे पाय चेपीत होते. (श्रीदादांना पाय चेपून घेणे आवडत असे). खोलीतील अंधारात अचानक सौम्य प्रकाश पडला. पण त्या प्रकाशात भावे व बापट एकमेकांना पाहू शकत नव्हते. पंधरा मिनिटांनी तो सौम्य प्रकाश दिसेनासा झाला. मधल्या काळात श्रीदादा एक पद ऐकत होते. ''इतका वेळ कसला प्रकाश पडला होता,'' असे बापट व भावे या दोघांनीही श्रीदादांना विचारले. ''आत्ता मला कानडी भाषेतील काकडारती व शेजारती ऐकू आली,'' श्रीदादांनी उत्तर दिले. नंतर खोलीतील विजेचा दिवा लावण्यात आला. तात्यासाहेबमहाराजांच्या उत्सवाच्या आमंत्रणपत्रिकेवरील मोकळ्या जागी श्रीदादांनी या दोन्ही आरत्या लिहिल्या होत्या. ही हकिकत सांगून श्री. बापट पुढे म्हणतात ''श्रीदादांनी आरत्या लिहिलेला तो कागद आजही मी मजजवळ जपून ठेवलेला आहे.'' या दोन्ही आरत्या वासुदेवरावांनी प्रकाशित केलेल्या गुरुलिंगगीतेत छापलेल्या आहेत. काकडारतीचा प्रारंभ ''नारायण नारायण'' असा असून, शेजारतीची सुरवात ''जय जया सिद्धानंदा'' या शब्दांनी होते.

श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या कीर्तनात श्री. वा.वें.आपटे हे कधी कधी तबला वाजवीत. त्यांच्या देहावसानानंतर त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई आपल्या दोन मुलांसह सांगलीच्या गावभागातील बक्षी बोळात श्री. पाटणकर



या त्यांच्या मुलांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. त्यांचे घर जवळ असल्याने, श्रीदादा अनेकदा शरदचे घरी जात. काही काळाने शरद आपटे हे पुण्यास स्थायिक झाले. तरी ते वरचेवर श्रीदादांचे दर्शनास सांगलीस येतात.

श्रीदादांच्या शरयू नावाच्या मामे बहिणीचे लग्न कोल्हापूरच्या श्रीयुत गोपाळराव जोशी यांचेबरोबर झाले. शरयू हीही श्रीदादांची अनुगृहीत होती. एकदा तिच्या मनात आले की श्रीदादांना घेऊन आपण काडसिद्धांचे दर्शनास जावे. तिने श्रीदादांना तशी विनंति केली. ती मान्य करुन के. वा. आपटे व त्यांची पत्नी सौ. सुमन आपटे यांना बरोबर घेऊन श्रीदादा कोल्हापूरास गेले. तेथून सौ. शरयू, गोपाळराव जोशी, व बरोबरच्या मंडळीसह श्रीदादा हे सर्वजण स्पेशल मोटारीने सिद्धगिरीस गेले व काडसिद्धांचे दर्शन घेऊन परतले. ही यात्रा मे १९५३ मध्ये झाली.

श्रीदादांची थोरली मेहुणी सौ. अंबुताई भावे. या श्रीदादांच्या शेजारच्या वाड्यात रहात असत. पौष शुद्ध नवमी, इ.स. १९५३ रोजी सकाळी श्रीदादा त्यांचे घरी गेले. श्रीदादांच्या आगमनाबरोबरच एक अनामिक सुगंध सुटला. मग श्रीदादांनी पंचांग मागितले. पंचांगात त्या दिवशी पौष शुद्ध नवमी होती. तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''अंबुताई, निंबरगीकरमहाराज आज तुमचे घरी प्रगट झाले आहेत. याचा अर्थ गुरुलिंगगीताजयंती तुमच्या घरी व्हावी अशी महाराजांची इच्छा आहे. तेव्हा सर्व तयारी करा.'' हे ऐकताच झटपट सर्व तयारी करण्यात आली. नंतर गुरुलिंगगीतापठण, पोथीचे पूजन, आरती व नंतर भोजन इत्यादि सर्व कार्यक्रम यथासांग पार पडले. नंतर तो सुगंध हळुहळु कमी झाला. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की आजतागायत भावे यांचे घरी पौष शुद्ध नवमीला गुरुलिंगगीताजयंतीचा कार्यक्रम होतो.

पालघरच्या माईसाहेब दांडेकर श्रीदादांना पालघरला येण्यास पत्रे लिहीत. इ.स.१९५४ नंतर दोन तीन वेळा श्रीदादा पालघरला उन्हाळ्याचे सुट्टीत गेले होते. पालघरला जाता येताना श्रीदादा हे के. वा. आपटे यांचे घरी उतरत. त्यावेळी के.वा.आपटे हे मुंबईला बॉम्बे कॉलेजमध्ये (आताचे कीर्ति कॉलेज) नोकरीला होते. दोन वर्षे श्रीदादांनी के.वा.आपटे यांचे घरी श्रीगुरुलिंगगीता जयंती साजरी केली. के. वा. आपटे यांच्या पत्नी सौ. सुमन., सौ. सुमन यांचे बंधु श्री. स. वि. ऊर्फ नाना जोगळेकर, सौ. सुमन यांच्या थोरल्या भगिनी सौ.

यांचे घरी रहात असत. त्यांना गुरुदेव रानडे यांचा अनुग्रह होता. शांता व शरद मंगला जोशी व सौ. रेखाताई बर्वे, त्यांचे पति श्री.अनंतराव जोशी व राजाभाऊ बर्वे, सौ. सुमन यांच्या मावस भगिनी श्रीमती कुसाताई इत्यादि मंडळी गुरुलिंगगीताजयंतीच्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहात व आवश्यक ते साहाय्य करीत. या सर्वांच्या खटपटीने आणि श्रमाने गुरुलिंगगीताजयंतीचा कार्यक्रम मोठ्या थाटात साजरा होई. आवर्जून जोंधळ्याची भाकरी, कांदे, व अंबाड्याची भाजी केली जाई. के. वा. आपटे यांच्या मुंबईच्या घरी झालेल्या गुरुलिंगगीताजयंतीच्या कार्यक्रमांची आठवण श्रीदादा कधी कधी कीर्तनात सांगत.

श्रीदादांच्या चौथ्या पुत्राचा जन्म दि. २५-२-१९५६ रोजी झाला. त्याच्या जन्मानंतरची हकिकतही मोठी आश्चर्यकारक आहे. सांगलीस आपले घरीच सौ. सीतावहिनी प्रसूत झाल्या. जन्मलेल्या मुलाचे अंग थंडगार पडलेले होते. अंगात काही चेतनाच नव्हती. ताबडतोब डॉक्टरांना बोलावण्यात आले. परंतु डॉक्टरांचा काही उपाय चालला नाही. त्या वेळी श्रीमंत माईसाहेब दांडेकर मामांच्या घरी रहात होत्या. त्यांना ही हकिकत कळताच त्या त्वरित मामामहाराजांचेकडे गेल्या व त्यांनी या नवीन बालकाची हकिकत मामांना सांगितली आणि त्या म्हणाल्या, ''मामा, आता तुम्हीच देवाचे तीर्थ व अंगारा द्या. त्याचा निश्चित उपयोग होईल.'' तेव्हा मामांनी कुलदेव रामेश्वराचे स्मरण करून, देवाचे तीर्थ व अंगारा दिला. माईसाहेबांनी मुलाच्या मुखात थोडे तीर्थ घातले, थोडे अंगावर शिंपडले, आणि मुलाच्या सर्व अंगाला अंगारा चोळून लावला. तोच मुलाचे अंगात चेतना आली आणि मूल हातपाय हलवू लागले. या मुलाचे नाव अनिलप्रभु असे ठेवण्यात आले. हे अनिलप्रभु पुढे बी.एस्सी. झाले. त्यांनी बँकिंगची परीक्षा दिली आणि त्यांना स्टेट बँकेत नोकरी लागली. नोकरीनंतर श्री. राजाराम कृष्ण पटवर्धन व सौ. रजनी पटवर्धन या दांपत्याच्या साधना नावाच्या मुलीशी अनिलप्रभूंचा विवाह झाला. साधनाचे सासरचे नांव सौ. अपर्णा असे ठेवण्यात आले. त्यांना अनिरुद्ध आणि अनिकेत असे दोन पुत्र आहेत व सध्या ते शिकत आहेत. पुढे अनिलप्रभूंनी दि. ३१-३-२००१ रोजी स्वेच्छानिवृत्ति घेतली.

卐卐卐卐卐



## प्रकरण ७ : संदर्भ

१) दीपलक्ष्मी मामामहाराज केळकर विशेषांक, पृ. १३, ६४, १६
२) डायरी (वही क्रमांक १३४)
३) श्रीदासरामगौरवग्रंथ
४) धनंजय भावे यांची आठवण, फाइल ४

❋

## प्रकरण ८

# पितृछत्र हरपले

## (इ.स.१९५६ ते १९६२)

पालघर येथील प्रेमळ विठ्ठल मंदिरात कीर्तन करण्यासाठी इ.स. १९५६ च्या मे महिन्यात श्रीदादा माईसाहेब दांडेकरांच्याकडे गेले होते. तेथे असताना दि. २६-५-१९५६ रोजी त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये, ''अरे रामा, तू इकडे गुरुलिंगगीता वाचीत आहेस, पण तिकडे सांगलीस रथाचे चाक अडले आहे,'' असे शब्द श्रीदादांना ऐकू आले आणि त्यानंतर पहाटे ५।। च्या सुमारास श्रीनिंबरगीकरमहाराज त्यांचे पुढे प्रगट झाले आणि त्यांनी 'रथविठ्ठा' हे पद श्रीदादांना श्रुत केले. ते पद ऐकल्यावर आणि त्याचा भावार्थ मनात प्रगटल्यावर श्रीदादांना बोध झाला की यापुढे श्रीगुरुलिंगगीताजयंती दिवशी आपण सांगलीतच आपल्या घरी असावयास हवे. लगेच माईसाहेबांना सर्व समजावून सांगून श्रीदादा तातडीने पालघरातून बाहेर पडले. वाटेत ते प्रा.के.वा.आपटे यांच्या मुंबईच्या घरी उतरले. त्यांनी केशवरावांना पालघरला घडलेला सर्व प्रसंग सांगितला. नंतर ते सांगलीस निघाले. पुन: वाटेत पुण्यास मुक्काम पडला. नंतर बरोबर श्रीगुरुलिंगगीता जयंतीच्याच दिवशी संध्याकाळी श्रीदादा सांगलीस पोचले. त्या दिवशी सकाळी गुरुलिंगगीताजयंती निमित्त निघणारा रथ निघू शकला नव्हता. घरी पोचल्यावर श्रीदादांनी तो रथ संध्याकाळी काढला. ही घटना घडून गेल्यानंतर श्रीदादांनी ठरविले की यापुढे श्रीगुरुलिंगगीता जयंती ही अन्य कुठेही साजरी न करता, ती सांगलीस फक्त आपलेच घरी साजरी करावयाची. आणि हा नेम त्यांनी पुढे आपल्या स्वत:च्या निर्याणापर्यंत पाळला.

श्रीगुरुलिंगगीता जयंतीचा सोहळा श्रीदादांचे घरीच होऊ लागल्या-नंतर काही वर्षे श्रीदादा थोड्याशा भक्तमंडळींना जेवणाचा प्रसाद घेण्यास थांबवून घेत. भोजनप्रसादात ज्वारीची भाकरी व अंबाड्याची भाजी असे. एके वर्षी या प्रसादात थोडी वेगळी भर पडली. श्री. नारायणराव सुपेकर या नावाचे एक भक्त श्रीदादांचेकडे नेमाने येत असत. ते श्रीदादांना म्हणाले, ''महाराज, या वर्षीच्या गुरुलिंगगीता जयंतीच्या दिवशी जेवणात आंबरस



असावा असे मला वाटते.'' या बेताला श्रीदादांनी संमति दिली. त्या दिवशी श्री. सुपेकरांनी भरपूर आंबे आणले, आणि मग भाकरी, भाजी यांचे बरोबर भरपूर आंबरसही वाढण्यात आला.

निंबरगीकरमहाराज हे चिमड संप्रदायाचे मूळ पुरुष. त्यांचे गाव निंबरगी किंवा देवनिंबरगी हे कर्नाटक राज्यात आहे. तेथे निंबरगीकरमहाराजांची समाधि आहे. केळकर कुटुंबाला बरोबर घेऊन निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यास आपण जावे अशी प्रेरणा श्री पंडितराव परचुरे यांना झाली. पंडितराव हे श्रीमामांचे भक्त. ते मामांना म्हणाले, ''मामा, आपण सर्व जण निंबरगीस जाऊन निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन येऊ. येण्याजाण्याची सर्व व्यवस्था मी करतो.'' पंडितरावांच्या आग्रहामुळे या यात्रेस जाण्यास मामा तयार झाले. पंडितरावांना आनंद झाला. मामांचे घरची सर्व मंडळी, परचुरे यांचे घरची मंडळी, स.वि. जोगळेकर, के. वा.आपटे , श्री. सुर्वे, श्री. बाळासाहेब गोखले इत्यादि मंडळी इ.स.१९५७ च्या निंबरगीयात्रेत सामील झाली. यात्रा निघण्याचा जो दिवस ठरला होता त्याच्या आधीपासून जोरदार पाऊस पडण्यास प्रारंभ झाला. कर्नाटकातील अनेक ओढ्यांनाल्यांना पूर आले आहेत, अशा बातम्या आल्या. परंतु ठरलेल्या दिवशी पाऊस नसल्याने प्रवासास निघण्याचे ठरले. तीन मोटारीतून यात्रेकरूंचा प्रवास होणार होता. ज्या मोटारीत मामा व सौ. इंदिराबाई बसले होते ती मोटार वाटेमध्ये एका ओढ्याच्या पाण्यात थांबली. ती पुढे जाईना. तेव्हा शेजारच्या शेतातून बैल आणवून ती मोटार पाण्याबाहेर काढण्यात आली. नंतर यात्रेकरू संध्याकाळच्या सुमारास निंबरगीच्या वाटेवर पोचले.त्या रस्त्यावर एके ठिकाणी अतिशय चिखल झालेला होता. त्यात मोटारी रुतून बसण्याची शक्यता होती. म्हणून मागे फिरून निंबरगीजवळील चडचाण या गावी रात्रीचा मुक्काम करण्याचे ठरले. तेथे एका मारुतीच्या देवळाजवळ मुक्काम पडला. या मारुतीच्या देवळात मामांनी आपले नित्याचे कीर्तन केले. या वेळी मामांच्या कपाळावर भस्माचे पट्टे उमटलेले अनेकांना दिसले. दुसरे दिवशी सकाळी सर्व लोक चडचाणहून निघून निंबरगीस पोचले. तेथे सर्वांनी निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. समाधीपुढेच श्रीमामांनी आपले कीर्तन केले. कीर्तनोत्तर निंबरगीकरमहाराजांचे घरी

जाऊन, त्यांच्या घरच्या मंडळींना आहेर करण्यात आला. त्यानंतर यात्रेकरू परत निघाले. परत येताना मात्र काहीही त्रास झाला नाही. या यात्रेचे रसाळ वर्णन श्री. न. दा. दिवेकर यांनी गोविंदचरितमानस या मामांच्या चरित्रात केले आहे.

श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराजांच्या कैवल्यधामात इ.स. १९५७ मध्ये ''कैवल्यविधि'' या ग्रंथाच्या प्रकाशनाचा समारंभ झाला. ओरिसा राज्याचे तत्कालीन राज्यपाल मा. वाय्. एन्. सुकथनकर हे प्रमुख पाहुणे होते. या समारंभात श्रीदादांच्या नावाचा जरी कुठे उल्लेख आला नाही तरी मा.सुकथनकरसाहेबांनी श्रीदादांचा उल्लेख केला. ते म्हणाले, ''कैवल्यविधि या ग्रंथाचे लौकर प्रकाशन व्हावे अशी कळकळीची विनंति राम गोविंद केळकरांनी केली होती असे मला स्मरते.''

श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी काही लेख लिहिले होते. तसेच काही काव्यही त्यांनी केले होते. ते एकत्र करुन प्रकाशित करण्याचे त्यांच्या दोन चिरंजीवांनी ठरविले. ते सर्व अंतर्भूत असणारा ''कैवल्यप्रसाद'' नावाचा ग्रंथ इ.स. १९५९ मध्ये प्रकाशित झाला. बाबूरावजींच्या चिरंजीवांनी ''या ग्रंथाची काव्यातील अर्पणपत्रिका करून द्या'' अशी विनंति श्रीदादांना केली. तेव्हा श्रीदादांनी पुढील अर्पणपत्रिका तयार करून दिली :-

भक्त श्रीरघुनाथ धन्य सुपिता पावे प्रसादू मना ।
सद्गुरु हनुमंत संत विभवे पुरवी मनोभावना ।
कैवल्यालयी पुष्पवेल फुलला घेवोनी पुष्पे बरी ।
अर्पी श्रीरघुनाथ नित्य सुमने श्रीपाद - पद्मावरी ॥१॥
वडिलांची उपरीच सत्कृती आम्ही अर्पू हनुमत्पदा ।
जे का चिंतुनि राहताच आमुते आनंद देई सदा ।
पुष्पांतील सुगंध नित्य पसरो आमुच्या मनी भाव हा ।
आशीर्वादचि लाभ थोर बरवा वाटे आम्हासी महा ॥२॥

याच सुमारास एकदा श्री. कुपवाडकर नावाचे गृहस्थ हे श्रीदादांना घेऊन तासगाव या गावी गेले होते. तेथे श्रीगणपतिमंदिरात श्रीदादांचे कीर्तन झाले. त्या काळी महादू बुवा नावाचे एक संत तासगावात मुक्काम करून होते. तेसुध्दा श्रीदादांच्या कीर्तनात उपस्थित होते. कीर्तन ऐकून महादू बुवा प्रसन्न



झाले. या प्रसंगाची आठवण या स्वरूपात श्रीदादांच्या हातून एक अभंग रचला गेला. हा अभंग असा आहे :-

तासगावी असे गणपतीचा रथ । तेथेचि बैसत महादू बुवा ॥१॥
गुंडुबुवा म्हणती महादू बुवा श्रेष्ठ । वझीर बाबा श्रेष्ठ म्हणे गुंडा ॥२॥
कुपवाडकरांमुळे गणेश दर्शन । जाहले कीर्तन माझे तेथे ॥३॥
महादू बुवा मुक्त हास्य ते करिती । पाहोनिया चित्ती समाधान ॥४॥
गुंडू बुवा जेव्हा जाहले अदृश्य । तेव्हाचि अदृश्य महादू बुवा ॥५॥
दासरामा घडले संतांचे दर्शन । त्याची आठवण होत असे ॥६॥

(दासरामगाथा, पृ.१३६)

याच काळात श्रीदादांना काही कारणाने पुणे गावी जाण्याचा योग आला होता. असेच एकदा श्रीदादा पुण्याहून एस्. टी. ने सांगलीस परत येत होते. मार्गावर एस्. टी. बस ही इस्लामपूरच्या बस स्टँडवर थांबली होती. तेथे स्टँडवर श्रीदादांना संत श्रीधोंडीराममहाराज दिसले. ते महान् विदेही साधु होते. त्यांना नमस्कार करण्यास श्रीदादा बसमधून खाली उतरले. धोंडीराममहाराजांचे संनिध जाऊन त्यांनी महाराजांना नमस्कार केला. त्या वेळी धोंडीराममहाराजांनी आपला उजवा हात आशीर्वाद देण्यास वर केला, आणि हास्यवदन करून त्यांनी श्रीदादांना शुभाशीर्वाद दिला. ही घटनाही श्रीदादांच्या स्मरणात राहिली आणि ती त्यांचे एका अभंगात पुढीलप्रमाणे निबद्ध केली गेली:-

ईश्वरपुरा[1]माजी धोंडीराम सिद्ध । जाहले प्रसिद्ध सर्वत्रची ॥१॥
तहान भुकेची जया शुद्ध नाही । देहीच विदेही पूर्णपणे ॥२॥
गटारीचे पाणी पिवोनिया तृप्त । मेहेरबाबा चकित पहाता भले ॥३॥
पुण्यपत्तने[2]सी जाता येता सहज । गुळवणीमहाराज दर्शन घेती ॥४॥
पुण्याहूनि येता धोंडीराम चरण । धरोनी नमन केले रामे ॥५॥
धोंडीरामे आपुले हात वर धरून । दिले आशीर्वचन हास्यमुखे ॥६॥
कधी नाही घडले ऐसे भक्त म्हणती । नवलाव चित्ती दासरामा ॥७॥

(दासरामगाथा,पृ.१३६)

१. ईश्वरपुर म्हणजेच इस्लामपूर.
२. पुण्यपत्तन म्हणजेच पुणे हे गाव.

याच सुमारास दोनदा कोल्हापूरला जाण्याचा श्रीदादांना अवसर आला. कोल्हापूरला कुंभारस्वामी या नावाचे एक महान् साधु होते. ते एका तेलिणीच्या घरी रहात असत. श्रीदादांची प्रसिद्धि व कीर्ति ऐकून त्या तेलिणीने एकदा श्रीदादांना कीर्तनास येण्याचे निमंत्रण दिले. ते स्वीकारून श्रीदादा कोल्हापूरास गेले. तेथे तेलिणीच्या घरातील देवाच्या शेजघरात श्रीदादांचे कीर्तन झाले. या कीर्तनास कुंभारस्वामी आवर्जून उपस्थित होते. कीर्तन ऐकल्यावर कुंभारस्वामींना फारच आनंद झाला. श्रीदादांचे कीर्तन चालू असताना सर्वत्र सुगंध पसरला होता. हा संस्मरणीय प्रसंगही श्रीदादांच्या एका अभंगात नोंदलेला आहे. तो अभंग असा :-

कुंभारस्वामींनी घेतली सेवा ।
दिला असे मेवा प्रसादाचा ॥१॥
तेलीण बोलवी कराया कीर्तना ।
आनंद तो मना झाला असे ॥२॥
शेजघरी माझे जहाले कीर्तन ।
स्वामीही प्रसन्न नवल झाले ॥३॥
सुगंध सुटला सर्वां जाणवला ।
दासराम झाला शरणागत ॥४॥

(दासरामगाथा,पृ.१३७)

कोल्हापूरातच श्रीदादामहाराज किर्लोस्कर या नावाचे आणखी एक साधु रहात होते. ते दत्ताचे मोठे भक्त होते. त्यांचे एक दत्ताचे छोटेसे मंदिर होते. एका वेळी या किर्लोस्करमहाराजांनी श्रीदादांना आपले मंदिरी कीर्तन करण्यास आमंत्रण दिले. मोठ्या आनंदाने श्रीदादांनी हे आमंत्रण स्वीकारले. ते कोल्हापूरला गेले. तेथे किर्लोस्करमहाराजांच्या दत्तमंदिरात श्रीदादांचे कीर्तन झाले. स्वत: किर्लोस्करमहाराज जातीने कीर्तनास उपस्थित होते. श्रीदादांचे कीर्तन ऐकून किर्लोस्करमहाराज फार खूष झाले. याही प्रसंगाची नोंद श्रीदादांच्या पुढील अभंगात आढळून येते :-

कोल्हापूर ग्रामी । वसती दत्त गुरु स्वामी ॥१॥
दत्तमंदिर लहान । तेथे जहाले कीर्तन ॥२॥
महाराज किर्लोस्कर । मुखी सदा दिगंबर ॥३॥



एकावेळी अंबालयी[१] । आणि मठी दिसती पाही ॥४॥
ऐसा ज्यांचा अधिकार । संतोषले ते अपार ॥५॥
कीर्तनी आल्हाद । दासरामासी आनंद ॥६॥

(दासरामगाथा, पृ.१३७)

श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या आज्ञेप्रमाणे इ.स. १९२४ च्या माघ वद्य तृतीयेपासून मामांनी आपले नित्य कीर्तन सुरू केले. मामांच्या दैनिक नित्य कीर्तनाचा रौप्य महोत्सव इ.स. १९४९ साली श्रीदादांनी साजरा केला. अशीच वर्षे उलटत गेली. इ.स. १९६० साल उजाडले. या वर्षी मामांच्या नित्य कीर्तनास छत्तीस वर्षे-तब्बल तीन-तपे पूर्ण होत होती. मामांच्या नित्य कीर्तनाचे कौतुक करण्याचा आणखी एक मोका श्रीदादांना प्राप्त झाला. आणि मामांच्या नित्य कीर्तनाचा हा त्रि-तप-महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे श्रीदादांनी ठरविले. त्यासाठी अनेक संतमहंताना श्रीदादांनी या समारंभाची आमंत्रणपत्रे पाठविली.

या त्रितप-महोत्सवासाठी अनेक विद्वानांचे, संतमहंतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. भजने,निरूपणे, कीर्तने, प्रवचने यांचा लाभ भाविकांना झाला. ह. भ. प. देशमुख वकिल, ह. भ. प. हरेरामपंत बोडस, इत्यादि मंडळींचे सुश्राव्य कार्यक्रम झाले. या समारंभाचे मुख्य पाहुणे होते सिद्धगिरीचे मठावरील तत्कालीन मठाधिपति काडसिद्धमहाराज.

श्रीमामा व श्रीदादा या दोघांनाही निंबरगीकरमहाराजांचे बद्दल अत्यंत आदर होता. निंबरगीकमहाराजांचे गुरु काडसिद्ध होते. त्यांची सिद्धगिरीच्या मठात परंपरा होती. त्या परंपरेतील विद्यमान काडसिद्धांना मुख्य पाहुणे म्हणून निवडण्यात एक प्रकारचे औचित्य साधले गेले. काडसिद्धमहाराजांचे रसाळ प्रवचन हे या समारंभाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी मामांचे कौतुक केले व त्यांना शुभाशीर्वाद दिले. त्रितप महोत्सवाच्या या सर्व सोहोळ्यात निंबरगीकरमहाराजांचे अधिकारी पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराज हे उपस्थित होते.

मामांच्या नित्य कीर्तनाच्या त्रितपमहोत्सवाच्या निमित्ताने आणखी

१. अंबालय म्हणजे कोल्हापूरचे प्रसिद्ध अंबाबाईचे देवालय.

एक जो प्रसंग घडला त्याचे योगे श्रीमामांचे महत्त्व आणखीनच उठून दिसले. माधवनगर येथील श्री. भा. द. लिमये, श्री. वासुदेवराव जोशी, श्री. बापूराव जोशी, तात्या करंदीकर इत्यादि मंडळींनी मामांचा सत्कार करण्याचे योजिले. व तसे त्यांनी मामांना कळविले. मामांनी या गोष्टीस संमति दिली नाही. पुढे काय घडले, हे श्री. भा. द. लिमये असे सांगतात :-

'' आम्ही माधवनगर येथे ह. भ. प. वासुदेवराव जोशी यांचे घरालगत बांधलेल्या इमारतीत एका कीर्तनमंदिराचे उद्‌घाटन त्यांचे (=मामांचे) हस्ते करून दुधाची तहान ताकावर भागवली. या कीर्तनमंदिराचे उद्‌घाटन प्रसंगी जो स्वल्प आहेर म्हणून माधवनगरातील कीर्तनप्रेमी श्रोत्यांचे वतीने (श्रीमामांना) करण्यात आला, तोही प. पू. बापूरावजींनी संप्रदायाचे मूळप्रवर्तक श्रीगुरुलिंगजंगममहाराज यांचे पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांचेकडे निंबरगीसच अहेराचे श्रीफळ व महावस्त्र वगैरे सर्वच पाठवून द्या, असे सांगून श्रोत्यांना सहज मौन धरायला लावले.''

या त्रितपमहोत्सावाचे प्रसंगी आणखी एक स्मरणीय प्रसंग घडला. तो असा :- श्रीमामामहाराजांनी आपला नित्य कीर्तनाचा क्रम सुरू होण्यापूर्वी काय घडले, आणि नित्य नित्यकीर्तनाचा क्रम त्यांनी केव्हा व कसा सुरू केला यांचे साधार वर्णन करणारे एक पुस्तक प्रा. के. वा. आपटे यांनी लिहिले होते. पुस्तकाचे नाव होते ''गुरु-तृतीया-कथा.'' हे पुस्तक मुंबईचे श्री. स. वि. ऊर्फ नाना जोगळेकर यांनी प्रकाशित केले होते. हे पुस्तक श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांना अर्पण करण्याचा समारंभ श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांच्या शुभ हस्ते झाला.

मामांच्या नित्य कीर्तनाचा त्रितपमहोत्सव इ. स. १९६० साली यथासांग पार पडला. या साली मामांचे वय बाहत्तर वर्षांचे होते. इतक्या दीर्घ आयुष्यात मामांच्या शरीरात अनेक व्याधि शिरून तेथेच वसति करून राहिल्या होत्या. मामांना रक्तदाबाचा विकार होता, मधुमेह होता, आणि अस्थीमधील क्षयरोग होता. मामा मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास कडक पथ्य पाळीत. या सर्व रोगांचा परिणाम मामांचेवर झाला होता आणि त्रितपमहोत्सवाचे काळी मामांची प्रकृति अगदी बेतास बात झाली होती. त्रितपमहोत्सव संपला आणि मामांची प्रकृति भराभर खालावतच गेली.



त्यातच पुढे मूत्रपिंडातील कर्करोगानेही मामांना पछाडले होते. इतके रोग व त्यांचा त्रास होत असताना एकादा सामान्य मनुष्य केव्हाच खचून गेला असता. परंतु मामांची गोष्टच वेगळी होती. ''मला काही त्रास होत नाही'' असे ते सांगत. आणि हे सांगताना त्यांचे मुख प्रसन्न असे. त्यांचा कीर्तन करण्याचा उत्साहही कमी झाला नव्हता.

किती झाले तरी रोज कीर्तन करावयाचे म्हटल्यावर शरिराची साथ ही आवश्यकच होती. पण मामांचे थकलेले शरीर हे साथ देण्यास असमर्थ ठरू लागले. त्यामुळे हळुहळु नेहमीप्रमाणे खुर्चीत बसून कीर्तन करणे हेही त्यांना जमेनासे झाले. तेव्हा जमिनीवर पसरलेल्या गादीवर बसून आणि भिंतीला टेकून मामा कीर्तन करू लागले. आणि कीर्तनापूर्वी व नंतर मामा त्या गादीवरच लवंडत असत. निर्याणापूर्वीच्या आदले दिवशीच्या रविवारी तर मामांना गादीवर बसूनही कीर्तन करणे जमेना; तेव्हा त्या दिवशी गादीवर झोपलेल्या स्थितीतच मामांनी कीर्तन केले. शरीराची कितीही विकलांग स्थिति झाली तरी आपला नित्य कीर्तन करण्याचा नेम चुकवावयाचा नाही असा मामांचा दृढ निर्धार आणि निश्चय होता. ''मामा, आता कीर्तन बंद करून तुम्ही विश्रांति घ्या,'' असे जर कुणी मामांना सुचविले तर मामा तत्काळ उत्तर देत,'' काहीही होवो. मी मरेपर्यंत कीर्तन करण्याचे सोडणार नाही.'' आणि हे शब्द मामांनी खरे करून दाखविले. इ. स. १९६२ च्या माघ महिन्यात मामांनी देह ठेवला. आणि एका दृष्टीने मामांच्या ''मरणाचा सोहळाच'' झाला असे म्हणावे लागते. माघ शुद्ध सप्तमी इ. स. १९६२ या दिवसापासून मामांच्या मरणाचा सोहळा सुरु झाला.

माघ शुद्ध सप्तमीचे दिवशी संध्याकाळी मामांचे नित्याचे कीर्तन झाले. त्यानंतर का कोण जाणे मामांनी आणखी एक कीर्तन केले. हे कीर्तन संपता संपताच मामांना बेसुमार ताप भरला. रात्रभर मामा तापाने फणफणत होते. दुसरे दिवशी माघ शुद्ध अष्टमी, दिवस रविवार. रविवारी सबंध दिवस मामांचा ताप उतरलाच नाही. या रविवारीच श्रीदादांनाही फ्लूचा ताप आला. स्वत:च्या अंगात ताप असतानाही श्रीदादा काही काळ मामांचे जवळ येऊन, मामांच्या कपाळावर हात फिरवीत बसले. त्यांनी काही वेळ मामांचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले. त्यावेळी श्रीदादांना मामांच्या नयनांत चमकणारे नील

तेज दिसले. श्रीदादांना तापामुळे जेव्हा अगदीच बसवेनासे झाले, तेव्हा मामांचे जवळून उठून ते आपल्या अंथरुणावर जाऊन झोपले.

रविवारी डॉक्टरांना घरी बोलावण्यात आले होते. ते औषधे, इंजेक्शने यांचे प्रयोग करीत होते. रविवारी संध्याकाळी ५ ही मामांच्या नित्य कीर्तनाची वेळ झाली. आजही मामांनी गादीवर झोपूनच कीर्तन केले. कीर्तन संपल्यावर मामांनी मौन धारण केले. रात्री बाराचा सुमार झाला. मामांच्या शेजारी स. वि. जोगळेकर जागत बसून होते. अचानक मामांनी त्यांना विचारले,''नाना, आज वार कुठला?'' ''रविवार'' असे नाना जोगेळेकरांनी उत्तर दिले. त्यावर ''आनंदू रे की परमानंदू रे'' हे पद म्हणण्यास मामांनी प्रारंभ केला. पद संपल्यावर मामांनी पुन: मौन धारण केले. रविवारची रात्र संपली. सोमवार उजाडला. हा सोमवार म्हणजे माघ शुद्ध नवमीचा दिवस.

श्रीमामांची प्रकृति फारच खालावली आहे हे कळल्यावर, सकाळपासूनच लोकांनी मामांचे दर्शन घेण्यास दाटी केली. सकाळी डॉक्टरही आले. त्यांनी मामांना तपासले. मामा जगतील अशी कोणतीही आशा त्यांना दिसली नाही. कारण सकाळपासूनच मामांच्या नाड्या सुटल्या होत्या. ''दुपारी २ वाजेपर्यंत आम्हाला बोलावू नका. तोवर आहे तोच उपचार चालू दे,'' असे मामांच्या जवळील मंडळींना सांगून डॉक्टर निघून गेले. त्यांचा होरा होता की दुपारी दोनपर्यंत श्रीमामा तग धरू शकणार नाहीत.

दुपारचे दोन वाजले. मामा आहेत तसेच होते. तेव्हा डॉक्टरांना बोलावण्यात आले. ''मामा अजून आहेत,'' हे ऐकल्यावर चकित झालेले डॉ. फडणीस आले आणि म्हणाले,'' हे अघटितच झाले.'' डॉक्टर दुसरे काय म्हणणार ? याच सुमारास कान्हेरे बुवा मामांचे दर्शन घेण्यास आले होते. त्यांना मामांच्या डोळ्यात निळी ज्योत दिसली.

मामा आहे त्या स्थितीत असतानाच संध्याकाळचे पाच वाजले. मामांच्या नित्य कीर्तनाची वेळ झाली. यावेळी लोक ''जय जय श्रीराम जय जय श्रीराम'' हे भजन म्हणत होते. घड्याळात पाचचे ठोके पडले. मामांनी ताडदिशी डोळे उघडले. त्यांच्या डोळ्यात तेज चमकले आणि ''श्रीराम जयराम जयजयराम म्हणा'' असे मामा मोठ्यांदा म्हणाले. हा मंत्र मामांचा



आवडता होता आणि तोच उच्चारून मामांनी आपले रोजचे कीर्तन केले. कारण नामाचे स्मरण हेच उत्तम कीर्तन आहे. नंतर मामांनी पुन: डोळे मिटून घेतले. मामांचे शरीर विकल झाले होते. पण मन मात्र नामस्मरणात जागृत होते. मामांच्या अंत:करणात नामस्मरणच आहे, हे त्यावेळी सर्व उपास्थितांना कळून आले.

मामांचे नामस्मरणरूप नित्याचे कीर्तन झाले. या वेळी श्रीदादा तापाने झोपून असल्यामुळे, लौकिकात श्री. वासुदेवराव जोशी यांनी कीर्तन केले. त्यांचे कीर्तन संपताच, उपस्थित असणाऱ्या सर्वांनी ''श्रीराम जयराम जय जय राम'' या महामंत्राचा घोष पुन: सुरू केला. हळुहळु रात्रीचे ११.५० झाले आणि मामांचे इहलोकीचे जीवन संपले. त्यांची आत्मज्योत परमात्मज्योतीत मिळून गेली. दुसरे दिवशी मंगळवारी सकाळी श्रीदादांचे हातून मामांचे और्ध्वदेहिक संस्कार पार पडले.

मामांच्या संपूर्ण जीवनाचे सार गोविंदचरितमानस (१.१६५) या ग्रंथात श्री. न. दा. दिवेकर यांनी असे सांगितले आहे :-

''अखंड ध्यान श्रीरामाचे । अखंड पूजन श्रीरामाचे । अखंड कीर्तन श्रीरामाचे । हेचि गोविंद चरित्र ।।'' तर अमृतवाणी या ग्रंथात (पृ. २६) प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी लिहितात ''या चिमड संप्रदायात आपल्या अखंड कीर्तन भक्तीने श्रीमामा हे 'चिन्मयाची ज्योत' ठरले.''

मामांच्या निर्वाणामुळे श्रीदादांचे पितृछत्र हरपले. ज्या मामांनी श्रीदादांचे लाड केले, ज्या मामांनी श्रीदादांचा प्रेमाने प्रतिपाळ केला, ज्या मामांनी श्रीदादांच्या वचनास मान दिला होता, ज्या मामांनी श्रीदादांचे ''राम-स्वरूप'' जाणले होते, जे मामा श्रीदादांना ''घरात वावरणारा रामप्रभु'' असे म्हणत, ते मामा लौकिक अर्थाने श्रीदादांना सोडून गेले. लौकिक दृष्ट्या श्रीदादा पोरके झाले. श्रीदादांच्यावर पितृवियोगाचा घोर प्रसंग कोसळला. श्रीदादांचे सांत्वन करण्यास अनेक लोक येऊन गेले.

आपल्या निर्वाणानंतर आपली नित्य कीर्तनाची परंपरा श्रीदादांनी चालू ठेवावी असे मामांनी श्रीदादांना पूर्वी अनेकदा सांगितले होते. आणि ते श्रीदादांनी मान्य केले होते. त्याप्रमाणे श्रीदादांनी नित्य कीर्तनाची धुरा

आपल्या खांद्यावर घेतली आणि आपली वाटचाल सुरू केली. मामांचे निर्वाणाचा दु:खद प्रसंग कोसळला असतानासुद्धा श्रीदादांनी मनातील दु:ख बाजूला ठेवले आणि मामांच्या निर्वाणाच्या दुसरे दिवसापासूनच म्हणजे माघ शुद्ध दशमी, इ.स. १९६२ पासून श्रीदादांनी नित्यकीर्तन-परंपरेचे आपले पहिले कीर्तन केले. आणि अशा प्रकारे इ.स. १९६२ सालच्या माघ शुद्ध दशमी पासून श्रीदादांचे नित्य कीर्तन सुरू झाले.

卐卐卐卐卐

### प्रकरण ८ : संदर्भ


१) केशवलिखित दासराम चरित्र टिप्पणे
२) दीपलक्ष्मी विशेषांक, पृ.१३-१४
३) कैवल्यविधि, प्र.र.ह. कोटणीस, सांगली, १९५७, मा. सुकथनकरांचे भाषण, पृ. ६.
४) दासरामगाथा, पृ.१३६,१३७.
५) कैवल्यप्रसाद.
६) भा.द.लिमये, नया पैसा पुस्तकालय पुस्तक, विश्वमानवी दीपमाला,पहिला दीप, पृ.३.
७) गोविंद चरित मानस, १.१६५
८) अमृतवाणी, गो. अ.केळकर, सांगली, १९८१, पृ.२६
९) दासरामगौरवग्रंथ.


### प्रकरण ९

# श्रीदादांची नित्यकीर्तन निष्ठा

(इ.स. १९६२ ते १९७०)

मामामहाराजांच्या निर्याणानंतर त्यांच्या पत्नी इंदिराबाई यांना फार मोठा धक्का बसला. ''आपल्या पतीचे अगोदरच आपणास अहेवपणी मरण यावे'', अशी आपली इच्छा त्या बरेच वेळा आपल्या पतीजवळ बोलून दाखवीत असत. त्यावर श्रीमामा त्यांना सांगत, ''अग, तसे होणार नाही. मी तुझ्या अगोदर जाणार आहे. त्यानंतर तुला थोडी कळ सोसावी लागेल.'' मामांची ही भविष्यवाणी खरी ठरली. ही पूर्वकल्पना जरी इंदिराबाईंना होती, तरी मामांच्या निर्याणानंतर त्यांनी चांगलीच हाय खाल्ली. मुळात त्यांचे जेवणखाण कमीच होते. ते आता आणखी कमी कमी होऊ लागले. आणि त्यांचीही प्रकृति खालावतच चालली. या स्थितीतही तुकाराममहाराजांचे बारा अभंग म्हणण्याचा क्रम त्यांनी खंडित होऊ दिला नाही.

मामांच्या निर्याणानंतर त्यांची दृश्य स्मृति रहावी या हेतूने श्रीदादांनी मामांचे नावे एक सिंहासन स्थापन करण्याचे ठरविले. कोल्हापूरच्या एका शिल्पकाराकडून काळ्या पाषाणाचे एक वृंदावनवजा सिंहासन श्रीदादांनी करवून घेतले. सिंहासनाचे वरचे बाजूस निंबरगीकरमहाराजांचे नावाची पिंडी आणि मामांच्या पादुका आहेत. दर्शनी भागावर मामांनी अखंड ३८ वर्षे नित्य कीर्तन केले इत्यादि मजकूर कोरलेला आहे. राममंदिरात मामा ज्या ठिकाणी बसून कीर्तन करीत त्याच स्थळी या सिंहासनाची स्थापना केली गेली. ''मामांच्या सिंहासनाची प्रतिष्ठापना रथसप्तमी दिवशी (सन १९६३) करण्यात आली असून, त्याच्या प्रतिष्ठापना सोहळ्याचे वेळी आरती चालू असताना, समाधीतून (= सिंहासनातून) एका अभंगाच्या पंक्ति बाहेर पडल्या : नामरूप भगवान । माझा नामरूप भगवान ।। नामरूप सद्गुरू कृपा करी । नामचि वरती महान ।। नामचि साधन नामचि कीर्तन । नामाविण नच ज्ञान ।। पंथही नामची प्राप्तिही नामचि । दासा तेच प्रमाण ।।'' असा चमत्कार श्री. प्रकाश भावे यांनी आपल्या अखंड कीर्तनानंद (पृ.१५२) या ग्रंथात नोंदवून ठेवला आहे. हे सिंहासन इंदिराबाईंनी आपल्या डोळ्यांनी पाहिले व त्या सिंहासनावरून आपला हात हळुवारपणे

फिरवून त्यांनी मामांच्या स्पर्शाचे सुख घेतले. त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रु ओघळू लागले.

या सिंहासनाच्या प्रतिष्ठापनेनंतर त्या सिंहासनाची रोज पूजा-अर्चा करण्याचा क्रम श्रीदादांनी सुरू केला.

मामांचे एक निष्ठावंत भक्त श्री. न.दा. दिवेकर नावाचे होते. त्यांनी मामांचे एक ओवीबद्ध चरित्र लिहिण्याचे ठरविले, आणि ते काम त्यांनी स्वयंस्फूर्तीने सुरू केले. या चरित्राला त्यांनी गोविंदचरितमानस असे शीर्षक दिले. मामांना १३ हा आकडा फार आवडे. म्हणून दिवेकरांनी या चरित्राचे तेरा अध्याय रचले होते. चरित्र पूर्ण झाल्यावर त्यांनी ते श्रीदादा आणि इंदिराबाई यांना वाचून दाखविले. चरित्र ऐकल्यावर इंदिराबाई व श्रीदादा यांच्या डोळ्यांत अश्रु आले.

इंदिराबाईंची प्रकृति फारच खालावत चालली होती. ''आता मला जगण्याची मुळीच इच्छा राहिली नाही,'' असे त्या वरचेवर म्हणत. तेव्हा श्रीदादा त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत.''आई, तू मला हवी आहेस'', असे श्रीदादा त्यांना पुन:पुन: सांगत. पण इंदिराबाईंच्या मनावर त्याचा काहीही परिणाम होत नसे. अखेर मामांच्या निर्वाणाला एक संवत्सर पूर्ण होण्यापूर्वीच, माघ शुद्ध चतुर्थी, शके १८८४ (इ.स. १९६३) रोजी दुपारी ३-५० च्या सुमारास, तुकाराममहाराजांचे बारा अभंग उच्चारीत इंदिराबाईंनी देह ठेवला. आईच्या मृत्यूने श्रीदादांना परमावधीचे दुःख झाले. ते तात्पुरते बाजूला सारून, श्रीदादांनी त्या दिवशीचे नित्य कीर्तन पार पाडले.

मामामहाराजांचे तेरा अध्यायी चरित्र छापण्यास गेलेले होते. त्याचवेळी इंदिराबाईंनी देह ठेवल्यामुळे, इंदिराबाईंची थोरवी गाणारा एक ओवीबद्ध अध्याय दिवेकरांनी रचला आणि तो मामांच्या चरित्रात चौदावा अध्याय म्हणून जोडून दिला. अशा प्रकारे मामा-मामींचे, पति-पत्नींचे, इंदिरा-गोविंदांचे जोडचरित्र ''गोविंद-चरितमानस'' या नावाने, मामांचे एक भक्त श्री. स. वि. जोगळेकर यांनी इ.स.१९६३ मध्ये मुंबई येथून प्रकाशित केले.

पितृवियोगानंतर अल्प काळातच श्रीदादांना मातृवियोग झाला. पितृछत्रानंतर त्यांचे मातृछत्रही हरपले. श्रीदादांची आपल्या मातापित्यांवर फार



भक्ति होती, त्यामुळे त्यांचा वियोग हा श्रीदादांना सतत जाणवणारा होता. लौकिक दृष्ट्या हे दोन्ही वियोग श्रीदादांना फार शोकदायक होते. पण हा शोकही श्रीदादांनी आवरून घेतला आणि आपले पारमार्थिक कार्यक्रम तसेच नित्याचे कीर्तन चालूच ठेवले.

आपल्या देहावसानानंतर श्रीदादांनी पाच मिनिटे का होईना कीर्तन करून नित्य कीर्तनाची परंपरा चालू ठेवावी, ही मामांची आज्ञा शिरसावंद्य मानून श्रीदादांनी माघ शुद्ध दशमीपासूनच आपले नित्याचे कीर्तन सुरू केले होतेच. परंतु तेवढ्यावरच न थांबता, मामा जे काही कीर्तनाखेरीज अन्य दैनिक कार्यक्रम करीत, तेही करण्यास श्रीदादांनी प्रारंभ केला. जसे :- सकाळची देवपूजा, दासबोधातील नामाच्या समासाचे पठण, व आरती; दुपारी कीर्तनापूर्वीची पोथी; कीर्तनानंतर पंचपदी. मामा नैमित्तिकपणे रामायण आणि गुरुचरित्र यांचे वाचन करीत. तेही श्रीदादांनी सुरू केले. खेरीज पूर्वीप्रमाणेच आराधना, रथ, पालखी हे प्रासंगिक कार्यक्रमही श्रीदादा पार पाडीत. या प्रासंगिक कार्यक्रमांत मामांची जयंती हा एक कार्यक्रम असे. मामांची शरयू उपळावीकर नावाची एक शिष्या होती. तिने मामांचा पाळणा रचला होता. मामांच्या जयंतीच्या कीर्तनात श्रीदादा शरयूला हा पाळणा म्हणावयास सांगत. तीही गोड सुरात हा पाळणा म्हणीत असे. हा पाळणा असा आहे :-

जो जो जो जो श्री गोविंद । तव नामी आनंद ॥ध्रु॥
प्रेम पालख हलविता । कृपा करा गुरुनाथा ॥१॥
हृदय पाळणा भक्तीचा । तो हा गुरुनामाचा ॥२॥
उन्मनी प्रगटले गोविंद । निजसुख परमानंद ॥३॥
कीर्तन भक्तीसी अवतार । नाम हे जगदोद्धार ॥४॥
गुप्त राखियला अधिकार । असोनी स्वरूपाकार ॥५॥
राधा सुपुत्र अविनाशी । शरयू हृदयनिवासी ॥६॥

वर सांगितलेल्या नित्य, नैमित्तिक आणि प्रासंगिक कार्यक्रमांच्या जोडीने श्रीदादांनी पुढील नवीन कार्यक्रम सुरू केले :- कीर्तनोत्तर पंचपदीपूर्वी मामांच्या रामपाठ ग्रंथाचे पठण. साधकाने त्रिकाल साधन करावे या निंबरगीकरमहाराजांच्या वचनाला अनुसरून त्रिकाल साधनाला बसण्याची पद्धत श्रीदादांनी सुरू केली. तसेच मामामहाराजांच्या वार्षिक पुण्यतिथीला, मामांचे

श्राद्ध झाल्यावर, जमलेल्या भक्तांना महाप्रसाद देण्याची प्रथा सुरू केली. त्यानंतर त्याच रात्री मामांच्या आराधनेचे कीर्तन श्रीदादांनी सुरू केले.

श्रीदादांचे दैनिक नित्य कीर्तन संध्याकाळी साधारणपणे १ ।।-२ तास चाले. ''श्रीरामभाऊंनी मामांची कीर्तनाची परंपरा चालू ठेविली आहे हेच मामांचे खरे स्मारक होय,'' असे गोविंद चरितमानसचे प्रकाशक स.वि.जोगळेकर लिहितात ते अगदी बरोबर आहे.

श्रीदादांचे एक भक्त शरद वामन आपटे हे निगडी-पुणे येथे रहातात. ऑक्टोबर १९६३ च्या सुमारास त्यांचेवर एक आपत्ति आली. त्यावेळी श्रीदादांनी त्यांना एक छोटेसे पिकलेले केळे प्रसाद म्हणून दिले. त्यांना काय वाटले कुणास ठाऊक त्यांनी ते न खाता तसेच ठेवून दिले. आजही ते केळे सुकलेल्या अवस्थेत तसेच आहे.

इ.स.१९६४-६५ सालची एक गोष्ट आहे. श्रीदादांना एकदा एक स्वप्न पडले. स्वप्नात भजन करीत आकाशातून खाली उतरणारी संतमंडळी आणि त्यांचे पुढे विठोबा असे दृश्य श्रीदादांना दिसले. नंतर विठोबा श्रीदादांच्या पुढे येऊन उभा राहिला. श्रीदादांनी त्याला नमस्कार केला. तेव्हा विठोबा श्रीदादांना बोलला, ''रामा, या कलियुगात जाधव नावाच्या कुळात, साताऱ्याकडच्या बाजूला मी अवतार घेणार आहे. तत्पूर्वी तुला दर्शन द्यावे म्हणून मी आलो आहे.'' हे ऐकताच हर्षभरित होऊन श्रीदादांनी पुन: एकदा विठोबा व अन्य संतमंडळी यांच्या पायांवर मस्तक ठेवले.

चिमड मठाचे अधिपति नारायणमहाराज यरगट्टीकर यांनी इ.स.१९६५ मध्ये माघ शुद्ध दशमीस निर्वाण केले. तत्पूर्वी ते आजारी होते. त्यांच्या आजारपणात श्रीदादा त्यांच्या दर्शनास गेले होते. तेव्हा नारायणमहाराजांनी प्रश्न केला ''रामभाऊ, रोज कीर्तन चालू आहे ना ?'' यावेळी नारायणमहाराजांचे जवळ त्यांचे मेहुणे श्री. बेळगली हे उभे होते. हे अनेकदा श्रीदादांच्या कीर्तनास येत. त्यांनी नारायणमहाराजांना सांगितले, ''बापूराव केळकर गेल्यानंतर दुसरे दिवसापासूनच रामभाऊंनी नित्य कीर्तन सुरू केले आहे.'' ते ऐकताच नारायणमहाराज बोलले, ''रामभाऊ, असेच कीर्तन चालू ठेवा.'' नंतर नारायणमहाराजांनी आपले चिरंजीव पंडितराव यांना



एक नारळ श्रीदादांचे ओट्यात घालण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंडितरावमहाराजांनी आरती करून, श्रीदादांचे ओट्यात नारळ घातला. श्रीदादांनी नारायणमहाराजांचे चरणांवर मस्तक ठेवले. त्यावेळी नारायणमहाराजांनी श्रीदादांचे पाठीवरून हात फिरवला. अशा प्रकारे त्यांनी श्रीदादांचे कौतुक केले.

मामांची नित्यकीर्तनाची निष्ठा तावून सुलाखून निघालेली होती. श्रीदादांच्या कीर्तननिष्ठेचीही अशीच परीक्षा झाली; त्यांच्या कीर्तननिष्ठेचा कस लागला. शनिवार दि.११-३-६७ पासून श्रीदादांना ताप येऊ लागला. शनिवारी रात्री ३-३।। डिग्री ताप होता. रविवार दि. १२-३-६७ रोजी दुपारी ३ डिग्री ताप होता. दुपारी ३-३।। चे सुमारास ताप थोडा कमी होऊन १।। डिग्री ताप झाला. संध्याकाळचे ५-५।। वाजले. श्रीदादांच्या कीर्तनाची वेळ झाली. तेवढ्यात कुणीतरी म्हणाले, ''आज चंद्रशेखर (= श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव) कीर्तन करतील. श्रीदादा विश्रांति घेतील.'' हे ऐकताच श्रीदादा म्हणाले, ''तसे का बरे ? मी द्राक्षे खातोय, कॉफी पितोय, आणि मला कीर्तन तेवढे नको काय ?'' ते पुढे म्हणाले, ''मी कीर्तन करणार. फार तर फार वेळ करणार नाही. फक्त १५ मिनिटे कीर्तन करीन.'' श्रीदादांच्या कीर्तनास प्रारंभ झाला. नमन संपता संपता श्रीदादा घाम पुसताना दिसू लागले. बरोबर ६। ते ७ पर्यंत पाऊण तास श्रीदादांनी कीर्तन केले. कीर्तन संपल्यावर पुन: ताप पाहिला तो १।। डिग्री ताप होता.

या दिवशी अंगात ताप असल्याने श्रीदादांनी थातुरमातुर बोलून वेळ काढला असे मात्र झाले नाही. त्यांच्या कीर्तनातील विषयाच्या नेहमीच्या पातळीला धरूनच वरील १२-३-६७ चे कीर्तन झाले. श्रीदादा कीर्तनात म्हणाले, ''ज्याच्यामुळे ज्ञान व अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान , आणि त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान. 'ज्ञान म्हणजे काय आपणा जाणणे;' अशा या ज्ञानाचा परिणाम काय होतो? तर 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत;' जे जे दिसते ते ते सर्व ब्रह्मरूपच दिसते. 'गुरुकृपेचे हे वर्म । जग देखे परब्रह्म।।' नामामुळे स्वत:चे अस्तित्व कळून येते. उपाधीमधे स्वत:चे अस्तित्व शोधावयास जावयाचे नाही. मणि बाजूला सारले की आतले सूत दिसते. तसे देहाची उपाधि बाजूला सारली की आपले अस्तित्व कळून येते. आणि त्या अस्तित्वाचे ज्ञान हेच खरे ज्ञान.''

श्रीदादांच्या कीर्तननिष्ठेची कसोटी पाहणारे आणखी काही प्रसंग पुढील

काळातही घडले. त्यांचा येथेच थोडक्यात निर्देश करणे उचित होईल :- श्रीदादांना मूळव्याध झाली होती. इ.स. १९७९ च्या ऑगस्ट महिन्याच्या उत्तरार्धात तर श्रीदादा मूळव्याधीने अतिशय हैराण झाले होते. उठणे, चालणे, बसणे इत्यादि क्रिया त्यांना त्रासदायक होत होत्या. तरी चुळबूळ करीत का होईना श्रीदादा खुर्चीत बसून कीर्तन करीत. पुढे काही काळाने श्रीदादांना मधुमेह त्रास देऊ लागला. त्यांना वरचेवर लघुशंकेला जाण्याची पाळी येऊ लागली. कीर्तनाचे वेळी असे होई. पण श्रीदादा न कंटाळता बाहेर जाऊन येत व कीर्तन चालू ठेवीत. दरम्यानच्या काळात कीर्तनात भजन केले जाई. यानंतर काही काळाने डोळ्यांतील मोतीबिंदूच्या ऑपरेशनसाठी श्रीदादांना दवाखान्यात रहावे लागले. त्या वेळी त्यांनी दवाखान्यातच आपले नित्याचे कीर्तन केले. पुढे अस्थिभंगाच्या उपचारासाठी श्रीदादांना दोनदा हॉस्पिटलमध्ये रहाण्याची पाळी आली. त्या वेळी त्या दवाखान्यातच पलंगावर झोपलेल्या स्थितीत श्रीदादांनी कीर्तन केले. या हॉस्पिटलमध्ये झालेल्या कीर्तनाचे वेळी श्री. सदुभाऊ साळुंखे, श्री. प्रकाश भावे, श्री. व्ही. के. कुलकर्णी, श्री. संदीप रेगोडकर, श्री. रेगोडकर, अशी मोजकी मंडळी उपस्थित असत.

उन्हाळ्यातील १७ एप्रिल १९६७ चा दिवस. या दिवशी फारच उकाडा होता. म्हणून श्रीदादा त्या दिवशी रात्री आपल्या घराच्या पडवीत झोपले होते. रात्री श्रीदादांना जाग आली. तोच समोरच्या घराच्या छपराइतक्या उंचीवरून गरुडाच्या आकाराचे, चकचकीत प्रकाश असणारे विमान जाताना श्रीदादांना दिसले.

मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या मराठी संशोधन पत्रिकेत मुद्रित झालेले 'मुद्राक्रम' हे प्रकरण प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदादांचे निदर्शनास आणून दिले. आणि हा ग्रंथ साधकांना उपयोगी पडण्यासारखा असल्याने यावर श्रीदादांनी टीका लिहावी असे सुचविले. श्रीदादांना हा ग्रंथ आवडला. त्यांनी या ग्रंथावरची टीका एका दिवसात लिहून पूर्ण केली. त्यानंतर श्रीदादांना आपल्या घरच्या पारमार्थिक ग्रंथसंग्रहात 'मुद्राप्रकरण' नावाचा ग्रंथ आढळला. त्यांनी तो 'मुद्राक्रम' या ग्रंथाशी ताडून पाहिला व त्यातले जे पाठभेद आणि ओव्या चांगल्या वाटल्या त्यांचाहि अंतर्भाव करून ''ज्ञानदेव मुद्राप्रकाश'' हा ग्रंथ सिद्ध केला व आपल्या टीकेला साधनमुद्रा हे नाव दिले. साधनमुद्रा या टीकेच्या



प्रास्ताविक भागात श्रीदादा लिहितात :- ''केशवामुळे घडली सेवा । हा ज्ञानेशांचा ठेवा । अध्यात्माचा प्रसाद मेवा । आनंदरुप ।।'' आणि या टीकेच्या समारोपात श्रीदादा म्हणतात :- ''केशवाचिया बोली । सहज सेवा घडो आली । चित्तवृत्ति आकळिली । मुद्राक्रमाने ।।''

मुद्राप्रकाश ग्रंथावर ''अभिप्रायात्मक आशीर्वाद'' देताना योगिराज श्रीगुळवणीमहाराज लिहितात, ''हा ग्रंथ विशेष मननीय आहे. विशिष्ट ज्ञात्याकडून या मुद्राप्रकारांचे नि:संदिग्ध ज्ञान संपादून, त्यास प्रयोगाने सिद्ध करू शकणाऱ्या साधकालाच या ग्रंथातील वर्णनाचे यथार्थत्व पूर्णपणे कळून येणारे आहे.''

हा मुद्राप्रकाश ग्रंथ मामामहाराजांचे पुण्यतिथि पर्वकाळी स.वि.जोगळेकर यांनी माघ शुद्ध अष्टमी शके १८८९, दि. ६-२-१९६८ रोजी प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रकाशनाचा सोहोळा श्रीदादांचे घरी झाला. त्यावेळी श्री. न. दा. दिवेकर यांनी तयार केलेले पुढील स्वागतगीत म्हणण्यात आले :-

जय जय जय साधुवृंद ।।ध्रु।।
उजळाया ज्ञानज्योत । जमले हे आज येथ ॥
विधि हरि हर जणु समस्त । नमन सत्पदा ।।१।।
प्रमुदित मन हेच कुसुम । अर्पू पदी हृदयी प्रेम ।
भाग्य आज हेच परम । संतदर्शने ।।२।।
स्वसुखास्तव यत्न सुगम । ग्रंथदीप जगी अनुपम ।
प्रकाशने धन्य धन्य । विनति तव पदा ।।३।।

श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा ''ॐकार अक्षर'' या नावाचा एक प्रदीर्घ अभंग आहे. तो श्री. त्र्यंबक हरि आवटे यांनी शके १८३० मध्ये प्रकाशित केलेल्या ''गाथापंचक'' या ग्रंथात पृ. २५३-२५९ वर छापलेला आहे. हा अभंग बराच क्लिष्ट आणि दुर्बोध आहे. या अभंगाचा सरळ अर्थ श्रीदादांनी रविवार दि. १४-४-१९६८, चैत्र वद्य प्रतिपदा, शके १८९० रोजी पूर्ण केला. त्या संदर्भात श्रीदादा लिहितात, ''प्रेरणा माऊलीची, सत्ता महाराजांची, कृपा तात्यासाहेबांची, व प्रेमवात्सल्य कै. परमपूज्य पितृदेवांचे; त्यामुळे त्यांनी या अर्भकाकरवी हा भावार्थ आपल्या कृपेने लिहून घेतला; त्यांचे अनन्य भावाने

स्मरण करून व गुरुपरंपरेला आणि गुरुपीठांना प्रणाम करून हा भावार्थ श्रीज्ञानराजमाऊलीचे चरणी समर्पण करीत आहे.'' हा भावार्थ पहिल्यांदा सिद्धगिरिसंदेश या मुंबईच्या त्रैमासिकात सप्टेंबर व डिसेंबर १९७२ साली प्रकाशित झाला. त्यानंतर त्याचे पुनर्मुद्रण इ.स.२००२ मध्ये माननीय सतीश खेडकर यांनी प्रकाशित केलेल्या ''चांगदेवपासष्टी व इतर ग्रंथ'' या पुस्तकात झाले आहे.

वेदग्रंथ हे हिंदूना पूज्य आहेत. त्यांमध्ये ऋग्वेद हा मुख्य आहे. या ऋग्वेदात 'नासदीय सूक्त' नावाचे एक लहानसे सूक्त आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हे नासदीय सूक्त फार महत्त्वाचे मानले जाते. या नासदीय सूक्तावर चिमड संप्रदायातील तत्त्वज्ञान व साधन यांना अनुसरून श्रीदादांनी भाष्य लिहावे अशी विनंति प्राचार्य ना. बा. ऊर्फ नाना पाटणकर आणि प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदादांना केली. ती श्रीदादांनी मान्य केली. परंतु ते म्हणाले, ''केशव, मला संस्कृतचे फारसे ज्ञान नाही. तू त्या सूक्ताचा मराठीत अन्वय आणि अर्थ लिहून दे. मग मी त्यावर भाष्य लिहीन.'' या सूचनेनुसार प्रा. के. वा. आपटे यांनी नासदीय सूक्तातील ऋचांचा अन्वय आणि अर्थ श्रीदादांचेसाठी लिहून दिला. त्यानंतर श्रीदादांनी त्यावर भाष्य लिहिले, व ते इ.स.१९६८ मध्ये पूर्ण झाले. इ.स.१९८० साली प्रसिद्ध झालेल्या दासरामगौरवग्रंथात जागे-अभावी हे भाष्य प्रकाशित होऊ शकले नाही. शेवटी इ.स.१९८८ मध्ये मामामहाराज केळकरांचा ''जन्मशताब्दीमहोत्सव'' साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे निमित्ताने, श्री. पां. सी. गोखले यांनी ''नासदीय सूक्त : भावार्थ'' हा ग्रंथ शनिवार दि. २७-२-१९८८, फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९०९ रोजी प्रकाशित केला.

पूर्वी एकदा पंडितमामांचे बरोबर श्रीदादा रेवणसिद्धांचे दर्शनास गेले होते. पुन: रेवणसिद्धांचे दर्शनास जाण्याचा योग श्रीदादांना प्राप्त झाला. इ.स. १९६९ च्या काळातील तिसऱ्या श्रावण सोमवारी एक स्पेशल मोटार ठरविण्यात आली. आणि प्रा. व्ही. जी. सोनार, रामभाऊ साळुंखे, अनिलप्रभु केळकर, प्रा. के. वा. आपटे यांचे सह श्रीदादा रेवणसिद्धाला जाऊन त्यांचे दर्शन घेऊन आले.



याच इ.स. १९६९ या वर्षी स्पेशल मोटारीने चिमड येथे जाण्याचा योग आला. प्रा. के. वा. आपटे, सौ. सुमन आपटे, सौ. सीतावहिनी केळकर, सौ. अंबुताई भावे, चि. गीतादेवी आपटे आणि चि. यशवंत आपटे यांना बरोबर घेऊन श्रीदादा चिमड येथील साधुमहाराजांचे दर्शनास गेले. चिमडमठापासून जवळच प्रभुस्वामीचे डोंगरावर अल्लप्रभूंचे मंदिर आहे. तेथे जाऊन सर्वांनी अल्लप्रभूंचे दर्शन घेतले. तेथे सर्वांचा फोटो काढण्यात आला.

तात्यासाहेब कोटणीसमहाराज सांगलीत काही काळ गोविंदराव पडसलगीकर यांचे वाड्यात रहात होते. तेथे ते आपली नित्याची कीर्तने करीत होतेच. याच गोविंदरावांचे नातू न. व्यं. ऊर्फ भाऊसाहेब पडसलगीकर यांनी स्वत:चे मुद्रणालय काढले होते. त्यांच्या मातोश्री सौ. रमाबाई यांनाही परमार्थाची आवड होती. त्या मामामहाराज केळकरांच्या कीर्तनास येत असत. मामांचे निर्वाणानंतर त्या श्रीदादांच्या नित्य कीर्तनास जाऊ लागल्या. त्यांना एकदा कळले की ''वायुलहरी'' हे शीर्षक असणारे श्रीदादांचे काही अभंग आहेत. ते पुस्तकरूपाने प्रकाशित करावेत अशी प्रेरणा मातोश्री रमाबाईंना झाली. ती त्यांनी भाऊसाहेबाजवळ व्यक्त केली. तेव्हा मातृभक्त अशा न. व्यं. पडसलगीकरांनी मातोश्रींची इच्छा पूर्ण करण्याचे ठरविले. आणि त्यांनी श्रीदादांचा ''वायुलहरी'' हा ग्रंथ गोकुळअष्टमी, शके १८९१, दि. ३-९-१९६९ रोजी प्रकाशित केला. इ.स. १९६९ पूर्वी काही दिवसांपासून श्रीदादा चष्मा वापरू लागले होते. वायुलहरी या ग्रंथात श्रीदादांचा चष्मा घातलेला फोटो आला आहे.

ह.भ.प. प्राचार्य सोनोपंत दांडेकर यांचे एक शिष्य प्रा. भाऊसाहेब ऐनापुरे हे नोकरीचे निमित्ताने सांगलीत रहात असत. अधून मधून ते श्रीदादांचे कीर्तनास येत असत. बुधवार दि. १५-४-७० चे रामनवमीचे श्रीदादांचे कीर्तनात ते उपस्थित होते. कीर्तन संपल्यावर श्री. बापूसाहेब देशमुख वकिल, बर्वे मास्तर, प्रा. ऐनापुरे ही मंडळी राममंदिरात बोलत बसली होती. त्यावेळी श्रीदादा प्रा. ऐनापुरे यांना म्हणाले, ''भाऊसाहेब, आज रामनवमी आहे. मामासाहेब दांडेकरांनी तुम्हाला करावयास सांगितलेला मंत्रजप तुम्ही आज रामनवमीपासून करण्यास सुरवात करा. तुम्ही तो अद्यापि सुरू केलेला नाही. म्हणून मी मुद्दाम तुम्हाला आठवण करुन देतोय. मामासाहेबांनी कोणता जप

करण्यास तुम्हाला सांगितले आहे, हे तुम्ही मला कधी सांगितले नाही. पण त्यांनी तुम्हाला कोणता मंत्र जपण्यास सांगितले आहे हे मला माहीत आहे. 'रामकृष्ण हरि' या मंत्रातील कृष्ण आणि हरि हे शब्द सोडून उरलेल्या ''राम''चा जप करण्यास प्राचार्य दांडेकरांनी तुम्हांस सांगितले आहे. होय ना?'' ''होय'', असे प्रा. ऐनापुरे म्हणाले. ते पुढे म्हणाले, ''दादा, आजपासून मी या मंत्राचा जप सुरू करीन.''

सांगलीहून कोल्हापूरला जाण्याच्या रस्त्यावर हातकणंगले हे गाव आहे. या गावापासून काही अंतरावर ''रामलिंग'' नावाचे शंकराचे स्थान एका डोंगरावर आहे. दि. १८-४-१९७० रोजी चैत्र शुद्ध द्वादशी होती. हा दिवस म्हणजे निंबरगीकरमहाराजांच्या आराधनेचा दिवस. या दिवसाचे अगोदर मुंबईच्या सौ. सनुताई बर्वे या आपल्या राजाभाऊ या पतीसह सांगलीस आलेल्या होत्या. वरील दिवशी त्यांनी श्रीदादांना रामलिंगला नेण्याचे ठरविले. त्यांनी एक स्पेशल मोटार ठरविली. सौ. सीतावहिनी केळकर, चंद्रशेखर केळकर, सौ. रोहिणी, श्री. व सौ. बर्वे, सौ. सुमन आपटे, प्रा. के. वा. आपटे, कु. गीतादेवी आपटे, यशवंत आपटे, सौ. उषाताई जोशी या मंडळींचे बरोबर श्रीदादा रामलिंगला जाऊन आले. तेथे फोटो काढण्यात आला. रामलिंगला जाताना वाटेत श्रीदादा म्हणाले, ''तीर्थस्थानी जावे असे मला वाटत नाही. पण रामलिंगला जावे असे मात्र मला वाटत असे. तो योग आज आला.''

निंबरगीकरमहाराजांची आराधना दि. १८-४-१९७० रोजी होती. निंबरगीकरमहाराज सतत साधनात रमलेले असत. त्याची खूण म्हणून श्रीदादांनी ठरविले ''आज दि. १८-४-१९७० पासून निंबरगीकरमहाराजांच्या आराधनेपूर्वी रात्री ९ ।।-१० ।। या काळात साधनाचा कार्यक्रम करावयाचा.'' त्याप्रमाणे त्या दिवशी साधनाचा कार्यक्रम झाला. आणि आजतागायत हा साधनाचा कार्यक्रम चालू आहे.

卐卐卐卐卐



## प्रकरण ९ : पुरवणी १

## वायुलहरीतील तत्त्वज्ञान

वायुलहरी हे दादांच्या अभंगांचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. श्रीदादांच्या मते, वायु हेच साध्य, साधन, किंबहुना सर्व काही आहे. अर्थात हा वायु म्हणजे भौतिक जगातील जड वायु नव्हे. हा वायु चैतन्यरूप आहे. या वायूविषयी श्रीदादांनी या वायुलहरीत विवरण केले आहे, ते संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे सांगता येईल :- वायु हाच सर्वोच्च देव आहे; इतर सर्व गौण देवही वाराच आहे. ॐकार हा वायुरूप आहे (वायु तो प्रणव). वायु म्हणजेच हरि. हा वारा चैतन्याचा वारा अथवा चिद्वायु आहे. हा वायु 'निरंजन' आहे. हा वायु ''नाही हालत चालत। नाही बोलत खेळत। नाही भासत नासत। घन निश्चळ पूर्णाव्यक्त'' आहे. निश्चळ वारा म्हणजे आत्मा. त्या 'आत्मरूपाची लाट वायु हा' म्हणजे 'निश्चळी चंचळ वायुच झाला.' निश्चळ तत्त्वही वायुच आहे आणि चंचळ तत्त्वही वायुच आहे. हा वायुच 'सगुण निर्गुण होऊनी ठेला' आहे.

फार पूर्वी, जगाच्या उत्पत्तीपूर्वी 'वायूचागोळा' होता. वाऱ्यापासूनच जगाची उत्पत्ति झाली. 'वारियाने विश्व प्रगट' झाले. जगाच्या आदिअंती वारेच आहे (आदी वारे अंती ही). जग हे नामरूपात्मक आहे. आणि वाराच ''नामरूपे नटला '' आहे. हा वारा जग व्यापून आहे; 'वारा जगती भरला.' किंवा 'वारा पहाता जगी संचरला.' या जगात जे काही आहे ते सर्व वायुच आहे. हा जो वायु आहे ''तो आत्मा या जगताचा'' अशी स्थिति आहे.

जगात जीव आहेत. वारा आहे म्हणून जीव आहेत. म्हणून 'वारियाच्या संगे भांडे । रहातील काय तोंडे ' असा प्रश्न श्रीदादांनी विचारला आहे. वारा हाच जीवाचा थारा, आधार आहे. किंबहुना 'वारियाच्या हाती जीव सारे रे' असे असून ''वारा हा जीवाचा जीवन रे '' असा आहे. जीवन टिकून रहाण्यासाठी 'चित्कळा' आवश्यक आहे, आणि वायु हीच चित्कळा आहे (वायु ते चित्कळा जहाली घर्षणे). प्राण, अपान, उदान, समान, आणि व्यान या पंच प्राणांच्या द्वारा वायु हा शरीरात कार्यप्रवण असतो. या वाऱ्यावरच माणसाच्या 'मन बुद्धीचे भान'असते. किंबहुना सर्व जीव वायुरूपच आहेत. पण याचे भान जीवाला असत नाही. म्हणून त्याला सर्वत्र द्वैत भासते.

द्वैत दूर होऊन, जीव हा वायुस्वरूपच आहे, ही प्रचीति जीवाला यावयाची झाल्यास, त्याने विशिष्ट साधन करणे आवश्यक आहे. हे साधनही वायुवरच अधिष्ठित आहे. वायु हाच 'परमार्थाचे अधिष्ठान' आहे.

वायु साधनाचा संप्रदाय हाच वायु संप्रदाय होय. हा वायु संप्रदाय फार सोपा आहे. म्हणून श्रीदादा म्हणतात ''धन्य आम्ही वायुपंथी । सहज साधनाची भक्ती ।।'' वायूचे साधन हेच सहज साधन आहे. हे वायुसाधन किंवा सहज साधन म्हणजे श्वासोच्छ्वासावर लक्षाचे केंद्रीकरण होय. म्हणून श्रीदादा सांगतात:''प्राणगती वारे वहाते बाहेरी । आत जाय वैखरी अपान तो ।। प्राणापानामाजी मनाचे मीलन । परमार्थ पूर्ण तया ठाया।।'' पुढे श्रीदादा म्हणतात:- अध ऊर्ध्व गतिमान । नामगान हे साधन ।।. या मानवी देहात ''वारे हे करी झणकार । श्रीहरीचा जयजयकार । वाचा या सारुनी चार । हरिवाचे हरीचा गजर ।।'' या गतीवर लक्ष ठेवण्याची कळा साधली पाहिजे. तसे झाल्यास ''वाऱ्यावरी लागली नजर । देहभानाचा पडला विसर ।।'' अशी स्थिति होते. अशा स्थितीत,''ऊर्ध्वगामित्वाने सहस्रदलकमला। जातसे आगळा प्राणवायु ।।'' या सहस्रदळ स्थानीच वायूचा/आत्म्याचा साक्षात्कार होतो, आणि जीव जीवन्मुक्त होतो.

वायूवर दृष्टी व कान केंद्रित झाले की वायूची गति संथ संथ होऊ लागते. त्याचे असे आहे :-

सर्वसाधारण अठरा ते वीस । अंगुळे नि:श्वास गती वाहे ।।१।।
क्रोधाग्निसंतापे होता बेसुमार । छप्पन्नाचे वर गती वाहे ।।२।।
पंधरा अंगुळे नि:श्वास वहाता । तरी ये स्थिरता सहजेची ।।३।।
द्वादश अंगुळ साधनी नि:श्वास । समता चित्तास प्राप्त होय ।।४।।
एकादश अंगुळे जरी होय वहाती । तरी काव्यस्फूर्ति आत्मयाची ।।५।।
दशम अंगुळे नि:श्वास वहाता । अक्षरे देखता दृष्टीपुढे ।।६।।
नवांगुळापासुनी साधी अष्ट सिद्धी । असे त्याचा अवधी द्वयांगुळी।।७।।
एकचि अंगुळ वहाता नि:श्वास । होय नाद घोष सुस्वरेसी ।।८।।
जरी होय बंद ऐसा हा नि:श्वास । दरवळे सुवास चहू ठायी ।।९।।
ऊर्ध्वमुख होता देखे साक्षात्काार । दासराम स्थिर अलक्ष्यातू ।।१०।।

हा वाराच ''दावी सगुण निर्गुण रे.'' हा वारा आत्मानंद देतो. वायुसाधनाने सहस्रदळस्थानात आत्म्याचा साक्षात्कार झाल्यावर, 'जेथे तेथे परमेश्वर' हा अनुभव येतो.



अशा प्रकारे, चिद्वायु-स्वरूपी अशा सद्गुरूंनी सांगितलेल्या वायुअधिष्ठित साधनाने सहस्रदळातील चिद्वायूत जीवरूपी वायु मिसळून टाकणे म्हणजे परमार्थ, हे वायुलहरीचे सार आहे.

## प्रकरण ९ : पुरवणी – २

## श्रीमामा आणि श्रीदादा

व्यावहारिक जगात तसेच परमार्थातही पिता व पुत्र सारखे असतातच असा नियम नाही. आणि म्हणूनच ''संताचे आप्त नव्हती ते संत'' असे म्हटले जाते. पण या नियमाला काही अपवाद असतातच. परमार्थातही पितापुत्र सारखे असू शकतात. याचे पूर्वकाळचे ठळक उदाहरण म्हणजे कबीरसाहेब आणि कमालसाहेब. आणि आधुनिक काळात श्रीमामा व श्रीदादा हे होत.

श्रीमामा व श्रीदादा हे दोघेही साक्षात्कारी संत होते. दोघांनीही निष्ठापूर्वक नित्य हरिकीर्तन केले. श्रीमामांनी अखंड ३८ वर्षे कीर्तन केले तर श्रीदादांनी अखंड ३९ वर्षे हरिकीर्तन केले. दोघांमध्येही सांप्रदायिक संकुचितपणा नव्हता. दोघांच्या कडेही अनेक जाति-धर्माची, पंथाची, संप्रदायाची, अनेक थरातील माणसे येत. या दोघांकडेही अन्य संताची आगमने झाली होती. दोघेही प्रतिभावान्, प्रज्ञावंत असून दोघांचेही पारमार्थिक साहित्य आहे. व ते समाजाला आध्यात्मिक मार्गदर्शन करणारे आहे. श्रीदादा श्रीमामांना प्रत्यक्ष 'गोविंद' रूप मानीत तर श्रीमामा हे श्रीदादांना साक्षात् 'राम' मानीत. अशा प्रकारे ''दोन देह प्राण एक । ऐसे पितापुत्र'' असे श्री. न. दा. दिवेकर यांनी जे म्हटले आहे (गोविंदचरितमानस, ३-१४०) ते अगदी खरे आहे.

आणि म्हणूनच श्री. के. ग. जोशी (साप्ताहिक तुतारी विशेषांक पृ. २०) म्हणतात, ''परमार्थ क्षेत्रात अलौकिक कार्य करणारी प.पू. मामा व प.पू. दादा यांच्यासारखी पितापुत्रांची जोडी आढळणे अत्यंत दुर्मिळ आहे.''

असे असले तरी क्वचित् 'बापसे बेटा सवाई' अशीही उदाहरणे आढळतात. श्रीमामा व श्रीदादा या दोघांचीही चरित्रे पाहिल्यास तसेच आढळून येते. म्हणून ''बापसे बेटा दिढी'' हे म्हणणे अधिक योग्य होईल. असे क्वचितच्

असते. हे क्वचित्पण दादांचे ठिकाणी होते असे प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी जे (दीपलक्ष्मी विशेषांक, पृ. ६३) म्हटले आहे ते योग्य वाटते.

### प्रकरण ९ : संदर्भ


१) अखंड कीर्तनानंद, पृ. १५२
२) शरयू उपळावीकरचा पाळणा, फाइल ५
३) गोविंदचरितमानस
४) दीपलक्ष्मी मामामहाराज केळकर विशेषांक, पृ. ६५
५) लेजर क्रमांक ६
६) दासरामगौरव ग्रंथ
७) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, प्र. स. वि. जोगळेकर, मुंबई, आवृत्ति पहिली, ६-२-१९६८, पृ. १४, १९, प्रकाशकाचे निवेदन, पृ. १.
८) नासदीय सूक्त : भावार्थ संगतीसह, प्र. पां. सी. गोखले, सांगली, १९८८
९) वायुलहरी
१०) सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, सप्टेंबर, डिसेंबर १९७२
११) चांगदेवपासष्टी व इतर ग्रंथ, प्र. सतीश खेडकर, सांगली, २००२
१२) केशवलिखित दासराम चरित्र टिप्पणे
१३) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत, पृ. १२


## प्रकरण १०

# श्रीदादांचा मान पहिला

(इ.स. १९७१-१९७५)

श्रीमामामहाराज केळकरांना श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे विषयी फार भक्ति होती. तशीच भक्ति श्रीदादांनाही श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे बद्दल वाटत असे. आत्तापर्यंत श्रीदादांनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानदेवतेहत्तिशी इत्यादि ग्रंथावर टीका लिहिल्या होत्या. आता ज्ञानेश्वरमहाराजांच्या एका अभंगावर लिहिण्याचे श्रीदादांनी ठरविले. ''पैल मेरूच्या शिखरी'' असा प्रारंभ असणारा श्रीज्ञानेश्वर-महाराजांचा एक अभंग आहे. या अभंगाच्या अंतिम चरणात ''दत्तात्रय'' असा शब्द येतो. त्यावरून या अभंगात श्रीदत्तात्रेय यांची स्तुति आहे, असे वाटते. या अभंगावर ''श्रीदत्तस्तुतिप्रसाद'' या नावाची टीका श्रीदादांनी लिहिली. आणि ज्ञानेश्वरमहाराजांच्या ७०० व्या जयंतीचे निमित्ताने हे पुस्तक ''श्रीदत्तस्तुति'' या शीर्षकाखाली दि. १३-८-१९७१ रोजी प्रकाशित केले.

प्रत्येक गणेश चतुर्थीचे दिवशी श्रीदादांच्या घरी गणपतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. हा गणपति श्रीदादांच्याकडे पाच दिवस असतो आणि गणेश चतुर्थीच्याच दिवशी गणपतीला महाप्रसाद अर्पण केला जातो. इ.स. १९७१ सालातील गणेश चतुर्थीच्या दिवशी पुढील प्रसंग घडला :- चतुर्थीचे दिवशी गणपतीला २१ मोदकांचा नैवेद्य दाखवावयाचा होता. त्याप्रमाणे एका तबकात २१ मोदक व्यवस्थित मांडले गेले. ते तबक गणेशाच्या मूर्तीपुढे ठेऊन श्रीदादांनी नैवेद्य दाखविला. आणि आश्चर्य अगदी वर असणारा मोदक आपोआप उकलला.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या नावावर दिले जाणारे अनेक ग्रंथ आहेत. त्यामध्ये चांगदेवपासष्टी हा एक ग्रंथ आहे. योगी चांगदेव यांनी ज्ञानेश्वरमहाराजांना जे कोरे पत्र पाठविले, त्या पत्राला उत्तर म्हणजे चांगदेवपासष्टी असे मानले जाते. या ग्रंथाचे स्पष्टीकरण करण्यास श्रीदादांनी एक विस्तृत टीका लिहिली, आणि त्या टीकेला 'पासष्टी कला' हे नाव दिले. या टीकेच्या शेवटच्या काही ओव्या अशा आहेत :- ''चौदा विद्या चौसष्ट कला । जरि का प्राप्त झाल्या

सकळा । नसता परमार्थी पासष्टी कला । विकलाचि त्या ।।'' असे सांगून या टीकेच्या निमित्ताने ''या मिसे आपुली सेवा । घडविली आपण श्रीज्ञानदेवा । आपुला हा प्रसाद मेवा । आपणचि दिला आम्हांते ।।'' अशी आपली भावना श्रीदादांनी व्यक्त केली आहे. ही पासष्टी कला टीका भाद्रपद वद्य षष्ठी, शके १८८८ मध्ये समाप्त झाली. आणि पुढे ती मुंबईमधील सिद्धगिरिसंदेश या त्रैमासिकात १९७२ साली प्रकाशित झाली. त्यानंतर ही पासष्टी कला श्रीदादांचे एक निष्ठावंत भक्त मा. श्री. न. ना. गोखले यांनी ''श्रीचांगदेवपासष्टी : एक नामकळा'' या शीर्षकाखाली इ.स.१९९९ मध्ये पुस्तकरूपाने प्रकाशित केली.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांची ७०० वी जयंती ही इ.स.१९७१ तसेच इ.स. १९७२ मध्ये साजरी करण्यात आली. इ.स. १९७२ मध्ये ज्ञानेश्वरांचे नावावर असणारे नमनस्तोत्र हे श्रीदादांनी टीकेसाठी निवडले. असे सांगितले जाते की संजीवन समाधि घेण्यापूर्वी हे नमनस्तोत्र म्हणून ज्ञानेश्वरमहाराजांनी भगवान् विष्णूची स्तुति केली. ''नमन हे तारक '' आहे असा विचार करून श्रीदादांनी या नमनस्तोत्रावर सम-ओवी अशी टीका लिहिली. तिला नाव दिले ''भावार्थ नमन''. श्रीदादांनी लिहिलेले हे भावार्थ नमन श्री. किसनराव भिडे यांनी इ.स. १९७२ साली प्रकाशित केले.

श्री. किसनराव भिडे हे सांगलीतच रहात होते. त्यांचे स्नेही श्री. बाळासाहेब गोखले हे मामामहाराजांचे कीर्तनास जात असत. त्यांचे तोंडून मामामहाराजांचे मोठेपण आणि संतपण श्री. किसनरावांना कळून आले. त्यावेळी श्रीमामामहाराज विद्यमान नव्हते. म्हणून श्री. किसनराव हे श्रीदादांच्या घरी येऊन, तेथेच स्थापिलेल्या मामांच्या सिंहासनाच्या दर्शनास येऊ लागले. त्यांचे मनात मामांचे विषयी जबरदस्त श्रद्धा निर्माण झाली. अशातच इ.स. १९६९-७० मध्ये किसनराव तापाने आजारी पडले. आणि आता या तापातून आपण वाचू अशी खात्री त्यांना वाटेना. तेव्हा त्यांनी मामांचे छायाचित्र आपल्या उशाशी ठेवून घेतले आणि ते त्याला नमस्कार करू लागले. आणि मग काही दिवसांनी किसनरावांचा ताप उतरला आणि ते चांगले हिंडू-फिरू लागले. मामांनीच आपणास बरे केले अशी त्यांना खात्री पटली. ज्या मामांनी आपणास वाचविले त्यांची काही सेवा आपल्या हातून घडावी असे त्यांना वाटू लागले. मामांचे संक्षिप्त चरित्र आणि आठवणी यांचा संग्रह



पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावा अशी त्यांना स्फूर्ति झाली. आणि मग ''श्रीगोविंदस्मृति'' हा ग्रंथ सिद्ध झाला. या ग्रंथाला प्रस्तावनावजा काही शब्द श्रीदादांनी लिहिले. आणि श्रीगोविंदस्मृति हा ग्रंथ मामांच्या निर्वाण तिथीला म्हणजे माघ शुद्ध नवमीला-गोविंदनवमीला-शके १८९३, सोमवार दि. २१-१-१९७२ रोजी प्रकाशित झाला.

सौ. सीतावहिनी या इ.स. १९४२ पासून श्रीदादांच्या सहचारिणी होत्या. इ.स. १९५१ मध्ये श्रीदादांनी आपल्या नोकरीचे त्यागपत्र दिले. त्यावेळी त्यांना काय वाटले असेल हे सांगता येत नाही. तथापि आपले घरची आहे तशी स्थिति मान्य करून त्या श्रीदादांना सहकार्य देत होत्या. इ.स.१९५१ पर्यंत सौ. सीतावहीनींना तीन पुत्र झाले होते. त्यातील चंद्रशेखर व सूर्यकांत या मुलांचा उपनयनविधि इ.स.१९५५ मध्ये झाला, तर तिसरे चिरंजीव अनल यांची मुंज इ.स. १९६० साली झाली. असले समारंभ हे सौ. वहिनींच्या फार आवडीचे. केळकरांच्या घरी असणारे स्त्रियांनी वापरावयाचे सर्व अलंकार घालून, नटून थटून ज्यावेळी सौ. वहिनी असल्या समारंभात वावरत, त्यावेळी त्या साक्षात् लक्ष्मीच भासत. मामांच्या कीर्तनाचा रौप्य महोत्सव आणि त्रितपमहोत्सव यांमध्येही सौ. वहिनींनी खूप उत्साहाने काम केले. मामामहाराजांना मधुमेह होता. त्यांचे पथ्यही कडक होते. ते पथ्य सौ. सीतावहिनी काळजीपूर्वक सांभाळीत. इ.स. १९६० नंतर मामांची प्रकृति फारच खालावली. डॉक्टरांनी त्यांना अगदी मोजून मापून जेवण घेण्यास सांगितले. त्या जेवणाची व्यवस्थाही सौ. वहिनी यथासांग करीत. इ.स. १९६२ मध्ये मामामहाराजांचे निर्वाण झाले आणि पुढील वर्षी १९६३ मध्ये इंदिराबाईंचे निर्याण झाले. घरातील वडिलधाऱ्या माणसांचे छत्र हरपले. आता घराची सर्वच जबाबदारी सौ. वहिनींच्याकडे आली. कारण श्रीदादा प्रपंचाकडे फारसे लक्ष देत नसत. परंतु त्याबद्दल कोणतीही कुरकुर न करता सौ. वहिनींनी घराची सर्व जबाबदारी हसत मुखाने पत्करली आणि ती समर्थपणे पेलून दाखविली. सौ. सीतावहिनींच्या संदर्भात श्रीदादा उद्गार काढीत, ''मला आईवडिल नाहीत असे तिने मला कधी भासू दिले नाही.'' यांतच सौ. वहिनींचे मोठेपण साठविलेले आहे.

सौ. सीतावहिनी या सौ. सुमन आपटे इजवर भगिनीवत् प्रेम करीत. डिसेंबर १९७० मध्ये सौ. सुमनचे अकाली देहावसान झाले. त्यावेळी पुढे

हॉस्पिटलमधून सौ. सुमनचा देह श्रीदादांचे घरी आणण्यात आला. तिच्या शरीरावर सौभाग्यवती स्त्रीचे सर्व संस्कार सौ. वहिनींनी पार पाडले.

सौ. सीतावहिनींना इ.स. १९७२ चे सुमारास मधुमेहाचा विकार जडला. त्या औषधपाणी घेत परंतु अनेकदा घरातील रामरगाड्यात त्यांचे औषध आणि पथ्यपाणी याकडे दुर्लक्ष होई. ''मधुमेहाला'' बरोबर घेऊनच घरचा कारभार पहाण्याचे त्यांचे कार्य चालू होते. या वेळी श्रीचंद्रशेखरांचा विवाह होऊन सौ. रोहिणी ही सून त्यांच्या हाताखाली आली होती. तिच्याकडे काही कामे सोपवल्यामुळे सौ. वहिनींना थोडीफार फुरसद मिळू लागली. तेव्हा आता परमार्थाकडे अधिक लक्ष पुरवण्याचे त्यांनी ठरविले.

आपल्या पतीची-श्रीदादांची-पारमार्थिक योग्यता सौ. सीतावहिनी जाणून होत्या. म्हणून इ.स. १९७२ मध्ये त्यांनी आपले पतीकडूनच प्रत्यक्ष अनुग्रह घेतला. आणि मग पहाटे उठल्यावर साधनास बसण्याचा क्रम त्यांनी सुरु केला. नंतर सवडीने त्या श्रीगुरुलिंगगीताही वाचू लागल्या. अशा प्रकारे इ.स. १९७२ पासून सौ. वहिनी परमार्थासाठी जास्त वेळ देऊ लागल्या. रोज आपल्या पतीच्या चरणांवर मस्तक ठेवून त्या त्यांचे दर्शन घेऊ लागल्या. असे दिवस जात असताना, श्रीदादांचे संदर्भात सौ. सीतावहिंनीना जे एक दृश्य दिसले ते लक्षणीय आहे :- एके दिवशी श्रीदादा राममंदिरात बसले असताना, सौ. वहिनी त्यांना नमस्कार करण्यास गेल्या. त्यावेळी त्यांना जे दृश्य दिसले. त्याचे वर्णन असे केले गेले आहे :- ''माऊली पातली मंदिरात । दादा निमग्न अनुसंधानात । प्रकाशाचा झोत अवचित । माऊली पाही ।। प्रकाशमान कडे तेजाचे । दादांचे पाठी होते साचे । तेज:पुंज वलयाचे । फिरे सभोवती ।। सूर्याऐसा प्रखर झोत । चंद्रापरी शांत शीत । कौमुदीपरी झगझगीत । तो प्रकाश ।। ते दिव्य तेज पाहूनी । डोळे कान गेले निवुनी । गेली पूर्ण सुखावुनी । दिव्य दर्शने ।।'' (फूल चैतन्याचे, पृ. ५१-५२)

''ज्ञानाचा एका'' या वचनाप्रमाणे एकनाथमहाराज हे ज्ञानेश्वरमहाराजांचे अवतार होत. एकनाथमहाराजांचेही पारमार्थिक लेखन विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. त्यांच्या साहित्यांमध्ये ''प्रकाशदीपिका'' या नावाचे एक छोटेसे ओवीबद्ध प्रकरण आहे. परमार्थदृष्ट्या हा लघु ग्रंथ महत्त्वाचा आहे, हे पाहून श्रीदादांनी त्याचा गद्य भावार्थ लिहून काढला. तो



सिद्धगिरिसंदेश त्रैमासिकाच्या मार्च १९७३ च्या अंकात प्रकाशित झाला. हाच लेख श्री. सतीश खेडकर यांनी प्रकाशित केलेल्या चांगदेवपासष्टी आणि इतर ग्रंथ या पुस्तकात अंतर्भूत केलेला आहे.

श्रीबाबूरावजी कोटणीस हे श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे थोरले चिरंजीव. त्यांनीच श्रीदादांच्या अनुग्रहाचे दृढीकरण केले होते. श्रीबाबूरावजींनी भाद्रपद शुद्ध षष्ठी, शके १८९५ (इ.स. १९७३) रोजी निर्याण केले. प्रारंभीचे और्ध्वदेहिक संस्कार झाल्यावर काकस्पर्शाचा दहावा दिवस उजाडला. या दिवशी नदीवर काकस्पर्शासाठी पिंड ठेवण्यात आला. परंतु पिंडास काकस्पर्श होईना. श्रीदादा त्यावेळी विष्णुघाटावर गेले होते. त्यावेळी ''ती. डॉ. अण्णा कोटणीस यांनी रामभाऊ केळकर व गंगाधरराव यांना 'ही कोटणीस फॅमिली यापुढे आपणास कधीही विसरणार नाही' असे बोलून मिठी मारली. इकडे लगेच पिंडाला काकस्पर्श झाला'' (वही ८१).

भावार्थनमनासह ज्ञानेश्वरमहाराजांचे नमनस्तोत्र प्रसिद्ध झाले होते. त्याची एक प्रत श्रीदादांना शंकरमामा शिपुरकर यांचेकडे पाठवावयाची होती. श्री. नारायणराव कुंभोजकर यांचेकडे एक पुस्तक श्रीदादांनी शंकरमामांना भेट देण्यास दिले. ते घेऊन श्री. कुंभोजकर अप्पाचे वाडी येथे गेले. पुस्तक स्वीकारल्यावर, शंकरमामांनी श्रीदादांना देण्यासाठी भंडारा दिला. त्या भंडाऱ्यात नारायणरावांना एक रुपयाची नोट व चार आण्याचे एक नाणे सापडले. तेव्हा नारायणराव पुन: शंकरमामांचेकडे जाऊन म्हणाले, ''मामा, तुम्ही दिलेल्या भंडाऱ्यात सव्वा रुपया आला आहे. तो तुम्हास परत देण्यास मी आलो आहे.'' तेव्हा शंकरमामा म्हणाले, ''नारायणराव, तो सव्वा रुपाया माझा नाही. तसेच तो भंडाऱ्यात घालूनही मी काही दिलेला नाही. तो सव्वा रुपया हालसिद्धांनीच दिला आहे. तेव्हा त्या सव्वा रुपयासकट हा भंडारा तुम्ही रामभाऊ केळकरमहाराजांना प्रसाद म्हणून नेऊन द्या.'' मग नारायणरावांनी सांगलीस येऊन सव्वा रुपयासह तो भंडारा श्रीदादांना दिला.

प्रत्येक अमावस्येच्या दिवशी अप्पाची वाडी या गावी हालसिद्ध-नाथांची यात्रा भरते. हे हालसिद्ध म्हणजे रेवणसिद्धांचे अवतार होत. इ.स. १९७३ मधील श्रावण महिन्याची अमावास्या होती. तारीख होती २८-८-१९७३. या दिवशी श्रीदादा अप्पाची वाडी येथे

हालसिद्धांच्या दर्शनास गेले होते. त्यासमयी शंकरमामा शिपुरकर हे हातामध्ये भंडारा घेऊन भाकित सांगत होते. त्यावेळी तेथे शिरगुप्पीकर नावाचे एक गृहस्थ आले. त्यांना पूर्वी कॅन्सर झाला होता. परंतु दोन वर्षापूर्वी तो देवाने दया करून बरा केला होता. ते शंकरमामांना म्हणाले, ''मामा, मला काही केल्या समाधान वाटत नाही. आपण काही तर उपाय सांगा.'' तेव्हा शंकरमामांनी त्यांना सांगितले ''आश्विन महिन्यापूर्वी तू आता सांगलीस रामभाऊ केळकरमहाराजांचेकडे जा. तेथे तू जावेस म्हणूनच तुला जगविले आहे. एक लक्षात ठेव :- आता चिमड संप्रदायात रामभाऊ केळकरमहाराजांच्या शिवाय दुसरा कोणी अधिकारी पुरुष नाही. त्यांच्याकडे गेल्याने तुला समाधान प्राप्त होईल.'' पुढे हे शिरगुप्पीकर श्रीदादांच्याकडे आले आणि समाधान पावून परत गेले.

असेच आणखी एकदा श्रीदादा अप्पाचे वाडीस गेले होते. त्यावेळी मानाच्या मंडळींना ओला भंडारा लावण्याचे काम चालू होते. खरे म्हणजे शंकरमामा शिपुरकरांचा मान पहिला आहे. तथापि त्यावेळी असे झाले की शंकरमामांचे अगोदरच श्रीदादांना ओला भंडारा लावण्यात आला. ते पाहून सर्व लोक चकित झाले. तेव्हा शंकरमामा उद्गारले, ''झाले ते बरोबरच झाले आहे. कारण रामभाऊ केळकरांचा मान हा पहिलाच आहे.''

हे शंकरमामा हे गोविंदपंत घोसरवाडकरांचे द्वितीय चिरंजीव होत. शंकरमामांचे थोरले बंधु बाबूराव अण्णा. यांना श्रीदादांचे बद्दल अत्यंत आदर होता. हे बाबूराव अण्णा श्रीदादांना म्हणत, ''रामभाऊ, आमच्या अंगात देवाचा संचार कधी कधी होतो. परंतु तुमच्या अंगात मात्र देव कायमचाच संचरून राहिला आहे, असे मला तुमच्या दृष्टीवरूनच दिसून येत आहे.''

रत्नागिरी येथे डॉ. म. ना. भागवत, डी. एस्. ए. सी, हे रहात असत. ते व त्यांच्या पत्नी हे एकदा डिसेंबर १९७३ मध्ये सांगलीस श्रीदादांच्या दर्शनास आले होते. हे डॉक्टर भागवत हे स्वामी स्वरूपानंदांचे शिष्य होते. भागवत पति-पत्नी हे श्रीदादांच्या कीर्तनात उपस्थित राहिले. त्या कीर्तनात श्रीदादांनी ''सोहं'' चे विवेचन केले. सोऽहं विषयी डॉ. भागवतांच्या मनात काही शंका होत्या. त्या सर्व शंकांचे समाधान श्रीदादांच्या कीर्तनात झाले होते. कीर्तन संपल्यावर डॉ. भागवत हे श्रीदादांना नमस्कार करू लागले. तेव्हा श्रीदादांनी



त्यांना पृच्छा केली, ''डॉक्टरसाहेब, तुमच्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला मिळाली ना?'' डॉ. भागवत आनंदाने बोलले ''हो. माझे चांगले समाधान झाले.''

श्रीमामामहाराज केळकरांचे विषयी किसनराव भिडे यांना पूज्यभाव होता. ते नेमाने मामांच्या सिंहासनाच्या दर्शनास येऊ लागले. आता श्रीदादांचे घरी येऊ लागल्यावर श्री किसनराव यांना श्रीदादांचे बाबतीतही अत्यंत आदर वाटू लागला. हे किसनराव ज्ञानेश्वरीचे पठण करीत. ज्ञानेश्वरीतील विषयांचे चिंतन व्हावे या दृष्टीने ज्ञानेश्वरीतील काही ओव्यांचे संकलन करून, त्यांचा अर्थ श्रीदादांनी लिहून द्यावा, अशी किसनरावांनी एकदा श्रीदादांना विनंति केली. ती मान्य करून श्रीदादांनी ''ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र'' तयार केले. याचे जोडीनेच आणखी एक गोष्ट करण्याचे ठरले. ती म्हणजे :- श्रीदादांच्या रामनिकेतनमध्ये गेली कित्येक वर्षे नित्याने कीर्तन चालू आहे. तेव्हा ज्ञानेश्वरीत कीर्तनविषयक ज्या ओव्या आहेत त्याही एकत्र करून त्यांचाही अर्थ श्रीदादांनी द्यावा. श्रीदादांनी तसे केले. मग भावार्थासह ''श्रीज्ञानेश्वरी-नाम-संकीर्तन'' हे छोटे पुस्तक तयार झाले. ही दोन्ही छोटी पुस्तके एकत्रितपणे प्रकाशित करण्याचे किसनरावांनी ठरविले. आणि मग ही दोन्हीही पुस्तके ''श्रीज्ञानेश्वरी-चिंतन-स्तोत्र'' या शीर्षकाखाली फेब्रुवारी १९७४ मध्ये प्रकाशित झाली.

घरात असताना श्रीदादांचा काही काळ घरच्या राममंदिरात जात असे. असेच एकदा श्रीदादा राममंदिरातील मामांचे सिंहासनाजवळ बसले होते. तो दिवस होता ज्येष्ठ शुद्ध एकादशी, शके १८९६, शुक्रवार दिनांक ३१-५-१९७४. वेळ होती दुपारी २।। वाजण्याची. यावेळी श्रीदादांना एक संस्कृत भाषेतील श्लोक श्रुत झाला. तो श्लोक असा :-

हकार: प्राणनि:श्वास: सकार: सद्भिरुच्यते ।
उभयोरपि संघर्षे सोहंहंसश्च जायते ॥

या श्लोकाचा भावार्थ असा आहे :- सज्जन माणसे असे सांगतात की श्वास आत घेताना सकार म्हणजे स: असा ध्वनि होतो, आणि श्वास बाहेर सोडताना हकार म्हणजे हं असा ध्वनि होतो. आणि या दोहोंच्या एकत्रित येण्याने - स: हं (= संधि होऊन सोहं) असा ध्वनि होतो. म्हणजे श्वासोच्छ्वास करतानाच सोऽहं असा सहज ध्वनि होत असतो.

श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांचे पहिले अपत्य

एक कन्या होती. तिचे 'ज्योति' असे नाव ठेवण्यास श्रीदादांनी सांगितले. ही ज्योति म्हणजे चिन्मय ज्योति असे म्हणण्यास हरकत नाही. ती लहानपणापासून बराच काळ श्रीदादांच्या जवळ आणि त्यांच्या आगेमागे असे. श्रीदादा जेव्हा कीर्तनास आरंभ करीत, तेव्हा ज्योति हटकून श्रीदादांचे कीर्तनात येई. आणि टाळ्या वाजवून कीर्तनात येणारी भजने म्हणीत असे. तिच्याबद्दल श्रीदादांना फार आपुलकी वाटे. ज्योति ही नेहमी ''सद्गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी'' हे भजन म्हणीत असे. परंतु दैवयोग असा की ज्योतीला अकाली मृत्यूचे आमंत्रण आले. आणि दिनांक १७-१२-१९७४ रोजी तिने देह ठेवला. अंतिम क्षणी ज्योतीच्या मुखातून ''सद्गुरुनाथ माझे आई, मला ठाव द्यावा पायी'' हेच भजन बाहेर पडत होते. तिच्या मृत्यूने तिच्या आईबापांना तर शोक झालाच पण इतरेजनांनाही चांगलाच चटका बसला. कारण ती इतर माणसांचीही लाडकी होती. श्रीदादांनाही तिच्या देहावसानामुळे दुःख झाले. ज्योतीवरून सौ. सानेबाई, दत्तात्रय कुलकर्णी, प्रकाश भावे, इत्यादींनी कवने केली. सौ. सानेबाईंच्या पुढील काव्यात ज्योतीचे फार चांगले वर्णन आले आहे :-

लख लख ज्योती लखलखली । वीज आकाशी गुप्त झाली ॥१॥
पायी पैंजण झुमझुमती । हाती कंकण किणकिणती ॥२॥
तनू कोवळी सुकुमार । फूल वेणीमध्ये शोभे फार ॥३॥
बोल बोबडे गोड किती । सद्गुरु चरणी मागे वसती ॥४॥

कु. ज्योतीचे वर्णन करणारी एक आर्याही श्रीदादांना स्फुरली, ती अशी :-

हासत नाचत प्रेमे वैकुंठा पातली स्वये ज्योती ।
सद्गुरुनाथा प्रार्थुनी न कळे पायी कधीच ठेली ती ॥

सांगलीच्या कन्या महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक असणारे प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी हे आपल्या पत्नीसह इ.स. १९७४-१९७५ चे सुमारास श्रीदादांचेकडे येऊ लागले. त्यांच्या पत्नी सौ. अनुराधाताई याही मराठीच्या प्राध्यापिका होत्या. हे दोघेही आपल्या अपत्यांसह श्रीदादांच्या कीर्तनास येत व इतर वेळीही श्रीदादांचे घरी येत. गोड व सौम्य हसत हसत बोलणे आणि वागणे यांमुळे प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी हे श्रीदादांचे घरचे मंडळीत आणि अन्य भक्तमंडळीत प्रिय झाले. काही काळाने सौ. अनुराधाताई



अनुराधाताईंनी आपल्या पतीच्या साहाय्याने घोसरवाडच्या ''श्रीसिद्धमूर्ती प्राणप्रतिष्ठा'' या सोहळ्यानिमित्त एक स्मरणिका संपादित केली.

प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी हे एकनाथी भागवतावर आपल्या पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध लिहिणार होते. त्यासाठी त्यांना श्रीदादांचे मार्गदर्शन लाभले. यथावकाश हा प्रबंध तयार झाला, व प्रा. दा. वि. कुलकर्णी यांना कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाची पीएच्. डी. ही पदवी प्राप्त झाली. श्रीदादांना कौतुक वाटले. त्यांनी कीर्तनात पेढे वाटले. श्रीदादांच्या कीर्तनातच प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात श्री. संभाजीराव भिडे यांचे भाषणही झाले होते.

प्रा. सौ. अनुराधाताई कुलकर्णी यांनाही पुढे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी मिळाली. श्रीदादांनी त्यांचेही कौतुक केले, आणि कीर्तनात पेढे वाटले. आणखी काही काळाने प्रा. दा. वि. कुलकर्णी यांना शिवाजी विद्यापीठाने संशोधनासाठी गाईड (= मार्गदर्शक) म्हणून मान्यता दिली. या गोष्टीबद्दलही श्रीदादांनी आपल्या कीर्तनात आनंद व्यक्त केला. प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी व प्रा. डॉ. अनुराधाताई कुलकर्णी या पतिपत्नीबद्दल ''सिद्धमूर्ति प्राणप्रतिष्ठा स्मरणिका'' या ग्रंथात श्रीदादांनी असे लिहिले आहे :- ''या स्मरणिकेच्या संपादिका आमच्या नाथकृपांकित प्रा. डॉ. अनुराधाताई कुलकर्णी या असून त्या आमचे परमप्रिय डॉ. दा. वि. कुलकर्णी यांच्या सुविद्य पत्नी होत.''

प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचे बंधु राघवेंद्र हेही सपत्नीक श्रीदादांचेकडे येऊ लागले. ते उत्तम आर्टिस्ट होते. इ.स. १९८८ मध्ये जेव्हा श्रीदादांच्या अभंगांचा ''श्रीदासरामगाथा'' छापला गेला, तेव्हा त्याच्या मुखपृष्ठाचे सुबक काम श्री. राघवेंद्र यांनी केले.

श्रीदादांचे आजोबा अनंतरावजी हे गोंदवलेकरमहाराजांचेकडे जात असत. मामामहाराजही बुधगाव स्टेशनवर जाऊन गोंदवलेकरमहाराजांचे दर्शन घेऊन आले होते; त्यावेळी गोंदवलेकरमहाराजांनी मामांना आशीर्वाद दिला होता. मामांच्या नित्य कीर्तनात गोंदवलेकरमहाराजांचे नाव पुढीलप्रमाणे येत असे :- ''भाऊसाहेब उमदीकर, ब्रह्मचैतन्य (= गोंदवलेकरमहाराज) इत्यादि सर्व संतांनी नाम घेण्यास सांगितले आहे.'' मामांच्यावरुन श्रीदादांनी जी आरती

केली आहे त्या आरतीत असा उल्लेख आहे :- ''ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ । रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।'' श्रीदादांनाही गोंदवलेकर-महाराजांचे संदर्भात आदर होता. केळकर कुळाचा अशाप्रकारे गोंदवलेकरमहाराजांशी संबध होता ही गोष्ट श्रीमती चंपूताई गोखले यांना माहीत होती. त्या सवडीनुसार मामांच्या व श्रीदादांच्या कीर्तनास येत असत. या चंपूताई गोंदवलेकरमहाराजांच्या भक्त होत्या. भजन करताना गोंदवलेकरमहाराज ज्या चिपळ्या वापरीत त्या चंपूताईंना मिळाल्या होत्या. एकदा त्यांना वाटले की गोंदवलेकरमहाराजांच्या या चिपळ्या सुरक्षित ठिकाणी रहाव्यात म्हणून त्या चिपळ्या घेऊन त्या श्रीदादांचेकडे आल्या. व त्यांनी त्या चिपळ्या श्रीदादांचे हातात ठेवल्या. श्रीदादांनी विचारले, ''या चिपळ्या कुणाच्या आहेत ?'' तेव्हा चंपूताई म्हणाल्या, ''आपणाला सगळं माहितच आहे.'' तेव्हा श्रीदादांनी गोंदवलेकरमहाराजांचे फोटोकडे हात करुन ''यांच्या आहेत ना ?'' असे चंपूताईना विचारले. तेव्हा श्रीदादांनी बरोबर ओळखल्याचे चंपूताईना आश्चर्य वाटले व त्या होय म्हणाल्या. ''गोंदवलेकरमहाराज व त्यांचा प्रसाद आपोआप मजकडे आला,'' असे बोलून श्रीदादांनी काही काळ त्या चिपळ्या आपल्या मस्तकी धारण केल्या आणि नंतर त्या व्यवस्थित ठेवून दिल्या. त्या चिपळ्या ठेवण्यापूर्वी त्या चिपळ्यावर खालील मजकूर असणाऱ्या चिठ्ठ्या दोन्ही चिपळ्यांना चिकटविल्या :-''आषाढ शुद्ध १४ श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांच्या हातच्या चिपळ्या चंपूताईंना मिळालेल्या त्यांनी दासरामास दिल्या. १९७५.'' अशाप्रकारे चिपळ्यांच्या रूपात श्रीगोंदवलेकरमहाराज श्रीदादांच्या घरी आले.

## प्रकरण १० : संदर्भ


१) दासरामगौरव ग्रंथ, पृ.२१

२) सिद्धगिरिसंदेश, १९७२

३) गोविंदस्मृति

४) फूल चैतन्याचे, पृ. ५१-५२

५) श्रीचांगदेवपासष्टी : एक नामकळा, प्र. न. ना. गोखले, सांगली, १९९९.





६) केशव लिखित दासराम चरित्र टिप्पणे

७) वही क्रमांक १०४, ८९, ८५, ५०, १२७, ८१.

८) श्रीदासरामगाथा

९) सिद्धमूर्ती प्राणप्रतिष्ठा घोसरवाड स्मरणिका

१०) लेजर क्रमांक ६

११) श्रीदत्त स्तुती, श्रीदत्तस्तुतिप्रसाद टीकेसह, दासराम, सांगली, १९७१

१२) नमन स्तोत्र, भावार्थनमनासह, दासराम, सांगली, आवृत्ति पहिली, १९७२

१३) श्रीगोविंदस्मृति, प्र. किसनराव भिडे, सांगली, १९७२

१४) चांगदेवपासष्टी आणि इतर ग्रंथ, प्र. सतीश खेडकर, सांगली, २००२

१५) फाइल क्रमांक ४

१६) श्रीज्ञानेश्वरी-चिंतन-स्तोत्र, प्र. किसनराव भिडे, सांगली, १९७४

## प्रकरण ११

# कीर्तनात पांडुरंग नाचला

(इ.स.१९७६ - १९७९/१९८०)

श्रीदादांचे तृतीय चिरंजीव हे आता सांगली बँकेच्या नोकरीत स्थिर झाले होते. ते वयात आले असल्याने त्यांचा विवाह करण्याचे ठरले. आणि त्याप्रमाणे पुणे नगरीतील श्री. परांजपे यांच्या पद्मा नामक मुलीशी डिसेंबर १९७६ मध्ये त्यांचा विवाह झाला. या विवाहानंतर श्रीदादांनी ठरविले की आपण सर्वांनी अप्पाची वाडी येथे जावयाचे आणि हालसिद्धांचे दर्शन घेऊन परत यायचे. ठरल्याप्रमाणे घरच्या सर्व मंडळीसह श्रीदादा बुधवार दि. ८-१२-१९७६ रोजी अप्पाचे वाडी येथे गेले.

अप्पाची वाडी येथील देवाला कौल लावण्याची पद्धत आहे आणि हे कौलही काही ठराविक दिवशीच लावले जातात. बुधवार हा काही कौल लावण्याचा दिवस नव्हता. परंतु श्रीदादा बुधवारीच आलेले पाहून शंकरमामांनी बुधवारी दुपारी बारानंतर देवाला कौल लावून म्हटले, '' देवा, खरे म्हणजे आज तुला कौल लावण्याचा वार नाही, आणि वेळही नाही. तथापि आज येथे रामभाऊ केळकर आले आहेत. म्हणून मी तुला कौल लावीत आहे. रामभाऊंचेवर तुझी कृपादृष्टि आहेच. त्यांचेकड्न भक्ति वाढू दे. त्यासाठी तुझा आशीर्वाद आहे हे चमत्कार होऊन सर्वांना दिसावे म्हणून मी आत्ता कौल लावीत आहे.'' असे शंकरमामांनी म्हणताच उपस्थित असणाऱ्या सर्वांच्या समक्ष देवाने अनुकूल कौल दिला.

यानंतर तेथेच आणखी एक अद्‌भुत घटना घडली. अप्पाचे वाडी येथे एका घुमटीत हालसिद्धांची संजीवन समाधि आहे. श्रीदादा आणि त्यांचे बरोबरची पुरुष मंडळी यांना बरोबर घेऊन शंकरमामा शिपुरकर घुमटीत शिरले. तोच एक दिव्य, अपूर्व, अद्‌भुत आणि अवर्णनीय असा सुगंध सर्वांना जाणवला. श्रीदादा घुमटीत होते तोपर्यंत सुमारे अर्धा तास हा सुवास दरवळत होता. श्रीदादा घुमटीतून बाहेर आले आता घुमटीत सुगंध आहे काय हे पहाण्यास श्री. धनंजय भावे पुन: घुमटीत गेले. तेव्हा त्यांना जाणवले की सुवास संपला होता.



वरील प्रसंग ज्यावेळी घडला त्यावेळी शंकरमामांचे अधिकारी चिरंजीव मधुकरपंत शिपुरकर हे उपस्थित होते. त्यांनाही या घटनेचे मोठे आश्चर्य वाटले. तेव्हा पुढे त्यांनी जेव्हा श्रीदादांचा गौरव करणारा एक लेख दासराम गौरवग्रंथासाठी लिहिला तेव्हा त्यांनी वरील प्रसंगाचा तपशील पुढील प्रमाणे दिला आहे :- ''ती. दादांच्या सामर्थ्याचा मला आलेला अनुभव सांगतो. ती. दादांचे तृतीय चिरंजीव अनल यांचा लग्नसोहळा पार पडला. लग्नानंतर श्रीक्षेत्र अप्पाचे वाडीस जाण्याचे ठरले. येथे जो घुमट आहे तिथे हालसिद्धनाथांची संजीवन समाधि आहे. त्या समाधीचे दर्शन घेण्यास ती. दादा आणि आम्ही काही मंडळी आत गेलो. ती. दादांनी समाधीवर मस्तक ठेवताच एक अनामिक सुगंध सुटला. तो सुगंध सुटल्याची जाणीव तिथे असलेल्या प्रत्येकाला झाली आणि सर्वांना खूण पटली. असा सुगंध सत्पुरुषाच्या आगमनाच्या वेळी सुटत असतो. सत्पुरुषांच्या व देवाच्या भेटीचा द्योतक असा तो सुगंध आहे आणि त्याचा अनुभव आम्ही सर्वांनी त्या दिवशी घेतला.''

श्रीदादांच्या पारमार्थिक जीवनात जे अनेक चमत्कार घडले, त्यापैकी वरील एक आहे. ''बुधवार, मार्गशीर्ष वद्य २, शके १८९८, ता. ८-१२-७६ रोजी आप्पाचे वाडीतील दासरामास सिद्धांचा झालेला साक्षात्कार'' असे म्हणून श्रीदादांनी वही क्रमांक १२२ मध्ये पुढील अभंग दिलेले आहेत:-

(१)

ऐसा पाहिला घुमट । सुगंधाचा घमघमाट ॥१॥
सिद्धनाथाची वसती । दर्शनेची चारी मुक्ती ॥२॥
गोविंदनाथांची विश्रांती । सर्व सिद्धी वोळंगती ॥३॥
शंकरांचे प्रेमबळे । सिद्धलीले घडो आले ॥४॥
अप्पाचिये वाडी। आली प्रचीती रोकडी ॥५॥
भक्तीप्रेमाचा सोहळा । दासराम पायी धाला ॥६॥

(२)

भक्तीप्रेमा वंश वेल । सदा फुलावा केवल ॥१॥
सिद्धनाथासी शंकर। विनविती जोडुनी कर ॥२॥
नाही वेळ नाही वार । कौल द्यावा जी सत्वर ॥३॥

तोचि झाला चमत्कार । सिद्धनाथे दिला वर ॥४॥
पहाता सारे चाकाटती । तया प्रेमा नाही मिती ॥५॥
दासराम पायी लीन । तया देवाचे वरदान ॥६॥

(३)

नाही गुरुवार नाही रविवार । असोनी बुधवार कौल दिला ॥१॥
सकाळची वेळ तेही गा नव्हती । तरी चमत्कृती दोन प्रहरी ॥२॥
शंकरांनी स्वये लावियला कौल । तया प्रेमा मोल नाही जगी ॥३॥
भक्ती वाढो ऐसा थोर आशीर्वाद। देती हालसिद्ध दासरामा ॥४॥

(४)

सुगंध पहाता दरवळला असे । परी फूल ऐसे नाही जगी ॥१॥
कोणते अत्तर सांगताचि ये ना। धूप उदी म्हणा तेही नव्हे ॥२॥
सहस्र मुखाचा वर्णिता माथा । डोल तया आला स्वानंदेची ॥३॥
माझे श्रीशंकर झालेती तटस्थ । बैसलेची स्वस्थ भक्त सारे ॥४॥
गोविंदसुता रामा दावी योगी खुणा । हालसिद्धराणा वोळलासे ॥५॥

(५)

सुगंध सागर माझा सिद्धेश्वर । नाम घेता फेर चुकताती ॥१॥
अप्पाचिये वाडी ऐसे घडो आले । अबोलची ठेले शब्दापैल ॥२॥
सिद्धेश्वर ऐसे म्हणताचि वाचे । परिपूर्ण त्याचे समाधान ॥३॥
दासराम प्रेमे गाई सिद्धेश्वर । आनंद अपार भरला दिसे ॥४॥

हालसिद्धांच्या कृपेबद्दल सर्वसामान्यपणे श्रीदादांनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे :-गोविंदनाथ आण्णा शंकरमामांचेनी ।
वोळले ते झणी हालसिद्ध ॥ (दासरामगाथा,पृ.१३५)

याच १९७६ साली आणखी एक महत्वाची घटना घडली ती अशी:- पुणे येथे बिडकरमहाराजांचे शिष्य रावसाहेव सहस्रबुद्धे होऊन गेले. या श्रीसहस्रबुद्धेमहाराजांचे मंदिर श्रीदिगंबरदासमहाराजांनी बांधले आहे. आपल्यानंतर या मंदिराचे अधिकारी या दृष्टीने श्रीअशोककाका जोशी यांना दिगंबरदास तयार करीत होते. या श्रीअशोककाकांना १९७६ साली ध्यानावस्थेत श्रीदादामहाराज केळकरांचे दर्शन झाले. ही गोष्ट त्यांनी श्रीदिगंबरदासमहाराजांना निवेदन केली. तेव्हा श्रीदिगंबरदासमहाराज म्हणाले, ''तुला दिसले ते बरोबरच आहे. मी देह ठेवल्यानंतर त्या सत्पुरुषाची आणि



तुझी भेट होईल.'' पुढे श्रीदिगंबरदासमहाराजांनी निर्याण केल्यावर श्रीदादा व श्रीअशोककाका यांची भेट झाली (निष्काम कर्मयोगी).

वरील घटनेनंतर लौकरच इ.स. १९७६ वर्ष संपून इ.स.१९७७ साल सुरू झाले. या वर्षीच्या चैत्र वद्य दशमी, सकाळचे वेळी, श्रीदादांना एका सत्पुरुषाचे दर्शन झाले असे श्रीदादांनी एका अभंगात नोंदवून ठेवले आहे (वही ११५). पण हे सत्पुरुष कोण होते हे मात्र श्रीदादांनी निर्दिष्ट केलेले नाही :-

शालीवाहन शके १८९९ । सकाळचे नऊ आणि दोन ॥१॥
चैत्र वद्य दशमी आणि बुधवार । आलासे समोर महापुरुष ॥२॥
उंचा [१]पुरा गोरा ..... शीरा । जया अंगी सदरा पायी लुंगी ॥३॥
'महाराजा बरे आहेना' म्हणोनी । पुसले तयांनी मजलागी ॥४॥
अनोळखी परी भेटविती वाटे । ऐसे प्रेम कोठे नातुडेची ॥५॥
दोन्ही हस्त वरी केलेसे तयांनी। दासराम मनी नमन करी ॥६॥

बरडे विठ्ठल मंदिर हे सांगलीतील एक भक्तीचे केंद्र आहे. या मंदिरात विशिष्ट प्रसंगी श्रीदादांची निरूपणे होत असत. इ.स.१९७७ साली असेच एका प्रसंगी बरडे विठ्ठलमंदिरात श्रीदादांचे निरूपण चालू होते. कीर्तनामध्ये ''नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग'' हा विषय श्रीदादा सांगत होते. त्यावेळी निरूपणात खूप रंग भरला होता. तितक्यात पखवाज वाजविणारे गृहस्थ श्रीदादांना म्हणाले, ''महाराज, आत्ता तुमच्या निरूपणातही विठ्ठल नाचला आहे.'' असे बोलून त्यांनी गाभाऱ्यातील विठ्ठलाच्या मूर्तीकडे बोट दाखविले. विठ्ठलाकडे पहाताच असे दिसले :- गर्भकुटीतील विठ्ठलमूर्तीच्या दोन्ही खांद्यावरून छातीवर रुळणारा पूर्वीचा हार हा आता जानव्यासारखा एका बाजूने मूर्तीच्या काखेत आला होता. हाराची दुसरी बाजू खांद्यावरच होती. श्रीदादांचे निरूपण चालू असताना कोणीही विठ्ठलाच्या मूर्तीजवळ गेले नव्हते. विजेचा पंखा चालू होता पण त्याचा वारा गाभाऱ्यापर्यंत पोचत नव्हता. तेव्हा खरेच विठ्ठलाची मूर्ति ही नाचली असली पाहिजे, हे पखवाजीचे शब्द खरेच होते.

१. या चरणात जी अक्षरे कळली नाहीत त्यांचे जागी...अशी टिंबे दिली आहेत.

या प्रसंगी नारायणराव सुपेकर, अनिलप्रभु केळकर, गणपतराव चित्रुक, इत्यादि अनेक श्रोते उपस्थित होते. या घटनेला उद्देशून श्रीदादांचा वही क्रमांक ११६ मध्ये पुढील अभंग आहे :-

बरडे विठ्ठल मंदिरी झाला हरिकीर्तन गजर ।
सप्त्याची समाप्ती काला रंगला अपार ।।ध्रु।।
नामया कीर्तनी रंग भरे अनिवार ।
विषय ओघे आला कीर्तनी या साचार ।।१।।
पखवाजी तो अभंग बोले......परीकर ।
म्हणे नाचता देवाजीचा गळला पीतांबर ।।२।।
जानव्यापरी तोचि जाहला विठोबाचा हार ।
गाभाऱ्यातची पहाता नवल करती नारी नर ।।३।।
प्रभाकरमहाराजा अर्पियेला हार ।
एका बाजुसी रुळे सारे म्हणती चमत्कार ।।४।।
चैत्र वद्य द्वादशीसी आला सोमवार ।
दासरामे सेवा केली प्रेमे सादर ।।५।।

श्रीगोविंदपंत घोसरवाडकर हे चिमडच्या नारायणमहाराजांचे शिष्य होते. ते पूर्वी एकदा मामामहाराज केळकरांचेकडे आले होते. त्यांचे नंतर त्यांचे चिरंजीव श्रीबाबूराव अण्णा आणि श्रीशंकरमामा शिपुरकर यांचा व श्रीदादांचा परिचय दृढ होत गेला. काही काळाने घोसरवाड आणि अप्पाची वाडी येथे श्रीदादांचे जाणे-येणे होऊ लागले. या दोन्ही ठिकाणी देवरूप असणारे श्रीहालसिद्ध हे रेवणसिद्धांचे अवतार होत आणि चिमड संप्रदायाची परंपरा ही रेवणसिद्धांपासून सुरू होते. अशी वस्तुस्थिति असल्याने, हालसिद्धांचे विषयी काही काव्यरचना श्रीदादांना श्रुत होऊ लागली. ती सर्व एकत्र करून, श्रीदादांनी ते सर्व काव्यबंध ''सिद्धस्तुति'' या शीर्षकाखाली रविवार दि. २३-१-१९७७ रोजी प्रकाशित केले.

श्रीगोविंदपंतांचे अंगात ज्याप्रमाणे देवाचा संचार होत असे त्याप्रमाणे त्यांचे चिरंजीव श्रीबाबूरावअण्णा यांचे शरीरातही देवाचा संचार होत असे. एकदा गोविंदपंतांचे पुण्यतिथि दिवशी श्रीदादा बाबूरावअण्णा यांचेकडे गेले असताना काय घडले ते वही क्र. १२९ मधील श्रीदादांच्या एका अभंगावरून कळून येते. तो अभंग असा आहे :-



बाबूरावालागी झालासे संचार । मजला सत्वर बोलाविले ।।१।।
हातीचा भंडारा काढोनी दिधला । शिक्कामोर्तब केला तयावरी ।।२।।
भक्ति वाढवावी ऐसा आशीर्वाद । देवोनी आनंद केला देवे ।।३।।
कारीकोळ राणा आमुचे वाड्यात । आलासे धावत काय सांगो ।।४।।
गोविंदपंतांचे पुण्यतिथि दिवशी । दिली खूण ऐसी दासरामा ।।५।।

पुढे श्रीबाबूरावजीअण्णांना अंतिम आजार झाला. त्यावेळी श्रीदादा त्यांना भेटण्यास गेले होते. त्या वेळी घडलेली घटना श्रीदादांनी वही क्र. १०३ मधील एका अभंगात पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केली आहे :-

तुम्ही येता येथे नव नारायण । ठाकले आपण मजपुढे ।।१।।
ऐसे म्हणोनिया बैसले उठोनी । अत्यवस्थ असूनी काय सांगो ।।२।।
कुरुंदवाड ग्रामी अण्णाकडे गोष्टी । अण्णांचिया पोटी प्रेम भारी ।।३।।
गजानना सवे भेटुनिया आलो । सारेची रंगलो भेटीमाजी ।।४।।
दासरामालागी होय आठवण । काय काय म्हणून सांगू तरी ।।५।।

पेण या गावी प.पू. आबासाहेब परांजपे हे सत्पुरुष रहात होते. ते इ.स.१९७७-१९७८ मध्ये श्रीदादांचेकडे मुक्कामास आले होते. माघ शुद्ध दशमी ही त्यांची जन्मतिथि होती. आणि त्या तिथीचे आदले रात्री त्यांना मृत्यु येणार असे एका ज्योतिषाने त्यांना सांगितले होते. श्रीदादांचे पवित्र धामातच आपणास मरण यावे याच इच्छेने ते श्रीदादांचे घरी आले होते. त्यांनी ज्योतिष्याचे वरील भविष्य श्रीदादांच्या कानांवर घातले. तेव्हा श्रीदादा त्यांना म्हणाले, ''बुवा, या वर्षी मात्र तुमचा मृत्युयोग नाही. काळजी करू नका.'' पुढे माघ शुद्ध दशमीचे आदले रात्री दोन वाजता परांजपे यांना जोराचा हार्ट ॲटॅक आला. ते कळताच श्रीदादा चट्दिशी उठले, आणि निंबरगीकरमहाराजांचे स्मरण करीत श्रीदादांनी परांजपेंना अंगारा लावला. थोड्याच वेळात श्रीपरांजपे शुद्धीवर आले. त्या रात्रीचा त्यांचा मृत्युयोग टळला. पुढे श्रीदादांनी परांजपेंना शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला व त्यांना निरोप दिला. त्यानंतर आठ वर्षांनी परांजपे यांचे देहावसान झाले.

परगावहून सांगलीत येणारे संत हे बहुधा श्रीदादांची भेट घेण्यास येत असत. असेच एक संत श्रीनानामहाराज तराणेकर इ.स. १९७८ साली सांगलीस आले होते. श्रीदादांच्याकडे जावे अशी अंत:प्रेरणा त्यांना होत

होती. त्याप्रमाणे ते चालतच श्रीदादांच्या घरी आले. श्रीदादांच्या घरचे वातावरण त्यांना भावून गेले. '' येथील वायुमंडल शुद्ध आहे '' असे उद्गार त्यांचे मुखातून बाहेर पडले. त्यांचा योग्य तो आदर सत्कार श्रीदादांनी केला. मग श्रीदादांचा निरोप घेऊन ते प्रसन्न मनाने परत गेले.

हेच श्रीनानामहाराज तराणेकर एकदा कोल्हापूरास भागवतवार नावाच्या एका मोठ्या ऑफिसरांचे घरी आले होते. साहजिकच अनेक भक्त आणि भाविक तराणेकरमहाराजांचे दर्शनास येत होते. त्यांमध्ये सांगलीचे एक गृहस्थ होते. ते सांगलीचे आहेत असे तराणेकरमहाराजांना सांगण्यात आले. ते कळल्यावर तराणेकरमहाराज त्यांना म्हणाले, '' अहो, तुम्ही सांगलीचे ना? मग तुम्ही सांगलीतच श्रीरामभाऊ केळकरमहाराजांच्याकडे जावयास हवे होते. तेथेच तुमचे काम झाले असते. येथे मजकडे येण्याची काय आवश्यकता होती ?''

पंडित आडनावाचे पतिपत्नी मुंबईस रहात होते. हे पंडित दांपत्य इ.स. १९७८ साली श्रीदादांचेकडे आले आणि त्यांनी नम्रतापूर्वक श्रीदादांचेकडे मार्गदर्शन मागितले. त्यावर श्रीदादा श्रीयुत पंडितांना म्हणाले ''अहो पंडित, मी तुम्हाला आवश्यक ते सांगेन. परंतु तुमच्या सौभाग्यवतींना मी अनुग्रह देऊ शकणार नाही.'' ''महाराज, आपण असे का म्हणता?'' अशी पृच्छा पंडितांनी केली. त्यावर श्रीदादांनी त्यांना सांगितले, ''अहो पंडित, तुमच्या पत्नीने कलावतीदेवींचा पूर्वीच अनुग्रह घेतलेला आहे व एका व्यक्तीला एकाच गुरूकडून अनुग्रह घेता येतो. म्हणून मी त्यांना अनुग्रह देऊ शकणार नाही.'' हे ऐकताच पंडित चकित झाले. कारण आपल्या पत्नीला कलावती देवींचा अनुग्रह आहे हे त्यांनाही माहीत नव्हते.परंतु श्रीदादांना कळले होते. श्रीदादांचा अनुग्रह घेऊन पंडित गेले.

श्री. वासुदेवराव जोशी यांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला होता. पण ते स्वत:ला मामामहाराज केळकरांचे शिष्य म्हणवीत. ते माधवनगरला रहात. दि.२३-७-१९७८ रोजी माधवनगर येथे त्यांनी देह ठेवला. तेव्हा श्रीदादा त्यांचेकडे गेले होते. त्यावेळी वासुदेवरावांची अंत्ययात्रा निघू लागली होती. एका ट्रॉलीत श्रीवासुदेवरावांचा देह ठेवला होता. त्यांचे शेजारीच श्रीमंत बापूसाहेब चाफळकर बसले होते. श्री. चाफळकरांनी श्रीदादांना आपल्याजवळ बसवून घेतले. ही अंत्ययात्रा सांगलीतील कैवल्यधामावरुन,



श्रीदादांच्या घराच्या मागच्या गल्लीतून अमरधामाकडे जाणार होती. श्रीदादांच्या घराच्या मागील बाजूस ही अंत्ययात्रा आली असता, वासुदेवरावांचे शरीरावर हार घालण्यात आला. पुढे वासुदेवरावांचे और्ध्वदेहिक झाल्यावर दहावा दिवस उजाडला. या दिवशी काही केल्या पिंडास काकस्पर्श होईना. तेव्हा चर्चा होऊन असे ठरले की वासुदेवरावांच्या गुरूंना म्हणजे श्रीदादांना बोलावून घ्यावे. त्याप्रमाणे श्रीदादांना बोलावले गेले. श्रीदादा तेथे गेले आणि ''वासुदेवराव, मी आलो आहे,'' असे शब्द त्यांनी उच्चारले. हे शब्द उच्चारताच कावळ्याने पिंडाला स्पर्श केला. ही हकिकत ''हरिपाठ'' (प्रकाशक- प्रभाकर शंकर जोशी, माधवनगर ) या ग्रंथात दिलेली आहे. या ग्रंथात पुढे असे म्हटले आहे, ''आपले गुरु आपल्याला भेटायला आल्यावर कै. ती.अण्णांचा आत्मा शांत झाला.''

कोल्हापूर येथे श्रीमाधवनाथ सांगवडेकर नावाचे एक सत्पुरुष रहातात. त्यांचे घरी श्रीविश्वनाथमहाराज रुकडीकर यांच्या पुण्यतिथीचा उत्सव साजरा होतो. त्यांच्या साठाव्या पुण्यतिथीचा कार्यक्रम फेब्रुवारी १९७८ मध्ये येत होता. या पुण्यतिथीच्या महोत्सवात कीर्तन करण्याचे निमंत्रण श्रीदादांना आले. श्रीदादांनी ते स्वीकारले आणि श्रीदादा कोल्हापूरला गेले. या श्रीदादांच्या कीर्तनात श्रीस्वरूपानंदांचे शिष्य स्वामी अमलानंद हे उपस्थित होते. तसेच स्वामी अमलानंदांचे शिष्य स्वामी प्रज्ञानंद (म्हणजे प्राध्यापक म.अ. कुलकर्णी ) हेही उपस्थित होते. तसेच श्रीदादांचे चिरंजीव चंद्रशेखर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी, प्रा. जोशी इत्यादि अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती.

या प्रसंगी ''सोहंस्वरूप ते जाण। न कळे सद्गुरूवाचून'' या अभंगावर श्रीदादांचे कीर्तन झाले. ते अगदी अभूतपूर्व होते. कीर्तन सुरू होताच वातावरणात पडलेला एक प्रकारचा फरक सर्व श्रोत्यांना जाणवत होता. सर्व श्रोते श्रवणभक्तीत रंगून जाऊन अगदी मंत्रमुग्ध होऊन गेले. स्वामी अमलानंद तर अत्यंत प्रमुदित झाले. कीर्तन संपताच अत्यानंदित झालेले स्वामी अमलानंद श्रीदादांचे जवळ गेले, त्यांनी श्रीदादांचे गळ्यात हार घातला आणि श्रीदादांना कडकडून मिठी मारली. स्वामी अमलानंद श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, माझ्या गुरूंच्या आज्ञेने आज मी तुमच्या गळ्यात हार

घातला आहे.'' ते पुढे बोलले, ''रामभाऊ, आजच्या तुमच्या कीर्तनात सोहंचे खरेखुरे स्वरूप प्रगट झाले आणि ते श्रोत्यांना कळले.''

वरील सर्वच घटना स्वामी प्रज्ञानंद उर्फ प्रा. म. अ. कुलकर्णी यांनाही अतिशय महत्वाची वाटली ती इतकी की पुढे श्रीदादांच्या षष्ट्यब्दपूर्तीनिमित्त जो श्रीदासराम गौरव ग्रंथ निघाला त्यात त्यांनी श्रीदादांचे गौरवपर जो एक लेख लिहिला आहे, त्यात त्यांनी वरील प्रसंगाचा आवर्जून उल्लेख केलेला आहे ते लिहितात:-''गतवर्षी कोल्हापूर येथे नाथपंथातील थोर योगींद्र विश्वनाथ-महाराज रुकडीकर यांची साठावी पुण्यतिथी थाटाने व भक्तिप्रेमाने श्री. माधवराव सांगवडेकर यांचेकडे साजरी झाली.या सोहळ्याकरिता प.पू. सद्‌गुरु स्वामी अमलानंद पेणहून मुद्दाम आले होते. त्यांच्या उपस्थितीत प. पू. रामदादांचे अप्रतिम कीर्तन झाले. ''आजि दिवस सोनियाचा वोढवला रंग'' अशी बहार त्यांनी अधिकारवाणीने केलेल्या अध्यात्मविवरणाने झाली होती. प.पू. रामदादा कीर्तनात किंवा कीर्तनानंतर कधीही कोणाकडूनही हार घालून घेत नाहीत. कीर्तन ऐकून प.पू. सद्‌गुरु स्वामी अमलानंदांना असे प्रेमाचे भरते आले की त्यांनी व्यासपीठावर जाऊन प.पू. रामदादांना प्रेमभराने कडकडून मिठीच मारली. ''संत भेटीचा आनंदू । सुखसागर परमानंदू '' कसा असतो हे त्यावेळी सर्वांना पहावयास मिळाले. दोघांच्याही नेत्रांतून प्रेमाश्रु ओघळत होते. प.पू. स्वामी अमलानंद त्यावेळी म्हणाले, ''तुमच्या या कीर्तनाने तुम्ही सद्‌गुरूंना डोलायला लावलेत. यापेक्षा अधिक काय सांगू? त्याची खूण म्हणून आशीर्वाद म्हणून मी हा हार आपल्या गळ्यात घालतो आहे. हा माझ्या सद्‌गुरूंचा मला आदेश आहे.'' आणि प.पू. दादांनी नतमस्तक होऊन तो हार ''मज दास करी त्यांचा । संतदासांच्या दासांचा,'' अशाच विनम्र वृत्तीने स्वीकारला. टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. तो सोहळा ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला ते धन्य धन्य झाले.''

श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज हे श्रीदादांच्या चिमडसंप्रदायाचे अधिष्ठानभूत देव होते. त्यांचे विहीरीचे मध्यभागी असणारे मंदिर चिमड येथे आहे. त्यांची निर्वाण शताब्दी इ.स. १९७९ मध्ये येत होती. या निमित्ताने साधुमहाराजांचे संक्षिप्त चरित्र लिहवून घेऊन ते प्रसिद्ध करावे असे श्रीदादांनी ठरविले. त्याप्रमाणे त्यांनी हे चरित्र लिहिण्याचे काम के.वा. आपटे यांचेकडे



सोपविले. साधुमहाराजांचा महिमा गाणारी ''श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा'' या नावाची लहानशी पुस्तिका के. वा. आपटे यांनी लिहिली. ती धनंजय भावे, कोल्हापूर यांनी चैत्र शुद्ध तृतीया, शके १९०१ (दिनांक ३०-३-१९७९) या साधुमहाराजांचे पुण्यतिथि दिवशी प्रकाशित केली.

श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराजांचे निर्वाण शताब्दि निमित्ताने आणखी एकादे पुस्तक प्रकाशित करावे, अशी अंत:प्रेरणा श्रीदादांना होऊ लागली. या स्थितीत कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयातील प्राध्यापक केंद्रे हे श्रीदादांचेकडे आले होते. श्रीदादांनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या काही ग्रंथांवर ओवीबद्ध टीका लिहिल्या आहेत, हे त्यांना माहीत होते. बोलता बोलता ते सहज श्रीदादांना म्हणाले, ''ज्ञानेश्वरमहाराजांच्या अमृतानुभव ग्रंथाचे मंगलाचरण संस्कृतमध्ये आहे. प्रचलित मंगलाचरणात पाच संस्कृत श्लोक आहेत. व ते सर्वांना माहीत आहेत. आणि त्यांचेवर पैठणच्या एकनाथ-महाराजांनी टीका लिहिली आहे. तथापि श्री. किबे यांच्याकडे जी अमृतानुभवाची प्रत आहे, त्यामध्ये संस्कृत मंगलाचरणाचे सहा श्लोक आहेत. हा सहावा श्लोक असा आहे :- ''दिवि भूमौ तथाकाशे बहिरंतश्च मे विभु: । यो विभात्यवभासात्मा तस्मै भावात्मने नम: ।।'' पण हा श्लोक तादृश अप्रसिद्ध आहे.'' हे ऐकताच श्रीदादांनी ठरविले की या अप्रसिद्ध श्लोकाचे स्पष्टीकरण करणारी टीका लिहावयाची. परंतु मंगलाचरणातला केवळ एकच श्लोक घेऊन त्यावर टीका रचणे हे योग्य होणार नाही हेही श्रीदादांच्या लक्षात आले. तेव्हा अमृतानुभवाच्या सहा श्लोकी मंगलाचरणावर टीका लिहिण्याचे श्रीदादांनी निश्चित केले आणि यथावकाश ही टीका पूर्ण केली. ही टीका ओवी वृत्तांत आहे. ही टीका पूर्ण झाल्यावर, रघुनाथप्रियसाधुमहाराजांच्या निर्वाण शताब्दीचा मंगल प्रसंग साधून, ''श्रीअमृतानुभव मंगलाचरण'' या शीर्षकाखाली ही टीका चैत्र शुद्ध तृतीया, शके १९०१, शुक्रवार, दिनांक ३०-३-१९७९ रोजी प्रकाशित केली.

अप्पाची वाडी या गावी हालसिद्धांचे देवस्थान आहे. या स्थानी मंदिरापुढे सभामंडप बांधण्याचे शंकरमामा शिपुरकर यांनी ठरविले. या बांधकामाचा शुभारंभ श्रीदादांच्याच हस्ते करावयाचा असे शंकरमामा शिपुरकर व त्यांचे चिरंजीव मधुकरपंत यांनी निश्चित केले. त्याप्रमाणे त्यांनी

श्रीदादांना विनंति केली. ही विनंति मोठ्या आनंदाने श्रीदादांनी स्वीकारली. शुभारंभाचा हा समारंभ बुधवार दि. १९-१२-१९७९, मार्गशीर्ष अमावस्या,शके १९०१ या शुभ दिवशी, मोठ्या थाटामाटाने, यथासांगपणे, श्रीदादांच्या मंगलकारक शुभ हस्ते पार पडला. समारंभ संपल्यावर तेथेच श्रीदादांचे कीर्तनही झाले. मग कीर्तन संपल्यावर श्रीमंत नानासाहेब माणकापुरे यांचे प्रेमळ भजनही पार पडले. आपल्या हातून झालेल्या या समारंभाची नोंद ज्या एका अभंगात श्रीदादांनी करून ठेवली आहे, तो अभंग असा:-

सभामंडपाचा शुभारंभ केला ।
देवाच्या प्रेमाला सीमा नाही ।।१।।
शंकरानी ऐसे केले कवतुक ।
मार्गशीर्ष देख अमावस्या ।।२।।
शीर्षमार्गे जाता साक्षात्कार झाला ।
दिवस लाभला सोनियाचा ।।३।।
सोन्याचा दिवस मधुकर बोले ।
दासरामे नमिले सिद्धपद ।।४।।
ऐसे हे घडले अप्पाचिये वाडी ।
दासरामा आवडी सिद्धपदी ।।५।।

卐卐卐卐卐

## प्रकरण ११ : संदर्भ

१) श्रीदासरामगौरव ग्रंथ, पृ. २१,२२,४२,११५,३६,२३.
२) श्रीदासरामगाथा, पृ. १३५.
३) वही क्रमांक १२२, ५०,१०३, ११६,१३८, १३१, १२९,
४) केशवलिखितदासरामचरित्र टिप्पणे
५) हरिपाठ, प्र. प्रभाकर शंकर जोशी, माधवनगर, १९९१, 'गुरूचा महिमा'
६) श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा, ले.के.वा.आपटे, प्र. धनंजय भावे, कोल्हापूर,१९७९.
७) श्रीअमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह, प्र.पां.सी.गोखले, सांगली १९७९
८) सिद्धस्तुती, प्र. दासराम, सांगली, १९७७
९) निष्कामकर्मयोगी तथा श्रीदिगंबरदासमहाराज, ले.विनायक श्रीधर जोशी, मुंबई (प्रकाशन वर्ष दिलेले नाही).

## प्रकरण १२

# श्रीदादांची साठी-शांति व निंबरगी यात्रा

(इ.स.१९८०-१९८१)

परमार्थ, पारमार्थिक कार्यक्रम, पारमार्थिक लेखन तसेच प्रपंचातील गोष्टी करीत करीत श्रीदादांचे जीवन व्यतीत होत होते. कालानुक्रमाने इ.स.१९८० हे साल उजाडले. यावर्षी श्रीदादांना साठावे वर्ष लागत होते. तेव्हा श्रीदादांच्या साठी शांतीचा सोहळा करण्याचे त्यांचे घरची मंडळी आणि त्यांचे भक्तसमूह यांनी निश्चित केले. आणि हा कार्यक्रम गुरुपुष्यामृत अमृतसिद्धियोग साधून माघ मास पौर्णिमा, शके १९०१, गुरुवार दि.३१-१-१९८० रोजी साजरा करण्याचे ठरले. या कार्यक्रमासाठी निमंत्रण पत्रे श्रीदादाचे चिरंजीव चंद्रशेखर यांनी पाठवावयाची असेही ठरले. या षष्ट्यब्द सोहळ्याच्या निमित्ताने ''श्रीदासराम गौरवग्रंथ'' काढावयाचा असेही ठरविण्यात आले. लगेच या ग्रंथासाठीची पूर्व तयारी सुरू झाली आणि हा ग्रंथ डिसेंबर १९७९ अखेर तयारही झाला.

गुरुवार दि. ३१-१-१९८० रोजी सकाळी परंपरेप्रमाणे असणारा धार्मिक सोहळा पार पडला. संध्याकाळच्या श्रीदादांच्या कीर्तनसमयी मुख्य समारंभ होता. या समारंभाचे प्रारंभी प्रथम बापूरावजींच्या-मामांच्या-सिंहासनास श्रीगुरुसिद्दप्पामहाराज, गुरुनाथ कोटणीसमहाराज, डॉ.माधवराव कोटणीस, शंकरमामा शिपुरकर, बापूसाहेब देशमुख वकिल, आणि श्रीदादा यांनी हार घालून कार्यक्रमास प्रारंभ झाला.

अंजनी भिडे, नेत्रा बेळगली, आणि छाया नानिवडेकर या तरुणींनी श्री. प्रकाश भावे यांची ''प.पू. सद्गुरु श्रद्धेय श्रीरामराय गोविंद केळकर यांच्या षष्ट्यब्दी सोहळ्याप्रीत्यर्थ व्यक्त केलेली भावांजली'' पेटी तबल्याच्या साथीत उत्तमप्रकारे गाईली. ही भावांजलि पुढील प्रमाणे होती:-

अध्यात्माचे टिपुर चांदणे पसरे हे दशदिशी ।
शत शरदाचे आयु लाभो हीच आस हृदयाशी ।।ध्रु।।

ज्ञानाची ही गंगा वाहे पवित्र कृष्णाकाठ
सुगंध उधळीत पुष्प बोलले इथेच माझी काशी ॥१॥
नामामृतसिंचने फुलविला अध्यात्माचा मळा
मने फुलविली लाजविती ती पवित्र गंगाजळा
फळे लगडती दिव्यत्वाची अमृत आले गळा
गंधित वायुलहरी बोले इथेच माझी काशी ॥२॥
श्रवणी मननी अद्‌वय भजनी रंगून जो गेला
गौण मानुनी लौकिकाला ईश्वर अपुला केला
स्वानंद भुवनी राम रंगला उधाण मांगल्याला
शतायुषी सहवास मिळावा मागू देवापाशी ॥३॥

या ''भावांजलि'' चे गायन झाल्यावर श्री. प्रकाश भावे यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर श्रीदादांचा गुणगौरव करणारी भाषणे सुरू झाली. त्यामध्ये काही वक्त्यांनी श्रीदादांच्या पत्नी सौ. सीतावहिनी यांच्याबद्दलही गौरवोद्‌गार काढले. या भाषणांचे वक्ते होते गुरुनाथमहाराज कोटणीस, प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी, मधुकरपंत शिपुरकर, ह.भ.प.बापूसाहेब देशमुख, प्रा. केंद्रे, ह.भ.प. डॉ. धालेवाडीकर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, प्रा. म. अ. कुलकर्णी, आणि डॉ. के.वा.आपटे. वक्त्यांची भाषणे संपल्यानंतर श्रीदादांनी समयोचित उत्तर दिले. त्यात त्यांनी ''साठी कशासाठी'' हे स्वकृत पद म्हटले. हे पद असे:-

जरी का झाली साठी। साठी तरी कशासाठी ॥१॥
जरी व्यक्तीचिये साठी । तरी व्यक्ती काय मोठी ॥२॥
व्यक्तिमत्त्व जेथे नाही । तेथे व्यक्ती तरी काई ॥३॥
अशांतता जेथे नाही । तरी शांती कैशी होई ॥४॥
जेणे योगे हे घडले । त्याचे महत्त्व कळले ॥५॥
तयाचिये म्हणू शांती । तरी त्याचे वय किती ॥६॥
महाराजांनी कवतुक केले । सकळा समाधान झाले ॥७॥
श्रद्‌धा आणि भक्ती । हीच साठीची संगती ॥८॥
ऐसा गोडची संकेत । दासराम हा निवांत ॥९॥

भाषणे संपल्यानंतर ''श्रीदासराम-गौरव-ग्रंथ'' चा प्रकाशन समारंभ सुरू झाला. शंकरमामा शिपुरकर यांचे अध्यक्षतेखाली आणि



नामामृत सेविता सेविता वर्षे गेली साठ
आयुष्य वेचले नामासाठी प्राणास मारूनी गाठ

श्रीगुरुसिद्दप्पामहाराज यांच्या शुभ हस्ते ग्रंथ प्रकाशन आणि ग्रंथ समर्पण झाले. त्यानंतर या ग्रंथाचे संपादक प्रा.डॉ.के.वा.आपटे आणि प्रकाशक श्री.धनंजय भावे यांना श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांना शुभाशीर्वाद देण्यात आले. नंतर श्री. चंद्रशेखर यांनी आभाराचे भाषण केले.''आपला सर्व भार ज्या सत् सद्‌गुरुनी घेतला त्यांचे आभार कसे मानावेत'', अशा भावपूर्ण शब्दांत त्यांनी ऋण- निर्देशात्मक आभार मानले. त्यानंतर उपस्थितांना अत्तर लावून गुलाब पाणी शिंपडण्यात आले, आणि प्रसाद वाटण्यात आला. अशा प्रकारे हा सर्व सोहळा आनंदाने, उत्साहाने, थाटामाटाने, यथासांग पार पडला.

श्रीदादांच्या साठी-शांतीचा हा सोहळा पाहिल्यावर श्री. मधुकरपंत शिपुरकर यांना जे काव्य स्फुरले ते असे:-

षष्ट्यब्दीचा सोहळा स्वर्गाहुनी आगळा। पाहुनिया डोळा धन्य झालो ॥१॥
सुखावली गात्रे परम पवित्रे । पावती हेळामात्रे उन्मनी अवस्था ॥२॥
प्रार्थिताती जन प्रार्थितसे मन। शत शरदांचे जीवन लाभो तुम्हां ॥३॥
नेमात रंगलेली दिसो आम्हा मूर्ती । पुरवाया आर्ती भक्त जनांची ॥४॥

तसेच या षष्ट्यब्द सोहोळ्याविषयी मधुकर शिपुरकरांनी पुढील उद्‌गार काढले; ''ती. दादा(उपाख्य रामरायमहाराज) यांचा हा षष्ट्यब्दीचा सोहळा हा केवळ त्यांच्याच अगर त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवनातील आनंदाचा क्षण नसून, त्यांच्या असंख्य भक्तांच्या भाविकांच्या जीवनातील आनंदाचा क्षण आहे. आणि मला वाटते ती. दादांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य व मोठेपण यातच लपलेले आहे.''

श्रीदादांच्या साठी-शांतीच्या सोहळ्याच्या निमित्ताने कोल्हापूरचे ''रसगंगाधर'' म्हणजेच प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी या संस्कृतपंडितांनी संस्कृत भाषेत श्रीदादांचे गुणवर्णन करणारी जी ''वाक्पुष्पांजलि'' वाहिली ती पुढील प्रमाणे :-

''दादा-'' राम-महाराजो 'मामा'-गोविंद-आत्मजः ।
शतायुर्वै भवेत् पूर्णो वर्धमानो दिने दिने ॥१॥

प्रातिभ-ज्ञान-संपन्नो जनानां हृदि संस्थित : ।।३।।
प्रशस्तदर्शनश्चासौ स्मेराननन-युत: कवि : ।
रंजयन् बोधयन्नित्यं गुरुरेव न संशय: ।।४।।
करुणामृतसमृद्ध : समदु:खसुख: क्षमी ।
संतुष्टो नामयोगी च यत- वाक्काय- मानस: ।।५।।
अध्यात्मज्ञाननित्यश्च ''मामा-'' मय-मनो-युत: ।
आदर्श: सज्जन: सार्थो 'नामदेवो' हि सांप्रत: ।।६।।
प्रह्लादस्यावतारोऽ यमिति यो गद्यते बुधै: ।
रसगंगाधरो धन्यो जनश्च तत्प्रसादत: ।।७।।

याच श्रीदादांच्या षष्टयब्द सोहोळ्याच्या निमित्ताने श्रीदादांचे गुण गाणारा जो अभंग मधुकरपंत शिपुरकरांना स्फुरला, तो असा:-

शुद्ध बीजापोटी घेऊनिया जन्म । जाणिले ते वर्म अध्यात्माचे ।।१।।
गर्भात मिळाले ज्यासी प्रमा ज्ञान । ते बालक अज्ञान कैसे म्हणू ।।२।।
चौदाव्या दिवशी गुरु घेती हाती । कौतुके चुंबती मुखकमळ ।।३।।
दृष्टिद्वारे दिला त्यांनी गुरु अनुभव । अष्ट सात्त्विक भाव उमलले ।।४।।
नवव्या वर्षी लिहिले कित्येक अभंग । कीर्तनात दंग मूर्ति गोरी ।।५।।
ज्ञानयोगी सांगे नामाचा महिमा। सोहं गुह्यतमा जिंकितसे ।।६।।
ज्ञान झाले तरी अखंड साधन । कीर्तन प्रवचन नित्य नेम ।।७।।
ज्ञानासी दाविली भक्तिवाट सोपी । ह्रदयात वोपी प्रेम प्रेम ।।८।।
नको तया सिद्धी नावडे प्रसिद्धी । स्थिर असे बुद्धी सुखदु:खी ।।९।।
नाही काही करी जरी द्रव्यार्जन। राजयोग महान उभा ठाके ।।१०।।
मूर्ती जरी दिसे हात साडेतीन । विभु परिमाण आत्म्याचे या ।।११।।
देहाचे कारक उरले उपकारक । विश्वाचे तारक उपादान ।।१२।।
हा कोणी नसे सामान्य संत । करी उभा भगवंत विटेवरी ।।१३।।
षष्ट्यब्दीचा सोहळा पाहे जगजेठी। करूनिया कुरवंडी जीवाभावाची।।१४।।
नाम घ्या नेमाने गाती पालुपदा । असे अमुचे ''दादा''सर्वासाठी ।।१५।।

श्रीदादांच्या साठी-शांतीच्या निमित्ताने श्रीदादांना शुभेच्छा देणारी अनेक पत्रे आली होती. त्यापैकी उपलब्ध असणाऱ्या श्री.रामकृष्ण हरि सांडू या उद्योगपतींच्या दि. ३१-१-१९८० च्या पत्रात पुढील भाग आहे:-

''आपले कर्तव्यदक्ष चिरंजीव श्री.चंद्रशेखर साठी-शांतीचा समारंभ करीत



अखंडकीर्तनारामो गुरुभक्तिपरायण: ।
संप्रदायैकनिष्ठश्च वाग्मी विनयवान् शुचि: ।।२।।
सात्त्विको वत्सलो धीर: शास्त्राभ्यासपरायण: ।

आहेत, त्या निमित्त आमच्या शुभेच्छा.

यन्मंगलं महेंद्रस्य प्राप्ते देवसमागमे ।
ऋषिभि: स्तूयमानस्य तत् ते भवतु मंगलम् ॥

आपणांस श्री, वर्चस्व, आयुष्य, आरोग्य, दैवीतेज (आत्मिक बळ) तसेच विपुल धान्य, धन, पशु, पुत्रपौत्रादि संतति व शंभर वर्षांचे आयुष्य प्राप्त व्हावे अशी प्रभुचरणी मनापासून प्रार्थना करतो.''

दिनांक ३१-१-१९८० रोजी झालेल्या सोहोळ्याचे तपशीलवार वर्णन सांगलीतील नवसंदेश दैनिकाच्या रविवार दि.३-२-८० च्या अंकात आले होते. त्यानंतर श्रीदादांचा गुणगौरव करणारा प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचा एक लेख दैनिक राष्ट्रशक्तीच्या शनिवार दि. २-२-८० च्या अंकात प्रसिद्ध झाला. तसेच प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदादांचे वर्णन करणारा लेख लिहिला आणि तो श्री. राजन जोशी यांच्या सूचनेवरून मुंबईच्या ''भक्तिसंगम'' मासिकाच्या जून १९८१ च्या अंकात प्रसिद्ध झाला.

याच सुमारास प्रा. के.वा. आपटे यांचे मेहुणे श्री. मधुकरपंत वैकर हे वालचंदनगरहून सांगलीत आले होते. ते श्रीदादांचे दर्शनास गेलेले असताना त्यांना मामांनी काढलेले श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र दिसले. या चित्राविषयीची सर्व हकिकत श्रीदादांनी वैकरांना सांगितली. ते चित्र पाहून ज्ञानेश्वर महाराज असेच असले पाहिजेत अशी त्यांची खात्री पटली. या चित्राचा सर्वत्र प्रसार व्हावयास हवा असे त्यांच्या मनाने घेतले आणि त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले. श्रीदादांनी अमृतवाणी या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे प्रथम ''श्रीमामांनी काढलेल्या या चित्रावरून वालचंदनगरचे श्रीज्ञानेश्वरभक्त श्री. मधुकरपंत वैकर यांनी सुंदर चित्र तयार करून घेतले.'' नंतर हे चित्र आळंदी येथे श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे समाधि मंदिरात लावले जावे असा यत्न त्यांनी सुरू केला. त्यासाठी त्यांनी ज्ञानेश्वर देवस्थानच्या ट्रस्टीशी पत्रव्यवहार सुरू केला तसेच अनेक वर्तमानपत्रातूनही पत्रे लिहिली. या संदर्भात त्यांचा व श्रीदादांचा जो पत्रव्यवहार झाला त्याची नोंद वही क्रमांक १२९ मध्येही

मठ, इत्यादि ठिकाणी लावण्याचा प्रयत्न श्री. कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे आणि अन्य काही भक्त मंडळी यांनी केला. आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले.

श्री. बापू मायदेव हे श्रीदादांच्या नात्यातील भाविक गृहस्थ. ते श्रीदादांचे अनुगृहीत असून ते वरचेवर श्रीदादांचे दर्शनास येत. १ जुलै १९८० रोजी ते सांगलीस श्रीदादांचेकडे आले होते. त्यावेळी श्रीदादा श्रीडोंगरेमहाराजांच्या प्रवचनाच्या उद्‌घाटन समारंभास केंगणेश्वरीच्या चौकात जाणार होते. बापूंना पहाताच श्रीदादा त्यांना म्हणाले, ''बापू, लगेच माझ्या बरोबर चला.'' बापूंच्या तोंडात तेव्हा पान तंबाकूचा तोबरा असल्याने, ते नुसते ऊं ऊं करु लागले. पान थुंकून व पाण्याने चूळ भरून ते परत येताच श्रीदादांनी त्यांचा हात आपल्या हातात घेतला व ते निघाले. केंगणेश्वरी चौकातील समारंभात बापूंना श्रीदादांचे जवळच बसविण्यात आले. बापूना संकोचल्यासारखे झाले. पण श्रीदादांनी त्यांचा हात धरून ठेवला होता. कार्यक्रम संपला. या प्रसंगाचे फलित म्हणजे त्या दिवसापासून बापूंचे पानतंबाकूचे व्यसन सुटले. कारण श्रीदादांनी त्यांचा हात धरून ठेवलेला होता, असे बापू सांगतात.

श्रीदादांची कीर्तन-निरूपणे फौजदार गल्लीतील बरडे विठ्ठल मंदिरात होत. तेथे विठ्ठलाची लहानशी पितळेची मूर्ति होती. श्री. सूरदास हे आपले मित्र आर्. आर्. जाधव यांना म्हणाले,'' या मंदिरास आपण विठ्ठलाची एक मोठी मूर्ति भेट म्हणून दिलीत तर बरे होईल.'' श्री. जाधव श्रीदादांच्याकडे आले व त्यांनी श्रीदादांना विचारले ''दादा, बरडे विठ्ठल मंदिरात माझ्या वडिलांच्या स्मरणार्थ मी विठ्ठलरुक्मिणीच्या मोठ्या मूर्ति देऊ का ?'' श्रीदादा म्हणाले, ''जाधव कुळात विठ्ठल जन्म घेणार आहे. तुम्ही त्या मूर्ति जरुर द्या.'' त्याप्रमाणे जाधवांनी पंढरपुराहून २॥-३ फुटांच्या विठ्ठल रुक्मिणींच्या मूर्ति आणल्या व त्या प्रथम श्रीदादांच्या घरी ठेवण्यात आल्या. तेथून त्या स्थापनेसाठी दि.२२-११-८० रोजी समारंभपूर्वक विठ्ठल मंदिरात नेण्यात आल्या. सांगलीतील हत्ती पुढे, मागे टाळ- मृदंग वाजविणारे वारकरी, अशा थाटात या मूर्तींची मिरवणूक निघाली. बरडे विठ्ठल मंदिरात श्रीदादांच्या हस्ते विठ्ठलरुक्मिणींच्या मूर्तींची स्थापना झाली. स्थापनेनंतर लगेच श्रीदादांचे कीर्तन झाले, आणि महाप्रसाद देण्यात आला.



आढळते. तथापि मधुकरपंताच्या या खटपटीला यश आले नाही. तरी त्यांच्या या उद्योगामुळे एक फायदा असा झाला:- या चित्राचे फोटो घेऊन त्यांच्या अनेक प्रती काढण्यात आल्या. आणि ते ते फोटो महाराष्ट्रातील विविध मंदिरे, श्रीदादांचा साठी-शांतीचा सोहळा यथासांगपणे पार पडला. त्यानंतर श्रीदादांचे मनात आले की आपण आता निंबरगीस जाऊन निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन यावे. श्रीदादा निंबरगी यात्रेस निघणार हे कळताच सुमारे १२५ भक्त मंडळीसुद्धा त्यांचेबरोबर जाण्यास निघाली. तेव्हा दोन स्पेशल एस्.टी. गाड्या ठरविण्यात आल्या. रविवार दि.२३-११-१९८० हा दिवस निघण्याचा ठरला. सकाळी लौकरच गाड्या निघाल्या. मिरज, चडचाण इत्यादि गावावरून मंडळी सुमारे ११-११॥ ला निंबरगीत समाधीचे जवळ पोचली. सर्वांनी निंबरगीकरमहाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. सभामंडपात बसून श्रीगुरुलिंगगीतेचे पठण करण्यात आले. त्यानंतर श्रीदादांचे कीर्तन झाले. रामदासस्वामीरचित सद्‌गरूंची आरती ''सुखसहिता दुःखरहिता निर्मल एकांता'' इत्यादि आहे. तिच्यावर निरूपण करून श्रीदादांनी सद्‌गुरूंचे माहात्म्य उपस्थितांना समजावून सांगितले. भर दुपारी कीर्तन चालू असताना शीतल वायूची लहर आली. जणु गुरुलिंगजंगम हे तेथे वायुरूपाने प्रगट झाले. कीर्तनाचे अंती आरती झाली. देवाचा संचार झालेल्या काहींनी हातावर पेटता कापूर ठेऊन आरती केली. हे सर्व होण्यास दुपारचे २-३० वाजले. महत्त्वाची गोष्ट अशी :- मंडळींच्या बरोबर लहान मुले होती. कुणीही गडबड केली नाही. इतकेच नव्हे तर दुपारी २॥ पर्यंत कुणालाही जेवणाखाणाची आठवणही झाली नाही. त्यानंतर मंडळी भीमरायाच्या मंदिरात गेली. तेथे देवाचे दर्शन झाल्यावर सर्वांची भोजने झाली. मग निंबरगीकरमहाराजांच्या निवासस्थानी लोक दर्शनास गेले. तेथून निघून पुनः निंबरगीकरमहाराजांचे समाधीचे दर्शन घेऊन यात्रेकरू ६-६॥ च्या सुमारास निंबरगीतून बाहेर पडले. तेथून पंढरपुरला जाऊन सर्वांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले.नंतर सर्वजण रात्री १-१॥ चे सुमारास सांगलीस पोचले. मंडळी आपापल्या घरी गेली.

सांगलीमध्ये श्री. ज्ञानबा पाटील नावाचे श्रीदादांचे एक भक्त होते. ते १९८१ साली निंबरगीकरमहाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशी निंबरगीस गेले

यांनी निवडले. आणि ते ''अमृतवाणी'' या शीर्षकाखाली दि. २१-२-१९८१ रोजी प्रकाशित केले. अमृतवाणीमधील अभंगांबद्दल श्रीस्वामी अमलानंद म्हणतात. ''पारमार्थिकांना या अभंगाद्वारे उत्तम मार्गदर्शन होईल. व त्या अभंगांच्या श्रवणमननाने सुख-शांति-समाधान यांचा लाभ होईल,'' तर श्री गो.श्री. कुलकर्णी सांगतात ''ही अभंग- सागराची गाथा संसार-सागर तरून जाण्यास श्रद्धाळू साधकाला खात्रीचा आधार आहे.'' ॲडव्होकेट ग.ब.देशमुख यांचे मते,''गुरुभक्तिपरायण रामराय तथा दासराम यांनी ही गाथा प्रकट करून महाराष्ट्र संतवाङ्मयात अत्यंत मोलाची भर घातली आहे.''

गुजरातमधील पारडी येथून 'पुरुषार्थ' नावाचे मासिक त्या काळी निघत असे. या मासिकाच्या संपादकांनी '' समर्थ रामदासस्वामी विषेशांक'' काढण्याचे ठरविले. तेव्हा त्यांनी समर्थ रामदासांच्या 'सोलीव सुख' या प्रकरणावर लेख लिहिण्यास कोल्हापूरच्या प्रा.डॉ.गं.वि.कुलकर्णी यांना पत्र लिहिले. या प्रकरणावर लिहिण्यास योग्य अधिकारी व्यक्ति म्हणून प्रा. कुलकर्णी यांनी श्रीदादांचे नाव सुचविले. तेव्हा दि.९-७-८१ च्या श्रीदादांना लिहिलेल्या पत्रात संपादक सांगतात :-

''सप्रेम नमस्कार,

माझे स्नेही व पुरुषार्थचे एक लेखक प्रा. गं. वि. कुलकर्णी, कोल्हापूर यांच्या सूचनेवरून हे पत्र लिहीत आहे. पुरुषार्थाच्या समर्थ-विशेषांकाचे निमंत्रण स्वीकारून आपण आपला समर्थांच्या 'सोलीव सुख' या प्रकरणावरील लेख अवश्य पाठवावा, ही नम्र विनंती.'' या विनंतीला अनुसरून श्रीदादांनी 'सोलीव सुख' चा गद्यात अर्थ लिहिला. तो पुरुषार्थच्या समर्थ विशेषांमध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर हाच लेख पुन: 'चांगदेवपासष्टी आणि इतर ग्रंथ' या पुस्तकात इ.स.२००२ मध्ये प्रकाशित झाला.

श्रीदादांचे एक भक्त श्री.आर्.आर्.जाधव यांच्या एकदा असे मनात आले की श्रीदादांच्या राममंदिरात जे काही नित्य व नैमित्तिक कार्यक्रम होतात,त्यामध्ये जी पदे वगैरे म्हटली जातात, त्यांचा सांगलीबाहेरील भक्तांना उपयोग व्हावा म्हणून ती सर्व एकत्र करून त्यांचे एक पुस्तक छापावे. तसे



होते. तेथे निंबरगीकरमहाराजांच्या समाधिसंनिध त्यांना श्रीदादांचे दर्शन झाले.

आपल्या नित्याचे कीर्तनास उपयोगी पडावे म्हणून मामांनी बरेच अभंग रचले होते. त्यांतील सुमारे १३०० अभंग श्रीदादा व श्री.न.दा.दिवेकर त्यांनी श्रीदादांना विचारले. श्रीदादांनी त्यांना अनुमति दिली, व या पुस्तकास 'आशीर्वाद' लिहिण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे श्री.र.रा.जाधव यांनी ''चिन्मय नित्यपाठ'' हे पुस्तक शुक्रवार दि. १६-१०-१९८१ रोजी प्रकाशित केले.

चिमड संप्रदायाचे पहिले पीठाधिकारी श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज हे होते. त्यांच्या पत्नी सौ. सीताबाई ऊर्फ माईसाहेब याही परमाधिकारसंपन्न होत्या. त्यांनी देह ठेवून बरीच वर्षे लोटली होती. तरी अद्यापि त्यांची समाधि चिमड मठाच्या परिसरात झालेली नव्हती. म्हणून ही समाधि बांधून घेण्याचे श्री. गंगाधरसिंग दीक्षित यांनी ठरविले. मग त्यांनी चिमड मठाधिपति श्रीपंडितरावमहाराज यरगट्टीकर यांचेकडे परवानगी मागितली. पंडितराव व पांडुरंगराव यरगट्टीकर या दोघांनीही या बेतास संमति दिली. तेव्हा साधुमहाराजांच्या समाधीच्या मागील बाजूस असलेल्या त्रयमूर्तींच्या समाधीच्या मागे माईसाहेबांची समाधी इ.स.१९८१ मध्ये बांधली गेली. या निमित्ताने त्रयमूर्तींच्या समाधीपुढे केळीचे खुंट उभे करून विजेची रोषणाई करण्यात आली. या कार्यक्रमास उपस्थित रहाण्यास श्रीदादांना जमावे म्हणून श्रीमंत सोनुताई माने यांनी आपल्या गाडीने श्रीदादांना चिमडास नेले. कार्यक्रम झाल्यावर श्रीपंडितराव व श्रीपांडुरंगराव यांच्या अनुज्ञेने श्रीदादांचे तेथे कीर्तन झाले व माईसहेबांची आराधना झाली. या कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या हजार पाचशे भक्तांना महाप्रसाद देण्यात आला.


श्रीमहादबामहाराज पाटील नावाचे एक विदेही संत अधूनमधून श्रीदादांच्या कीर्तनास येत. ते नृसिंहवाडीची वारी करीत. पुढे ते नृसिंहवाडीसच राहू लागले. एकदा बापूसाहेब चाफळकरांनी श्रीदादांना वाडीस नेले. तेथे श्रीमहादबामहाराजांचे समोर श्रीदादांचे कीर्तन झाले. ते ऐकून प्रसन्न झालेल्या महादबामहाराजांनी श्रीदादांना 'प्रल्हाद' या नावाने हाक दिली, आणि दृढ आलिंगन दिले. या प्रसंगाचे वर्णन करणारा श्रीदादांचा एक

आयुवरी वारी नृसिंहवाडीची । तेथे विश्रांतीची जागा केली ।।४।।
चाफळकर योगे जाहले कीर्तन । जाहले प्रसन्न रामावरी ।।५।।
प्रल्हाद या नामे हाक दिली निकी । दोनी हाते शेखी कवटाळिले ।।६।।
रामानंदापरी मारताची हाक । वाटले कौतुक दासरामा ।।७।।

卐卐卐卐卐

## प्रकरण १२ : पुरवणी

श्रीदादांच्या साठी-शांति सोहळ्यानिमित्त शंकरमामा शिपुरकर यांनी पाठविलेली वर्षे ६० ची आंदोलन कुंडली अशी आहे :-




श्रीदादांच्या षष्ट्यब्द समारंभानिमित्त आलेल्या पत्रातील काही मजकूर आणि काव्य पुढीलप्रमाणे :-

श्रीएकनाथांच्या उक्तीप्रमाणे 'प्रपंच साधुनी परमार्थाचा लाहो ज्याने केला तो नर भला रे भला' याप्रमाणे तेही संतपदवीचे मोठेच आहेत अशांची साठीशांति समारंभ करणे अगदी यथायोग्य आहे. - नारायण व्यंकटेश जोग.

ती. दादा, आपण शतायुषी व्हावे व आपल्या व ती. सौ. वहिनींच्या मायेची पाखर आम्हां लेकरांवर सदैव रहावी हीच या मंगल प्रसंगी प्रभुरामचंद्र-चरणी प्रार्थना.- श्री. वि. सहस्रबुद्धे

सौ. लताकाकू व त्यांचे यजमान दोघांनी मिळून केलेल्या काव्यपंक्ति :-

राम वसे ध्यानी मनी । त्याचा नाद घुमे निशिदिनी ।।१।।
चंद्र सूर्य अनल अनिल बंधु चार । कौतुकास्पद त्यांचे आचार विचार ।।२।।
सीता रोहिणी दीपक अंजनी । भजनी रंगती दिनरजनी ।।३।।
पत्नी सून नातू अन् नात । सदैव असती आनंदात ।।४।।



अभंग असा आहे:-

राजयोगी असोनी सर्वदा विदेही । असोनी विदेही राजयोगी ।।१।।
पाटीलमहाराज ऐसे थोर संत । अंगारा लावीत कल्याणाचा ।।२।।
बोलावे ते होते ऐसा अनुभव । अनेकांचा भाव त्यांचे पायी ।।३।।
तीन स्नुषा रोहिणी सुनीता अर्चना । रामसीतेचरणी वाहती गंगा गोदा यमुना ।।५।।
व्याही विहिणी थोडे जवळ थोडे दूर । दोघांच्या अंत:करणी एकच सूर ।।६।।
काका म्हणतात काकूला इथेच थोडे थांबू । श्रीरामाचे मनोभावे चरण वंदू ।।७।।
प्रसाद घेऊन साखरेचा चिमूटभर । शांत चित्ती ध्यान करु मिनिटभर ।।८।।
राम वदे फक्त नाही राज्य । तरी स्वमंदिरी निर्मिले प्रतिरामराज्य ।।९।।

श्रीदादांच्या षष्ट्यब्द महोत्सवाचे निमित्ताने श्रीदासरामगौरवग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिलेले ''श्रीदादांचे विहंगम जीवनदर्शन'' आहे. खेरीज श्रीदादांचा गौरव करणारे प्रा. दा. वि. कुलकर्णी, प्रा. म. अ. कुलकर्णी, म.शं. शिपुरकर, आणि प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी यांचे लेख आहेत. तसेच श्रीदादांच्या लेखनाचा परामर्श घेणारा ''श्रीदादांचे वाङ्मय'' हा लेख आहे. खेरीज श्रीदादांचे पुढील साहित्य येथे दिलेले आहे :- आत्मविज्ञान (गद्य लेख), काही कूटपदांवरील टीपा, आत्मलहरी (गद्य वाक्ये), श्रीदासरामविंशिका (ओवी), परमार्थसार (श्लोक), भजने आणि आरत्या. याखेरीज सद्गुरु, तत्त्वज्ञान, नाम, साधन, अनुभव यांवरील काही अभंग आणि नंतर 'श्रीरामवचनामृत' दिलेले आहे.

या ग्रंथाबद्दल ह. भ. प. मा. ग. वि. तुळपुळे दि. १-२-८० चे पत्रात लिहितात :- ''या ग्रंथात दुसऱ्या भागात बरेच लेख आहेत, ते वाचकांना फार उद्बोधक वाटतील.''

卐卐卐卐卐

## प्रकरण १२ : संदर्भ

१) श्रीदासरामगौरव ग्रंथ, प्र. धनंजय भावे, कोल्हापूर, १९८०, पृ. ३७,४४
२) फाइल क्रमांक ५ मधील पुढील पत्रके :- ''साठी कशासाठी?'' (श्रीदादा), भावांजली (प्रकाश भावे), ती. रामरायाणां षष्ट्यब्दिसमारोहे वाक्यपुष्पांजलि: (रसगंगाधर) कार्यक्रमपत्रिका
३) फाइल क्रमांक ५ मधील नवसंदेश रविवार दि. ३-२-८०, राष्ट्रशक्ती शनिवार दि. २-२-८०
४) अमृतवाणी, गो. अ.केळकर, सांगली. १९८१
५) वही क्रमांक १२९
६) फाइल क्रमांक ४,५

## प्रकरण १३

# सौ. सीतावहिनींचे निर्याण

## (इ.स. १९८२-१९८३)

श्रीदादांचे एक भक्त श्री. बळवंतराव गावडे या नावाचे होते. ते सांगलीस रहात असत. ते कधी कधी सातारचे नीलकंठभारती या साधूंचेकडे जात असत. श्री. गावडे यांच्या निमित्ताने श्रीदादा व श्रीनीळकंठभारती यांचा परिचय झाला. श्रीदादांचे विषयी आदर वाटू लागल्याने श्रीनीलकंठभारती हे श्रीदादांचेकडे येऊ लागले. इ.स. १९८२ मध्ये एके दिवशी श्रीनीलकंठमहाराज हे श्रीदादांचे कीर्तन ऐकण्यास आले. या कीर्तनसमयी महादबामहाराज पाटील हेही उपस्थित होते. दुसरे दिवशी श्रीनीलकंठभारती पुन: श्रीदादांच्याकडे आले आणि बोलता बोलता अचानकपणे म्हणाले, ''दादा, मला देह ठेवायचा आहे. आपण मला परवानगी द्या.'' हे ऐकताच श्रीदादा थोडसे चकित झाले. श्रीनीलकंठभारतींनी इतक्यात देह ठेवू नये असे श्रीदादांना वाटले. म्हणून श्रीदादा त्यांना बोलले ''महाराज, आपण इतक्या लवकर देह ठेवण्याचा विचार करू नये, असे मला वाटते.'' तेव्हा श्रीनीलकंठभारतींनी विचारले, ''दादा, मग मी आता काय करावे ?'' यावर श्रीदादा म्हणाले, ''महाराज, आपण आणखी दहा वर्षे समाधि घेण्याचा विचार करू नये.'' यावर श्रीनीलकंठभारतींनी मौन धरूनच श्रीदादांच्या म्हणण्याला संमति दिली. हा प्रसंग नीलकंठभारतींच्या चरित्रात पृ. १९१-१९२ वर पुढीलप्रमाणे वर्णिलेला आहे :-

''एक वेळ असेच सांगलीस आले । दादांच्याकडे जाऊ या म्हणाले । गावडेसाहेब शामराव बापूंना घेतले । संतदर्शनासी ।। सुरवात होण्यापूर्वी कीर्तनाला । प्रत्यक्ष नीलकंठ तेथे प्रगटला । पाटीलमहाराजही आले कीर्तनाला । विदेह स्थितीत ।। तीन संतांचा झाला संगम । भक्तिरसाचा झाला उगम । देऊन आसनासी व्याघ्रचर्म । केले स्वागत सर्वांचे ।। कीर्तन संपवून निरोप घेतला । सकाळी येऊन भेटीला । सर्वजण आले सांगलीवाडीला । गुरुराजासमवेत ।। दादांनी दुसरे दिनी मिठी मारली । भेटीतच आत्मज्योत प्रगटली । भगव्या वेषातील नीलकंठ माऊली । भेटली श्रीदादांना ।। नेत्रांतरी गंगा वाहू लागली । बाबांनी दादांना परवानगी मागितली । समाधीला ।। साक्षात असता आपण शंकर । टाकिला प्रश्न कसा रामरायावर । आणखी दहा वर्षे देऊ नये अंतर । केवळ आमच्यासाठी ।। बाबांनी मौनपाठ धरिला । मान देऊ



आपले शब्दाला । बोलणे झाले बोला अबोला । सन १९८२ मध्ये ।।''

यावेळी नीलकंठभारती परत गेले. परंतु ते लौकरच पुन: सांगलीस आले. त्यांनी श्रीदादांची भेट घेतली. आणि श्रीदादांनी सांगितलेल्या दिवसापासून इ.स. १९८३ मध्ये दहा वर्षे कशी पुरी होतात हे त्यांनी श्रीदादांना समजावून सांगितले. ते श्रीदादांना पटले. त्यानंतर नीलकंठभारती परत गेले. त्यानंतर श्रीदादांची परवानगी घेऊन, नीलकंठभारतींनी दि. १६ नोव्हेंबर १९८३ रोजी विठ्ठलवाडी येथे समाधि घेतली.

असाच प्रसंग महादबामहाराज पाटील यांचे बाबतीत घडला. नृसिंहवाडीस आपला देह ठेवण्यापूर्वी श्रीमहादबामहाराज पाटील श्रीदादांच्याकडे कीर्तनास आले होते. कीर्तन संपल्यावर, र. रा. जाधव, शिंगाडे, महादबामहाराज व श्रीदादा एकत्र असताना, श्रीमहादबामहाराज श्रीदादांना म्हणाले, ''रामभाऊ, आता आम्हाला परवानगी द्यावी.'' ''ठीक आहे'', श्रीदादा बोलले. त्यांना वाटले महाराज निघण्याची परवानगी मागत आहेत. म्हणून महादबामहाराज पुन: म्हणाले, ''रामभाऊ, आम्हाला कायमची परवानगी द्यावी. व मी गेल्यानंतर तेथे तुमचे कीर्तन व्हावे.'' यावर श्रीदादा म्हणाले, ''महाराज, तुम्ही आम्हांला अजून दहा वर्षे हवे आहात.'' त्यावेळी महादबामहाराज हसत बोलले ''रामभाऊ, दहावरचे शून्य काढून टाका.'' त्यानंतर श्रीमहादबामहाराज नृसिंहवाडीस गेले आणि बरोबर एक वर्षाने त्यांनी देह ठेवला.

श्रीदादांच्या पत्नी सौ. सीतावहिनी यांची एक बहीण कोकणात आजरे गावी रहात होती. तिचे चिरंजीव श्री. बापू मायदेव. ते श्रीदादांचे अनुगृहीत होते. ते आजरे गावी शेती करून रहात. पाण्यासाठी आपल्या शेतात विहीर खणून घ्यावी असे त्यांचे मनात आले. ते श्रीदादांचेकडे आले व त्यांनी नम्रपणे पृच्छा केली, ''दादा, मला माझ्या शेतात विहीर खणावयाची आहे. ती कोणत्या भागात खणावी?'' श्रीदादांनी उत्तर दिले, ''बापू, तुम्ही तुमच्या शेतात कुठेही खणून घ्या. १३-१४ फुटावर विहिरीला पाणी लागेल.'' बापूराव परत गेले. शेतातील एके ठिकाणी त्यांनी विहीर खणवून घेतली. विहिरीला गोड, शुभ्र व मुबलक पाणी लागले. ही गोष्ट श्रीदादांना सांगितल्यावर श्रीदादा म्हणाले, ''बापू, तुमच्या विहिरीत चिमडची तापनाशी आली आहे.'' पुढे या विहिरीतील पाणी वापरून श्रीदादांनी मामांच्या सिंहासनाला अभिषेक केला. याच बापूराव सर्व

मायदेवांची पत्नी १९८२ मध्ये अगदी सीरियस झाली. त्यावेळी श्रीदादांनी पाठविलेला अंगारा तिला लावण्यात आला. आणि ती बरी झाली.

सौ. सीतावहिनींचे माहेरचे आडनाव गोवंडे असे होते. त्यांच्या गोवंडे या कुटुंबातील श्री. नंदा गोवंडे हे इचलकरंजीस रहातात. जानेवारी १९८२ मध्ये त्यांच्या पत्नीला एक स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना श्रीदादांचे दर्शन घडले. नंदाच्या पत्नीने स्वप्नातच श्रीदादांना नमस्कार केला. श्रीदादांनी तिला पद्मासन घालून बसण्यास सांगितले. आणि स्वप्न संपले. त्या बाईंना योगासनांची काहीच माहिती नव्हती. तथापि जागे झाल्यावर त्यांना आपोआपच पद्मासन घालून बसता आले.

पुण्याला गोडबोले या नावचे एक गृहस्थ रहात होते. इ.स. १९८२ मध्ये त्यांच्या मुलाला ताप येऊ लागला. कोणत्याही उपायाने त्याचा ताप उतरेना. तेव्हा त्यांनी आपल्या एका स्नेह्याला श्रीदादांचेकडे सांगलीस पाठविले. आणि मुलाच्या दुखण्याबद्दल सांगून अंगारा देण्याची विनंति केली. श्रीदादांनी अंगारा दिला. अंगारा त्या स्नेह्याने पुण्यास नेला. तो अंगारा मुलाचे अंगाला लावताच हळुहळु त्या मुलाला बरे वाटू लागले.

सांगलीतील बरडे विठ्ठल मंदिरात रविवार दि. २१-३-१९८२ रोजी एकादशीचे दिवशी दुपारी श्रीदादांचे निरूपण चालू होते. त्यावेळी अन्यत्र असे घडले :- शंकरमामा शिपुरकर यांचे चिरंजीव कोल्हापूरला वैद्यकीय व्यवसाय करीत होते. वरील दिवशी ते सांगलीला एका कॉन्फरन्समध्ये भाग घेऊन कोल्हापूरला परत जात होते. त्यांची स्वत:ची मोटारगाडी होती. परतीच्या वाटेवर त्यांची गाडी जयसिंगपूरजवळ आली असताना ती अचानक बंद पडली. काही केल्या ती चालू होईना. तितक्यात ''परत जाऊन सांगलीला रामभाऊ केळकरांचे कीर्तन ऐकल्यावाचून पुढे जाऊ नको'' , असे शब्द त्यांच्या कानी पडले. श्रीदादा त्यांना माहीत होतेच. त्यांनी सांगलीला परत जाण्याचे ठरविले. आणि मग पुन: एकदा गाडी सुरू होते का हे पाहाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांनी गाडीची चावी फिरविली आणि आश्चर्य गाडी सुरू झाली. मग मागे वळून ते सांगलीला आले व श्रीदादांचे घरी गेले. तेथे त्यांना कळले की आत्ता श्रीदादांचे कीर्तन बरडे विठ्ठल मंदिरात चालू आहे. बरडे विठ्ठल मंदिराचा पत्ता जाणून घेऊन ते तिकडे गेले. तेथे त्यांनी श्रीदादांचे कीर्तन ऐकले. कीर्तन संपल्यावर घडलेला



प्रकार श्रीदादांना सांगून त्यांनी कोल्हापूरला प्रयाण केले.

व्यास पौर्णिमा इ.स. १९८१ या दिवशी सांगलीत रहाणारे श्री. जमदाडे, श्री. पवार, श्री. भोसले हे लोक श्रीदादांचेकडे आले आणि म्हणाले, ''दादा, आम्ही तुकाराममहाराजांचे मंदिर बांधू इच्छितो. या गोष्टीस आपला आशीर्वाद हवा आहे.'' ''अहो, तुकाराममहाराजांचे मंदिर बांधण्याचा तुमचा संकल्प पूर्ण होईल'', असा त्यांना श्रीदादांनी आशीर्वाद दिला. मग ही मंडळी आनंदाने परत गेली. त्यानंतर अनेक अडचणी दूर होत होत मंदिराचे काम दिनांक ५-३-१९८२ रोजी समाप्त झाले. त्यानंतर मूर्तीची प्रतिष्ठापना श्रीदादांचे हस्ते करण्याचे ठरले. त्याप्रमाणे फाल्गुन शुद्ध द्वादशी दि. ७-३-१९८२ रोजी सायंकाळी ७ चे सुमारास श्रीदादांच्या शुभ हस्ते तुकाराममहाराजांच्या मूर्तीची स्थापना झाली. यावेळी उपस्थित असणाऱ्या बोरगावकरमहाराजांनी शुभ चिंतन केले. अनेक टाळकरी भजन करीत होते. नंतर अन्नदान झाले. या संदर्भातील श्रीदादांचा एक अभंग असा आहे :-

सांगली क्षेत्र हे पावन झाले ॥ध्रु॥
जगदाळे जमदाडे पोवार । भोसले हरणे झटले ॥१॥
सहकारी अधिकारी यांचे । सत्कार्यी मन रमले ॥२॥
बोरगावकर महाराजांनी । शुभ चिंतन केले ॥३॥
सुमनहार हा वाहता तुकया । नामी मन रंगले ॥४॥
दासराम हा वंदन करितो । तुकयाची पदकमले ॥५॥

श्रीदादांचे प्रोस्टेटचे दुखणे घेऊनच इ.स. १९८३ हे साल उजाडले. या दुखण्याचा त्रास होत असतानाही नेहमीचे नैमित्तिक व प्रासंगिक कार्यक्रम तसेच रोजचे कीर्तन चालूच होते. या प्रोस्टेटचे ऑपरेशन करावयास हवे असे डॉक्टर मंडळी श्रीदादांना सांगत होती. पण ऑपरेशन केले तर दवाखान्यात रहावे लागेल आणि तसे केल्यास आपल्या नित्याच्या कीर्तनात अडचण येईल, असा विचार करून श्रीदादांनी प्रोस्टेटचे ऑपरेशन करून घेण्याचे टाळले. केवळ काहीतरी जुजबी औषधे घेऊन श्रीदादांनी आपले कार्यक्रम चालूच ठेवले.

श्रीदादांच्या मातापित्याचे निर्वाण झाल्यानंतर, सौ. सीतावहिनी श्रीदादांची काळजी घेत होत्या. आपल्या सुनांकडे बराचसा कार्यभार सोपवून

सौ. वहिनी इ.स. १९७२ पासून थोड्या निवांत झाल्या होत्या. इ.स. १९७२ मध्ये त्यांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. तेव्हापासून त्या श्रीदादांना म्हणत, ''अहो, मला लोळत घोळत, इतरांच्याकडून सेवा करून घेत मरण नको आहे. मला झट की पट मरण यावे.'' सौ. वहिनींची ही इच्छा पुरी होण्याची वेळ आली. इ.स. १९८२ च्या जून महिन्यात सौ. वहिनींना एका रात्री हृदयविकाराचा पहिला जोरदार झटका आला. ताबडतोब डॉक्टरांना आणण्यात आले. वेळच्या वेळी योग्य औषधोपचार झाले आणि सौ. सीतावहिनी त्यावेळी निभावून गेल्या.

हृदयविकाराचा पहिला झटका येऊन गेल्यावर, सौ. वहिनींची प्रकृति ढासळत चालली आणि त्यांना फार अशक्तपणा जाणवू लागला. त्यांना विश्रांति घेण्याची नितांत आवश्यकता होती. परंतु विश्रांति ही सौ.वहिनींना वावडी. कारण काम करण्यात मग्न रहाणे हा त्यांचा छंद बनला होता. पण आता ते शक्य नव्हते. त्यांना मधून मधून अस्वस्थ वाटे, तर कधी कधी धाप लागे. औषधांनी तात्पुरता गुण येई. सोमवार दि. २१-३-८३ रोजी सौ वहिनी फारच अस्वस्थ झाल्या. त्यांचे भाचे अशोक भावे हे डॉक्टर होते. ते हार्ट स्पेशॅलिस्ट होते. त्यांनी इ.सी.जी. काढून तात्पुरते औषध दिले. एक दोन दिवसानंतर बुधवार दि. २३-३-८३ रोजी डॉक्टरांनी तपासून सौ. वहिनींना संपूर्णपणे बेड रेस्ट घेण्यास सांगितले. या दिवशी त्यांनी कशीबशी बेड रेस्ट घेतली. संध्याकाळी ७ वाजता श्री. श्रीकांत देशपांडे यांचे प्रवचन ऐकण्यास त्या बाहेर आल्या. प्रवचनानंतर त्यांनी प्रवचनाचे कौतुक केले.

फाल्गुन शुद्ध दशमी, गुरुवार दि. २४-३-८३ हा दिवस मामांच्या जयंतीचा होता. त्यासाठी सकाळी व संध्याकाळी अधिक कार्यक्रम आयोजित केलेले होते. सकाळी सौ. वहिनींनी श्री. दिलीप कुलकर्णी यांनी प्रथमच केलेले कीर्तन ऐकले व त्यांचे कौतुक केले. कीर्तनानंतर झालेले भजन ऐकून त्या बिछान्यावर येऊन लवंडल्या. भोजनोत्तर दुपारी १२।। नंतर सौ. वहिनी अत्यंत अस्वस्थ झाल्या. अशा प्रसंगी डॉक्टरांनी ज्या गोळ्या घ्यावयास सांगितल्या होत्या त्या सौ. वहिनींनी घेतल्या. पण गुण आला नाही. त्यांचा अस्वस्थपणा वाढू लागला. तेव्हा राममंदिरात अभ्यासास बसलेल्या प्रकाश भावे यांना डॉक्टरांना घेऊन येण्यास पाठविण्यात आले. तेवढ्यात सौ. वहिनींच्या भगिनी सौ. अंबुताई आल्या. त्यांना सौ. वहिनी म्हणाल्या, ''अंबुताई, मी कुणाचे



वाईट केलेले नाही. मग देव मला असा त्रास का देत आहे? आता मला हे सहन होत नाही.'' असे बोलून त्या सौ. अंबुताईंच्या गळ्यात पडल्या. सौ. वहिनींचे चिरंजीव चंद्रशेखर व अनिलप्रभु हे नोकरीवर गेले होते. त्यांना घरी येण्यास निरोप देण्यात आला.

तितक्यात डॉ. परांजपे आले. त्यांना वहिनींची प्रकृति ठीक दिसली नाही. तेवढ्यात वाड्यातच रहाणारे डॉ. बापटही तेथे आले. इंजेक्शन देण्यात आले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. सौ. वहिनींची नाडी हाताला लागेनाशी झाली. त्यावेळी एका पळीत तीर्थ घेऊन श्रीदादांनी ते आपल्या पत्नीच्या मुखात घातले. ते पोटात गेले. पण त्याचाही उपयोग झाला नाही. बरोबर १२.५० वाजता सौ. सीतावहिनींची प्राणज्योति परमात्मज्योतीत मिळून गेली. सौ. वहिनींची आत्मज्योति बाहेर पडताना, जसे विजेचे स्पार्किंग होते तसे प्रकाशाच्या ठिणग्या असणाऱ्या काही माणसांना दिसल्या, तर सौ. वहिनींच्या शरीरातून विजेचे लोळ बाहेर पडत होते असे दृश्य श्रीदादांना दिसले, अशी नोंद प्रकाश भावे यांनी केली आहे.

सौ. वहिनींचा देह राममंदिरात देवापुढे ठेवण्यात आला. काही स्त्रियांनी सौ. वहिनींच्या भालप्रदेशी लालभडक कुंकवाचा मळवट भरला, कुणी त्यांच्या मुखात तुळशीपत्र घातले. आणि राममंदिरात ''श्रीराम जयराम जयजयराम'' हा मंत्रघोष सुरू झाला. श्रीदादा, चंद्रशेखर, अनिलप्रभु हे शोकाकुल झाले. श्रीदादांच्या ज्या भक्तांना सौ. वहिनींच्या निर्वाणाची वार्ता कळली, तो तो उपस्थित झाला. श्री. बापूराव जोशी, के. वा. आपटे, सौ. माया आपटे, बंडोपंत कुलकर्णी, प्रा. दा. वि. कुलकर्णी, श्रीपतराव धोंगडे इत्यादि मंडळी जमली. स्त्रीपुरुषांची अफाट गर्दी जमली. प्रत्येक जण सौ. वहिनींच्या पायावर मस्तक ठेवी. कुणी त्यांच्या गळ्यात हार घाली. सौ. वहिनींच्या तळपायांना केशर लावून त्यांच्या मुद्रा एका कागदावर श्री. श्रीपतराव धोंगडे यांनी घेतल्या.

सौ. वहिनींचे दोन चिरंजीव सूर्यकांत आणि अनल हे परगावी होते. ते आल्यानंतर अंत्ययात्रा काढण्याचे ठरले. ते दोघे संध्याकाळी ५ पर्यंत आले. त्यांच्या आगमनानंतर सौ. वहिनींच्या देहावर सौभाग्यवतीचे सर्व संस्कार करण्यात आले. तोवर अंत्ययात्रेची पालखी तयार झाली होती. सौ. वहिनींचे शरीर पालखीत ठेवण्यापूर्वी श्रीदादा व इतर भक्त यांनी ''सुखसहिता दुःखरहिता''

ही आरती म्हटली. ''श्रीराम जयराम जयजयराम'' च्या घोषात सौ. वहिनींचे कलेवर पालखीवर ठेवण्यात आले. तितक्यात श्री. सूरदास यांनी बोलावलेला भजनीमंडळाचा ताफा येऊन पोचला. भजन व श्रीराम जयराम जयजयराम हा नामघोष चालू असताना पालखी निघाली. पालखीच्या मागेपुढे लहान थोर शेकडो माणसे होती. पालखी शाळा नं. २ जवळ असताना, परगावहून आलेल्या सौ. राधाबाई कुलकर्णी यांनी सौ. वहिनींचे दर्शन घेतले.

कोटणीसमहाराजांच्या समाधिमंदिराजवळ पालखी खाली ठेवून, कापूर लावून 'सुखसहिता दुःखरहिता' ही आरती म्हणण्यात आली. समाधि मंदिरात रहाणारे वृद्ध श्री. गंगाधरपंत दीक्षित बाहेर आले व त्यांनी सौ. वहिनींच्या पालखीला एक प्रदक्षिणा घातली. सौ. वहिनींचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीचंद्रशेखर यांचे हस्ते और्ध्वदेहिक संस्कार सुरू झाले. त्यावेळी रामपाठ, गीतेचा १५ वा अध्याय, तुकाराममहाराजांचे बारा अभंग इत्यादींचे पठण जमलेली मंडळी करीत होती. सौ. वहिनींच्या अर्धोन्मीलित डोळ्यांत प्रा. दा. वि. कुलकर्णी यांना झगझगीत प्रकाश दिसला, तर श्री. हलदुले यांना असे जाणवले की मामामहाराज सौ. वहिनींना सांगत होते, ''बाळ, चल. तुला नेण्यास मी आलो आहे.'' चितेला मंत्राग्नीने स्पर्श केला. इकडे श्री. बापूसाहेब देशमुख, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, प्रा. के. वा. आपटे, श्री. बापू जोशी यांनी श्री. वहिनींना स्मशानातच श्रद्धांजली वाहिली.

सौ. वहिनींच्या घरची मंडळी अनेक भक्तांसह रात्री ८-८॥ चे सुमारास घरी परतली. त्यांना श्रीदादा म्हणाले, ''आता मला नित्याचे कीर्तन करावयाचे आहे.'' सर्वजण चकितच झाले. त्या दिवशी शोकाकुल अवस्थेतच श्रीदादांनी आपले नित्याचे कीर्तन केले.

सौ. वहिनींच्या निर्याणाच्या तिसऱ्या दिवशी शनिवार येत होता. म्हणून गुरुजींच्या सांगण्यावरून शुक्रवार दि. २५-३-८३ रोजी रक्षाविसर्जन करण्यात आले. पाण्याने चिता थंड झाल्यावर, श्रीपतराव धोंगडे, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी इत्यादींना आढळले की राखेमध्ये एक दोन पाने, एक दोन फुले, व सौ. वहिनींच्या नेसत्या साडीच्या निऱ्या तशाच राहिलेल्या होत्या. पतिव्रता साध्वी स्त्रियांच्या बाबतीत असे काही तरी घडते असे जाणती माणसे म्हणाली.



रक्षाविसर्जनानंतर सौ. वहिनींचे परिवर्धित छायाचित्र लगेच तयार करुन घेण्यात आले. ते चित्र राममंदिरात लावण्यात आले.चित्राखाली प्रा. के. वा. आपटे यांनी केलेला पुढील श्लोक लिहिण्यात आला :-

गृहिणी भली वंद्य जी सत्कुळी या ।
मनी सज्ज जी ''राम'' भक्ती कराया ।
सदा कर्मयोगा जिने पाळियेले ।
सीता माऊलीला नमीले नमीले ।

प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांना स्फुरलेली सौ. वहिनींची आरती अशी :-

जय देवी जय देवी जय सीता शक्ती ।
भक्ती मुक्ती वत्सल तू करुणामूर्ती ।।ध्रु।।
सीता साध्वी माता वात्सल्यसिंधू ।
अगाध छाया माया परमार्थी बोधू ।
कुंकुम मळवट लेवूनी सौभाग्यकांती ।
अहेवलेणे दावी अंबाई शक्ती ।।१।।
तेजोमूर्ती झळके प्रकाश नामाचा ।
चंद्र सूर्य अनल अनिल रामाचा ।
जन्म मृत्यु गूज दावी गुरुभक्ती ।
नारायण हनुमंती विसावली दीप्ती ।।२।।
टाळ मृदंग दिंडी पूजा आणि आरती ।
तुळशी वाहुनि उजळु कर्पूर ज्योती ।
ज्योती ज्योत मिळाली नामी अद्वैती ।
पूर्ण निमाली भ्रांती दावी निजभक्ती ।।३।।
पूर्ण प्रसन्न वदनी गोविंद धामी ।
दासरामी रंगली सौभाग्य लक्ष्मी ।
दास करी चरणी हीच विनंती ।
प्रेमे द्यावी साधन संकीर्तन प्रीती ।।४।।

प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी सौ. सीतावहिनींची पुढील आरती केली आहे :-

आरती सीतामाई । धन्य सती गृहिणी ।
निष्काम कर्मयोगा । गेली जगी आचरोनी ।।ध्रु।।
इंदिरा गोविंदाची । पूज्य पतीची तैशी ।

करुनि नित्य सेवा । जपे रामनाम कैशी ।।१।।
माऊलीपरी माया । दावी रामाच्या भक्ता ।
केशवाने नमीयेले । वंद्य चरण माथा ।।२।।

卐卐卐卐卐

## प्रकरण १३ : पुरवणी

सौ. वहिनींच्या निर्वाणानंतरचा शनिवार दि. २-४-१९८३ हा दहावा दिवस होता. यावेळी गावची व परगावची पुढील मंडळी जमली होती :- सांगलीतील प्रकाश भावे, सौ. अंबुताई भावे, श्री. व सौ. बोधे, दिलीप कुलकर्णी, के. वा. आपटे, सौ. माया आपटे, नारायण आपटे, श्रीकांत देशपांडे, इत्यादि. मुंबईहून श्रीकृष्ण लिमये, श्री. मिसाळ, स. वि. जोगळेकर, माणकेश्वर, साठेबाई, राजाभाऊ बर्वे, सौ. सनुताई बर्वे, श्रीमती बाबीताई जोशी; पुणे येथून श्री. शरद आपटे, आनंद सहस्रबुद्धे, भरत फाटक, लक्ष्मण फाटक व त्यांच्या मातोश्री; शरयू जोशी, व सौ. शांता या भरतच्या भगिनी; चंद्रपूरहून श्री. वि. सहस्रबुद्धे; आजरा येथून बापू मायदेव; कोल्हापूरहून धनंजय भावे; डहाणूहून बंडोपंत मायदेव; इचलकरंजीहून गोवंडे कुटुंबीय; बडोदा येथून बापू गोवंडे व त्यांच्या सौभाग्यवती; इत्यादि.

दहावे दिवशी सकाळी विष्णुघाटावर धार्मिक कृत्ये झाल्यावर, काकस्पर्शासाठी पिंड ठेवण्यात आले. लौकर पिंडाला काकस्पर्श होईना. तेव्हा गणेशराव केळकर श्री. चंद्रशेखर यांना म्हणाले, ''आम्ही अनिलप्रभूचे लग्न व दीपक-सुनीलच्या मुंजी व्यवस्थित करू असा संकल्प बोलू काय?'' ते एवढे बोलतात न बोलतात तोच पिंडाला काकस्पर्श झाला.

सौ. वहिनींच्या निर्वाणानंतरच्या चौदाव्या दिवशी घरी उदकशांति झाली. सायंकाळी श्रीदादांच्या कीर्तनानंतर सौ. वहिनींना श्रद्धांजलि वहाणारी पुढील व्यक्तींची भाषणे झाली :- श्री. बापूराव जोशी, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे, सौ. शरयूताई भिडे, श्रीपतराव धोंगडे, म. शं. शिपुरकर, प्रा. डॉ. के. वा. आपटे, ग. ब. देशमुख वकिल, कृ. रा. शिंगाडे. तसेच सांत्वनपर आलेली काही पत्रेही वाचून दाखविण्यात आली.



दैनिक अग्रदूत (दि. २८-३-८३), दैनिक तरुण भारत (३-४-८३) इत्यादि वर्तमानपत्रांनी सौ. वहिनींच्या निर्वाणाची वार्ता दिली. सांगली शिक्षण संस्थेने सौ. वहिनींच्या दुखवट्याचा ठराव पास केला. प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिलेला सौ. सीतावहिनींचा गौरवपर लेख पुण्याच्या दैनिक तरुण भारतमध्ये शुक्रवार दि. २२-४-८३ रोजी प्रकाशित झाला. तसेच प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी लिहिलेला सौ. सीतावहिनींचा गौरवपर लेख मुंबईच्या दीपलक्ष्मी मासिकाच्या मार्च १९८४ च्या अंकात प्रसिद्ध झाला.

श्री. सुधाकर रेगोडकर हे श्रीदादांचे निष्ठावंत भक्त. सौ. वहिनींच्या निर्याणानंतर त्यांना असे वाटले :- चिमड संप्रदायात ब्रह्मीभूत सांप्रदायिक संतांची आराधना केली जाते. त्यात तुकाराममहाराजांचे निर्याणाचे व संप्रदायातील संतांचे निर्याणाचे अभंग म्हटले जातात. हे सर्व अभंग व श्रीदादांनी रचलेले अन्य संतांवरचे निर्याणाचे अभंग एकत्र करून एक पुस्तक प्रसिद्ध करावे. ही कल्पना त्यांनी श्रीदादांना सांगितली. ती श्रीदादांना पसंत पडली. या निमित्ताने सौ. सीतावहिनींचे अल्पसे चरित्रही या पुस्तकात घालण्याचे ठरले. रेगोडकरांनी प्रकाश भावे यांना तशी विनंति केली. प्रकाश भावे यांनी सौ. सीतावहिनींचे भावुक, ओघवते आणि रसाळ चरित्र लिहिले. या ग्रंथाला ''महानिर्वाण'' असे नाव देण्यात आले. हा ग्रंथ सौ. सीतावहिनींच्या प्रथम पुण्यतिथि दिवशी - फाल्गुन शुद्ध १०, शके १९०५, दि. १२-३-१९८४ या दिवशी-प्रकाशित झाला. प्रकाशनसमारंभाच्या अध्यक्षस्थानी निंबरगीचे श्रीगुरुलिंगाप्पा महाराज होते. प्रकाशन श्रीगुरुनाथमहाराज कोटणीस यांचे हस्ते झाले. या प्रकाशन समारंभात श्री. येळावीकर, श्री. जाधव, प्रा. डॉ. के. वा. आपटे, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, म. शं. शिपुरकर, बापूराव जोशी यांची भाषणे झाली.

सौ. सीतावहिनींच्या विषयी श्रीदादांना काय वाटत होते, हे त्यांच्या लेखनात प्रगट झाले आहे. सौ. वहिनींच्या निर्याणानंतर गुरुवार, रामनवमी, शके १९०५ रोजी श्रीदादांनी केलेले पद असे आहे :-

आजि सोनियाचा दिवस । घरी आले गुरुपुष्य ।।१।।
ठेवुनी सौभाग्य सुभटा । भार्या गेली आत्मपीठा ।।२।।
चरण ठसे घेऊ म्हणती । पाच तास बरी होती ।।३।।

पाय कागदी धरूनी । नवल केले श्रीपतींनी ।।४।।
सकळा आश्चर्य वाटले । पाहुनी सौभाग्य पाऊले ।।५।।
गुरुलिंगजंगमनाथा । दासराम वंदी माथा ।।६।।

''नित्यपाठामृत'' या ग्रंथात पृ. १७७ वर श्रीदादा सौ. सीतावहिनींचे विषयी पुढीलप्रमाणे लिहितात :- ''भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेतील माझ्या पत्नी सौ. सीताबाई केळकर यांनी नित्यनेमाने साधना आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत अक्षरश: साधली, आणि फाल्गुन शुद्ध दशमीस, गुरुपुष्यामृत योगावर, माझे प. पू. पितृदेव श्रीमामा केळकर यांचे जयंतीस, दुपारी १ ला दहा मिनिटे असताना आपल्या आयुष्याचे सोने केले.

''घरातील आणि येणाराजाणारांचे मनाप्रमाणे वागून, कोणालाही आपल्या आयुष्यात न दुखवता, सर्वांशी चांगले वागून भलेपणा मिळविला. या केळकरांचे घरात त्यांनी किती कष्ट उपसले त्याला सीमा नाही. त्या एकट्या जे काही करीत होत्या ते आता शंभरांचे हातूनही होणार नाही, ही अगदी सत्य स्थिति आहे. माझेसाठी तर त्यांनी काय काय केले हे शब्दाने सांगणे कठिण, आणि ते न सांगितलेलेच बरे.

''येवढे मात्र निश्चित अगदी हसत खेळत त्यांनी वीज चमकण्यास जेवढा वेळ लागेल तेवढ्याच वेळात जगाचा निरोप घेऊन, त्या देवाघरी गेल्या. डॉ. अशोक भावे, डॉ. माधवराव बापट, व डॉ. परांजपे यांनी अत्यंत परिश्रम घेतले पण श्वास सरळ चालेना. 'मी कोणाचेही वाईट केले नाही मग मला देव का त्रास देत आहे?' हेच सौ. वहिनींचे शेवटचे उद्गार आहेत.

''मला नमस्कार अखेरचा करण्यास उठू लागल्या, पण त्यांना उठू दिले नाही. 'तुझा नमस्कार मला पोहोचला'असे सांगितले. आणि कोणत्याही मायापाशात न गुरफटता त्या आपले बहिणीचे म्हणजे सौ. अंबुताई भावे यांचे मांडीवर डोके ठेवून स्वरूपाकार झाल्या-अमर झाल्या.''

सौ. सीतावहिनींच्या बाबत ज्या काही काव्यरचना आहेत त्या आता पुढे दिलेल्या आहेत :-

(१)

सौभाग्याचा तिलक लेऊनि संपविला अवतार ।



सतीचा त्रिवार जयजयकार ।।ध्रु।।
ध्यान तुझे ते श्रीरामाचे । पूजन तेही श्रीरामाचे ।
ध्यानी मनी स्वप्नात रंगला । रामरूप संसार ।।१।।
अखंड सेवा असिधारा व्रत । त्यात पाहिला तू भगवंत ।
कार्यमग्न तू सदा अनुदिनी । दिव्य भव्य आचार ।।२।।
सार शोधूनी तू गीतेचे । करी घेतले वाण सतीचे ।
भक्तिप्रेम हा सागर उसळे । गगनी अपरंपार ।।३।।
अग्नी थिजला तव भक्तीला । काळ चमकला दिव्यत्वाला ।
कर्पूरासम देह निमाला । झाला स्वर्गापार ।।४।।
चित्शक्ती तू माय माऊली । दीन जनांची तूच साऊली ।
तव स्मरण हा ठेवा आमुचा । नित जीवा आधार ।।५।।

– प्रकाश सदाशिव भावे

(२)

सीता-साध्वी-स्तवन-स्तोत्रम्

ॐ नमस्ते मालतीदेवी सीता पुण्यपतिव्रते ।
गुरुभक्तिसाधनासक्ते सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।१।।
प्रसन्नवदने अंबे सदानंदप्रदायिनी ।
वत्सले प्रेमले मूर्ती सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।२।।
संत-गोविंद-नाथस्य स्नुषा त्वं विनता नता ।
नता च हनुमत्पादे सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।३।।
साधकानां त्वमग्रण्या धर्म-कर्तव्य-तत्परा ।
दासराम-प्रिया देवी सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।४।।
माता चंद्रश्च सूर्यश्च अनलानिल-प्रकाशिका ।
काशिका संप्रदायेऽस्मिन् सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।५।।
निंबर्गी-भीमरायस्य नारायण-भजन-तत्परा ।
तत्परा संतसेवायां सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।६।।
श्रीराम-भजन-भक्तानां प्रमुखा त्वं च प्रेरिका ।
साक्षात् त्वं मधुरा भक्ति सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।७।।
सीता सौभाग्यलक्ष्मीस्त्वं कुंकुमारूपधारिणी ।
हरिणी-भ्रांति-निभ्रांतं सीता साध्वी नमोऽस्तु ते ।।८।।

संत-गोविंदरायस्य शुभ-जयन्त्युत्सवे दिने ।
दर्शिता सूत्रनिर्वाणं सीता साध्वी नमोऽस्तु ते ॥९॥
गुरुपुष्यामृते याता वैकुंठं गुरु-वासरे ।
तांबूल-पर्ण-साक्षी त्वं सीता साध्वी नमोऽस्तु ते ॥१०॥
दर्शनं पापहारि च भाषणं अमृतोपमम् ।
नवली बांदेश्वरी साक्षात् सीता साध्वी नमोऽस्तु ते ॥११॥
द्वादशः स्तोत्रमिदं नित्यं यः पठेत् श्रद्धयान्वितः ।
तस्य दुःखापदां शांतिं भवेत् साध्वी-प्रसादतः ॥१२॥
अचलां गुरुभक्तिं च तुष्टिं पुष्टिं च साधने ।
कल्याणं इह परं चैव भवेत् साध्वीप्रसादतः ॥१३॥

– प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी.

(३)

उभयकुलपवित्रा नाम हे सार्थ केले ।
जनक-श्वशुर-वंशा साचची उद्धरीले ।
गुरु प्रभु पतिसेवा सादरे नित्य केली ।
सुखवुनी सकलांना माऊली धन्य झाली ॥

– श्री. भगवान् बापू कुलकर्णी, दुधोंडीकर.

(४)

स्वधर्म जाणुनि जीवन जगणे । अशी माऊली पुन्हा न होणे ॥ध्रु॥
तेज मुखावर रविरायाचे । हास्य चांदणे शशिधराचे ।
प्रसन्नतेने सज्ज राहूनी । आल्या जीवांचे स्वागत करणे ॥१॥
शोधक दृष्टी सदैव जागृत । जिव्हेवरती रसाळ अमृत ।
प्रत्यक्षाची ठेऊनी जाणीव । नित कार्याला वाहुन घेणे ॥२॥
प्रेमावाचून अन्य भावना । राग द्वेष हा मना शिवेना ।
दृष्टी ठेवून पैलतीरावर । सद्भावांची कावड भरणे ॥३॥
रिते कधी ना रामनिकेतन । ध्यान धारणा चिंतन कीर्तन ।
तयात आपुले सौख्य पाहुनी । तृप्त मनाने जीवन जगणे ॥४॥
स्मृतिपटलावर कोरीव लेणी । कानी घुमते सुबोध वाणी ।
कालचक्र ना चुकते कोणा । या बोधाची जाणीव देणे ॥५॥

– श्री. माधव ऊर्फ बाबूराव गोखले, सांगली.



(५)

आरती सीतामाई । ज्ञानेशाची मुक्ताबाई ।
निष्काम कर्मयोगे । केली भक्तीची कमाई ॥ध्रु॥
सर्वा भूती देव पाही । अंतरात ठाव देई ।
कुलधर्म आचरुनी । झाली सकला सवाई ॥१॥
अंतर्बाह्य रामभक्ती । ध्यानी मनी तोचि चित्ती ।
रामहस्त येता शिरी । नाममय झाली वृत्ती ॥२॥
एक गुरु एक देव । ऐसा अंतरीचा भाव ।
साधनी रत झाली । स्वरूपाचा प्रभाव ॥३॥
गोविंद जयंतीशी । साधियेले पर्वणीशी ।
चमकुनी वीज जाई । डोळा दावी नवलेशी ॥४॥

– प्रकाश भावे.

(६)

जय जय रेणुकामाता । तव चरणी नमन आता ॥ध्रु॥
तुझाची अवतार सीतामाऊली । अवतार घेऊनी सांगली ग्रामी ।
केळकर कुळी येऊनी । दासरामांच्या पत्नी होऊनी ।
जगदोद्धाराचे कार्य करोनी । भक्तावरी मायेचे छत्र धरोनी ।
सतत त्यांना जवळ करोनी ।
दीनदुबळ्यांना तूची माता । माते तव चरणी सूरदास लोळे आता ॥

– श्री. सूरदास ढेरे.

(७)

सौ. सीतावहिनींच्या निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके एकोणीसशे चारात ।
दुंदुभि संवत्सरात उत्तरायण ॥१॥
फाल्गुन शुद्ध दशमी आणि गुरुवार ।
दिवसा तृतीय प्रहर पहिले तासी ॥२॥
सीतावहिनींनी केलेसे निर्याण ।
मनात स्मरण रामनाम ॥३॥
गोविंद जयंती गुरुपुष्यामृत ।

योग हा विख्यात साधियेला ।।४।।
सच्चिदानंदरूपी मिळोनिया गेल्या ।
कीर्तिरूपे उरल्या दासापाशी ।।५।।

– श्री. के. वा. आपटे.

## प्रकरण १३ : संदर्भ


१) नीलकंठभारती चरित्र, पृ. १९१–१९२
२) फाइल क्रमांक ४
३) श्रीदासरामगौरव ग्रंथ, पृ. ३७, ४४
४) केशवलिखितदासरामचरित्र टिप्पणे
५) अमृतवाणी, पृ. ५१
६) कृ. रा. शिंगाडे यांची टिपणे
७) वही क्रमांक १२९, १३६, १००, १३४, १२७, १४०
८) लेजर क्रमांक ६ (२५–२–९९. प्रकाश भावे यांचे प्रवचन)
९) महानिर्वाण, प्र. सुधाकर रेगोडकर, सांगली, १९८४
१०) कथा एका सूरदासाची, प्रकाश भावे, सांगली.


प्रकरण १४

# संतसहस्रनाम

(इ.स. १९८३–१९८५)

सांगली बँकेत श्री. शर्मा या नावाचे एक अधिकारी होते. दोन वर्षापूर्वी बँकेत काही रकमेची फसवणूक झाली. ती उघडकीस आली. त्या संदर्भात श्री. शर्मा यांचेवर वहीम घेण्यात आला. तेव्हा हे शर्मा लक्ष्मीकांत शंकरवाला या श्रीदादांच्या भक्तांच्या बरोबर दि. ४–४–१९८३ रोजी श्रीदादांच्याकडे आले. त्यांनी श्रीदादांना सर्व प्रकार सांगितला. तेव्हा श्रीदादांनी त्यांना एकच प्रश्न केला. ''मला खरे सांगा. तुम्ही खरेच पैसे खाल्ले आहेत काय?'' त्यावर श्री. शर्मा म्हणाले, ''महाराज, मी खरेच सांगत आहे या व्यवहारात मी सहीने गुंतलो आहे. पण मी एकही पैसा खाल्लेला नाही.'' त्यांच्या प्रामाणिकाबद्दल श्रीदादांना खात्री वाटली. श्रीदादांनी शर्मांना तुकाराममहाराजांचे बारा अभंग रोज तेरा वेळा म्हणण्यास सांगितले त्याप्रमाणे शर्मांनी पठण सुरू केले. पुढे हे शर्मा निर्दोष म्हणून सुटले.

श्रीदादांचे पिताजी श्रीमामामहाराज. श्रीदादा त्यांना प्रत्यक्ष ''गोविंद'' मानीत. मामांच्या नित्यकीर्तनाच्या तपश्चर्येस इ.स. १९८४ मध्ये साठ वर्षे पूर्ण होत होती. या निमित्ताने मामांचा एकादा ग्रंथ प्रसिद्ध करावा असे श्री. व. के. कुलकर्णी यांना वाटले. हे व. के. कुलकर्णी हे मुळात पुण्याच्या श्रीगुळवणीमहाराजांचे शिष्य. परंतु सांगलीत रहावयास आल्यानंतर, श्रीदादांची कीर्ति त्यांचे कानावर गेली आणि ते श्रीदादांच्या नित्याच्या कीर्तनास येऊ लागले. आणि श्रीदादांचे कीर्तन चालू असतानाच ती लिहून घेण्याचे काम त्यांनी सुरू केले. प्रत्येक वर्षाच्या चैत्र महिन्यात मामांच्या ''रामपाठ'' वर श्रीदादांची कीर्तने होत. तेव्हा व. के. कुलकर्णी यांना प्रेरणा झाली की श्रीदादांच्या कीर्तनातील स्पष्टीकरणासह रामपाठ प्रकाशित करावा. मामांचा रामपाठ व त्यावरील श्रीदादांची कीर्तने एकत्र छापल्यास ''आधीच सोन्याचे वरी जडावाचे,'' असा प्रकार होईल असे श्री. कुलकर्णी यांना वाटले. लगेच त्यांनी श्रीदादांनी विनंति केली की श्रीदादांनी मामांचे रामपाठावर गद्यामध्ये स्पष्टीकरणात्मक लेखन करावे. ही कल्पना श्रीदादांनाही फारच

आवडली. त्याप्रमाणे श्रीदादांनी रामपाठातील प्रत्येक अभंगाचा गूढ अर्थ स्पष्ट करून सांगणारा अर्थ लिहून काढला. रामपाठाच्या अभंगांच्या श्रीदादांनी केलेल्या सखोल पण त्याचवेळी सुबोध अशा या विवरणाला ''श्रीरामपाठामृत'' हे नाव देण्यात आले. आणि हे ''श्रीरामपाठामृत'' श्री. व. के. कुलकर्णी यांनी श्रावण वद्य ८, शके १९०६, रविवार दि. १९-८-८४ दिवशी प्रकाशित केले. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात श्री. व. के. कुलकर्णी, श्री. बापूराव जोशी, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, श्री. प्रकाश भावे, प्रा. डॉ. के. वा. आपटे यांची भाषणे झाली, आणि हा ग्रंथ प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या हस्ते मामांच्या सिंहासनावर अर्पित झाला.

श्रीदादांचे सद्गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे जेव्हा सांगलीत स्थायिक होऊन वकिली करू लागले, तेव्हा प्रारंभी त्यांना श्रीबाबासाहेब मुजुमदार या प्रसिद्ध वकिलांचे साहाय्य झाले. हे बाबासाहेब चिमडमहाराजांचे शिष्य होते. त्यांची चिमडमहाराजांचेवर अतोनात निष्ठा होती ती इतकी की त्यांच्या गुरुभक्तीची तारीफ कोटणीसमहाराजही करीत असत. श्रीबाबासाहेब हे केवळ उत्तम वकिल होते असे नव्हे तर चिमडमहाराजांच्या कृपेने ते साक्षात्कारसंपन्न अधिकारी सत्पुरुष झाले होते. साहजिकच श्रीदादांना त्यांचेविषयी आदर होता. श्रीबाबासाहेबांचे चिरंजीव श्री. यशवंतराव हे श्रीमामांच्या नित्य कीर्तनास येत असत. यशवंतरावांचे घरी बाबासाहेबांची पुण्यतिथि दरवर्षी साजरी होत असे. यशवंतरावांचे चिरंजीव श्री. दिलीप यांना एकदा असे वाटले की संत असणाऱ्या आपल्या आजोबांचे चरित्र आपण प्रसिद्ध करावे. दिलीप यांनी बाबासाहेबांचे चरित्र लिहिण्याविषयी श्रीदादांना विनंति केली. ती विनंति श्रीदादांनी आनंदाने मान्य केली. आणि त्यांनी बाबासाहेबांचे सुंदर चरित्र लिहून काढले. आणि मग श्रीबाबासाहेबांचे हे चरित्र श्री. दिलीप पाटणकर यांनी इ.स.१९८४ मध्ये प्रकाशित केले.

श्रीदादांच्या घराच्या मागील बाजूस सेनामंदिर रोड आहे. याच रोडवर अंकली पोलीस चौकीजवळ श्री.दत्तात्रय विनायक कुलकर्णी, गोमेवाडीकर यांचे घर आहे. दत्तोपंतांचे वडिलांनी इ.स.१९३५ पासून आपल्या घरी रामनामाचा सप्ताह सुरू केला होता. या सप्ताहात श्रीमामा व



श्रीदादा यांची कीर्तने होत. या रामनाम सप्ताहाच्या उपक्रमाला इ.स.१९८४ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत होती. म्हणून श्री. द. वि. कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे ठरविले. तत्पूर्वी द.वि. कुलकर्णी यांनी आपल्या घरी ''श्रीसद्गुरु ब्रह्मचैतन्य मंदिर'' स्थापण्याचे ठरविले. ही स्थापना श्रीदादांनी करावी अशी विनंती त्यांनी केली. ती श्रीदादांनी मान्य केली. आणि माघ शुद्ध बारा, इ.स.१९८१ या दिवशी श्रीदादांच्या शुभ हस्ते या मंदिराची स्थापना झाली. इ.स.१९८४ मध्ये श्री. द. वि. कुलकर्णी यांनी रामनाम सप्ताहाच्या सुवर्ण महोत्सवास प्रारंभ केला. या सुवर्ण महोत्सवात मुख्यत: ५१ प्रवचनांचा कार्यक्रम झाला. त्यातील प्रारंभीचे पहिले प्रवचन श्रीदादांचे झाले आणि महोत्सवाचा आरंभ झाला. समारंभाच्या समारोपाचे प्रवचनही श्रीदादांचे होते. या समारंभात श्रीदादांनी जे काही काम केले त्याचा गौरव करताना श्री.द.वि.कुलकर्णी लिहितात, ''श्रीरामनाम सप्ताहाचा सुवर्ण महोत्सव, ५१ प्रवचनांचा कार्यक्रम, गीतचैतन्यायन, कीर्तने, उपासना केंद्र इत्यादींच्या मागे असलेली प्रेरक शक्ति व सर्व कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पाडण्यासाठी ज्यांनी तन, मन, धनाने व कृपाशीर्वादाने मदत केली, त्या संतश्रेष्ठ श्रीरामराय केळकरांचा मी जन्मोजन्मी अत्यंत ऋणी आहे.''

श्रीदादा बोलता बोलता काही घटना सांगून जात. अशीच एक घटना त्यांनी दि.१४-५-१९८४ रोजी सांगितली. ते म्हणाले, ''विश्रामबाग- सांगली येथे श्री. पळसुले नावाचे एक वयस्क गृहस्थ रहातात. त्यांचे श्री. भागवत या नावाचे जावई कोकणात राजापुर तालुक्यातील 'केळशी' नावाच्या गावी आहेत. लग्नानंतर डॉ. भागवतांच्या पत्नीच्या स्वप्नात काळपुरुष येऊ लागला. तो तिला भीति दाखवून म्हणे,''मी तुला सहा महिन्यांत नेणार आहे.'' भीतीमुळे डॉ. भागवतांची बायको वाळत जाऊ लागली. श्री. पळसुले अधूनमधून मजकडे येतात. त्यांना आपल्या मुलीची वरील हकिकत कळताच श्री. पळसुले आपली कन्या व जावई भागवत यांना घेऊन मजकडे आले. '' तुम्ही कुणाचा अनुग्रह घेतला आहे काय?'' असा मी प्रथम प्रश्न केला. त्यावर ''पुण्याच्या गुळवणीमहाराजांचा अनुग्रह आहे,'' असे उत्तर आले. त्यानंतर मी त्या दोघांना सांगितले, ''प्रथम तुम्ही

गुळवणीमहाराजांच्याकडे जाऊन या.'' त्याप्रमाणे ते गेले. त्यांनी गुळवणीमहाराजांना सर्व हकिकत सांगितली. तेव्हा गुळवणीमहाराज काहीच बोलले नाहीत, व त्यांनी काही उपायही त्या भागवत पतिपत्नींना सांगितला नाही. तेव्हा ते दोघे पुन: मजकडे आले. आणि, '' दादा, तुम्हीच काहीतरी करा,'' असे मला म्हणू लागले. तेव्हा मी त्या बाईंना अंगारा लावण्यास दिला. परिणामत: त्या बाईना स्वप्नात काळपुरुष दिसेनासा झाला. मग त्या बाईंची भीतीही कमी झाली. नंतर तिची प्रकृति सुधारली. काही दिवसांनी भागवत बाईना एक मुलगा झाला. परंतु तो बोलतच नव्हता. या मुलाचे वडिल भागवत हे स्वत: डॉक्टर. त्यांनी स्वत: आपल्या मुलाला अनेक औषधे दिली. तरीही गुण आला नाही. तेव्हा भागवत कुटुंब पुन: मजकडे आले. त्यांनी मला सर्व हकिकत सांगितली. तेव्हा त्या मुलासाठी मी अंगारा दिला. आणि एकाच महिन्यात तो मुलगा बोलू लागला.''

शालूमामा हे इंचगिरीच्या श्रीअंबुरावमहाराजांचे शिष्य. ते श्रीदादांना सांगत ''रामभाऊ, मी साधन करतो. पण मला काहीच अनुभव येत नाही. काय करावे?'' तेव्हा श्रीदादांनी त्यांना विचारले,'' शालुमामा, तुम्ही भस्रिका करता ना?'' तेव्हा ते होय म्हणाले. मग श्रीदादा त्यांना म्हणाले, ''शालुमामा, तुम्हाला भस्रिका करण्यास श्रीअंबुरावमहाराजांनी सांगितलेले नाही. अंबुराव-महाराजांनी तुम्हाला जसे साधन करावयास सांगितले आहे तसेच तुम्ही करीत जावे.'' तसे करताच त्याना अनुभव येऊ लागले.

श्रीदादांचे कीर्तन ऐकण्यास श्रीमहादबामहाराज पाटील हे विदेही संत कधी कधी येत असत. पुढे त्यांनी नृसिंहवाडी येथे देह ठेवला. त्यांची पहिली पुण्यतिथि जून १९८४ मध्ये येत होती. या पुण्यतिथीनिमित्त श्रीदादांचे नृसिंहवाडीस प्रवचन झाले. श्रीदादांचे प्रवचन सुरू होण्यापूर्वी प्रास्ताविक म्हणून श्री. बापूसाहेब चाफळकर चार शब्द बोलले. आपल्या भाषणात चाफळकर म्हणाले, ''श्रीमहादबामहाराजांनीच आम्हाला सांगून ठेवले आहे की येथे श्रीरामराय केळकरांचा कार्यक्रम व्हायला पाहिजे. त्याप्रमाणे आम्ही येथे श्रीरामराय केळकरांचा कार्यक्रम ठेवला आहे. खरे म्हणजे सध्या रामराय यांची तब्येत फारशी बरी नाही. तथापि ते आले आहेत. असे त्या दोघांचे एकमेकावर प्रेम होते.''



श्रीदादांचेकडे परगावचे अनेक संत येऊन जात. बुधवार दि.२७ जून १९८४ या दिवशी नाथपंथातले श्रीगंगादासमहाराज अवलिया हे श्रीदादांच्या कीर्तनाला आले होते. कीर्तन संपल्यावर श्रीदादांनी गंगादासमहाराजांना पेढे दिले आणि दोन रुपये प्रसाद म्हणून दिले. तेव्हा गंगादासमहाराज श्रीदादांना म्हणाले ''महाराज, तुम्ही मला डाकुरनाथाच्या रूपात दिसलात. तेव्हा तुम्ही मला हा प्रसाद नुसता देऊ नका. तर तुम्ही माझ्या पाठीवरून हात फिरवा.'' असे बोलून त्यांनी श्रीदादांना नमस्कार केला, आणि श्रीदादांचा अमृतहस्त आपले पाठीवरून फिरवून घेतला.

श्रीदादा हे चिमड संप्रदायातले. या चिमडसंप्रदायात जे संत होऊन गेले, त्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान आणि साधन हे एकदा अचानकपणे श्रीदादांच्या मनात प्रगट झाले. मग ते श्रीदादांनी तेरा अभंगांत निबद्ध केले. या तेरा अभंगांच्या छोट्या काव्यबंधाला त्यांनी ''सांप्रदायबोध'' हे नाव दिले. श्रीदादांचे एक भक्त श्री. मुकुंदराव शंकर सहस्रबुद्धे यांना 'सांप्रदायबोध' प्रकाशित करण्याची प्रेरणा झाली. त्यानुसार त्यांनी गुरुवार दि. १२-७-१९८४ रोजी गुरुपौर्णिमेच्या दिवशी ''सांप्रदायबोध'' पुस्तकरूपाने प्रकाशित केला.

सांगलीमध्ये श्रीमती पार्वती गोविंददास शेडजी या नावाच्या एक भाविक स्त्री रहातात. श्रीमहादबा पाटीलमहाराज आणि श्रीनीलकंठ-भारतीमहाराज यांच्या आज्ञेप्रमाणे या भाविक स्त्रीने आपले घरी (६९, क, शिवाजीनगर, सांगली) श्रीदत्तगुरूंच्या मूर्तीची स्थापना श्रीदादांचे हातून गुरूवार दि. २३-८-१९८४ रोजी केली. याच मंगल प्रसंगी आणखी एक चांगली गोष्ट करण्यात आली ती अशी :- श्रीगुरुगीता हा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे.त्या गुरुगीतेची आठवण करून देईल असा श्रीगुरुपाठ श्रीदादांनी रचला होता. श्रीदादांचा हा गुरुपाठ श्रीमती पार्वती गोविंददास शेडजी यांनी श्रावण वद्य ११, शके १९०६ गुरुवार दि. २३-८-८४ रोजी प्रकाशित केला. या पुस्तकात श्रीदादांनी गुरूचा गौरव गाइलेला आहे. या गुरुपाठाचे वैशिष्ट्य असे आहे.:- भौतिक जगातील विज्ञानशास्त्रात गुरुत्वाकर्षण, गुरुत्वमध्य, इत्यादि संकल्पना आहेत. तसेच भूमिति शास्त्रात वर्तुळ, व्यास इत्यादि संकल्पना आहेत. या संकल्पनांचा वापर गुरूचे बाबतीत करून श्रीदादांनी गुरूचा महिमा प्रगट केला आहे.

श्रीनिंबरगीकरमहाराजांची श्रीदादांचेवर पूर्ण कृपा होती. या श्रीनिंबरगीकरमहाराजांची निर्वाण शताब्दी ही चैत्र शुद्ध द्वादशी, शके १९०७, मंगळवार दिनांक २-४-१९८५ रोजी येत होती. ती अभिनव पद्धतीने साजरी करण्याचे श्रीदादांनी ठरविले. या संदर्भात ते लिहितात :- ''कोणालाही उपद्रव देऊ नये, कोणाचा द्वेष करू नये अगर मत्सर करू नये अशी महाराजांची शिकवण होती. सर्व धर्मांबद्दल त्यांचे मनात आदर होता.'' त्यामुळे श्रीदादांना असे वाटे की सर्व धर्मांत जे जे मोठे महात्मे होऊन गेले त्या सर्वांची नामावली आपले पुढे आदर्श म्हणून ठेवली तर त्या नामानेही प्राणिमात्रांचा उद्धार होऊन, खरा धर्म काय आहे, हे जाणून अखिल मानवांत आत्मीयता जागृत होईल. त्यामुळे त्यांच्या मनात याच विषयी विचार येत. श्रीदादा सांगतात,''सर्व धर्मातील- पंथातील आचार्य, संस्थापक, संतसाधूंची नावे आपल्या मुखाने आली तर सहज मनात क्रांति करून जातील आणि आत्मरूपाकार विश्वाचा साक्षात्कार प्राणिमात्राला होईल, असा एक विचार माझे मानसात कैक वर्षे घर करून राहिला होता.'' तथापि सर्व धर्मांतील हजारो संतांची नावे एकत्र करण्यास योग्य प्रसंग हवा होता. तो श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणशताब्दीच्या निमित्ताने आला. कारण श्रीनिंबरगीकरमहाराजांना सर्व धर्म समान वाटत. म्हणून श्रीदादा पुढे म्हणतात, ''जेव्हा श्रीनिंबरगीकरमहाराजांची निर्वाण शताब्दी जवळ येत चालली तसा तो विचार सतत उफाळून मला जागृति देऊ लागला. आपापले परीने कोणी कोणी काहीना काही महाराजांची सेवा करतीलच, पण मला मात्र महाराजांनी जणु या संतसहस्रनामाची आज नितांत गरज आहे, अशीच एक अंतर्यामी प्रेरणा दिली.''

वरील प्रेरणेनुसार सहस्र संताची नावे एकत्र करवून घेण्याचे श्रीदादांनी ठरविले. तसेच ही नावे देवांच्या भाषेत म्हणजेच संस्कृत भाषेत असावीत, असेही त्यांनी ठरविले. आता हे काम करण्यास योग्य व्यक्ति हवी होती. ती व्यक्तीही श्रीदादांना उपलब्ध झाली. ही व्यक्ति म्हणजे प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी. त्यांची निवड होण्यामागे दोन कारणे होती:- पहिले कारण म्हणजे ''त्यांचेवर भगवान् श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांची कृपा आहेच,'' असे श्रीदादांना वाटे. दुसरे कारण म्हणजे प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी हे संस्कृत



भाषा जाणणारे होते.या दोन कारणास्तव संत-सहस्र-नाम तयार करण्याचे काम श्रीदादांनी प्रा.डॉ.दा. वि. कुलकर्णी यांचेकडे सोपविले. मग डॉ.दा.वि. कुलकर्णी यांनी आपली सुविद्य प्राध्यापक पत्नी सौ. अनुराधा हिच्या साहाय्याने हे संतसहस्रनाम तयार केले. तेव्हा श्रीदादा उद्गारले ''श्रीमहाराजांचे कृपेने हे संतसहस्रनाम अतिशय उत्तम तऱ्हेने प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचे हातून पूर्ण झाले आहे. या कामी त्यांच्या सुविद्य पत्नी प्रा. डॉ. सौ. अनुराधाताई कुलकर्णी यांचे फार मोठे सहकार्य त्यांना लाभले आहे. हे संतसहस्रनाम अशा प्रकारे पूर्ण झालेले पाहिल्यावर, माझ्या मनातील हेतु परमप्रिय डॉ. दा. वि. कुलकर्णी ऊर्फ आप्पा यांनी सफल केला असून, त्यांनी केलेली ही सेवा श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे पदकमली रुजु झालेली आहे असा माझा विश्वास आहे.''

वर उल्लेखिलेले संतसहस्रनाम आणि इतर सहस्रनामे यांत जो मूलभूत फरक आहे तो असा :- विष्णुसहस्रनाम, शिवसहस्रनाम, गणेश सहस्रनाम, इत्यादि उपलब्ध सहस्रनामात एकाच देवतेची सहस्रनामे गुंफलेली असतात. परंतु संतसहस्रनामात मात्र सहस्र संतांची नावे एकत्र गुंफलेली आहेत. तसेच या संतसहस्रनामाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ते श्री.चंद्रशेखर केळकर असे सांगतात.''या सहस्रनामात कोणत्याही धर्माचा, पंथाचा, सांप्रदायाचा संकुचितपणा सोडून, एक हजार संतमहात्म्यांची नावे एकत्रित केली आहेत. त्यामुळे प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनीच म्हटल्याप्रमाणे, जवळजवळ १०१ संप्रदायातील थोर संतांचे मनोभावे स्मरणार्चन घडले आहे. या खेरीज देशविदेशातील पंथोपपंथाचाही यात समावेश आहे. आणि असे करण्याचा हेतु काय आहे ? तर जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या भिंती कोसळून आत्म्याचा साक्षात्कार अनुभवास यावा हा एकच हेतु निरनिराळ्या संतांची नावे या सहस्रनामात एकत्रित करण्यामागे आहे, हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.''

आणि या संतसहस्रनामाचे महत्त्व कथन करताना प्रा. डॉ. दा.वि.कुलकर्णी सांगतात ''सहस्राधिक संतांची नाममांदियाळी मेळवून विश्वात स्वधर्म सूर्याचा प्रकाश पसरावा आणि संतकृपेने 'असतो मा सद् गमय' अशी विश्वाची सद्धारणा घडावी या हेतूने प.पू. श्रीदासराममहाराजांनी

प्रेरणा देऊन संपन्न केलेला हा उपक्रम विश्वात्मक ऐक्य भावनेच्या दृष्टीने अतीव महत्त्वाचा आहे.''

हे संतसहस्रनाम श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणशताब्दीनिमित्त प्रकाशित होणार असल्याने, या ग्रंथात निंबरगीकरमहाराजांची काही माहिती येणे हे क्रमप्राप्तच होते. म्हणून या पुस्तकात प्रारंभी ''श्रीनारायण-नमनम्'' आणि ''श्रीगुरुलिंग-चरित-विंशिका '' हे प्रा.डॉ. के. वा. आपटे यांनी रचलेले दोन संस्कृतमधील काव्यबंध देण्यात आले आहेत.

संतसहस्रनाम हा ग्रंथ फाल्गुन शुद्ध दशमी शके १९०६, दिनांक २-३-१९८५ रोजी प्रकाशित झाला.त्यानंतर चैत्र शुध्द द्वादशी शके १९०७ मंगळवार दि.२-४-१९८५ रोजी श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या निर्वाणतिथि दिवशी- श्रीदादांच्या राममंदिरात पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाला:- संतसहस्रनाम या ग्रंथाचे समर्पण श्रीमान् बापूसाहेब चाफळकर यांचे शुभ हस्ते झाले. त्या नंतर प्रा. डॉ. दा.वि.कुलकर्णी यांनी संतसहस्रनामाचे पठण केले. संताच्या प्रत्येक नावाबरोबर श्रीदादा व जमलेले शेकडो भक्तगण एक फूल, बेल वा तुळसीपत्र अर्पण करीत होते. पठण पूर्ण झाल्यावर, आरती करण्यात आली. त्यानंतर साजूक तुपातील शिऱ्याचा प्रसाद उपस्थितांना देण्यात आला. हा पठणाचा कार्यक्रम सकाळी झाला.

येथेच मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे संतसहस्रनाम पठणाचा कार्यक्रम फक्त सांगलीत श्रीदादांचे घरी झाला असे नव्हे तर पुणे,मुंबई, इत्यादि दूरदूरच्या ठिकाणीही तिथल्या तिथल्या भक्तगणांनी हा कार्यक्रम साजरा केला.

याच दिवशी रात्री श्रीनिंबरगीकरमहाराजांची आराधना झाली. नंतर साखरेचा प्रसाद देण्यात आला. येथेही एक वैशिष्ट्य सांगण्यासारखे आहे. आपल्या जवळ येणाऱ्या माणसांनी ईश्वराचे नाम घ्यावे या इच्छेने श्रीनिंबरगीकरमहाराज मूठभर साखर देत. म्हणून त्यांना ''सक्री मुत्त्या '' (साखर देणारा म्हातारा) असे नाव पडले होते. ती गोष्ट लक्षात घेऊन, आराधनेनंतर उपस्थितांपैकी प्रत्येकाला एक ओगराळ भरून साखर प्रसाद म्हणून देण्यात आली.



संतसहस्रनामाचे पठणाचा कार्यक्रम झाल्यावर, श्रीदादांना एक पद स्फुरले, ते पुढील प्रमाणे आहे :-

सत् संताचे सहस्रनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१।।
प्रेरक श्रीनारायण नाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।२।।
दा.वि. दावी सहस्रनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।३।।
मुकुंद सुचवी सहस्रनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।४।।
केशव गाई नारायण नाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।५।।
अनुराधा श्रीधर करी काम । श्रीराम जयराम जयजयराम ।।६।।
बापू समर्पी सहस्रनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।७।।
....देतो चंद्र विराम । श्रीराम जयराम जयजयराम ।।८।।
सहस्र पठती सहस्रनाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।९।।
गुरुलिंग महावीर स्फुरवी नाम । श्रीराम जयराम जयजयराम ।।१०।।
बेल तुळस फूल वहात राम । नारायण पदी दासराम ।।११।।

संत सहस्रनामपठणाचा कार्यक्रम झाल्यावर त्याच १९८५ साली शिरोळ गावी तेली महाराज यांनी नाम सप्ताह सुरू केला. श्री. बरगे यांनी श्रीदादांना शिरोळला नेले. तेथे वीणा उभा करण्याचे वेळी श्रीदादा थोडेसे प्रास्ताविक बोलले. या वेळी तेलीमहाराजांनी श्रीदादांना एक सुपारी भेट-प्रसाद म्हणून दिली. या सर्व घटनेचे वर्णन श्रीदादांच्या पुढील अभंगात आहे :-

नामसप्ताहाचा शुभारंभ झाला ।
आनंद वाटला शिरोळात ।।१।।
निंबर्गी (जे महा) निर्वाण शताब्दीचे वर्ष ।
प्रगट पुरुष गुरुलिंग ।।२।।
उभा वीणा केला पारायण सोहळा ।
बोलिलो समयाला चार शब्द ।।३।।
फुलाचिया परी बरगे यांनी नेले ।
दर्शन जहाले तेली यांचे ।।४।।
निंबरगीमहाराजे योग हा आणिला ।
पुढे उभा केला नाथपंथ ।।५।।
घेवारी यांची इच्छा पूर्ण झाली ।
प्रेमे संतोषली संत माता ।।६।।

तात्यामहाराजे दिलीसे सुपारी ।
प्रेमे धरली करी दासरामे ॥७॥

श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या निर्वाण शताब्दीचे इ.स. १९८५ हे जसे वर्ष होते, तसे ते श्रीदादांच्या पासष्टीचेही वर्ष होते; कारण याच वर्षी श्रीदादांना ६५ वे वर्ष लागत होते.श्रीदादांच्या या पासष्टीच्या निमित्ताने प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी आपल्या घरी मोठा थाटमाट करून, श्रीदादांना आपल्या घरी बोलाविले. आणि हनुमान जयंती, दिनांक ५ एप्रिल १९८५ रोजी समारंभपूर्वक श्रीदादांची शर्करा-तुला केली. श्री. हरिभाऊ गाडगीळ, भगवान्‌बापू दुधोंडीकर, इत्यादि अनेक भक्तमंडळी या कार्यक्रमास उपस्थित होती.

रायगडावर असणाऱ्या श्रीशिवाजीमहाराजांच्या पुतळ्यावर बसविलेल्या मेघडंबरीचे उद्‌घाटन राष्ट्रपति मा. झैलसिंग यांच्या हस्ते ५ एप्रिल १९८५ रोजी झाले. श्रीदादांना श्रीशिवाजीमहाराजांचे विषयी फार आदर वाटे. त्यांनी श्रीशिवाजीमहाराजांचे वरून एक आरतीही केलेली आहे. ती ''आरती संग्रह'' या ग्रंथात प्रसिद्ध झालेली आहे.

श्रीदादांचे काही भक्त सांगलीचे जवळपास रहातात. अनेक भक्त परगावी रहातात. ते पत्राने श्रीदादांना शंका विचारतात. प्रत्येकाला पत्र लिहिणे हे अवघड झाल्याने, सर्वांना उपयोगी पडेल असे एक टिप्पण श्रीदादांनी तयार केले. या संदर्भात श्री. सुरेश शंकर सहस्रबुध्दे सांगतात, ''अशा सर्व प्रश्नांचे एकत्रीकरण करून श्रीदादांनी आम्हां भक्तांसाठी एक मार्गदर्शनपर सुसूत्र अशी पवनविजयाची स्मरणी गुंफली.'' ही स्मरणी श्री. सुरेश शंकर सहस्रबुद्धे यांनी सायक्लोस्टाइल करून घेतली व ती दि. २ जुलै १९८५ या गुरुपौर्णिमेच्या दिवशी भक्तांमध्ये वाटली. नामाचा अभ्यास करणाऱ्या साधकांना ही स्मरणी अत्यंत उपयुक्त आहे. म्हणून ती येथे उद्धृत केली आहे.

## पवन -विजय-स्मरणी

''भगवंताचे नाम हे नादरूप असून हा नाद आपले श्वासोच्छ्वासात घुमत असतो. या नादानुसंधानात साधकांस समाधि अवस्था प्राप्त होते. ''नाम श्वासोच्छ्वासी असे । परब्रह्म तेथे वसे'', असे श्रीसमर्थांनी म्हटले आहे.



दिक्, काल व आकाश यांच्या अतीत आत्मा आहे. ''आकाशात आत्मा आत्म्यात आकाश'', असे श्रीगुलाबरावमहाराज म्हणतात.

श्वासात नाम आहे व नामात ब्रह्म आहे. जीवनाचा संबंध श्वासाशी, श्वासाचा नामाशी व नामाचा ब्रह्माशी संबंध आहे. हे वर्म जर जाणले नाही तर ब्रह्मकर्म करूनही काही उपयोग नाही. 'आता मज एक सुचला उपाव । घेईन मी नाव श्वासोच्छ्वासी ।।', असे श्रीगुलाबराव महाराजांनी म्हटले आहे. सर्व संतांचा हाच अभिप्राय आहे. 'सकलही संती केले हे साधन । नामाचे स्मरण श्वासामाजी ।।' असे श्रीअक्कलकोटस्वामी म्हणतात. 'नका करू काही आस । नाम जपा श्वासोच्छ्वास ।।' असे श्रीब्रह्मचैतन्यमहाराज सांगतात. म्हणून श्वासात नाम घेणे हे सर्वोत्कृष्ट साधन आहे.

नामस्मरणाची बैठक एकांतात साधावी लागते. 'उगाच एकांती बसावे । तेथे हे समजोन घ्यावे । घ्यावे आणि सांडावे । प्रभंजनासी ।। ' असे श्रीसमर्थांचे सूत्र बैठकीचे बाबतीत चिंतनीय आहे. 'घ्यावे आणि सांडावे' हा शब्द येथे महत्त्वाचा आहे. पाणी सोडणे, हा त्याग , पण ते सांडणे हे अर्घ्य होते. हे साधन म्हणजे पाणी न घेताही एक संध्याच आहे. 'वृत्ती पै बैसली पद्मासनी', या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे उक्तीप्रमाणे वृत्तीची बैठक महत्त्वाची आहे. 'देह तरी वरचिली कडे । आपुलिया परी हिंडे । परी बैसका न मोडे । मानसीची ।।', किंवा ''अजपा जपाचे आसनी बैसावे । मन मुरडोनी स्वरूपी लावावे'' ही श्रीज्ञानेशोक्ति येथे सतत विचारात घ्यावी अशी आहे. 'नासापुटोनी वारा । जो अंगुले जातसे बारा । तो गचिये धरूनी माघारा । आतु घाली ।।'. या साधनाने 'अंग अंगाते वरी । पवनाते पवन धरी । ऐसी अनुभवाची उजरी । होचि लागे ।।'. अंग हे चिदांग होऊन वायूची मोट बांधली की अनुभवाला मग काय तोटा आहे ?, असा प्रश्न आहे. असे नामस्मरण चालू झाले की जीवाला समाधान होते. हीच समाधि म्हणून 'सर्व काल नाम चिंतन मानसी । समाधान चित्तासी समाधि ते ।।', असे श्रीतुकाराममहाराजांनी म्हटले आहे. या नामाने वृत्तीत मोठा फरक पडतो. 'राम म्हणता काम क्रोधाचे दहन । जाय अभिमान देशोधडी ।' कामक्रोधांची राखुंडी होऊन अभिमान देशोधडी जातो, असे नामाचे सामर्थ्य आहे.

योगमार्गात जी चक्रे आहेत ती शरीरात अशी सापडणारी नाहीत.

चक्रे म्हटले तर आऱ्या नाहीत. चैतन्याचा वायु हा संघात करीत जातो. आणि तेथे नाद उसळत रहातो. तो ज्या ज्या ठिकाणी संघात करतो तेथे तेथे नाद-प्रकाशानुभव येतो, त्यालाच चक्रे अशी संज्ञा आहे. चक्र हा एक संकेत आहे. किंवा ती एक अनुभवाची खूण आहे. विमान वर जाताना अगर उतरताना फेरे घेत जाते, तशीच वायूची गति शरीरात आधारापासून सहस्रदळापर्यंत खेळती आहे. त्याचा संघात जेथे होतो त्याला संतांनी चक्र म्हटले आहे. 'सोहं सोहं चौदा चक्रे दावी अनुहात' असे श्रीगहिनीनाथ म्हणतात.

नासिकाग्री लक्ष ठेवणे असे जे गीतेत सांगितले आहे अथवा 'नासिकेपासुनी अंगुळ्या त्या चार । दृष्टी करी स्थिर तये ठायी।।' असे श्रीतुकाराममहाराजांनी सांगितले आहे, त्याचा अर्थ सांकेतिक आहे. नासिक हा शरीरातील एक भाग आहे. तेथे लक्ष ठेवून साक्षात्कार कसा होणार?, हा प्रश्न आहे. येथे शाखाचंद्रन्यायाने नासिकेतून जो प्राण वहातो तेथे लक्ष पाहिजे असाच अर्थ होतो. 'नासिकेचा प्राण कोण मार्गी येत' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. येथे लक्ष ठेवून नामात काल साधला तर पवन विजय होतो. श्वास नाममय होतो. तो जितका काल होतो त्याच कुंभकात नाद, बिंदु, कला, ज्योति अनुभवाला येतात.''- अशी ही नामस्मरणाची व पवनविजयाची गाथा श्रीदादांनी सांगितली आहे.

श्रीगुरुलिंगगीतेची ६६ पदे १९४८ पर्यंत झाली होती. त्यानंतरही श्रीदादांना कानडी, मराठी, इंग्रजी आणि संस्कृत या भाषातून ही पदे, श्लोक, इत्यादि श्रुत होत राहिले. इ.स. १९८५ पर्यंत पहिली ६६ पदे धरून एकूण पदे २२८ इतकी झाली. ही सर्वच पदे एकत्रितपणे प्रकाशित करण्याची प्रेरणा श्रीदादांचे एक निष्ठावंत भक्त श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे यांना झाली. श्रीदादांची अनुज्ञा घेऊन, निंबरगीकरमहाराजांच्या निर्याण शताब्दि वर्षात ही सर्व पदे त्यांनी छापवून घेतली. आणि गोकुळ अष्टमी. दि. ७-९-१९८५ रोजी''श्रीगुरुलिंगगीता'' या पुस्तकाच्या समर्पणाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रकाश भावे, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, श्री. बापूराव जोशी यांची भाषणे झाली तर प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचे हस्ते ग्रंथ-समर्पण झाले.

श्री. फडके नावाचे गृहस्थ दि. २० ऑक्टोंबर १९८५ या दिवशी मुंबईहून सांगलीत आले. त्यांनी श्रीदादांना काही शंका विचारल्या. त्यांच्या



शंकांचे निरसन श्रीदादांनी केले.

सांगलीजवळ असणाऱ्या माधवनगर गावी दि. २६ ऑक्टोबर १९८५ या दिवशी गोसलिया हायस्कूलमधील भूमिपूजनाचा कार्यक्रम श्रीदादांचे पवित्र हस्ते झाला. त्यानंतर श्रीदादा श्री. भराडिया यांचे घरी गेले. त्यांच्या घरातून बाहेर पडताना एक अवलिया साधु ''श्री.डेव्हिड'' समोर आले. त्यांना श्रीदादा 'ट्रिनिटी' असे म्हणत. श्रीदादा त्यांना नमस्कार करू गेले, तेव्हा त्यांनी श्रीदादांना नमस्कार करू दिला नाही. ते त्यावेळी श्रीदादांना ''बादशहा'' असे म्हणाले.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे दि. ११ नोव्हेंबर १९८५ रोजी श्रीदादांचे कीर्तनाचे वेळी आले होते. तेव्हा श्रीदादांनी आपले कीर्तन जरा लौकर आटोपते घेतले, व नंतर कवीश्वरमहाराजांना चार शब्द बोलण्याची विनंति केली. त्यांच्या प्रवचनात पुढील वाक्य आले :- ''कलियुगात भगवंताचे गुणगान हे श्रेष्ठ आहे आणि तेच गुणगान येथे केळकरांच्या घरी होत आहे.'' नंतर त्यांनी श्रीदादांना दीर्घायुरारोग्य चिंतिले.

卐卐卐卐卐

### प्रकरण १४ : संदर्भ

१) श्रीरामपाठामृत, प्र. व. के. कुलकर्णी, सांगली. १९८४
२) श्रीरामनामसप्ताह सुवर्णमहोत्सव, गुरुपौर्णिमा, सांगली. १९८४
३) वही क्रमांक १२७,१३६,१५८
४) केशवलिखितदासराम चरित्र टिप्पणे
५) लेजर क्रमांक २
६) गुरुपाठ, प्र. श्रीमती पार्वती गोविंददास शेटजी , सांगली. १९८४
७) संतसहस्रनाम, संकलक-प्रा. दा. वि. कुलकर्णी, प्र. चंद्रशेखर राम केळकर, सांगली. १९८५
८) सांप्रदाय बोध, प्र. मुकुंद शंकर सहस्रबुद्धे, सांगली, १९८४

# प्रकरण १५

## श्रीदादांची मुलाखत

(इ.स.१९८६-१९८७)

श्रीदादांची प्रकृति प्रथमपासूनच यथातथा होती. त्यामुळे तरुण तसेच प्रौढ वयात त्यांना वरचेवर ताप, खोकला इत्यादि दुखणी येत असत. बुधवार दिनांक १६-४-१९८६ पूर्वी आठ दहा दिवस श्रीदादा हे जुलाब, ताप, इत्यादि शारीरिक व्याधींनी हैराण झालेले होते. बुधवार दि.१६-४-१९८६ या दिवशी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास डॉ. कार्लेकर हे श्रीदादांना तपासण्यास आले होते. बुधवारपूर्वी एक दोन दिवस अगोदर त्या डॉक्टरांनी श्रीदादांची छाती तपासली होती. त्या संदर्भात ते म्हणाले,''मी दादांची छाती तपासत असताना मला काहीतरी वेगळे वाटू लागले. प्रथम काही अस्पष्ट असा वेगळा आवाज ऐकू येतो आहे असे मला जाणवले. मग मी अधिक काळजीपूर्वक त्या आवाजाकडे लक्ष दिले. मग माझ्या लक्षात आले की श्रीदादांच्या छातीतून सोहं सोहं असा ध्वनि मला ऐकू येत आहे. ही गोष्ट मी दादांना सांगितली त्यावर ते म्हणाले 'महाराजांची कृपा म्हणून असे घडते.' ''

डॉ. कार्लेकर हे श्री. विलासराव काटकर यांच्याशी परिचित होते. हे काटकर श्रीदादांचे अनुगृहीत होते. रविवार दि. २७-४-८६ या दिवशी सकाळच्या वेळी काटकरांची भेट झाल्यावर, डॉ. कार्लेकर त्यांना म्हणाले,''अहो काटकर, तुमच्याप्रमाणेच मलाही श्रीदादांचेकडून अनुग्रह घ्यावयाचा आहे. आणि श्रीदादा जर खरे सत्पुरुष असतील, तर ते माझ्या मनातील इच्छा ओळखून मला अनुग्रह देतील.'' नंतर त्याच दिवशी संध्याकाळी डॉ. कार्लेकर हे एकटेच श्रीदादांचेकडे आले. आल्या आल्या डॉ. कार्लेकरांच्याकडे पाहून श्रीदादा म्हणाले, ''मी तुम्हाला अनुग्रहाबद्दल विचारावे असे तुमच्या मनात आहे ना ?'' चकित झालेले डॉक्टर कार्लेकर होय म्हणाले. नंतर ते श्रीदादांना सांगू लागले, ''दादा, तुम्ही अगदी माझ्या मनातील ओळखलेत. आज सकाळीच मी काटकरांना असे म्हणालो होतो.'' येथे लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे त्या रविवारी काटकर आणि श्रीदादा यांची भेटच झालेली नव्हती. नंतर दुसरे दिवशी म्हणजे सोमवार दि.२८-४-१९८६



रोजी डॉ. कार्लेकरांना श्रीदादांचेकडून अनुग्रह मिळाला.

श्रीदादांचे एक भक्त श्री. मुरलीधर गणपतराव माने या नावाचे होते. त्यांचे घरी नारळी पौर्णिमा दि. ९-१-८७ रोजी श्रीदादांची पाद्यपूजा झाली. एका पाटावर एक कापड अंथरून त्यावर श्रीदादांचे पाय येतील अशा पद्धतीने श्रीदादांना बसविण्यात आले. पाद्यपूजा झाल्यावर, पाटावरील ते कापड घडी घालून ठेवण्यात आले. आठ दिवसांनी श्री. माने यांचे घरी सत्यनारायणाची पूजा होती. त्या पूजेत अंथरण्यास ते पाटावरील मागील कापड काढण्यात आले. आणि आश्चर्य. त्यावर श्रीदादांची पाऊले उमटलेली होती असे दिसले. माने यांनी लगेच श्री. ल. कृ. कुलकर्णी या श्रीदादांच्या अनुगृहीताला बोलावून ती पाऊले दाखविली. श्री. कुलकर्णी यांनी त्या कापडासह माने यांना श्रीदादांचेकडे नेले. ते कापड पाहून श्रीदादांना आनंद झाला. ते माने यांना म्हणाले, ''अहो माने, तुमचे घरी निंबरगीकरमहाराज आहेत. आता हे कापड फ्रेम करून तुमचे घरी ठेऊन द्या.'' त्याप्रमाणे माने यांनी केले.

ज्यावेळी प्रा. दा. वि. कुलकर्णी हे ''श्रीएकनाथीभागवताचा विवेचक अभ्यास'' या विषयावर पीएच्. डी. पदवीसाठी प्रबंध लिहिणार होते, त्यावेळी त्यांनी श्रीदादांचे मार्गदर्शन घेतले होते. त्यावेळी श्रीदादांनी त्यांना ''गुरुप्रसाद'' म्हणून एकनाथी भागवतातील ३१ ओव्या दिल्या होत्या. एकनाथी भागवताच्या ३१ अध्यायांतून एकेक अध्यायाची एकेक सारभूत ओवी निवडून श्रीदादांनी या ३१ ओव्या संगृहीत केलेल्या होत्या. आता श्रीदादांच्या नित्य कीर्तनाच्या उपक्रमास दि.७-२-१९८७ या दिवशी पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. या रौप्य महोत्सव प्रसंगी,''श्रीएकनाथी भागवत संक्षिप्त पाठस्तोत्र'' या शीर्षकाखाली हे ३१ ओव्यांचे स्तोत्र सौ. मुक्ता वैद्य व श्री. एस्. एस्. वैद्य यांनी प्रकाशित करुन, ''या कीर्तन रजत-महोत्सव प्रसंगी आपली ही अल्पशी सेवा'' श्रीदादांचे चरणी सादर केली. श्री. व सौ. वैद्य हे दांपत्य श्रीगणपतरावमहाराज कन्नूर यांचे शिष्य आहे. ते अधून मधून श्रीदादांच्या दर्शनास येत असतात.

आपले पितृदेव श्रीमामामहाराज केळकर यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष म्हणून शके १९०८ ते १९०९ (इ. स. १९८६-१९८७) हे वर्ष साजरे करण्याचे श्रीदादांनी ठरविले. त्या निमित्ताने या वर्षीच्या बारा महिन्यांतील

प्रत्येक महिन्यात एक याप्रमाणे श्री. बाळासाहेब केळकर, श्री. बापूसाहेब देशमुख, श्रीगणपतरावमहाराज कन्नूर, विद्यावाचस्पति विष्णुजी क्षीरसागर, श्री. बाबूराव गोखले, श्री. श्रीकांत देशपांडे, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, श्रीदत्तमहाराज कवीश्वर, श्री. मामासाहेब देशपांडे, श्री. दत्तवाडकर शास्त्री इत्यादि मान्यवर व्यक्तींची प्रवचने श्रीदादांनी आयोजित केली. श्रीमामांच्या याच जन्मशताब्दीच्या वर्षात श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे यांनी श्रीदादांना विनंति केली की श्रीदादांनी फक्त १०८ ओव्यांमध्ये श्रीमामामहाराजांचे चरित्र लिहावे. ही सूचना श्रीदादांना पसंत पडली. आणि मग त्यांनी एकाच बैठकीत १०८ ओव्यांमध्ये श्रीमामांचे संक्षिप्त चरित्र गुंफले. या १०८ ओव्यांना ''श्रीगोविंद-दर्शन'' हे नाव देण्यात आले. आणि हे गोविंददर्शन पुस्तक श्री. वामन विश्वनाथ सहस्रबुद्धे यांनी दि. २७-१-१९८८ रोजी प्रकाशित केले.

श्रीमामांच्या जन्मशताब्दीच्या वर्षातच, श्रीदादांच्या नित्यकीर्तनाला माघ शुद्ध दशमी, शके १९०८, शनिवार दि. ७-२-१९८७ रोजी पंचवीस वर्षे पूर्ण होत होती. श्रीदादांच्या नित्य कीर्तनाचा रजत महोत्सव साजरा करण्याचे ठरले. हे निमित्त पाहून श्रीदादांचे एक भक्त श्री. यशवंत केशव आपटे यांना असे वाटले :- श्रीदादांच्या कीर्तन-प्रवचनांत अनेक अपूर्व, अमोलिक, पारमार्थिक विषय आणि विचार येऊन जातात. ''परमार्थाचा हा अमोल खजिना'' ग्रंथरूपाने एकत्र करून छापला तर परमार्थप्रेमी जनांना त्याचा उपयोग होईल. मग त्यांनी असा संग्रह करण्याची विनंति आपले पिता प्रा. डॉ. के. वा. आपटे यांना केली. ते काम डॉ. आपटे यांनी लौकरच पूर्ण केले. श्रीदादांच्या या विचारसंग्रहाला ''श्रीदासराम-वचनामृत'' असे नाव देण्यात आले. या ग्रंथालाच ''परमार्थ प्रकाश'' असे वैकल्पिक नाव देण्यात आले. कारण संपूर्ण परमार्थशास्त्र अथवा साक्षात्कारशास्त्र यामध्ये संक्षिप्तपणे सुसूत्ररीत्या आले आहे. या ग्रंथातील प्रकरणांना ''ज्योति'' असे नाव दिलेले आहे. एकूण सात ज्योतींमध्ये देव/आत्मा, विश्वाचा पसारा, प्रपंच-परमार्थ, संत-सद्गुरु, साधन, नाम आणि साक्षात्कार या विषयांची गुंफण आहे. श्रीदासरामवचनामृत हा ग्रंथ श्री. य. के. आपटे यांनी माघ शुद्ध दशमी शके १९०८, शनिवार दि. ७-२-१९८७ या पवित्र दिवशी प्रकाशित केला.

श्री. गंगाधरपंत सिंग यांनी दिलेल्या जागेवर श्रीतात्यासाहेबमहाराज



कोटणीस यांच्या अचेतन कलेवराचे पूर्वी दहन करण्यात आले होते. त्या दहनभूमीवर कोटणीसमहाराजांची समाधि गंगाधरपंतांनी बांधली. त्यानंतर त्या समाधिमंदिराचे मागचे बाजूस त्यांनी एक औदुंबर वृक्ष लावला होता. या औदुंबराला सभोवती एक पार किंवा कट्टा बांधवून घेण्याचे श्री. दत्तात्रेय कर्णेकर यांनी ठरविले. त्यासाठी त्यांनी श्रीगंगाधरपंताची परवानगी घेतली. या कामाचा शुभारंभ म्हणून दि. ९-११-१९८७ रोजी सकाळी ७॥ च्या सुमुहूर्तावर श्रीदादांचे हस्ते एक नारळ वाढविण्यात आला. चंद्रशेखर केळकर यांचे हस्ते हळद कुंकू व बुक्का वाहून फुले व हार घालण्यात आले.

श्रीमामांच्या जन्मशताब्दीच्या वर्षातच श्रीदादांच्या नित्य कीर्तनाचा रजत महोत्सव येत होता. तेव्हा याच वर्षात श्रीमामा व श्रीदादा या दोघांच्याही लेखनाचा एक ग्रंथ काढावा अशी स्फूर्ति श्री. व. के. कुलकर्णी यांना झाली. श्रीमामांचे ''नित्यपाठ'' या शीर्षकाखाली काही अभंग होते. या अभंगांवर श्रीदादांनी कीर्तन-भाष्य लिहावे अशी विनंति श्री. व. के. कुलकर्णी यांनी श्रीदादांना केली. त्यांच्या विनंतीनुसार श्रीदादांनी मामांच्या नित्यपाठावर कीर्तने लिहून पूर्ण केली. आणि या दोहोंना मिळून ''नित्यपाठामृत'' असे नाव देण्यात आले. आणि हे नित्यपाठामृत श्री. व. के. कुलकर्णी यांनी फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९०८, मंगळवार दि. १०-३-८७ रोजी पुस्तकरूपाने प्रकाशित केले. या नित्यपाठामृताचे संदर्भात प्रा. म. अ. कुलकर्णी ऊर्फ स्वामी प्रज्ञानंद लिहितात :- ''या उत्कृष्ट अभंगांवरती तितकेच उत्कृष्ट भाष्य प. पू. रामरायमहाराज यांनी केलेले आहे. ते किती उत्तम आहे ? गंगातीरावर उत्तम संगमरवरी घाट बांधावा असा समसमा संयोग जुळून आलेला आहे.''

आपल्या चिमड संप्रदायातील संतसत्पुरुषांबद्दल श्रीदादांना अत्यंत आदर होता. परंतु आपला संप्रदाय सोडून इतर संप्रदायातील संतांबद्दल असूया अथवा मत्सर किंवा अनादर त्यांचे ठायी नव्हता. गोंदवलेकरमहाराज, स्वामी रामतीर्थ, भाऊसाहेब उमदीकर, स्वामी विवेकानंद, कबीर, तुलसीदास, रामकृष्ण परमहंस इत्यादींचेबद्दल श्रीदादांना पूज्यभाव होता; त्यांची नावे आदरपूर्वक श्रीदादांच्या कीर्तनात येत असत. साहजिकच बुधवार दि. १२-३-१९८६ रोजी श्रीदादांच्या राममंदिरात भगवान् रामकृष्ण परमहंस यांची जन्मशताब्दी मोठ्या थाटाने साजरी झाली. याच दिवशी श्रीदादांचे एक

भक्त श्री. हलदुले यांच्या हस्ते रामकृष्ण परमहंस यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. श्री. हलदुले यांचे मातापिता हे रामकृष्ण मिशनमधील स्वामी वीरेश्वरानंद यांचे शिष्य होते. प्रतिमा-पूजनानंतर रामनिकेतनमध्ये सकाळचा नित्य क्रम सुरू झाला. त्यानंतर उपस्थित मंडळींना तांदळाची खीर प्रसाद म्हणून देण्यात आली. कारण रामकृष्ण परमहंसांना तांदळाची खीर फार आवडत असे. सायंकाळी श्री. श्रीकांत देशपांडे यांचे उत्कृष्ट प्रवचन झाले व त्यानंतर श्रीदादांचे नित्याचे कीर्तन झाले. रामकृष्ण परमहंसांच्या या जन्मशताब्दि कार्यक्रमाच्या कारणाने श्रीदादांना जणु रामकृष्ण परमहंसांचा ध्यासच लागला. श्रीदादांच्या चिंतनात, बोलण्यात सारखा हाच विषय येऊ लागला. आणि परिणामत: रामकृष्ण परमहंस आणि निंबरगीकरमहाराज एकच आहेत, अशी श्रीदादांची खात्री पटली. या संदर्भात श्रीदादा लिहितात :- ''रविवार दि. ४-५-१९८६ रोजी आमचेकडे नित्य कीर्तनास येणाऱ्या, श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेतील, सौ. श्यामला कृष्णराव पटवर्धन यांचे जवळ अध्यात्मचर्चा चालू असतानाच सहजपणे श्रीरामकृष्ण, विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांचा हृदयस्पर्शी असा विषय निघाला. आणि त्यानंतर आश्चर्य असे :- मज समोर सारखे रामकृष्णच उभे राहिले. भगवान् रामकृष्ण परमहंस उभे आहेत आणि त्यांनी दोनी हात वर केले आहेत. जणु ते आशीर्वाद देत आहेत. असेच ते दृश्य होते. आणि त्या अवस्थेत मला श्रीरामकृष्णांचेवर अभंग स्फुरू लागले. कीर्तनाची तर वेळ झालेली. कीर्तनातच चि. यशवंत आपटे यास काही सांगत होतो. तो लिहीत होता. असे एक दोन अभंग झाले. कीर्तनात आतून तीच एक धूम होती. आणि कीर्तन, रामपाठ, पंचपदी झाल्यावर एका बैठकीलाच पुढे अठरा अभंग लिहून झाले. खाणे पिणे हे भानही नव्हते. आतून एक आनंद होत होता. ते हे २६ अभंग आहेत. हे जे अभंग मला स्फुरले किंवा ऐकू आले त्याची पावतीच रामकृष्णांनी दिली याचीही मौज वाटते.'' अशा प्रकारे रामकृष्ण परमहंस यांचेवर श्रीदादांना २६ अभंग स्फुरले अथवा ऐकू आले. या २६ अभंगांच्या समूहाला त्यांनी ''संजीवन पाठ'' असे नाव दिले. संजीवन पाठ अशाप्रकारे सिद्ध झाल्यावर, फाल्गुन वद्य सप्तमी, इ.स. १९८७ या दिवशी स्वामी वीरेश्वरानंद यांची पुण्यतिथि आली. श्रीदादांच्या गद्य स्पष्टीकरणासह हा



संजीवन पाठ प्रकाशित करावा अशी आंतरिक प्रेरणा श्री. हलदुले यांना झाली. तेव्हा त्यांनी श्रीदादांना विनंति केली की संजीवन पाठाचे गद्यात स्पष्टीकरण श्रीदादांनी लिहावे. त्यांच्या विनंतीला अनुसरून श्रीदादांनी संजीवन पाठाचे गद्यातील विवेचन लिहून काढले.आणि मग या गद्यातील विवरणासकट हा संजीवन पाठ श्री. हलदुले यांनी इ.स. १९८७ मध्ये प्रकाशित केला.

सांगलीमध्ये ''तुतारी'' या नावाचे एक साप्ताहिक निघते. त्याचे संपादक श्री. रंगनाथ दुधाळ हे आहेत. दि. २३-१-१९८६ रोजी ते श्रीदादांचेकडे येऊन, श्री. चंद्रशेखर यांचे उपस्थितीत, श्रीदादांना म्हणाले, ''महाराज, काही वर्षापूर्वी माझी परिस्थिति अगदी हलाखीची होती. परंतु एकदा तुमचे दर्शन घेण्याचा योग मला आला. आणि त्यानंतर माझी स्थिति भराभर सुधारत गेली. ती इतकी की मी आज लक्षाधीश झालो आहे. आता पुढील वर्षी तुमच्या नित्य कीर्तनाला पंचवीस वर्षे पूर्ण होणार आहेत हे मला कळलेले आहे. या रौप्य महोत्सवाचे निमित्ताने जानेवारी १९८७ मध्ये मी माझ्या खर्चाने एक पुस्तक काढू इच्छितो.'' पुढे काही कारणाने हे पुस्तक निघू शकले नाही. तरी श्री. दुधाळ यांनी आपल्या तुतारी या साप्ताहिकाचा ''रामराय केळकरमहाराज विशेषांक'' प्रकाशित केला. प्रकाशनदिन होता माघ शुद्ध दशमी, शके १९०८, दि. ७-२-१९८७. या विशेषांकात त्यांनी प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी, प्रा. म. अ. कुलकर्णी, प्रकाश भावे, श्री. केशवराव ग. जोशी, श्री. बाबूराव गोखले, श्री. श्रीकांत देशपांडे, श्री. कृ. रा. शिंगाडे, सौ. वासंती भिडे, सौ. उषाताई भावे यांचे लेख संगृहीत केलेले आहेत. तसेच या अंकात श्री. मधुकर शिपुरकर आणि श्री. ल. कृ. कुलकर्णी यांचे काव्यही आहे. या तुतारीच्या विशेषांकात प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी लिहितात : ''ती. दादांच्या कीर्तनाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. ही खरोखर भगवंताची आणि संतांची कृपा आहे. ही घटना रुप्याच्या नव्हे सोन्याच्या अक्षरांनी महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिण्याजोगी आहे.''

## श्रीदादांची मुलाखत

तुतारीच्या वर उल्लेखिलेल्या विशेषांकात श्री. रंगराव दुधाळ यांनी घेतलेली श्रीदादांची मुलाखत ''एक बातचीत श्रीदादांशी'' या शीर्षकाखाली

पृ. २८-३० वर प्रकाशित झालेली आहे. श्री. रंगराव श्रीदादांचेकडे येऊन म्हणाले, ''दादा, तुमच्या कीर्तनाला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणून महाराज मी एक तुमची छोटीशी मुलाखत घ्यायला आलो आहे.'' त्यावर महाराज एकदम म्हणाले, ''माझी कसली मुलाखत घेता? मी एवढं काय केलं आहे? मी देवाचे नाव घेतो झाले. अहो मी कीर्तन करतो ही भावना माझ्या मनात आली नाही. चालले आहे ते आमच्या श्रीमामांचे, श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे, माझे काही नाही. सारे काही त्या देवस्वरूप महात्म्यांचे.'' हे ऐकताच माझ्या मनात येऊन गेलं केवढी ही नम्रता ! मनुष्य एवढं काही तरी करतो आणि त्याचा केवढा डांगोरा पिटतो. इथं सारेच काही वेगळे. बुद्धिवादाच्या पलीकडचे. अनाहूतपणे माझे हात जोडले गेले. मग मी महाराजांना विचारू लागलो.

प्रश्न :- महाराज, आपल्या परिसराच्या सांनिध्यातल्या आणि व्यक्तिमत्त्वातल्या प्रसन्नतेचे मूळ कशात आहे ?

उत्तर :- चैतन्याचा स्रोत एकसारखा वहात राहिला की प्रसन्नता निर्माण होते. त्यावर सारा परिसर भारावून जातो. चैतन्याशी जवळीक गुरुकृपेने साधता येते. चैतन्य सर्वत्र असतेच. त्याची अनुभूति साधली की मग प्रसन्नता यायला कितीसा वेळ लागणार ? आपले मन प्रसन्न असल्यावर, आजूबाजूचे वातावरण प्रसन्नच होणार हे उघड आहे.

प्रश्न :- आपली नित्य कीर्तनाची प्रेरणा आपणास कशातून मिळाली ? साक्षात्कारासारखा काही प्रसंग आपणास आपल्या पूज्य पिताजींप्रमाणे अनुभवावयास मिळाला का?

उत्तर :- भगवान् श्रीसद्गुरु तात्यासाहेबमहाराज यांच्या अमृतकृपाहस्ताच्या सामर्थ्यामुळे अगदी लहानपणापासून कीर्तन होऊ लागले. साक्षात्काराबाबत सांगावयाचे झाल्यास, साक्षात्कारामुळे जीवन व जीवन हाच साक्षात्कार अशी माझी धारणा आहे.

प्रश्न :- आपण वयाच्या पाचव्या वर्षापासून कीर्तन करता?

उत्तर :- अहो, त्यात काय एवढं आश्चर्य ! महाराजांनी तसा आशीर्वाद लहानपणीच दिला होता. त्याचे असे झाले. माझे आजोळ कुरुंदवाडचे.



त्यामुळे माझा जन्म कुरुंदवाड येथे झाला. याच वेळी श्रीतात्यासाहेबमहाराज श्रीमंत कुरुंदवाडकर यांचेकडे कीर्तनासाठी आले होते. माझे आजोबा 'नाना' महाराजांचे निस्सीम उपासक. त्यांनीच त्यावेळी महाराजांना माझ्या आजोळी आणले होते. 'या बाळावर कृपा असावी', असे म्हणून नानांनी मला माझे १४ वे दिवशी महाराजांचे मांडीवर ठेवले. त्यावेळी महाराज म्हणाले, ''आहेच मुळी हा आमचा.''असे म्हणून माझ्या मस्तकावरून अमृतहस्त फिरवला.'' या मुलाचे नाव 'राम' असे ठेवा,'' असे सांगितले. ''हा अगदी लहानपणापासून कीर्तन करू लागेल'', असा कृपाशीर्वाद दिला. या त्यांच्या कृपाशीर्वादाप्रमाणे लहानपणापासून कीर्तन होऊ लागले.

माझ्या पितृदेवांनी त्यांची अखेरची इच्छा म्हणून ''रामजी, तू पाच मिनिटे का होईना नित्य नेमाने कीर्तन करीत जा'', असे सांगितले. तेव्हापासून त्यांच्याच कृपेने हे अखंड कीर्तन चालले आहे.

प्रश्न :- आपली गुरुपरंपरा कृपया सांगाल काय?

उत्तर :- हो. का नाही ? अहो, आमचा चिमड संप्रदाय हा स्वरूप संप्रदाय आहे. तो रेवणसिद्धांच्यापासून सुरू झाला. मरुळसिद्ध, काडसिद्ध, आणि आमचे निंबरगीचे महाराज की ज्यांनी या संप्रदायाची चिमड येथे मुहूर्तमेढ रोवली. पुढे रघुनाथप्रिय साधुमहाराज, चिमडचे रामभाऊमहाराज, तात्या-साहेबमहाराजांनंतर आमचे श्रीमामा अशी परंपरा आहे.

प्रश्न :- आपल्याला कृपाशीर्वाद वगैरे कुणाचा लाभला?

उत्तर :- अगदी लहानपणी श्रीतात्यासाहेबमहाराजांचा कृपाशीर्वाद लाभला. तो आत उमटला. पण ही साधनाची कृति बरोबर आहे की नाही हे कोण सांगणार ? म्हणून मी आमच्या मामांना हे विचारले. त्यांनी मला गुरुवर्य दादासाहेब कोटणीसमहाराज यांचेकडे नेले. त्यांना साधनाला बसून दाखवताच त्यांनी बरोबर म्हणून सांगितले. तसेच साधन पुढे चालू झाले. यामुळे श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, श्रीमामा व श्रीदादामहाराज कोटणीस यांच्यात मला कधीही फरक वाटला नाही.

यानंतर श्रीनागाप्पाण्णामहाराजांच्या वचनाप्रमाणे श्रीनिंबरगीकर-महाराजांनी कायेच्या वाचेच्या मनाच्या पलीकडचे नाम, त्याचा बोध

गुरुलिंगगीतेच्या रूपाने श्रुतिरूपाने १९३८ साली केला. हालसिद्धनाथांनी प्रेमाचा वर्षावच केला.

प्रश्न :–आपल्या कुटुंबावर परमेश्वरी कृपेचे छत्र आहे. म्हणूनच आपण सगळे परमेश्वरभक्तीत रंगलेले आहात. परमेश्वरभक्तीच्या सातत्याचा हा धागा आपले पिताजी, आपण, आपले चिरंजीव यांच्याप्रमाणे आपल्या वंशात मागे आणखी कोणात दिसतो का ?

उत्तर :– आमचे मूळ पुरुष केशव. भक्तीची परंपरा त्यांच्यापासूनच सुरू झाली. ज्ञानदेव तेहत्तिशी हा ग्रंथ १० पिढ्या वाचतात. सोमवारचा उपवास व नामस्मरण पूर्वीपासून चालत आलेले. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ श्रीमामांच्यामुळे आमच्या घरात आला. आमचे नाना म्हणजे माझे आजोबा. दररोज शंकराचा १२००० जप करीत असत. पार्थिव पूजा त्यांनी श्री. लक्ष्मण दीक्षितस्वामी यांच्याकडून घेतली. ती त्यांनी अगदी शेवटच्या दिवसापर्यंत चालविली. माझ्या आजी कै. सौ. लक्ष्मीबाई यांना श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचा अनुग्रह. त्यामुळे त्यांचे व नानांचे श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचेकडे वारंवार येणे जाणे असे. नानांना अनुग्रह तात्यासाहेबमहाराज यांचा. आणि टेंबेस्वामी यांच्या हातचा प्रसाद म्हणून एक रुपया त्यांना मिळालेला. असा हा आमचे घराण्यात भक्तीचा वारसा पिढ्यान पिढ्या लाभला. श्रीरामेश्वर–सोमेश्वर आमचे कुलदैवत. सोमेश्वरापासून रेवणसिद्धांचा अवतार. त्यामुळे कुलदैवते व गुरुपरंपरा यांचे एकच सूत्र आहे.

प्रश्न :– आज मनुष्य जिकडे तिकडे पैसा, सत्ता, सुखसाधने यांच्या मागे लागलेला दिसतो. पण बहुसंख्य लोकांना मन:शांति नाही. ती कशामुळे मिळेल असे आपणांस वाटते?

उत्तर :– मन:शांति का नाही मिळणार ? त्यासाठी भरकटणारे विचार बाजूला होणे आवश्यक आहे. निर्विषय होणे हाच ब्रह्मानंद आहे. यासाठी मन स्थिर होण्याची आवश्यकता आहे. भौतिक साधनांनी मन:शांति प्राप्त होणार नाही. गुरुकृपेने साधनाने अंतर्मुख झाल्यास मन:शांति लाभू शकते. त्यासाठी चैतन्याशी जवळीक आवश्यक आहे. विज्ञानाने केलेल्या प्रगतीने बाह्याकर्षणामुळे परावलंबित्व आले. त्यामुळे स्वतंत्र विचार करण्याची क्षमताच कमी झाली आहे. मुळात जीव बाह्याकर्षणीच आहे. भोवतालची



सुखे क्षणैक आहेत हे कळल्यावर, शाश्वत सुखाकरता जीव अंतर्मुख झाल्यास, त्याला मन:शांति निश्चित लाभेल.

प्रश्न :– प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालता येईल का? आपल्या मते कशी?

उत्तर :– येईल की. कारण प्रपंच व परमार्थ या एकाच नाण्याच्या दोन बाजू. प्रपंच हा परमार्थाच्या वाटेवरचा कसोटीचा दगड असून, मनोव्यथा दूर करण्यासाठी तो एक सुंठीचा वळसा आहे. आत्मा व शरीर एका ठिकाणी असल्याशिवाय या जगात दुसरे काहीच असू शकत नाही. आपण तिसराच विचार करू लागलो तर काहीतरी चवथेच होऊन बसते. देहासाठी प्रपंच, आत्म्यासाठी परमार्थ, यांची सांगड अटळ आहे. जीव कितीही ज्ञानी झाला तरी त्याला दुपारची वेळ कठिण आहे. म्हणून केवळ त्याच्या मागे लागावे तर शेवटी हात झाडून जायचे आहे. यासाठी दोन्हींचा समन्वय आवश्यकच आहे. याकरिता क्षेत्र–क्षेत्रज्ञाचे ज्ञान होणे अगत्याचे आहे. हे जाणणारा प्रपंच व परमार्थ यांची सांगड घालू शकतो.

प्रश्न :– पाश्चिमात्य देश आज भारतीयांच्या भक्तिमार्गाकडे वळताना दिसताहेत. आपल्या संस्कृत वाङमयात रस घेताहेत. काय कारण असावे ?

उत्तर :– सध्याची सुखाची साधने दु:खाकडे नेणारी आहेत. प्रयोगावस्थेतच मनुष्य नाशाकडे जातोय याची जाणीव त्यांना झाली आहे. त्यामुळे पाश्चात्य लोक आपल्या संस्कृतीचा अभ्यास करू लागले आहेत. जगाच्या बुडाशी काय मूळ तत्त्व (element) आहे हे एकीकरण (synthesis) व पृथक्करण (analysis) याद्वारा पाश्चात्य शास्त्रज्ञ त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु असा शोध करताना, त्यांच्या हाताला मूळ तत्त्व न येता, तत्त्वातून तत्त्व अशा प्रकारे नवनवीन तत्त्वे हाताला येत आहेत. मूळगामी तत्त्व म्हणजे आत्मा हा प्रयोगी आहे. तर तो प्रयोगाने कसा सिद्ध होणार असा प्रश्न आहे. त्याने हा सारा विश्वाचा प्रयोग केलेला आहे. तर विश्वातील पदार्थांच्या साहाय्याने मूळगामी तत्त्व किंवा आत्मा हा कसा सिद्ध करता येईल? ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे अज्ञान म्हणजे अज्ञान, व ज्याच्यामुळे ज्ञान व ज्याच्यामुळे अज्ञान त्याचे ज्ञान म्हणजे ज्ञान, याची जाणीव नसल्यामुळे केवळ अज्ञानच शिल्लक राहते. शाश्वत असा जो आत्मा त्याच्या ठिकाणी स्थिर झाल्याशिवाय खरे ज्ञान होऊ शकत नाही.

आपल्याकडील अध्यात्मात मूळ तत्त्व किंवा आत्मा प्राप्त करून घेण्यासाठी साधना आहे. त्याच्यासाठी लागणारी उपकरणे व प्रक्रिया वेगळी आहे. त्यात बाह्य गोष्टींचा संबंध येतच नाही. त्यामुळे पाश्चात्य लोक भारतीयांच्या भक्तिमार्गाकडे आज आकृष्ट होताना दिसत आहेत.

प्रश्न :- सध्याच्या शिक्षणात धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव करावा का? कोणत्या पद्धतीने हे धार्मिक शिक्षण लहान मुलांच्या मनात रुजवावं?

उत्तर :- धर्माचे खरे स्वरुप कळले तर ते यच्चयावत् सर्व मानवाला ग्राह्यच ठरेल. आज ज्याला धर्म म्हणून समजण्यात येते ते धर्माचे बहिरंग आहे. कालमान-परिस्थितीनुसार ज्याप्रमाणे निसर्ग बदलतो, त्याचप्रमाणे सांस्कृतिक आचारांत, विचारांत फरक होत जातात. तसेच धर्मातही फरक होत जातात. दृश्य व मन परस्परावलंबी असल्याने, दृश्यातीत व मनातीत खऱ्या स्वरूपाची ओळख झाल्याशिवाय खऱ्या धर्माचे ज्ञान होत नाही. आणि मग हे सारे धर्म भेदमूलकच ठरतात. त्यामुळे त्यांत निष्कारण गैरसमज होऊन, संघर्ष सुरू होतो आणि ते एक कलहाचे कारण ठरते. ''सकल धर्मामाजी धर्म । स्वरूपी रहाणे हा स्वधर्म'', या समर्थांच्या व्याख्येप्रमाणे अशा प्रकारचे धर्म-शिक्षण विश्वाला हितकारी व उपकारी असून, गैरसमज दूर करणारे आहे. या योगाने मानवता जागृत होऊन, मानवधर्माची स्थापना अत्यावश्यक ठरणारी आहे.

प्रश्न :- नामस्मरणामुळे दुरितक्रम मानला गेलेला स्वभाव पालटू शकतो का?

उत्तर :- का नाही पालटणार? अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील. एका नामाने सारे काही होते. वाल्या कोळी, अजामेळ यांची उदाहरणे आपल्या दृष्टीसमोर आहेतच. नामाने दगड जिथे तरले तिथे हा मनुष्यरूपी दगड का नाही तरणार? नामाने आचारात, विचारात, उच्चारात सर्व काही बदल होतो, अंतर्बाह्य शुद्धि होते. नामाने चैतन्याशी जवळीक साधता येते. चराचरात परमेश्वर दिसू लागतो. मग दुरितक्रम स्वभाव पूर्वीसारखा राहीलच कसा? नामाने कसाई जिथे बदलतो तिथे मनुष्याचा स्वभाव का पालटणार नाही?

प्रश्न :- अशांत अशा तरुण पिढीला आपला संदेश कोणता?

उत्तर :- प्रक्षुब्ध वातावरणामुळे अशांतता पसरते. प्रक्षोभक घटना, विचार, लेख, साहित्य या गोष्टीमुळे विचारसरणी बदलते. शक्य झाल्यास, रेडिओ,



टी. व्ही. यांवर काही बंधने असावीत. त्यामुळे बरेच काही साधेल. अशांतता ब्रह्मदेवालासुद्धा असते. नामस्मरणाने प्रक्षोभक वृत्ति नाहीशी होऊन, निंदास्तुति टळते, काळाचा अपव्यय टळतो, व शक्ति रिझर्व्ह रहाते. यासाठी नामात गुंतून रहाणे महत्त्वाचे आहे.

येथे रंगरावांचे प्रश्न व त्यांना श्रीदादांनी दिलेली उत्तरे संपली. त्यानंतर रंगराव सांगतात :- ''ज्याचे नाव राम, ज्याच्या मुखात राम, आणि ज्याच्या अंतरातही रामाशिवाय दुसरं काही नाही असा महात्मा सापडणे मुष्कीलच. भरल्या अंत:करणाने महाराजांचा निरोप घेतला.''

卐卐卐卐卐

## प्रकरण १५ : संदर्भ


१) केशवलिखितदासरामचरित्र टिप्पणे
२) श्रीएकनाथी भागवत संक्षिप्त पाठस्तोत्र, प्र. मुक्ता वैद्य आणि श्री. एस्. एस्. वैद्य, सांगली, १९८६
३) श्रीगोविंददर्शन
४) श्रीदासरामवचनामृत, प्र. य. के. आपटे, सांगली, १९८७
५) नित्यपाठामृत, प्र. व. के. कुलकर्णी, सांगली, १९८७
६) सांगली माहात्म्य
७) संजीवन पाठ, प्र. विवेक मु. हलदुले, सांगली, १९८७
८) साप्ताहिक तुतारी प. पू. रामराय केळकरमहाराज विशेषांक, संपादक-दुधाळ, माघ शुद्ध १०, शके १९०८, दि. ७-२-१९८७
९) फाइल क्रमांक ४

## प्रकरण १६

# ''नाम आणि नामस्मरण''

(इ.स. १९८८-१९९०)

श्रीमामांच्या जन्मशताब्दी वर्षातील मुख्य पर्वकाळ फाल्गुन शुद्ध अष्टमी ते फाल्गुन शुद्ध दशमी, शके १९१० असा तीन दिवसांचा होता. या तीन दिवसांत श्रीमामांच्या 'अमृतवाणी' या गाथ्याचे पारायण, श्री. मनोहरपंत सबनीस व सौ. सबनीस यांचे भजन, मंगला जोशी व मंजूषा कुलकर्णी यांचे गायन, श्री. काशीनाथ बोडस, कानपूर यांचे अभंगगायन, आणि श्री. ज्ञाननाथजी रानडे यांचे प्रवचन असे कार्यक्रम झाले.

श्रीमामांच्या जन्मशताब्दीच्या काळात फाल्गुन शुद्ध १०, शके १९१०, दि. २७-२-१९८८ हा मुख्य दिवस होता. सनईच्या सुरांनी कार्यक्रम सुरू झाला. मामामहाराजांच्या सिंहासनाला रुद्राभिषेक करण्यात आला. ब्रह्मवृंदांनी शांतिमंत्रांचे पठण केले. श्री. केशवराव जोशी यांचे संस्कृतमधून प्रवचन झाले. पुण्याहून आलेले पंडित वसंतराव गाडगीळ यांचेही संस्कृतमधून प्रवचन झाले. ते प्रवचनात म्हणाले, ''मामामहोदयानां इयं अखंड-संकीर्तन-परंपरा अखंड-कालपर्यंतं प्रचलिता भवतु। यथा गोविंदमामामहोदयानां श्रीचरणानां जन्म-शती-महोत्सव: स्वानंदसाम्राज्ये मग्नै: सर्वै: महता उत्साहेन कृत: तथैव श्रीदासरामचरणानां जन्म-शतीमहोत्सव: अपि यथाकाले महता उत्साहेन भवतु।।''. श्री. केशवराव जोशी यांनी संस्कृत भाषेत लिहिलेले श्रीमामामहाराजांचे चरित्र सकाळीच प्रकाशित करण्यात आले.

त्यानंतर श्रीमामांच्या पालखीचा दिंडी-सोहळा सुरू झाला. दिंडीमध्ये बँड, तुतारी, पखवाज-वादनयुक्त भजन, आणि जयजयकार होते. अशा थाटामध्ये श्रीदादांचे घरातून ही दिंडी निघाली. दिंडीचे अग्रभागी श्रीदादा होते. दिंडीचा प्रवास चालू असताना पालखीपुढे घागरीतून पाणी ओतले जात होते, पालखीवर फुले उधळली जात होती, व पालखीतील मामामहाराजांच्या प्रतिमेला हार घातले जात होते. दिंडी सिटी हायस्कूलसमोर आली. याच शाळेत श्रीमामा काही काळ शिक्षक होते. या शाळेच्या शिक्षकांपैकी श्री. शंकरराव काळे या शिक्षकांनी पालखीला हार घातला.



मार्गक्रमण करीत दिंडी कोटणीसमहाराजांच्या कैवल्यधामापुढे आली. तेथे श्रीगुरुनाथमहाराज कोटणीस पुढे आले व त्यांनी पालखीला हार घातला. पालखी कैवल्यधामाचे आत गेली. तेथील त्रयमूर्तींच्या समाधीला पालखीने तीन प्रदक्षिणा घातल्या. मग पंचारती झाली, व प्रसाद वाटण्यात आला. मग तेथून बाहेर पडून दिंडी संत सेनामंदिरमार्गाने कृष्णानदीकाठावरील कोटणीस-महाराजांच्या समाधिमंदिरापुढे आली. तेथेही समाधिमंदिरात पालखीने तीन प्रदक्षिणा केल्या, आणि मग दिंडी रामनिकेतनमध्ये परत आली. रामनिकेतनच्या पुढील अंगणात पालखी आल्यावर, श्रीदादांच्या चार सुना सौ. रोहिणी, सौ. सुनीता, सौ. अर्चना व सौ. अपर्णा, आणि सौ. वासंती भिडे यांनी पालखीला औक्षण केले. पालखी मग राममंदिरात गेली व तिने देवाच्या देव्हाऱ्याला तीन प्रदक्षिणा घातल्या. नंतर श्रीमामांची आरती म्हणण्यात आली आणि नंतर महाप्रसाद झाला.

संध्याकाळी श्रीदादांच्या कीर्तनातच दोन ग्रंथांचे प्रकाशन व समर्पण झाले. सौ. श्यामला पटवर्धन यांनी प्रकाशित केलेल्या 'श्रीदासरामगाथे'चे समर्पण प्रा. म. अ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. श्री. प्रकाश भावे यांनी भाविकपणे लिहिलेल्या श्रीमामांच्या ''अखंड कीर्तनानंद'' या भावुक चरित्राचे प्रकाशन आणि समर्पण श्रीदादांच्या हस्ते झाले.

श्रीदादांच्या कीर्तनानंतर मा. मधुकरपंत शिपुरकर, प्रा. म. अ. कुलकर्णी, आणि श्रीमती सुमन महादेवकर यांची प्रवचने झाली. त्यानंतर श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांचे वारकरी पद्धतीने निरूपण झाले. त्यानंतर बरडे विठ्ठल मंदिरातील मंडळीचे भजन रात्री तीनपर्यंत चालले. त्यानंतर रामपाठाचे पठण आणि पंचपदी झाली आणि मग प्रसाद-वाटप झाले. अशाप्रकारे मुख्य दिवसाचा कार्यक्रम यथासांगपणे समाप्त झाला.

मामांच्या जन्मशताब्दीच्या दि. २७-२-१९८८ रोजीच दैनिक केसरीने ''कै. मामामहाराज केळकर जन्मशताब्दी महोत्सव'' या शीर्षका-खाली एक पुरवणी काढली होती. त्या पुरवणीत श्रीकांत देशपांडे यांनी घेतलेली श्रीदादांची मुलाखत प्रसिद्ध झाली. ही मुलाखत नेहमीच्या पद्धतीप्रमाणे प्रश्न आणि उत्तर या स्वरूपात नव्हती, तर ती सरळपणे श्रीदादांचे मनोगत व्यक्त करणारी अशी होती. या श्रीदादांच्या कथनात 'नाम' आणि

'नामस्मरण' इत्यादि विषयीचे श्रीदादांचे पारमार्थिक विचार फार चांगल्या प्रकारे प्रकट झाले आहेत. हे विचार अत्यंत महत्त्वाचे असल्याने, ते येथे जसेच्या तसे उद्‌धृत केले आहेत.

श्रीदादा सांगतात :-

''नाम म्हणजे शब्द नव्हे. किंवा अक्षर नव्हे. संघाताशिवाय होणारा ध्वनि म्हणजे नाम होय. ते स्वसंवेद्य, स्वत:सिद्ध, स्वयंपूर्ण, स्वयंचलित, 'स्व' ची ओळख करून देणारे, 'स्व' हेच सर्व आहे किंवा सर्व हेच 'स्व' आहे, हे स्पष्ट करून, जीवाचा घटक विश्व की विश्वाचा घटक जीव याची अनुभूति देणारे, गुरुत्व आणि मनाला समाधान-शांति देणारे प्रभुत्व त्या एका नामातच आहे. या नामाचा वेध आणि शोध पूर्वी ऋषिमुनींनी आणि अलीकडे या काळात साधुसंतांनी घेतला, आणि त्यांना असे दिसून आले की नामाचा व जीवनाचा घनिष्ठ संबंध आहे, आणि दगड-धोंडा, झाडे-वेली, पशु-पक्षी, आणि मानव या जीवनानेच समृद्ध आहेत. हे जीवन हे ''जीव-न'' असे आहे.

''(नामाने) या जीवाचा अहंकार शिल्लक रहात नाही. आणि त्यामुळेच साक्षात्कार होतो. एक अहंकार तरी किंवा साक्षात्कार तरी अशी वस्तुस्थिति आहे.'' वस्तुस्थिति'' या (शब्दा)चा अर्थ असा :- स्थितिरूप वस्तु. यामुळे स्थिति आहे म्हणून स्थापकता आहे का स्थापकता आहे म्हणून स्थिति आहे, हेही विचारात घेणे आवश्यक आहे, आणि याचा स्थापक कोण किंवा संस्थापक कोण असा प्रश्न आहे. स्थापकाचा काही बोध यावरून होतो का हे सहज गौप्य येथे प्रगट करतो.

''जीवाचा आणि श्वासाचा संबंध आहे. श्वासाचा आणि नामाचा संबध आहे. नामाचा आणि ब्रह्माचा संबंध आहे. म्हणून नामानेच ब्रह्मसाक्षात्कार होतो. 'ब्रह्म' ' ब्रह्म' असे म्हणून ब्रह्म भेटत नाही. नामाने त्याची अनुभूति घेता येते. अनुभव एकाचा एकाला येत नाही. आणि असे विधान केले की अध्यात्मशास्त्र हे लंगडे आहे असा बुद्धिवाद जडवादी (लोक) करतात. पण व्यवहारातसुद्धा एकाने जेवल्यावर दुसऱ्याचे पोट भरत नाही. मग व्यवहारशास्त्र लंगडे म्हणणार काय? ते जर लंगडे नसेल तर



अध्यात्मही लंगडे नाही.

''या विश्वाच्या बुडाशी एक सोऽहं तत्त्व आहे. या सोऽहंचा विलास म्हणजे हे जग आहे. या विश्वाचा केंद्रबिंदु म्हणजे सोऽहं आहे. आणि परिघ हा बिंदूंचाच बनलेला असतो हे उघड आहे. म्हणजे सोऽहं शिवाय काही नाही. हे ज्ञान सोऽहंरूपी गुरूने कृपा केली तर स्पष्ट होते; कारण हे ज्ञान पुस्तकी नाही. ही एक कला आहे, एक धाटी आहे; म्हणून गुरुकृपेची आवश्यकता आहे. कृपेने व्यवहारिक ज्ञान होत नाही पण आत्मज्ञान मात्र नक्की होते. आणि म्हणून सोऽहंरूप गुरुकृपेने सोऽहं साधना साधली तर सोऽहं ध्यानाने सोऽहं समाधि अवस्थेत सोऽहं सिद्धि प्राप्त होऊन, सोऽहंचा साक्षात्कार होतो. कारण सोऽहंस्वरूप म्हणजेच पांडुरंग. ''सोऽहं ब्रह्म विटेवरी'' असे श्रीतुकाराम-महाराज म्हणतात. ज्यांनी ज्यांनी ही पातळी गाठली, त्यांचे विश्वच वेगळे आहे आणि ते सोऽहं विश्व आहे . ऋग्वेदातील दहाव्या मंडलात नासदीय सूक्तात ज्या सात ऋचा आहेत, त्यातील तत्त्वज्ञान उपनिषदे-आरण्यके आणि भगवद्‌गीता यांत प्रगट झाले, हे प्रगट आहे. हा सर्व विषय पहाता, ज्यांचे विश्व सोऽहं विश्व आहे, तेच नामाचा व श्वासाचा परस्पर संबंध ओळखू शकतात, आणि त्याची परस्पर देवाण- घेवाण करू शकतात.

''नामाचे देहातीत स्मरण म्हणजे काय? स्मरण म्हणजे चैतन्य आणि चैतन्य म्हणजे स्मरण हे एक लक्षात घेण्यासारखे आहे. स्मरणाशिवाय नुसत्या नामानेही साक्षात्कार संपादन करता येत नाही असे एक इंगित आहे.''नवल स्मरणाची ठेव । नामी नाही अनुभव'' असे नाथमहाराज सांगतात, तर ''नामस्मरण तुम्ही करा हरीचे ध्यान '' असे नरहरी सुनावतात, आणि नामस्मरण व ध्यान यांत फरक नाही, असे ते दाखवून देतात. तर ''स्मरण देव स्मरण देव स्मरण देव जाणा '' यांत समर्थ स्मरण देव उभा करतात. येथे स्मरण म्हणजे आपण जे स्मरण व विस्मरण हे शब्द व्यवहारात वापरतो त्या अर्थांनी स्मरण हा शब्द समर्थांनी वापरलेला नाही. ज्या स्मरणामधून विस्मरण आणि विस्मरणामधून स्मरण घडते ते स्मरण होऊच शकत नाही. ज्या सुखाने दु:ख आणि दु:खातून सुख निर्माण होते, त्याला सुख म्हणता येणार नाही. तसेच, पुण्यातून पाप, स्वर्गातून नरक, नरकातून स्वर्ग म्हणजे सारे पाप व नरकच आहे. धर्मातून अधर्म व अधर्मातून धर्म होत असेल

तर तो धर्म होऊ शकत नाही. म्हणून तर धर्म, पंथ, जातिभेद या साऱ्या शृंखला तुटल्याशिवाय ईश्वराचा साक्षात्कार होत नाही, असे आमचे भगवान् निंबरगीकरमहाराज सांगतात. तर दिव्याची ज्योत एकच आहे; त्यावर ज्या रंगाची काच ठेवावी तसा प्रकाश पडतो, हे उघड आहे. प्रकाश भिन्न असला तरी ज्योत एकच आहे, असे भगवान् रामकृष्ण परमहंस म्हणतात. ज्याला ज्योत एकच आहे, याचे ज्ञान झाले नाही, तेथे धर्माधर्मात लढे उत्पन्न होतात. कारण त्या ठिकाणी व्यक्तिभाव जागृत असतो. समष्टिभावाने व्यक्तिभाव लयाला जातो. हा समष्टिभाव गुरुकृपेने उदित होतो. देश-काल-परत्वे धर्माच्या आचार-विचारांत फरक होतो, राहणीमानात फरक होतो; हा सारा बदल प्रकृति-मानामुळे होतो. परंतु आत्मा हा इथून तिथून सर्वांचा एकच असल्याने, आत्मदर्शन घडवणारा जो धर्म त्यात फरक होण्याचे प्रयोजनच नाही.

''प्रकृति या शब्दाची व्युत्पत्ति पाहताना कृति, आकृति, प्रतिकृति, प्रगति आणि प्रकृति अशी त्याची एक साखळी आपणास दिसून येईल. या जगाच्या बुडाशी असे एक जीवन होते की त्या वेळेला आत्ता जे जगात आपण पहातो ते काही नव्हते; दृश्यही नव्हते आणि अदृश्यही नव्हते. एक वायुरूप चैतन्य नुसतेच वरखाली होत राहिले होते. पण या शब्दाने आता आपल्याला जे काही खालवर झाले तसे होत नव्हते. चैतन्यरूप वायु याचा अर्थ चित्‌वायु. पंच प्राण, पंचभूत प्राण, प्राणगति, प्राणशक्ति, प्राणवृत्ति, प्राण एव आत्मा असे जे श्रुतिवचन आहे, तो प्राण यांची गल्लत करून चालणार नाही. या सगळ्यांचे एकीकरण म्हणजे हा विश्वाचा खेळ. यात संघटन आणि विघटन अशा दोन प्रकारांचे विधायक आणि विघातक कार्य चालू आहे, हे विधेयक आम्ही मांडले तर ते अप्रस्तुत होणार नाही. हे संघटन व विघटन ज्या एका शक्तीमुळे होते की ज्यामुळे एवढ्या अवाढव्य विश्वात ग्रहाग्रहांची धडक होऊन कुठे अपघात झाला असे दिसून येत नाही. संघात -घात - अपघात हे सारे मानवाच्या माथी आहेत. कारण मनुष्य चैतन्य शक्तीला ओळखू शकत नाही. म्हणून माणसाला देव बुद्धि देऊन चुकला आहे. म्हणून तर माणसाने देवाच्या डोक्यावर हात फिरविला आहे:- देव, धर्म नाही अशी मुक्ताफळे फक्त मानवांचे तोंडून येतात, पशु-पक्षी यांच्याकडून नाही. आणि म्हणून पर्जन्यवृष्टि



पशुपक्ष्याकरिता होते, मानवासाठी नाही. काड्यापेटी जर माणसाकडे दिली तर स्वयंपाक करायचा की घर पेटवायचे? याचा दोष काड्यापेटी देण्याऱ्याचा आहे काय? शेवटी माणूसच दोषी ठरतो. म्हणून या जगात कुणी देव आहे म्हणतात, कुणी देव नाही म्हणतात. कुणी आहे म्हणावे वा कुणी नाही म्हणावे असा एक देवच आहे. कारण का तर तो दिसत नाही. माणसाचे मन दिसत नाही, तरी सुद्‌धा त्याला अस्तित्वभाव आहे. हा सर्व विषय पहाता, विश्वाची सिद्‌धि ज्ञानाने, पण ज्ञानाची सिद्‌धि कशाने? उघड आहे, बुद्‌धि असेल तर ज्ञान आहे, आणि प्राण नसेल तर बुद्‌धि कुठून असणार ? बुद्‌धिच नसेल तर शरीरात व्यवहार काय होणार? व्यवहार या स्मरण- विस्मरणानेच चालतो. आवश्यक गोष्टींचे स्मरण व अनावश्यक गोष्टींचे विस्मरण याचे नाव व्यवहार.आपल्या मेंदूमध्ये एक मोठे वाचनालय आहे. त्यात सर्व घटनांची नोंद होत असते. काही गोष्टींबाबत वेळ येईल तेव्हा ''बघून घेईन'' असे माणूस बोलतो, नंतर विसरतो. पण ती वेळ येताच त्याची जाणीव होते, व परिणाम स्पष्ट होतात. हे जे स्मरण-विस्मरण ते वेगळे, व समर्थ ज्याला ''स्मरण देव'' म्हणतात ते वेगळे. अखंड स्मरण हा देव व अखंड विस्मरण म्हणजे मरण, आणि स्मरण-विस्मरण हा व्यवहार. व्यवहार नव्हे तो परमार्थ व परमार्थ नव्हे तो व्यवहार. शरीर नव्हे तो आत्मा, व आत्मा नव्हे ते शरीर कसले? आत्मा हा आत्म्यानेच जाणावा लागतो. मनालाच मनाची ओळख होते. कृष्णाबाईच्या पाण्यानेच कृष्णाबाईची पूजा. तेजानेच तेजाची आरती.

''संतमहात्मे आत्मतृप्त असतात याचा अर्थ आत्मा हेच तृप्तीचे साधन आहे, हे उघड आहे. भगवान निंबरगीकरमहाराज, भगवान् सद्‌गुरु तात्यासाहेबमहाराज, भगवान् मामामहाराज, स्वामी स्वरूपानंद, योगिराज गुळवणीमहाराज आणि सर्व संतमहात्मे हे आत्मतृप्त आहेत.आत्म्याने देहाचे ज्ञान होते. आत्मविरहित देहाला दुसऱ्या देहाचे ज्ञान होत नाही. देव म्हणजे आपला प्राण असे समर्थ म्हणतात. आत्म्यामुळे ज्ञान व ज्ञानामुळे जगाची सिद्‌धि असे दिसून येते. आत्म्याने ज्ञान उपलब्ध केले आणि मानवी शोध त्या ज्ञानातूनच लागले. म्हणून ज्ञानाने आत्मा सिद्‌ध होत नाही, हे उघड आहे.

''सिद्‌ध वस्तूची ओळख जो सिद्‌ध आहे त्यालाच होते.''तुम्ही या, तुमच्या स्वागताला सिद्‌ध आहे.'' असा जो सिद्‌ध, सिद्‌ध वस्तूच्या

स्वागताला सिद्ध असतो, असा सिद्ध त्या सिद्ध वस्तूला जाणतो.

''आत्मा हा प्रयोगी असून आत्म्याने विश्वाचा प्रयोग केला आहे. विश्व हीच एक प्रयोगशाळा आहे. आणि म्हणूनच या जगात शास्त्रज्ञांनी प्रयोगशाळा उघडल्या आहेत. जगाचा नाश करणारे प्रयोग जगाचा नाशच करतील. परंतु त्यातूनसुद्धा मानवाने बुद्धीचा उपयोग केला तर विधायक शक्तीतून विधायक शक्ति निर्माण करता येईल. हे माझे म्हणणे मनुष्य अंतर्मुख झाला तर त्याला निश्चित पटेल.''

दैनिक केसरीच्या विशेषांकात आलेले हे श्रीदादांचे विचार मननीय आणि स्मरणीय आहेत यात शंका नाही.

आत्तापर्यंत श्रीदादांचे अनेक ग्रंथ प्रकाशित झाले होते. परंतु श्रीदादांना आपल्या वयाच्या सातव्या वर्षापासून जे अभंग स्फुरलेले होते ते अद्यापि अप्रकाशित होते. ते प्रसिद्ध होण्याचा योग हा मामांच्या जन्मशताब्दीच्या वर्षातच आला. म्हणजे त्याचे असे झाले :- सौ. सीतावहिनींच्या देहावसानानंतर काही काळाने सौ. श्यामलाताई कृष्णराव पटवर्धन या सुविद्य शिक्षिका श्रीदादांच्या कीर्तनास येऊ लागल्या होत्या. त्यांना कळले की श्रीदादांचे अनेक अभंग आहेत. पण ते अद्यापि हस्तलिखित स्वरूपात आहेत. या अभंगांची गाथा प्रसिद्ध करण्याचे सौ. श्यामलाताई यांनी ठरविले. तत्पूर्वी प्रा. के. वा. आपटे यांनी त्यांना उपलब्ध झालेल्या श्रीदादांच्या वह्यांतून श्रीदादांचे सुमारे २००० अभंग एकत्र लिहून ठेवले होते. त्यांचे थोडेफार वर्गीकरण करून ते छापण्याचे ठरले. मग या अभंगांचा गाथा छापून तयार झाला. आणि इ.स. १९८८ सालच्या फाल्गुन शुद्ध दशमी शके १९१०, शनिवार, दि. २७-२-१९८८ या सौ. सीतावहिनींच्या पुण्यतिथीच्या दिवशी ''श्रीदासराम गाथा'' प्रकाशित झाला.(फाल्गुन शुद्ध दशमी हा दिवस म्हणजे मामांच्या जयंतीचा दिवस आणि सौ. सीतावहिनींच्या पुण्यतिथीचा दिवस होय). या संदर्भात श्रीदादा सांगतात, ''कीर्तनास नित्यनियमाने येणाऱ्या सौ. श्यामला कृष्णराव पटवर्धन, शिक्षिका, या श्रीमामांचे जन्म-शताब्दीनिमित्त ''श्रीदासराम गाथा'' प्रकाशित करीत आहेत.'' श्रीदासरामगाथा हा ग्रंथ प्रा. म. अ. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित व समर्पित झाला.



श्रीदादांचे एक भक्त इस्लामपूर जवळील चिकुर्डे गावी रहातात. एकदा त्यांच्या मनात आले :- आपण आपल्या घरी श्रीदादांच्या पादुकांची स्थापना करावी आणि ही स्थापना श्रीदादांच्या हस्तेच व्हावी. आपले मनोगत त्यांनी श्रीदादांना सांगितले. ते श्रीदादांनी मान्य केले. स्थापनेसाठी बुधवार दिनांक २४-८-१९८८ हा दिवस ठरला. या दिवशी श्री. जाधव , श्री. ल. कृ . कुलकर्णी, सौ. श्यामला पटवर्धन, अंबुताई वाटवे, शेखर जोशी, प्रा. के. वा. आपटे व श्रीदादांच्या घरची सर्व मंडळी मोटारीने चिकुर्डे येथे गेली. श्री. पोतदारांच्या देवघरात श्रीदादांच्या पादुकांची स्थापना करण्यात आली. तत्पूर्वी श्री.व सौ. पोतदार या दांपत्याने श्रीदादांची यथासांग पाद्यपूजा केली. श्रीदादांच्या हस्ते पादुका-स्थापना झाल्यावर, श्री. श्रीकांत देशपांडे यांचे बहारदार व्याख्यान झाले. त्यानंतर चंद्रशेखर यांचे ''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी'' या अभंगावर छान प्रवचन झाले. नंतर दादांचेही प्रवचन झाले. त्यानंतर महाप्रसाद होऊन हा कार्यक्रम समाप्त झाला व सर्वजण सांगलीला परतले.

याच श्री. पोतदार यांचे बाबतीत घडलेला एक प्रसंग येथे सांगण्यास हरकत नाही. पोतदारांनी दि. १७-२-१९८४ रोजी दादांचा अनुग्रह घेतला होता. तत्पूर्वीच त्यांचा विवाह होऊन त्यांना दोन मुली झालेल्या होत्या. मे १९९० मध्ये त्यांना तिसरी मुलगी झाली. तेव्हा पेढे देण्यासाठी ते श्रीदादांच्याकडे आले. त्यावेळी श्रीदादांनी त्यांना विचारले, ''अहो पोतदार, तुम्हाला मुलगा आहे की नाही?'' पोतदारांनी नाही असे उत्तर दिले. तेव्हा श्रीदादा म्हणाले ''निंबरगीकरमहाराजांचे कृपेने तुम्हाला मुलगा होईल.'' त्याप्रमाणे दिनांक १७-११-१९९३ रोजी पोतदारांना पुत्र-लाभ झाला.

श्रीदादांच्या मातोश्री इंदिराबाई श्रीदादांचा वाढदिवस साजरा करीत. पुढे श्रीदादांचे भक्त वाढदिवस पूज्य मानू लागले. बुधवार दि. ३१-८- १९८८ रोजी श्रीदादांचा वाढदिवस होता. या दिवशी पुण्याहून श्री. शरद आपटे श्रीदादांचेकडे आले होते. या दिवशी श्रीदादांना काय वाटले कुणास ठाऊक, ते शरद आपटे यांना घेऊन, कोणतीही पूर्वसूचना न देता अचानकपणे प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या घरी आले. श्रीदादांचे यथोचित स्वागत करण्यात आले. त्यावेळी प्रा. आपटे हे विलिंग्डन कॉलेजच्या परिसरातील बंगला नं. ३

मध्ये रहात होते. ऐन वेळी भोजनात जे गोड करता येणे शक्य होते ते केले. प्रा. आपटे यांच्या पत्नी सौ. मायादेवी यांनी झटपट भोजनाची सिद्धता केली. भोजनासाठी शेवयांची खीर व साखरभात करण्यात आला होता.

भोजनोत्तर श्रीदादा विश्रांति घेण्यास पलंगावर लवंडले होते. शेजारी प्रा. आपटे व शरद आपटे होते. बोलणे चालू असताना, ''दिसे तारकू तो चतुर्वक्त्र जाणा'' इत्यादि श्लोकातील साक्षात्काराविषयी बोलणे निघाले. यावेळी एका कागदाच्या चिटोऱ्यावर आकृति काढून दाखवून श्रीदादांनी स्पष्टीकरण केले. श्रीदादा म्हणाले, ''शिव हा बिंदुस्वरूपी दिसतो; म्हणजे बिंदूचे दर्शन म्हणजे शिवाचे दर्शन होय. हा बिंदु लखलखीत असून तो गोल असतो. आता बिंदूला शिव किंवा महेश्वर म्हटल्याने, इतर दोन साक्षात्कारांना ब्रह्मा आणि विष्णु अशी नावे दिली गेली. दंड म्हणजे कोदंडाच्या आकाराचा प्रकाश दिसतो; तोच विष्णु होय. तारका-स्वरूप दिसणारा प्रकाश म्हणजे ब्रह्मा; हा तारा चमचम करीत असतो. याउलट बिंदूचा प्रकाश लखलखीत आणि स्थिर असतो. आणि दंडाचे तेज हे इंद्रधनुष्याप्रमाणे स्थिर असते.''

श्री. व सौ. ल. कृ. कुलकर्णी या श्रीदादांच्या भक्तांना, कार्तिक शुद्ध तृतीया, इ.स. १९८८ या दिवशी, श्रीदादांना दीपदान द्यावे अशी इच्छा झाली. त्यांनी श्रीदादांना आपले घरी येण्याचे आमंत्रण दिले. श्रीदादा त्यांचे घरी गेले. प्रथम कुलकर्णी जोडप्याने श्रीदादांची पाद्यपूजा केली. त्यावेळी श्रीदादांचे पायाखाली त्यांनी एक वस्त्र ठेवले. त्यावर श्रीदादांनी आपली पाऊले ठेवली. पाद्यपूजा झाल्यावर खिचडीचा प्रसाद घेऊन श्रीदादा परत गेले. या घटनेला चार दिवस उलटून गेले. आणि त्या वस्त्रावर श्रीदादांची पावले उमटलेली दिसली. ती पुसून टाकण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु ती पुसली गेली नाहीत. ही गोष्ट श्रीदादांचे अनुगृहीत श्री. जाधव आणि श्री. काटकर यांना समजली.त्यांनी त्या पावलांना चौकट बसवून दिली. तेव्हापासून श्री. कुलकर्णी यांचे घरी त्या पावलांची नित्य पूजा सुरू झाली. गुरुपौर्णिमेदिवशी तर ही पाऊले तेज:पुंज दिसतात.ही सर्व घटना सौ. उर्मिला लक्ष्मण कुलकर्णी यांनी ओवीबद्ध करून ठेवली आहे.

श्रीदादांना इ.स. १९८८ पासूनच मोतिबिंदूमुळे कमी कमी दिसू लागले होते. डॉक्टरांनी ऑपरेशन करून घेण्याचा सल्ला दिला होता. परंतु



ऑपरेशनसाठी दवाखान्यात रहावे लागेल व नित्य कीर्तनात अडचण येईल या भीतीने श्रीदादा ऑपरेशन करून घेण्याची टाळाटाळ करीत होते. पण एक दिवस असा उजाडला की ऑपरेशन करण्याशिवाय गत्यंतरच उरले नाही. तेव्हा श्री. बबनराव करंदीकर यांचे सांगणेवरून श्रीदादा ऑपरेशनसाठी तयार झाले. डॉ. परांजपे यांच्या ''नयनतारा'' नावाच्या हॉस्पिटलमध्ये डॉ. परांजपे यांनी ऑपरेशन यशस्वीपणे केले. श्रीदादांना २-३ दिवस हॉस्पिटलमध्ये रहावे लागले. या वेळी श्रीदादांनी पलंगावर बसून कीर्तन केले. सौ. शैला भिडे व विसुभाऊ भिडे हे श्रीदादांचेसाठी जेवण घेऊन येत होते.

कु. शकुंतला केशव खामकर या श्रीदादांच्या भक्त मंगळवार, मार्गशीर्ष पौर्णिमा, इ.स. १९८९ रोजी श्रीदादांच्या दर्शनास आल्या. त्यांना श्रीदादांनी पृच्छा केली, ''बाई, तुम्ही ज्ञानेश्वरमहाराजांचे मंदिर बांधणार आहात ना?'' त्या होय म्हणाल्या. तेव्हा श्रीदादांनी सांगितले, ''आमच्या मामांना जसे ज्ञानेश्वरमहाराजांचे दर्शन झाले तशी मूर्ती करवून घेऊन प्रतिष्ठापना करा.'' त्या 'हो' म्हणाल्या. मंदिरासाठी पैशाची जुळणी कशी करावी असा त्यांना प्रश्न पडला. त्यांनी आपल्या बहिणीला हे सर्व सांगितले. बहिण व तिचे यजमान म्हणाले, ''दादांची इच्छा आहे तर काहीतरी पैशांची सोय होईलच.'' हे सर्वजण श्री. शिंगाडे या श्रीदादांच्या अनुगृहीताकडे गेले. शिंगाडे लगेच म्हणाले, ''दादा म्हणताहेत तर मंदिर होणारच .''

दुसऱ्या दिवशी खामकर बाईंनी सर्व हकिकत आपल्या वडिलांना सांगितली व मंदिरासाठी विटा आणावयास सांगितल्या. पाया खोदायला प्रारंभ झाला. तितक्यात खामकर बाईंच्या मोठ्या काकांनी हरकत घेतली. कारण त्या जागेसंबंधी खामकरबाईंचे वडिल व त्यांचे भाऊ यांचेमध्ये कोर्टात दावा चालू होता. तरी खामकर बाईंच्या वडिलांना कोर्टातून परवानगी मिळाली. मग मंदिराच्या कामाला सुरवात झाली. कारण त्याचवेळी खामकरबाईंना पगारातील फरकाची रक्कम मिळाली होती. पंढरपुरला जाऊन श्री. शिंगाडे मूर्ति घडविण्याची ऑर्डर देऊन आले. यथावकाश मूर्ति पंढरपुरहून आणण्यात आली. आणि मार्गशीर्ष वद्य द्वादशी दि. २४-१२-१९८९ रोजी श्रीदादांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना झाली.

श्रीनिंबरगीकरमहाराजांची २०० वी जयंती ही चैत्र शुद्ध पौर्णिमा,

हनुमान जयंती, शके १९१२, मंगळवार दि. १०-४-१९९० रोजी येत होती. या जयंतीसाठी काहीतरी वेगळे करावे अशी प्रेरणा श्रीदादांना झाली. ''निंबरगीकरमहाराजांची दोनशे नावे संस्कृत भाषेत तयार करवून घ्यावीत'', असे श्रीदादांना वाटले. त्यांनी हे काम प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्याकडे सोपविले. त्यांनी हे काम पूर्ण केले. या दोनशे नावांची रचना होण्यापूर्वी के. वा. आपटे यांनी 'संतसहस्रनामा' साठी 'श्रीनारायणनमनम्' व 'श्रीगुरुलिंगचरितविंशिका' हे काव्यबंध तयार केलेले होतेच. त्यात आता ''श्रीगुरुलिंग-द्विशत-नामस्तोत्रम्'' याची भर पडली. निंबरगीकर-महाराजांची जयंती असल्याने, के. वा. आपटे यांनी निंबरगीकरमहाराजांचा ''श्रीगुरुलिंगमहाराजस्य दोलागीतम्'' हा पाळणाही रचला. या सर्व काव्यबंधात ''श्रीगुरुलिंगमहाराजस्य बोधविंशिका'' इत्यादि काही रचना घालून तयार झालेल्या पुस्तकाला ''श्रीगुरुलिंग-गीतम्'' असे नाव देण्यात आले. आणि हा ग्रंथ गोविंदनवमी, शके १९१२, शनिवार, दि. ३-२-१९९० रोजी श्री. चंद्रशेखर केळकर यांनी प्रकाशित केला. भगवान श्रीसद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज यांच्या द्विजन्मशताब्दी पर्वकाळाच्या निमित्ताने दि. १०-४-१९९० रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत या ''श्रीगुरुलिंगगीतम्'' चे वाचन प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी व उपस्थितांनी केले. त्यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराजांचे प्रतिमेसमोर द्विशत नामांतील प्रत्येक नावाच्या उच्चाराबरोबर एक फूल, तुळस/बेल श्रीदादांनी व सर्व उपस्थितांनी अर्पण केले. शेवटी श्रीमहाराजांची आरती झाली व 'तुका म्हणे काही न मागो आणिक । तुझे पायी सुख सर्व आहे ।।' असे मागणे मागितले. यानंतर या कार्यक्रमासाठी जमलेल्या सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. असाच कार्यक्रम अनेक ठिकाणी संपन्न झाला.

कोल्हापूर येथे श्रीदादांचे भक्त डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर हे रहातात. कोल्हापूरात इ.स.१९९० साली प.पू. व्रजचकोरीदेवी आल्या होत्या. त्यांना डॉ. कुंभोजकरांनी आपल्या घरी येण्याचे निमंत्रण केले. त्यांनी ते स्वीकारले. आदले दिवशी थंडीची लाट आली आणि वीजही गेली. तेव्हा डॉ. कुंभोजकरांनी श्रीदादांची प्रार्थना केली. मग रात्री उशिरा लाईट आला व तयारी करण्यात आली. सकाळी देवीजी आल्या. तेव्हा एक अनामिक प्रकाश



घरात भरून राहिला; देवीजी परत गेल्यावर तो प्रकाश कमी कमी होत गेला. पुढे सांगलीस आल्यावर डॉ. कुंभोजकरांना पहाताच श्रीदादा म्हणाले, ''बंडोपंत, एका फार मोठ्या संतांचे दर्शन तुम्हाला झाले आहे.'' हे ऐकल्यावर डॉ. कुंभोजकर चकित झाले नसते तरच नवल.

श्रीदादांच्या वयाला इ.स.१९९० मध्ये सत्तरावे वर्ष पूर्ण होत होते. या वेळी श्रीदादांची तब्येत अतिशय खालावलेली होती. तेव्हा आत्ताच श्रीदादांचा अमृतमहोत्सव साजरा करून घ्यावा असे त्यांच्या घरची मंडळी आणि भक्तमंडळी यांना वाटले व तसे करण्याचे ठरले. या संदर्भात श्रीदादांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव चंद्रशेखर सांगतात :- ''माझे ती. प. पू. श्रीरामराय गोविंद केळकर यांचे वयाला ७० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांचा अमृतमहोत्सव आम्ही घरची मंडळी व त्यांचे भक्तजन म्हणजे ''ते माझे सोयरे सज्जन सांगाती। पाय आठविती विठोबाचे।।'' या श्रीतुकाराम-महाराजांच्या उक्तीप्रमाणे खऱ्या अर्थाने सोयरी-धायरी मंडळी यांनी संपन्न करणेचा संकल्प केला आहे. हा संकल्प भगवान् श्रीसदगुरु श्रीनिंबरगीकरमहाराजांच्या कृपेने पूर्ण होणार आहे. ''सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ।।''. संकल्पाप्रमाणे हा अमृत महोत्सव साजरा झाला.

श्रीदादांच्या या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी'श्रीगुरुलिंग-गीतम्' च्या धर्तीवर ''श्रीदासरामगीतम्''हा संस्कृत काव्यबंध रचला. या ग्रंथात 'लेखकाचे मनोगत' लिहिताना प्रा. के. वा. आपटे सांगतात,''आता श्रीदासराममहाराजांनी आपल्या वयाची सत्तरी ओलांडली आहे. त्याचे कुटुंबीय व भक्तजन त्यांचा अमृतमहोत्सव साजरा करीत आहेत. या निमित्ताने श्रीदासराममहाराजांना काव्यकुसुमांजली वहावी असे वाटले. त्याचे दृश्य फल म्हणजे प्रस्तुतचे छोटेसे पुस्तक होय. श्रीदासराम-महाराजांना देववाणी संस्कृत भाषा आवडते ही गोष्ट लक्षात घेऊन, त्यांच्या विषयीची कविता संस्कृत भाषेत असावी, असे वाटल्याने माझे हातून निरनिराळ्या प्रकारचे संस्कृत काव्यबंध तयार झाले. हे सर्व एकत्र करून, ते ''श्रीदासरामगीतम्'' या शीर्षकाखाली प्रस्तुत पुस्तकात संगृहीत केलेले आहेत.'' या छोट्याश्या ग्रंथात श्रीदादांचे ''दोलागीत'' (=पाळणा), नमनाष्टक, चरित्र,

वचनामृत, शतनामस्तोत्र, आरती, प्रार्थना इत्यादि आलेले आहेत. हा ग्रंथ श्री. नारायण केशव आपटे यांनी रविवार दि.२ जून १९९१ रोजी प्रकाशित केला.

## प्रकरण १६: पुरवणी

## श्रीदासरामगाथा : विषयपरिचय

श्रीदासरामगाथा या ग्रंथात श्रीदादांचे सुमारे २००० अभंग संगृहीत करण्यात आले आहेत. या ग्रंथाबद्दल स्वामी स्वरूपानंदांचे उत्तराधिकारी स्वामी अमलानंद म्हणतात, ''आगमनिगमांचे सर्व सार या ग्रंथात आले आहे.'' (पहा: प्राचार्य क.श्री.काळे, फाइल क्र. ३). या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथातील काही विषयांचा संक्षिप्त परिचय येथे करून दिला आहे. त्यानंतर या गाथ्यात व्यक्त झालेले श्रीदादांचे तत्त्वज्ञान थोडक्यात दिले आहे.

१) श्रीदादांचे काही अभंग हे आत्मपर आहेत. त्यांमध्ये त्यांच्या ऐहिक जीवनातील तसेच पारमार्थिक जीवनातील काही प्रसंगांचा निर्देश आला आहे. उदा. श्रीकोटणीसमहाराजांचाअनुग्रह, व आशीर्वाद, रामानंदमहाराज खटावकर यांनी केलेले कौतुक, नागाप्पाण्णामहाराजांनी वापरलेली प्रल्हाद ही संज्ञा, गुरुलिंगगीतेची प्राप्ति, व सद्गुरुकृपेने प्राप्त झालेली स्थिति.

२) स्वधर्मपाठामध्ये 'आत्मा हाच स्वधर्म आहे' असे सांगितले आहे. 'साधनाचे अभंग' यांत साधनाची काही वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. 'नाम परमार्थाचे गूज' असून 'नामकळी परब्रह्म। ऐसा परमार्थ सुगम' असे आश्वासन सदानंदपाठात आहे. श्रुतिपाठात 'अहं ब्रह्मास्मि'व 'तत्त्वमसि' या वाक्यांचे स्पष्टीकरण आहे. चैतन्यपाठ हा चैतन्याचे विवेचन करतो. आत्मसुधा या प्रकरणात 'पहाणे' या विशिष्ट संकल्पनेचा खुलासा आहे. स्मरणपंचकात साधनाचे गुह्य सांगितलेले आहे. 'प्राणापानामाजी मनाचे मीलन । परमार्थ पूर्ण तया ठायी।।' असे आश्वासन साधनपाठ देतो. देव या शीर्षकाखाली असणाऱ्या अभंगात गणेश, श्रीराम, विठ्ठल, महेश्वर, मारुति, इत्यादि देवांचे गुणवर्णन आहे. 'देव काही दूर नाही। आहे आपुल्याच देही।।' आणि 'देव करी सर्व काही' असे सांगितले आहे.



३) 'संत ब्रह्म ते सगुण ' असे सांगून, संत हे अद्वैतात समरस झालेले असतात, संत हे स्वत:च्या देहातच मोक्षरूप होऊन रहातात, आणि जगाला संताचा आधार आहे, असे संतांविषयीच्या अभंगांत सांगितलेले आहे.

४) स्वत:च्या चिमड संप्रदायातील संतसज्जनांचा गुणगौरव श्रीदादांच्या काही अभंगात आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की अन्य संप्रदायांतील साधुंबद्दलही त्यांना आदर आहे. म्हणून ज्ञानेश्वर, एकनाथ, सावता माळी, वजीरबाबा, गोंदवलेकरमहाराज, टेंबेस्वामी, शंकरमहाराज मिरीकर, कुंभारस्वामी, स्वरूपानंद इत्यादी प्राचीन-अर्वाचीन संतांचा गौरव श्रीदादांनी केला आहे.

५) बंगालमधील सुप्रसिद्ध संत रामकृष्ण परमहंस यांचे दर्शन श्रीदादांना झाले. त्यावेळी स्फुरलेले अभंग 'संजीवनपाठ' यात आहेत.

६) श्रीदादांचे पितृदेव श्रीमामामहाराज. श्रीदादा मामांना देवच मानीत. या मामांचे वर्णन करणारे अनेक अभंग श्रीदादांना स्फुरले.

७) अनेक संतांच्या निर्याणाचे अभंगही श्रीदादांच्या हातून रचले गेले.

### तात्त्विक विचार

श्रीदादांचा चिमड संप्रदाय हा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अद्वैतवादी आहे. तेच तत्त्वज्ञान श्रीदादांच्या अंगात मुरले होते. आणि तेच अद्वैतावर भर देणारे तत्त्वज्ञान आणि साधन श्रीदादांच्या अभंगात व्यक्त झाले आहे. श्रीदादा अभंगांतून सांगतात:-

आत्मा/परमात्मा/ ब्रह्म/परब्रह्म हे एकमेव अंतिम सत्य तत्त्व आहे. आत्मा हा अपरिच्छिन्न आहे. 'सत्य साच खरे ब्रह्म' हे अविभाज्य, पूर्ण, निर्विकल्प, सनातन आणि नि:शब्द आहे. सत्य ब्रह्मात कोणत्याही प्रकारचा विकार घडत नाही. म्हणून 'निश्चळ नि:शब्द वस्तु पूर्ण सत्य' आहे.'आत्मवस्तु सत् चिद्घन' अशी आहे.अंतिम तत्त्व ब्रह्म हे निर्गुण आहे.मग सगुणाचे काय? 'निर्गुणापासोनी जहाले सगुण' अशी वस्तुस्थिति असून, 'तूप थिजले विघुरले' या प्रमाणे सगुण-निर्गुणाची कथा आहे.

माया म्हणजे अज्ञान आहे. माया ही चंचळ आहे. 'निश्चळ ते ब्रह्म चंचळ ते माया' असा प्रकार आहे. मायेमुळे उपाधि निर्माण होते, आणि 'जीव- शिव ' ही भाषा येते.

सदानंद अशा ब्रह्मात येणाऱ्या चंचळ गुणाने विश्वाचा खेळ होतो; चंचळ मायेमुळे जग निर्माण होते. तथापि चंचळ मायेमुळे आकारास आलेले हे विश्व सत्य नसून, ते म्हणजे परब्रह्मावरचा एक भास आहे. ''विश्व परब्रह्मी भास । माये आले आकारास ।।''. शिंपेवर जसा रुप्याचा भास होतो, तसा ब्रह्मावर विश्वाचा भास होतो. तेव्हा खरे म्हणजे आहे ते सर्व ब्रह्म असूनही जग भासत असते (ब्रह्मची असोन भासतसे विश्व). म्हणून 'तत्त्वता पहाता ब्रह्मरूप जाण' अशीच वस्तुस्थिति आहे. सर्व विश्व हे ब्रह्मच आहे. साहजिकच या जगात देह इत्यादींच्या उपाधीत सापडलेला जीव हासुद्धा तत्त्वत: ब्रह्मच आहे. म्हणून ''जीव तो पहाता ब्रह्मरूप जाण'' असे श्रीदादा सांगतात. मायेच्या बाबतीतही असाच प्रकार आहे. म्हणजे असे :- निश्चळ ब्रह्मात चंचळ माया होते. मग, 'माया सेवी ब्रह्म । ब्रह्म सेवी माया।।' असा प्रकार होतो. 'ब्रह्मावरी झाली माया' असे असल्याने, ''ब्रह्म पहाता माया । माया पहाता ब्रह्म ।।'' अशीच स्थिति आहे.

तत्त्वत: जीव हा ब्रह्मच आहे हे खरे. पण या जगात तो नानाप्रकारच्या उपाधीत सापडला आहे. आणि अज्ञानाने तो स्वत:ला कर्ता, भोक्ता, इत्यादि काहीतरी वेगळेच मानीत असतो. त्याचे लक्ष आत्म्याकडे वेधण्यास त्याला पुढील गोष्टी सांगणे आवश्यक ठरते :- देह हा अचेतन आहे. अहंकार अथवा गर्व हा घातक आहे. म्हणून अहंकाराचा त्याग व्हावयास हवा. आशापाश तोडावयास हवेत. आपले चित्त बाह्य विषयांकडे धावणार नाही, इकडे लक्ष द्यावयास हवे. (भटकू देऊ नका मना).

आत्मज्ञानासाठी एकाद्या गुरूचा उपदेश घेणे आवश्यक आहे. गुरूंनी सांगितल्याप्रमाणे ''जनामाजी वनी मनी आणि ध्यानी । चित्त नारायणी जडवावे।।''. नाम हेच ब्रह्म आहे. सद्गुरु शरीरात गतिरूप असणारे नाम दाखवून देतात. मग शरीरात जेथे 'सोहं सोहं ध्वनि उमटे । तेथे लक्ष लावी नेटे।।'. सद्गुरूंनी सांगितलेल्या साधनाने 'पवनसिद्धि' व्हावयास हवी. ही पवनसिद्धि कशी प्राप्त होते ? 'प्राणाचा मनाचा एक लय होता । तत्त्वे तत्त्व सारीता पवनसिद्धी ।।' प्राप्त होते. आणि मग 'पवनसिद्धी झालिया प्रगटे आत्माराम'. पवनसिद्धि होण्यास 'प्राणावरी राहे ठेवोनिया दृष्टी' असा उपाय श्रीदादांनी सांगितलेला आहे. हे प्राणाचे साधन म्हणजे नामाचेच साधन आहे.



म्हणून श्रीदादा सांगतात ''नामघोष जेथे देही लक्ष ठेवी तेथे.'' अशाप्रकारे ''सूत्र धरोनिया करी नामजप''. असा जर नाम-जप झाला तर ''पुढे आपे आप देव दिसे,'' असा प्रकार होतो. आत्मानुभव येण्यास नाम हेच साधन आहे. नाम हेच ब्रह्म असल्याने, ''साधन ते नाम साध्य तेही नाम'' अशीच वस्तुस्थिति आहे.

नामसाधन सिद्ध झाल्यावर , नाद आणि प्रकाश या स्वरूपात परमात्म्याचे अनुभव येऊ लागतात, ते असे :- लख् प्रकाशात नीलबिंदु, विजांचा झगझगाट, नाना रंगांचे प्रकाश, तारांची चकाकी, तेज:पुंज लाली, तेजाचा बंबाळा अथवा तेजोमेरु, नील प्रभा, अपरंपार निळे तेज, महानाद, इत्यादि अनुभव येतात. ज्याला असा परमात्म्याचा साक्षात्कार झाला, तो आत्मसाक्षात्कारी साधक मुक्त होऊन जातो. लौकिक व्यवहारात तो सुखदु:खाच्या द्वंद्वातून सुटतो, आणि मोठ्या आनंदाने संसाररूपी सागर तरून जातो, आणि अमर होऊन अवर्णनीय आनंद प्राप्त करून घेतो.

### प्रकरण १६ : संदर्भ

१) अखंड कीर्तनानंद
२) दैनिक केसरी, केसरी पुरवणी :- कै. मामामहाराज केळकर जन्मशताब्दी महोत्सव, २७ फेब्रुवारी, १९८८
३) श्रीदासरामगाथा
४) सांगली माहात्म्य
५) वही क्रमांक १३६
६) केशवलिखितदासरामचरित्रटिप्पणे
७) श्रीगुरुलिंगगीतम्, के.वा.आपटे, सांगली, १९९०
८) श्रीदासरामगीतम्, के.वा.आपटे, सांगली, १९९१
९) फाईल क्रमांक ३ (पोतदारांची आठवण) (प्राचार्य क. श्री. काळे)
१०) फाईल क्रमांक १ (ल.कृ.कुलकर्णी)
११) फाईल क्रमांक ४ (खामकर बाई)
१२) श्रीगुरुलिंगगीता

## प्रकरण १७

# श्रीदादांचा दुसरा अमृतमहोत्सव

(इ.स.१९९१-२०००)

श्रीदादांचे एक अनुगृहीत श्री. श्री. वि. सहस्त्रबुद्धे हे नोकरीनिमित्त पुण्यात रहात. त्यांना एकदा असे वाटले :- श्रीदादांच्या नित्य कीर्तनात गुरूचा महिमा श्रीदादा सांगतात. जे कीर्तन ऐकतात त्यांना तो कळतो. पण त्यांचे कीर्तन ऐकण्याची संधि ज्यांना मिळत नाही अशा साधकांची सोय करण्यास आपण काहीतरी करावे. पुढे ते एकदा सांगलीस आले असताना, गुरुमहिमा वर्णन करणारे काव्य श्रीदादांनी लिहावे अशी त्यांनी श्रीदादांना विनंति केली. श्रीदादा हे शीघ्र कवि होतेच. त्यांनी लगोलग गुरुमहिमा विशद करणाऱ्या ओव्या सांगण्यास सुरवात केली. या ओव्या एकूण १०८ झाल्या. या १०८ ओव्यांचे पुस्तक ''श्रीगुरुमहिमा'' या शीर्षकाखाली श्री. श्री. वि. सहस्त्रबुद्धे यांनी २ जून १९९१ रोजी प्रकाशित केले.

श्रीदादांचे सांगलीतील अनुगृहीत श्री. र. रा. जाधव हे भूविकास बँकेत नोकरीस होते. त्या बँकेशेजारी एक उंबराचे झाड होते. तेथे दत्ताचे मंदिर व्हावे असे जाधवांना वाटले. त्यांची कल्पना बँकेचे मॅनेजर इत्यादींना पसंत पडली. व त्याप्रमाणे मंदिर बांधून झाले. राजस्थानातून दत्ताची मूर्ति आणण्यात आली. मॅनेजर टी. एम्. पाटील यांनी श्री. जाधवांना सांगितले, ''कुणाच्या हस्ते मूर्तीची स्थापना करावयाची हे तुम्हीच ठरवा.'' त्यावेळी जाधवांनी श्रीदादांचे नाव सुचविले. आणि मग अनेक भक्तांच्या उपस्थितीत श्रीदादांचे हस्ते दि. ५-९-१९९१ रोजी दत्तमूर्तीची स्थापना झाली.

श्रीदादांच्या रामनिकेतनमध्ये रोज सकाळी साधनास बसायचा कार्यक्रम असे. गुरुद्वादशी शनिवार, दि. २-११-१९९१ रोजी श्रीदादा साधनास बसले होते. तेथेच वरच्या बाजूस भिंतीवर श्रीनिंबरगीकरमहाराजांचा फोटो आहे. साधन चालू असताना, आपल्या मस्तकाच्या वरच्या बाजूस काही हालचाल होत आहे अशी जाणीव श्रीदादांना झाली. श्रीदादांनी आपली नजर वर केली. तो तेथे प्रत्यक्ष निंबरगीकरमहाराज उभे आहेत असे श्रीदादांना दिसले. श्रीदादांच्या डोळ्यात अश्रु आले. त्यांनी महाराजांना नमस्कार केला.



तेव्हा श्रीनिंबरगीकरमहाराज श्रीदादांना बोलले ''रामा, तू मुळीच काळजी करू नकोस. तुझी भक्ति अखंड चालेल.'' असे आश्वासन देऊन निंबरगीकरमहाराज अंतर्धान पावले.

शरीर म्हटले की शरीराच्या व्याधि आल्या. रक्तदाब, इत्यादींनी श्रीदादांचे देहात वास्तव्य केले होते.पुढे दात अधू झाल्यामुळे तेही काढून घ्यावे लागले. तसेच डोळ्यातील मोतीबिंदूचे ऑपरेशनही करून घ्यावे लागले. या सर्वांवर कडी इ.स. १९९२ साली झाली. या वर्षी झालेल्या अपघाताने श्रीदादा हे बऱ्याच प्रमाणात परावलंबी झाले. २५ जून १९९२ रोजी सकाळी श्रीदादा संडासला गेले होते. परत येताना पाय घसरून ते सिमेंटच्या उंबऱ्यावर पडले. त्यांच्या उजव्या पिंढरीचे हाड मोडले. अस्थिभंगाने असह्य कळ येऊन श्रीदादा ओरडले. त्यांचा आरडा ऐकताच त्यांचे व्याही श्री. पटवर्धन इत्यादि लोक धावून गेले. श्रीदादांना उचलून त्यांना रामनिकेतनपर्यंत आणण्यात आले. लगोलग त्यांना रिक्षात बसवून श्री.शरद कुलकर्णी या अस्थितज्ञ डॉक्टरांच्या ''भक्ति क्लिनिक्'' मध्ये नेण्यात आले. पिंढरीचा फोटो काढून अस्थिभंग झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. श्रीदादांच्या पिंढरीवर प्लॅस्टर घालण्यात आले. आणि ''तीन दिवस श्रीदादांनी दवाखान्यातच रहाणे आवश्यक आहे'' असे डॉक्टरांनी सांगितले. यावेळी श्रीदादांना निजूनच रहावे लागत होते. या बिकट परिस्थितीतही श्रीदादांचा नित्यकीर्तनाचा नेम चुकला नाही. श्रीदादा पलंगावर पडूनच कीर्तन करीत. श्री. सदुभाऊ साळुंखे, श्री. व्ही. के. कुलकर्णी इत्यादि भक्तमंडळी कीर्तनास उपस्थित असत.

आता श्रीदादांनी आपल्या वयाची सत्तरी पूर्ण ओलांडलेली असल्याने, पायावरील प्लॅस्टर बरेच दिवस ठेवावे लागले. त्यामुळे श्रीदादांना बऱ्याच प्रमाणात इतर लोकांवर अवलंबून रहाणे भाग पडले. श्री. चंद्रशेखर वगैरे मंडळी त्यांचे स्पंजिंग वगैरे करीत. अपघातानंतर ३-४ महिन्यांनी प्लॅस्टर काढण्यात आले. नंतर कुबडी घेऊन चालण्याचा व्यायाम करावयास हवा असे डॉक्टरांनी श्रीदादांना सांगितले. तेव्हा श्रीदादा कुबडी घेऊन चालू लागले. पण काही दिवसांनी हे चालणे जमेनासे झाले. कारण पाय फारच दुखू लागला. तेव्हा श्रीदादांना पुनः डॉक्टरांकडे न्यावे लागले. या खेपेला

'उष:काल' हॉस्पिटलमध्ये डॉ. मोडक या अस्थितज्ञांना श्रीदादांचा पाय दाखविण्यात आला. पुन: एक्स रे इत्यादि सोपस्कार होऊन, श्रीदादांच्या पायावर पुन: प्लॅस्टर घालण्यात आले. याही वेळी श्रीदादांना दोन दिवस हॉस्पिटलमध्ये रहावे लागले. याही वेळी श्रीदादांनी पलंगावर पडल्या पडल्या आपले नित्याचे कीर्तन पार पाडले. पुढे काही दिवसांनी पायाचे प्लॅस्टर काढण्यात आले. नंतर वॉकरच्या साहाय्याने चालण्याचा व्यायाम करावयास हवा असे श्रीदादांना डॉक्टरांनी सांगितले. हा व्यायामचा क्रम दि. १४-५-१९९३ अखेरपर्यंत चालू होता. चालण्याचा व्यायाम झाल्यावर श्रीदादा काही वेळ घरच्या पडवीत खुर्चीवर बसत. त्यावेळी श्री. सदुभाऊ साळुंखे हे श्रीदादांचा पाय वर खाली करुन घेत. हळु हळु वॉकरशिवाय श्रीदादांना चालता येऊ लागले. आणि मग श्रीदादा अंगणात अथवा पडवीत चालण्याचा व्यायाम करीत.

इ.स. १९९२ पूर्वीपासून काही काळ श्रीदादांनी एक लेजर टाइप-वही ठेवली होती. त्यात कांही घटनांच्या नोंदी करण्यास श्रीदादा जवळच्या मंडळींना सांगत. इ. स. २००१ पर्यंत अशी सहा लेजरे तयार झाली होती. यातील लेजर क्रमांक १ मध्ये पुढील नोंदी आढळतात :- (१) श्री. संजय पाटील हे कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते श्रीदादांचे भक्त आहेत. त्यांच्या निमित्ताने अकोळचे डॉ. रमेश कुलकर्णी तथा अकोळकरमहाराज सोमवार दि. १०-११-९२ रोजी सांगलीस आले होते. या महाराजांनी एक रुद्राक्षांची माळ श्री. संजय पाटील यांच्याकडे दिली व ती केळकरमहाराजांना नेऊन देण्यास सांगितले. (२) गुरुवार दि. ३१-१२-९२ रोजी श्रीदादांना स्वप्नात श्रीसेनामहाराजांचे दर्शन झाले. (३) श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांची पुण्यतिथि दि. १२-१-१९९३ रोजी होती. या दिवशी राममंदिरात श्रीतात्यासाहेबमहाराजांची आराधना झाल्यानंतर, श्रीदादांना मारुतिराय प्रगटलेले दिसले. (४) मे १९९३ चे सुमारास डोंगरेमहाराज सांगलीत आले होते. ते श्रीदादांच्या भेटीस आले होते. ते श्रीदादांना म्हणाले,''प्रभु, आपण मला आशीर्वाद द्या. माझे मस्तकावर आपला हात ठेवा.''

कोल्हापूरला प्रा. डॉ. पां. ना. कुलकर्णी हे अनेक पाठभेद पाहून ज्ञानेश्वरीची एक प्रत तयार करीत होते. ते श्रीदादांना भेटण्यास आले व त्यांनी आपल्या कार्याची कल्पना श्रीदादांना सांगितली. श्रीदादांनी त्यांना १०१



रुपयांची भेट दिली. पुढे ज्ञानेश्वरी संपादनाचे काम पूर्ण झाल्यावर डॉ. पां. ना. कुलकर्णी श्रीदादांना भेटण्यास आले व म्हणाले, ''महाराज, आपण मागे मला रु. १०१ प्रसाद म्हणून दिले होते. माझे काम आता पूर्ण झाले. आपण दिलेल्या आशीर्वादाने मला फार मोठा आधार वाटत होता.''

लेजर क्रमांक २ मध्ये पुढील नोंदी आहेत :-

(२) जुलै १९९३ चे सुमारास श्रीदादा साधनास बसले असताना श्रीनिंबरगीकरमहाराज प्रगट झाले व त्यांनी श्रीदादांना हाक मारली. श्रीदादांनी महाराजांच्या पायांवर मस्तक ठेवले. ''वंशपरंपरा कीर्तन चालावे, भक्ति चालावी, नामस्मरण चालावे'', असा वर श्रीदादांनी त्यांना मागितला. ''तथास्तु'' असे म्हणून निंबरगीकरमहाराज अदृश्य झाले. (२) शनिवार दि. १०-७-९३ रोजी पहाटे ४ वाजता श्रीदादांना स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना आपली आई व मामा दिसले. ते दोघे त्यांना म्हणाले, ''रामजी, तुझी प्रकृति पहाण्यास आम्ही आलो आहोत.'' श्रीदादा म्हणाले, ''माझी प्रकृति ठीक आहे. पण आता वय वाढले असल्यामुळे पूर्वीप्रमाणे कीर्तन होत नाही.'' यावर मामा म्हणाले, ''रामजी, यापुढे तुझी कीर्तने पूर्वीप्रमाणे होतील.'' नंतर श्रीदादांनी ''चंद्रशेखरची कीर्तने कशी काय होतील?'', असा प्रश्न मामांना केला. मामा म्हणाले, ''रामजी, काळजी करू नको. चंद्रशेखरची कीर्तने तुझ्यासारखीच होतील.'' पुढे मामा म्हणाले, ''सौ. रोहिणी इत्यादींना माझा आशीर्वाद कळव. भजनस्पर्धेत सौ. रोहिणीला यश मिळेल.'' (३) याच सुमारास पुणे येथे श्रीसहस्रबुद्धेमहाराजांच्या मंदिरात जप चालू होता. तो सांगलीत श्रीदादांना ऐकू आला.

लेजर ३ मध्ये श्रीदादांनी १९९५ सालच्या काही नोंदी अशा केलेल्या आहेत :- (१) एकदा श्रीदादा स्वस्थ बसले असताना, त्यांना ''शांति ब्रह्म पूर्ण ब्रह्म पूर्ण ब्रह्म तेजाचे'' असा एक चरण जवळजवळ दहा मिनिटे ऐकू आला. हा चरण म्हणणारा कोणीही जवळपास नव्हता. तेव्हा श्रीदादांना वाटले की आपल्या केळकर कुळाचे पूर्वज जे शांडिल्य ऋषि ते हा चरण उच्चारीत असावेत. (२) श्रीदादांच्या घराच्या पुढील भागात दत्ताचे मंदिर आहे. रविवार दि. २९-१-९५ रोजी श्रीदादा या दत्ताच्या दर्शनाला गेले. त्यांनी दत्तापुढे एक पावली (=चार आण्याचे नाणे) ठेवले. श्रीदत्तगुरूंनी प्रत्यक्ष

प्रगट होऊन ते नाणे स्वीकारले. (३) दि. ५-३-९५ या दिवशी संध्याकाळचे वेळी श्रीदादा साधनास बसले होते. साधनातील निर्विचार स्थितीत त्यांना नील बिंदूचा साक्षात्कार झाला.

श्री. कृ. रा. शिंगाडे यांनी लेजर ४ मध्ये पुढील नोंद केली आहे :- गुरुवार दिनांक १३-४-१९९५ रोजी सुमारे १०० लोकांसह श्रीदादा निंबरगीच्या यात्रेस गेले. निंबरगीकरमहाराजांच्या समाधीपुढे श्रीदादांचे कीर्तन झाले. नंतर मंडळी पंढरपुरला गेली. पांडुरंगाच्या मंदिरात श्रीदादांनी पांडुरंगाच्या डोळ्यांकडे पाहिले. यावेळी पांडुरंगाने श्रीदादांना बुक्का लावला, असे नंतर श्रीदादांनी शिंगाडेंना सांगितले.

अलीकडे श्रीदादा २-३ या दुपारच्या वेळेत मौन पाळीत. त्या वेळात एक दिवस ''अरे रामा, अरे रामा'' अशी हाक निंबरगीकरमहाराजांनी प्रगट होऊन मारली, अशी श्रीदादांची नोंद लेजर ३ मध्ये आहे.

श्रीदादांच्या घरी गणेशचतुर्थीला बसविलेल्या गजाननाच्या मूर्तीचे विसर्जन शनिवार दि. २-९-९५ रोजी होते. उत्तरपूजेनंतर गणपतीची मूर्ति विसर्जनास नेली जात असताना, मूर्तीच्या डोळ्यातून अश्रु ओघळू लागले.

श्रीदादा हे मोठे भाग्यवान् संत होते. म्हणूनच त्यांचा अमृतमहोत्सव दोनदा साजरा झाला. इ.स. १९९० मध्ये त्यांना सत्तरावे वर्ष असताना एक अमृतमहोत्सव झालेला होता. आता १९९५ साली त्यांची ७५ वर्षे पूर्ण होत होती. म्हणून त्यांचा आणखी एक अमृतमहोत्सव साजरा झाला. एकाच व्यक्तीचे दोन अमृतमहोत्सव घडल्याची घटना अन्य कुणाच्या जीवनात घडली असेल असे वाटत नाही.

दिनांक २-५-१९९५ रोजी श्रीदादांची पंचाहत्तरी साजरी करण्याचे ठरले. या बाबतीत श्रीदादांचे मत काय होते, हे रविवार दि. १-५-१९९५ रोजी श्रीदादांना स्फुरलेल्या पुढील अभंगात व्यक्त झाले आहे :-

पंचाहत्तरी कशासाठी । सांगा सांगा धूर्जटी ॥१॥
काय केले समाजकारण । काय केले राजकारण ॥२॥
दासराम म्हणे देवा । घडवून घ्यावी सेवा ॥३॥
श्रीमामांचा प्रसाद मेवा । थोडा आम्हा द्यावा ॥४॥
श्रीमामांचे कीर्तन । दासरामा द्यावे आपण ॥५॥



श्रीदादांनी समाजकारण अथवा राजकारण केले नाही हे खरे. परंतु कीर्तनाचे द्वारे त्यांनी ''अध्यात्मकारण'' केले होते. श्रीदादा जरी स्वत: कीर्तन करीत, तरी ''आपले कीर्तन हे श्रीमामांचेच कीर्तन आहे'' अशी त्यांची श्रद्धा होती. कीर्तनाचे द्वारा ''परमार्थ-कारण'' होत असे. आणि म्हणूनच त्यांचा अमृतमहोत्सव होणे हे योग्यच होते. अक्षय्य तृतीया, मंगळवार दि. २-५-१९९५ या शुभ दिवशी श्रीदादांचा अमृतमहोत्सव होणार आहे अशा मजकुराच्या निमंत्रणपत्रिका श्री. चं. रा. केळकर यांच्या सहीने पाठविण्यात आल्या. श्रीदादांचे नातेवाईक, भक्त, आणि अनेक लोक या कार्यक्रमास उपस्थित होते.

अक्षय तृतीया दि. २-५-१९९५ रोजी सकाळी ६-९ पर्यंत धार्मिक होमहवन झाले. या कार्यक्रमास चंद्रशेखर व सौ. रोहिणी हे दांपत्य बसले होते. धार्मिक कार्यक्रम संपल्यावर शोभिवंत केलेल्या तुलेपुढे सूर्यकांत व त्यांची पत्नी सौ. सुनीता यांनी तुलेचे पूजन केले. त्यानंतर अनल व सौ. अर्चना आणि अनिलप्रभु व सौ. अपर्णा या दोन जोडप्यांनी मिळून श्रीदादांची पाद्यपूजा केली. त्यानंतर तुलेच्या एका पारड्यात ''केळी'' घालून दुसऱ्या पारड्यात श्रीदादांना बसवून श्रीदादांची ''केळे-तुला'' करण्यात आली. हा सर्वच कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला. उपस्थित असणाऱ्या सर्व मंडळींच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

सकाळी ६ वाजता सुरू झालेला कार्यक्रम सकाळी ११ चे सुमारास समाप्त झाला. नंतर सुमारे ७५० भक्तांच्या भोजनांचा समारंभ बालशिक्षण मंदिरातील ज्ञानेश्वर सभागृहात पार पडला. संध्याकाळी ५ ते ५।। या वेळात श्रीदादांचे नित्याचे कीर्तन झाले. कीर्तनातच श्री. प्रकाश भावे यांनी लिहिलेल्या ''फूल चैतन्याचे'' या श्रीदादांच्या चरित्र ग्रंथाचे प्रकाशन व समर्पण झाले. त्यानंतर श्रीदादांचा गौरव करणारी भाषणे झाली. सर्वश्री मधुकरराव शिपुरकर, श्रीकांत देशपांडे, कृष्णाजी शिंगाडे, चैतन्य बाजारचे चालक पवार, माने वकील, प्रा. डॉ. के. वा. आपटे, प्रकाश भावे यांनी आपापल्या भाषणांत श्रीदादांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. या अमृतमहोत्सव प्रसंगाच्या निमित्ताने श्रीदादांच्या प्रतिमेचे मेटल प्रिंट्सचे समर्पण श्री. श्रीपतिबुवा धोंगडे यांचे हस्ते झाले. नंतर रेडिओ स्टार मंगला जोशी यांनी

श्री. रामभाऊ चिपळूणकरलिखित काव्य, आणि मामांचे दोन अभंग गाऊन दाखविले. हे सर्व कार्यक्रम कीर्तनाच्या मध्यंतरात झाल्यानंतर आरती झाली. त्यानंतर रथ व पालखी यांचा दुहेरी सोहळा साजरा झाला. त्यानंतर रामपाठ व पंचपदी होऊन रात्री ९। वाजता हा कार्यक्रम संपला. त्यानंतर प्रसादवाटप झाले. श्रीदादांच्या तुलेसाठी जी केळी वापरली होती ती आणि बुंदीचे लाडू प्रसाद म्हणून भक्तजनांना देण्यात आले. सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध रीतीने व उत्साहाने पार पडला. हा सर्वच कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला असे पुन: सांगावेसे वाटते.

श्रीदादांचा अमृतमहोत्सव झाल्यानंतर दि. २०-८-९५ रोजी घोसरवाडचे श्री. अनंत मरुळेकर हे श्रीदादांचे दर्शनास आले होते. ते म्हणाले, ''प.पू. दादांच्या चरणांचा स्पर्श होताच माझ्या मनातील आस्तिक भावनांना एकदम उधाण आले.''

श्री. गणेश हरिभाऊ गाडगीळ, डी. एम्. ई., हे इ.स. १९९५-९६ च्या सुमारास सांगली अर्बन बँकेच्या निवडणुकीस उभे राहणार होते. अर्ज भरण्यापूर्वी ते श्रीदादांच्या दर्शनास आले. त्यांनी निवडणुकीची गोष्ट श्रीदादांना सांगितल्यावर, श्रीदादा म्हणाले, ''तुम्ही विजयी होणार.'' त्याप्रमाणे गणेश गाडगीळ निवडून आले.

श्रीदादा आपल्या काही भक्तांबरोबर दि. २२-१-१९९७ रोजी बोलत बसले होते. तेव्हा बोलताना ते म्हणाले, ''काही साधक मला सांगतात की त्यांना अनाहत ध्वनि ऐकू येतो. हे ऐकल्यावर मी त्यांना प्रश्न केला, ''तुम्हाला कोणत्या कानाने अनाहत ऐकू येतो ? खरे म्हणजे अनाहत ध्वनि हा बाह्य कानांना ऐकू येत नाही. तर दोन कानांच्या पोकळीत अनाहत ध्वनि ऐकू येतो.''

श्रीदादांचे एक निष्ठावंत भक्त श्री. शरद आपटे हे पिंपरीच्या औषध कारखान्यात नोकरीस असताना, मा. सतीश खेडकर हे त्यांचे वरचे अधिकारी म्हणून रुजू झाले. श्री. खेडकर यांना ज्ञानेश्वरमहाराजांचेबद्दल अत्यंत आदर. ज्ञानेश्वरमहाराजांच्या ज्ञानदेव तेहत्तिशी इत्यादि काही ग्रंथांवर श्रीदादांनी टीका लिहिली आहे, ही गोष्ट शरद आपटे यांचेकडून श्री. खेडकर यांना समजली. तेव्हा त्यांनी श्रीदादांच्या एक दोन टीका वाचल्या. त्या टीकांच्या वाचनाने श्री.



खेडकरांना श्रीदादांचे बद्दलही पूज्य भाव वाटू लागला. म्हणून शरद आपटे यांना बरोबर घेऊन, ते सांगलीस येऊन श्रीदादांचे दर्शन घेऊन गेले. त्यानंतर त्यांना अंत:स्फूर्ति झाली की ज्ञानेश्वरमहाराजांशी निगडित असणारे श्रीदादांचे काही ग्रंथ प्रकाशित करावेत. आपली इच्छा त्यांनी शरद आपटे यांना सांगितली. श्री. शरद आपटे यांच्या सांगण्यावरून श्री. खेडकर यांनी हा ग्रंथ संपादन करण्याचे काम सांगलीच्या प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचेवर सोपविले. तेव्हा श्रीदादांचे श्रीज्ञानेश्वरस्तोत्र, श्रीज्ञानदेव-आज्ञापत्र, श्रीज्ञानेश्वरीसार, श्रीज्ञानदेवकृत दत्तस्तुति इत्यादि ग्रंथ एकत्र करून, ''श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघु ग्रंथ'' हा छोटेखानी ग्रंथ सिद्ध झाला. व तो सांगलीत श्री. खेडकरांनी दि. १७-३-१९९७ रोजी प्रकाशित केला.

श्रीदादा आपल्या राममंदिरात रामाची मूर्ति असणाऱ्या देव्हाऱ्यापुढे साधनास बसत. दि. २५-७-९७ रोजी ते असेच साधनास बसले असताना, त्यांना रामाच्या मूर्तीचे ठिकाणी महान् स्वरूपात गणपतीचे दर्शन झाले.

श्रीदादांच्या नित्यकीर्तनाच्या उपक्रमाला माघ शुद्ध दशमी, इ.स. १९९८ रोजी ३६ वर्षे-तीन तपे- पूर्ण होत होती. तेव्हा श्रीदादांच्या कीर्तनाचा 'त्रितप-महोत्सव' मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे श्री. चंद्रशेखरअण्णा यांनी ठरविले. श्रीगणेशजयंती माघ शुद्ध चतुर्थी, जानेवारी १९९८ ते माघ शुद्ध दशमी, ६ फेब्रुवारी १९९८ या दिवसांत हा सोहोळा साजरा करण्यात आला. या समारंभात ह.भ.प. बापूसाहेब देशमुख वकिल, ह.भ.प. प्रा. भाऊसाहेब ऐनापुरे, ह.भ.प. प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी इत्यादि मान्यवरांची प्रवचने झाली. तसेच अनेक भजनी मंडळींचे भजनाचे कार्यक्रम झाले.

माघ शुद्ध दशमी या मुख्य दिवशी श्रीदादांचे नित्याचे कीर्तन झाल्यावर, पुणे येथील श्रीसहस्रबुद्धेमहाराज मंदिराचे प्रमुख श्री.अशोककाका-महाराज जोशी यांचे प्रवचन झाले. प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या टिपणात श्रीदादांचे १९५२ चे एक कीर्तन लिहिलेले होते. ते वाचून दाखविण्यास श्री. चंद्रशेखरअण्णांनी त्यांना सांगितले. त्याप्रमाणे ते कीर्तन प्रा. के. वा. आपटे यांनी वाचून दाखविले.

या कार्यक्रमानंतर श्री. अनल व श्री. अनिलप्रभु या श्रीदादांच्या दोन

चिरंजीवांनी श्रीदादांची पाद्यपूजा केली.

त्रितप महोत्सवाच्या निमित्ताने श्रीदादांनी रचलेली चिमड संप्रदायाची आरती ही जाड कार्ड शीटवर छापून ती ''प्रसाद भेट'' म्हणून उपस्थितांना देण्यात आली. ही आरती पुढीलप्रमाणे आहे :-

आरती सांप्रदाया । प्रेमभावे वंदूनिया ।
ओवाळीन संतराया । विनवोनी सदया ।।ध्रु।।
अगाध काडसिद्धा । शिवस्वरूप प्रसिद्धा ।
माया ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा ।।१।।
जय जया नारायणा । जीविचिया जीवना ।
साकार ब्रह्म तनू । गुरुलिंगा निधाना ।।२।।
लक्षुमी अक्का भली । आदि शक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ।।३।।
रघुनाथप्रिय साधु । गुरु आज्ञे करी बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्यसिंधू ।।४।।
धन्य धन्य रामचंद्र । महाविष्णू अवतार ।
साधन सांप्रदाय । गुरु भक्ति बडिवार ।।५।।
नारायण गुरुपीठ । हनुमंत वरिष्ठ ।
गोविंदसुत रामी । नामावली चोखट ।।६।।

या त्रिपत-महोत्सवाच्या निमित्ताने प्रा. डॉ. के. वा. आपटे यांना जे एक पद स्फुरले ते पुढीलप्रमाणे आहे :-

धन्य सांगली ग्राम भूतळी जेथे अवतरले ।
संत श्रेष्ठ श्रीदासराम हे तारक जगी झाले ।।१।।
चौदावे दिनी हनुमंतांची कृपादृष्टी झाली ।
''करील कीर्तन राम आमुचा'' तद्‌वाचा वदली ।।२।।
पंचम वर्षी रामाने त्या कीर्तन सुरू केले ।
ऐकुनि कीर्तन रामानंदे 'प्रल्हाद' तया म्हटले ।।३।।
अखंड कीर्तन परंपरा ती गोविंदी मिनली ।
श्रीरामांनी कीर्तन योगे परंपरा धरली ।।४।।
एकोणीसशे बासट पासून नित्य कीर्तनाला ।
आज अखेरी छत्तीस वर्षे समय पूर्ण झाला ।।५।।



कीर्तन गंगेच्या या ओघा खंड नाही पडला ।
परमार्थाचा मेवा त्यातील भक्तजनी लुटला ।।६।।
तीन तपांची कीर्तनसेवा प्रभुसाठी झाली ।
पाहूनि वामनतनयाला कविता ही स्फुरली ।।७।।

श्रीदादांच्या पिंढरीतील अस्थिभंग बरा होऊन श्रीदादा थोडेफार चालू लागले होते. तोच पुन: एक अपघात घडला. २ एप्रिल १९९८ चा दिवस होता. सकाळी सातच्या सुमारास श्रीदादा पलंगावर पडून श्री. चंद्रशेखर यांच्याशी काहीतरी बोलत होते. बोलता बोलता ते सहज वळले, आणि डाव्या हातावर ते खाली जमिनीवर पडले. त्यांच्या डाव्या खांद्याच्या हाडाला फ्रॅक्चर झाले. ताबडतोब श्रीदादांना डॉ. मोडक यांच्या दवाखान्यात नेण्यात आले. तेथे डावा खांदा व छाती यावर प्लॅस्टिक पट्टा बसविण्यात आला. यावेळी श्रीदादांना चार पाच दिवस दवाखान्यात रहावे लागले. त्यामुळे पाच एप्रिलच्या रामनवमी दिवशी श्रीदादांचे कीर्तन घरात होऊ शकले नाही; घरातले कीर्तन श्रीचंद्रशेखर यांनी केले. या वेळीही श्रीदादांनी दवाखान्यात असताना आपली नित्य कीर्तने चालूच ठेवली होती.

श्रीदादा दवाखान्यातून घरी आले. डाव्या हाताने काही व्यायाम करण्यास डॉक्टरांनी श्रीदादांना सांगितले होते. परंतु यावेळी मात्र श्रीदादांनी हाताचा व्यायाम फारशा गंभीरपणे केला नाही. परिणामत: हा हात हळुहळु आखडू लागला. हा हात कोपराखाली वाकडा होऊन बसला व बोटे ताठ पडली.

श्रीदादांनी आपल्या एका अनुगृहीताच्या साधनातील अडचण दूर केल्याचे एक उदाहरण १९९८-१९९९ साली घडले ते असे :- श्री. अरविंद पीतांबरे हे श्रीदादांचे अनुगृहीत. त्यांचे डोके अतोनात दुखू लागले. ''कोणत्याही शारीरिक कारणांनी ही डोकेदुखी नाही'', असे त्यांना डॉक्टरांनी सांगितले. पीतांबरेंचे बंधूंचेही डोके असेच दुखत असे. त्यांना पीतांबरे यांनी आपली डोकेदुखी निवेदन केली. बंधु म्हणाले, ''साधनाच्या प्रक्रियेत काही अडथळा आल्यास अशी डोकेदुखी होते.'' डोकेदुखीवर उपाय करून घेण्यास काही संतांकडे जावे असे पीतांबरे यांना सुचविण्यात आले. तसे करण्यापूर्वी पीतांबरेंनी श्रीतराणेकरमहाराजांचे भक्त श्री. परांजपे यांचा सल्ला

घेतला. परांजपे म्हणाले, ''अहो पीतांबरे, तुम्ही दादामहाराज केळकरांचे अनुगृहीत आहात. ते सर्व पारमार्थिक शंकाकुशंकांचे निरसन करतात. तेव्हा त्यांना सोडून तुम्ही इतरत्र कशासाठी जाता?'' हे ऐकल्यावर पीतांबरेंना लाजल्यासारखे झाले. श्रीदादांच्याकडे जाऊन पीतांबरेंनी त्यांना सर्व काही सांगितले. श्रीदादा म्हणाले, ''अहो पीतांबरे, 'मी आता साधनास बसतो,' असे म्हणून तुम्ही माझ्यापुढे साधनास बसत जा. पंधरा दिवसांत तुमची डोकेदुखी नाहीशी होईल.'' त्याप्रमाणे पीतांबरे करू लागले. आणि ७-८ दिवसांतच त्यांची डोकेदुखी नाहीशी झाली. आजतागायत पुन: तसली डोकेदुखी पीतांबरे यांना झाली नाही.

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरमहाराजांची पुण्यतिथि दि. १९-१२-९८ रोजी होती. या दिवशी श्री. ल. कृ. कुलकर्णी यांना श्रीदादांनी गोंदवलेकरमहाराजांच्या रूपात दर्शन दिले. हा भाग कुलकर्णी काव्यबंधात पुढीलप्रमाणे सांगतात :-

ब्रह्मचैतन्य पुण्यतिथि । पर्वकाळ राम कीर्तनी ।
चिपळ्या भावे पुजोनी । ठेविल्या तेथे ।।१।।
घुंगुर्डे यांचे प्रवचन । ऐकिती दादा तन्मय होऊन ।
नाममहिमा ऐकून । चरित्र महाराजांचे ।।२।।
ते वेळी मजला । बैसवले जवळ मजला ।
प्रवचनाचे वेळेला । चमत्कार दाखविला ।।३।।
सद्गुरु दादांचे ठिकाणी । महाराज दिसती झणी ।
थराथरारून अंग जाणी । अत्यानंदे ।।४।।
अंगी कफनी भगवी दिसे । तुळशीमाळ वरी वसे ।
व्याघ्रासनी बैसे । दासबोध पुढती ।।५।।
मनोहर हास्यवदन । कृपा कटाक्ष स्नेहनयन ।
मजकडे पाहोन । कुबडी घेतली ।।६।।
ते वेळी नाम बोल कल्लोळे । जागा झालो ते वेळी ।
श्रीदादा समोर दिसले । प्रत्यक्ष ।।७।।
तसेच उठोनी झणी । वंदिले गुरुचरण गुणी ।
महाराजांचे रूप नयनी । दिसे अजुनी ।।८।।
श्रीदादा वदले ते वेळी । महाराज दिसले ना जवळी ।



दर्शनाची इच्छा झाली । ती पूर्ण केली ।।९।।
ऐसे सद्गुरूचे महिमान । जाणो न शकती सर्व जन ।
म्हणोनी जवळ असून । आकळेना ।।१०।।

श्रीदादांचे पितृदेव श्रीमामा यांनी अडतीस वर्षे अखंड नित्यकीर्तन केले. मामांचे नंतर श्रीदादांनी नित्य कीर्तन सुरू केले. श्रीदादांच्या नित्य कीर्तनास इ.स. १९९९ मध्ये ३७ वर्षे पूर्ण होत होती. अशा प्रकारे श्रीदादांच्या कुळात श्रीदादांच्या घरी ३८+३७ अशी ७५ वर्षे अखंड नित्य कीर्तन झाले. ही एक न भूतो न भविष्यति अशी अपूर्व घटना घडली. भूतकाळात अशी घटना कुठे घडल्याचा दाखला सापडत नाही. भविष्यकाळाच्या पोटात काय दडले आहे हे आज कोण सांगू शकेल ?

श्रीमामा व श्रीदादा या दोघांच्या मिळून नित्यकीर्तनाला ७५ वर्षे झाली, या निमित्ताने केळकरांच्या नित्यकीर्तनाचा अमृतमहोत्सव करण्याचे ठरले. हा अमृतमहोत्सव माघ शुद्ध चतुर्थी ते माघ वद्य तृतीया या दीर्घ काळात साजरा करण्याचे ठरले. या काळात नेहमीप्रमाणे वेद-पठण, प्रवचने, भजने, इत्यादि कार्यक्रम तर झालेच. पण या महोत्सवात आणखी एक आगळा-वेगळा कार्यक्रम करण्याचे चंद्रशेखरअण्णांनी ठरविले. हा कार्यक्रम असा होता :- पौष शुद्ध प्रतिपदा ते माघ वद्य तृतीया या काळात श्रीदादांच्या राममंदिरामध्ये तसेच अनेक साधक-भक्तांच्या घरामध्ये ७५ तासांचे साधन आणि दासबोध या महान् ग्रंथाचे पठण-पारायण पार पडले. तेही तसा संकल्प सोडून. चिमड संप्रदायात साधन व दासबोध वाचन हे दोन्हीही महत्त्वाचे असल्याने, वरील दोन गोष्टींचे औचित्य लक्षात येईल.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चांगदेवपासष्टीवर ''पासष्टी कला'' ही ओवीबद्ध टीका श्रीदादांनी लिहिली होती व ती सिद्धगिरिसंदेश त्रैमासिकात प्रसिद्ध झाली होती. ती पुस्तकरूपाने परमार्थ-प्रेमी जनांना उपलब्ध करून देण्याचे श्री. न. ना. गोखले यांनी ठरविले. कारण श्री. गोखले यांचे मते, ''चांगदेवपासष्टी हे अध्यात्मातले एक गूढ प्रमेय आहे. 'मी सर्व जाणले आहे' अशी स्वत:ची ठाम समजूत असणाऱ्या महायोगी चांगदेवांना, 'त्यांनी काहीच जाणले नाही', ही जाणीव करुन देण्याचे सामर्थ्य श्रीज्ञानेश्वरमाऊलीच्या या पासष्ट ओव्यांमध्ये आहे.'' आणि श्रीदादांचे निष्ठावंत भक्त श्री. न. ना. गोखले

यांनी श्रीदादांच्या टीकेसह चांगदेवपासष्टी हा ग्रंथ गुरुपौर्णिमा दिनांक २८-७-१९९९ रोजी प्रकाशित केला.

श्री. वसंत गंगाधर गोगटे, जी.सी.डी, ज्योतिषभूषण, सामुद्रिक भूषण हे रिझर्व्ह बँकेतून असिस्टंट ट्रेझरर म्हणून निवृत्त झाले. ते 'गजानन आशिष' चे संपादन करीत. त्यांना पुणे येथील श्रीदिगंबरदासमहाराजांचा अनुग्रह होता. ते १९ नोव्हेंबर १९९९ रोजी उत्सवासाठी सहस्रबुद्धे मंदिरात गेले. तेथे श्रीकाकामहाराज जोशी यांनी त्यांना सांगलीस श्रीदादामहाराज केळकरांचे दर्शन घेण्यास सांगितले. ते २० नोव्हेंबर ९९ रोजी सांगलीत आले. ते श्रीदादांच्याकडे आले त्यावेळी आरती चालू होती व श्रीदादा खुर्चीत बसलेले होते. श्रीदादांच्या प्रसन्न मूर्तीकडे पाहिल्यावर ते एकटक पहातच राहिले. श्रीदादांनी त्यांच्याकडे पाहिले. त्यांच्या कृपाकटाक्षाने श्री.गोगटेंना श्रीगजाननमहाराजांच्या कृपाकटाक्षाचा भास झाला व ते मनात सुखावले. ते सांगतात, ''क्षणार्धात वीज चमकून काहीतरी दिसावं तसं ती. दादामहाराजांच्या अकस्मात् झालेल्या कृपाकटाक्षानं मला काहीतरी मिळालं असं वाटलं. मी सारखा त्यांच्याकडे पहातच होतो. आरतीनंतर त्यांच्या चरणी मस्तक ठेवलं आणि मी कृतार्थ झालो. त्यांच्या पायाशी बसलो.'' या सुमारास गोगट्यांच्या घरी फार अडचणी आलेल्या होत्या. त्या सर्व त्यांनी श्रीदादांना सांगितल्या. तेव्हा श्रीदादांनी त्यांची कुलस्वामिनी कोणती असे विचारले. 'अंबेजोगाई' असे गोगटेंनी उत्तर दिले. तेव्हा श्रीदादांनी त्यांना सांगितले की घरच्या सर्वांनी अंबेजोगाईच्या दर्शनास जावे आणि रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ पाच पाच माळा जप करावा; नंतर ''अजिबात काळजी नको'', असे आश्वासन दिले.

दुसरे दिवशी गोगटे पुण्यास निघाले. काकामहाराजांना देण्यास श्रीदादांनी त्यांच्याजवळ प्रसाद दिला. पुण्यास येऊन त्यांनी काकामहाराजांना सर्व सांगितले. तेव्हा काकामहाराज बोलले, ''तुम्हाला दासराममहाराजांचा आशीर्वाद लाभला. आता तुम्ही निश्चिंत रहा.''

गोगटे २४ नोव्हेंबर ९९ रोजी आपल्या घरी गेले. आपली पत्नी सौ. वृषाली हिला त्यांनी सर्व हकिकत सांगितली व काहीही करून अंबेजोगाईस गेलेच पाहिजे असे म्हटले, व हर्षवर्धन या आपल्या मुलास



त्यासाठी तयार कर असेही सांगितले. तेव्हा ती म्हणाली, ''तुम्ही पुण्यास गेल्यावर मी अंबे-जोगाईस जाण्याचा विषय हर्षवर्धनकडे काढला होता व तो तयार आहे. तो म्हणाला 'बाबा पुण्याहून आले की आपण सर्वजण अंबेजोगाईस जाऊ'.''

२ डिसेंबर रोजी गोगटे कुटुंब अंबेजोगाईस जाण्यास निघाले. दर्शन घेऊन ते ४ डिसेंबर रोजी सर्वच जण सांगलीस श्रीदादांचे दर्शनास आले. व मग परत गेले. गोगटे यांचे लग्नाला २८ वर्षे झाली होती. तरी ते अंबेजोगाईला जाऊ शकले नव्हते. पण श्रीदादांच्या वचनानुसार ते पंधरा दिवसांतच अंबेजोगाईला जाऊन आले. ''जी गोष्ट इतक्या वर्षात साध्य झाली नाही ती श्रीदादामहाराजांनी पंधरा दिवसांत घडवून आणली हा चमत्कार नाही तर काय?'' असे गोगटे विचारतात. श्री. गोगटे पुढे सांगतात, ''ब्रह्मा विष्णु महेश हे सर्व ती. दादामहाराजांचे रूपात होते असंच मला वाटतं''

श्रीदादांच्या वयाला ८० वे वर्ष लागत होते. या निमित्ताने सोमवार दि. २५-१०-१९९९ रोजी 'सहस्रचंद्रदर्शन' व प्रपौत्र-मुख-दर्शन हा कार्यक्रम करण्याचे श्रीदादांच्या घरच्या मंडळींनी ठरविले. या कार्यक्रमाची निमंत्रण-पत्रिका श्रीदादांचे चार चिरंजीव आणि त्यांच्या सौभाग्यवती यांच्या नावाने काढण्यात आली होती. साहजिकच सांगलीतील व परगावातील अनेक मंडळी या कार्यक्रमास उपस्थित होती. श्रीगुरुनाथ कोटणीसमहाराज, त्यांचे बंधु व चिरंजीव, श्रीमती अंबुताई वाटवे, संजय पाटील व त्यांचे वडिल, अरुण दांडेकर व त्यांचेबरोबर नगराध्यक्ष सुरेश पाटील, दत्तात्रय कर्णेकर, सुधाकर रेगोडकर, सतेज केळकर व त्याचे मातापिता, श्री. म. वि. गाडगीळ, मामी घारपुरे, सौ. पमाताई परचुरे, लोखंडे बंधु, प्रशांत जोशी इत्यादि सांगलीतील लोक उपस्थित होते. तर मुंबईहून श्री. व सौ. भानुशाली, पुणे येथून शरद आपटे, शिवदे, अशोक पंडित, केशवराव जोशी; काडसिद्धमहाराज हे निंबरगीहून, जत येथून श्री. गुरव, कर्नाळहून माणिक गोसावी, संगमनेरचे श्री. दामोदर केशव दिवेकर व सौ. वृंदा दिवेकर, फलटण येथून श्री. वि. सहस्रबुद्धे, घोसरवाडचे मा. दत्तोपंत घोसरवाडकर, कोल्हापूरहून धनंजय भावे व त्यांच्या सौ. आणि चिरंजीव, श्री. शशिकांत मायदेव, आजरा येथून बापू मायदेव, कुणकेश्वर येथून श्रीपतराव धोंगडे, नागपूरहून वि. म. जोशी, आणि

विश्रामबाग येथून प्रा. डॉ. के. वा. आपटे, सौ. माया के. आपटे, श्री. नारायण के. आपटे, उदय कुलकर्णी, मा. न. ना. गोखले, चव्हाण सरकार, व्ही. के. कुलकर्णी, व त्यांच्या सौ., श्री. व सौ. शैला भिडे, प्रकाश भावे इत्यादि भाविक उपस्थित होते.

सहस्रचंद्रदर्शन या कार्यक्रमात सकाळी धार्मिक विधि, सोन्याची फुले उधळणे इत्यादि सोहोळे पार पडले. नंतर श्रीदादांचे नातेवाईक व भक्त यांनी श्रीदादांना आहेर केला. त्यानंतर दुपारी ५०० भक्तांना भोजन देण्यात आले.

संध्याकाळी श्रीदादांचे कीर्तन झाल्यावर लगेच श्रीदादांचे चिरंजीव श्री. सूर्यकांत व त्यांच्या पत्नी सौ. सुनीता यांनी श्रीदादांची यथासांग पाद्यपूजा केली. यावेळी ''श्रीदासराम-गौरव-गीत'' या श्रीदादांचे गौरवपर काव्यग्रंथाचे सामुदायिक पठण झाले. हा ग्रंथ या कार्यक्रमानिमित्त श्री. चंद्रशेखर यांनी प्रकाशित केला होता. या ग्रंथामध्ये प्रा. डॉ. के. वा. आपटेरचित ''श्रीदासरामजीवन । विहंगम दर्शन'' हा काव्यबंध, आणि श्री. प्रकाश भावे लिखित ''स्वयंसिद्ध रामा तुजला नमस्ते'' हे काव्य, या दोन काव्यांचा समावेश होता.

श्रीदासरामगौरवगीताचे पठणानंतर, ''आरती रामराया । करी कृपेची छाया'' ही दादांचेवरुन असणारी आरती म्हणून श्रीदादांची आरती करण्यात आली. नंतर अंगणातच रथ व पालखी यांच्या प्रदक्षिणेचा सोहोळा झाला आणि नंतर पंचपदी होऊन या दिवसाचा कार्यक्रम समाप्त झाला.

श्रीदादांच्या ऐंशी वर्षाच्या दीर्घ आयुष्यात मुख्यत: काय काय घडले हे येथपर्यंत पाहून झाले. श्रीदादांचे ८० वे वर्ष संपल्यानंतर श्रीदादा फार काळ या भूलोकी राहिले नाहीत. त्यांनी पुढल्याच इ.स.२००१ या वर्षी निर्याण केले. श्रीदादांच्या निर्याणाचा प्रसंग पाहण्यापूर्वी श्रीदादांच्या जीवनाचा भिन्न दृष्टिकोनातून एक आढावा घेणे आवश्यक आहे. कारण असे :- श्रीदादा हे मुख्यत: परमार्थी होते हे खरे; पण ते प्रपंचात राहूनच परमार्थ करीत होते. मग ते प्रपंचात कसे वागत होते हे कळणे उपयुक्त आहे. पारमार्थिकदृष्ट्या श्रीदादांची कोणती वैशिष्ट्ये होती त्यांचेही दिग्दर्शन व्हावयास हवे.



श्रीदादांच्या पारमार्थिक सामर्थ्याचे भक्त व भाविक यांना कोणते अनुभव आले हे कळणेही उद्बोधक ठरणार आहे. ऐंशी वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात श्रीदादांनी जे काही पारमार्थिक लेखन केले, त्याचाही परिचय व्हावयास हवा. श्रीदादांनी ३९ वर्षे अखंड नित्य कीर्तन केले. त्यांच्या कीर्तनाची काय वैशिष्ट्ये होती हेही कळावयास हवे; तसेच त्यांचे एकादे पूर्वीचे कीर्तन वाचावयास मिळेल तर उत्तमच होणार आहे. या सर्व दृष्टींनी यापुढे प्रपंचातील श्रीदादा, परमार्थातील श्रीदादा, श्रीदादांचे भक्त-भाविकांना आलेले अनुभव, श्रीदादांचे लेखन, व श्रीदादांची कीर्तने यांची माहिती प्रथम दिली आहे आणि त्यानंतर श्रीदादांच्या निर्याणप्रसंगाचे वर्णन केले आहे.

**प्रकरण १७ : संदर्भ**


१) श्रीगुरुमहिमा, प्र. श्री. वि. सहस्रबुद्धे, पुणे, २ जून १९९१
२) फाइल क्रमांक ४ (जाधव)
३) लेजर क्रमांक २, १, ३, ४, ५, ६
४) केशवलिखितदासरामचरित्रटिप्पणे
५) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ, प्र. सतीश खेडकर, सांगली, १९९७
६) श्रीचांगदेवपासष्टी-एक नामकळा, प्र. न. ना. गोखले, सांगली, १९९९

## प्रकरण १८

# प्रपंचातील श्रीदादा

श्रीदादांच्या संपूर्ण आयुष्यात परमार्थ हाच केंद्रस्थानी होता. आणि ''आयुष्याच्या या साधने'' त्यांनी ''सच्चिदानंद'' ही पदवी प्राप्त करून घेतली होती. असे असले तरी ''प्रपंचात राहून परमार्थ करावा'' ही निंबरगीकर-महाराजांची शिकवण त्यांना शिरोधार्य होती आणि म्हणून त्यांनी ती स्वत:च्या आचरणात आणली होती. वरवर पाहिल्यास श्रीदादा इतर माणसांप्रमाणेच संसारात वावरताना दिसत, परंतु त्यांचे अंत:करण मात्र अन्यत्र असे. सुक्या नारळातील वाळलेल्या गोट्याप्रमाणे ते संसारातून अलिप्त होते. त्यांचे शरीर संसारात असे पण त्यांचे चित्त मात्र चैतन्याच्या अनुसंधानात असे. असामान्य असणारे श्रीदादा संसारात सामान्य माणसांप्रमाणे वागले, आणि श्रीएकनाथ-महाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''परमार्थे साधे सहज संसार'' अशी त्यांची स्थिति होती. त्यांचे बाबतीत ''प्रपंच परमार्थ एकरूप होत । आहे ज्याचा हेत रामनामी'' हे मात्र खरे होते.

श्रीदादांचे प्रापंचिक जीवन सर्वसाधारणपणे सुखासमाधानाचे होते. या संदर्भात पुढील प्रसंग बोलका आहे :- श्रीदादा मॅट्रिकची परीक्षा अनुतीर्ण झाल्यावर, त्यांची पत्रिका त्यांच्या मातोश्रींनी श्री. छत्रे गुरुजींना दाखविली. पत्रिका पाहून गुरुजी बोलले, ''मातोश्री, या पत्रिकेत पुष्कळ शिक्षण, व्यापार, नोकरी इत्यादि कसलाच योग मला दिसत नाही. तथापि राजयोग आहे. ही पत्रिका ज्याची आहे त्याला आयुष्यात कडेपर्यंत कधीच काही कमी पडणार नाही.'' श्रीदादा संसारात राजयोगी ठरले. प्रसंगानुसार ते स्वत:च अनेकदा सांगत, ''लहानपणी माझे सगळे आईवडिलांनी केले. आता बायको व मुले सर्व करतात. मी मात्र मधल्यामध्ये निवांत आहे. आत्तापर्यंतचे माझे आयुष्य राजासारखे गेले आहे. फक्त राज्य नाही इतकेच.'' याचा अर्थ असा नव्हे की श्रीदादांच्या जीवनात काही अडचणी, त्रासाचे प्रसंग इत्यादि आले नाहीत. सांगलीतील कविवर्य श्रीरंग विष्णू जोशी यांनी पुढील नोंद केली आहे :- श्रीदादा म्हणाले, ''तुमचे आमचे दु:ख कुणीही काढून घेऊ शकत नाही. ते आपले प्राक्तन म्हणा हवे तर. आपणालाच ते भोगावयास हवे. त्यातून सुटका नाही.



पण संसारातले दु:ख सोसण्याचे सामर्थ्य संत आम्हांला जरुर देतात.'' प्रपंचात जे काही अनुकूल अथवा प्रतिकूल घडते ते महाराजांच्या इच्छेने घडते अशी श्रीदादांची भूमिका असे. कर्ते-करविते श्रीमहाराज आहेत ही जाणीव श्रीदादांना प्रकर्षाने होती. म्हणून प्रपंचात त्यांचा आग्रह किंवा दुराग्रह दिसतच नसे.

लहानपणी श्रीदादा इतर मुलांप्रमाणे विटीदांडू, गोट्या, इत्यादि खेळ खेळले नाहीत. तथापि त्यांना बैठ्या खेळातील पत्त्याचे काही डाव माहीत होते. ते पत्त्यांना इस्पिटे म्हणत. नोकरी लागण्यापूर्वी आणि नंतरही ते कधी कधी पत्ते खेळत, ते सुद्धा इतरांचा फारच आग्रह पडला तर त्यांचे मन मोडू नये म्हणून. त्यांना 'नाठे ठोम' (नॉट ॲट होम), लॅडिस आणि झक्कू हे खेळ येत. तथापि पत्ते खेळण्याचे व्यसन मात्र त्यांना कधीच लागले नाही. त्यांना मोक्षपटाचा खेळ खेळणे मात्र आवडत असे.

बालपणी श्रीदादांचा पोषाख इतर लहान मुलांप्रमाणे असे. मुंजीत घेतलेली जरीची टोपी घालूनच ते बरीच वर्षे शाळेला जात होते. पुढे वयात आल्यावर पांढरे धोतर व सदरा असा त्यांचा पोषाख असे. बाहेर जाताना ते काळ्या रंगाची टोपी वापरीत. आवश्यक असेल तेव्हा बाहेर जाताना ते कोटही घालीत. नोकरीच्या काळात ते सरसहा कोट वापरीत होते. प्रारंभी दोन काचा मारून ते दुटांगी धोतर नेसत होते. पुढे ते उजव्या बाजूला सोगा सोडून धोतर नेसू लागले. शेवटच्या काही वर्षात ते घरी असताना एक लोकरीची लाल रंगाची कानटोपी डोक्यावर घालीत. कीर्तनाचे वेळी बहुधा त्यांचे मस्तकावर टोपी असे तर कधी कानटोपी असे. त्यांच्या निर्वाणयात्रेच्या प्रसंगी ही कानटोपी त्यांना घालण्यात आली होती. थंडीच्या दिवसात श्रीदादा लोकरीचा स्वेटर वापरीत.

श्रीदादा लहानपणी चहा पीत असत. त्यांचे पिताजी श्रीमामा हे काँग्रेसचे अनुयायी होते; त्यांनी काँग्रेसच्या चळवळीत ''ममता सोडली चहा कॉफीची । आणि परदेशी साखरेची ।।''. वडिलांचे अनुकरण करून श्रीदादांनी चहा पिणे बंद केले. पुढे बरेच दिवस झाल्यावर ते अधून मधून कॉफी घेऊ लागले. नोकरीच्या काळात श्रीदादांचे सहकारी चहा पीत. परंतु श्रीदादा चहाला शिवले नाहीत. तथापि पुढे इ.स. १९९५ चे सुमारास कॉफीमुळे त्यांच्या पोटात गुबारा धरू लागला. तेव्हा डॉक्टरांच्या

सांगण्यानुसार श्रीदादा अधून मधून चहा घेऊ लागले.

श्रीदादांच्या खाण्यापिण्याच्या विशेष अशा काही आवडीनिवडी नव्हत्या. भात, भाकरी/पोळी, भाजी, आमटी व तोंडी लावण्याची चटणी असा त्यांचा प्राय: आहार असे. गुरुलिंगगीताजयंतीचे दिवशी मात्र, निंबरगीकरमहाराजांना आवडे म्हणून ते जोंधळ्याची भाकरी व अंबाड्याची भाजी करवून घेत. पक्वान्नामध्ये त्यांना त्यातल्या त्यात श्रीखंड आवडे. ते श्रीखंडात तूप घालून खात. असे केल्याने श्रीखंड बाधत नाही असे ते सांगत.

नोकरी लागण्यापूर्वी तसेच नोकरी लागल्यावरसुद्धा सणावारप्रसंगी श्रीदादा नागवेलीच्या पानाचा विडा खात. त्यांचा विडाही मजेशीर असे : कमीत कमी चारपाच पानांचा त्यांचा विडा असे. विड्यामध्ये सुपारी आणि कात याखेरीज अन्य काही त्यांना चालत नसे. विडा खाताना तो लगेच संपवून न टाकता तो गालात बराच वेळ धरून ठेवण्याची सवय त्यांना होती. रोज विडा खाण्याची सवय मात्र श्रीदादांना कधीच लागली नाही.

तरुणपणी श्रीदादा उंचेपुरे आणि गोऱ्या रंगाचे होते. प्रारंभी त्यांच्या चेहऱ्यावर तारुण्य-पीटिका उठून दिसत असत; पुढे त्या नाहीशा झाल्या. त्यांच्या हातापायाची नखे गुलाबी होती; ती पोचट नसून भरीव होती. ते प्राय: कातडी वहाणा वापरत. पुढे पुढे काही प्रसंगी ते बूट वापरताना दिसत.

श्रीदादांचे पिताजी श्रीमामा कधी कधी तपकीर ओढत. प्रारंभी तपकीरीचा वास चांगला येतो म्हणून श्रीदादा सुगंधी तपकीर ओढू लागले. पुढे तेवढ्याने समाधान होईना म्हणून ते साधी कडक तपकीर ओढू लागले. नोकरी लागल्यावर तर त्यांना तपकिरीचे व्यसनच जडले. पुढे पुढे श्रीदादांचा तपकिरीचा हा सोस फारच वाढत गेला. प्रारंभी बाहेर गेल्यावर वापरता यावी म्हणून ते तपकीर ठेवण्यास एक छोटीशी लाकडी डबी वापरीत. पुढे ते एक पत्र्याची लहान डबी वापरू लागले. नंतर श्री. हरिभाऊ गोवंडे या त्यांच्या मेव्हण्याने त्यांना तपकिरीसाठी एक चांदीची डबी भेट म्हणून दिली. शेवटपर्यंत श्रीदादा ती डबी वापरीत. पुढे एक वेळ अशी आली की ''महाराज, आता तपकीर ओढणे बंद करा'' असे डॉक्टरांनी त्यांना सांगितले. तेव्हा मात्र श्रीदादांनी तपकीर ओढणे हळूहळू कमी केले आणि एक दिवस तपकीर ओढणे हे संपूर्णपणे बंद करून टाकले.



नोकरीच्या काळात अथवा तत्पूर्वी श्रीदादांनी मनगटी घड्याळ कधीच वापरले नव्हते. पुढे त्यांचे तृतीय चिरंजीव श्री. अनल हे मिळवते झाल्यावर त्यांनी श्रीदादांना सोनेरी रंगाचे मनगटी घड्याळ भेट म्हणून दिले. ते श्रीदादा वापरू लागले. आंघोळीची वेळ सोडून श्रीदादा हे घड्याळ सतत आपल्या मनगटावर बांधून ठेवीत. प्रथम ते हे घड्याळ डाव्या मनगटावर बांधीत; पुढे डावा हात अधू झाल्यावर ते उजव्या हातावर घड्याळ घालू लागले.

घरात पोपट, मांजर यासारखे पाळीव प्राणी बाळगणे हे श्रीदादांना मुळीच आवडत नसे. कुत्रा या प्राण्याला तर ते भीतच असत.

घरातील पैशांच्या व्यवहारात श्रीदादानी कधीच लक्ष घातले नाही. पैशाचे सर्व व्यवहार त्यांचे पिताजी श्रीमामा बघत असत. नोकरी लागल्यावरही श्रीदादा आपला सर्व पगार मामांचे स्वाधीन करीत. आवश्यक वाटल्यास त्यांचेकडून पैसे मागून घेत. मामांचे निर्वाणानंतर श्रीदादांनी काही काळ पैशाचा व्यवहार पाहिला, तो सुद्धा ज्येष्ठ चिरंजीव चंद्रशेखर हे कर्तेसवरते होईपर्यंत. त्यामुळे पुढे बेळगांवजवळील शेताच्या विक्रीचा व्यवहार उद्भवला तेव्हा श्रीदादांनी तो चंद्रशेखर यांचेवरच सोपवला.

नोकरी लागण्यापूर्वी आणि नोकरी लागल्यावरही श्रीदादा मंडईत कधी गेलेच नाहीत. ते अन्य बाजारहाटही करीत नसत. ते काम घरची मंडळी पार पाडीत.

श्मश्रु व केस कापणे यासाठी श्रीदादा सलूनमध्ये जात नसत. केसांचे कारागीर-शंकरराव, मुकुंदराव इत्यादि-घरी येऊन दाढी करीत आणि केस कापीत. श्रीदादांच्या डोक्यावर सैनिकी पद्धतीचा बारीक क्रॉप असे व त्यात लहानशा शेंडीला जागा दिलेली असे. आरंभी काही दिवस श्रीदादांनी ओठावर मिशी ठेवली होती. पुढे मिशी काढून ते आपला चेहरा सफाचट ठेवू लागले.

''नोकरी करण्यासाठी माझा जन्म नाही'', असे श्रीदादा उघडपणे म्हणीत असत. तरी जितकी वर्षे त्यांनी नोकरी केली तितकी वर्षे वरिष्ठांची मर्जी सांभाळून त्यांनी काळजीपूर्वक नोकरी केली. मजा करण्यासाठी म्हणून त्यांनी कधी रजा काढली नाही. त्यांचे नोकरीचे ठिकाण गणेशदुर्ग म्हणजे राजवाडा हे होते. तेथे श्रीदादा पायीपायी जात. सायकल वा अन्य वहान

चालविण्यास शिकून ते त्यांनी कधी वापरले नाही.

जेवण करुन साधारण सकाळी १०।। चे सुमारास श्रीदादा कचेरीत जाण्यास निघत व प्राय: संध्याकाळी ६-६।। चे सुमारास घरी परत येत. कचेरीत जाताना ते कधीच जेवणाचा डबा बरोबर नेत नसत. कचेरीतून घरी आल्यावर, काही तरी थोडेसे खाऊन, ते मामांच्या कीर्तनात पेटीची साथ करण्यास बसत. कधी कीर्तनोत्तर ते श्री. के. वा. आपटे यांचे बरोबर बाहेर जात. तसे न घडल्यास कीर्तनोत्तर पंचपदी इत्यादि झाल्यावर रात्री ९ चे सुमारास त्यांचे भोजन होई. संध्याकाळी रथ, पालखी वा अन्य काही कार्यक्रम असल्यास या वेळात फरक होई. जेव्हा रथ-सोहळा असे, तेव्हा मामा असताना आणि मामांच्या नंतरही श्रीदादा स्वहस्तेच रथ ओढून देव्हाऱ्याला तीन प्रदक्षिणा घालीत. श्रीदादांची प्रकृति व्यवस्थित होती, तोपर्यंत हा क्रम चालू होता. पालखी सोहोळ्यात मात्र अन्य कोणीतरी दोघे पालखी वहात. या सोहोळ्यात तीन आरत्या असत. त्यातील एक आरती घेण्यास श्रीदादा के. वा. आपटे यांना सांगत.

श्रीदादा अधून मधून श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराजांचे कैवल्यधामात जात. तसेच ते गंगाधरपंतसिंग यांच्या हनुमान समाधिमंदिरात जात असत. श्रीबाबूरावजी कोटणीस यांच्या सांगण्यावरुन, कैवल्यधामात होणाऱ्या उत्सव इत्यादींचे इतिवृत्त श्रीदादा मुंबईहून निघण्याऱ्या 'सद्भक्तिप्रकाश' या त्रैमासिकाकडे प्रसिद्धीसाठी पाठवत.

सिटीहायस्कूल मध्ये जितका झाला तितकाच संस्कृत भाषेचा अभ्यास श्रीदादांनी केलेला होता. तथापि त्यांना संस्कृत भाषेबद्दल फार आस्था होती. या आस्थेपोटी श्रीदादांनी इतरांचेकडून पुढील गोष्टी करवून घेतल्या :- सानंद टीकेसह श्रीज्ञानदेवतेहत्तिशी या आपल्या ग्रंथात त्यांनी के. वा. आपटे यांचेकडून 'प्रेमपुष्पांजली' संस्कृतमध्ये लिहून घेतली, तसेच त्यांचेकडूनच गुरुपरंपरा व गुरुतृतीया यावरचे श्लोक संस्कृतमध्ये लिहवून घेतले. प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचेकडून त्यांनी 'संतसहस्रनाम' संस्कृतमध्ये लिहवून घेतले. मामांच्या पुण्यतिथि उत्सवात श्रीदादांनी संस्कृतचे शिक्षक श्री. केशवराव जोशी यांना संस्कृतमध्ये प्रवचन करण्यास प्रवृत्त केले.

श्रीदादांचे आपल्या मातापित्यांवर प्रेम आणि भक्ति होती. ''इंदिरा गोविंद माता पिता । रामासी लाभले पूर्वपुण्ये'' (दासरामगाथा, पृ. १३५) असे



त्यांचे उद्गार आहेत. ''प. पू. बापूरावजी हे वडिल व प. पू. सौ. इंदिराबाई ही माता लाभली म्हणूनच आपणांस गुरुकृपेचा लाभ झाला,'' असे श्रीदादा सांगत. किंबहुना ''मोक्ष मिळाला नाही तरी चालेल पण हेच आईबाप जन्मोजन्मी दे, असे मागणे राम परमेश्वराजवळ मागतात'' अशी नोंद श्री. वि. द. देवधर यांनी केली आहे, ती लक्षणीय आहे. श्रीमामांच्या विषयी श्रीदादांची भूमिका फार वेगळी होती. मामांना उद्देशून ते म्हणतात ''माझा योगची अपूर्व । म्हणोनी तुम्ही पितृदेव । येता घेवोनि आली ठेव । अध्यात्माची'' (श्रीगोविंददर्शन पृ. १). इतकेच नव्हे तर ''पिताजी मामा ब्रह्मरुप'' (तत्रैव पृ. ८) अशी त्यांची निष्ठा होती. म्हणूनच श्रीदादांना मामांविषयी अनेक अभंग आणि आरत्या स्फुरल्या. देवांची जयंती साजरी केली जाते. मामा हे देव म्हणून श्रीदादा मामांची जयंती साजरी करू लागले. आईवडिलांविषयीचा श्रीदादांचा आदर व्यावहारिक जीवनात पुढीलप्रमाणे दिसे :- बाहेर जाण्यापूर्वी अथवा कीर्तन सुरू करण्यापूर्वी श्रीदादा सर्वांचे समक्ष मातापित्यांचे चरणावर मस्तक ठेवून नमस्कार करीत.

आपली पत्नी व पुत्र यांच्याविषयी श्रीदादांना आपुलकी वाटत असे. पत्नीला बरोबर घेऊन ते कधी फिरावयास गेले नाहीत. तसेच तिला घेऊन ते कधी सिनेमा-नाटक-सर्कस पहाण्यास गेले नाहीत. कारण ते कधी सिनेमा-नाटक पहातच नसत. परंतु विशेष प्रसंगी ते पत्नीला बरोबर घेऊन जात. सौ. सीतावहिनींचे एक बंधु नोकरीचे निमित्ताने अहमदाबादला रहात होते. त्यांनी एकदा सौ. सीतावहिनींना आपल्याकडे बोलावले. त्यावेळी सौ. सीतावहिनींचे बरोबर श्रीदादा अहमदाबादला गेले. असेच एकदा ते पत्नीसह सिकंदराबाद येथे असणाऱ्या सौ. सीतावहिनींच्या बंधूकडे जाऊन आले. आपल्या पुत्रांच्या प्रकृति, त्यांचे शिक्षण, त्यांच्या लग्नमुंजी इत्यादीकडे श्रीदादांचे लक्ष असे. श्रीदादांना चार पुत्र, चार सुना, नातवंडे व पणतवंडही झाले. त्यांची नावे श्रीदादांनी सुचवली तशी ठेवली गेली.

श्रीदादांचे जन्माचे वेळी त्यांचे घरी अंताजीपंत हे आजोबा, आई, आणि वडिल इतकी माणसे होती. पुढे आजोबा निजधामास गेले. काही काळाने श्रीदादांचे घरी श्री. गणपतराव कानिटकर हे रहावयास आले. मामा त्यांना आपला पुत्रच मानीत. काही दिवसांनी श्रीदादांचे मामा पंडितराव हे सहकुटुंब काही काळ श्रीदादांचे घरी राहिले. श्री. पंडितमामा हे परमार्थाबद्दल फार वेचक

प्रश्न विचारीत असे श्रीदादा सांगत. काही काळ श्रीदादांचा मामेभाऊ भरत हा श्रीदादांचेकडेच रहात होता. पुढे पंडित मामांचे कुटुंब इतरत्र गेले. तितक्यात श्रीदादांना पुत्र झाले. सौ. सीतावहिनींच्या थोरल्या भगिनी सौ. अंबुताई काही कारणाने काही दिवस श्रीदादांच्या घरी रहात होत्या. पुढे त्यांनी शेजारच्या वाड्यात आपले बिऱ्हाड हलविले. सौ. अंबुताई व त्यांची अपत्ये धनंजय, प्रकाश व शैला हेही श्रीदादांच्या घरी येत असत.

श्रीदादांच्या बालपणी त्यांचे आजोबा व आईवडिल हे श्रीदादांचे हवे-नको पहात. इ.स. १९४२ पासून १९८३ पर्यंत सौ. सीतावहिनी श्रीदादांचेकडे लक्ष पुरवीत होत्या. श्रीदादांच्या मातापित्यांच्या निर्वाणानंतर सौ. सीतावहिनींनी प्रपंचात श्रीदादांना भक्कम आधार दिला. सौ. सीतावहिनींच्या निर्याणानंतर नाही म्हटले तरी श्रीदादांच्या प्रापंचिक जीवनात एक पोकळी निर्माण झाली. ती पोकळी भरून काढण्याचा आपापल्या परीने प्रयत्न श्रीदादांचे पुत्र व सुना करीत. चंद्रशेखर यांची नोकरी सांगलीतच असल्याने, ते व त्यांच्या पत्नी सौ. रोहिणी हे दोघे श्रीदादांची काळजी घेत. श्रीदादांचे कनिष्ठ चिरंजीव अनिलप्रभु यांनाही सांगलीमध्येच नोकरी होती. तेही श्रीदादांचेकडे लक्ष पुरवीत. सूर्यकांत व अनल हे श्रीदादांचे दोन चिरंजीव नोकरीसाठी परगावी असत. तेही वेळोवेळी सांगलीस येऊन श्रीदादांचेकडे लक्ष देत.

श्रीदादांचे मेहुणे सिद्धराज, रामभाऊ, हरिभाऊ, व मेहुणी सौ. अंबुताई यांना श्रीदादांचे विषयी आदर वाटे. सौ. अंबुताई व त्यांची मुले यांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला होता. श्रीदादांच्या व्याह्यापैकी श्री. घारपुरे, श्री. कुंटे, व श्री. पटवर्धन हे सर्वच सांगलीस रहात. त्यांनाही श्रीदादांचे बाबत आदरभाव होता. ते तिघेही श्रीदादांच्या कीर्तनास येऊ लागले. श्री. पटवर्धन हे तर कीर्तनासाठीची बैठक घालणे इत्यादि कामेही आवडीने करीत. श्रीदादांचा अनुग्रह घेतल्यावर श्रीदादांचे चिरंजीव आणि सौ. सीतावहिनी हे श्रीदादांचे पायांवर मस्तक ठेवीत. ते कीर्तनासही उपस्थित रहात. या संदर्भात ''आवड असेल तर सवड होते'' असे श्रीदादांचे मत होते.

श्रीदादांच्या घरी प्रारंभी राममंदिराचे वर माड्या होत्या. त्यांच्या शेजारी पत्र्याचे छत असणारी एक खोली होती. तेथे सुरवातीला श्रीदादा आपल्या भक्तांसह बसत. बिऱ्हाडकरूंनी माड्या सोडल्यावर, श्रीदादा त्यांतील एकाद्या



माडीत बसू लागले. फावल्या वेळात ते स्वयंपाकगृहात आईशी बोलत बसत. पुष्कळदा ते सोप्यावरील अंधाऱ्या खोलीत बसत. पुढे श्रीदादांची मुले मिळवती झाल्यावर, त्यांनी घराचे नूतनीकरण केले. तेव्हा श्रीदादा आतल्या बाजूस पलंगावर बसू लागले. पुढे घराचे आणखी नूतनीकरण झाले; आणि श्रीदादांचेसाठी पडवीच्या पश्चिमेला एक स्वतंत्र खोली तयार करण्यात आली. श्रीदादा शेवटपर्यंत याच खोलीत होते.

श्रीदादांचे चिरंजीव मिळवते झाल्यावर श्रीदादांच्या घरी हळुहळु सोफा, फर्निचर, फ्रीज, टी. व्ही, इत्यादि आधुनिक वस्तु आल्या. श्रीदादांना गार पाणी आवडे. त्यामुळे ते फ्रीजमधील थंडगार पाणी पिऊ लागले. घरातील लोक टी. व्ही. पहात पण श्रीदादांनी टी. व्ही. कडे ढुंकूनही पाहिले नाही.

श्रीदादांना उन्हाळ्यात उकाड्याचा फार त्रास होई. घरी वीज नव्हती तेव्हा श्रीदादा वाळ्याचा अगर ताडपत्राचा पंखा वारा घेण्यास वापरीत. पुढे त्यांचे घरी वीज घेण्यात आली. प्रथम काही ठिकाणी नंतर सगळीकडे विजेचे पंखे बसविण्यात आले. पुढे पुढे श्रीदादांना या विजेच्या पंख्यांची इतकी सवय लागली की ते कडक हिवाळ्यातही पंख्याचा वारा घेत. सांगलीत वीजेचा लपंडाव हा नेहमीचा खेळ आहे. वीज नसताना सुधाकर रेगोडकर, दत्तात्रय कर्णेकर इत्यादि काही भक्त त्यांना हातपंखा/पेपर/पुठ्ठा यांचा उपयोग करून वारा घालीत.

आपल्या जवळच्या मंडळींची प्रगति व्हावी असे श्रीदादांना वाटे. त्यांनी केशव आपटे, सोपान साळी, श्रीकांत देशपांडे, सौ. निशा बापट, इत्यादींना प्रवचन करण्याची प्रेरणा दिली, तर श्री. चंद्रशेखर, दिलीप कुलकर्णी वगैरेंना कीर्तन करण्याची प्रेरणा दिली.

श्रीदादांचा जरी संसारात रस नव्हता, तरी व्यावहारिक उपचार पाळण्यात श्रीदादा कधी कमी पडले नाहीत. कुणीही केव्हाही घरी येवो, ''या'' शब्दाने श्रीदादा त्याचे स्वागत करीत. त्याची योग्य संभावना करीत. त्याचे काम होऊन तो परत निघाला की त्याचे हातावर प्रसाद म्हणून साखर/चिरमुरे/लाह्या/केळे ठेवीत, आणि ''पुन: केव्हा येणार?'' असा प्रश्न तरी करीत अथवा ''या पुन: सवडीने'' असे आमंत्रण देऊन ठेवीत. या संदर्भात सुरेश जोशी, डी. सी. ई., यांची आठवण लक्षणीय आहे. ते म्हणतात, ''मी दादांचे चरणी

मस्तक ठेऊन नमस्कार केला. ''रोज येत जा बरं'' एवढेच त्यांचे शब्द. पण आपुलकी, आंतरिक ओढ, समोरची व्यक्ति आकर्षिली जावी अशी प्रचंड शक्ति, आवाजात मार्दवता पण अधिकारवाणी अशी अनंत वैशिष्ट्ये त्या एका वाक्यात ठासून भरली होती.''

अगत्यपूर्वक कुणी लग्न, मुंज, इत्यादि समारंभासाठी बोलावले तर श्रीदादा अगत्याने जात आणि यथाप्रसंग व यथाशक्ति आहेर वगैरे करीत. श्री. शरद आपटे यांच्या मुंजीला श्रीदादा गेले होते. कु. मीना गोविंद वाटवे, अरुण महादेव माने, कु. गीतादेवी शिंगाडे, इत्यादींच्या लग्नांत ते उपस्थित होते. कुणी मंगलाष्टके करून मागितली तर श्रीदादा करून देत. आजारी माणसास भेटावयास जाणे व शोकप्रसंगी सांत्वनास जाणे ही कामेही श्रीदादा करीत. महादेव रघुनाथ कुलकर्णी हे आजारी असताना श्रीदादा त्यांना भेटण्यास गेले. श्री. भ. रा. नाईक यांचे वडिल वारल्यावर श्रीदादा त्यांच्या सांत्वनास गेले होते. सौ. उषा महादेव माने, कोल्हापूर, यांच्या आईवडिलांच्या निधनानंतर श्रीदादांनी त्यांना सांत्वनपर पत्र पाठविले होते. शक्य असेत तेव्हा श्रीदादा इतरांना मदतही करीत. कु. शांता आपटे, यशवंत आपटे यांचा विवाह ठरविण्याचे बाबतीत त्यांनी पुढाकार घेतला होता. एकाद्या शैक्षणिक, धार्मिक, इत्यादि प्रकारच्या संस्थांसाठी देणगी मागण्यास कुणी आला तर श्रीदादा यथाशक्ति देणग्याही देत असत.

संसारातील संकटे, अडचणी, दुःखे इत्यादि निवारण करण्याचे उपाय विचारण्यास श्रीदादांचेकडे अनेक लोक येत. काहींना अंगारा, इतरांना स्तोत्रपठण, इत्यादि उपाय ते सांगत. तथापि त्यांना अनेकदा वाटत राही की लोकांनी आपणांस परमार्थातील गोष्टींबद्दल अधिक विचारावे.

श्रीदादांची वृत्ति ही लोकसंग्रहाची होती. त्यांचेकडे समाजाच्या सर्व स्तरातील माणसे येत असत. शाळकरी मुले, तरुण, प्रौढ, वृद्ध, वेडेखुळे, पांगळे, अशिक्षित, सुशिक्षित असे नाना प्रकारचे लोक त्यांचे दर्शनास येत. प्राचार्य क. श्री. काळे यांनी नोंदल्याप्रमाणे, ''आठ दहा वर्षांच्या शाळकरी मुलापासून ८०-८५ पर्यंतचे, सर्व जाति-धर्म-पंथाचे, अनपढ कामगारापासून विद्वान प्राध्यापक, प्राचार्य, डॉक्टर, इंजिनियरपर्यंतचे, आणि निराधार निर्धन अपंगापासून उद्योगपती, राजकीय पुढारी, मंत्र्यापर्यंतचे अनेक स्त्री-पुरुष भाविक त्यांचेकडे नित्य सकाळ, दुपार, संध्याकाळ येत. त्या सर्वांशी दादा सारख्या



आपुलकीने बोलत. त्यांचे प्रश्न, अडचणी, सुखदुःखे आस्थेने सहानुभूतीने ऐकून घेत आणि त्यांच्या अधिकार-श्रद्धाप्रमाणे उपासना, उपचार, आचार सांगत.'' उदा. सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणारे आनंद परांजपे, भागवत मास्तर, संभाजीराव भिडे, दिगंबर जाधव, डी. के. पाटील, संजय पाटील, प्रकाश बापू पाटील, सौ. शैलजा पाटील; दीपशिखा आपटे व श्री. माने यांसारखे वकिल; डॉ. परांजपे, डॉ. कार्लेकर, डॉ. लिमये यांसारखी वैद्यकीय व्यवसायातील मंडळी; पोलिस खात्यात काम करणारे सावंत फौजदार, शिंगाडे फौजदार; श्री. वि. जोशी, श्री. वि. सहस्रबुद्धे, म. वि. गाडगीळ, हलदुले, र. रा. जाधव इत्यादि बँक व विमा क्षेत्रात काम करणारे सेवक; श्री. महाजन, पट्टणशेट्टी, इत्यादि व्यापारी लोक; लोखंडे बंधु हे मुद्रण व्यवसायातील लोक; सूरदास, इत्यादिसारखे वारकरी; प्राचार्य डॉ. गो. रा. कुलकर्णी, प्राचार्य क. श्री. काळे, प्रा. ना. बा. पाटणकर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, प्रा. डॉ. के. वा. आपटे, प्रा. डॉ. सौ. अनुराधा कुलकर्णी, खामकरबाई, सौ. श्यामला पटवर्धन, श्री. केशवराव जोशी यासारखी शिक्षण क्षेत्रातील मंडळी. याखेरीज मध्यमवर्गीय स्त्री आणि पुरुष यांचाही राबता श्रीदादांच्या घरी असे. ''श्रीदादांच्याकडे स्त्रिया येतात तसेच पुरुषही येतात. पण कधी कोणी आपल्याकडे वाईट नजरेने बघितल्याचे आठवत नाही, की गैरवर्तन करणारे कोणी नाही'' असे सौ. मंजिरी जगदीश देवधर, बी. ए. (ऑनर्स) सांगतात. श्रीमती सोनुबाई माने, सौ. परचुरे, इत्यादि स्त्रिया येत. श्रीमती अंबुताई वाटवे यांना श्रीदादांच्या घरची मंडळी ''मावशी'' म्हणत. त्या सकाळ संध्याकाळ नियमाने येत व आरती तयार करणे इत्यादि सेवेची कामेही करीत. हे सर्व पाहून मधुकर शिपुरकर म्हणतात, ''ती. दादांचा गोतावळा फार मोठा आहे. यात सर्व प्रकारची माणसे आहेत. ही सारी माणसे ती. दादांच्यावरच्या अलोट प्रेमाच्या अदृश्य रेशमी धाग्याने एकत्र बांधली गेली आहेत. यांतच श्रीदादांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.'' श्रीदादांचेकडे येणाऱ्या माणसांच्या संदर्भात, ''कोणी केव्हाही या घराशी । दादा तत्पर स्वागतासी । नाही मिठी कपाळाशी । उलटे आनंदती'', असे प्रकाश भावे सांगतात. म्हणूनच प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी म्हणतात, ''दादा म्हणजे मूर्तिमंत प्रेम, कमालीचे सौजन्य, शुद्ध माणुसकी. त्यांचे हृदय माऊलीचे आहे.'' कोणाचेही मन मोडणार/

दुखावणार नाही याची काळजी श्रीदादा घेत. म्हणूनच असे दिसून आले की ऑगस्ट-सप्टेंबर १९७९ मध्ये मूळव्याधीचे रोगाने जर्जर असल्याने, खुर्चीवर बसणेसुद्धा अवघड असताना, श्रीदादा दर्शनेच्छूसाठी खुर्चीवर बसून रहात. श्रीदादांचा स्वभाव असा असल्याने, आपल्याकडे येणाऱ्याचे म्हणणे श्रीदादा शांतपणे ऐकून घेत. सल्ला विचारल्यास आणि तो देता येण्यासारखा असल्यास देत. तरी श्रीदादांच्या बोलण्यात आग्रह नसे, मग दुराग्रह कोठून येणार? ''पटत असेल तर घ्या, माझा आग्रह नाही,'' असे ते नेहमी म्हणत.

श्रीदादांचेकडे अनेक सांप्रदायांचे, अनेक जाति-पंथांचे साधक येत. ''दादांचेकडे येणारा साधक हा कोणत्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा वा सांप्रदायाचा असो, तो एक वेळ श्रीदादांचे दर्शन झाले की तो आपोआपच पुन्हा रामनिकेतनमध्ये येई,'' असे नामदेव यशवंत पाटील बी. ए. (ऑनर्स) यांचे निरीक्षण आहे.

आपल्याकडे येणाऱ्या व्यक्तीविषयी श्रीदादांना आपुलकी वाटे. श्री. बापट व भरत यांना ते बापटलाल, भरतलाल असे म्हणत. शशिकांत मायदेवच्या मायदेव या नावावरुन ते त्याला 'माय गॉड' असे म्हणत. श्री. म. अ. कुलकर्णी हे एम्. ए. झाल्यावर त्यांना बरेच नोकरीचे कॉल आले. कोणती नोकरी स्वीकारावी असे त्यांनी श्रीदादांना विचारले, ''तुमची नोकरी सांगलीचे जवळपास असावी. म्हणजे गाठभेट सुलभ होईल,'' असे श्रीदादांनी उत्तर दिले. त्याप्रमाणे श्री. म. अ. कुलकर्णी यांनी कोल्हापूरच्या कॉलेजात नोकरी पत्करली, हे श्रीदादांना आवडले.

श्रीदादांची आपल्या भक्तांशी वागण्याची एक विशिष्ट खुबी होती. त्यामुळे त्या प्रत्येकाला असे वाटे की आपल्याबद्दलच श्रीदादांना अधिक आपुलकी आहे. याचा परिणाम असा होई की श्री. शरद आपटे यांनी म्हटल्याप्रमाणे काहींना अहंगंड होत असे.

श्रीदादांनी इ.स. १९६२ पासून आपले नित्य कीर्तन सुरू केले. त्यावेळी त्यांनी आपल्या वयाची चाळिशी ओलांडलेली होती. त्यानंतर काही काळाने श्रीदादांना डोळे तपासून घ्यावे लागले. डॉक्टरांनी त्यांना चष्मा वापरण्यास सांगितले. काही दिवस श्रीदादांनी चष्मा वापरला. चष्मा घातलेले श्रीदादांचे काही फोटोही आहेत. तथापि चष्मा वापरण्याचा श्रीदादांना फारच कंटाळा.



त्यामुळे पुढे काही दिवसांनी त्यांनी चष्मा वापरणेच बंद केले.

श्रीदादांचे पितृदेव मामा हे काँग्रेसचे स्वयंसेवक होते. श्रीमामांच्या मुळेच श्रीदादांना म. गांधीबद्दल तसेच लालबहादूर शास्त्री यांचेबद्दल आदर वाटे. या आदरापोटीच त्यांनी या दोघांच्याहि आरत्या केलेल्या आहेत.

घरामध्ये सुना येऊन घरची बरीचशी जबाबदारी कमी झाल्यावर सौ. सीतावहिनी श्रीदादांना म्हणाल्या, ''आम्ही बायका आता स्त्रियांचे भजनी मंडळ सुरू करू का?'' त्यांना श्रीदादांनी संमति दिली. मग सौ. सीतावहिनींचे 'श्रीराम भजनी मंडळ' सुरू झाले. हे भजनी मंडळ पुढे भजनाच्या स्पर्धेतही भाग घेऊ लागले. आणि जेव्हा या भजनी मंडळाला स्पर्धेत पारितोषिक मिळे तेव्हा श्रीदादा त्यांचे कौतुक करीत.

आपल्या भक्तांचे बाबतीत काही चांगले घडले की श्रीदादा त्यांचे जाहीर कौतुक करीत. श्री. वासुदेवराव जोशी हे कीर्तने व वारकरी पद्धतीची निरूपणेही करीत. त्यांच्याबद्दल श्रीदादा एके ठिकाणी लिहितात, ''माधवनगरचे ह. भ. प. श्री. वासुदेवराव जोशी यांनीही चिमड सांप्रदायाचा लौकिक खूपच वाढविला आहे. हल्ली हे वारकरी पद्धतीने निरूपणे करून श्रोतृवंदांना तन्मय करून देहभान विसरवतात.'' प्रा. दा. वि. कुलकर्णी यांना जेव्हा पीएच्. डी. पदवी मिळाली तेव्हा श्रीदादानी आपल्या कीर्तनाचे समयी त्यांचा सत्कार समारंभ केला. प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांच्या पत्नी प्रा. सौ. अनुराधा यांनाही जेव्हा पीएच्. डी. पदवी मिळाली तेव्हा त्यांचे कौतुक करून श्रीदादांनी कीर्तनात पेढे वाटले. श्री. माधव बर्वे हे जेव्हा सी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले तेव्हा त्यांचे कौतुक करून श्रीदादांनी कीर्तनात पेढे वाटले. प्रकाश भावे यांच्या लहान कन्येने-देवयानीने-जेव्हा श्रीदादांना भीमरूपी स्तोत्र अस्खलितपणे म्हणून दाखविले तेव्हा तिचे कौतुक करून श्रीदादांनी तिला एक रुपया बक्षिस दिला. श्रीरंग विष्णु जोशी यांच्या ''आईची कविता'' या काव्यसंग्रहाला ल. मो. प्रभुणे पुरस्कार मिळाला. त्यांनी ही गोष्ट श्रीदादांना सांगितली ''तेव्हा माझ्याहून जास्त आनंद त्यांना झाल्याचे मी अनुभवले आहे'', अशी नोंद श्रीरंग जोशींनी केली आहे. राममंदिरात दत्तात्रय बाळकृष्ण केळकर यांनी एक अभंग म्हटला. तो ऐकून श्रीदादा म्हणाले, ''तुम्ही आज पंढरीस नेऊन आणलेत''. शुक्रवार दि. १३-३-९८ रोजी गोविंद चिंतामण ताम्हनकर

यांनी राममंदिरात दासबोध वाचन केले. तेव्हा ''तुमचे वाचनाने माझे समोर साक्षात् श्री देव विठ्ठल उभे राहिले एवढे तुमचे वाचन चांगले झाले.'' असे उद्‌गार श्रीदादांनी काढले. श्री. सुरेश महादेव जोशी यांची कन्या दहावीच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत आली. तेव्हा आनंद झाल्याचे पत्र श्रीदादांनी लिहिले. श्री. कृ. रा. शिंगाडे हे इ.स. १९९४ साली जेव्हा सब् इन्स्पेक्टरची परीक्षा क्रमांक चारने उत्तीर्ण झाले तेव्हा श्रीदादांना आनंद झाला. श्री. मुरलीधर माने हे जेव्हा एल्. एल्. बी. ची परीक्षा पास झाले. तेव्हा सांगलीच्या सेना मंदिरात त्यांचा सत्कार श्रीदादांचे हातून होणार होता. श्रीदादांना सेनामंदिरात नेण्यास श्री. माने आले तेव्हा श्रीदादा त्यांना म्हणाले, ''मी प्रथम तुमचा सत्कार करणार आहे''. त्या प्रमाणे माने यांचे कौतुक करून श्रीदादांनी त्यांचा सत्कार केला व मग ते सेनामंदिरात गेले.

सूरदास या नावाचे श्रीदादांचे एक अंध भक्त होते. त्यांना पोटदुखीचा विकार होता. त्याला कंटाळून, पंढरपूरला जाऊन चंद्रभागेत देह अर्पण करण्याचा निर्णय सूरदासांनी घेतला व श्रीदादांचा निरोप घेण्यास ते श्रीदादांचेकडे आले. सूरदास आल्या आल्या श्रीदादांनी चंद्रशेखरअण्णांना सांगितले की सूरदासांना घेऊन श्री. दातार वैद्याकडे जाऊन दाखवून आण. दातार वैद्यांनी सूरदासांना औषध दिले व सूरदास पोटदुखीतून मुक्त झाले. ही गोष्ट श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे यांनी 'प्रेमलहरी' या नितयकालिकात सांगितली आहे.

श्रीदादांच्या पायास अस्थिभंग झाल्यावर श्रीदादा जेव्हा कुबड्या आणि वॉकर घेऊन चालण्याचा व्यायाम करीत त्यावेळी अनेक भक्त त्यांच्या मदतीस तत्पर असत. पुढे श्रीदादांच्या खांद्याचे हाड मोडले. त्यांचा डावा हात सुधारू शकला नाही. येथपासून म्हणजे साधारण इ.स. १९९५ पासून श्रीदादा बहुतेक काळ आपल्या खोलीत पलंगावर पडूनच व्यतीत करीत. या काळात त्यांनी आपले बोलणेही अत्यंत कमी केले होते. अशा स्थितीत त्यांना आपल्या जवळपास एकादा माणूस लागे. त्यांच्याजवळ बसण्याचे हे कार्य सुधाकर रेगोडकर, संदीप रेगोडकर, दत्तात्रय कर्णेकर, श्री. अरविंद पीतांबरे, सतेज केळकर, नारायण के. आपटे, सुनील सूर्यकांत केळकर, चंद्रशेखरअण्णा, अनिलप्रभु केळकर, सूर्यकांत केळकर, बजरंग हडदरे, नंदकुमार कुलकर्णी, शेखर पट्टणशेट्टी, श्री. डी. के. पाटील इत्यादि मंडळी करीत. श्रीदादांची



आवश्यक सेवासुद्‌धा हीच मंडळी करीत.

श्रीदादांच्या परावलंबी स्थितीत त्यांच्याजवळ जास्तीत जास्त बसता यावे आणि त्यांची सेवा करता यावी या उद्देशाने चंद्रशेखरअण्णांनी दिनांक १-७-१९९८ पासून नोकरीतून स्वेच्छा निवृत्ति घेतली. ही गोष्ट खरोखरच भक्तिदर्शक, गौरवास्पद आणि कौतुकास्पद आहे. नोकरीतून सुटका झाल्यामुळे चंद्रशेखर रात्रंदिवस श्रीदादांच्या सेवेला उपलब्ध झाले. श्रीदादांना वेळच्या वेळी औषध देणे, श्रीदादांच्या प्रकृतीत काही कमी जास्त झाल्यास तत्काळ डॉक्टरांना आणवणे, श्रीदादांच्या भोजनाच्या वेळा संभाळणे, त्यांना आधार देऊन कीर्तनासाठी राममंदिरात नेणे इत्यादि गोष्टी चंद्रशेखर व्यवस्थितपणे पार पाडीत. श्रीदादांना चालताना आधार देण्याचे वेळी सुधाकर रेगोडकर, सदुभाऊ साळुंखे, श्री. पवार, श्री. संजय पाटील इत्यादि लोक पुढे असत. कधी कधी शारीरीक व्याधींना कंटाळून श्रीदादा मोठ्यांदा काहीतरी बोलत. परंतु चंद्रशेखर अण्णा आपली शांति न सोडता सौम्य शब्दांत त्यांची समजूत घालीत.

असा आहे श्रीदादांच्या प्रापंचिक जीवनाचा आढावा. प्रपंचात श्रीदादा इतरांना कसे दिसत याचे प्रतिनिधि म्हणून प्रा. म. अ. कुलकर्णी यांनी जे शब्द वापरलेले आहेत ते लक्षणीय आहेत. ते म्हणतात, ''संसार-प्रपंचाची चिंता करताना आम्ही त्यांना कधी पाहिलेच नाही. प. पू. रामदादांना सतत मी अखंड प्रसन्नचित्त, आत्मतृप्त, चैतन्याचा पुतळा अशा स्थितीतच पहात आलो आहे. 'मज सोडवी दातारा । कर्मापासूनी दुस्तरा' असे देवाजवळ साकडे घालताना ते कधी दिसले नाहीत.'' प्रपंचातील श्रीदादांचे वर्णन करणाऱ्या प्रा. डॉ. के. वा. आपटे यांच्या दासरामगौरवगीतमधील पुढील ओव्या चिंतनीय आहेत :- ''दासराम दिसती प्रपंचात । सामान्यजनापरी दिसत । परी परमार्थी त्यांचे चित्त ।। जाणत्याला कळत असे ।। देह प्रपंची वर्तत । चैतन्यामाजी वसे चित्त। ऐसे असती सिद्‌धसंत । खूण पटे ही दासरामी ।।''

### प्रकरण १८ : संदर्भ

१) गोविंदचरितमानस
२) फूल चैतन्याचे
३) दासराम गौरव ग्रंथ, पृ. २३, २४, ३३, ३५, ४०, ४७, ४८

४) अखंड कीर्तनानंद
५) केशवलिखित दासराम चरित्र टिप्पणे
६) गुरुलिंगगीता, प्रस्तावना
७) दीपलक्ष्मी विशेषांक, पृ. ५७
८) अदृष्टाची सावली, श्रीरंगविष्णु जोशी, सांगली, आवृत्ति पहिली, १९९४
९) श्रीदासराम गौरवगीत, प्र. चं. रा. केळकर, सांगली, आवृत्ति पहिली, १९९९
१०) कर्नाटकमहाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय, दासरामकृत पुरस्कार, ले. पां. वि. कुलकर्णी, सांगली.
११) श्रीदासरामगाथा
१२) फाइल क्र .२-अ, ३, ४, ५
१३) आरती संग्रह, प्र. कृ. रा. शिंगाडे, सांगली, २००२.

## प्रकरण १९

# परमार्थातील श्रीदादा

श्रीदादा हे संसारात राहूनच सिद्ध संत झालेले होते. त्यांचा देह प्रपंचात वावरत असे, परंतु त्यांचे विकाररहित झालेले चित्त मात्र नेहमी चैतन्याच्या अनुसंधानात असे. सामान्य माणसांना संसारात वासना, विकार हे त्रास देत असतात. पण श्रीदादांच्या बाबतीत असे काही घडले नाही. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, आणि मत्सर हे सहा विकार निसर्गतःच प्रत्येक मनुष्यात असतात. ते परमार्थाला घातक असल्याने त्यांना षड् रिपु असे म्हणण्यात येते. संतांचे ठिकाणी या विकारांचे स्वरूप बदलेले असते ते इतके की हे विकार नगण्य झालेले असतात. त्यांचा प्रभाव संतांवर पडू शकत नाही. संत झालेल्या श्रीदादांना हे विकार त्रास देऊ शकत नव्हते. त्यांच्या जीवनात हे सहाही विकार नसल्यासारखेच होते.

श्रीदादा प्रपंचात राहूनच परमार्थ करीत होते. त्यांचा विवाह झालेला होता. साहजिकच संसारात आवश्यक तेवढ्या ‘‘कामा’’ चा वापर त्यांचे हातून झाला. या पलीकडे त्यांचेवर कामाचा काहीच प्रभाव नव्हता. संत आणि कीर्तनकार म्हणून श्रीदादांची ख्याति झाली असल्याने, त्यांच्याकडे अनेक लहान, तरुण, प्रौढ तसेच वृद्ध स्त्रियाही येत आणि त्यांचे पायावर मस्तक ठेवीत आणि गरज पडल्यास त्यांच्याशी संभाषणही करीत. तथापि कोणत्याही परस्त्रीविषयी श्रीदादांच्या मनात कसलीच अभिलाषा कधीच उत्पन्न झाली नाही.

श्रीदादा म्हणत की ‘‘संताच्या कोशात क्रोध हा शब्द आहे.’’ श्रीदादा कधी कधी रागावत परंतु त्यांचा राग मनापासून नसे, तो वरवरचा असे, तो अळवाच्या पानावरील पाण्याप्रमाणे क्षणभर टिकणारा असे. आवश्यक वाटल्यासच ते रागाचा अविर्भाव करीत. पण रागाने त्यांनी थयथयाट केला किंवा घरात वा बाहेर आदळआपट केली असे कधी घडले नाही. अशाप्रकारे त्यांच्याजवळ नावालाच क्रोध असल्याने, त्यांनी कुणाला कधी दोष दिला, कुणाचा द्वेष केला किंवा कुणाला शत्रु मानले अथवा कुणाचे वाईट केले असे एकही उदाहरण दाखविता येत नाही.

श्रीदादांची सांपत्तिक स्थिति ही प्रथम बेतास बात होती. तरी त्यांनी

कुणाकडे तोंड वेंगाडून पैसा किंवा अन्य काही वस्तु यांची कधीही याचना केली नाही. ''व्यवहारात मला अमुकच हवे'' असा त्यांचा आग्रहच नसल्याने, कुणाजवळ काहीतरी मागण्याची पाळी त्यांच्यावर आली नाही. तर ''यदृच्छा-लाभ-संतुष्टः'' अथवा ''संतुष्टो येन केनचित्'' अशी त्यांची स्थिति होती. अमुक पाहिजे अशी त्यांची इच्छाच नसल्याने, लोभ या भयंकर दुर्गुणाला त्यांचे जवळ स्थानच नव्हते. त्यांना कशाचीही हाव नव्हती.

श्रीदादांचे काम, क्रोध आणि लोभ हे त्यांच्या काबूत असल्याने, त्यांचे ठिकाणी ''मोह'' आला नाही. व्यवहारात त्यांना कशाचाही मोह झाला नाही. आणि त्यांना आत्मज्ञान झाले असल्याने, ज्याला परमार्थात ''मोह'' म्हणतात, तोही त्यांचेजवळ नव्हता.

मद/अहंकार/मस्ती हा विकारही श्रीदादांचे ठायी नव्हता. व्यवहारात शिक्षण अपुरे, सांपत्तिक स्थिति बेताची आणि कोणतीही सत्ता हाती नाही, मग मद कशाचा येणार? ते संत होते; पण आपल्या संतपणाचा टेंभाही त्यांनी कधी मिरवला नाही. ''मी संत आहे. माझे सर्वांनी ऐकले पाहिजे,'' असा दुराग्रहसुद्धा त्यांचे जवळ नव्हता. याउलट विनय/नम्रता हा गुण त्यांचे ठिकाणी प्रकर्षाने वसत होता. इतर संत त्यांचेकडे आले तर त्यांना नमस्कार करून, ते ''साधु गृहाप्रती आले । भले सार्थक झाले'' हे पद ते म्हणत व त्या साधूचा योग्य तो आदर सत्कार करीत. कीर्तनात ते पुष्कळ काही सांगत पण शेवटी म्हणत ''मी जे सांगतो ते पटत असेल तर घ्या, माझा मुळीच आग्रह नाही.'' प्रसंगविशेषी ते इतर संतांकडेही जात व त्यांना नमस्कार करून परत येत. आपल्या संप्रदायातील निंबरगीकरमहाराज, चिमडमहाराज, कोटणीसमहाराज यांच्या विषयी त्यांचे ठिकाणी पूज्य बुद्धि होती तशीच त्यांचे वंशज गुरुसिद्दप्पामहाराज, सदाशिवमहाराज, पंडितरावमहाराज, गुरुनाथ कोटणीसमहाराज यांचे बद्दलही होती. इतर कुणी श्रीदादांना नमस्कार केला की श्रीदादा प्रतिनमस्कार केल्याशिवाय रहात नसत. ''नम्र झाला भूता । तेणे कोंडिले अनंता'' हे वचन त्यांना लागू पडत होते. त्यांनी कुणाबद्दलही तुच्छता दाखविली नाही.

श्रीदादांच्यामध्ये मत्सर या विकाराचा लवलेशही नव्हता. व्यावहारिक जीवनात आपल्यापेक्षा अधिक श्रीमंत माणूस असो किंवा आपल्यापेक्षा अधिक शिकलेला माणूस असो, त्या माणसाचा त्यांना कधीच मत्सर वाटला नाही.



उलट ते उच्च शिक्षित मनुष्याचे कौतुक करीत. इतर संतांबद्दलही श्रीदादांना कधी मत्सर वाटला नाही. मत्सराअंती भूतकालीन अगर वर्तमानकालीन साधुसंतांबद्दल त्यांचे तोंडून कधीही अनुचित, अनुदार उद्‌गार बाहेर पडले नाहीत. या संदर्भात प्रा. म. अ. कुलकर्णी यांनी दासरामगौरवग्रंथात (पृ. ३५-३६) केलेले विधान लक्षात घेण्यासारखे आहे; ते म्हणतात, ''परमार्थातील महत्त्वाचे पथ्य-'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' हे श्रीदादा कटाक्षाने पाळीत आले आहेत. सर्वेश्वराच्या पूजेचे हे खरेखुरे वर्म त्यांनी दक्षतेने पाळलेले आहे. म्हणूनच ''निर्मळ स्फटिक जसा'' अशी त्यांची वृत्ति झालेली आहे. निर्मत्सर सदयतेचे ते मूर्तिमंत उदाहरणच आहेत.''

निंबरगीकरमहाराजांच्या आज्ञेनुसार श्रीदादा उपदेशानुग्रह देत. तथापि ते सामुदायिक अनुग्रह देत नसत अथवा उपदेशाची खैरातही त्यांनी केली नाही. योग्य माणूस दिसला तर ते आपणहूनही अनुग्रह देत. परंतु प्रायः अनुग्रह मागणाऱ्याची तळमळ ते पहात-मग तो वयाने लहान असो वा मोठा असो. अनुग्रहाची उत्कट इच्छा पहाण्यास ते कधी त्या माणसाला काही दिवसांनी ये असे सांगत. साहजिकच आपले नातेवाईक, पत्नी व पुत्र यांनाही श्रीदादांनी आपणहून अनुग्रह दिला नव्हता. तर त्यांनी जेव्हा उपदेशाची इच्छा व्यक्त केली तेव्हाच त्यांनी त्यांना उपदेशानुग्रह केला.

दर्शनासाठी येणाऱ्या लोकांसाठी श्रीदादांच्याकडे मुक्त द्वार असे. दर्शनासाठी अमुक वेळ असे बंधन नव्हते. गावातील किंवा परगावची मंडळी कधी कधी वेळी अवेळी श्रीदादांच्या घरी येत. श्रीदादा त्यांचे यथोचित स्वागत करीत व त्यांचेशी मोकळेपणाने बोलत. ''दर्शनेच्छु कधीही येऊन त्रास देतात'' असे म्हणून त्यांनी आपली नाराजी दाखविली नाही किंवा कुरकुरही केली नाही.

परमार्थातील शंका विचारण्यास काही जण श्रीदादांचेकडे येत. त्यांच्या शंकांचे निरसन श्रीदादा करीत. उदा. श्री. फडके या नावाचे एक गृहस्थ मुंबईहून येऊन आपल्या शंकांचे निरसन करून घेऊन परत गेले.

श्रीदादांच्याकडे काही लोक व्यावहारिक अडचणी, संकटे, रोग, इत्यादि दूर करण्याचे उपाय विचारण्यास येत. त्यांचा त्यांनी कधी तिटकारा केला नाही. त्यांच्याबद्दल सहानुभूति व्यक्त करून श्रीदादा त्यांना ग्रंथवाचन,

जप, स्तोत्रपठण इत्यादि काहीतरी करण्यास सांगत, अथवा अंगारा-प्रसाद देत. त्यामुळे त्या लोकांना गुण येत असे. अशी काही उदाहरणे मागे आली आहेत व पुढील प्रकरणातही येणार आहेत.

श्रीदादा आपल्या वयाच्या पाचव्या वर्षापासून कीर्तन करू लागले. त्यांची कीर्तने/निरूपणे/प्रवचने चांगली होतात अशी त्यांची प्रसिद्धि झाली. तेव्हा त्यांना कीर्तन करण्यास येण्याची आमंत्रणे येऊ लागली. ''देवाची सेवा करण्याची संधि'' या दृष्टीने श्रीदादा ही आमंत्रणे स्वीकारीत. परंतु ''प्रथम अमुक रक्कम द्या'' असे त्यांनी कधी म्हटले नाही, इतकेच नव्हे तर कीर्तन-प्रवचन संपल्यावर कुणी पैशाच्या रूपाने बिदागी देऊ लागला, तर ती त्यांनी कधीही स्वीकारली नाही. नोकरीच्या काळात सांगली संस्थानच्या सरकारी वाड्यात गणपतीपुढील कीर्तन संपल्यावर देऊ केलेली बिदागी त्यांनी स्वीकारली नाही.

श्रीदादांना वयाच्या सातव्या वर्षीच पारमार्थिक लेखनाची स्फूर्ति झाली. 'आत्माविष्कार' या दृष्टीने त्यांचे हातून अभंग, पदे, आरत्या, ओवीबद्ध प्रकरणे, श्लोकबद्ध लघुग्रंथ, गद्य निबंध इत्यादि पारमार्थिक लिखाण झाले. नदीचा प्रवाह निसर्गत:च समुद्राकडे वहात जात असतो, पण दोन्ही काठावरील लोकांना त्या नदीच्या पाण्याचा उपयोग होतो; तद्वत् साधक मुमुक्षूंना त्यांच्या लिखाणाचा उपयोग होई. परंतु ''माझे अमुक पुस्तक वाचा'' असे त्यांनी कधी कुणाला सांगितलेले ऐकिवात नाही. तसेच ''आपले ग्रंथ प्रसिद्ध करा'' असेही ते कुणाला म्हणाले नाहीत. ज्या कुणी त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रकट केली त्यांना त्यांनी तशी परवानगी दिली.

सर्वा ठायी असणाऱ्या आत्म्याशी श्रीदादा एकरूप झालेले असल्याने, त्यांना दुसऱ्याच्या मनात काय चालले आहे हे सहज कळत असे. पण या अंतर्ज्ञानाचा उपयोग श्रीदादा सर्रास करीत नसत. ''आपल्या मनातील विचार न सांगता श्रीदादा ओळखत'' याची प्रचीती सौ. सुशीला हरी गाडगीळ, सांगली व श्री. विष्णु हरी माईणकर वकिल यांना आली होती. दीपशिखा बळंवत आपटे, वकिल या एकदा मनात शंका धरून श्रीदादांचेकडे आल्या. श्रीदादांनी त्यांच्या शंकांचे निवारण केले. कु. भाविका लक्ष्मीकांत शंकरवाला या एस्. एस्. सी. परीक्षेपूर्वी श्रीदादांना नमस्कार करण्यास आल्या. त्यांचे मनातील



ओळखून श्रीदादा म्हणाले, ''तुला परीक्षेत ५४% टक्के मार्क पडतील.'' त्याप्रमाणेच झाले. या संदर्भात गोविंद यशवंत देशपांडे, कोल्हापूर, यांचा अनुभव त्यांच्याच शब्दांत असा :- ''माझे मित्र बी. एच्. कुलकर्णी यांच्यामुळे मी १९७३ मध्ये दादांचा अनुग्रह घेतला. दादा मला 'जी वाय्' म्हणत. मी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकरीला होतो. १९७३ ते १९७९ या काळात बँकेच्या चुकीमुळे मला निलंबित केले होते. ही गोष्ट दादांना समजल्यावर ते म्हणाले, ''जी. वाय्. तू निर्दोष आहेस, काळजी करू नकोस.'' दि. ४-६-७७ रोजी बँकेने मला माझे शेवटचे म्हणणे लेखी स्वरूपात देण्यास सांगितले. त्याच दिवशी बी. एच्. कुलकर्णी यांचेकडे दादांचे प्रवचन होते. प्रवचनास धनंजय भावे उपस्थित होते. प्रवचन संपल्यावर दादा म्हणाले, ''चला, आपण जी. वाय्. कडे जाऊ.'' तेव्हा धनंजय भावे म्हणाले, ''जी. वाय्. बँकेत गेले आहेत. त्यांना आज लेखी निवेदन बँकेस द्यावयाचे आहे.'' त्यावर दादा म्हणाले ''जी. वाय्. चे काम केव्हाच झाले आहे. आत्ता तो घरी आहे.'' सर्वजण माझ्या घरी आले तेव्हा मी घरीच होतो.''

''श्रीदादा पुण्यातील सहस्रबुद्धे मंदिरात बहुतेक १९९३ साली आले होते. उपस्थित भक्त जेव्हा श्रीदादांना नमस्कार करीत त्यावेळी श्रीदासराममहाराज त्या भक्ताच्या इष्ट देवतेचा नामोच्चार करीत. मी त्यांना नमस्कार केल्यावर श्रीदादा म्हणाले 'श्रीमहालक्ष्म्यै नम:' माझे कुलदैवत श्रीमहालक्ष्मी बांदिवडे, गोवा, असेच आहे'', असे निशिकांत महादेव बांदिवडेकर, बी. ए. एल्.एल्.बी. हे वकिल सांगतात.

श्रीदादा हे गुणग्राहक होते. दुसऱ्याचे अंगी त्यांना एकादा चांगला गुण दिसला तर श्रीदादा त्याचे कौतुक करीत. इतरांच्या गुणांचा गौरव करणे-तोही चार लोकांच्या पुढे-हे तर त्यांच्या अंगवळणीच पडले होते. हे लक्षात आल्याने, प्रा.डॉ.गं.वि. कुलकर्णी सांगतात, ''श्रीदादा दुसऱ्यांचे गुण पर्वताएवढे मोठे करून पहातात. माणसाला त्याच्यातल्या दिव्यत्वाची जाणीव करून देतात, स्फूर्ति देतात.'' भजनपटु मोरोपंत कुलकर्णी, वासुदेवराव जोशी, बापूराव जोशी, श्री. व्ही. के. कुलकर्णी, कृ. रा. शिंगाडे, प्रकाश भावे, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी, सौ. अनुराधा कुलकर्णी, बाबूराव गोखले, श्री.वि. सहस्रबुद्धे, श्रीकांत देशपांडे, के.ग. जोशी इत्यादींना श्रीदादांच्या या गुणाचा अनुभव

आला होता. श्रीदादांचे कीर्तनात विश्रांतीचे वेळी मिलिंद कुलकर्णी या नावाचा एक लहान मुलगा पद उत्तम प्रकारे म्हणी. श्रीदादा त्याचे कौतुक करीत.

चिमड संप्रदाय हा गुरुसंप्रदाय आहे. तेथे सद्गुरु हे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. प्रथमपासूनच श्रीदादा सद्गुरूचे महत्त्व ओळखून होते. श्रीदादांच्या ठिकाणी गुरुभक्ति अगदी खोलवर मुरली होती आणि ती वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होताना दिसत असे.

श्रीमामामहाराज हे श्रीदादांचे पिताजी. पिता हा पुत्राचा गुरु असतोच. या खेरीज आपले वडिल मामा हे प्रत्यक्ष ''गोविंदच'' आहेत अशी श्रीदादांची मनोभूमिका होती. ते मामांचा फार आदर करीत व त्यांच्या आज्ञेत रहात. श्रीमामांची स्तुति आणि गौरव करणारे श्रीदादांचे ९६ अभंग आहेत. श्रीमामांची प्रशंसा करणारे त्यांचे अनेक श्लोक आहेत. मामांचेवरून श्रीदादांनी केलेल्या आरत्यांची संख्या सोळा आहे. मामांना तात्यासाहेबमहाराजांनी साक्षात् प्रगट होऊन कीर्तन करण्याची आज्ञा दिली, या घटनेत अभिप्रेत असणारा मामांचा मोठेपणा इतरांना कळावा म्हणून श्रीदादांनी गुरुतृतीयेचा उत्सव सुरू केला व त्यावेळी प्रगटकाळच्या कीर्तनात ते मामांचा मोठेपणा स्पष्ट शब्दांत मांडीत. मामांनी रचलेला ''रामपाठ'' लोकांच्या पुढे यावा म्हणून त्यांनी तो प्रसिद्ध केला. तसेच मामांच्या अभंगांची गाथा प्रसिद्ध केली. अवतारी देवांच्या जयंत्याप्रमाणे, श्रीदादांनी मामांचा जयंती उत्सव सुरू केला. श्रीमामांच्या नित्य कीर्तनाचे रौप्य महोत्सव आणि त्रितपमहोत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले. श्रीमामांचे चरित्र प्रसिद्ध केले. मामांचा निर्वाण दिन माघ शुद्ध नवमी व श्रीदादांच्या मातोश्रींचा निर्वाण दिन माघ शुद्ध चतुर्थी. माघ शुद्ध चतुर्थी ते माघ शुद्ध नवमी असा मामांच्या पुण्यतिथीचा सोहोळा श्रीदादा साजरा करू लागले. मामांच्या पुण्यतिथीच्या दिवशी दुपारी श्रीदादा महाप्रसाद करीत. त्यांत २-३ हजार माणसे जेऊन उठीत. मामांसाठी केल्या गेलेल्या जपलेखनाचा समर्पण सोहळा होई. मामांच्या जन्मशताब्दीच्या वर्षी श्रीदादांनी दिंडी सोहोळा साजरा केला.

तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी श्रीदादांचेवर कृपानुग्रह केला होता. त्याचे दृढीकरण तात्यासाहेबमहाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी केले होते. बाबूरावजींचे विषयीही श्रीदादांना आदर वाटे. श्रीदादांच्या अनेक अभंगांत हणमंत (=तात्यासाहेब कोटणीसमहाराज), रघुनाथ (= श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराज) आणि गोविंद (=श्रीमामामहाराज केळकर) यांचे आदरपूर्वक नामनिर्देश आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या कृपेने पारमार्थिक लेखन होत आहे, असे उल्लेख अभंगांत आहेत.



तात्यासाहेब कोटणीसमहाराज हे श्रीदादांचे साक्षात् गुरु. त्यांच्या स्तुतिपर पोवाडा श्रीदादांनी आपल्या लहानपणीच रचला होता. आणि या पोवाड्याच्या गायनाचे काही कार्यक्रमही केले होते. श्रीदादांनी तात्यासाहेब-महाराजांचे जन्माख्यान रचले. इतकेच नव्हे तर त्यांचे संपूर्ण चरित्रही लिहिले. श्रीतात्यासाहेबमहाराज बरीच वर्षे हरभट रोडवरील गुलाबसिंग भगवानसिंग सोबनसी यांचे वाड्यात राहिले होते. ती वास्तु तात्यासाहेबांच्या वास्तव्याने पवित्र झालेली आहे हे लक्षात घेऊन, त्या वाड्याचे दर्शन घेण्यास श्रीदादा जात. बाबूरावजी कोटणीसमहाराजांनी बांधलेल्या कैवल्यधामात तसेच गंगाधरसिंगानी बांधलेल्या हनुमान समाधी मंदिरात श्रीदादा तात्यासाहेबांच्या दर्शनास जात असत.

श्री. दिलीप डिग्रजकर यांनी गुरुवार दि. ३०-११-१९८६ रोजी आपल्या ''दखल'' नावाच्या साप्ताहिकाचा 'तात्यासाहेब कोटणीसमहाराज विशेषांक' काढला. त्यामध्ये श्रीदादांनी तात्यासाहेबमहाराजांचे वर एक लेख लिहिला. या लेखात श्रीदादा लिहितात : ''श्रीतात्यासाहेब हे एक चालते बोलते ब्रह्म होते. ते महान् अवतारी पुरुष असून, त्यांनी आपले जीवन सांगलीत व्यतीत केले, आणि त्यांचेमुळे सांगली हे क्षेत्र झाले. केवळ हरिकीर्तनासाठी या महात्म्याचा अवतार झाला. साधना आणि कीर्तन, कीर्तन आणि साधना या दोन्ही गोष्टी अविभाज्य आहेत, एकाशिवाय एक घडू शकत नाही, हे त्यांनी आपल्या कृतीने जगाला सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट करून दाखविले.''

श्रीतात्यासाहेबमहाराजांचे गुरु श्रीरामचंद्रावजी यरगट्टीकरमहाराज ऊर्फ चिमडमहाराज, त्यांचे गुरु श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज, व त्यांचे सद्गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज, या सर्वांचे बद्दल श्रीदादांना अत्यंत आदर होता. चिमडमहाराजांचे बद्दल एका तथाकथित शहाण्या माणसाने काही अनुचित लिहिले. ते श्रीदादांना मुळीच आवडले नाही. तेव्हा त्या आक्षेपांचे निरसन करणारे असे चिमडमहाराजांचे चरित्र श्रीदादांनी प्रा. डॉ. के. वा. आपटे यांचेकडून लिहवून

घेतले. चिमडमहाराजांच्या अधिकारसंपन्न पत्नी श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांची आरती श्रीदादांनी रचली. चिमडमहाराजांचे अधिकारी चिरंजीव श्रीनारायणमहाराज आणि श्रीउद्धवरावजीमहाराज यांची चरित्रेही श्रीदादांनी लिहिली.

चिमडमहाराजांचे सद्‌गुरु श्रीरघुनाथप्रियसाधुमहाराज यांची इ.स. १९७९ साली निर्वाण शताब्दी होती. त्या निमित्ताने श्रीदादांनी ''रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा'' हे साधुमहाराजांचे चरित्र प्रा. के. वा. आपटे यांचेकडून लिहवून घेतले.

साधुमहाराजांचे सद्‌गुरु श्रीनिंबरगीकरमहाराज. श्रीदादा त्यांना ''सगुण ब्रह्ममूर्ति'' म्हणत. श्रीदादांच्या बहुतेक कीर्तन-प्रवचनांत श्रीनिंबरगीकर-महाराजांचा अत्यंत आदरपूर्वक उल्लेख येत असे. निंबरगीकरमहाराजांचे चरित्रही श्रीदादांनी प्रा. के. वा. आपटे यांचेकडून लिहवून घेतले. निंबरगीकरमहाराजांची निर्वाण शताब्दी साजरी केली. त्यानिमित्ताने प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांचेकडून 'संतसहस्रनाम' लिहवून घेतले.

श्रीनिंबरगीकरमहाराजांचे चिरंजीव श्रीभीमाण्णामहाराज व नातू श्रीनागाप्पाण्णामहाराज हे दोघेही थोर अधिकारी सत्पुरुष होते. त्यांची चरित्रे लिहून श्रीदादांनी त्यांचे विषयीचा आपला आदर व्यक्त केला. निंबरगीकर-महाराजांचे पणतू श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांचे विषयी श्रीदादांना पूज्यभाव होता. ज्या दिवशी श्रीगुरुसिद्दप्पामहाराजांचे अपूर्ण पद पूर्ण झाले व ते त्यांनी श्रीदादांच्या वहीत लिहून दिले तो दिवस गुरुलिंगगीताजयंतीचा दिवस म्हणून श्रीदादा साजरा करू लागले. गुरुसिद्दप्पामहाराजांचे चिरंजीव श्रीसदाशिवमहाराज हे सांगलीत असतात. त्यांचे विषयीही श्रीदादांना आदरभाव होता. श्रीदादांच्या निर्वाणानंतरच्या दहाव्या दिवशी सदाशिवमहाराजांनी पिंडाला फुले वाहिल्यावर पिंडाला काकस्पर्श झाला हे स्मरणीय आहे. यावरून केवळ विद्यमान असताना नव्हे तर निर्वाणानंतरही श्रीदादांनी आपली गुरुभक्ति प्रकट केली.

श्रीदादांची गुरुभक्ति ही अत्यंत प्रखर असून ती वेळोवेळी त्यांच्या बोलण्यात आणि लेखनात व्यक्त होत असे. हे पाहूनच स्वामी प्रज्ञानंद (म्हणजे प्रा. म. अ. कुलकर्णी) यांनी तुतारीच्या विशेषांकात (पृ. १९) पुढीलप्रमाणे गौरवाचे उद्‌गार काढले आहेत :- ''भगवंत वा सद्‌गुरु चरणी श्रद्धा/निष्ठा कशी असावी, साधुसंतांनी केलेल्या आज्ञेचे पालन कसे करावे, अहंभाव पूर्ण



नष्ट करून भगवत्प्रेमात कसे समरसून जावे, याचे उत्तम उदाहरण प. पू. दासराममहाराजांनी आपल्या आचारविचारांनी घालून दिलेले आहे.''

सर्व संत देवरूप झालेले असतात. त्यामुळे काही भाग्यवान भक्तांना संत श्रीदादा हे देवाच्या रूपात दिसले, ''प. पू. दासराममहाराज प्रत्यक्ष भगवंत आहेत'' असे सौ. माधुरी श्रीकांत कुलकर्णी सांगतात. गोविंदपंत घोसरवाडकरांचे अधिकारी नातू श्रीदत्तोपंत घोसरवाडकर एकदा प्रा. के. वा. आपटे यांना म्हणाले, ''केशवराव, श्रीदादा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आहेत. त्यांना पाहिले की देव पाहिल्याचे समाधान वाटते.'' त्यामुळे ''दादांचा सहवास म्हणजे प्रत्यक्ष देवाचा सहवास'' असे प्रकाश भावे सांगतात. श्रीदादा वसगडे येथे जात. तेथे ते करंजीच्या झाडाला टेकून बसत. त्यावेळी ते राधाबाई नरहरी थोरात यांना दत्तरूप दिसत. नाथपंथी गंगादास अवलिया हे श्रीदादांचे दर्शनानंतर म्हणाले ''मला तुम्ही डाकुरनाथाच्या रूपात दिसलात.'' सुहास राजाराम क्षीरसागर सांगतात, ''श्रीगजाननमहाराजांच्या पोथीचे मी पारायण करीत असताना, मी कीर्तन ऐकण्यास दादांचेकडे आलो. मला दादा गजाननस्वरूपात दिसू लागले.'' भाऊसाहेब जोशी लिहितात (दीपलक्ष्मी विशेषांक, पृ. ५६) ''१९६५ पासून मी दादांचेकडे जाऊ लागलो. तत्पूर्वी दर महिन्यास मी नरसोबावाडीच्या दत्ताला जात असे. ते मी बंद केले. कारण दादा हेच दत्त आहेत असा माझा निश्चय झाला.'' सांगली अर्बन बँकेतर्फे श्री. बापूसाहेब पुजारी यांनी ज्ञानेश्वरी-पारायण आयोजित केले होते. त्यावेळी मृदंगाचार्य शंकरबापू आपेगावकर हे बापूसाहेबांचे बरोबर श्रीदादांचे दर्शनास आले. श्रीदादांना पहाताक्षणीच आपेगावकर पुजारींना म्हणाले, ''बापूसाहेब आज मला प. पू. दादांना पाहताच पंढरीच्या पांडुरंगाचे दर्शन झाले आहे.'' ही घटना ब. रा. हडदरे यांनी सांगितली आहे.

सर्व संत हे एकरूप असतात. त्यामुळे काही भाविकांना श्रीदादा हे इतर संतांच्या रूपात दिसले असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. ''सद्‌गुरु दासराममहाराज हे साक्षात् ज्ञानेश्वराचे अवतार,'' असे नामदेव यशवंत पाटील बी. ए. (ऑनर्स) हे म्हणतात. ''संध्याकाळी मी श्रीदादांच्या कीर्तनास गेले होते. दादांनी मला ब्रह्मचैतन्यांच्या रूपात दर्शन दिले,'' असा अनुभव सौ. स्नेहा अशोक कुलकर्णी, बी. कॉम्. सांगतात. श्री. व. के. कुलकर्णी यांनी

अनेकदा श्रीदादांना गुळवणीमहाराजांच्या रूपात पाहिले आहे. ''एकदा पाटील महाराज व एकदा दादा स्वत: या रूपात दादांनी दर्शन दिले'' असे चंद्रशेखर श्रीकांत शेडजी, डी. आय्. आय्. हे सांगतात. ''दादा हे गुरुलिंगजंगममहाराज आहेत,'' असे गि. न. कुंभार म्हणतात. सतीश लोखंडे आपल्या मातोश्रींचा अनुभव असा सांगतात, ''इ.स. १९८२-८३ मध्ये माझ्या मातोश्री प्रथमच दादांच्या कीर्तनास गेल्या. खुर्चीवर बसून कीर्तन करणारे दादा त्यांना अगदी तुकाराममहाराजांचे सारखे दिसले.'' ''दादांचे रूपाने मला रामकृष्णांचे दर्शन झाले'' असे श्रीकांत देशपांडे म्हणतात. तर श्री. एकनाथ ह. काते, उपसंपादक ॐ चैतन्य मासिक, मुंबई, हे दि. ७-१२-१९९५ रोजी श्रीदादांचे दर्शनास आले. त्यांना प्रकाशमान साईप्रमाणे श्रीदादांचे दर्शन झाले. दत्तात्रय यशवंत कर्णेकर यांनी 'श्रीदादा हे प्रत्यक्ष स्वामीसमर्थ रूपात' अनुभवले. श्री. ब. रा. हडदरे यांनाही श्रीदादा अक्कलकोट स्वामींच्या रूपात दिसले. गुरुपौर्णिमेला श्रीदादांची पाद्यपूजा दिलीप नारायण कुलकर्णी, बी. ए. (ऑनर्स) यांनी केली. त्यावेळी त्यांना श्रीदादांचे ठिकाणी श्रीस्वामीसमर्थांचे दर्शन झाले. ''दादा व स्वामी समर्थ हे मला एकरूप दिसले'' असे सौ. कालिंदी सुरेश कौलगेकर चिंचवड, या सांगतात. ''सांगलीत व त्या परिसरात किंवा दक्षिण महाराष्ट्रात म्हणा, दादा हे गजाननमहाराजांचे स्वरूपातच आध्यात्मिक मार्गदर्शन करीत आहेत.'' असे राजाभाऊ कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. तर एस्. एस्. वैद्य, संपादक शांतिकुटिरसंदेश हे म्हणतात, ''श्रीसद्गुरु दादामहाराज यांना आम्ही श्रीसद्गुरु कन्नूर महाराजांचे स्थानी मानतो.''

श्रीदादांच्यामुळे काही भक्तांना नाद व प्रकाश यांचे अनुभव आले. कपिल बजरंग हडदरे यांनी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. त्यावेळी श्रीदादांनी त्यांना डोळे मिटण्यास सांगितले. डोळे मिटून त्यांनी श्रीदादांचेकडे मान केली. त्यांना सगळीकडे लख्ख प्रकाश बराच वेळ दिसला. सोपान गणपत साळी, पुणे, हे आपला अनुभव पुढीलप्रमाणे सांगतात, ''मी दादांचा अनुगृहीत आहे. मी मुंबईत असताना दादामहाराज स्वप्नात आले. ते मला म्हणाले, ''तुमची साधना नीट होत नाही ना ?'' माझ्या समोर बसा आणि माझ्या कपाळाकडे बघा.'' दादा डोळे मिटून ध्यानाला बसले. मी त्यांच्या कपाळाकडे पहात राहिलो. कपाळावर विष्णूची चतुर्भुज मूर्ति दिसू लागली. मूर्तीच्या मागे चक्र फिरत



होते, त्या चक्रावर नजर जाताच माझे डोळे मिटले गेले. डोके बधिर झाले. काय होत आहे हेच कळेना. दादांनी दिलेल्या नामाचा आवाज कानात घुमला. पुढे जाग आली. जाग आल्यावर साधनेस बसलो. एका मिनिटात मन एकाग्र झाले. तेव्हापासून माझी साधना व्यवस्थित होत आहे.''

श्रीदादांचे संतपण हे अनेक जाणत्या पुरुषांनी ओळखले आणि ते व्यक्तही केले. जगद्गुरु शंकराचार्य भारती तीर्थ, शृंगेरीमठ, हे सांगलीला आले होते. ते म्हणाले श्रीदादा म्हणजे ''बडा भक्त है.'' ''दादा एक महान् संत आहेत,'' असे श्रीकांत देशपांडे म्हणतात. ''दादा हे एक उच्च कोटीचे महान् संत आहेत,'' असे के. ग. जोशी सांगतात. ''दादा म्हणजे खऱ्या अर्थाने एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आहे'' असे खासदार प्रकाशबापू पाटील यांचे मत आहे. 'दादा संत आहेत' असे डॉ. ग. वि. तगारे म्हणतात, तर ''चिमड संप्रदायातील विद्यमान श्रेष्ठ पुरुष म्हणून श्रीदादांना फार मोठे आदराचे स्थान लाभले आहे,'' असे मत श्री. वि. सहस्रबुद्धे व्यक्त करतात. ''सांगली येथील प.पू. मामामहाराज व प.पू. समर्थ सद्गुरु श्रीदासराम तथा रामराय केळकरमहाराज हे चिमड पंथाचे अधिकारी संत आहेत,'' असे विधान प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी करतात. ''दादांचा शास्त्रांचा व्यासंग दांडगा आहे. 'शास्त्रे परे च निष्णात:' म्हणजे शास्त्रांत आणि स्वानुभवात ते निष्णात आहेत. त्यामुळे ते संप्रदायातले एक अधिकारी पुरुष आहेत'', असा प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी शेरा मारतात. सौ. श्यामला पटवर्धन लिहितात ''दासराममहाराजांचा अधिकार फार मोठा आहे. श्रीज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायावरील टीका, श्रीज्ञानदेवतेहत्तिशी या श्रीज्ञानेश्वरांच्या अप्रसिद्ध परंतु अध्यात्मदृष्टीने अतिशय अवघड अशा ओव्यांवरील टीका, नासदीय सूक्तावरील टीका, तसेच श्रीमामामहाराज जन्मशताब्दीनिमित्त प्रसिद्ध झालेली श्रीदासरामगाथा हे त्यांचे ग्रंथ परमार्थ क्षेत्रातील त्यांचा अधिकार सिद्ध करतात.'' ''श्रीदासराममहाराज हे एक सत्प्रवृत्त व योगी पुरुष आहेत,'' असे श्री. मुकुंद माधव गोरे, बी. एस्सी, पुणे, यांना जाणवले. ''परमपूज्य दासराम-महाराज केळकर हे जन्मसिद्ध थोर सत्पुरुष अवतारी संत आहेत,'' असे विधान विनायक श्रीधर जोशी करतात. इचलकरंजीचे डॉ. दत्तात्रय महादेव चौगुले, एम्. बी. बी. एस्., हे पुण्यास सहस्रबुद्धेमहाराजांच्या मंदिरात गेले होते. तेथील श्रीअशोककाकामहाराज

जोशी त्यांना म्हणाले, ''सांगली येथे थोर सिद्ध पुरुष श्रीदासराममहाराज यांचे वास्तव्य आहे.'' श्रीदादांचे संदर्भात लिहिताना स्वामी प्रज्ञानंद (प्रा. म. अ. कुलकर्णी) लिहितात ''दादांचे ठिकाणी हरिप्रेम सरोवरी क्रीडा करणारा संत स्वत:च सुखसागर कसा होऊ शकतो व वैकुंठीचे सुख त्याच्या पायातळी कसे येऊन लोळत असते, त्याचे प्रत्यंतर जाणकारांना येते. ज्ञानी असून नम्र, अधिकार असून निगर्वी, सर्वार्थाने अंतर्बाह्य शुद्ध, सात्त्विक, असा थोर अधिकारी संत म्हणून दादा ख्यातकीर्त आहेत. लहानथोर, संतमहंत, सिद्धसाधु अशा सर्वांना प्रिय तसेच आदरणीय वाटणारे ते सत्पुरुष आहेत.'' श्रीदादांच्या घरी दि. ३-२-१९८५ रोजी झालेल्या प्रवचनात स्वामी अमलानंद म्हणाले, ''दादा स्थितप्रज्ञ आहेत.'' निंबरगीकरमहाराजांचे वंशज काडसिद्धमहाराज सांगतात की श्रीदादा हे सामान्य मानव नाहीत. ते अवतारी पुरुष आहेत.

श्रीगुरुलिंगगीतेत निंबरगीकरमहाराज श्रीदादांचेबद्दल काय म्हणतात तेही येथे पहाण्यासारखे आहे. श्रीदादांना उद्देशून निंबरगीकरमहाराज म्हणतात, ''हरि स्वरूपात एकरूप होऊन, त्या तत्त्वाशी तू समरस झाल्याने, तुझ्या जन्माचे सार्थक झाले आहे. हे प्रल्हादा, स्वयंभू शिवस्वरूप हा तुझा गाभाच आहे. गुरुलिंगजंगमाचे ठिकाणी तू परिपूर्णच होतो आहेस. ब्रह्मांडाचे ठिकाणी असणारा अनाहत ऐकून, त्याचा ग्रास करून, हे प्रल्हादा, तुझे ठिकाणी शिवाच्या कृपेने घनानंद निर्माण झाला आहे. मी-तू-पणा सरल्याने दासराम मुक्त स्थितीत गेला.''

श्रीदादा असे थोर, अधिकारी, साक्षात्कारी संत होते म्हणून इतर संतही काही लोकांना श्रीदादांचेकडे जाण्यास सांगत. पुण्याचे श्रीदिंगबर-दासमहाराज यांनी देह ठेवण्यापूर्वी आपल्या काही मोजक्या मंडळींना-श्रीअशोककाका जोशी, श्री. बाणावली, इत्यादींना-सांगितले होते ''माझ्या पश्चात् तुम्ही सांगलीचे थोर संत सिद्ध पुरुष श्रीदादामहाराज केळकर यांना भेटा.'' त्याप्रमाणे ही मंडळी सांगलीला जाऊन श्रीदादामहाराजांना भेटली. श्री. दिलीपकुमार पराप्पा आरळी, बी. कॉम्. जयसिंगपूर, हे गणपतरावमहाराज कन्नूर यांचे शिष्य. त्यांना श्रीकन्नूरमहाराजांनी श्रीदादामहाराजांचेकडे जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे ते सांगलीला श्रीदादांचेकडे येऊ लागले. दीपक राजाराम



मोरे हे सोलापूरचे. ते एकदा कोल्हापूरच्या संत काटकरमहाराज यांच्या दर्शनास गेले. काटकरमहाराजांनी त्यांना सांगलीस जाऊन श्रीदादांचे दर्शन घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे मोरे यांनी केले. दादामहाराज केळकरांच्या दर्शनाने त्यांना प्रसन्न वाटले. श्री. ब. रा. हडदरे पुढील आठवण देतात :- वाचस्पति विष्णुजी क्षीरसागर हे श्रीदादांचेकडे आले होते. ते श्रीदादांना म्हणाले, ''मी आंध्र प्रदेशात संत अम्मा यांचेकडे गेलो होतो. त्यांनी मला विचारले, ''तुम्ही सांगलीला जाता का?'' मी म्हणालो, ''कधी कधी जातो.'' तेव्हा अम्मा मला म्हणाल्या,''आता ज्यावेळी जाल त्यावेळी सांगलीचे थोर संत प. पू. केळकरमहाराज यांची भेट घ्या व मी पाठविले असे त्यांना सांगा.''

श्रीदादांच्या संतपणाचे एक वैशिष्ट्य येथे स्पष्टपणे सांगावयास हवे. ते म्हणजे श्रीदादांचे संपूर्ण जीवन हे चमत्कारांनी भरलेले आहे, असे दिसून येते. श्रीदादांचे जन्मापूर्वी वजीरबाबांचे भविष्य कथन, चौदाव्या दिवशी कोटणीसमहाराजांचा अनुग्रह, पाचव्या वर्षी कीर्तनाचा प्रारंभ, सातव्या वर्षी आत्मयाची काव्यस्फूर्ति, नववे वर्षी श्रीरामदासबोधाचे लेखन, तुकाराममहाराज व अन्य संत यांनी केलेला बोध, श्रीनिंबरगीकरमहाराजांनी प्रगट होऊन दिलेली गुरुलिंगगीता, अप्पाची वाडी येथील घुमटीत सुटलेला सुगंध इत्यादि अनेक चमत्कारांनी त्यांचे संतपण खुलून दिसते.

संक्षेपाने सांगायचे झाल्यास :- श्रीदादा अध्यात्म जगत होते. परमेश्वराच्या/चैतन्याच्या विशिष्ट अनुसंधानात त्यांचे चित्त रमलेले असे. चालता बोलता ते समाधि अवस्थेतच असत. आपल्याला आलेले अनुभव त्यांच्या लिखाणात व्यक्त झालेले आहेत. सर्वांशीच गोड बोलून त्यांनी सर्वांची मने जिंकलेली होती. म्हणूनच प्रा. म. अ. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे ''महाराष्ट्रातील सर्व लहान थोर साधुसंतानी त्यांचा सतत गुणगौरव केला आहे.''

## प्रकरण १९ : पुरवणी

## श्रीदादांचे रामनिकेतन

''परेहूनि परते घर । तेथे राहू निरंतर'' या उक्तीप्रमाणे संतांचे आध्यात्मिक घर असते. पण व्यवहारात-संसारात-संत एकाद्या विशिष्ट घरात असतात. आणि संत जेथे राहतात. ती वास्तुसुद्धा पुनीत, पवित्र होते, तीर्थक्षेत्र बनते. म्हणून श्रीदादांचे ''रामनिकेतन हे सर्व तीर्थांचे तीर्थराज झाले आहे,'' असे प्रकाश भावे म्हणतात. ज्या वास्तूत श्रीदादा रहात होते तिचा प्रभाव काही भक्त-भाविकांना जाणवला. श्रीदादांच्या घरात मामांनी ३८ वर्षे आणि श्रीदादांनी ३९ वर्षे अखंड नित्य कीर्तन केले. साहजिकच ''दादांच्या घरी जाणाऱ्याला आपण एका निराळ्या विश्वात वावरत असल्याचा भास झाल्याशिवाय रहात नाही. हे विश्व बाह्य भौतिक विश्वापेक्षा निराळे आहे हे नंतर कळते. इथले वातावरण इतके भारलेले आहे की नवखा माणूस त्या वातावरणात मंत्रमुग्ध झाल्याशिवाय रहात नाही. एकदा मी दोन मित्रांबरोबर तेथे गेलो...आम्ही १५-२० मिनिटे बसलो मग परतलो. तेव्हा माझे भौतिकवादी नास्तिकवादी मित्र मला म्हणाले 'येथील वातावरण (atmosphere) फार charging आहे. मनाला एक प्रकारची शांति मिळाली. भयंकर उष्मा असताना एअर कंडिशन्ड रूममध्ये प्रवेश केल्यावर जसे शरीराला गार वाटते तसे मनाला वाटते','' असे मधुकरमहाराज शिपुरकर सांगतात. तर ''रामनिकेतनमध्ये शुद्ध वायुमंडळ आहे. रामनिकेतन म्हणजे एक चार्जिंग स्टेशन आहे. येथे आल्यानंतर काही केले नाही तरी बॅटरी चार्ज होते,'' असे श्रीपति बाबांचे मत आहे.''ही वास्तुच ब्रह्मविद्येच्या सुकाळामुळे भारलेली आहे,'' असे विधान प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी हे करतात. ''या घरातील दाही दिशा अभंग-संकीर्तनांनी कोंदल्या आहेत. अखंड प्रसन्नतेने येथील कणन् कण गजबजलेला आहे. सदा सर्वकाळ येथे केवळ भक्तिप्रेमाचा रस उचंबळत आहे'', असे आपले मत प्रा. म. अ. कुलकर्णी व्यक्त करतात. तर ''इथल्या खिडक्या, दारे, भिंती, तुळयासुद्धा चांगले कीर्तन करतील इतके इथले वातावरण नाममय झाले आहे'' असे स्वामी चिन्मयानंद म्हणाले अशी नोंद प्रकाश भावे यांनी केलेली आहे.



''या स्थानाचे पावित्र्य काही वेगळेच आहे. ज्या ठिकाणी आत्म-साक्षात्कार होतो अशी या सारखी ठिकाणे थोडी आहेत'', असे मत सु. ग. शेवडे प्रगट करतात. तर ''अध्यात्मजीवनाची एक वेगळी अनुभूति येथे येते'' असे म. शं. शिपुरकर उद्गारतात. ''येथे अध्यात्मातले मधाचे पोळे आहे'' असे ज्ञाननाथजी रानडे सांगतात. ''दादांचे घर म्हणजे एक आध्यात्मिक विद्यापीठच आहे'', असे मधुकर शिपुरकर कौतुकाने म्हणतात. ''रामनिकेतन म्हणजे चित्तशुद्धीचा कारखाना आहे'', असे श्रीनीलकंठभारती म्हणत. तर नीलकंठभारतींचे पट्टशिष्य श्रीबळवंत भारती सांगतात, ''दादांचे राममंदिर म्हणजे ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात सांगितलेला निगूढ मठ आहे.''

श्रीदादांच्या श्रीरामनिकेतनचे एक सुंदर वर्णन सौ. मंजिरी जगदीश देवधर, बी. ए. (ऑनर्स) यांनी पुढील प्रमाणे केले आहे :-

''येथील वातावरण अतिशय शुद्ध आणि शांत आहे. येथे आल्यावर फक्त शांति आणि समाधानाचा लाभ होतो. काही काळ जगाचा विसर पडतो. सद्गुरूंचे घर हे माहेर आहे. येथे विश्रांती मिळते. कीर्तनाची गोडी अवीट आहे. म्हणून श्रीरामनिकेतन म्हणजे सांगलीमधील भाविकांना नंदनवन आहे.''

श्रीदादांच्या रामनिकेतन या वास्तूवरून सांगलीचे कवि मा. श्रीरंग विष्णु जोशी यांनी ''श्रीरामनिकेतनाष्टक'' रचलेले आहे. ते असे :-

### ॐ श्रीरामनिकेतनाष्टक ॐ

गंगा सिंधु नको सरस्वति नको ती चंद्रभागा नको ।
काशीक्षेत्र नको हिमालय नको कन्याकुमारी नको ।
बैराग्यासम घोर दूर विपिनी ते हिंडणे ही नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ॥१॥
संतांच्या स्मरता स्मितास उजळे पंचारती केवळ ।
त्यांचे शब्द स्मरुन नेत्रि भरते आनंदणारे जळ ।
घ्यावी लोळण वाटताच गुरुचे तू पाय सोडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ॥२॥
रानी दूर कुणी गुरे वळवितो जेथे झरा वाहतो ।
स्कंधी घोंगडि वेत्रहस्त मधुनी देवापरी हासतो ।
देई साखर बालकांस बघुनी तो विस्मरू तू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ॥३॥

गीता सद्‌गुरुची प्रतिष्ठित करी यात्रा रथाची असे ।
गाभारा उजळे प्रकाश पसरे जो अंतरंगी वसे ।
होता तीन प्रदक्षिणा भय मनी तापत्रयाचे नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।४।।
तीर्थे सर्व पहा इथे प्रगटली ओवी अभंगांतुनी ।
श्वासांचे तुझिया निनाद उठती येथे मृदंगातूनी ।
मामांचा कर रामपाठ कधिही नामास सांडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।५।।
आले संत किती तया न गणती या व्यासपीठावरी ।
भक्तीच्या दुसऱ्या फुले उधळुनी केली उभी पंढरी ।
टाळांच्या गजरामध्ये हि मनिचा तू मंत्र सोडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।६।।
गेल्या उधळीत कुंकवास वहिनी वैकुंठ वाटेवरी ।
केले कीर्तन अष्टही जरि दिशा झाकोळल्या अंतरी ।
नेमाचे व्रत हे कठोर असते तू धीर सोडू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।७।।
दादांना बघता क्षणी विसरतो प्रापंचिकाचे जिणे ।
गंगेच्या वरती हळू पसरते कोजागिरि चांदणे ।
ते गंगाजळ अंतरात भरणे डोळे भरू तू नको ।
तू या रामनिकेतनास त्यजुनी कोठेहि जाऊ नको ।।८।।

卐卐卐卐卐

## प्रकरण १९ : संदर्भ

१) अखंड कीर्तनानंद, पृ. १५४.
२) गुरुमहिमा
३) निष्काम कर्मयोगी
४) श्रीगुरुलिंगगीता, ७.२, १७.११, १२.५, २३.४, ८.४
५) तूचि बाप धनी, पृ. ११८ (द्वितीयावृत्ति, मुंबई, १९९३)
६) साप्ताहिक तुतारी विशेषांक, पृ. २३, २१, २४, १९, १८
७) रामपाठ, प्र. रा. गो. केळकर, सांगली, आवृत्ति पहिली, १९३८, आणि आवृत्ति दुसरी, १९६३
८) दासरामगौरव ग्रंथ, पृ. ४०, ४७, ३४, ३७, ४७, ४९, ४८



९) लेजर क्रमांक ३, ४, १, ६, ५
१०) वही क्रमांक १३६, १२७
११) फाइल क्रमांक ३, १, २, ४, २-अ
१२) श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा, के. वा. आपटे, सांगली, १९७९
१३) साप्ताहिक दखल, तात्यासाहेब कोटणीसमहाराज विशेषांक, सांगली, १९८६
१४) फूल चैतन्याचे
१५) दीपलक्ष्मी मामामहाराज केळकर विशेषांक, मुंबई, पृ. ४६
१६) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, प्रस्तावना, प्र. सतीश लोखंडे, सांगली, १९८९
१७) सिद्धमूर्ति प्रतिष्ठा स्मरणिका
१८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर यांचे चरित्र, दासराम, सांगली, १९७२.

## प्रकरण २०

# भक्त-भाविकांना आलेले अनुभव

श्रीदादा हे नित्य कीर्तन करीत तसेच उपदेशानुग्रहसुद्धा देत असत. या दोन कारणांनी श्रीदादांच्याकडे पुष्कळ लोक येत. त्यातील अनेकांना दादांच्या सामर्थ्याचे अनुभव आले. त्यातील काहींनी आपले अनुभव लेखी स्वरूपात श्री. चंद्रशेखर केळकर यांना कळविले. हे सर्व लेख पाच फाईलमध्ये संगृहीत केले गेले. त्यांच्या आधारे, त्यांचे थोडेफार वर्गीकरण करून भक्त-भाविकांना आलेले अनुभव येथे दिलेले आहेत. तसे देताना त्या त्या व्यक्तींची नावे आणि गावेही दिलेली आहेत.

परमार्थाविषयी आस्था बाळगणारे लोक श्रीदादांचेकडे उपदेशानुग्रह घेण्यासाठी येत. त्यांना प्राय: स्वत:पुढे बसवून श्रीदादा अनुग्रह देत. तथापि श्रीदादांनी काहींना स्वप्नात अनुग्रह दिला अशी उदाहरणेही आहेत. उदा. श्री. आनंद बळवंतराव आपटे, डी. एम. ई., डी. ई. ई., सांगली, हे सांगतात, ''श्रीदादामहाराजांनी स्वप्नात येऊन अनुग्रह दिला व मंत्र दिला. मग प्रत्यक्षात विचारल्यावर ते म्हणाले तुम्हाला अनुग्रह दिला आहे आता प्रत्यक्षात द्यायची जरुरी नाही.''. ''इ.स. १९८३ साली त्रिपुरी पौर्णिमेला रात्री १२ वाजता प. पू. दादांनी स्वप्नात येऊन अनुग्रह दिला,'' असे सौ. सुजाता अरुण जोग, मिरज, यांचे सांगणे आहे. अंजना संभाजीराव गोरे, सांगली, यांचे बाबतीत असे घडले, ''दादांचा अनुग्रह घेण्यापूर्वी प. पू. दादा व चंद्रशेखर अण्णा स्वप्नात आले. त्यांनी दुर्वा व शमी हातात दिली. मला आनंद झाला. नंतर मी दादांचा अनुग्रह घेतला.''

श्रीदादांचा अनुग्रह प्रत्यक्षात जागेपणी झालेला असो अथवा स्वप्नात झालेला असो, अनुगृहीतांवर त्याचे काही विशिष्ट परिणाम घडून आले. 'मनाला शांति मिळाली' असा अनुभव सौ. स्मिता दिनेशसिंग परदेशी, एम्. कॉम्., डी. बी. एम्., वडगाव बुद्रुक (जि. पुणे) आणि जनाबाई महादेव कोळी, सांगली, यांना आला. तर प्रसाद खंडेराव कुलकर्णी, बी. ई., सांगली, यांचा मन:शांतीच्या दिशेने प्रवास सुरू आहे. 'मनाची वृत्ति समाधानी झाली', असे श्रीमती यमुनाबाई नरहर आळतेकर म्हणतात. ''घरात सुखशांतीचे वातावरण



आले'' असे सौ. चंपा गणपती पाटील व गणपती रामचंद्र पाटील, सांगली, हे सांगतात. ''एका गंभीर घटनेमुळे माझे मानसिक स्वाथ्य बिघडले होते, अशांती निर्माण झाली होती. श्रीदादांचेकडून अनुग्रह घेतल्यानंतर त्या सर्वांची तीव्रता एकदम कमी झाली,'' असा अनुभव विश्वनाथ शंकर कुलकर्णी, बीड, यांना आला. ''संसार व्यवस्थित चालू आहे'' असे सौ. सुनंदा लक्ष्मण कानडे, नौपाडा ठाणे, सांगतात. ''कोणी कितीही त्रास दिला तरी त्यांना काही वाईट बोलू नये असे वाटते'' (तुळसाबाई धोंडीराम पवार, सांगली). ''माझ्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत गेला'' (एस्. जी. माळी). ''लग्नापूर्वी मी अनुग्रह घेतला. लग्नानंतर मी पुण्यात आहे. आता मी दररोज दादांचे ध्यान करते'' (सौ. कविता श्रीकांत जाधव, बी. कॉम्. पुणे). ''छोटी संकटे दूर झाली'' (सौ. छाया पांडुरंग पालेकर, सांगली). ''वाईट विचार येत नाहीत. सदैव चांगले विचार येतात,'' (रुक्मिणी केवल यादव, सांगली). ''प्रपंचाची ओढ कमी होऊन परमार्थाकडे ओढा वाढला. आत्मपरिवर्तन घडले'' (सौ. संजीवनी नरोत्तम वैष्णव, सांगली). ''लौकिकातील फायदे झाले. जपाची थोडी थोडी गोडी लागली.'' (चंद्रकांत पु. अभ्यंकर, रिटायर्ड इंजीनियर व सौ. वैशाली चं. अभ्यंकर, बी. कॉम्., पुणे). ''हळुहळु भजन-कीर्तनात गोडी वाटू लागली'' (लीलाबाई रामचंद्र बोर्गीकर, सांगली). ''श्रीदासरामांचा अनुग्रह मिळाल्यापासून खूप समाधान आहे'' (सौ. पद्मावती बाबासाहेब महाजन, बुधगाव). ''श्रीदासराममहाराजांचा २३-११-७८ रोजी कृपानुग्रह झाला त्या दिवसापासून माझ्या जीवनाचे नवीन सुखदायक पर्व सुरूझाले,'' असे बाबासाहेब दादासाहेब महाजन, बुधगाव, हे सांगतात.

श्रीदादा आपल्या नित्याच्या कीर्तनात जे काही सांगत त्याचा श्रोत्यांच्या मनावर परिणाम होत असे. ''श्रीदादांच्या कीर्तनाच्या श्रवणामुळे मनास शांतता मिळाली'', असे सावित्रीबाई पांडुरंग पवार, सांगली, सांगतात. ''दादांचे कीर्तन ऐकल्यानंतर मनातील उद्वेग, चलबिचलता नाहीशी होई, शांति लाभे, मनातील शंकांचे निरसन होई, '' असा अनुभव सौ. सुनंदा काशीनाथ लिमये, सांगली, यांना आला. लक्ष्मण कृष्णाजी कुलकर्णी, सांगली, यांची अनुभूति अशी आहे :- ''रामकीर्तनी बैसता । दूर होती सर्व चिंता । रामकीर्तन ऐकता । देहभाव विसरती ।।''. ''दादांचे कीर्तनातून आम्ही चांगला बोध

घेतला. त्यांच्या कीर्तनाचा आमच्यावर चांगला परिणाम झाला'' (सौ. पुष्पा रंगराव दुधाळ, सांगली). तर सौ. लता बळवंत घारपुरे, निवृत्त शिक्षिका, कल्याण, यांचे ठिकाणी ''दादांचे कीर्तन ऐकल्यामुळे सतत रामनाम घेण्याची गोडी व आवड उत्पन्न झाली.''

संसारातील अडचणी, कटकटी, संकटे इत्यादि दूर कशी होतील, हे विचारण्यास काही लोक श्रीदादांचेकडे येत. त्यातील काहींना श्रीदादा विशिष्ट जप वा पठण करण्यास सांगत. त्यामुळे त्यांचा फायदा होई. श्री. व. म. बापट, सांगली, यांना झोपेत फार वाईट स्वप्ने पडत व ते भिऊन जात. असली स्वप्ने पडू नयेत म्हणून काय करावे, असे त्यांनी श्रीदादांना विचारले. श्रीदादा म्हणाले, ''बापटलाल तू निजताना जप करीत जा. म्हणजे तुला वाईट स्वप्ने पडणार नाहीत.'' श्री. बापट तसे करू लागले आणि मग त्यांना वाईट स्वप्ने पडण्याचे बंद झाले. गिरीश प्रतापसिंह रजपूत, सांगली, यांच्या नाकाचे हाड वाढले होते. श्रीदादांनी त्यांना रामरक्षा म्हणावयास सांगितले. तसे करताच त्यांचा त्रास कमी झाला. प्रकाश जयगोंडा पाटील, सांगली, हे तापाने आजारी होते. श्रीदादांनी त्यांना त्यांच्या कुलदैवताचा जप करण्यास सांगितले. तो जप केल्यावर ते बरे झाले. प्रकाश दत्तात्रय मुरुडकर यांना श्रीदादांनी विशिष्ट जप करण्यास सांगितले. त्यांनी तसे केले. त्यांच्या अडचणी दूर झाल्याची प्रचीति त्यांना आली. मिलिंद शांतारात चिवटे, सांगली, यांना कुलदैवताचे नामस्मरण करण्यास श्रीदादांनी सांगितले. तसे करताच त्यांचे संकट दूर झाले. सुरेश मनोहर शिराळे (बुधगाव) हे मिरजेला खाजगी संस्थेत नोकरीस होते. इ.स. १९९८ मध्ये सर्व कर्मचाऱ्यांनी पगार मागितला. त्यामुळे वातावरण तंग झाले. संस्थाचालकांनी सांगितले, ''या वर्षापासून आम्ही संस्था बंद करणार आहोत.'' सर्वांना काळजी लागली. श्री. शिराळे श्रीदादांचेकडे आले. त्यांनी श्रीदादांना सर्व काही सांगितले. तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''काळजी करू नका. कुलदैवतेचे नामस्मरण करीत रहा.'' तसे त्यांनी केले. आता त्यांचे व्यवस्थित चालू आहे. सौ. स्मिता संजय रजपूत, बी. कॉम्. (सांगली) यांचे पति संजय रजपूत हे एस. टी. डी. बूथ चालवीत. तेथे त्यांना गुंडांचा त्रास होई. याबाबतीत काय करावे असे सौ. स्मिता यांनी श्रीदादांना विचारले. श्रीदादांनी त्यांना व्यंकटेश स्तोत्र म्हणण्यास सांगितले. त्यांनी वाचणे सुरू केले आणि गुंडांचा त्रास कायमचा थांबला.



संसारातील अडचणी सांगून उपाय विचारणाऱ्या काही माणसांना श्रीदादा अंगारा, तीर्थ-प्रसाद देत. त्यामुळे त्यांना गुण येई. श्रीमती बेबीताई चव्हाण (सांगली) यांची तब्येत ठीक नव्हती. श्रीदादांनी त्यांना अंगारा दिला. तो त्या रोज भक्षण करीत. त्यामुळे त्या लौकर बऱ्या झाल्या. प्रभा रामराव कासतळीकर, बी. पी. एन्. ए. (औरंगाबाद) या सांगलीत असताना त्यांच्या नातीला ताप आला. त्यांनी श्रीदादांना सांगितले. श्रीदादांनी मारुतिस्तोत्र म्हणावयास सांगून अंगारा दिला. नातीला अंगारा लावताच ती बरी झाली. सौ. सुनीता शरद आपटे (निगडी-पुणे) या इ.स. १९८५ मध्ये व्याधिग्रस्त होत्या. त्यांचे पति शरद वामन आपटे हे सांगलीला आले असताना श्रीदादांनी अंगारा दिला. तो लावल्यावर त्यांचे दुखणे कमी झाले व त्याना बरे वाटले. नारायण दत्तात्रय काटकर (सांगली) हे दवाखान्यात होते हे श्रीदादांना माहीत नव्हते. ते कळताच कर्णेकर व रेगोडकर यांच्या करवी श्रीदादांनी त्यांना अंगारा पाठविला. काटकर मरता मरता वाचले. अरुण त्रिभुवन सारोळकर (सांगली) हे शहाबाद या गावी जाताना श्रीदादांचे दर्शनास गेले. त्यावेळी श्रीदादा भोजनास बसले होते. त्यांनी सारोळकरांना बसण्यास सांगितले. जेवण झाल्यावर श्रीदादांनी त्यांना अंगारा दिला. तो घेऊन ते निघाले. श्रीदादांचेकडे थांबावे लागल्याने त्यांची नेहमीची गाडी चुकली. ते दुसऱ्या गाडीने निघाले. वाटेत चोरांच्या टोळीने गाडी अडविली. चोरांनी प्रत्येकाच्या गळ्याला चाकूचे टोक लावून प्रवाशांकडील दागिने व रोख रक्कम यांची लूट केली. परंतु सारोळकर समोर असतानाही चोरांनी त्यांचेकडे पाहिलेही नाही. श्रीदादामहाराजांनी दिलेला अंगारा लावल्यावर एक प्रकारचे संरक्षण वाटते, असा रघुनाथ शरद आपटे, एम्. कॉम्. (निगडी-पुणे) यांचा अनुभव आहे. श्री कमलेश जोशी यांनी नोंदलेली दोन उदाहरणे अशी आहेत :- डॉ. प्रसाद भडभडे हे काविळीने फार सिरीयस झाले. श्रीदादांनी त्यांना तीर्थ व अंगारा पाठविला. त्यांची तब्येत सुधारली. तसेच कमलेश जोशी यांच्या आतेबहिणीचे यजमान डॉ. सुनिल आंदळगावकर यांच्या मोटारीला भीषण अपघात झाला; डॉ. आंदळगावकरांचा उजवा पाय मोडला. त्यांनी दोन महिने दवाखान्यात काढले. श्रीदादांच्या अंगाऱ्याने ते पूर्ण बरे झाले. सौ. शोभा शिवाजीराव हडदरे (सांगली) फार आजारी होत्या. त्यांना सांगलीतील डॉक्टरांनी पुण्यास जाऊन ऑपरेशन करून घेण्यास सांगितले.

पुण्यास जाण्यापूर्वी श्रीदादांना सर्व सांगून, 'मला वाचवावे' अशी त्यांनी विनंति केली. तेव्हा श्रीदादा हसले व 'भीमरुपी स्तोत्र' म्हणवून घेऊन त्यांनी अंगारा दिला. अंगारा घेऊन त्या पुण्यास गेल्या. पुण्याचे डॉक्टरांनी त्यांची तपासणी करून त्यांना आठ दिवसांसाठी गोळ्या लिहून दिल्या. श्रीदादांनी दिलेला अंगारा त्या श्रीदादांचे स्मरण करून लावीत व मग गोळ्या घेत. आठ दिवसांनी ऑपरेशनशिवाय त्यांची तब्येत चांगली झाली. त्यांचा नवीन जन्म झाला. श्री. कृ. रा. शिंगाडे यांनी पुढील हकिकत नोंदविलेली आहे :- श्रीमती खामकर यांच्या घरातील एक मुलगा ब्रेन ट्यूमरने आजारी होता. सांगली, कोल्हापूर येथील डॉक्टरांनी त्याला मुंबईस नेण्यास सांगितले. खामकरबाई शिंगाडे यांना घेऊन श्रीदादांचेकडे आल्या व त्यांनी मुलाला श्रीदादांचे पायावर घातले. ''मुलाला काही होणार नाही'' असे सांगून श्रीदादांनी अंगारा दिला. पुढे मुलाला मुंबईस नेण्यात आले. ''केस हाताबाहेरची आहे '' असे तेथील डॉक्टरांनी सांगितले. मग त्या मुलाला परत आणण्यात आले. त्याचेसाठी श्रीदादांनी दिलेला अंगारा वापरला गेला. श्रीदादांच्या अंगाऱ्याने मुलगा बरा झाला. ही गोष्ट एप्रिल १९९२ मध्ये घडली. श्री. बापूराव मायदेव (आजरा) यांचे शेत आहे. शेतात त्यांनी एक कुळ ठेवले होते. ते कुळ फार घातक होते, हे श्री. मायदेवांनी श्रीदादांना सांगितले. श्रीदादांनी त्यांना अंगारा दिला आणि सांगितले, ''तो माणूस तुमच्या घरी आला की हा अंगारा फुंका''. मायदेवांनी तसे केले. ते कुळ कुळाचा हक्क सोडून निघून गेले. श्री. गजानन दामोदर केळकर यांनी सांगितलेले उदाहरण असे आहे :- सौ. सुधा केळकर या माझ्या पत्नीचे तीन सलग आजार व जिवावरील संकटे दासराममहाराजांचे आशीर्वादाने व अंगाऱ्याने टळली. इ.स. १९९९ मध्ये त्यांच्या डाव्या पायाच्या नडगीचे वर हाडापर्यंत पोचलेली व तज्ज्ञ डॉक्टरांच्या सलग १।। वर्षे उपचाराने बरी न होऊ शकलेली जखम दादांच्या अंगारा-प्रसादाने बरी झाली.''

श्रीदादांचे दर्शन घेतल्याने मनाला सुख, शांति, समाधान वाटते, उत्साह वाढतो, आत्मविश्वास वाढतो, भीति कमी होते, आचरणात फरक पडतो, परमार्थाची गोडी लागते असे अनुभव काहींना आले. ''दादांचे दर्शनाने मनाला सुख मिळते'' (अ. धो. भांडवले).

दादांचे दर्शनाने मनाला शांति लाभली (विलासराव खंडागळे, पोलीस



पाटील, हरिपूर; सौ. सुचित्रा सुरेश कुलकर्णी, एम्. एल्. सी. बी. एड्, सांगली; सौ. वैशाली संदीप पवार, सांगली; अनूसया रामचंद्र जाधव, सांगली; रावसाहेब आकाराम पाटील, सांगली).

श्रीदादांचे दर्शनाने मनाला समाधान वाटते (गजानन गोविंद कांबळे, सांगली; सौ. लीलावती शंकरराव पाटील, प्राथमिक शिक्षिका, सांगली; श्याम श्रीपती वेल्हाळ; सौ. रेखा दत्तात्रय केळकर, डी. एड्, सांगली; विद्याधर बाबूराव कबुरे, उपाध्यक्ष सहकारी साखर कारखाना, सांगली; अशोक एकनाथ कुलकर्णी; माणिकराव जाधव; तानुबाई परशुराम पवार, सांगली; गोपाळ बाळकृष्ण जोशी, बी. कॉम्. विश्रामबाग; सौ. उषा रवींद्र कुलकर्णी, सांगली; श्रीराणेमहाराज).

श्रीदादांचे दर्शनाने आनंद होतो (सौ. वासंती सुभाष फुके, अंगणवाडी सेविका, सांगली; ॐकार अच्युत कुलकर्णी; अरुण गुजराती, माजी मंत्री, महाराष्ट्र शासन; महेश गणपतराव जाधव (सांगली); अनंत हरि रेमणे, सांगली).

श्रीदादांचे दर्शनाने मनाला प्रसन्नता वाटते (चंद्रकांत रामचंद्र जोशी, मुंबई; देवीदास वामन पाटील, शिरवली (जि. रायगड); एम्. ए. बाकल; सौ. सुभद्रा भीमराव गवळी, सांगली).

हजरत पीर मन्सूरुल हसन हे सांगलीत आले की श्रीदादांना भेटत (पहा: तरुण भारत, स्पंदन, गुरुवार, दि. २४ जानेवारी २००२). श्रीदादांच्या एका भेटीनंतर ते म्हणाले, ''आपको मिलके बडी शांती हुई, खुषी हुई.''

श्रीदादांचे दर्शनाने आत्मविश्वास वाटतो, असा अनुभव राजन शशिकांत रामचंद्रे,भांड्याचे व्यापारी, सांगली, यांना आला. श्रीदादांच्या दररोजच्या दर्शनाने आपण काही करू शकतो ही सुनील विश्वासराव पवार (सांगली) यांच्या मनाची पूर्ण खात्री झाली. श्रीदादांचे दर्शन घेतलेवर मनातील भीति नाहीशी व्हायची (विश्वनाथ शंकर कुलकर्णी, बी. कॉम्. जी. डी. सी., बीड). श्रीदादांच्या दर्शनाने पुढील कार्य करण्यास उत्साह वाटतो, असे सौ. स्नेहल श्रीकांत गोडबोले, शिक्षिका, (सांगली) सांगतात. श्रीदादांच्या दर्शनामुळे जीवनात खूप चांगल्या घटना घडत आहेत, असा सौ. माधुरी श्रीकांत कुलकर्णी, बी. ए. (सांगली) यांना अनुभव आला. दररोजच्या श्रीदादांच्या

दर्शनाने घरातले वातावरण चांगले रहाते, असे कुसुम विलास पवार (सांगली) सांगतात. श्रीदादांचे दर्शनानंतर मनातील ताणतणाव, कामाचा व्याप व शीण कमी होतो, असे सुरेश कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. श्रीदादांच्या दर्शनामुळे योजलेली सर्व कामे पूर्ण होतात, असा प्र. ह. रजपूत यांचा अनुभव आहे. श्रीदादांच्या दर्शनाने स्फूर्ति लाभते, असे माधव अ. बकाल सांगतात. श्रीदादांच्या दर्शनानंतर जीवनामध्ये काही मिळविल्याचे समाधान मिळते, अशी अनुभूति दत्तात्रय पांडूरंग पाटील, बी. कॉम्. (सांगली) यांना आली. श्रीदादांच्या दर्शनामुळे, जी माणसे बोलत नव्हती, सहकार्य करीत नव्हती ती सहकार्य करू लागली, असा अनुभव लक्ष्मण दत्तू नलवडे, बी. ए. (सांगली) यांना आला. श्रीदादांचे दर्शनामुळे जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला आहे, असे नारायण गंगाधर आपटे (सांगली) सांगतात. श्रीदादांच्या दर्शनामुळे आचरणात फार मोठा बदल झाला आहे, अशी कबुली संतोष शिंत्रे देतात. ''श्रीदादामहाराजांच्या दर्शनामुळे आनंद होतो, सर्व प्रपंचाच्या गोष्टींचा विसर पडत असल्यामुळे जप-साधनेची आठवण होते'', असे श्रीकांत शेटजी सांगतात. श्रीदादांचे दर्शन घेतल्यावर साधना करावी अशी इच्छा होते, असे सुधीर मुकुंद काळे म्हणतात. तर श्रीदादांच्या दर्शनामुळे परमार्थाची गोडी लागली आहे, अशी कबुली आनंदराव मधुकर पाटील (सांगलीवाडी) हे देतात.

श्रीदादांचे स्मरण/चिंतन केल्यामुळे अडीअडचणी, संकटे दूर होतात, अवघड वाटणारी कामे सहज होऊन जातात, मार्ग सापडतो, श्रीदादांचे स्वप्नात दर्शन होते, अशा प्रकारचे अनुभव भाविकांना आले. श्रीदादांचे स्मरण केल्याने संभाजीराव नारायण घाटगे (सांगली) यांचे काही महत्त्वाचे प्रश्न सुटले. ज्ञानेश्वर बाबूराव चव्हाण (सांगली) यांचा हरवलेला पुष्कराज खडा श्रीदादांचे स्मरण करताच त्वरित रस्त्यावरच सापडला. स्वप्ना साळी आता सौ. स्वप्ना पिदडी, एम्. एस्. इन कॉम्प्युटर सायन्स, इले. डिप्लोमा, (पुणे), या सांगतात की मन अस्वस्थ झाले किंवा काही अडचण आली की त्या १५ मिनिटे दादामहाराजांचे स्मरण करतात. लगेच त्यांचे मन शांत होते; मार्ग सापडतात. रंगराव राघू पवार सांगतात की श्रीदादांचे स्मरण केल्यानंतर प्रापंचिक अडचणी दूर झाल्या. तर कधी संकटे टळली हे कळलेच नाही असा अनुभव आला असे पार्वतीबाई शामराव बुवा (सांगली), सौ. शुभदा बाबूराव निकम (सांगली), सौ. गीता



राजसिंह रजपूत (सांगली), सौ. मनाबाई सीताराम मगर (सांगली) हे लोक म्हणतात. कुसुम विलास पवार (सांगली) या एकदा परगावी गेल्या. तेथे श्रीदादांचे दर्शन होणार नाही म्हणून त्यांच्या मनाला रुखरुख लागली. तेव्हा त्यांनी श्रीदादांचे स्मरण केले. त्या दिवशी रात्री स्वप्नात येऊन श्रीदादांनी त्यांना दर्शन दिले. रमेश गुरुसिद्धाप्पा बेले, एम्. कॉम्. जी. डी. सी. ए. (सांगली) हे सांगतात ''प. पू. दादांच्या स्मरणामुळे जीवनातील कोणत्याही स्वरूपाच्या अडचणींच्या/दु:खाच्या प्रसंगी तोंड देण्याचे बळ मिळालेले आहे. त्यामुळे साक्षात् मरणाचीही भीति वाटत नाही.'' नीलकंठ पांडुरंग भिडे, एम्. ए. (सांगली) यांच्या गेल्या तीन वर्षातील गुजरात व राजस्थान राज्यांच्या प्रवासात प. पू. श्रीदादांच्या स्मरणाने अवघड वाटणारी कामे सहज होऊन गेली व त्यांचा प्रवास सुखरूप पार पडला. श्रीमती शैलजा रामचंद्र कुलकर्णी, कोल्हापूर, या आपला एक अनुभव असा सांगतात :- ''आम्ही दि. २८ फेब्रुवारी १९९६ रोजी गांधीनगरला बसने साखरपुड्याची साडी आणण्यास निघालो होतो. वाटेत बसगाडी अचानक एका विहिरीजवळ आल्यावर उलटली.'' ''दादामहाराज, काय हे?'' असे मी म्हटले. त्यावेळी मला चक्रधारी विष्णूच्या रूपात दादांचे दर्शन झाले. विहिराचा कठडा तोडून आत गेलेली गाडी विहिरीत साठलेल्या केंदाळात थटली. तेथे दादांचा हात आडवा होता. गाडीतील सर्व माणसे वाचली. आम्हाला खरचटले सुद्धा नाही. तेथे जमलेल्या सर्व लोकांना मी माझ्याजवळ असणारे दादांचे पुस्तक दाखविले, व ''आमचे गुरु येऊन भक्तांचे रक्षण करतात'' असे सांगितले, आणि दादामहाराजांचा जयजयकार केला.''

श्रीदादांची कृपा ही फलदायी ठरते असे अनेकांचे अनुभव आहेत :- श्रीदादांचे कृपेने सर्व काही चांगले घडत आहे, असे माधव रामकृष्ण बर्वे, सी. ए. (इचलकरंजी) सांगतात. दादांचे कृपेने सर्व व्यवस्थित आहे, असे राजू काटकर म्हणतात. दादांच्या कृपाशीर्वादामुळे जीवनाची वाटचाल यशस्वीपणे झाली व होत आहे, असे मत अरुण महादेव माने, लाकूड कोळसा व्यापारी (कोल्हापूर) हे व्यक्त करतात. श्रीदादांच्या कृपेमुळे आपण सुखी जीवन जगत आहोत, असे सौ. आक्काताई भाऊसाहेब नेमिष्टे (इचलकरंजी) व सौ. सुलभा वसंत तांबडे (सांगली) सांगतात. जीवनात येणाऱ्या अडचणीतून श्रीदादांच्या कृपेने सुटका झाली असा दावा लक्ष्मण कृष्णा पाटील (चिकुर्डे), धोंडीराम

गोपाळ भोसले (चिकुर्डे) सौ. प्रभा दत्तात्रय कर्णेकर (सांगली) व सर्जेराव गणपति जाधव (चिकुर्डे) यांचा आहे. श्रीदादांच्या कृपाप्रसादामुळे जीवनातील अनेक कठिण प्रसंगावर मात करता आली, असे निवेदन सौ. शुभदा रवींद्र पाटील, एम्. ए. पीएच्. डी.(विश्रामबाग) करतात. तर अगदी संकटकाली दादामहाराजांनी खड्यासारखा बाजूला काढला आहे, असे कथन भालचंद्र भास्कर कुलकर्णी, बी. कॉम्. जी. डी. सी. ए. (कोल्हापूर) यांचे आहे. श्रीदादांचे कृपाप्रसादामुळे समर्पित व समाधानी जीवनाचा मार्ग रघुनाथ वसंत पोतदार (चिकुर्डे) यांना सापडला. श्रीदादांच्या कृपेने श्रीमती जनाबाई महादेव कोळी (सांगली) समाधानात आहेत, तर सौ. मोहिनी विकास फडके, बी. ए. (मिरज) यांना श्रीदादांच्या कृपेने मानसिक समाधान लाभले. किरण अप्पासाहेब अपराध, बी. ई. (सांगली) हे कॉमर्स क्षेत्रातील आय्. सी. डब्ल्यू. ए. सारख्या अतिशय कठिण कोर्सच्या दोन परीक्षा अतिशय कमी कालावधीत उत्तीर्ण झाले, हे श्रीदादांच्या कृपेचे फळ असे ते म्हणतात. श्री. समीर बाबूराव चव्हाण यांचे समवेत यशस्वी व्यावसायिक वाटचाल केवळ श्रीदादांच्या कृपाशीर्वादावरच झाली, याह्ल शंका नाही, असे ज्ञानेश्वर बाबूराव चव्हाण, कॉमर्स पदवीधर (सांगली) सांगतात. श्रीदादांच्या कृपेने एक मुलगा इंजिनिअरिंगकडे व दुसरा डॉक्टरीकडे गेला, असे सौ. नीलिमा दत्तात्रय चौगुले (इचलकरंजी) यांचे मत आहे. सद्‌गुरु दादांच्या कृपेने नित्य क्षणोक्षणी अनुभूति घेत आहे, असे गुरुप्रसाद सुरेश कुलकर्णी, इलेक्ट्रीक सुपरवायझर (सांगली) हे सांगतात. श्रीदादांच्या कृपेने कृष्णा रामचंद्र शिंगाडे, फौजदार, हे मनुष्य म्हणून जगू लागले. दादांच्या कृपेने सदानंद बंकापुरे यांच्या जीवनाला योग्य वळण लागले तर सौ. माधुरी महादेव भागवत बी. ए. (ऑनर्स) (रत्नागिरी) यांचे आध्यात्मिक जीवन श्रीदादांच्या कृपेने सुरू झाले. डॉ. गोविंद रामचंद्र कुलकर्णी, एम्. ए. पीएच्. डी., डी. लिट्. (सांगली) यांचे संशोधन चालू होते. ते पूर्ण होईल की नाही या संभ्रमात ते निराश झाले होते. ''ते तुमच्या हातून निश्चित पुरे होईल'', असे श्रीदादांनी त्यांना सांगितले आणि श्रीदादांच्या कृपेने ते पूर्ण झाले. ''मी फार मोठ्या ॲक्सिडेंटमधून तीन वेळा वाचलो ही मामांची व दादांची कृपा'' असे विजयसिंह सुर्वे (कोल्हापूर) सांगतात. दामोदर गोविंद धामणीकर सांगतात की डासासाठी लावलेल्या उदबत्तीने बेडशीट, चादर पेटली पण दादांच्या कृपेने



कोणतीही इजा न होता ते वाचले. सौ. प्रतिभा सोपान साळी (पुणे) या सांगतात, ''कन्याकुमारीच्या टूरवर गेलो असता मोठा ॲक्सिडेंट झाला. त्यावेळी नामस्मरण चालू होते. त्यामुळे आमच्यापैकी एकालाही जरासुद्धा खरचटले नाही. तसेच माझ्या मोठ्या मुलाच्या गाडीला ॲक्सिडेंट झाला. गाडी तीन वेळा पलटी झाली तरीही त्याला जरासुद्धा खरचटले नाही ही दासरामांची मोठी कृपा मी समजते.''

श्रीदादांच्या आशीर्वादाचेही अनेक अनुभव भक्त-भाविकांना आले. श्रीदादांच्या आशीर्वादाने सौ. श्रद्धा नंदकुमार दिवाण, बी. ए. (सांगली) यांची संसाराची वाटचाल उत्तमप्रकारे चालू आहे, तर सौ. भाग्यश्री अशोक पंडित, जी. सी. डी. (निगडी-पुणे) यांना आयुष्यात चांगला जोडीदार मिळाला व त्या सुखी समाधानी आहेत. सौ. शोभा बाळासाहेब चौगुले (कोल्हापूर) सांगतात, ''माझ्या लग्नाला दासराम व सौ. वहिनी उपस्थित होते व त्यांचे शुभाशीर्वाद आम्हाला लाभले. तेव्हापासून गेली २६ वर्षे आम्हाला कशाचीही कमतरता भासली नाही.'' कितीही अवघड कामे, परिस्थिति असली तरी त्यांना सामोरे जायचे साहस श्रीदादामहाराजांचे आशीर्वादामुळे प्राप्त होते, असे मत पंकज प्रतापसिंग रजपूत, पॉलिमर इंजिनीयर (सांगली) यांचे आहे. तर श्रीदादांच्या आशीर्वादाने सर्व त्रास, संकटे दूर होतात, आहे त्या परिस्थितीत सुधारणा होते, असा सौ. प्रभावती गजानन भंडारे (वानलेसवाडी) यांचा अनुभव आहे. सौ. इंदू विश्वनाथ बुद्धे, एम्. ए. (कोल्हापूर) यांना श्रीदादांचा आशीर्वाद नेहमीच उत्साहवर्धक वाटला. दिलीप लेले यांची मुलगी मोठ्या आजारातून बरी झाली. सौ. शोभा अरुण सारोळकर (निगडी-पुणे) यांच्या मोठ्या मुलाचे हार्टचे ऑपरेशन दादांच्या शुभाशीर्वादाने व्यवस्थित झाले. सौ. उषा रवींद्र पवार, बी. ए. (सांगली) यांचा मुलगा ५५% टक्के भाजला होता तो दादांच्या आशीर्वादाने बरा झाला. सौ. सुनंदा लक्ष्मण कानडे (मुंबई) यांचे यजमान मोठ्या दुखण्यातून बरे झाले. तर लक्ष्मण भिकाजी कानडे (मुंबई) हे अल्सर ट्यूमरच्या मोठ्या ऑपरेशनमधून श्रीदादांच्या कृपाशीर्वादाने बरे झाले. श्रीदादांच्या आशीर्वादाने डॉ. डी. एम्. चौगुले (इचलकरंजी) यांच्या दवाखान्याचे काम पूर्ण झाले व नवीन वास्तूत दवाखान्याचे स्थलांतर झाले. सौ. भारती विलासराव बडवे (कोल्हापूर) सांगतात की साध्या घराची तीन

मजली इमारत झाली. तर सुरेश दत्तात्रय कुलकर्णी, सी. ए. (सांगली) यांची श्रीरामनिकेतनजवळ स्वत:ची वास्तु झाली. श्रीदादांच्या आशीर्वादाने, कोर्टात घराबद्दल चालू असलेल्या केसचा निकाल लक्ष्मीकांत विठ्ठल मोघे (इचलकरंजी) यांच्या बाजूने लागला. नीलेश चौगुले यांना श्रीदादांच्या आशीर्वादाने आभियांत्रिकी शाखेत प्रवेश मिळाला. रामचंद्र घोडके (सांगली) यांना सांगलीचे नगराध्यक्ष पद मिळाले आणि दिगंबर जाधव (सांगली) हे वसंतदादा सूत गिरणीचे चेअरमन झाले असे ते सांगतात. ज. य. जनवाडे यांना श्रीदादांच्या कृपाशीर्वादाने नोकरी मिळाली. चंचलबेन प्रेमजीभाई शंकरवाला (सांगली) यांची बद्रीनाथला जाण्याची इच्छा पूर्ण झाली, तर अण्णाजी महादेव कुलकर्णी (सांगली) यांची कन्या बी. ई. होऊन मुंबईस नोकरी करीत आहे. श्रीदादांच्या आशीर्वादामुळे आत्मविश्वास निर्माण होऊन सर्व कार्ये यशस्वी होत आहेत, असा अनुभव सचिन सुभाष मोहिते, बी.ई. (सांगली) यांना आला. ''I Mrs Anjusha Joshi have experienced good moments and important events of life, with Dada's blessings'', तर सौ. सुनीता मंगेशसिंग रजपूत (सांगली) सांगतात ''वैवाहिक जीवन शांतसे चल रहा है और संसार प्रपंचको पैसोंकी जरुरत पडती है वो महाराजके आशीर्वादसे कभी कमी नही आई । कभी किसी बातका भय नही रहा दादाके आशीर्वादसे ।'' मधुसूदन कृष्णाजी दातार (सातारा) सांगतात की दादामहाराजांच्या आशीर्वादाने त्यांची पंधरा पुस्तके प्रकाशित झाली. तर कैलास शिवाजीराव हडदरे, बी. कॉम्., डी. बी. एम्. (सांगली) यांचे शिक्षण श्रीदादांचे आशीर्वादाने पूर्ण झाले व त्यांना परमेश्वराबद्दल व साधनेबद्दल गोडी लागली.

श्रीदादा अनेकदा उत्स्फूर्तपणे बोलून जात व ते खरे होई, असे अनुभव अनेकांना आले. त्यातील काही असे :- सांगलीमध्ये सुधाकर रेगोडकर यांची रहाण्याची जागा फारच लहान होती. ते कळताच श्रीदादा म्हणाले, '' रेगोडकर, तुम्हाला सहा महिन्यात मोठी जागा मिळेल''. त्याप्रमाणे रेगोडकरांना मोठी जागा भाड्याने मिळाली. श्रीदादांची दाढी करणारे श्री. साळुंके यांचे लग्न ठरले. पुढे वधूकडच्या मंडळींनी हे लग्न मोडले. हे साळुंके यांनी श्रीदादांना सांगितले. तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''तीच मंडळी पुन: तुमचेकडे येतील व त्याच मुलीशी



तुमचे लग्न होईल.'' पुढे तसेच घडले, ही गोष्ट रेगोडकर सांगतात. ''अच्युतानंद तीर्थ (भागवतस्वामी) इंदूर यांनी मला सुमारे ५० वर्षापूर्वी मंत्र दिला. तरुण वयात त्या मंत्राची उपेक्षा झाली. पुढे मंत्रावर श्रद्धा वाटू लागली. ध्यानाच्या अवलंबनासाठी गुरूंना समोर आणावे म्हटले तर त्यांची मूर्ति स्पष्टपणे समोर येईना. म्हणून दासराम यांनाच समोर ठेवू लागलो. त्यांनी सांगितले की काही काळ उपासना केल्यावर भागवतस्वामी समोर येतील. गेले आठ दिवस तो अनुभव येऊ लागला आहे,'' असा आपला अनुभव वि. ह. माईणकर, वकिल सांगतात. सांगलवाडी येथील आनंदराव मधुकर पाटील यांना आपल्या शेतात पाईप लाईन स्कीम करावयाची होती. ते इ.स. १९९४ पासून प्रयत्न करीत होते. पण सतत काहीतरी अडचणी येत होत्या. शेवटी त्यांनी श्रीदादांना विचारले. तेव्हा श्रीदादा म्हणाले की त्या वर्षअखेर ही स्कीम होईल. त्याप्रमाणे ही स्कीम पूर्ण झाली. श्रीदादांनी एकदा बिरदेव मल्हारी लोखंडे (रा. कोकळे, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) यांना ''नोकरी लागेल,'' असे सांगितले. लगेच त्यांना भारतीय सेनेत नोकरी मिळाली. आत्ता ते पंजाबात आर्मी पोलीस आहेत. परशुराम शिवराम लोखंडे यांचे लग्न बरेच दिवस जमत नव्हते. ते त्यांनी श्रीदादांना सांगितले. ''एक महिन्यात होईल'' असे श्रीदादा त्यांना म्हणाले. त्याप्रमाणे महिन्याच्या आतच त्यांचे लग्न झाले. लक्ष्मीकांत प्रेमजी शंकरवाला (सांगली) यांच्या मोठ्या मुलीच्या अंगावर पांढरे डाग उठू लागले. ते त्यांनी श्रीदादांना सांगितले. श्रीदादा म्हणाले, ''काळजी करू नका, डाग कमी होतील. तिच्या लग्नात काही अडचण येणार नाही''. पुढे तसेच घडले. मे १९८७ मध्ये मुकुंद दत्तात्रय हलदुले (पुणे) हे प्रोस्टेट कॅन्सरने दवाखान्यात होते. श्रीदादा तेथे जाऊन म्हणाले, ''तुला काहीही होणार नाही.'' श्रीदादांचे कृपेने ते ठीक आहेत.

सौ. मंगल तुकाराम पवार (सांगली) यांचे उदाहरण तर लक्षणीय आहे. त्या सांगतात,''श्रीदादांनी माझ्या स्वप्नात येऊन माझे काम पूर्ण होईल, माझी इच्छा पूर्ण होईल, असे सांगितले आणि खरेच पुढच्याच महिन्यात माझे काम पूर्ण झाले. खरेच दादा कल्पवृक्ष आहेत.''

卐卐卐卐卐

## प्रकरण २० : पुरवणी

श्रीदादांचा अनुग्रह, कीर्तन, दर्शन, स्मरण इत्यादि विशिष्ट कारणांनी भक्तांना विविध अनुभव आले. तसेच दादांचेकडे येणे सुरू झाल्यामुळे काही लोकांना विशिष्ट अनुभव आले, ते येथे दिलेले आहेत.

१) मन देवाधर्माकडे जास्त लागू लागले. भजन-प्रवचन-कीर्तन यांचा ओढा वाढू लागला आहे (विश्वनाथ शंकर कुलकर्णी बी. कॉम्. सांगली; फाइल १).

२) परमार्थाची आवड, अध्यात्मात रुचि निर्माण झाली (प्रीति प्रेमसिंग परदेशी, बी. ए., वेब ग्रॉफिक्स इंजिनियर, रावळगाव; फाइल ४).

३) माझा असाध्य रोग बरा झाला. अनेक वेळा अपघाताचे प्रसंग आले पण मला काहीही इजा झालेली नाही. (जयकृष्ण मोरेश्वर भानुशाली, बोरीवली-मुंबई; फाइल २).

४) प्रपंचामध्ये समाधान आहे. (सौ. सिंधू आनंद पाटील, सौ. विमल गणपतसिंग रजपूत, शिवाजी ज्ञानू पवार, श्रीमती शोभना दिलीपसिंग परदेशी, सांगली; फाइल १).

५) समाधान लाभले (सूर्यकांत राम केळकर, सौ. सुचिता सूर्यकांत केळकर, इचलकरंजी; फाइल १; सौ. उषा अरविंद पीतांबरे, रत्नाबाई बापू कोळी, सांगली; फाइल १; सौ. अलका रामराव पाटील, सांगली; फाइल १; सुमित्रा नरसिंह जमखिंडी, सांगली; फाइल २; मिलिंद शंकरराव फडणीस, बी.ए. बी. कॉम, सौ. मेघना मिलिंद फडणीस, बी. ए. इचलकरंजी; फाइल २).

६) मनास शांतता व प्रसन्नता लाभली ( सौ. अरुणा विजय पाटील, कोरेगाव; फाइल १; कुमारी शांताश्री श्रीकृष्ण दांडेकर; सौ. सुमन वसंत सावंत, सौ. आक्काबाई महादेव क्षीरसागर, सांगली; फाइल २).

७) मनात आलेली गोष्ट पूरी होते (सौ. सुमति नीळकंठ गोगटे, मिरज; फाइल २).

८) आहे त्यात समाधान वाटते (पार्वतीबाई शंकरराव चाळेकर, सांगली; फाइल २).

९) जीवनात समाधान मिळाले आहे (सौ. पार्वती शंकरराव सटाले, सांगली; फाइल १).

१०) सर्व काही ठीक चालले आहे (यमुना रामराव पाटील, सांगली; फाइल १).

११) मला कीर्तन, नामस्मरण, पूजा, साधना इत्यादींचे महत्त्व कळले (सदाशिव



बाबूराव माने, सांगली; फाइल १).

१२) मनाला धीर वाटतो (सौ. सुलभा वसंत तांबडे, सांगली; फाईल १).

१३) घरामध्ये आनंदी वातावरण झाले (सौ. शैलजा रघुनाथ चव्हाण, सांगली; फाइल १).

१४) माझ्या मनातील इच्छा दादांनी पूर्ण केली (सौ. मंगला प्रतापराव कदम, सांगली; फाइल १).

१५) सहनशीलता लाभली (बाळासाहेब राजाराम पाटणे, इचलकरंजी; फाइल १).

१६) सुखी संसार व परमार्थ घडला (सौ. विजया रघुनाथ जाधव, सांगली; फाइल १).

१७) ईश्वरभक्तीकडे मन ओढले गेले (संभाजीराव नारायणराव घाटगे, सांगली; फाइल १).

१८) समाधानी जीवन लाभले (पांडुरंग सीताराम गोखले, सांगली; फाइल १).

१९) नि:स्वार्थी प्रेम लाभले (सुनील सूर्यकांत केळकर, डी. ई. ई., इचलकरंजी; फाइल १).

२०) मानसिक समाधान लाभले (सौ. मीनाक्षी मुरलीधर माने, सांगली; फाइल २; सौ. वैशाली विजय कपिलेश्वर, विश्रामबाग; फाइल २; हेमंत नारायण जोशी, बीएस्. सी., मिरज; फाइल १; सौ. सुजाता चंद्रकांत हडदरे, सांगली; फाइल १; आनंदराव बाबूराव भोसले, सौ. पद्मावती आनंदराव भोसले, सौ. सावित्री बाबूराव भोसले, सांगली; कमळाबाई शंकर कदम, सौ. सुशीला अनंत रोहितकर; फाइल १; सौ. राजाक्का जगन्नाथ पवार, कुपवाड; फाईल १; सौ. सुलोचना शिवराम काळोखे, सांगली; फाइल १; सुलोचना मनोहर कदम, दिलीप भालचंद्र कुलकर्णी, सांगली; फाइल १; सौ. दमयंती वल्लभदास राजगौर, तीरुपूर; फाइल २-अ).

२१) मन:शांति व समाधान लाभले (सौ. कांचन शिवाजीराव ठोंबरे, शिवाजीराव लक्ष्मण ठोंबरे, तुळसाबाई लक्ष्मण ठोंबरे, सांगली; फाइल २; श्रीमती बाळूबाई रामाराम पाटणे, सांगली; फाइल १; रामराव विठोबा पाटील, बी.ए., सांगली; फाइल १).

२२) घरात शांतता वाटली (शिरमाबाई आनंदा कोळी, सांगली; फाइल १).

२३) अध्यात्माची ओढ वाढली (किसाबाई रामचंद्र शिंदे, मिरज; फाइल १).

२४) परमार्थ घडतो (श्रीमती राधाबाई हरिभाऊ मांडरे, सांगली; फाइल १).

२५) परमार्थ करवून घेतात (अजित खंडेराव लोखंडे, सांगली; फाइल १).

२६) मन:स्वास्थ्य व संकटकाली धैर्य प्राप्त झाले (लक्ष्मीकांत विठ्ठल मोघे, कोल्हापूर; फाइल २-अ).

२७) श्रीसद्गुरुंच्यामुळे परमार्थ चांगला घडतो व व्यवसाय व संसार चांगला चालतो (चंद्रशेखर बसाप्पा पट्टणशेट्टी, सांगली; फाइल १).

२८) स्वभावात फरक पडला आहे. राग येण्याचे प्रमाण कमी झाले आहे (आनंदी भगवान् कुलकर्णी, बुधगाव; फाइल २-अ).

२९) सर्व सुखदु:खे सहन करण्याची शक्ति दादांच्यामुळे मिळते. (सौ. वासंती वसंत भिरंगी, बुधगांव; फाइल २-अ).

३०) प्रपंचात सुख समाधान वाढले आहे असे वाटते (सौ. माया मनोहर परदेशी, सौ. दमयंती मायाराम परदेशी, बुधगाव; फाइल २-अ).

३१) श्रीदासरामहाराजांच्यामुळे प्रपंचात आर्थिक अडचण भासली नाही (रवींद्र वीरभद्र भाकरे, बुधगाव; फाइल, २-अ).

३२) फळले भाग्य माझे (श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे, बी. एस्सी. पुणे; फाइल २-अ).

३३) भीति कमी झाली. आधार वाटतो (शांताबाई दत्तात्रय हलदुले; पुणे).

३४) मनाला शांतता लाभली (यमुनाबाई नरहर आळतेकर, सांगली; फाइल २; रेखा राजाराम बर्वे, बोरीवली-मुंबई; फाइल २; सौ. गंगूबाई पुंडलीक कोळी, सांगली; फाइल २; अरविंद आनंदा चव्हाण, सौ. कल्पना अरविंद चव्हाण; (सांगली); फाइल२; सुशीला जनार्दन अवसरे, सांगली; फाइल १; सावित्रीबाई संभाजी सावंत, चंद्रकांत शिवलिंग तांदळे, लीलाबाई गणपति कोळी, सौ. मंगल अशोक कोळी, सांगली; फाइल १; सौ. शेवंता रावसाहेब पाटील, सांगली; फाइल १; सदाशिव श्रीपति जाधव, कोल्हापूर; फाइल ३; भरत मधुसूदन जानी, बी. कॉम्., सांगली; फाइल २-अ).

३५) स्वप्नात दर्शन:- पालखी शेजारी बसलेले दादा स्वप्नात दिसले (प्रकाश जयगोंडा पाटील, एम्.ए., बी. एड्., सांगली; फाइल २); स्वप्नात दोनतीन वेळा दादांचे दर्शन झाले (सौ. जयश्री सुभाष पाठक, सांगली; फाइल २). इ.स. १९८९ मध्ये एका गुरुवारी पहाटे स्वप्नात येऊन श्रीदासराममहाराजांनी माझेकडून पाद्यपूजा करवून घेतली (शिवाजी रामराव हडदरे, सांगली; फाइल १). श्रीपटवर्धनकाकांचा अनुग्रह झाला त्यावेळी परमपूज्य दादांचे एकाच वेळी तीन रूपांत स्वप्नात दर्शन झाले (श्रीपाद सदाशिव काळे, बी. कॉम्, सांगली; फाइल १). स्वप्नात दादांनी बरेच वेळा दर्शन दिले (सौ. नंदिनी संजीव आगाशे, बी. कॉम्., पी. जी. डी. एस्. एम्., कोथरुड-पुणे; फाइल ४).



३६) संसार करून परमार्थ करावा या दादांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही करीत आहोत. त्यामुळे जे समाधान लाभते, ते व्यक्त करण्यास शब्द अपुरे पडतात. (सौ. शकुंतला सखाराम घाटगे, सौ. छबुताई शामराव जगदाळे, सांगली; फाइल १).

३७) रात्री झोपतेवेळी दादांची मूर्ति डोळ्यांसमोर येते (इंदूबाई बाळासाहेब सूर्यवंशी, सांगली; फाइल २).

३८) मनाला एक प्रकारची स्थिरता लाभली. मनाचा गोंधळ कमी झाला (सौ. जयश्री बाळकृष्ण मेहेंदळे (पटवर्धन), विश्रामबाग; फाइल ४).

३९) प्रकाश दिसला (सदाशिव बळवंत साळुंखे, सांगली; फाइल १).

४०) मनास शांति लाभून कौटुंबिक सर्व कामे वेळचे वेळी होऊन लाभ झाला (सौ. सुशीला दिनकरराव पाटील, मौजे केंबळी (जि. कोल्हापूर); फाइल २-अ).

४१) मनाने परमार्थ करावा व शरीराने प्रपंच करावा असे वाटू लागले आहे (मैनाताई गणेश भिरंगी, बुधगाव; फाइल २-अ).

४२) माझा संसार चांगला व्यवस्थित सुरू आहे (रमेश रघुनाथ संकपाळ, कोल्हापूर; फाइल ३).

४३) श्रीदादा म्हणजे आमचे स्फूर्ति व पूर्तिस्थानच होय (ज्ञानेश्वर बाबूराव चव्हाण, सांगली; फाइल ३).

४४) ईश्वराविषयी आवड निर्माण झाली (प्रकाश कृष्णा जाधव, सांगली; फाइल २).

४५) आलेली संकटे दूर झाली (सौ. लक्ष्मीबाई अण्णासाहेब केसरकर, सांगली; फाइल २).

४६) सुख, शांति, समाधान लाभले (सौ. आशाराणी रामचंद्र माने, कर्नाळ; फाइल १; जयश्री दत्तात्रय मेंडगुले, सांगली; फाइल ४; सौ. प्रमिला सदाशिव जाधव, मनीषा सदाशिव जाधव, कोल्हापूर; फाइल ३; शकुंतला वसंतराव कुलकर्णी, कवठे एकंद; फाइल २; श्रीमती पार्वती निवृत्ति माने, सांगली; फाइल १; श्रीमती अक्काबाई दत्तात्रय पवार, सांगली; फाइल १).

४७) अडीअडचणी दूर झाल्या. जीवनास योग्य वळण लागले (रवींद्रनाथ सदाशिव ढेरे, सांगली; फाइल २).

४८) पोथीश्रवण, प्रवचन, कीर्तन आवडू लागले (सौ. विमल विलास फुके, सौ. कृष्णाबाई गोविंद फुके, सांगली; फाइल २).

४९) दादा सदैव पाठीशी असल्याचा अनुभव आहे (नारायण नरसिंह जमखिंडी, सांगली; फाइल २).

५०) माझ्या मुलांचे संसार चांगले झाले (सौ. सुलोचना रघुनाथ संकपाळ, कोल्हापूर; फाइल ३).

५१) रामपाठ, पंचपदी, भीमरूपी स्तोत्र यांचे रोजचे पठण दादांच्यामुळे होते (कु. कल्याणी बजरंग हडद्रे, कु. कावेरी बजरंग हडद्रे, सांगली; फाइल १).

५२) कीर्तन, प्रवचन, पोथी ऐकण्यास ओढ लागली (सुशीला लक्ष्मणराव कदम, सांगली; फाइल २).

५३) मला सुख, समृद्धि व परमार्थ लाभले आहेत (अप्पासाहेब बाळगोंडा पाटील, लेजर ७).

५४) कोणत्याही कठिण प्रसंगी किंवा आनंदाच्या क्षणी प्रत्येक गोष्टीत श्रीदादा आमच्या पाठीशी उभे आहेत, असा आम्हाला सतत भास होतो. (सौ. शिल्पा विजय जोशी, बी. ए., नागपूर; फाइल ४).

५५) माझे हार्टचे मोठे ऑपरेशन झाले. मी दादांचा फोटो उशाखाली ठेवला होता. माझे ऑपरेशन यशस्वी झाले. त्यानंतर मला मोठा असा आजार झाला नाही. (उदय अरुण सारोळकर, इले. डिप्लोमा, निगडी-पुणे; फाइल ४).



५६) आम्ही भाड्याच्या घरात रहात होतो. घरात गैरसोयी होत्या व अतिशय त्रास होता. मी रोज दादांच्या फोटोपुढे उभे राहून, ''मला साधे का होईना पण स्वतःचे छोटे घर मिळू दे'' म्हणून प्रार्थना करायची. आणि मला थोड्याच दिवसांत घराची सावली मिळाली (सौ. आशा राजाराम चौगुले, सांगली; फाइल २).

५७) दि. १०-२-९७ रोजी मी उत्सवासाठी सांगलीस आलो. मी दादांची सेवा केली. मला जडलेला संधिवात कमी झाला (भरत वामन फाटक, पुणे; लेजर १).

५८) गेली ३५ वर्षे मी दासराममहाराजांचेकडे येत आहे. तेथे गेल्यामुळे मानसिक समाधान मिळते. (सौ. शालन नारायण काटकर, सांगली; फाइल ३).

५९) प. पू. दादांचे मुळे भूतबाधा गेली (राजाराम शंकर खाडिलकर, सांगली; फाइल २).

६०) दादांच्याकडे आल्यापासून मनाला शांति मिळाली. आपण चांगले कार्य करू शकतो हा अनुभव आला (सौ. सुवर्णा धनाजी पवार, सांगली; फाइल २).

६१) श्रीदादांच्यामुळे संसारात स्थैर्य येऊ लागले आहे (हरी वामन खाडिलकर, बी. ए., मिरजोळे, रत्नागिरी; फाइल ३).

६२) जसे दादांच्याकडे यायला लागले तसे मनाला शांति मिळाली (कु. रेखा बाळकृष्ण पवार, सांगली; फाइल २).

६३) श्रीदादांकडे यायला लागल्यापासून मनाला शांति वाटते, भजन कीर्तन ऐकावेसे वाटते (सौ. शालन सदानंद शेटे, सांगली; फाइल २).

**प्रकरण २० : संदर्भ**

१) फाइल क्रमांक १, २, २-अ, ३, ४, ५
२) लेजर क्रमांक ५, ७, ६, १, ४, ३
३) तरुण भारत, स्पंदन, गुरुवार, दि. २४ जानेवारी २००२

प्रकरण २१

# श्रीदादांचे लेखन

श्रीदादा हे प्रपंचात राहून परमार्थ करणारे श्रेष्ठ संत होते. ते शाळेत असताना त्यांना निबंध-लेखन इत्यादि करावे लागले. असल्याप्रकारचे त्यांचे लेखन हे ऐहिक अथवा व्यावहारिक लेखन म्हणता येईल. प्राथमिक शाळेत जाण्याचे वेळीच त्यांना 'आत्मयाची काव्यस्फूर्ति' झाली. आणि तेव्हापासून त्यांचे पारमार्थिक वा आध्यात्मिक लेखन सुरू झाले. अशाप्रकारे श्रीदादांचे लेखन हे दोन प्रकारचे आहे :- **अ) लौकिक लेखन** :- यामध्ये पुढील उपप्रकार दिसून येतात :- १) सिटी हायस्कूलमध्ये असताना, त्यांनी लिहिलेले निबंध, पत्रे इत्यादि त्यांच्या शाळांच्या वह्यांत उपलब्ध आहेत. उदा. वही क्र. ३०, ७३, ५१ यांमध्ये मराठीतील निबंध आहेत, तर वही क्र. २५, ८६ मध्ये इंग्रजीतील निबंध व एक पत्र आहे. २) आपले नातेवाईक, भक्त इत्यादींना श्रीदादांनी लिहिलेली पत्रे आहेत. श्रीदादांचा पत्रव्यवहारही बराच होता. ३) श्रीदादा काव्य करतात हे पाहून काही निकटवर्तीयांनी त्यांना लग्न-मुंजीसाठी मंगलाष्टके करून देण्याची विनंति केली. काही विशिष्ट प्रसंगी त्यांनी आपणहूनच मंगलाष्टके रचून दिली. वही क्र. १११, १२७, १२८ यांमध्ये काही मंगलाष्टके उपलब्ध आहेत. त्याखेरीज श्रीदादांनी जी मंगलाष्टके ऐनवेळी स्वतंत्र कागदावर लिहून दिली, त्यांच्या स्थळप्रती मात्र उपलब्ध नाहीत. ४) पुण्यस्मरणात्मक लेखन :- काहींच्या निधनानिमित्त श्रीदादांनी पुण्यस्मरणात्मक लेखन केले. उदा. ''कै.सौ.कमलताई जोशी पुण्यस्मरण'', हे साप्ताहिक दि सांगली न्यूज कै. सौ. कमलताई श्रीपाद जोशी स्मृति विशेषांक, वर्ष १ ले, अंक १३ वा यामध्ये रविवार दि. १२-२-१९८९ रोजी प्रकाशित झाले. ५) गु. श्रीबाबूरावजी कोटणीस यांच्या कैवल्यधाम या स्थानी निरनिराळे कार्यक्रम, समारंभ होत. गु. श्रीबाबूरावजींच्या सांगण्यावरून श्रीदादा त्यांचे इतिवृत्त तयार करीत. श्रीदादांनी लिहिलेली अशी काही इतिवृत्ते 'सद्भक्तिप्रकाश' या मुंबईच्या त्रैमासिकात प्रसिद्ध झाली होती. उदा. सद्भक्तिप्रकाश, एप्रिल-जून १९४७, जानेवारी-मार्च १९५०, जानेवारी-मार्च १९५१, इत्यादि अंक. **(आ) पारमार्थिक/आध्यात्मिक लेखन**



:- अशा प्रकारचे श्रीदादांचे लेखन हे विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. यातील बहुतेक लेखन हे स्वेच्छेने वा स्वयंस्फूर्तीने झालेले आहे, तर काही लेखन मात्र इतरांच्या विनंतीवरून झालेले आहे. उदा. ज्ञानदेव तेहत्तिशीवरील सानंद टीका, मुद्राप्रकाशवरील टीका, इत्यादि हे इतरांच्या विनंतीवरुन झाले आहे.

श्रीदादांचे वर उल्लेखिलेले दोन्ही प्रकारचे लेखन हे गद्य आणि पद्य या स्वरूपात आहे.

श्रीदादांचे काही लेखन प्रकाशित झाले आहे तर अद्यापिही काही लेखन अप्रकाशित आहे.

श्रीदादांचे जे काही लेखन प्रकाशित झाले आहे, त्याचे चार प्रकार आढळून येतात :- (१) काही लेखन नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. (२) काही लेखन इतरांच्या ग्रंथांत प्रकाशित झाले आहे. (३) काही लेखन स्वतंत्रपणे प्रकाशित झाले आहे. (४) काही लेखनांचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

श्रीदादांचे जे काही पारमार्थिक लेखन आहे, त्याचाच सविस्तर आढावा येथे घेतला आहे. तो घेताना गद्य आणि पद्य असा विभाग लक्षात घेतला आहे.

## (अ) गद्य लेखन

श्रीदादांचे गद्य लेखन पुढीलप्रमाणे विविध प्रकारचे आहे :-

(१) सुटी वा स्वतंत्र गद्य वाक्ये :- उदा. आत्मलहरी. यामध्ये श्रीदादांना वेळोवेळी स्फुरलेले संकीर्ण विचार एकत्रितपणे उपलब्ध आहेत.

(२) इतिहास :- उदा. चिमड संप्रदायाचा इतिहास

(३) चरित्र :- उदा. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चरित्र, रामानंद-महाराज खटावकर यांचे चरित्र, नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर यांचे चरित्र, नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र.

(४) स्वभावचित्र :- तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे स्वभावचित्र.

(५) ग्रंथपरिचय :- कैवल्यपुरुष खंड १, भाग २ या ग्रंथाचा परिचय.

आहेत. या पदांवर श्रीदादांनी संक्षिप्त टीपा लिहिल्या आहेत. श्रीज्ञानेश्वर-महाराजकृत हरिपाठावरही श्रीदादांच्या टीपा आहेत.

(७) भाष्य :- ऋग्वेदातील नासदीय सूक्तावरील भाष्य.

(८) विशिष्ट विषयांवरील लेख :- सिद्धसंप्रदाय व त्याची परंपरा, आत्मविज्ञान, सोऽहं तत्त्वज्ञान.

(९)भावार्थ/तात्पर्यार्थ :- उदा. ज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ, श्रीतुकाराम-महाराजांचे १२ अभंग, ज्ञानेश्वमहाराजांचा प्रणव, उत्तरगीतेवरील ज्ञानेश्वमहाराजांची टीका, ज्ञानेश्वमहाराजांची सनद, एकनाथमहाराजकृत प्रकाशदीपिका, समर्थ रामदास स्वामींचे सोलीव सुख, इत्यादींचा भावार्थ.

(१०) अर्थ :- ज्ञानेश्वरमहाराजकृत चांगदेवपासष्टी, मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग, ज्ञानेश्वरीचा सहावा अध्याय, इत्यादि.

(११) संकीर्ण :- काही प्रश्नोत्तरे.

(१२) वर्णनात्मक :- श्रीबाबूरावजी कोटणीसमहाराजांचे निर्याण.

## (आ) पद्यलेखन

श्रीदादांच्या पद्यलेखनामध्ये पुढील प्रकार आढळून येतात:-

(१) पोवाडा :- तात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचा पोवाडा.

(२) आख्यान:- कल्याणस्वामी व तात्यासाहेब महाराज यांची जन्माख्याने.

(३) श्लोक :- श्लोकातील विषयांनुसार श्लोक रचनेचे पुढील उपप्रकार दिसतात (अ) भिन्न विषयांवरील स्वतंत्र श्लोक. उदा. परमार्थसार, सूर्यनमस्कार, मनाचे श्लोक, इ. (आ) संतसज्जनांचे वर्णन करणारे श्लोक. (इ) ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठाचे स्वरूप सांगणारे श्लोक. (ई) ग्रंथांच्या अर्पणपत्रिकेचे श्लोक. (उ) पद्यात्मक ग्रंथांचा अनुवाद करणारे सम-श्लोक. उदा. भगवद्गीतेचे समश्लोक, हे अपूर्ण राहिले आहेत. (ऊ) अष्टक म्हणजे आठ श्लोकांचा समूह. उदा. कोटणीस कुलदैवताष्टक, नागराजाष्टक. (ए) स्फुट :- स्फुट स्वरूपाचे काही श्लोक.



(६) टीपा :- कैवल्यवैभव या ग्रंथात संतांची काही कूट पदे संगृहीत केलेली

(४) आरती:- श्रीदादांच्या सुमारे १५० आरत्या उपलब्ध आहेत. त्यांचा हा 'आरतीसंग्रह' श्री. कृ. रा. शिंगाडे यांनी नुकताच प्रकाशित केला. तेथे या आरत्यांचे पुढील तेरा विभाग देण्यात आले आहेत :- (१) देवदेवी (२) चिमड संप्रदायातील सिद्धत्रयी (३) निंबरगीकरमहाराज आणि त्यांचे वंशज (४) चिमड संप्रदायातील गुरूपरंपरेतील संत व चिमड संप्रदाय (५) चिमड संप्रदायातील व चिमड संप्रदायाशी संबंधित अन्य संत (६) श्रीदासराममहाराजांचे कुलदेव, अन्य पूज्य देव आणि मातापिता (७) समर्थ रामदासस्वामी संप्रदायातील संत (८) इंचगिरी संप्रदायातील संत (९) सांगली जिल्ह्यातील संतसाधु, एकस्थळ व एक चित्र (१०) वारकरी संप्रदायातील संत (११) अन्य संत साधु (१२) राजकारणातील महनीय पुरुष (१३) पूज्य ग्रंथ.

यामध्ये काकडारती व शेजारती नाहीत. श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकरांची पंचारती आहे.

(५) भजन :- नानाप्रकारची भजने दादांनी रचलेली आहेत.

(६) सवाया:- काही सवायाही दादांनी लिहिलेल्या आहेत.

(७) ओवी :- ओवी लेखनात पुढील उपप्रकार करता येतात :-

(अ) चरित्रासाठी :- उदा. उद्धवरावजी यरगट्टीकर, भीमाण्णामहाराज निंबरगीकर, रामानंदमहाराज खटावकर, इत्यादींची चरित्रे (आ) कथामृतसार:- चिमड संप्रदायातील सिद्ध व संत आणि अन्य संत यांचे चरित्र सांगणारे:- सिद्धकथामृतसार, साधुकथामृतसार (इ) स्तोत्र:- उदा. श्रीज्ञानेश्वर स्तोत्र (ई) भावार्थ :- उदा. ज्ञानदेव आज्ञापत्र (उ) टीका:- ज्ञानदेव तेहत्तिशी, चांगदेव पासष्टी (दोन टीका:- एक तपशीलवार दुसरी एका ओवीस एक ओवी), अमृतानुभव, ज्ञानदेवकृत मुद्राप्रकाश, नमन, दत्तस्तुति, एकनाथकृत आनंदानुभव, अष्टादशनामगीता, तत्वमसि (अपूर्ण), कैवल्यसुमन, इत्यादीवरील टीका. (ऊ) स्वतंत्र ग्रंथ :- श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी, रामदासबोध, आत्मबोधप्रत्ययामृत (ए) स्फुट ओव्या.

(अ) विशिष्ट अभंगाचा समूह, ज्याला पाठ म्हटले जाते :- रेवणसिद्धपाठ, नारायणपाठ, कैवल्यपाठ, गुरुपाठ, हरिपाठ (हे दोन आहेत), इ. (आ) लहरी:- वायुलहरी, स्वानंदलहरी, इत्यादि.(इ) पंचक म्हणजे पाच अभंगांचा विशिष्ट समूह :- उदा. स्मरणपंचक (ई)दशक- दहा अभंगांचा विशिष्ट समूह. उदा. सद्बोधदशक (उ)अमृतानुभवावरील अभंग (अपूर्ण) (ऊ) भिन्न विषयावरील अभंग :- १) साधु संत २) साधन ३) प्रणव ४) तत्त्वज्ञान ५) साक्षात्कार ६) मामांचेवरील अभंग, इत्यादि (ए) निर्याण:- अनेक संतांच्या निर्याणाचे अभंग. (ऐ) कूट अभंग.

वर उल्लेखिलेल्या लिखाणापैकी काही लेखन इतरांच्या ग्रंथांत प्रकाशित झाले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे देता येतो :- हा तपशील देताना, प्रथम श्रीदादांच्या लेखनाचा प्रकार देऊन, मग पुस्तकाचे नाव, त्या पुस्तकाचा लेखक/संपादक/प्रकाशक याचे नाव, नंतर पुस्तक प्रसिद्धीचे स्थळ व काळ यांचा निर्देश केला आहे.

१) पद:- हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र, साधुदास, सांगली, १९३७ .

२) अभंग व आरती :- हनुमद्गुरुचरित्रबोधसार, गो. अ. केळकर, सांगली, १९३७.

३) पदे:- श्रीरामपाठ, गो. अ. केळकर, आवृत्ति १-२, सांगली, १९३८, १९६३.

४) नमनाचे पद:- गोविंदकीर्तनगुणगान, अप्पाराव पोवार, सांगली,शके १८६१.

५) आरत्या :- कैवल्यमनोबोधिनीग्रंथाच्या, कैवल्यप्रसाद, र. ह. कोटणीस, सांगली, १९५९.

६) मंगलाचरण :- अपरोक्षज्ञान व साक्षात्कार, वासुदेव अण्णा कामत, १९४९.

७) श्रीतुकाराम निर्याण :- श्रीतुकाराममहाराजांचे सदेह वैकुंठगमन, मं. रा. टाकी, मुंबई, १९५०.

८) ताम्हनकरमहाराजांचा अल्प परिचय, सार्थक, पांडुरंगमहाराज ताम्हनकर, सांगली, १९५१.

९) ग्रंथपरिचय व आरती : कैवल्यपुरुष, खंड१, भाग२, प्रकाशक-



(८) अभंग-पदे :- या लेखनातही पुढील उपप्रकार आढळून येतात:- र. ह. कोटणीस, सांगली, १९५२ .

१०) आरती, अभंग :- श्रीगुरुलिंगप्रसादगीता, प्र. वासुदेवराव जोशी, माधवनगर, १९५३.

११) सवाया, अभंग, कोटणीस कुलदैवताष्टक:- नित्यनियमभजनविधि, सं. र. ह. कोटणीस, आवृत्ति दुसरी, सांगली, १९५४.

१२) अर्पणपत्रिकेचे श्लोक, कैवल्यप्रसाद, (र. ह. कोटणीस), सांगली, १९५९.

१३) ज्ञानेश्वरी व गीता यांची आरती:- पहिला दीप, सं. भा. द. लिमये, (माधवनगर), संवत् २०१६.

१४) श्लोक :- श्रीगुरुतृतीया कथा, के. वा. आपटे, मुंबई, १९६०.

१५) काव्यपुष्पांजलि:- हि. हा. श्रीमंत चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन राजेसाहेब सांगली, गौरव ग्रंथ, प्र. भ. अं. दप्तरदार, सांगली, १९६०.

१६) सुमनगुच्छ, श्लोक, अभंग आरती:- गोविंदचरितमानस, न. दा. दिवेकर, सांगली, १९६३.

१७) काव्य आहेर:- तुकाराममहाराज चरित्र, मो. कृ. कुलकर्णी, सांगली, १९६५.

१८) पंचारती :- श्रीसमर्थ पांडुरंग विजय, न. दा. दिवेकर, सांगली, १९६६ .

१९) तात्यासाहेबांचे त्यांच्या पद्याधारे लिहिलेले गद्य चरित्र:- कैवल्य-संकीर्तन, प्र. ह. र. कोटणीस, पां. र. कोटणीस, सांगली, १९७०.

२०) आरती, श्लोक:- गोविंदपंत दादा घोसरवाडकर यांचे चरित्र, म. अ. कुलकर्णी, (कोल्हापूर, १९७०).

२१) दोन शब्द (प्रस्तावनावजा):- गोविंदस्मृति, प्र. किसनराव भिडे, सांगली, १९७२.

२२) आरती :- शुद्ध व सुलभ परमार्थ विचार, गो. ह. दिवेकर, पुणे, १९७२.

२३) अभिप्राय:- श्रीबालमुकुंद बालावधूतलीला चरित्र, म. अ. कुलकर्णी, कोल्हापूर, शके १८९८.

कुलकर्णी, सांगली, १९७८.

२५) पदे,आरती:- रघुनाथप्रिय साधुमहाराज यांची यशोगाथा, के. वा. आपटे, सांगली, १९७९.

२६) सोहंतत्त्वज्ञान :- श्रीसिद्धचरित्र, द. अ. किर्लोस्कर, कोल्हापूर, प्रथमावृत्ति, १९८३.

श्रीदादांचे काही लेखन नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे देता येईल:-

१) आत्मबोधप्रत्ययामृत(ओवीबद्ध), सिटी हायस्कूल त्रैमासिक, के. जि. दीक्षित, सांगली, ऑगस्ट १९३८.

२) श्रीसिद्धसंप्रदाय व त्याची परंपरा (गद्य लेख): दीपलक्ष्मी मासिक, श्रीमामामहाराज केळकर विशेषांक, मुंबई, फेब्रुवारी १९७१.

३) श्रीज्ञानेश्वरमहाराज यांची सनद (गद्य अर्थ): सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, १९७१.

४) श्रीज्ञानदेवकृत चांगदेवपासष्टी (ओवीबद्ध टीका): सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, मार्च, १९७२.

५) श्रीज्ञानेश्वरांचा प्रणव (गद्य भावार्थ) : सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, सप्टेंबर- डिसेंबर,१९७२.

६) सिद्धकथामृतसार (ओवीबद्ध): सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, जून-सप्टेंबर, १९७३.

७) एकनाथकृत प्रकाशदीपिका (गद्य अर्थ): सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, मार्च,१९७३.

८) अमृतानुभव (ज्ञानेशविलास टीका): सिद्धगिरिसंदेश त्रैमासिक, मुंबई, डिसेंबर,१९७३ पासून सुरू.

९) अमृतदर्शन (चरित्रवजा लेख): शांतिकुटिरसंदेश, षण्मासिक पत्रिका, गणपतरावमहाराज अमृतमहोत्सव विशेषांक, कन्नूर, १९७९.

१०) आदरांजलि : शक्तिपात योगदर्शन श्रीगुळवणीमहाराज गौरव अंक, सांगली, १९७९.



२४) पुरस्कार, आठवणी :- कर्नाटक महाराष्ट्रातील समर्थ सांप्रदाय, पां. वि.

११) परमार्थसार: संतकृपा मासिक, ऑक्टोंबर, १९८३.

१२) चिमड संप्रदाय: सहजयोग दर्शन, सांगली, १९८३.

१३) 'गुरुराजे कृपा केली' या शीर्षकाचा एक अभंग : शांतिकुटिर संदेश, कन्नूर, ९-१२-१९९२

१४) 'आत्मा आत्मरूप आहे' या शीर्षकाचा एक अभंग : शांतिकुटिर संदेश, कन्नूर, २४-३-९३

१५) तुकाराममहाराजांच्या बारा अभंगांचे स्पष्टीकरण, शांतिकुटिर संदेश.

श्रीदादांचे लेखन स्वतंत्र रूपानेही प्रकाशित झाले आहे. ''श्रीतात्यासाहेबमहाराजांचा पोवाडा'' (सांगली, १९३५) हा पत्रक रूपाने प्रसिध्द झाला होता. त्यानंतर त्यांचे पुस्तकरूपाने प्रसिध्द झालेले ग्रंथ पुढीलप्रमाणे देता येतील :-

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र / परिचय. प्रकाशक - ना.न.दिवाण, सांगली, शके १८६२ (इ.स.१९४०)

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी, सानंद टीकेसह, व तात्पर्यार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ, प्र.रा.गो.केळकर, सांगली, १९५२

३) श्रीज्ञानदेव मुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार, प्रकाशक :- स.वि.जोगळेकर, मुंबई, १९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ), प्र. न. व्यं. पडसलगीकर, सांगली, १९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह, प्र.रा.गो.केळकर, सांगली, १९७१

६) श्रीज्ञानदेवकृत नमन स्तोत्र, भावार्थ नमनासह, प्र.किसनराव भिडे, सांगली, १९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरित्रामृत, प्र.न.व्यं.पडसलगीकर, सांगली, १९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबगीकर चरित्र, प्र.न.व्यं.पडसलगीकर,

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह), प्र. किसनराव भिडे, सांगली, १९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र, प्र.रा.गो.केळकर, सांगली, १९७५

११) सिद्धस्तुती, संकलक-रा.गो.केळकर, सांगली, १९७७

१२) अमृतानुभव-मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह, प्र.पां.सी.गोखले, सांगली, १९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र, संतकृपा प्रकाशन, पुणे, १९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र, प्र.रमेश देशपांडे, सांगली, (सन नाही.)

१५) गुरुपाठ, प्र.श्रीमती पार्वती गोविंददास शेडजी, सांगली, १९८४

१६) सांप्रदायबोध, प्र.मुकुंद शंकर सहस्त्रबुद्धे, सांगली, १९८४

१७) श्रीरामपाठामृत, प्र.व.के.कुलकर्णी, सांगली, १९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र, प्रकाशक :- दिलीप य. पाटणकर, सांगली, १९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र, सं.प्रा.डॉ.दा.वि.कुलकर्णी, सांगली, १९८७

२०) नित्यपाठामृत, प्र.व.के.कुलकर्णी, सांगली, १९८७

२१) संजीवनपाठ, प्र.वि.मु.हलदुले, सांगली, १९८७

२२) श्रीदासरामवचनामृत (सं.के.वा.आपटे), प्र.य.के.आपटे, सांगली, १९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति, प्र.पां.सी.गोखले, सांगली, १९८८

२४) श्रीगोविंददर्शन, प्र.वा.वि.सहस्त्रबुध्दे, सांगली, १९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत, प्र.द.य.कर्णेकर, सांगली, १९८८

२६) श्रीदासरामगाथा, प्र.सौ.श्यामला कृ. पटवर्धन, सांगली, १९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण, प्र. सतीश लोखंडे,



सांगली, (सन दिलेला नाही.).

सांगली, १९८९

२८) श्रीगुरुमहिमा, प्र.श्री.वि.सहस्त्रबुद्धे, पुणे, १९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ, (ज्ञानेश्वर स्तोत्र, ज्ञानदेव आज्ञापत्र, ज्ञानेश्वरीसार, ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति एकत्र), प्र.सतीश खेडकर, सांगली, १९९७

३०) श्रीरामदासबोध, प्र.ब.रा.हडदरे, सांगली, १९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला : प्र.न.ना.गोखले, सांगली, १९९९

३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ, प्र. सतीश खेडकर, सांगली २००२ (यामध्ये पुढील १३ लघुग्रंथ आहेत :- १ परमार्थसार २ श्रीसिद्धकथामृतसार, ३ श्रीभीमाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र ४ श्रीसमर्थ रामदास स्वामी नमन ५ श्रीदासराम विंशिका ६ श्रीदासराम पंचविशी ७ श्रीसूर्यनमस्कार ८ श्रीरामानंदमहाराज खटावकर यांचे चरित्र ९ मनाचे श्लोक १० श्रीसाधुचरितामृत कथासार ११ हरिपाठ स्वरूप १२ श्रीउद्धवरावजी यरगट्टीकरमहाराज यांचे चरित्र १३ आत्मबोधप्रत्ययामृत)

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, सं.के.वा.आपटे, प्र.न.ना.गोखले, सांगली, २००२ आवृत्ति पहिली व दुसरी २००२

३४) आरतीसंग्रह, सं.के.वा.आपटे, प्र.कृ.रा.शिंगाडे, सांगली, २००२

३५) चांगदेवपासष्टी व इतर ग्रंथ, सं.के.वा.आपटे, प्र.सतीश खेडकर, सांगली, २००२ (यामध्ये पुढील लघुग्रंथ आहेत :- १) चांगदेव पासष्टी वरील एका ओवीस एक ओवी अशी टीका. २) ज्ञानेश्वरमहाराजांच्या 'प्रणव' या दीर्घ अभंगाचा गद्य भावार्थ ३) एकनाथमहाराजांच्या 'प्रकाशदीपिका' ग्रंथाचा गद्यात अर्थ. ४) समर्थ रामदास स्वामींच्या दासबोधाचे सार असा 'सोलीव सुख' नावाचा जो ग्रंथ आहे त्याचा गद्य अर्थ. ५) सोऽहंतत्त्वज्ञान (गद्य लेख). ६) आत्मविज्ञान (गद्य लेख).

श्रीदादांनी ज्या वह्या उपलब्ध करून दिल्या, त्यातील अभंग

दासरामगाथा या ग्रंथात प्रकाशित झाले आहेत. अद्यापिही श्रीदादांचे अनेक अभंग अप्रकाशित आहेत. तसेच त्यांनी रचलेली अनेक भजनेही अप्रकाशित आहेत. आणि काही श्लोकही अप्रसिद्ध राहिले आहेत. याखेरीज उत्तरगीतेवरील श्रीज्ञानेश्वरांच्या टीकेचा गद्य भावार्थ, रामदासस्वामींच्या 'आत्माराम' ग्रंथाचा गद्य अर्थ, इत्यादि अनेक लहानमोठी प्रकरणे अद्यापि अप्रसिद्ध आहेत.

श्रीदादांनी इतके विपुल लेखन केले आहे. हे साहित्य परमार्थप्रेमी-जनांना उपयोगी पडणारे आहे. या बाबतीत पर्जन्याचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पाऊस समानपणे सर्वत्र पडत असतो. जो तो आपापल्या कुवतीप्रमाणे व गरजेप्रमाणे वर्षा ऋतूतील पाण्याचा वापर करून घेतो. त्याप्रमाणे श्रीदादांच्या साहित्याचा काहींना काही उपयोग होईलच. श्रीदादांच्या साहित्याचे संदर्भात, श्रीदासरामगौरव ग्रंथात (पृ.४३) मा. मधुकरराव शिपुरकर म्हणतात, ''ही ग्रंथसंपदा जो नित्यनेमाने वाचेल, त्याचे पठण करील, तो आपला जन्म सार्थकी लावेल यात तिळमात्र शंका नाही.''



## प्रकरण २१ : पुरवणी

### श्रीदादांचे अप्रकाशित लेखन

१ गुरुदास्ये राजयोग निरुपण (३१ ओव्या)
२ भावार्थ हरिपाठ (२९ अभंग)
३ श्रीज्ञानेश्वरी नामपाठ (३४ अभंग)
४ ज्ञानेश्वरी भावार्थ चिंतन (निवडक ओव्या)
५ सुलभ ज्ञानेश्वरी पाठ (निवडक ओव्या)
६ दत्तात्रेयप्रणीत जीवन्मुक्त गीत (२५ श्लोक)
७ दासरामकृत अंतरगीता (२९ श्लोक)
८ गीतार्थ (२४ श्लोक)
९ सुश्लोक हरिपाठ (२९ श्लोक)
१० अभंगरूप चांगदेवपासष्टी (६७ चरणांचा अभंग)
११ अकरा बिल्वपत्रे (१२ आर्या)
१२ भावार्थ हरिपाठ (२९ श्लोक)
१३ अपरोक्ष गुह्य ज्ञान (२१ ओव्या)
१४ ताटीचे अभंग (गद्य अर्थ)
१५ समश्लोकी गुरुगीता
१६ ज्ञानेश्वरीप्रसाद पाठ स्तोत्र (गद्य भावार्थ)
१७ उत्तरगीतेवरील ज्ञानेश्वरांच्या टीकेचा गद्य भावार्थ
१८ ओरमकी लणय पाठ (५ अभंग)
१९ दासबोधसार
२० पांडवगीतासार स्तोत्र
२१ गुरुगीतासार स्तोत्र
२२ सप्तश्लोकी गीतेची समश्लोकी (७ श्लोक)
२३ उत्तरगीता-टीका-सार-स्तोत्र
२४ श्रीज्ञानेश्वरी तात्पर्य स्तोत्र
२५ अष्टादशनाम गीता (यावरील टीका)
२६ आत्मलहरी (दादांची वचने व अवतरणे)
२७ प्राकृत गुरुगीता (१५८ श्लोक)

२८ श्रीगणपतरावमहाराज कन्नूर चरित्र
२९ अध्यात्म (गद्य निबंध)
३० आत्माराम (याचा गद्य अर्थ)
३१ श्रीबापूसाहेब चांदवले चरित्र (गद्यामध्ये)
३२ ज्ञानेश्वरी तात्पर्य स्तोत्र
३३ भावार्थदीपिका नाम संकीर्तन स्तोत्र
३४ काही अभंग

**प्रकरण २१ : संदर्भ**

१) वही क्रमांक :-१०७, १२१, ८३, ११७, ११८, १२०, ११५, १११, १०५, १०६, ९५, ८९, २४, ८५, ८०, १२४, ७८, ५२, १४९, १५८, १३९, १४७, १४७-अ, १३५, १२६, १२८
२) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का, के.वा.आपटे, पुणे, १९८६
३) समर्थ पांडुरंग विजय, न.दा.दिवेकर, सांगली, १९६६
४) श्रीबापूरावजी गद्रे यांचे पुण्यस्मरण, न.ना.गोखले, सांगली, २०००

* वरील अप्रकाशित लेखनापैकी बहुतांश लेखन प्रकाशित झाले आहे.

प्रकरण २२

## श्रीदादांची कीर्तने

श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराजांच्या भविष्यवाणीप्रमाणे श्रीदादा आपल्या वयाच्या केवळ पाचव्या वर्षापासून हरिकीर्तन करू लागले. त्यांची ही बालपणीची कीर्तनेसुद्धा पारमार्थिक विषयांनी परिपूर्ण असत आणि म्हणूनच ती रामानंदमहाराज खटावकर यांना आवडत आणि ते श्रीदादांना आपल्या समोर कीर्तन करण्यास सांगत. श्रीदादांच्या बालपणीची ही कीर्तने कधी कधी होत. पुढे श्रीदादा वयात आले. त्यावेळी काही कारणाने श्रीमामा परगावी गेले असताना श्रीदादा घरी कीर्तने करीत, तसेच ते द्वादशीला वारकरी पद्धतीचे निरूपणही करीत. त्यांची कीर्तने- निरूपणे चांगली होतात, अशी प्रसिद्धि झाल्यावर, श्रीदादांना कीर्तन-निरूपणासाठी बाहेरचीही निमंत्रणे येऊ लागली.

श्रीदादांची तरुणपणी जी कीर्तने झाली त्यांचे तीन भाग करता येतात :- (१) इ.स.१९३६ ते १९६२ या काळातील श्रीदादांच्या कीर्तनाचे काळात श्रीमामा विद्यमान होते. ही कीर्तने श्रीदादांचे घरी तसेच बाहेरही होत. ही कीर्तने साधारणपणे २।।-३ तास चालत. त्यांमध्ये परमार्थातील महत्त्वाचे विषय येत. या कीर्तनांत श्रीदादा विनोद वगैरे काही करीत नसत. या प्रकारच्या कीर्तनातील एक कीर्तन या प्रकरणाच्या पुरवणीमध्ये दिलेले आहे. (२) इ.स.१९६२ ते १९९४ या काळात श्रीमामांच्या निर्वाणानंतर सुरू झालेली श्रीदादांची कीर्तने येतात. ही कीर्तने साधारण १-१।। तास चालत. या कीर्तनांत व्यवहारातील उदाहरणे, नर्म विनोद, इत्यादि असत. या कीर्तनांचे नमुने श्रीरामपाठामृत आणि नित्यपाठामृत या प्रकाशित ग्रंथांत सापडतात. याच कीर्तनाबद्दलचा सविस्तर तपशील येथे दिला आहे. (३) इ.स. १९९४ ते इ.स. २००१ या काळातील कीर्तनांचा तिसरा विभाग पडतो. या काळात श्रीदादांनी व्यवहारकाळीही आपले बोलणे अत्यंत कमी केले होते. त्यामुळे ते कीर्तनातही फारसे स्पष्टीकरण देत नसत. निरूपणाला घेतलेल्या अभंगातील विषयांना अनुसरून ते अभंगांची अवतरणे म्हणत, फार तर एकाद दुसरे वाक्य मध्ये येत असे. तरी श्रोत्यांची उपस्थिति कमी नसे.

श्रीमामांच्या निर्याणानंतर इ.स.१९६२ ते इ.स.२००१ या काळात अखंड ३९ वर्षे श्रीदादांनी कीर्तने केली. ही कीर्तने बिनसुट्टीची व बिनरजेची असत. अंगात ताप असो, फार खोकला येत असो, रक्तदाब त्रास देवो, मुळव्याध ताप देवो, घरात अथवा घराबाहेर काहीही बरे-वाईट घडो, श्रीदादांच्या कीर्तनांत खंड पडला नाही. आपल्या पुत्रांचे लग्नमुंजीसारखे आनंदाचे प्रसंग असोत अथवा सौ. सीतावहिनींच्या निर्याणासारखे दुःखद प्रसंग असोत, श्रीदादांच्या नित्य कीर्तनाचा नेम चुकला नाही.

आपल्या घरच्या राममंदिरातील नित्य कीर्तनासाठी दिवा-बत्ती, विजेचे पंखे, प्रसादाच्या वस्तु इत्यादींचा खर्च श्रीदादांचा असे. कीर्तनात रोज एक आरती असे. प्रसंगविशेषी तीन आरत्या आणि विजेची रोषणाई असे. काही विशिष्ट दिवशी रथ अथवा पालखी उत्सव होई. अशा प्रसंगी कापूरही लावण्यात येत असे. प्रसाद हा बहुधा ज्वारीच्या लाह्या, चुरमुरे, साखर/ खडीसाखर यापैकी काहीतरी असे. उपवासाचे दिवशी केळी/शेंगा / शेंगदाणे असे जिन्नस प्रसाद म्हणून दिले जात. कधीतरी श्रोत्यांपैकी कुणीतरी काही कारणाने प्रसाद वाटण्यास आणीत. हा प्रसाद मग नेहमीच्या प्रसादाबरोबर दिला जाई. कीर्तनात श्रीदादा कधीही हार घालून घेत नसत.

श्रीदादा आपल्या लहानपणीच्या कीर्तनात 'नमो हनुमंता' हे पद नमनामध्ये प्रथम म्हणीत.पुढे त्यांची नित्य कीर्तने सुरू झाल्यावर, श्रीदादा श्रीमामांनी ठरवून ठेवलेला कीर्तनाचा ढाचा वापरीत. श्रीमामांच्या कीर्तनाचा आकृतिबंध असा असे:-''रघुनाथप्रिय गुरुवरा'' या पदाने नमनाचा प्रारंभ होई; ज्यावर स्पष्टीकरण करावयाचे आहे तो अभंग/ पद नमनातच म्हटला जाई. नमनानंतर त्या अभंगाचे स्पष्टीकरण होई. ते संपल्यावर 'श्रीराम जयराम जय जय राम' या मंत्राचा १०८ जप होई. त्यानंतर बुक्का लावला जाई; या समयी 'सद्गुरुराज पहा प्राण्या'हे पद म्हटले जाई. मग विश्रांतीच्या वेळी एकाद्या श्रोत्याला पद म्हणण्यास सांगितले जाई. नंतर एकाद्या संताची छोटी गोष्ट सांगून झाल्यावर व काही भजने झाल्यावर आरती होई. आरती संपल्यावर 'चिमड क्षेत्री सद्गुरु माई' हे पद म्हटले जाऊन कीर्तन समाप्त होई. मग खिरापत/प्रसाद वाटला जाई.

श्रीमामांच्या प्रमाणेच श्रीदादा दरवर्षी श्रीज्ञानेश्वरांचा हरिपाठ,



श्रीमामांचा श्रीरामपाठ व नित्यपाठ यांतील अभंग विवेचनास घेत. जरी श्रीदादांच्या कीर्तनात विवरणास त्या त्या महिन्यात तेच तेच अभंग येत असत, तरी त्यांची वेगवेगळ्या पद्धतीची स्पष्टीकरणे श्रीदादा करीत. त्यामुळे त्यांच्या कीर्तनात शिळेपणा/ तोचतोचपणा येत नसे.

कीर्तनाचे वेळी लौड स्पीकर असो वा नसो, श्रीदादांचे कीर्तन हे नेहमी चढत्या आवाजात होत असे. नेहमीपेक्षा वरचा आवाज चढविताना श्रीदादा आपला डावा हात आपल्या डाव्या कानावर ठेवीत.

तबला, पेटी, व झांज ही नेहमीची साथीची साधने असत. श्रीदादा बहुधा स्वत: चिपळ्या वापरीत, कधीतरी झांज वापरीत. नाना दांडेकर, लाखेबुवा, प्रकाश भावे, अनिलप्रभु केळकर इत्यादि तबला वाजवीत. श्रीचंद्रशेखर अण्णा, अनिल प्रभु पेटीची साथ करीत. यशवंत आपटे, अनिल प्रभु, माधव बर्वे, के.वा.आपटे, दिलीप कुलकर्णी, दत्तात्रय कर्णेकर, इत्यादि झांज वाजवीत. समजा काही कारणाने साथीची मंडळी नसली तरी श्रीदादा अडून बसत नसत. बुक्का लावण्याचे व आरती घेण्याचे काम हे बहुधा बर्वे मास्तर करीत; त्यांचे नंतर हे काम व्ही. के. कुलकर्णी करू लागले. आरती/ आरत्यामध्ये वाती भरुन तयार करणे, व मग आरती स्त्रियांमध्ये फिरविणे ही कामे प्राय: श्रीमती अंबुताई वाटवे या करीत.

श्रीदादांच्या कीर्तनात लहानापासून थोरापर्यंत, समाजातील सर्व स्तरातील मंडळी असत. विद्यार्थी, शिक्षक, उद्योग-व्यवसाय करणारे, व्यापारी, पेन्शनर, अधिकारी वर्ग, कारकून, वकिल, प्राध्यापक, अशिक्षित, अशाप्रकारचे स्त्री पुरुष श्रोते असत. श्रीदादांचे नित्य कीर्तन नेमाने ऐकणारे श्रोते असत. श्रोते कितीही कमी जास्त असोत, श्रीदादांच्या कीर्तनाचा रंग तोच असे. श्रीदादांचे कीर्तन हे श्रोत्यांच्या मनोरंजनासाठी नसे तर श्रोत्यांना परमार्थ कळावा, त्याची गोडी लागावी, त्यांनी परमार्थाकडे वळावे या हेतूने त्यांचे कीर्तन असे. साहजिकच त्यांचे कीर्तनात राजकारण, समाजकारण, इतरांची निंदानालस्ती इत्यादि काही नसे. ''मी कोणीतरी मोठा आहे'' असे मानून श्रोत्यांना कमी लेखणे असाही प्रकार त्यांचे कीर्तनात नसे. 'मी सांगतो ते इतरांनी ऐकलेच पाहिजे ' असा तोराही त्यांचे कीर्तनात नसे. उलट श्रीदादा म्हणत ''मी सांगतो ते पटते का पहा.''

कीर्तन चालू असताना गुरुघरची मंडळी आली अथवा परिचित संत सज्जन आले तर श्रीदादा उठून त्यांना नमस्कार करीत व त्यांना आदर पूर्वक बसण्यास सांगत.

श्रीदादांना कधी ताप येई तर कधी खोकला येई. तरी श्रीदादांचे कीर्तन चालूच. रक्तदाबामुळे उभे राहून कीर्तन करणे अशक्य झाले. तेव्हा श्रीदादा खुर्चीत बसून कीर्तन करू लागले. मूळव्याध झाली तरी खुर्चीत बसून कीर्तन करणे श्रीदादांनी चालूच ठेवले. एकादे दिवस कीर्तन न करता विश्रांति घेण्याचा सल्ला श्रीदादांनी कधीच मानला नाही. श्रीदादांची कीर्तननिष्ठा खंबीर व अभंग होती. म्हणून अस्थिभंग व डोळ्याचे ऑपरेशन या कारणाने त्यांना दवाखान्यात रहावे लागले, तेव्हाही त्यांनी कीर्तन चुकू दिले नाही. कीर्तनाच्या बाबतीत ते स्वतःच्या प्रकृतीची पर्वा करीत नसत. कीर्तन हे दैनंदिन व्रत आहे, ते स्वधर्म आहे, या भूमिकेतून श्रीदादा कीर्तन करीत.

''श्रीदादांच्या कीर्तनाचे मुख्य वैशिष्ट्य असे की त्यांच्या कीर्तन/ प्रवचन/निरूपण यांत येणारे विषय हे आपल्याला बाहेर इतरत्र ऐकावयास मिळत नाहीत. इतकेच नव्हे तर पुस्तकांतूनही वाचावयास मिळत नाहीत,'' असे य.के . आपटे सांगतात. श्रीदादांची कीर्तने ऐकल्यावर श्रीमामासुद्धा म्हणत, ''रामजी, तुझ्या कीर्तनात येतात तसले विषय इतर कुठे वाचावयास वा ऐकावयास मिळत नाहीत.'' एकदा बुधवार दि.११-१२-१९७९ रोजी सांगलीच्या अध्यात्म विद्यामंदिरात श्रीदादांचे प्रवचन ऐकल्यावर हिंचगिरि संप्रदायाचे अनुयायी श्री. तात्यासाहेब केळकर उद्गारले ''मी अनेक प्रवचने ऐकली आहेत. पण रामभाऊंच्या सारखे प्रवचन मात्र ऐकावयास मिळालेले नाही.'' सोमवार दि. १८-२-१९८० रोजी महादबामहाराज पाटील श्रीदादांचे कीर्तनास आले होते. ते म्हणाले,''रामभाऊंचे कीर्तन म्हणजे एक नंबरी काम आहे.''

प्रसंगानुरूप श्रीदादांच्या कीर्तनात आपल्या मातापित्यांचा उल्लेख येई. तेव्हा ते म्हणत,''या आईबापांच्या पोटी जन्म आल्याने मला परमार्थाचा लाभ आला.'' तात्यासाहेबमहाराज, चिमडमहाराज, निंबरगीकरमहाराज, यांच्या स्मरणाने ते सद्गदित होत; त्यांना गहिवरून येई; त्यांचे डोळे अश्रूंनी भरत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधि प्रसंगाचे वर्णन करताना त्यांच्या



नयनांतून अश्रु गळत. तर गुरुतृतीया दिवशीच्या तात्यासाहेबमहाराजांच्या प्रगटदिनासारख्या आनंद प्रसंगी ते हसत आणि उड्याही मारत. आषाढी एकादशीच्या श्रीदादांच्या कीर्तनात तर राममंदिरात पंढरपुर अवतरले आहे असे श्रोत्यांना वाटे. फक्त आपल्याच संप्रदायातील साधुसंतांचे गुणवर्णन करावे असा सांप्रदायिक संकुचितपणा श्रीदादांच्या कीर्तनात नसे. म्हणून विशिष्ट प्रसंगी, ''भगवान श्रीधरस्वामी, भगवान् रमणमहर्षि, श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, एवढेच काय पण ख्रिस्त, बुद्ध, लो. टिळक, म. गांधी, या इतर महात्म्यांबद्दलही ते नितांत आदर बाळगतात आणि कीर्तनात त्यांच्या रसाळ बोधकथा प्रसंगोपात सांगतात,'' असे प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी सांगतात.

कीर्तन करताना श्रीदादांचे बोलणे स्पष्ट व अस्खलित असे. विवेचनासाठी घेतलेल्या पद-अभंगाचे सुसूत्र, क्रमशः विवरण श्रीदादा करीत. परमार्थासारखा विषय सोप्या, सरळ, रसाळ, आणि श्रोत्यांना कळेल अशा भाषेत ते मांडीत. श्रीदादांच्या सर्व विवेचनामागे त्यांची स्वतःची आध्यात्मिक अनुभूति ही पार्श्वभूमि म्हणून असे.त्यामुळे आध्यात्मिक पुस्तके वाचूनही ज्या गोष्टी मिळत/कळत नसत, त्या गोष्टी श्रीदादांच्या कीर्तनातून सहजपणे श्रोत्यांच्या गळी उतरत. ''श्रीदादांचे कीर्तन हे अंतरीचा कळवळा आणि स्वभावाचा जिव्हाळा यांनी भरलेले असे. कीर्तनातील विवरणात ठामपणा आणि उपदेशाचा अधिकार दिसून येत असे. विषय मांडण्याची त्यांची हातोटी, उद्धृत केल्या जाणाऱ्या पद-अभंगांच्या गोड चाली, श्रीदादांचे अनुभवाचे बोल इत्यादीमुळे श्रीदादांचे कीर्तन मनोवेधक व आकर्षक होई ''(दासरामगौरव ग्रंथ, पृ.२४-२५). ''अध्यात्मातल्या गहन प्रमेयांचा उलगडा करताना त्यांची अमृतरसास्वादिनी वाणी मोहरून येते'' (दासरामगौरव ग्रंथ, पृ.३५).

प्रतिपाद्य विषय स्पष्ट करताना श्रीदादा जे करीत, त्यांचा निर्देश पुढीलप्रमाणे करता येतो:-

[१] विषयाचे स्पष्टीकरण करताना, विषयाला अनुकूल अशा अवतरणांचा पाऊस पाडीत. ही अवतरणे पुढीलप्रमाणे असत :-

(अ) संस्कृत भाषेतील : वेद , भगवद्गीता, गुरुगीता, पांडवगीता, संस्कृत सुभाषिते, विष्णुसहस्रनाम, आणि शंकराचार्यांचे ग्रंथ (आ) इंग्रजी:-

Existence is God हे वचन. (इ) कानडी भाषेतील :- रेवणसिद्ध, निंबरगीकरमहाराज यांची पदे. (ई) हिंदी भाषेतील :- कबीर, कमाल, तुलसीदास, मीराबाई , बयाबाई व मत्स्येंद्रनाथ यांची वचने (उ) मराठीतील:- (१) गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ/ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम, बहिणाबाई, गोरा कुंभार, सेनामहाराज, चोखोबा, निळोबा, तुकया बंधु, शिवदिन केसरी यांचे काव्य (२) चिमडमहाराज, तात्यासाहेब कोटणीसमहाराज, वामनकाका कोटणीस, गोपाळकाका कोटणीस, मामामहाराज केळकर, श्रीदासराममहाराज या चिमडसंप्रदायातील संतांची पदे. (३) भीमानंदमहाराज खटावकर, रामानंदमहाराज खटावकर यांचे अभंग (४)मुकुंदराज, गुलाबरावमहाराज, बाबागर्दे, बांदकरमहाराज, माणिकप्रभु, शेख महंमद, ज्योतिपंत महाभागवत, लालदासजी, हरिबुवा भोंडवे यांची पदे (५) समर्थ रामदासस्वामी, कल्याणस्वामी, वेणाबाई, आनंदमूर्ति, केशवस्वामी, रंगनाथस्वामी, उद्धवचिद्घन, मध्व मुनीश्वर, माधवदास, आनंदतनय, रमावल्लभदास यांची काव्ये (६) मोरोपंत, वामनपंडित, यांचे श्लोक (७) स्वरूपानंद, पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांची पदे.

[२] जरुर तेथे विज्ञानातील गोष्टींचा निर्देश श्रीदादांच्या कीर्तनात येई. म्हणून ''विज्ञान आणि अध्यात्म यांचा संबंध जेव्हा ते आपल्या भेदक वाणीने स्पष्ट करतात तेव्हा त्यांची विशाल दृष्टी व आधुनिकता यांचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाही,'' असे प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी यांनी म्हटले आहे. विज्ञान- विषयक पुढील प्रकारची विधाने श्रीदादांच्या कीर्तनात येत:- (१) ज्ञानामुळे दृश्याची सिद्धि हा तर विज्ञानाचा सिद्धांत आहे. (२) गति हे विश्वातील फार मोठे तत्त्व आहे. (३) ग्रहमाला सूर्याभोवती फिरते. (४) पृथ्वी ही सूर्याभोवती फिरत आहे तोवर दिवसरात्र अटळ आहे. (५) लोखंड व लोहचुंबक जवळ आले की लोखंड उड्या मारू लागते. (६) वाफ ही अदृश्य पण ती हवेशी संलग्न झाली की दिसू लागते. (७) ज्या प्रकाशामुळे आपणास वस्तु दिसतात तो प्रकाश मात्र अदृश्य आहे. (८) मी आणि तू हे पृथ्वीवरील अक्षांश-रेखांशाप्रमाणे व्यवहाराच्या सोईसाठी आहेत. (९) उष्णतेने झालेली पाण्याची वाफ जशी वर जाते, त्याप्रमाणे चैतन्याच्या साक्षात्काराने होणारी



जीवनाची वाफ वर जाऊ लागते. (१०) दोन रेषा एका बिंदूत मिळाल्या की 'कोण' होतो. (११) आपले शरीर हे आयुर्वेदाचे दृष्टिकोनातून सात धातूंचे बनले आहे. (१२) शरीरातील काही क्रिया अनैच्छिक असतात तर काही प्रतिक्षिप्त असतात. (१३) श्वसनसंस्था ही स्वतंत्र असून तिनेच शरीराची यंत्रणा चालते.

[३] कधी स्पष्टीकरणात पुढील गोष्टी येत :- मत्स्येंद्रनाथ व गोरखनाथ यांची स्त्रीराज्यातून परत येतानाची कथा; (दक्षाच्या) सतीचे दहन, शंकराचे विषप्राशन; रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांच्याशी संबधित गोष्टी; शेखमहंमदाच्या तपाची गोष्ट,सत्यवान-सावित्री-कथा; योगवासिष्ठातील राम, वसिष्ठ व भुंगा यांची गोष्ट; प्रल्हादाची कथा; शंकराचार्यांनी सोन्याच्या आवळ्यांचा पाऊस पाडला ही गोष्ट; बिरबल व बादशहा यांची २७ नक्षत्रांविषयीची गोष्ट; निंबरगीकरमहाराज व लक्ष्मीबाई अक्का यांची कथा; केन उपनिषदातील देव आणि ब्रह्म यांची गोष्ट; इत्यादि.

[४] काही वेळा शब्दांचे खेळ करून श्रीदादा विषय मांडीत उदा.(१) प्राण नाही असे म्हणणारा निष्प्राण या जगात कोण आहे ? (२) जीव हा स्वस्थ नाही हेच त्याच्या अस्वस्थतेचे खरे कारण आहे. (३) काम क्रोधादि खट पटले तरच ती खऱ्या अर्थाने देव शोधण्याची खटपट झाली. (४) संगात असंगता आली की असंगाचा संग होतो. (५) कुंडलिनी जागृत झाल्याने कुंडली पालटून जाते. (६) नाम उच्चारण्याचे काम झाले की काम (=इच्छा) रहात नाही. (७) सर्वच खोटे आहे हे म्हणणेही खोटे आहे हे काही खोटे नाही. (८) या जगात सहज काय आहे हे सहज समजावे इतके ते सहज नाही.

[५] काही शब्दांचे विशिष्ट अर्थ श्रीदादा सांगत. उदा. स्वस्थ :- स्व म्हणजे आत्मा त्यात स्थ म्हणजे रहाणारा. नित्यनेम:- नित्य काय आहे हे जाणून त्याचा नेम साधणे याचे नाव नित्य नेम. सावध :- सहांचा वध ज्याने केला तो सावध झाला.

[६] विषय स्पष्ट करण्यास श्रीदादा कधी पुढीलसारख्या म्हणी वापरीत :- (१) का भितोस भटा तर पुढल्या एकादशीला. (२) पैशाचे नाटक

करता येत नाही. (३) तालीम गेली आणि आखाडे राहिले. (४) गर्वाचे घर खाली. (५) सगळेच मुसळ केरात. (६) जे पिंडी ते ब्रह्मांडी.

[७] विषय सोपा करून सांगण्यास दृष्टांत/उदाहरणे देण्याची पूर्वापार पद्धत आहे. तिचा अवलंब श्रीदादा करीत. म्हणून म. शं. शिपुरकरांनी म्हटलेले आहे, ''गहन योगशास्त्र असो, मायावाद असो, अगर कठिण व रूक्ष असे तत्वज्ञान असो, ती. दादा ते इतके सोपे करून सांगतात की सर्वांनी माना डोलवाव्यात. अध्यात्मासारखा गहन व कठिण विषय. पण ती. दादा तो इतका सोपा करून सांगतात की तो सामान्यातील सामान्यांना कळावा. व्यवहारातील उपमा-दृष्टांतांनी जे खरोखर अरूप आहे त्याला रूपाला आणतात व अतींद्रिय म्हणून ज्याचे वर्णन केले जाते त्यांना इंद्रिय गोचर करतात.'' श्रीदादा खालीलसारखी उदाहरणे देत :- (१) आत्मसाक्षात्कारासाठी अहंकार टाकावयास हवा. तो कसा टाकायचा? त्यासाठी आपण लहान व्हावयाचे. हे लहान कसे व्हायचे? एक उदाहरण आहे:- मुले खेळताना असे करतात:- पाटीवर काढलेली एक रेषा तिच्यात बदल न करता लहान करावयाची असल्यास, मुले त्या रेषेच्या आसपास पहिल्या रेषेपेक्षा मोठ्या रेषा काढतात. असे केल्याने पहिली रेषा आपोआपच लहान होते. असेच आपणही करावयाचे. दुसऱ्यांना मोठे म्हटले की आपण लहान होतो. असे करीत राहिल्यास अहंकार हळुहळु कमी होतो. पुढे गुरुकृपेने व साधनाच्या अभ्यासाने अहंकार गेला की आत्मसाक्षात्कार होतो. (२) परमार्थाला आवश्यक असणारी चित्तशुद्धि प्रयत्नाने करावी लागते. जसे:- घरात केर येत असतो. तो रोज घरातील स्त्री प्रयत्नपूर्वक काढून टाकत असते. म्हणून घर स्वच्छ रहाते. तसे आपल्या मनात वाईट विचार, वासना, क्रोध इत्यादि येत असतात. ते दूर सारण्याचा अभ्यास करावयास हवा. मग संतांची संगत, साधन, गुरुकृपा यामुळे मनातील जळमटे दूर होऊन चित्त शुद्ध होते. (३) माळेतील मणि बाजूला केले की आतील सूत दिसते. तसे चत्वार देह बाजूला सारले की आतला आत्मा दिसतो. (४) तापलेल्या पळीवर पाण्याचे चार थेंब टाकले तर ते चर्रर् होऊन नाहीसे होतात. तसे तापलेल्या जिभेने घेतलेले नाम निरुपयोगी ठरते (५) व्यापारात पैसा हे भांडवल. त्यातून मिळणारा नफा हाही पैसाच. तसे परमार्थात नामाने नामच मिळवायचे आहे. (६) जे मूल आईवर अवलंबून



आहे त्याचे रक्षण आई करते. तसे ईश्वर आपल्या अनन्य भक्ताचे रक्षण करतो. (७) व्यवहारातसुद्धा हवा, पाणी, अन्न हे मानवावे लागतात. तसा परमार्थात एकांत मानवावा लागतो. (८) कोळ्यामुळे जाळे आहे. जाळ्यामुळे कोळी नाही. त्याप्रमाणे देवामुळे देह आहे, देहामुळे देव नाही. (९) व्यवहारात काही ''अल्प बचत'' केली तर तिचा वृद्धापकाळी उपयोग होतो. तसे नामधन साठविले तर ते उपयोगी पडते.

[८] विषय मांडताना श्रीदादा कधी असे हातवारे करीत की श्रोत्यांना हसू येत असे :- (१)'एवढे शेजारणीने केले, मला पंढरीला नेले' इत्यादि चरण म्हणताना श्रीदादा विशिष्ट हावभाव करीत. (२) 'अनुग्रहाची झाली पीडा। बंद झाल्या पिंगळा इडा' इत्यादि चरण म्हणतानाही श्रीदादा गमतीचे हावभाव करीत. (३) एक जण दुसऱ्याला सांगत होता, ''बरेच दिवस गुरु करून टाकायचा असे मनात होते. शेवटी एकदा गुरु करून टाकला'' हे म्हणताना श्रीदादा हाताने टाकण्याचा अविर्भाव करीत. आणि या वेळी त्यांची शब्दांची फेक अगदी सूचक असे.

[९] शब्दांवर कोट्या इत्यादि करणे याचेही श्रीदादांना वावडे नव्हते. उदा- (१) वीज-कपातीचे दिवस होते. कीर्तन चालू असताना एकदा वीज गेली. तेव्हा श्रीदादा म्हणाले ''वीज कपात आहे बशीत नाही.'' (२)माणूस सध्या अस्वस्थ आहे कारण तो स्वस्थ नाही. येथे 'स्वस्थ' मधील स्व म्हणजे आत्मा असा अर्थ आहे. (३) कीर्तनात उपस्थित असणाऱ्या जवळच्या एकाद्या श्रोत्याचे नाव घेऊन त्या नावावर श्रीदादा कोटि करीत. उदा. प्रकाश भावे हे कीर्तनात असतील तर श्रीदादा म्हणत, ''प्रकाश असल्यावर अंधार कसा रहाणार ?'' प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी उपस्थित असताना त्यांच्या 'दा. वि.' या अक्षरावरून श्रीदादा सांगत,''तुका म्हणे करूनी दावि । त्याचे पाय माझे जीवी. '' हे दावि म्हणजे दाखवितात. शिरुभाऊ सहस्रबुद्धे उपस्थित असतील तर त्यांच्या 'शिरु' या अक्षरांवरुन ''तुका म्हणे कैसे करू । सोहंस्वरूपात शिरु'' हा चरण म्हणून शिरुभाऊंनी असे शिरले पाहिजे, असे श्रीदादा सांगत. (४) इ.स. १९६७ साली कोयना धरणाच्या परिसरात फार मोठा भूकंप झाला. आणि काही जण कोयना धरण फुटून हाहाकार होईल असे म्हणू लागले. तेव्हा रामदास स्वामींच्या शब्दात थोडा बदल करून श्रीदादा

सांगत :- धरणाचे स्मरण असावे. (५) माणसे आपण मात्र खरा ''काप'' घालतात आणि देवाला मात्र कापसाचा 'काप' घालतात. (६) वारकरी आणि वारी केव्हा तरी करी, माळकरी माळ तुटली तरी, आणि टाळकरी टाळाटाळ करी, याला काही अर्थ नाही. (७) झोपेत आत्मा घोररूपाने प्रगट होतो आणि प्राणी बिनघोर होतो.

[१०] स्पष्टीकरणाच्या ओघात श्रीदादा अशी काही संक्षिप्त वाक्ये बोलून जात की ती लक्षात ठेवल्याने साधकाचा कार्यभाग होऊ शके. उदा. (१) समबुद्धीने नाम घेतले की साधक हा हरिसमान होतो. (२) नामाने ''नामी'' प्रगट होतो. तेथे ''ना मी'' अशी अवस्था होते. (३) नाम म्हणजे मंत्र नव्हे, तंत्र नव्हे, शरीराचा व मनाचा खेळ नव्हे, कपोलकल्पित तर नव्हेच नव्हे. नामातच आत्माराम प्रगट होतो. (४) नुसते जगाकडे, दृश्याकडे, देहाकडे पाहून मात्र देहातील आत्मा दिसत नाही. (५) प्रेमरूप परमेश्वरावर आपण प्रेम करणेस शिकले पाहिजे. (६) देह म्हणजे जगातील नाटकाचे मंचावर जीवाने घेतलेला एक वेष आहे. (७) अनात्मा नव्हे तो आत्मा. ज्या आत्म्यामुळे अनात्मा कळतो, पण अनात्म्याने आत्मा कळत नाही, त्या आत्म्याचा शोध ऋषिमुनींनी घेतला. (८) मनाचे मनत्व नाहीसे होणे यापरता परमार्थातील दुसरा श्रेष्ठ अनुभव नाही. (९) नाम घेतल्याने काळाचा अपव्यय होत नाही, चेष्टामस्करी घडत नाही, आणि लोकांचे उणेदुणे काढून जे नुकसान होते ते होत नाही. (१०) आपले जीवन ऊर्ध्वगामी झाले की साक्षात्कार होतो.

चैतन्य हे श्रीदादांच्या कीर्तनात केंद्रबिंदु असे. ''चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याचा साक्षात्कार करून घेणे हाच परमार्थ आहे'' असे श्रीदादा सांगत.

अशाप्रकारचे श्रीदादांचे कीर्तन ऐकता ऐकता तास दीडतास कसा निघून जाई हे श्रोत्यांना कळत नसे. श्रीदादांच्या कीर्तनाची वर्णन करणारी काही जाणत्या श्रोत्यांची वचने येथे उद्धृत केल्यास ते अनाठायी ठरणार नाही. ''दादांचे कीर्तन म्हणजे अखंड अनुष्ठान. दादांचे कीर्तन म्हणजे शीर्षमार्गाचे शोधन. दादांचे कीर्तन म्हणजे विश्वाचे विस्मरण आणि सत्याचे सतत स्मरण. दादांचे कीर्तन म्हणजे अखंड समाधान. दादांचे कीर्तन म्हणजे अनंताचा साक्षात्कार,'' असे. श्री. के. ग. जोशी सांगतात. तर श्री. प्रकाश भावे यांचे मते, ''दादांचे कीर्तन म्हणजे अमृताचा ठेवा, आनंदाचे डोही आनंद तरंग.'' तसेच ''श्रीदादांचे कीर्तन म्हणजे साधकांना पर्वणीच'', असे श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे म्हणतात.



श्रीदादांचे कीर्तन हे पारंपारिक कीर्तनापेक्षा वेगळे वाटते. याचे जणु कारण देताना प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी सांगतात :- दादांच्या कीर्तनात, ''नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी'' असा नामदेवी बाणा आहे. त्यात नामाचे ''निखिल प्रबंध'' आहेत, तशी ''माजी आत्मचर्चा उदंड'' आहे, आणि ती सहज, सुलभ, हसत खेळत गळी उतरणारी आहे. हे कीर्तन 'गुह्याद् गुह्यतम' सांगणारे आहे.

श्रीदादा हे ''अखंड नाम संकीर्तनाचा गजर करून आडमार्गी जाणाऱ्या जनांना प्रकाशाचा मार्ग दाखवीत आहेत, अध्यात्माचा मळा फुलवीत आहेत'', असे साप्ताहिक तुतारीचे संपादक सांगतात. तर ''जागृति, स्वप्न, सुषुप्ति या अवस्थांत उपासना कशी करावी याचे मार्गदर्शन दादा करतात,'' असे सौ. वसुधा बापट म्हणतात. श्रीदादांच्या कीर्तनात येणारी ''नामस्मरणाची महती आणि आत्मज्ञानाची अनुभूति यांचा प्रत्यय श्रोत्यांना अंतर्मुख करणारा व साधनेला प्रवृत्त करणारा असतो'', असे मत श्री.वि. सहस्रबुद्धे व्यक्त करतात. ''प.पू. दादा 'हरुष आनंदाचा । घोष करा हरिनामाचा' हेच सतत सांगत आले आहेत.'अवघे होती लाभ । एका या चिंतने । नामसंकीर्तने गोविंदाच्या' हाच थोर संतांचा संदेश स्वत: आचरण करून इतरांना देत राहिले आहेत'', असा अभिप्राय प्रा. म. अ. कुलकर्णी यांचा आहे. तर सुरेश महादेव जोशी यांचे विधान लक्षणीय आहे. ते म्हणतात, ''ती. श्रीदादांनी जे कीर्तन, निरूपण, प्रवचन केले त्यात फक्त परमार्थ/ अध्यात्माचाच अंतर्भाव जास्त आणि तोही अतिशय उच्च कोटीचा असतो असा मला अनुभव आला. या कीर्तन – प्रवचनाला जगात तोड नाही. त्यामुळे बाहेरचे कीर्तन/प्रवचन ऐकून आलेला साधक एकदा येथे आला की येथलाच होऊन जातो.बाहेरच्यापेक्षा काहीतरी वेगळे आणि सुश्राव्य येथे आपल्याला ऐकायला मिळते अशी त्याची खात्री होते.''

श्रीदादांच्या कीर्तनाचे एकंदरीत स्वरूप हे कवि श्रीरंग विष्णु जोशी काव्यमय भाषेत असे सांगतात : ''त्यांचे अध्यात्माचे विवेचन वाहत्या

झऱ्यासारखे स्वच्छ, नितळ व पारदर्शक असते. घरातल्या वडिलधाऱ्या माणसाने आत्मप्रचीतीचे चार शब्द सांगावेत अशी कीर्तनाची वाटचाल असते. कुठलीही पोझ नाही कशाचाही सोस नाही. सारेच विवेचन निर्व्याज लडिवाळपणाने संतमहंतांचे बोट धरून कैवल्य सोपानाच्या पायऱ्या चढत रहाते. कीर्तन म्हणजे त्यांच्या लेखी देवाशी संपर्क साधण्याचे साधन.'' तर प्रा.म.अ. कुलकर्णी रसाळ भाषेत म्हणतात ''प.पू. रामदादांचे कीर्तन हा एक अनुभवाचा विषय आहे. देवासंनिध नित्य रहाणारा, अंतरंगी रंगलेला महात्मा कीर्तनरंगी कसा रंगतो, कसा डोलतो, हे प्रत्यक्ष पहावयासच हवे. चित्त शुद्ध व्हावे, द्वैतभाव विसरावा या उच्च भूमिकेतूनच ते कीर्तनात सारे विचार मांडीत असतात, भावशुद्ध अंत:करणाने भगवंताचे व साधुसंतांचे गुणानुवाद करीत असतात. भक्तिमहिमा वाढविणारे सोज्वळ कीर्तन कसे असावे याचा तो एक आदर्श असतो. चंदनाच्या वनावर निर्मळ चांदणे सहस्त्र किरणांनी बरसत रहावे अशी किमया त्या कीर्तनात असते. भक्ति, ज्ञान, वैराग्य, विवेक यांच्या मूलभूत सिद्धांतांचे सहज स्पष्टीकरण त्यात असते. सर्वसामान्यासह भाविकांना सन्मार्गाला लावणारे, सद्भक्तांना गतिमान करणारे आणि मुख्यत: भगवंताला तोषविणारे ते कीर्तन असते.'' असे हे श्रीदादांचे कीर्तन देवदुर्लभ आहे. या जगात दुर्मिळ आहे. म्हणूनच डॉ. गं. वि. कुलकर्णी सांगतात, ''बहुता सुकृताची जोडी ज्यांची आहे असेच भाग्यवान् श्रोते याचा लाभ घेत आहेत.''

श्रीदादांच्या कीर्तनात परमार्थ, तत्त्वज्ञान, सदाचार, साधन, आत्मसाक्षात्कार, इत्यादि विषयांचे निरूपण असे. ते ऐकल्यावर साधकांचे मनावर काय परिणाम होई याचे दिग्दर्शन पुढीलप्रमाणे केलेले आढळते. ''निखळ भक्ति व त्यांत गुफंलेल्या नामातून चैतन्य शक्ति या सूत्रात ते (=श्रीदादा) सर्व साधकांना असे काही गुंगवतात की तो आकंठ तृप्त होतो. व साधक कीर्तन गंगेत डुंबत राहून जीवन कृतार्थ करुन घेतो'' (श्रीकांत देशपांडे). मूळ स्वरूपाचे ज्ञान जसजसे होत जाते तसतसे साधकाच्या मनातील 'मीपण' हळुहळु विरघळत जाते व निखळ चैतन्याच्या संनिध जाऊन आत्मसुख घेण्याची ओढ लागते. आणि या अमोघ आणि दुर्मिळ विचार-गंगेत स्नान करून पुनीत झाल्याचा परमोच्च आनंद मिळतो



(बाबूराव गोखले). देह, मन, बुद्धि यांना विलक्षण प्रसन्नता येते. भावाची फुलबाग बहरून येते. परतत्त्वाचा स्पर्श व्यक्तिमत्त्वास उजळून टाकतो (प्रा.डॉ.गं.वि.कुलकर्णी). दादामहाराज म्हणजे भक्तिपंथाचे महामेरु. त्यांनी आम्हा सर्व भक्तजनांना भक्तिपंथाचा चांगला मार्ग दाखवून दिला (धोंडीराम मारुती खैरमोडे).

काही व्यक्तींचे अनुभवही येथे नोंद करण्यासारखे आहेत. श्रीदादांची कीर्तने ऐकून माधवनगरचे फौजदार सावंत समाधान पावले. भाऊसाहेब जोशी सांगतात की दादांचे कीर्तन ऐकून त्यांच्या मनातील शंकाकुशंका दूर आल्या. ते म्हणतात की दादांचे त्यांनी प्रथम जे कीर्तन ऐकले त्याने त्यांच्या मनात उसळलेल्या अनेक शंकांच्या वावटळीचे शमन झाले. परमेश्वर दाखवता येत नाही, त्याचा अनुभव घ्यावयाचा असतो हा बोध मला दादांचे कीर्तनातून झाला. श्री.के.ग. जोशी म्हणतात, ''दादांच्या कीर्तनांनी मला इतके वेड लावले व त्यामुळे मी इतका भारून गेलो की इतर कीर्तने वा प्रवचने ऐकण्यात मला रस वाटेनासा झाला, हा एक मोठाच चमत्कार म्हणावयास पाहिजे.''

कोणतीही गोष्ट रोज नित्यनेमाने करावयाची म्हटले की माणसाला कधीतरी कंटाळा येतो आणि ती गोष्ट करणे हे ओझे वाटू लागते. मग माणूस वाईट तोंड करून ती गोष्ट कशीतरी पार पाडतो. असा प्रकार श्रीदादांच्या बाबतीत कधीच झाला नाही. उलट ते आवडीने रोजचे कीर्तन करीत. कीर्तन करताना प्राय: श्रीदादांचा चेहरा प्रसन्न व हसरा असे. श्रीदादांच्या या हसत मुखाच्या बाबतीत श्री. के. ग. जोशी जे सांगतात ते अगदी स्मरणीय आहे. ते म्हणतात, ''त्यांच्या मुद्रेवरील मुक्त हास्य पहाणे ही एक अत्यंत परम भाग्याची गोष्ट आहे, असे मला राहून राहून वाटते. प.पू. दादा स्वानंदनिवासी आहेत. ते नेहमीच हसतमुख असतात. पण कीर्तनाचे वेळचे त्यांच्या चेहऱ्यावरील तेज व आनंद काही अपूर्वच असतो. त्यांच्या मुद्रेवर असे काही विलक्षण हास्य विलसू लागते की ते डोळे भरून पहात रहावे असे मला नेहमी वाटत असते. मला नेहमी वाटते की ते हास्य पहाण्याचे भाग्य मला लाभावे. ज्यांना ज्यांना हे पहाण्याचे भाग्य लाभले ते खरोखरीच धन्य होत.''

श्रीदादांचे कीर्तनाचे शेवटी आरती असे. विशेष प्रसंगी तीन आरत्या असत. आरत्यांचे वेळी राममंदिरातील विजेचे दिवे लावले जात. हे सर्व

विद्युद्दीप व आरत्यांमधील हलणाऱ्या ज्योति यांची असंख्य प्रतिबिंबे भिंतीवरील थोर थोर विभूतींच्या फोटोवरील काचांत प्रतिबिंबित होत. त्यामुळे जिकडे तिकडे ज्योतिच ज्योति दिसत. हे दृश्य हे विलोभनीय असे. ते श्री. के. ग. जोशी यांना फार आवडे. ते म्हणतात ''कधी डोळे मिटून तर उघडून या 'दीपावलि' चे हे अपूर्व दृश्य अधाशीपणाने पिण्यात मी मग्न होतो. अशा आरतींमध्ये रत होणाऱ्या मला त्या दिव्य ज्योतींच्या साक्षात्काराने परमानंद होत असतो.''

अशी होती श्रीदादांची नित्य कीर्तने. ही कीर्तने अपूर्व होती यात शंका नाही. या गोष्टीची जाण इतर अनेक संतांनाही झाली होती. म्हणून श्रीदादांच्या कीर्तन श्रवणाचा लाभ लोकांनी घ्यावा असे ते सांगत. या संदर्भात श्री. कृ. रा. शिंगाडे यांनी माधवनगरचे विदेही साधु डेव्हिडमहाराज यांच्या वचनाची नोंद पुढीलप्रमाणे केली आहे. ''सांगलीत केळकरमहाराजांचे येथे कीर्तनाचा जिवंत पाण्याचा झरा वहातो आहे. रोज भरपूर पाणी प्या.''

卐卐卐卐卐

### प्रकरण २२ : संदर्भ


१ श्रीदासराम वचनामृत, प्रकाशकाचे हृद्‌गद

२ श्रीदासरामगौरवग्रंथ, पृ. २४,२५,३५,४८-४९,४७,४६

३ वही क्र. १२९

४ साप्ताहिक तुतारी विशेषांक (के. ग. जोशी, प्रा. म. अ. कुलकर्णी, श्रीकांत देशपांडे, बाबूराव गोखले), पृ. २०,२१,२२,१८,२४,२७

५ अखंड कीर्तनानंद

६ गुरुमहिमा, प्रकाशकाचे मनोगत

७ लेजर क्रमांक ६ (सौ. वसुधा बापट), (कृ. रा. शिंगाडे), लेजर क्रमांक ३ (धोंडिबा मारुति खैरमोडे).

८ फाइल क्रमांक ३

९ अदृष्टाची सावली, पृ. १४४-१४५




## प्रकरण २२ : पुरवणी

## श्रीदादांचे इ.स. १९५२ मधील

# एक कीर्तन

### विवरणाचा अभंग

बोलो अबोलणे मरोनिया जीवे । असोनि नसणे जगी आम्हा ॥१॥
भोगी झाला त्याग संगीच असंग । तोडियेले लागमाग दोन्ही ॥२॥
तुका म्हणे नोहे दिसतो मी तैसा । पुसाल तरी पुसा पांडुरंगा ॥३॥

-श्रीतुकाराममहाराज

ब्रह्म हे सत्-चित्-आनंद आहे. म्हणजे ते सत्, चित् आणि आनंद आहे किंवा ते अस्ति, भाति आणि प्रिय या स्वरूपाचे आहे. सच्चिदानंद म्हणजे काय, ते श्री एकनाथमहाराजांनी असे सांगितले आहे : ''सत्पद ते ब्रह्म चित्पद ते माया । आनंद पदी जया म्हणती हरी ॥''. याचा अर्थ असा :- सत् हे ब्रह्म, चित् म्हणजे माया, आणि आनंद म्हणजे हरि. तेव्हा सच्चिदानंद म्हणजे ब्रह्म, माया, हरि.

या सच्चिदानंदाचेच अधिक स्पष्टीकरण चिमडच्या श्रीरामभाऊ-महाराज यरगट्टीकरांनी असे केले आहे :- ''सद्रूप मूळ ब्रह्म पाही । चिद्रूप गगनी नटला बाई। आनंद- रूप ते लवलाही । गुरु-घरचे नाणे ॥''

सत् ब्रह्म हे सर्वांचे मूळ आहे. सत् म्हणजे आस्तित्व. जीवाचा स्वप्न हा जसा विलास आहे, त्याप्रमाणे सत् चा विलास म्हणजे चित् आहे. चित् हे अत्यंत चंचळ आहे. सत् मध्ये चित् मिसळले की आनंद. किंबहुना सत् + चित् = आनंद आहे. याचा अर्थ असा की अस्तित्व आणि चैतन्य असेल, तरच आनंदाचा लाभ घेता येतो. तसेच, चित्+आनंद =सत् आहे. म्हणजे चैतन्य असून आनंद असल्यास, तेथे सत् म्हणजे अस्तित्व हे असलेच पाहिजे. तसेच, आनंद+ सत् = चित् आहे. याचा अर्थ असा की :- सत् ला आनंद होत असेल, तर तेथे चित् हे असलेच पाहिजे.

मूळ सत् ब्रह्म हे शब्दांच्या पलीकडचे आहे म्हणजे ते शब्दांनी किंवा शब्दांत व्यक्त करताच येत नाही. ''ब्रह्म हे अमर्यादित आहे,'' असेही म्हणता

येत नाही; कारण तेही आपल्या बुद्धीला काहीतरी जाणीव देते. ब्रह्म हे कोणत्याही लौकिक शब्दांत व्यक्त करता येत नसल्याने, त्याला 'नि:शब्द' असे म्हणतात.

परंतु शब्द वापरल्याशिवाय ब्रह्माविषयी काही सांगता येणार नाही, काही कळणार नाही, आणि काही करता येणार नाही. म्हणून शब्द वापरावे लागतात. आणि शब्द आला की भेद आलाच. म्हणून म्हटले आहे :-
''सर्व ब्रह्म ते नि:शब्द । भेदाभेद चिदानंद ।।''

चित्चा गुण चंचलपण आहे. जेथे चंचलपण असते तेथे शब्द असतो. आता देहाला धरून जे चित्चे बोलणे त्याला 'बोलणे' असे म्हणावयाचे. आणि देहाला सोडून चित्चे बोलणे, त्याला ''अबोलाचे बोलणे'' म्हणावयाचे; तेच अबोलणे.

शब्दाचा ग्रास केल्याशिवाय अशब्दात जाता येत नाही. अशब्द म्हणजे ज्यातून शब्द निर्माण झाला ते. ज्याप्रमाणे व्यवहारात काट्यानेच काटा काढावयाचा असतो, त्याप्रमाणे परमार्थात शब्दानेच शब्दाचा ग्रास करावयाचा आहे. विसोबा खेचरांनी म्हटले आहे, ''म्हणे खेचर विसा झालासी पिसा । या दृश्याची आशा सांडी नाम्या ।।''. दृश्य व शब्द यांचा लय झाला की अदृश्य आणि अशब्द अशी स्थिति होते.

शब्दाचा ग्रास झाल्यावर, लगेच ''अबोलाचे बोलणे'' बोलता येत नाही. तसे करण्याकरिता जीवभावाचा लय व्हावा लागतो. म्हणून एका संतानी म्हटले आहे : ''जिता असता मारिले.'' जीवभावाचा नाश म्हणजे एका दृष्टीने मरणच आहे. हा जीवभाव लयास गेल्यानंतर, ''अबोलाचा बोल'' बोलता येतो.

कोणताही शब्द घेतला तर त्याला अर्थ असतो आणि नाद किंवा ध्वनि असतो. आणि त्या ध्वनीचा परिणाम मेंदूवर होत असतो. आपण जे जे बोलणे बोलतो, ते ते बोलणे द्वैतातले असते. ज्या बोलण्याच्या योगाने अद्वैताचा मार्ग कळतो, ते बोलणे अबोलाचे.

ब्रह्म नि:शब्द आहे खरे. परंतु ते शब्दांनी सांगितल्याशिवाय गत्यंतर नाही. तसे करण्याचे काम संतांनी केले. परंतु संतांचे बोलणे आणि आपले



बोलणे एकच नव्हे. आपल्याला कळावे म्हणून संतांनी आपले शब्द वापरले आहेत इतकेच. संतांचे बोलणे हे अद्वैत दाखविणारे असल्याने, ते अबोलणेच होय.

मन हे अत्यंत हट्टी आहे. शिक्षक व्रात्य मुलाची स्तुति करून ज्याप्रमाणे त्याचेकडून आपले काम करवून घेतो. त्याप्रमाणे मन हे वाईट असूनसुद्धा त्याला 'सज्जन' असे म्हणून समर्थ रामदासस्वामींनी त्याला निम्मे गार केले. ते म्हणतात:''मना सज्जना भक्तिपंथेचि जावे.'' त्यानंतर ते पुढे त्याला सांगतात: ''जनी निंद्य ते सर्व सोडोनी द्यावे.'' परंतु समर्थ रामदासस्वामींनी निंद्य गोष्टींची यादी काही दिली नाही. त्यांनी ती दिली असती तर त्या निंद्य गोष्टी टाकता आल्या असत्या.

आता, जे आपणास चांगले वाटते, ते दुसऱ्यास वाईट दिसते. मग निंद्य कशाला म्हणावे? या प्रश्नाचे उत्तर रामदासस्वामींनी या श्लोकातच दिले आहे. ''जनी सर्व'' ते ''निंद्य'' आहे. याचा अर्थ असा की या जगात जे जे सर्व दिसते आहे, ते ते निंद्य आहे. म्हणजेच सर्व दृश्य निंद्य आहे. हाच आशय ''म्हणे खेचर विसा झालासी पिसा । या दृश्याची आशा सांडी नाम्या।। '' या चरणात विसोबा खेचरांनी व्यक्त केला आहे. आता, दृश्य टाकणे म्हणजे ''निंद्य'' टाकणे. मग ''जनी वंद्य ते सर्व भावे करावे'' असे समर्थ म्हणतात. निंद्य टाकल्यानंतर जे उरते ते ब्रह्म वंद्य आहे.

बाह्य बोलणे एकदा थांबले की काम झाले. विहिरीचा झरा एकदा बंद केला की तो पुन: त्याच ठिकाणी येत नाही. नळाचे तोंड बंद केले की पाणी मागे परतते. मनातील विचार एकदा येतील, दोनदा येतील, परंतु ते दूर करण्याचा सारखा प्रयत्न केला, तर मन त्यांचा विचार करणे सोडून देते. अशा तऱ्हेने सर्व विचार मागे परतू शकतात. व्यवहारात वाचेच्या पलीकडे मन आहे. परंतु परमार्थात मनाच्या पलीकडे एक वाचा आहे. मनासह ही वाचा निवृत्त होणे म्हणजे मूकत्व येणे. आणि हे मूकत्व म्हणजे आत्म्याचेच बोलणे आहे. आणि हे बोलणे अद्वय मार्गावर सुरू होते. या वाटेवर आले असता, अद्वैत अथवा अद्वय आहे. आणि तेथील आनंदही निश्चळ आहे.

अद्वैताचा हा मार्ग कोणता ? मन झोपेत शिरताना ज्या मार्गाने

जाते, तो मार्ग अद्‌वयाचाच आहे. हे मन कोणत्या वाटेने जाते, ही गोष्ट अभ्यासाने कळून येते. आणि या अद्‌वय वाटेवरच आत्म्याचे बोलणे किंवा मूकत्वाचे बोलणे आहे. एका संतांनी म्हटले आहे. ''अंतरात नाद कसा घुमतसे पहा.'' हेच मुक्याचे बोलणे, किंवा नामदेवमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे ''बोलू ऐसे बोल । जेणे बोले विठ्ठल डोले ।।'', आणि हे जे मूकत्वाचे बोलणे, त्यालाच तुकाराममहाराजांनी या अभंगात ''बोल'' असे म्हटले आहे. त्याच्या पलीकडे अबोलणे आहे.

हा जो बोल आहे, तो रामकृष्ण-गतीवर आरूढ झालेल्या साधकालाच बोलता येतो. यालाच ''नामाचे कीर्तन'' म्हणतात. किंबहुना नाम हेच कीर्तन होय.

नवविधा भक्ति अशी सांगितलेली आहे :- ''श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पाद- सेवनम्।अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।''. यातील कीर्तन व्हावयाचे असल्यास, प्रथम ''श्रवण'' व्हावयास हवे. हे जे श्रवण आहे, ते ''वाचा गीत गाईजे। गाता गाता श्रवणी ऐकिजे रया ।।'' या स्वरूपाचे आहे. येथे श्रवणाचा अर्थ वेगळा आहे. येथे श्रवण म्हणजे श्रवण+मनन+निदिध्यास असे आहे. हे श्रवण होणे आवश्यक आहे. त्यानंतर मग 'नाम-स्मरण' आहे. नाम-स्मरण म्हणजे नाम सातत्याने रहाणे, नाम अखंड स्मरणात रहाणे. असे होण्यास प्रथम कीर्तन व्हावयास पाहिजे.

नाम हे कंठात उच्चारावयाचे आहे. तुकाराममहाराजांनी म्हटले आहे:- ''नाम उच्चारिता कंठी। पुढे उभा जगजेठी ।। ऐसे धरोनिया ध्यान। मने करावे चिंतन ।।''. जे नाम कंठात उच्चारले जाते, ते नाम ओठाने उच्चारले जात नाही, ते नाम कोणते? तुकाराममहाराज सांगतातः ''अहर्निशी नाम गाईन मी वाचे । बीज कल्पांतीचे तुका म्हणे ।।''. कल्पांतीचे बीज असणारे हे नाम शब्दांत व्यक्त केल्यास, त्याला ''राम'' म्हणावे ; नाहीतर ते नुसते ''अहर्निशी'' या शब्दानेच दिग्दर्शित करता येते.

आणि नाम गाऊन मिळवावयाचे काय ? व्यापारात वगैरे भांडवलात पैसा घालून ज्याप्रमाणे पैसाच मिळवावयाचा, त्याप्रमाणे नामाने नामच मिळवावयाचे आहे. आणि हे नाम ''कल्पांतीचे बीज'' आहे. पण कल्पांत कुणी पाहिला आहे ? आपण तेथपर्यंत कोठे जिवंत रहाणार आहोत ? मग



कल्पांत म्हणजे काय ? ''कल्प ते कल्पना वासना निमाली। वृत्ति पै बैसली पद्मासनी'', या चरणात म्हटल्याप्रमाणे कल्प म्हणजे कल्पना असा अर्थ आहे. कल्पनेचा अंत म्हणजे कल्पांत. कल्पनेचा अंत ज्यात होतो, ते नामच आहे. आता, हे नाम कोठे आहे ? असे सांगितले आहे : ''श्रोत्रवाणी चक्षू याचे पैल नाम''. या चरणात श्रोत्र म्हणजे नाद असा अर्थ आहे. कारण ''नाद तोची झाला कान'' असे आहे. हे नाम अव्यक्त ''अहर्निशी'' आहे. अव्यक्त अहर्निशी नामाकडे जाण्यास व्यक्त रामनामाची गरज आहे. अणि ''राम'' या शब्दाचा ज्योतिषशास्त्रात तीन असा अर्थ आहे आणि हे तीन म्हणजे इडा, पिंगला व सुषुम्ना.

या नादांचे उपनिषदांत वर्णन आहे. ''चिणिति प्रथमः चिंचिणीति द्वितीयः ,'' इत्यादि. खरे म्हणजे आपल्या शरीरात रामनामाचा ध्वनि उमटतो आहे, असे ''रामनामध्वनि उमटे। तेथे लक्ष लावी नेटे'' या चरणात सांगितले आहे. शरीरात उमटणारा रामनामाचा ध्वनि ऐकण्यास, शरीरात होणाऱ्या इतर नादांना बाजूला सारून तो लक्षपूर्वक ऐकला पाहिजे. घड्याळाची टिक्‌टिक् सतत चालू असते; परंतु ती ऐकण्यास प्रयत्न करावा लागतो. त्याप्रमाणे शरीरातील रामनामाचा ध्वनि ऐकण्यास प्रयत्न करावा लागतो.

कबीरसाहेब म्हणतात : ''राम जपो राम जपो राम जपो रे। भवजल भवजल पार करो रे।। अंबर जावे धरणी जावे जावे सुरज चंदा । जितना देखे उतना जावे पिछे न रहे कुंदा ।।'' येथे प्रथम धरणी, नंतर सूर्य - चंद्र व मग आकाश जातात असे न सांगता, प्रथमच आकाश सांगितले आहे. याचे कारण असे:- साधनाचा अभ्यास सुरू झाला की प्रथम आकाशाचा निरास होतो. या आकाशाचे स्वरूप असे सांगितले आहे : ''शब्द जो राहिला नादाते गिळोन। तेचि ते गगन देखे स्वये ।।''. आकाश म्हणजे नादरहित शब्द. नंतर ज्या धारणेवर हे आकाश असते, ती धरणी म्हणजे धृति लुप्त होते आणि त्यानंतर सूर्य व चंद्र लोप पावतात.

हे रामनाम कसे उच्चारावयाचे ? ''कहत कबीरा सुन भाई साधु रामनाम कहो गद्‌धे । रामनाम का डंका बाजे जब चाहे सो लद्‌धे ।।''. येथे गद्‌धे म्हणजे गाढवा असा अर्थ नाही. गद्‌धे म्हणजे गाढ वाचेने. रामनाम हे गाढ वाचेने उच्चारले पाहिजे. रामनामाचा डंका वाजत आहे ; परंतु ज्याची इच्छा असेल

त्यालाच तो ऐकू येईल.

रामनामाचा नुसता डंका वाजतो आहे असे नाही. तर ''झडतो नामाचा चौघडा । ब्रह्मी ब्रह्मरूपीचा हुडा ।। संत ऐकताती कोडा । प्रेमबळा स्वानंदे।।''. या चरणात नामाचा चौघडा वाजत आहे असे म्हटले आहे. नामाचा चौघडा असे का म्हटले आहे ? कारण स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चारही देहात नामाचे स्फुरण होत आहे; या चार देहात नामाचा चौघडा वाजत आहे. पृथ्वी, आप, तेज, आणि वायु ही चार देहांची तत्वे आहेत व गंध,रस, रूप आणि स्पर्श हे चार गुण आहेत. चार देहांत नामाचा ध्वनि आहे; म्हणून नामाचा चौघडा असे म्हटले आहे.

आणि रामनामाचा हा चौघडा संतांनांच ऐकू येतो. संत कोण? संतांच्या कपाळावर संत असा काही ट्रेडमार्क मारलेला नाही. तर 'करी वृत्ति जो संत तो संत जाणा' या वचनाप्रमाणे ज्याची वृत्ति संथ झाली आहे तो संत. संथ वृत्ति ही कृतीवरून कळत असते.

ज्याप्रमाणे शरीरात रामनामाचा चौघडा आहे, त्याप्रमाणे शरीरात हरिनामाची नौबत वाजत आहे. एका संतानी सांगितले आहे,'' नौबत बाजत है हरिनामकी । अतिमंद हुई गत सकल कामकी ।।''. माणसाच्या इच्छा कमी झाल्याशिवाय त्याला ही हरिनामाची नौबत ऐकू येत नाही. कारण ''जहाँ काम वहाँ राम नहि । जहाँ राम वहा काम नहि ।।'' असा प्रकार आहे. ''काम'' ही पाहिजे व ''राम'' ही पाहिजे, या दोन्ही गोष्टी एकदम साधत नाहीत.

इच्छा कमी कशा होतात? वाऱ्याने इच्छा वाढतात, वाऱ्याने इच्छा कमी होतात. जसे:- वाऱ्याने पाण्यावर लाट निर्माण होते, व ती वाऱ्यानेच नाहीशी होते; वाऱ्यानेच दिवा लागतो, त्याप्रमाणे वाऱ्यानेच दिवा जातो; त्याप्रमाणे. ''आत वारा बाहेर वारा। त्याचा निर्गुणात पसारा । त्या वाऱ्याचा शोध करा ।।'' असे नामदेवमहाराजांनी म्हटले आहे. वाऱ्याने जग निर्माण होते, वाऱ्यानेच नाश पावते. देहात वारा आहे, बाहेर वारा आहे आणि निर्गुणातही वारा आहे. देहातील वारा हा बाह्य वाऱ्यापेक्षा भिन्न आहे. देहातील वारा हा मरेपर्यंत देहातच रहातो. मेल्यावर बाह्य वारा देहात भरूनही मनुष्य जिवंत होऊ शकत नाही.



अनाहताचे बोलात येण्याकरता प्रथम तार, मंद्र व घोर यांचा अभ्यास व्हावा लागतो. त्यांचे वर्णन असे केले आहे:- ''गुरुने तार सुनाई रे । क्या कहुँ वहाँ की बढाई रे ।।१ ।। नाभिकंदका डेरा बनाया उपर दंडी चढाई। नेट बोट की खूटी गाढी सोहं तार जुडाई ।।२।। प्रेमभावसे तार बजाई जब सब संग छुडाई । अनुहत नाद उठा जब प्यारे जीव शिवनकु मिलाई ।।३।। दास कहे शिवराम प्रभुका पूरन धुंदी चढाई । आपही आप दुजा नही कोई प्रेमगगन मे लुडाई ।।''

ही तार वाजण्याकरता नाभिकंद हाच डेरा (भोपळा) होतो; पाठीच्या मणक्याची माळ हीच 'दंडी'. नेट ही खुंटी पिळली की सोहं तार जोडली जाते. या तारेचा आवाज ऐकू येण्यासाठी प्रेमाची जरुरी आहे. ईश्वराचे ठिकाणी अत्यंत प्रेम पाहिजे आणि हे होण्याकरता मन सर्व संगातून अलिप्त झाले पाहिजे आणि असे झाल्यावर अनाहताचा नाद येतो. खरे म्हणजे ''अनुहात ध्वनि आहे सकळा पिंडी।।''. परंतु प्रत्येक ठिकाणी त्याला नरदेहाची जोड मिळत नाही. या नरदेहातच ही जोड मिळते.

आणि पुढे या तारेचेच मंद्र व घोर होतात. मंद्र व घोर हे निराळे नाहीत. यालाच ''नाम उच्चारिता कंठी'' असे म्हटले आहे.

मनुष्य या साधनात आला की ''प्रेतरूप झाला शरीराचा भाव'' अशी स्थिति होते आणि मग ''कमलमुख रामभजनकू दिया, '' या चरणात म्हटल्याप्रमाणे, कमलमुखातून रामनामाचा उच्चार होऊ लागतो. हेच नामाचे कीर्तन आणि या नामकीर्तनाला उद्देशूनच ''नाम-संकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची '' असे म्हटलेले आहे.

हा अनाहत केव्हा ऐकू येतो ? चत्वार देह व चार स्थिति यांचे पलीकडे गेल्यावर अनाहत ऐकू येतो. अनाहत म्हणजे श्वासोच्छ्वास हा अणुरेणूत आहे. ''अनुहात ध्वनि आहे सकळा पिंडी। राम नाही तोंडी कैचा तरे ।।''. हा खरा अनाहत नव्हे. चत्वार देहापलीकडे खऱ्या अनाहताला प्रारंभ होतो याला बोलणे म्हणतात. केशवस्वामींनी म्हटले आहे,''बोलणे सांडी बोलणे सांडी । मौन्यावरती आसन मांडी ।। बोलणे अबोलणे सारूनि दोन्ही । बोलसी तरी बोल शब्दाते गिळोनी।।'' म्हणजेच ''बोलो अबोलणे''.

सहस्रदल- स्थानात सोहं हंस आहे. ''धरिता सो टाकिता हं। अखंड चाले सोहं सोहं ।।''. या हंसाच्या गतीच्या मदतीने प्राण हा भ्रुकुटिमध्यापर्यंत

येत असतो. या गतीत उपाधिभूत-जीवन येऊन मिसळले की अनाहत ध्वनि ऐकू येऊ लागतो. तात्यासाहेब कोटणीसमहाराजांनी म्हटले आहे,''हंसावरती राम बैसुनी चालिले हो पुढती। हंस कसा बघ उड्डाण करतो खाली आणि वरती।।''. हंस म्हणजे श्वासोच्छ्वास नव्हे. हंस हा चिदाकाशात आहे. हा हंस चार देहांच्या पलीकडे आहे.

ज्या बिंदूतून प्राणाची गति चालू असते, त्याला नासिका असे म्हणतात. हा प्राण म्हणजे प्राणापानांतील प्राण नव्हे, तर तो चिदाकाशातील प्राण आहे. ''नासिकेचा प्राण कोण मार्गी येत। नाद दुमदुमत अनुहाती'' असे ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. एका बिंदूतून जेव्हा दोन रेषा निघतात, तेव्हा तेथे ''कोण'' होतो म्हणून म्हटले आहे, ''पश्चिम दिशेसी जाता उजवा ठाकिला मेरु। अनुहात गगन गर्जे थोर ऊठिला गजरु ।।''. या गगनातील अनुहताच्या पलीकडे आणि एक अनाहत आहे. त्याला ज्ञानेश्वरमहाराजांनी प्रणवाचा अनाहत असे म्हटले आहे. त्यालाच ''दशमो मेघनादः'' असे उपनिषदांनी म्हटले आहे.

अनाहताचे पुष्कळ प्रकार आहेत. आत्ता सांगितलेले दोन. आणखी अनाहत असे:- प्रस्फुट गगनात होणारा अनाहत आहे. ज्या शून्यातून प्रस्फुट गगन निर्माण होते तेथे एक अनाहत आहे. ज्या राम-कृष्ण-गतीतून हे शून्य निर्माण होते, त्या गतीत अनाहत आहे. ही रामकृष्ण-गति ज्या शिवात्म्यातून निर्माण होते, त्या शिवात्म्याजवळही अनाहत आहे. हा शिवात्मा सहस्रदळात असतो.

वर उल्लेखिलेला अनाहत नाद कोठे चालू असतो? ''त्रिवेणीचा ओघ तेथे अंग धूतले । अनुहात झणझणाट नाद ऐकिले '', असे मुक्ताबाई सांगतात. खरे म्हणजे सर्व तीर्थे या देहातच आहेत. तेथे त्रिवेणीच्या संगमावर आल्यावर नामाचा उच्चार ऐकू येतो. त्यात साधकाचे चित्त तन्मय झाले पाहिजे.

साक्षात्कार हा काही वरचेवर होत नाही. साक्षात्काराचे मागे लागून साधक जर या नामात एकरूप न होता राहिला, तर तो तेथेच राहील. मच्छिंद्रनाथांनी म्हटले आहे, ''आडसट तिरथ है घट भीतर''. आडसट म्हणजे ६८ नव्हे. तर जे साठाला आड करून आहे, ते आडसट. ''आकाशातूनि वाट रे। न करावा बोभाट रे । सांडुनि तीनशे साठ प्राण्या । घे वरचा एकसष्ट रे ।। '' असे चिमडचे रामभाऊमहाराज सांगतात. मनुष्याच्या देहात एकंदर ७२००० नाड्या आहेत. त्यात ३६० महत्वाच्या. त्यातील एक वायुरूप जोडी महत्वाची.



त्रिगुणात्मक इडा, पिंगला, सुषुम्ना या तीन नाडींची ऐक्यता म्हणजे त्रिवेणी गंगा. त्रिगुणांच्या पलिकडे, त्रिकूट स्थानी, ही त्रिवेणी गंगा वहात आहे. ''षड्चक्रावरी त्रिकूटाभीतरी । त्रिवेणी सुंदरी गंगा वाहे'', असे तुकाराममहाराज सांगतात. ही गंगा मुंगीच्या मुखातून निघते. ''मुंगीच्या मुखी त्रिवेणी गंगा,'' असे नामदेवमहाराज म्हणतात. मुंगी म्हणजे मु न गी. मु म्हणजे मुख, न म्हणजे नाही, गी म्हणजे गीर्वाण. म्हणजे शब्दरहित नाद. ही गंगा ऊर्ध्वमुख आहे. ''ऊर्ध्ववाहिनी हरिकथा.'' या ठिकाणी साधक शुद्ध सत्त्वगुणी झालेला असतो. म्हणून तो ऊर्ध्वमुख होऊन जाऊ शकतो, कारण सत्त्व हा गुण हलका किंवा लघु म्हटला आहे आणि या शुद्ध सत्त्वाचे सामर्थ्य तुकाराममहाराजांनी असे सांगितले आहेः- ''तुका म्हणे ऐका सत्त्वाचे सामर्थ्य । करवी परमार्थ अहर्निशी ।।'' आणि हे नाम, हे बोलणे म्हणजे ''बोलू ऐसे बोल। जेणे बोले विठ्ठल डोले।।'' आणि शेवटी मुक्ताबाईंनी म्हटल्याप्रमाणे,''म्हणे मुक्ताबाई आता बोल राहिला। पहा ठायी ठायी तोचि उभा ठाकला ।।''

त्रिकूट स्थानावरील त्रिवेणी- संगम - स्थानात अनाहतनाद श्रवण केल्यानंतर, पुढे ऐकू येतो प्रस्फुटगगनातील अनाहत. प्रस्फुटगगन म्हणजे अशब्द स्थिति. हे प्रस्फुटगगन वायूच्या दोन गतीने निर्माण झालेले आहे. त्यातील एक गति उष्ण आहे आणि दुसरी गति शीत आहे; त्यांनाच उद्देशून कबीरसाहेबांनी म्हटले आहे ''आसपासमों श्वेत भरा है, श्वेतके बीचमें श्याम.'' ज्ञानेश्वरमहाराजही म्हणतात ''उष्ण शीत अभा। अरूप आकारिला नभा ।।,'' आणि यालाच उद्देशून ''वारिया पोटीं या गगन,'' असे म्हटले आहे.

आत्म्याची केवल म्हणजे निर्हेतुक दृष्टि जेथे पडते त्याला शून्य असे म्हणतात. या शून्यातून असंख्य शून्ये निर्माण होतात. त्यातील काही संतांनी सांगितली आहेत, काही सांगितली नाहीत. या शून्यातून आणि एक शून्य निर्माण होते व त्यातून आकाश उत्पन्न होते. आकाश म्हणजे नादरहित शब्दस्थिति. प्रस्फुटगगन म्हणजे अशब्द स्थिति. प्रस्फुट गगनातील अनाहत म्हणजे तेथील वायुलहरींचा नाद. शब्द व अशब्द यांचे पलीकडे आणि एक

शून्य आहे; तेथेही अनाहत आहे; आणि त्यालाच 'अबोलाचे बोलणे' म्हणतात. प्रस्फुट गगनाच्या पलीकडील शून्यात,'शून्य-महेलमें दीप बिराजे । वाजे अनुहत ढोल' अशी स्थिति आहे. आणि हा अनुहात म्हणजे अबोलाचे बोलणे. येथे दृश्य नाहीसे झाले असल्यामुळे, शुद्ध मनाला परमेश्वराशिवाय संकल्प करण्यास दुसरा विषय असत नाही. म्हणून चित्त हे फक्त आत्म्याचेच चिंतन करीत रहाते; तेथे आपणास चिंतन करावे लागत नाही; तर आपोआपच चिंतन होऊ लागते आणि हीच भूमिका बुद्धीच्या ठिकाणी कायम रहाते.

याच्या पलीकडे रामकृष्ण-वाचा आहे. रामकृष्णवाचेमुळे आपण जगतो. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात ''रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा.'' ही वाचा संपली की नाकाला सूत लागते. या वाचेचा निरास होणे म्हणजे ''मरोनिया जीवे'' असा अर्थ आहे.

शून्याचे पलीकडे मन,चित्त, बुद्धि यांच्या पलीकडे साधक गेला म्हणजे त्याच्या जीवाभावाचा लय होतो; जीव शिवात्म्यात लीन होतो; त्याचे स्वत:चे असे अस्तित्व रहात नाही.याचा अर्थ त्याचा अहंकार नाहीसा होतो. अहंकार गेला की माणूस मेल्याप्रमाणे आहे. परंतु परमेश्वराच्या सत्तेने साधकाचे उपाधिभूतजीवन आपले कार्य करीत रहाते. मेंदू विश्रांती घेत असता, ज्याप्रमाणे पृष्ठवंशरज्जु झोपेत कार्य करीत असतो, त्याप्रमाणे. याचाच अर्थ ''जीता असता मारिले । मेलियासी जिते केले ।।''. जोपर्यंत चैतन्याची ओळख नसते तोपर्यंत मनुष्य मेल्यासारखाच असतो. परंतु जेव्हा त्याला चैतन्याची ओळख होते, तेव्हा तो खरा जिवंत होतो. एक वाघाचे पिलू होते. ते लहानपणापासून मेंढरात वाढले. त्यामुळे ते मेंढराप्रमाणे वागत होते. आपण वाघ आहोत ही जाणीव त्याला नव्हती, तोपर्यंत ते मेल्यासारखे होते. पुढे एका वाघाने त्याला त्या दोघांचे प्रतिबिंब पाण्यात दाखवून, तो वाघच आहे, अशी त्याची खात्री पटवून दिली. तेव्हा त्याला कळले की आपण मेंढरु नसून वाघ आहोत. तो खरा जिवंत झाला. तीच तऱ्हा माणसाच्या बाबतीत.

एकदा जीव शिवात्म्याशी एकरूप झाला की शरीरात आधारस्थानापासून ते सहस्रदलापर्यंत तो गतिमान् रहातो. ''सोहं सोहं चौदा चक्रे दावी अनुहात'', असे गहिनीनाथ सांगतात. ही चौदा चक्रे म्हणजे वायूच्या चौदा गोलाकार गति आहेत. आणि ही स्थिति प्राप्त होणे म्हणजेच



मोक्ष. ''जाणीव नेणीव भगवंती नाही । उच्चारणी पाही मोक्ष सदा'', असे ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. भगवंताच्या नामोच्चारात जाणीव-नेणीव लयाला जाणे म्हणजे मोक्ष. अशा स्थितीत परमात्म्याचे नाद होतच असतात; त्यालाच जीवभाव मरून उरलेले 'अबोलणे' म्हणावयाचे.

रामकृष्णगति ही गंगासागर-न्यायाने एकदा शिवात्म्यात मिसळू लागली की ती कायम मिसळत रहाते. हा मिलाफ अनुस्यूत रहातो. येथे जीवभावाचा-अहंकाराचा-लय झालेला असतो. ही शिवात्म्यात मिसळण्याची क्रिया चालू असताना, जो नाद उत्पन्न होतो, त्यालाच ''अबोलाचे बोलणे'' म्हणतात. एकदा जीवभाव लयाला गेला की साधक निश्चळ होतो. अशा तऱ्हेची निश्चळ वृत्ति साध्य झाली की मग परमार्थातील निश्चळता साध्य होते.

जीवभावगति ही शिवात्म्यात अनुस्यूतरीत्या मिसळत रहाणे म्हणजेच 'अबोलाचे बोलणे.' यालाच नामदेवमहाराजांनी 'सहस्रदळीचा अनाहत' असे म्हटले आहे. आणि हे अनुसंधान अखंड असते. हे अनुसंधान एकदम येत नाही. प्रथम अनुकंपन, मग अनुवृत्ती, नंतर छंद, शेवटी अनुसंधान. प्रत्येक माणसाचे ठिकाणी श्वासाचे अनुकंपन चालू आहे. तेथे दृष्टि लागली की अनुकंपन. त्यात वृत्ति तदाकार झाली की अनुवृत्ति. ''जैसी गंगा वाहे तैसे ज्याचे मन,'' अशी तऱ्हा झाली की अनुवृत्ति साधते. मनात इतर विचार येता कामा नयेत; षड् विकार दूर झालेले असले पाहिजेत; अशी तऱ्हा झाली म्हणजे त्याचाच छंद लागतो. छंद म्हणजे त्याशिवाय काही न सुचणे. ''असा धरी छंद, जाय तुटोनिया भवबंध,'' या चरणात 'असा' याचा अर्थ - अ म्हणजे नाही सा म्हणजे सहा. असा छंद म्हणजे ज्यात सहा नाहीत असा छंद. असा छंद लागला म्हणजे कोणतीही गोष्ट साध्य होते. आणि मग परमात्म्याचे अखंड अनुसंधान लागते. हे अखंड अनुसंधान म्हणजेच ''अबोलाचे बोलणे'' होय.

हे अनुसंधान लागण्यास काय केले पाहिजे? ''ज्ञानदेव मुक्ताईशी त्रिधा उपदेशी। ओहं कोहं सोहं साक्षी केले.'' म्हणजे ओहं-कोहं-सोहंचा अभ्यास व्हावयास हवा. सोहंमधूनच कोहं निर्माण झाला आहे; सोहंची विस्मृति म्हणजेच कोहं. सोहं ही गति आहे; कोहं ही सुद्धा गतिच आहे.

आपण म्हणतो ''गर्भी असता म्हणे सोहं । बाहेर येता म्हणे कोहं ;'' पण तसे नाही. कारण कोहं म्हणणारा लगेच सोहं मध्ये जात असतो, इतके ते दोन्ही जवळ आहेत. प्रथम ओहं म्हणजे ॐ कार; त्याचा अभ्यास व्हावयास पाहिजे. ॐ कार हा आकाशात निर्माण झाला आहे; म्हणून ''आकाशातूनि वाट रे'' असे म्हटले आहे. आकाशस्थानातूनच साधनाला सुरवात होते. ॐ म्हणजे अ उ म. अ हा प्राण आहे; या अ मधून उ म्हणजे गति निर्माण होते; या गतितूनच म म्हणजे नाद उत्पन्न होतो. अशा तऱ्हेने साधन करताना साधक जेव्हा कोहं म्हणतो तेव्हा त्याला लगेच कळते की, आपण स्वत:च सोहं आहोत.

आणि या अभ्यासानंतर जेव्हा जीव हा शिवात्म्यात अनुस्यूतपणे मिसळत रहातो, अखंड अनुसंधानात रहातो, तेव्हा तेथे नि:शब्दाचे जे नाद आहेत, त्यांनाच ''अबोलाचे बोलणे'' म्हणतात. तेव्हा सहस्रदळातील अनाहत म्हणजे अबोलाचे बोलणे. नामदेवमहाराज म्हणतात ''सहस्रदळी अनाहत ध्वनि उठी । श्रवण करिता पातके पळाली कपाटी.'' येथे अशी शंका येईल :- 'सहस्रदळापर्यंत साधक आल्यानंतर पापे कुठली ?' त्याचे उत्तर असे आहे :- सर्व पापांचे मूळ माया आहे. या मायेचे धागेदोरे सूक्ष्मरूपाने ब्रह्मरंध्रापर्यंत पसरलेले आहेत. ब्रह्मरंध्रापर्यंत गेलेल्या साधकालासुद्धा माया मागे खेचू शकते. कारण ''दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया'' अशी स्थिति आहे. परंतु सहस्रदळी नामोच्चार होऊ लागला म्हणजे मात्र साधक मायेतून सुटतो. तेथे नाम व रूप एकच आहेत.

हे ''अबोलाचे बोलणे'' संतांना साधते. अशा तऱ्हेचे संत संसारात असलेले दिसतात परंतु ते इंटरेस्ट घेऊन संसार करीत नाहीत. झोपी गेलेला व समाधि लावलेला हे दोघेही सारखेच दिसतात; पण त्यात फरक आहे. कधी संतांचा संसार सुलट दिसतो कधी तो उलट वाटतो. आपणही संसार करतो; संतही संसार करतात. परंतु संसारातील संतांची प्रत्येक क्रिया ही इंटरेस्ट न घेताच चाललेली असते. म्हणून तुकाराममहाराजांनी पहिल्या अभंगात म्हटले आहे ''असोनि नसणे जगी आम्हा''. संत संसारात असूनसुद्धा नसल्याप्रमाणेच असतात. पूर्वीच्या काळी स्त्रिया डोकीवर घागर घेऊन पाणी आणत. त्यांचे हात हलत असतात; त्या परस्परांत गप्पा मारतात; परंतु त्यांचे



सर्व लक्ष मात्र डोकीवरील घागरीकडे असते. त्याप्रमाणे संत संसारात असले तरी त्यांचे सर्व लक्ष चैतन्याच्या खेळाकडे असते. म्हणून तुकाराममहाराज सांगतात ''असोनि नसणे जगी आम्हा.'' त्यामुळे ''भोगी झाला त्याग संगीच असंग । तोडियेले लागमाग दोन्ही'', अशी स्थिति होते. भोग भोगून त्याग होतो असे नाही तर आत्मस्वरूपाचा एकदा भोग माणसाने घेतला की आपोआपच त्याचे ठिकाणी त्याग निर्माण होतो; त्याला मुद्दाम त्याग करावा लागत नाही. आपल्या बाबतीत मात्र त्याग होत नाही. कारण मन व इंद्रिये यांचा संयम जास्तीत जास्त किती काळ करता येईल? मनातल्या इच्छा कितीही दाबल्या तरी केव्हातरी वर उसळून येणारच. या उलट आत्म्याचा भोग झाला की आपोआप त्याग होतो; तेथे मुद्दाम त्याग करावा लागत नाही. एकादे दृश्य पहावयास नको म्हणून डोळे मिटून घेणे व दृश्य पहाताना सुद्धा ते दृष्टीत न शिरणे यात जसा फरक आहे तसा त्याग होणे व त्याग करणे यात फरक आहे.

तसेच ज्याला आत्म्याचा संग घडतो, तो आपोआपच असंग होतो. म्हणून तुकाराममहाराज सांगतात :- ''भोगी झाला त्याग संगीच असंग। तोडियेले लागमाग दोन्ही ।।''

शेवटच्या कडव्यात तुकाराममहाराज म्हणतात ''तुका म्हणे नोहे दिसतो मी तैसा । पुसाल तरी पुसा पांडुरंगा ।।''. याचा अर्थ असा :- संत हे वरवर दिसतात तसे नसतात. ते संसारात असले तरी अलिप्त असतात. आणि त्यांचे सर्व अनुसंधान परमेश्वराकडेच असते.

प्रकरण २३

# श्रीदादांचे महानिर्वाण

(इ.स.२००१)

श्रीदादांचा जन्म सातव्या महिन्यात झाला होता. त्यांची प्रकृति प्रथमपासूनच अशक्त होती. त्यांनी मध्ये काही काळ थोडा व्यायाम करून प्रकृति बळकट करण्याचा प्रयत्न श्रीगंगाधरपंत सिंग यांच्या नादाने केला. पण पुढे तो संपूर्णपणे सोडून दिला. त्यामुळे त्यांची प्रकृति सुदृढ होण्यास मार्गच राहिला नाही. वयाला २० वर्षे लागेपर्यंत त्यांना वरचेवर फ्लूचा ताप येई. तसेच त्यांना खोकल्याची उबळ लागून जीव घाबराघुबरा होत असे. पुढे त्याना रक्तदाबाचा त्रास होऊ लागला. त्यातच मूळव्याधही अंगात शिरली. हे सर्व कमी होते म्हणूनच की काय त्यांना मधुमेहाची व्याधि जडली. मधुमेह आटोक्यात ठेवण्यास श्रीदादा कडक पथ्य पाळीत. त्यामुळे त्यांच्या अशक्तपणात भरच पडत होती. अशातच श्रीदादांचे दात किडल्यामुळे ते सर्वच काढून टाकावे लागले. श्रीदादांनी कवळी वापरलीच नाही. त्यामुळे चावून जेवण करता येत नसे. त्यामुळे पोटात गॅस धरण्याचा त्रास सुरू झाला. पोटही वाढत गेले. तशातच एकदा डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी आणि दोनदा अस्थिभंगाच्या उपचारासाठी त्यांना हॉस्पिटलमध्ये रहावे लागले. हॉस्पिटलात रहाणे त्यांना पसंत नव्हते, परंतु नाईलाजाने त्यांना तेही करावे लागले. या सर्वच कारणांनी इ.स.१९९७ -१९९८ पासून श्रीदादांची तब्येत फारच खालावत चालली होती.त्यामुळे ते इकडे तिकडे काही न करता नुसते पलंगावर पडून रहाणे पसंत करू लागले. पलंगावरसुध्दा तक्क्याला टेकून बसणे हेही त्यांनी बंद केले. त्यांना आधार देऊन पलंगावरच उठवून बसते करावे लागे. भोजनासाठी व नैसर्गीक विधीसाठी तसेच कीर्तनासाठी त्यांना दोन्ही हातांना व पाठीला धरून न्यावे लागत होते. या काळातच त्यांनी व्यावहारिक बोलणे अगदी कमी केले. इतकेच नव्हे तर नित्याच्या कीर्तनातही ते फारच कमी बोलत.

इ.स.२००० पासून तर श्रीदादांच्या अंगात आणखी अशक्तपणा आला होता. नानाप्रकारची औषधे डॉ. परांजपे यासारख्या डॉक्टरांनी लिहून



दिली होती. ती त्यांना वेळच्या वेळी दिली जात. तथापि त्या औषधांचा फारसा परिणाम दिसून येत नव्हता. इ.स.२००१ च्या श्रावण महिन्यापासून तर राममंदिरात त्यांच्या कीर्तनासाठीच्या खुर्चीपर्यंत श्रीदादांना नेणे हेही फार अवघड होऊ लागले होते. त्यामुळे श्रीदादांचे चिरंजीव श्रीचंद्रशेखरअण्णा यांनी असे केले :- पडवीतील श्रीदादांच्या खोलीशेजारी बाहेरच्या भागात श्रीदादांची कीर्तनाची खुर्ची मांडली. खुर्चीसमोर संप्रदायातील संतांचे फोटो लावले. पंख्याची सोय केली.

श्रावण शुद्ध ४, मंगळवार दि. २४-७-२००१ रोजी श्रीदादांचे कीर्तन झाले. श्रावण महिन्यात ज्ञानेश्वरमहाराजांच्या हरिपाठावर श्रीदादा कीर्तन करीत. या मंगळवारी तर श्रीदादा कीर्तनाचे वेळी थोडे उत्साही वाटले. त्यामुळे लगेच दुसरे दिवशी काही विपरीत घडेल असे कुणालाच वाटले नाही. मंगळवारचे कीर्तन संपल्यावर श्रीदादांना पित्ताचा त्रास होऊ लागला. त्यामुळे रात्रभर त्यांना नीटशी झोप लागली नाही. बुधवार दि. २५-७-२००१ उजाडला. या दिवशी सकाळी श्रीदादांचे प्रातर्विधि उरकले, आणि रात्री जागरण झाले असल्याने ते सकाळी ८ च्या सुमारास झोपले ते दुपारी ३ पर्यंत ते झोपूनच राहिले. तीन वाजता त्यांना थोडे भाताचे आटवल देण्यात आले. नंतर ''आता कीर्तनाच्या वेळेपर्यंत मी पडतो'' असे म्हणून श्रीदादा पुनः झोपले.

सकाळी शरद आपटे श्रीदादांच्या जवळ होते. सकाळी ८ वाजता अरविंद पीतांबरे आले. त्यांना आपटे यांनी सांगितले की श्रीदादांनी पाणी मागितले तर त्यांना पाणी द्या. एक दोनदा श्रीदादांनी पाणी मागितले ते पीतांबरे यांनी दिले. दुपारी ४.४५ चे सुमारास पुनः पीतांबरे श्रीदादांचे जवळ बसण्यास आले.

बुधवार दि. २५-७-२००१ रोजी नागपंचमी होती. आाणि संध्याकाळी षष्ठी लागत होती. आजचा दिवस श्रीदादांनी आपल्या निर्वाणासाठी निवडला आहे, ही कल्पना कुणालाच आली नव्हती. या दिवशी ४.३० चे सुमारास चंद्रशेखरअण्णांचे प्रवचन सांगलीवाडीत ठरलेले होते. ते श्रीदादांना म्हणाले,''दादा, मी प्रवचन करून ६ वाजेपर्यंत परत येतो. मी

आल्यावर तुमचे कीर्तन सुरू करू या.'' तेव्हा श्रीदादा म्हणाले, ''चंदा, तू प्रवचन करून ये, मग कीर्तन करू या.'' त्याप्रमाणे चंद्रशेखर व शरद आपटे प्रवचनास निघून गेले. ते संध्याकाळी ६ ला परत आले. श्रीदादांचे कीर्तन संध्याकाळी ६।। वाजता सुरू होत असे. सहा वाजल्यापासूनच कीर्तनाला जाण्याची श्रीदादांची चुळबुळ सुरू झाली.

चंद्रशेखरअण्णा प्रवचनाहून परत आल्यावर रामपाठाचे पठण सुरू झाले. खोलीत श्रीदादा, पीतांबरे, शरद आपटे, अनिलप्रभु होते. रामपाठ झाल्यावर ६.२० च्या सुमारास चंद्रशेखरअण्णा खोलीत आले व श्रीदादांना म्हणाले, ''दादा, आता कीर्तनाला जायचे ना ? थोडे दूध घ्या मग आपण जाऊ''. श्रीदादा नुसते हं हं म्हणाले. शरद आपटे यांनी अर्धा कप दूध श्रीदादांना पाजले. पडवीत श्रीदादांची खुर्ची मांडली होती. कीर्तनापूर्वी श्रीदादांच्या अंगात शर्ट घालण्यास सुरवात केली. पण श्रीदादांचा एकच हात शर्टात गेला परंतू दुसरा हात काही केल्या जाईना. तेव्हा चंद्रशेखरअण्णा बोलले ''आज शर्ट नकोच. श्रीदादांच्या अंगावर शाल पांघरून त्यांना कीर्तनासाठी नेऊ या.'' तसे मंडळी करू लागली. पण श्रीदादांना चालवेना. तेव्हा खोलीतील एक प्लास्टिकची खुर्ची त्यांच्या मागे ठेवून तीवर त्यांना कसेबसे बसविण्यात आले. श्रीदादांना खुर्चीवर बसविताच त्यांची मान एका बाजूला झुकली ती सरळ होईना. ते पाहून सर्वजण घाबरले व श्रीदादांना पुन: कॉटवरच झोपविण्यात आले. मग चंद्रशेखरअण्णा श्रीदादांना म्हणाले, ''दादा, मी आज पडवीत बसून तुमचे कीर्तन वाचून दाखवितो.''श्रीदादांनी मानेनेच होकार दिला. पण ही सूचना त्यांना कितपत पसंत पडली होती कोण जाणे !

दरम्यानच्या काळात डॉ. परांजपे यांना बोलावण्यात आले होते. त्यांनी श्रीदादांना तपासले व औषध पाठवून देतो असे सांगितले व ते निघून गेले. त्यांचे औषध आणून ते श्रीदादांना देण्यात आले. या वेळी श्रीदादा मात्र सतत पृच्छा करीत होते. ''कीर्तनाची वेळ झाली की नाही ? कीर्तनास केव्हा जावयाचे?''त्यावर अनिलप्रभु हे श्रीदादांचे कनिष्ठ चिरंजीव त्यांना म्हणाले ''दादा, बाहेर अण्णा तुमचेच कीर्तन वाचून दाखवीत आहे. तुम्हास ऐकू येते ना ?'' तेव्हा श्रीदादा ''हो'' म्हणाले.

बाहेर पडवीत चंद्रशेखरअण्णांनी कीर्तन वाचून संपविले.



संध्याकाळी कीर्तनानंतर आरती झाली. आरतीवरून श्रीदादांनी हात फिरविला. नंतर इतर कुणाचीही मदत न घेता श्रीदादांनी उठण्यासाठी मान उचलली. तेव्हा अनिलप्रभूंनी त्यांच्या मानेला आधार दिला, व विचारले, ''दादा, तुम्हाला उलटी होते आहे काय?'' त्यावर काहीच उत्तर न देता श्रीदादा स्वस्थ पडून राहिले. आणि हळुहळु त्यांचा श्वासोच्छ्वास कमी कमी होऊ लागला. तेव्हा अनिलप्रभूंनी चंद्रशेखरअण्णांना खोलीत बोलावले आणि डॉ. परांजपेना बोलावण्यात आले. डॉक्टर लगेच आले. त्यांनी श्रीदादांना तपासले. त्याच वेळी अनिलप्रभु हे डॉ. परांजपे व डॉ. विवेक वैद्य यांना घेऊन आले. त्यांनी श्रीदादांची तपासणी केली. आणि श्रीदादांचा श्वासोच्छ्वास बंद झालेला त्यांना आढळला. अनिलप्रभु त्यांना म्हणाले, ''दादांना दवाखान्यात नेऊ या का?'' त्यावर डॉ.वैद्य म्हणाले,''आता काही उपयोग नाही. त्यांचा श्वास बंद झाला आहे. ते आता आपल्यात नाहीत.'' याप्रमाणे संध्याकाळी ७-४० चे सुमारास श्रीदादांची जीवनज्योति अत्यंत शांतपणाने परमात्मज्योतीत मिसळून गेली. ज्ञानेश्वरीतील 'कि झाकिलिया घटीचा दिवा। काय झाला न कळे केव्हा । तयापरी जो पांडवा। देह ठेवी ।।'', या वचनाप्रमाणे श्रीदादा शांतपणे ब्रह्मरूप झाले होते. श्रीदादांचे निर्वाण झाले हे कळताच घरात सर्वत्र शोकाचे सावट पसरले. काहीजण तर ढसढसून रडू लागले.

श्रीदादांच्या निर्वाणाची वार्ता गावात भराभर पसरत चालली. आणि श्रीदादांचे अंतिम दर्शन घेण्यासाठी स्त्रीपुरुषांचे लोंढेच्या लोंढे येऊ लागले. प्रारंभी श्रीदादांचा अचेतन देह खोलीतील पलंगावर होता. ती खोली लहान असल्याने, तेथेच त्यांचे दर्शन घेणे हे लोकांच्या गर्दीमुळे अवघड होऊ लागले. तेव्हा भाविक जनांना श्रीदादांचे दर्शन घेणे सोईचे व्हावे म्हणून श्रीदादांचा देह उचलून दुसऱ्या एका पलंगावर ठेवण्यात आला. श्रीदादांचा चेहरा नीट दिसावा म्हणून श्रीदादांच्या मस्तकाखाली उशा ठेवण्यात आल्या, आणि मग हा दुसरा पलंग उचलून राममंदिरात नेण्यात आला. तेथे श्रीतात्यासाहेबमहाराजांचे फोटोखाली श्रीदादांचे मस्तक येईल अशा बेताने हा पलंग ठेवण्यात आला. यावेळी श्रीदादांची नेहमीची काळी टोपी श्रीदादांचे मस्तकावर ठेवावी असे श्री. के. वा. आपटे यांनी सुचविले. तसे करण्यात

आले. काही वेळा नंतर श्रीचंद्रशेखरअण्णा तेथे आले तेव्हा त्यांनी श्रीभाऊसाहेबमहाराजांच्यासारखी जी चॉकलेटी रंगाची कानटोपी श्रीदादा आपल्या मस्तकावर घालीत, ती श्रीदादांच्या मस्तकावर घालावी असे सुचविले. त्याप्रमाणे ती कानटोपी घालण्यात आली. श्रीदादांच्या कपाळावर उभा तांबडा नाम लावण्यास श्री. के. वा. आपटे यांनी सुचविले व त्याप्रमाणे श्रीदादांचा नातू चि. सुनील याने श्रीदादांना तांबडा नाम लावला व अंगाला अत्तर लावले.

रात्रीचे आठ वाजल्यापासून लहान मुले, तरुण, प्रौढ आणि वृद्ध असे स्त्री पुरुष यांची श्रीदादांच्या दर्शनासाठी गर्दी वाढू लागली. श्रीदादांचे दर्शन घेऊन, त्यांचे पायांवर मस्तक ठेवताना अनेकजण ढळढळा अश्रु गाळीत होते. काहीजण श्रीदादांना पुष्पहार अर्पण करून आपली श्रद्धांजलि वहात होते. समाजाच्या सर्व स्तरातील मंडळी श्रीदादांच्या दर्शनास येत होती. श्रीदादांचे दर्शन घेऊन झाल्यावर काही लोक अंगणातच बसून राहिले. याच सुमारास वर्तमानपत्रांचे एक दोन वार्ताहर तेथे आले. त्यांनी श्रीदादांची सर्व हकिकत विचारून घेतली.

श्रीदादांच्या निर्याणाची वार्ता काही लोकांना फोनवरून कळविण्यात आली. श्रीदादांचे द्वितीय चिरंजीव सूर्यकांत हे इचलकरंजीत रहात होते. ते लौकरच आपल्या पत्नीसह आले. श्रीदादांचे जवळ जाताच त्या दोघांनाही रडू कोसळले. ते दोघेही काही काळ श्रीदादांचे जवळच बसून राहिले.

श्रीदादांचे तृतीय चिरंजीव श्री.अनल हे या वेळी नोकरीच्या निमित्ताने पुणे येथे होते. त्यांनाही फोन करण्यात आला. ते सांगलीत येईपर्यंत दुसरे दिवशीचे सकाळचे ५-६ वाजणार होते. त्यांना श्रीदादांचे अंतिम दर्शन व्हावे म्हणून श्रीदादांची अंत्य यात्रा दुसरे दिवशी-गुरूवारी-सकाळी ९ चे सुमारास काढण्याचे चंद्रशेखरअण्णांनी ठरविले.

रात्री ८ ते ११ या काळात जवळजवळ ५-६ हजार माणसे श्रीदादांचे अंत्य दर्शन घेऊन गेली. रात्री अकरानंतर दर्शन थांबविण्यात आले. या वेळी घरातील अंगणात जी मंडळी बसली होती, ती 'श्रीराम जयराम



जयजयराम' या मंत्राचा घोष करीत होती. त्याच वेळी आत राममंदिरात संपूर्ण भगवद्गीता श्री. गजानन केळकर व श्री. डी. व्ही. जोशी यांनी म्हटली. तर श्रीदादांची आवडती गुरुलिंगगीताही संपूर्णपणे श्री. सुनील केळकर व प्रसन्न गोखले यांनी पठण केली.

श्रावण शुद्ध षष्ठीची रात्र संपली. गुरुवार दि. २६-७-२००१ हा दिवस उजाडला. सकाळ होताच श्रीदादांचे दर्शन घेण्यास लोकांची झुंबड उडाली. गुरुवार दि. २६-७-२००१ च्या दैनिक सकाळ, तरुण भारत, पुढारी, केसरी, लोकमत, सनातन प्रभात, या दैनिकांत श्रीदादांच्या निर्वाणाची हकिकत ठळकपणे पण कमीजास्त तपशीलात आली होती. शुक्रवार दि.२७-७-२००१ रोजी सुद्धा दैनिक पुढारी व सकाळ या वर्तमानपत्रात पुन: एकदा श्रीदादांच्या वैकुंठगमनाची वार्ता आली होती. तसेच दि.२७-७-२००१ रोजीच दैनिक नवसंदेश व महाराष्ट्र टाइम्स यात श्रीदादांच्या निर्वाणाची वार्ता आली होती. नंतर विजयंत साप्ताहिक व संचार सोलापूर या वर्तमानपत्रांतही श्रीदादांच्या निर्याणाची बातमी आली होती.

गुरुवार दि. २६-७-२००१ या दिवशी सकाळपासूनच श्रीदादांच्या घरच्या अंगणात भजनी मंडळाचे तीन ताफे उपस्थित झाले होते. त्यातील एक ताफा स्त्रियांचा होता. या तीनही ताफ्यांनी अंगणात भजन सुरू केले.

चंद्रशेखरअण्णांच्या सूचनेप्रमाणे श्रीदादांच्या अंत्ययात्रेचा मार्ग पुढीलप्रमाणे ठरला:- श्रीदादांची पालखी उत्तरेकडील दरवाजाने बाहेर पडून, संत मामामहाराज केळकर विद्या मंदिरावरून, सिटी हायस्कूलच्या पुढच्या रस्त्यावरून पूर्वेकडे जाऊन, संत कोटणीस पथावरून, कोटणीसमहाराजांच्या कैवल्यधामापुढे येईल. मग तेथून उजवीकडे वळून संत सेनामंदिर पथावरून पश्चिमेकडे जाईल; मग कृष्णानदीच्या काठावरील कोटणीसमहाराजांच्या समाधि मंदिरापुढे येईल. मग तेथून अंत्य यात्रा अमरधाम स्मशानभूमीत प्रवेश करील.

श्रीराममंदिरात 'सुखसहिता दु:खरहिता' ही नेहमीची आरती व श्रीदादांच्यावरील दोन आरत्या या श्री. चंद्रशेखरअण्णांनी श्रीदादांचे समोर म्हटल्या. यानंतर श्रीदादांचा देह घरच्या अंगणात ठेवण्यात आला. तेथे एकच

गर्दी होती. गर्दीतून येऊन श्रीदादासाहेब रोटीथोर यांनी श्रीदादांना पुष्पहार घातला व नंतर ह.भ.प. आकाराम बापू पाटील यांनी श्रीदादांची आरती केली.

त्यांनतर श्रीदादांची अंत्ययात्रा निघाली. अंत्ययात्रेत श्रीदादांचा एक मोठा फोटो एका ट्रकमध्ये दर्शनी भागी ठेवण्यात आला होता. हा ट्रक अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालत होता. त्या ट्रकचे मागे सांगलीतील भजनीमंडळांचे तीन ताफे भजन करीत होते. त्यांचे मागे पूर्वप्रथेप्रमाणे आवश्यक अग्नि बरोबर घेऊन श्री. चंद्रशेखरअण्णा अनवाणी चालत होते. त्यांचे बरोबर श्रीदादांचेवर प्रेम करणारी आणि निष्ठा असणारी अनेक माणसे होती. अनेक जण 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र तर इतर काही 'सद्‌गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।' हे भजन उच्चारीत होते. या मंडळींचे मागे ट्रॅक्टरच्या एका ट्रॉलीमध्ये, सर्वांना दर्शन होईल अशा पद्धतीने श्रीदादांचा पुष्पहार-समर्पित देह ठेवण्यात आला होता. या ट्रॉलीमध्ये श्रीदादांचे चिरंजीव व अन्य काही भक्त मंडळी होती. अशाप्रकारे श्रीदादांची ही अंतिम यात्रा अत्यंत संथपणे पुढे जात होती.

श्रीदादांच्या या अंत्य यात्रेत सांगलीतील तसेच परगावातील अनेक भक्तजन, संतमहात्मे, माजी व आजी खासदार, आमदार, नगरसेवक, तसेच आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील, व श्रीदादांचेवर प्रेम आणि निष्ठा असणारी अनेक अनेक भक्तमंडळी हजारोंच्या संख्येने उपस्थित होती. सर्वांची नावे तरी कशी घेता येतील !

संथपणे अंत्ययात्रा प्रथम केळकर विद्यामंदिराजवळ (हे शाळा नं. २ चे नूतन नामकरण आहे.) आली. तेथे उजवीकडे वळून सिटी हायस्कूल पुढे आली. वाटेवरील घरांच्या दारादारातून उभी असणारी माणसे श्रीदादांना नमस्कार करीत होती, फुले उधळीत होती तर काही जण पुढे येऊन श्रीदादांना पुष्पहार अर्पण करीत होते. ''दासराममहाराज की जय'' असा जयघोष सुरू होता.

हळुहळु ही अंत्ययात्रा श्रीतात्यासाहेबमहाराजांच्या ''कैवल्यधामा'' समोर आली. या ठिकाणी श्रीगुरुनाथमहाराज कोटणीस, डॉ. माधवराव कोटणीस व श्रीमती उषाताई कुलकर्णी, गोमेवाडीकर, यांनी श्रीदादांना पुष्पहार



अर्पण केला आणि नंतर ''सुखसहिता दुःखरहिता'' ही आरती म्हटली.

पुढे ही अंत्ययात्रा उजवीकडे वळून श्रीसेनामंदिर रोडवर आली. या रस्त्यावर श्रीदादांच्या घराची मागची बाजू येते. तेथील दरवाज्याजवळ अंत्ययात्रा आल्यावर, कापूर लावून श्रीदादांची आरती करण्यात आली. यावेळी जवळच्या एका घरातून एक सुवासिनी स्त्री पुढे आली. तिने श्रीदादांच्या पालखीपुढे पाण्याची कळशी ओतली व पूजा केली.

सेना मंदिर रोडवरुन अंत्ययात्रा कृष्णानदीच्या दिशेने पुढे निघाली, आणि श्रीदादांचे सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज यांच्या समाधिमंदिरापुढे स्थिर झाली. या ठिकाणी श्रीमान् सारडा यांनी हातात आरती घेऊन, ''सुखसहिता दुःखरहिता'' ही आरती म्हटली. ह. भ. प. श्री. अण्णासाहेब घाणेकर यांनी श्रीदादांना पुष्पहार अर्पण केला. हनुमानसमाधिमंदिराचे लगेच पुढे श्रीपंतमहाराजांचे मंदिर आहे. तेथे गु. भ. प श्रीगोविंदमहाराज कुलकर्णी यांनी श्रीदादांची आरती केली. आणि मग ही अंत्ययात्रा दहनस्थानाकडे गेली. सकाळी ९ ते १० ।। पर्यंत ही अंत्ययात्रा चालू होती.

अमरधामाच्या स्मशानभूमीतही तुफान गर्दी उसळली होती. हजारोंचा लोकसमूह तेथे उपस्थित होता. या लोकांमध्ये अनेक स्त्रियांनीही आपली हजेरी लावली होती. अमरधामाच्या आवारातही ''श्रीराम जय राम जय जय राम'' हा मंत्र घोष, आणि 'सद्‌गुरुनाथ माझे आई' हे भजन चालूच होते. स्त्रियाही मोठ्या प्रमाणात नामघोष व भजन करीत होत्या.

श्रीदादांचे चारही चिरंजीव स्मशानात उपस्थित होते. त्यांच्या बरोबर मा. मधुकर शिपुरकर हेही वावरत होते. स्मशानभूमीत गुरुजींचे मंत्र वगैरे और्ध्वदेहिक कर्मे झाली. श्रीदादांचे ज्येष्ठ पुत्र चंद्रशेखरअण्णा यांनी चितेला मंत्राग्नि दिला. चितेवर साध्या लाकडांचे जोडीने चंदनी लाकूड पुष्कळ होते. चिता प्रज्वलित झाल्यावर तिच्यावर साजूक तूप आणि अफाट कापूर ओतण्यात आला. चिता पेटली असताना चितेजवळ गोविंदमहाराज कुलकर्णी यांचे एकतारी भजन चालू होते. भजनात 'उजळणी करू या हरिनामाची,' 'माझी प्रार्थना ऐका प्रभुजी,' आणि 'शेवटची विनवणी ' हीही पदे म्हटली गेली.

इकडे चिता धगधगत असताना, दुसरीकडे श्रीदादांचा गुणगौरव करणारी भाषणे स्मशानात सुरू झाली. श्रीगुरुनाथ कोटणीसमहाराज, खासदार प्रकाशबापू पाटील, बापूसाहेब पुजारी, नगराध्यक्ष सुरेश पाटील, माजी आमदार संभाजीराव पवार, अजित अडवाणी, संजय पाटील, मा. मधुकर शिपुरकर, श्रीझेंडेमहाराज इत्यादींची श्रीदादांचे गुणगान करणारी भाषणे झाली.

गेली ऐंशी वर्षे श्रीदादांना त्यांच्या परमार्थात साथ करणारा त्यांचा जड, पांचभौतिक देह अग्नीने पंच तत्त्वांत विलीन करून टाकला. श्रीदादा देहात वावरत असतानाच ते ''सिद्धसाधनाने स्वये ब्रह्मचि '' झाले होते. आता श्रीदादा विदेह अवस्थेत ब्रह्मरूप झाले होते. आता देहधारी सगुण रूपात श्रीदादा दृश्यमान नव्हते. म्हणून सर्वांची मने खिन्न, उदास, शून्य झाली होती. प्रत्येकाला शोक अनावर झाला होता. शोकमग्न अवस्थेतच लोक स्मशानातून आपापल्या घरी परत गेले.

लौकिक अथवा व्यावहारिक दृष्टीने श्रीदादा हे देहधारी स्वरूपातून अदृश्य झाले. पण श्रीदादा सामान्य नव्हते; ते संत होते. आणि संत हे देहपातानंतरही या जगात असतातच. समर्थ रामदासस्वामी सांगतात, ''माझी काया गेली खरे । परी मी आहे जगदाकारे''. याप्रमाणे जगदाकाररूपाने संत येथे असतातच. समर्थ रामदासस्वामींनी आणखी असे म्हटले आहे, ''दासबोध आत्माराम माझे रूप''. याचा अर्थ असा की साधु संत हे आपल्या ग्रंथरूपाने या जगात असतातच. श्रीदादांचे अनेक ग्रंथ आहेत. त्या ग्रंथांच्या रूपात श्रीदादा आपल्या जवळ आहेतच. आणि ज्या भक्तांना त्यांचे स्मरण होते त्यांचे जवळही श्रीदादा आहेतच. हनुमद्गुरू- चरित्र-बोध-सार या आपल्या ग्रंथात श्रीदादांचे पितृदेव श्रीमामामहाराज केळकर यांनी जे म्हटले आहे तेही लक्षणीय आहे:-

''स्वरूपी स्वरूपाकार झाले । ते साधुसंत नाही गेले ।
निर्गुणरूपे जगदाकार झाले । जगी व्यापूनी रहाती ॥
संतसद्गुरु आले गेले । हे तो आपुले बोलणे झाले ।
परी ते अखंडित राहिले । भक्तजनांकारणे ॥''



**प्रकरण २३ : संदर्भ**

१) केशवलिखितदासरामचरित्रटिप्पणे
२) सौ. अपर्णा केळकरलिखित टिप्पणी
३) श्रीचंद्रशेखरअण्णा यांची मौखिक व लेखी माहिती

प्रकरण २४

# श्रीदादांचे महानिर्वाणानंतर

(इ.स.२००१ ते इ.स. २००२)

या जगात काहीही बरे वाईट घडो. काळ मात्र त्यातून अलिप्त असतो आणि तो अखंडपणे पुढे पुढेच जात असतो. काळाच्या निरंतर प्रवाहाप्रमाणेच, केळकर कुळातील नित्य कीर्तनाची परंपरा श्रीदादांच्या निर्वाणानंतरही पुढे चालूच राहिली. श्रीदादांच्या निर्वाणाने केळकर कुटुंबात आलेल्या नित्य कीर्तनाचे दुसरे पर्व संपले. आपल्या निर्वाणापूर्वी श्रीदादांनी आपल्या घराण्यात आलेली नित्य कीर्तनाची परंपरा चालू ठेवण्यास आपले ज्येष्ठ चिरंजीव श्री. चंद्रशेखरअण्णा यांना सांगून ठेवले होते. श्रीदादांची आज्ञा चंद्रशेखरअण्णांना प्रमाणभूत होती. आपल्या प्रिय पित्याच्या निर्वाणाने चंद्रशेखरांना अत्यंत दुःख झाले होते; परंतु कीर्तन चालू ठेवावयाचे आहे म्हणून त्यांनी आपले दुःख बाजूस सारले आणि त्यांनी गुरुवार दिनांक २६-७-२००१ पासून आपले नित्याचे कीर्तन सुरू केले. याप्रमाणे इ.स. १९२४ पासून केळकर कुळात आलेला नित्य कीर्तनाचा प्रवाह पुढे जाऊ लागला.

शुक्रवार दि. २७-७-२००१ या दिवशी श्रीदादांच्या निर्वाणा-नंतरचा तिसरा दिवस होता. याच दिवशी सकाळी रक्षाविसर्जन आणि अस्थिसंचयन व्हावयाचे होते. श्रीदादांचे चारही चिरंजीव आणि अन्य बरीच मंडळी सकाळीच स्मशानात गेली. पाण्याने चिता थंड करून रक्षा व अस्थि गोळा करण्यात आल्या. काही अस्थि शेजारच्याच कृष्णा नदीत विसर्जित करण्यात आल्या. याच दिवशी हरिपूर येथील कृष्णा-वारणा नद्यांच्या संगमात विसर्जित करण्यास काही अस्थि नेण्यात आल्या. नावेतून संगमस्थानी जाऊन अस्थींचे विसर्जन केल्यावर फुले उधळण्यात आली. पाण्यात पडलेल्या फुलांनी ॐ चा आकार धारण केला आणि तो बराच काळ टिकून राहिला. याच दिवशी पंढरपुरला चंद्रभागेत, आळंदीला इंद्रायणीमध्ये, नरसोबाची वाडी येथे कृष्णा-पंचगंगा या नद्यांच्या संगमात आणि औदुंबर येथे कृष्णा नदीत अस्थि सोडण्यात आल्या. त्यानंतर यथासमय मुंबईतील समुद्र, द्वारका,



काशी आणि प्रयाग येथे अस्थिविसर्जन झाले.

श्रीदादांच्या निर्याणानंतरचा दहावा दिवस-शुक्रवार दिनांक ३-८-२००१ हा उजाडला. सांगलीतील विष्णुघाटावर सकाळपासून चंद्रशेखरअण्णा यांचे हस्ते दहाव्या दिवशीचे धार्मिक विधि सुरू झाले. यावेळी सुमारे ५०० स्त्रीपुरुषांचा समुदाय उपस्थित होता. धार्मिक विधि संपल्यावर, पिंडांचे दर्शन प्रथम घरच्या मंडळींनी व नंतर भक्तांनी घेतल्यावर, काकस्पर्शासाठी पिंड उघड्या जागी घाटावर ठेवण्यात आले. खरे म्हणजे संतांच्या पिंडास कावळा शिवला काय किंवा न शिवला काय या गोष्टीला काहीच महत्त्व नसते. तथापि लोकप्रथेला अनुसरून काकस्पर्शासाठी पिंड मांडण्यात आले.

पिंड जेव्हा उघड्यावर ठेवण्यात आले होते तेव्हा जवळपास खूप कावळे होते. पण एकही कावळा खाली उतरून पिंडास स्पर्श करीत नव्हता असा बराच वेळ गेला. लोक अस्वस्थ होऊ लागले. थोड्या वेळाने चंद्रशेखरअण्णा, गुरुनाथमहाराज कोटणीस, मधुकरमहाराज शिपुरकर हे पिंडाजवळ जाऊन काही संकल्प बोलून आले. परंतु कावळ्यांवर काहीच परिणाम झाला नाही. तेव्हा काही भक्तांनी हळु आवाजात ''श्रीराम जय राम जय जय राम'' या महामंत्राचा घोष सुरू केला.त्यानेही काही निष्पन्न झाले नाही. उलट यावेळी जवळ असणारे सर्वच कावळे लांब उडून गेले.

सकाळी दहाचा सुमार झाला. यावेळी श्री. कृष्णाजी शिंगाडे या श्रीदादांच्या भक्ताला एक कल्पना सुचली व ती त्यांनी चंद्रशेखरअण्णांच्या अनुज्ञेने अंमलात आणली. श्रीनिंबरगीकरमहाराजांचे खापरपणतू श्रीसदाशिवमहाराज हे सांगलीतच असतात. त्यांना बोलावून घेऊन शिंगाडे आले. श्रीसदाशिवमहाराज हे जेथे पिंड ठेवले होते तेथे गेले. पिंडांना फुले वाहून त्यांनी नमस्कार केला, तोच एक कावळा जवळ आला आणि सदाशिवमहाराज पिंडाजवळून जरासे दूर होताच आणखी दोन तीन कावळे तेथे आले आणि काही सेकंदातच एका कावळ्याने मुख्य पिंडाला चोच मारली. पिंडाला काकस्पर्श झाला. उपस्थितांनी टाळ्या वाजवून श्रीदादांचा जयजयकार केला.

श्रीदादा हे निस्सीम गुरुभक्त होते. त्यांची श्रीनिंबरगीकरमहाराजांचे-वर अढळ दृढ निष्ठा होती. त्यांच्याच वंशातील सदाशिवमहाराजांनी फुले वहाताच पिंडाला काकस्पर्श झाला. हे पाहिल्यावर श्रीदादांचे चतुर्थ चिरंजीव श्री. अनिलप्रभु अंत:स्फूर्तीने उद्गारले, ''श्रीदादांनी श्रीनिंबरगीरमहाराजां-विषयीची आपली भक्ति मरणोत्तरही व्यक्त केली.''

नंतर उपस्थित मंडळींनी पिंडाला तिलोदक अर्पण केले. घाटावरचा हा तिलोदक अर्पणाचा विधि संपता संपताच पाऊस सुरू झाला. तशा पावसात भिजत भिजतच भक्त आपापल्या घरी परतले.

चौदाव्या दिवशी संकष्टी असल्याने पंधरावे दिवशी सर्वांना प्रसाद द्यावयाचा होता. श्रीदादांचे घरामध्ये एकाच वेळी सर्वांनाच प्रसाद देणे शक्य नसल्याने सांगलीतील मराठा मंडळाच्या सभागृहातील प्रशस्त जागेत अडीच तीन हजार भाविक भक्तांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

काही निवडक लोकांनी स्मशानात श्रीदादांचे गौरवपर भाषणे केली होती. त्यानंतर दि. २८-७-२००१ या दिवशी अर्बन बँकेत श्रीदादांना श्रद्धांजलि वाहण्यात आली. प्रारंभी रेडिओ-स्टार मंगला जोशी यांनी नामदेवमहाराजांचा ''अमृताहुनी गोड नाम तुझे देवा'' इत्यादि काही अभंग म्हटले. त्यानंतर बापूसाहेब पुजारी, सौ. शैलाभाभी पाटील, अशोकराव तेलंग, डी. के. पाटील, आनंद परांजपे, मनुभाई सारडा, संजय पाटील, झेंडेमहाराज यांची भाषणे होऊन श्रीदादांना आदरांजली वाहण्यात आली.

असे झाले तरी अद्यापि अनेकांना श्रीदादांना श्रद्धांजली अर्पण करावयाची होती. त्यांची तळमळ व विनंति लक्षात घेऊन दि. ८-८-२००१ या दिवशी चंद्रशेखरअण्णांनी आपले कीर्तन झाल्यावर, भक्तांनी आपापल्या भावना व्यक्त कराव्यात असे सुचविले. त्याप्रमाणे प्रा.डॉ.दा.वि.कुलकर्णी, मा.मधुकरमहाराज शिपुरकर, सौ. श्यामला पटवर्धन, श्री. कृ. रा. शिंगाडे, कविराज श्रीरंग जोशी, बुधगावचे व्यापारी श्री. महाजन, श्री. नाना दिवाण, इत्यादींनी श्रीदादांचे गुणगान केले. परंतु या दिवशी वेळेचे अभावी अनेक भक्तांना श्रध्दांजलि अर्पण करण्याची संधि मिळू शकली नाही. तेव्हा त्यांच्यासाठी पुन: एकदा दि. ९-८-२००१ रोजी कीर्तनोत्तर भाषणे ठेवली गेली. या वेळी श्रीपतीबुवा धोंगडे, दा.मा.कुंटे, प्रा.ना.बा.पाटणकर, अरविंद



पीतांबरे, शिरुभाऊ सहस्रबुध्दे यांनी आपल्या भावना प्रकट केल्या. दिनांक ११-८-२००१ या दिवशी स्वामी प्रज्ञानंद यांनी लिहून पाठविलेली श्रद्धांजलि कीर्तनात वाचून दाखविण्यात आली.

शांतिकुटिर संदेश या त्रैमासिकाच्या गणेश चतुर्थी, दिनांक २२-८-२००१ च्या अंकात श्रीदादांना श्रद्धांजलि अर्पण करणारा लेख श्री. एस्. एस्. वैद्य यांनी लिहिला होता. (तत्पूर्वी याच त्रैमासिकाच्या ५-६-२००१ च्या अंकात श्रीदादांचा गौरव करणारा लेख आला होता). शांतिकुटिरसंदेशच्या दि.२२-८-२००१ च्या अंकातच श्रीदादांचा ''अयमात्मा ब्रह्म'' या शीर्षकाचा पुढील अभंग प्रसिद्ध झाला :-

देहभावे जीव भ्रांतिरूप झाला । कैंचा हा गोविला बंधनात ।।१।।
हाची ब्रह्मरूप वस्तूता पहाता । आत्मरूपी सत्ता त्याची असे ।।२।।
निरसोनी अज्ञान पाही तू स्वत:सी । आत्माचि आहेसी आत्मरूप ।।३।।
पंच तत्त्वाआत आत्मयाची गाठी । चिदानंदी भेटी सद्रूपाची ।।४।।
मानिले आपुले ते ते टाकी वेगी । राहे उगाउगी स्वस्थ चित्त ।।५।।
निज ते आपण अयमात्मा ब्रह्म । महावाक्य वर्म दासरामा ।।६।।

पुणे येथील संतकृपा मासिकाच्या सप्टेंबर २००१ च्या अंकात श्रीदादांचा गौरव करणारे दोन लेख एकाच वेळी आले. एक लेख श्री. श्री. वि. सहस्रबुद्धे यांचा होता, तर दुसरा लेख प्राचार्य क. श्री. काळे यांनी लिहिलेला होता.

सांगलीच्या गावभागात ''ज्येष्ठ नागरिक संघ सेवा संस्था'' आहे. या संस्थेने आपल्या दि. ९-९-२००१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत श्रीदादांना पुढीलप्रमाणे श्रद्धांजलि वाहिली. ''कीर्तनाची अखंड परंपरा चालविणारे सांगलीचे थोर संत प.पू. श्रीरामराय केळकर ऊर्फ श्रीदासराममहाराज यांनी नागपंचमी दि. २५ जुलै २००१ रोजी देहत्याग केला. प.पू. दादांचा आपल्या संस्थेवर लोभ होता. तसेच आपल्या कार्यास त्यांचा आशीर्वाद होता. त्यांच्या निर्वाणामुळे महाराष्ट्राच्या आध्यात्मिक क्षेत्राची फार मोठी हानि झाली आहे. त्यांना विनम्र भावाने आमची श्रद्धांजलि.''

श्रीदादांचे निर्वाणानंतरची बरीचशी गडबड संपली. थोडासा निवांतपणा मिळताच श्रीचंद्रशेखरअण्णा व त्यांचे बंधु यांनी अनेक गोष्टी

करवून घेतल्या. (१) श्रीदादांच्या पादुकांचे चांदीचे सिंहासन. (२) श्रीदादांचे पितृदेव श्रीमामा यांच्या पितळी पादुकांप्रमाणे श्रीदादांच्याही तशाच पितळी पादुका करवून घेतल्या, व त्या मामांच्या पादुकाशेजारी देव्हाऱ्याचे खालचे बाजूस ठेवण्यात आल्या. (३) श्रीदादांचे एक मोठे तैलचित्र श्री. कल्याण शेटे यांजकडून करवून घेण्यात आले व ते मामांच्या तैलचित्राशेजारीच लावण्यात आले. (४) मामांच्या सिंहासनाप्रमाणेच श्रीदादांचे सिंहासन करण्याचे ठरवून, तशी ऑर्डर कोल्हापूरच्या आर्.आर्. सूर्यवंशी व त्यांचे चिरंजीव यांना देण्यात आली. यथावकाश हे सिंहासन सांगलीत आणण्यात आले.

हे सिंहासन श्रीदादा जेथे कीर्तनास बसत त्याच जागी स्थापन करण्याचे ठरले. श्रीदादा जेथे कीर्तनासाठी खुर्चीवर बसत तेथे मागचे बाजूस खोलीत जाण्यास दरवाजा होता. तो दरवाजा काढून तेथे सफाईदार भिंत करवून घेण्यात आली. आणि ज्याप्रकारे आणि ज्या पद्धतीने मामांचे सिंहासन बसविण्यात आले होते, त्याच प्रकारे व त्याच पद्धतीने दादांचे सिंहासन स्थापन करण्यात आले. आणि सिंहासनाचे मागचे भिंतीवर श्रीदादांचे तैलचित्र लावण्यात आले. इतके सर्व होईतो इ.स. २००२ साल उजाडले. मग सिंहासनाच्या औपचारिक स्थापनेसाठी माघ शुद्ध दशमी, दिनांक २२-२-२००२ हा दिवस मुक्रर करण्यात आला. हाच दिवस निवडण्यातील औचित्य असे होते :- १) हा दिवस तुकाराममहाराजांच्या अनुग्रहाचा दिवस होता. २) चिमडपीठाधीश श्रीनाराणमहाराज यरगट्टीकर यांची पुण्यतिथि या दिवशी होती. ३) मुख्य म्हणजे श्रीदादांनी या दिवसापासूनच आपले नित्य कीर्तन सुरू केले होते.

सिंहासनस्थापनेच्या औपचारिक समारंभास निंबरगी, चिमड व सांगली येथील श्रीदादांच्या संप्रदायातील अधिकारी पुरुषांना बोलावण्याचे ठरले. त्याप्रमाणे निंबरगीचे श्रीगुरुलिंगाप्पामहाराज व श्रीकाडसिद्धमहाराज, चिमडचे श्रीपंडितरावमहाराज आणि श्रीपांडुरंगमहाराज, सांगलीतील श्रीसदाशिवमहाराज, श्रीगुरुनाथ कोटणीसमहाराज व डॉ. माधवराव कोटणीस यांना निमंत्रणे पाठविण्यात आली. निंबरगी व चिमड येथून या सत्पुरुषांना सांगलीत आणण्यास स्वतंत्र मोटारीची व्यवस्था करण्यात आली. माघ शुद्ध दशमीसच श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची पुण्यतिथि असल्याने त्यांचे



चिरंजीव श्रीपंडितरावमहाराज मात्र येऊ शकले नाहीत.

माघ शुद्ध दशमी, दि. २२-२-२००२ या दिवशी सकाळी ८ ते १० पर्यंत सर्व याज्ञिकी क्रिया पूर्ण झाल्या. याज्ञिकी क्रियेस बसलेल्या चंद्रशेखर व सौ. रोहिणी यांना गुरुजींनी सिंहासनास नमस्कार करण्यास सांगितले. त्यानंतर वर निर्दिष्ट केलेल्या संतसज्जनांनी श्रीदादांच्या सिंहासनास हार घातले. नंतर त्यांनी मामांचे सिंहासनास हार घातले. हा सर्व कार्यक्रम राममंदिरात झाला. यानंतरचा पुढील कार्यक्रम घराचे अंगणात झाला. यावेळी जवळ जवळ १००० स्त्रीपुरुषांचा समुदाय उपस्थित होता. उपस्थितांमध्ये मोहन भावे (कोल्हापूर), राजन जोशी (मुंबई), व म. बापट (डोंबिवली), सौ. माया के आपटे व नारायण के आपटे (विश्रामबाग), व्हि. के. कुलकर्णी, शिरुभाऊ सहस्त्रबुद्धे व शरद आपटे (पुणे), अंबुताई वाटवे, सुशीलाबाई पटवर्धन, श्रीपतीबुवा धोंगडे, खाडिलकर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी इत्यादि अनेकानेक भक्तजन होते.

अंगणामध्ये उत्तम गादीच्या खुर्च्या मांडून वरील सत्पुरुषांची आरामशीर बसण्याची व्यवस्था केलेली होती. या प्रसंगी प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी संपादित केलेल्या ''श्रीदासराममहाराज : परमार्थ प्रश्नोत्तरी'', आवृत्ति पहिली, या ग्रंथाचे प्रकाशन व्हायचे होते. प्रारंभी श्री. दीपक केळकर यांनी माघ शुद्ध दशमीचे औचित्य स्पष्ट करुन, निंबरगी, चिमड व सांगली येथील सांप्रदायिक संतांचा त्रिवेणी संगम झाला आहे, असे सांगून कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. चंद्रशेखरअण्णा यांच्या सूचनेवरुन प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी श्रीदादांच्या पारमार्थिक जीवनातील ठळक प्रसंग सांगितले. श्रीदादांची कीर्तननिष्ठा किती जाज्वल्य होती हे सांगताना, श्रीदादांच्या निर्याणसमयी ''मुखात वचन नित्य कीर्तनाचे'' होते असे म्हणून, आपटे यांनी श्रीदादांचे संपूर्ण जीवन हे ''सिद्धसाधनाने स्वये ब्रह्मचि झाले'' या केवळ चार शब्दांत सांगता येते, असे कथन करून त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. त्यानंतर 'परमार्थ प्रश्नोत्तरी' या पुस्तकाचे प्रकाशक मा. न. ना. गोखले यांनी पुस्तकाचा परिचय करून दिला आणि हे पुस्तक प्रकाशित करण्याची विनंति श्रीगुरुलिंगाप्पामहाराजांना केली. त्याप्रमाणे श्रीगुरुलिंगाप्पामहाराजांनी पुस्तक प्रकाशित केले. नंतर चंद्रशेखरअण्णांनी

समारोप करून वरील संतांना शाल, हार, गुच्छ इत्यादि देऊन त्यांचा सत्कार केला. तसेच यावेळी त्यांनी मधुकरमहाराज शिपुरकर, बळवंत भारती, श्रीपतिबुवा धोंगडे, मिलिंद खाडिलकर, कल्याण शेटे, इत्यादींचाही सत्कार केला. आणि हा कार्यक्रम समाप्त झाला. त्याचवेळी भोजनाचीही तयारी झाली होती. दुपारी १२ ते ४ पर्यंत भोजन झाले. आणि या दिवसाचा सोहळा संपन्न झाला.

श्रावण महिन्यात शुद्ध ५-६, मंगळवार दि.१३-८-२००२ हा श्रीदादांच्या पुण्यतिथीचा मुख्य दिवस होता. ही पहिलीच पुण्यतिथि असल्याने, सोमवार दि. १२-८-२००२ व मंगळवार दि.१३-८-२००२ या दोन दिवशी श्रीदादांची श्राद्धे झाली.

सोमवार दि. १२-८-२००२ रोजी सकाळी श्री. केशवराव जोशी यांचे संस्कृतमधून प्रवचन झाले. मंगळवार दि. १३-८-२००२ हा पुण्यतिथीचा मुख्य दिवस. याच दिवशी परमार्थ प्रश्नोत्तरी या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन, तसेच श्रीदादांचे लेखन संगृहीत असणाऱ्या ''चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ'', आणि दासराममहाराजकृत ''आरती संग्रह'' या पुस्तकांचे प्रकाशन व ग्रंथसमर्पण होणार होते. मंगळवार दि.१३-८-२००२ या दिवशी सकाळी श्री. केशवराव जोशी यांनी संस्कृतमध्ये लिहिलेल्या श्रीदादांच्या संक्षिप्त चरित्राचे वाचन त्यांनी केले. अपराण्ह काळी श्रीदादांचे श्राद्ध झाल्यावर उपस्थितांना श्राद्धप्रसाद देण्यात आला.

वरील मंगळवारीच संध्याकाळी ४।। वाजता श्रीचंद्रशेखरअण्णांचे नित्याचे कीर्तन झाले. या कीर्तनात नेहमीच्या ठरलेल्या अभंगावर निरूपण न करता, त्यांनी प्रा. डॉ. के. वा. आपटे रचित ''आरती रामराया'' या श्रीदादांच्या आरतीवरच कीर्तन करून श्रीचंद्रशेखरअण्णांनी श्रीदादांचा महिमा सांगितला.

चंद्रशेखरअण्णांचे कीर्तन समाप्त झाल्यावर, वर उल्लेखिलेल्या तीन पुस्तकांच्या प्रकाशनाचा व समर्पणाचा सोहाळा सुरू झाला. यावेळी श्रीसदाशिवमहाराज व श्रीगुरुनाथमहाराज कोटणीस उपस्थित होते. श्री. द. बा. केळकर यांनी 'श्रीदासराम पंचपदी' या काव्याचे पठण केले. त्यानंतर कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. चंद्रशेखरअण्णांच्या स्वागतपर भाषणानंतर, प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी आपल्या प्रवाही आणि प्रभावी भाषेत श्रीदादांच्या चरित्राचा आढावा घेतला. ''श्रीदादांचे संपूर्ण जीवन चैतन्यमय होते'' असे त्यांच्या भाषणाचे सार होते. त्यानंतर प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी तीनही ग्रंथाचा परिचय करुन दिला. ते म्हणाले, ''एकाच दिवशी एकाच सत्पुरुषाच्या म्हणजे श्रीदादांच्या तीन ग्रंथाचे प्रकाशन होत आहे ही गोष्ट अपूर्व आहे.'' तसेच ''श्रीदादांनी जीवनभर जी कीर्तने केली त्या सर्वांचे सार परमार्थ प्रश्नोत्तरी या ग्रंथात आहे'', असे ते म्हणाले आणि ''श्रीदादांचे संपूर्ण जीवन हे चमत्कारांनी भरलेले होते'', असे सांगून आपटे यांनी आपले भाषण आटोपले. त्यांनतर वरील तीनही पुस्तकांचे प्रकाशक मा. न. ना. गोखले, श्री. कृ. रा. शिंगाडे, व श्री. खेडकर यांची समयोचित भाषणे झाली. व त्यांनी पुस्तक समर्पणाची विनंति केली. त्याप्रमाणे श्रीगुरुनाथमहाराजांनी 'परमार्थ-प्रश्नोत्तरी' ग्रंथाचे, श्रीसदाशिवमहाराज यांनी 'आरती संग्रह' ग्रंथाचे, व प्रा. डॉ. के. वा.आपटे यांनी 'चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ' याचे समर्पण केले. पहिल्या दोघांनी मामांच्या सिंहासनावर ग्रंथ अर्पण केले, तर ग्रंथ अर्पण करण्यापूर्वी, ''ज्याप्रमाणे गंगेचेच पाणी घेऊन गंगेलाच अर्पण केले जाते, त्याप्रमाणे श्रीदादांचे हे लेखन मी त्यांनाच समर्पण करीत आहे'', असे बोलून प्रा. डॉ. के. वा.आपटे यांनी श्रीदादांच्या सिंहासनावर ग्रंथ अर्पण केला.



त्यानंतर परमार्थ-प्रश्नोत्तरी या ग्रंथाविषयी श्रीगुरुनाथमहाराज कोटणीस हे चार शब्द बोलले. ते म्हणाले, ''जत्रेतून साखरेची बाहुली आणली. मूल विचारते 'कोठून खाऊ ?' कोठूनही खाल्ली तरी ती गोडच लागते. त्याप्रमाणे परमार्थ प्रश्नोत्तरी हा ग्रंथ सगळीकडून गोडच गोड आहे.''

वरील कार्यक्रम संपल्यावर सर्व उपस्थितांना गोडाचा शिरा आणि दूध प्रसाद म्हणून देण्यात आले.

वरील कार्यक्रमाचे वेळी राममंदिर व पडवी भक्तजनांनी गच्च भरली होती. काही लोकांना अंगणात बसावे लागले. या लोकांच्या निष्ठेची त्यावेळी चांगलीच परीक्षा झाली. कारण मधूनच पाऊस येत होता. परंतु पाऊस येतो, निवारा नाही, म्हणून भक्तगण निघून गेले नाहीत. काहीजण छत्री घेऊन उभे होते. हा एक चमत्कारच म्हणावयास हवा.

वर उल्लेखिलेली श्रीदादांची पहिली पुण्यतिथि व पुस्तक समर्पण या कार्यक्रमास श्रीदादांचे नातेवाईक, परगावची श्रीदादांची भक्तमंडळी, आणि

सांगलीतील असंख्य निष्ठावंत भक्त उपस्थित होते.

भगवान् श्रीसद्गुरु श्रीदादा यांच्या आज्ञेप्रमाणे चंद्रशेखरअण्णांनी नित्य कीर्तनास प्रारंभ केला. नित्य कीर्तन करणारी चंद्रशेखरअण्णांची तिसरी पिढी होय. ही गोष्टच अपूर्व आणि अद्भुत आहे. या संदर्भात स्वामी प्रज्ञानंद लिहितात :-

''प.पू.रामरायांचे सुपुत्र श्री.चंद्रशेखर हेही वाडवडिलांची सद्गुणांची परंपरा पाठीशी घेऊन, हेच कीर्तन व्रत पुढे चालवीत आहेत. एकाच कुळात असे नामकीर्ति पवाडे गाणारे भाग्यवंत श्रीहरिभक्त उदयास यावेत, त्या प्रत्येकास हरिकीर्तनाची गोडी वाटावी, त्याचे हातून शुद्ध परमार्थ प्रसाराचे कार्य अखंड व्हावे, ही ईश्वरी योजनाच नव्हे काय ?''

**प्रकरण २४ : संदर्भ**

१) केशव लिखित दासराम चरित्र टिप्पणे

२) साप्ताहिक तुतारी विशेषांक, पृ.११

३) ज्येष्ठ नागरिक संघ सेवा संस्था, द्वितीय वार्षिक अहवाल, सन २०००-२००१, पृष्ठ २



# * भाविक-भक्तांच्या आठवणी-अनुभव *

(श्रीदादांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चिरंजीव श्रीचंद्रशेखरअण्णा यांच्या लिखित आवाहनानुसार अनेक भक्त- भाविकांनी आपापले अनुभव/आठवणी श्रीचंद्रशेखरअण्णांचेकडे लेखी पाठविल्या. काहींनी अगदी थोडक्यात लिहिलेले होते, तर इतरांनी तपशीलवार लेखन केले होते. त्यातील सारभूत भाग येथे दिला आहे. तसे करताना पहिल्या दोन आणि शेवटच्या दोन आठवणी सोडून, इतर सर्व आठवणी/अनुभव हे ते देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या आद्याक्षराला धरून वर्णानुक्रमाने दिलेले आहेत.)

(१)

प्रा. डॉ. सौ. अवंतिका कुलकर्णी, एम्. ए., पीएच्. डी., सांगली.

माझा मुलगा अमित हा दादामहाराजांचा एकनिष्ठ भक्त आहे. कमी ऐकू येत असल्यामुळे तो ऐकण्यासाठी कानात यंत्राचा वापर करतो. अलीकडे त्याला चक्कर येऊ लागली. डॉक्टरांना दाखविले. डॉक्टरांनी त्याला घरीच रहाण्यास सांगितले. तेव्हा दादांकडे जाता येत नाही याचे त्याला फार वाईट वाटे. पुढे त्याला डॉ. पुरोहितांना दाखविण्यात आले. त्यांनी डोक्याचे स्कॅनिंग करून घेण्यास सांगितले. स्कॅनिंगमध्ये डाव्या कानामागील छोट्या मेंदूकडे जाणाऱ्या शिरेवर गाठ आल्याचे निष्पन्न झाले. त्यासाठी ऑपरेशन करणे भाग होते. पुण्याला माझा पुतण्या न्युरॉलॉजिकल सर्जन आहे. त्याच्याकडे अमितला नेण्यात आले. त्याने ऑपरेशन करण्याचे ठरविले. हे मेजर ऑपरेशन होते. गुरुवार दि. २१-११-२००२ रोजी दुपारी ऑपरेशन करण्याचे ठरले. यावेळी मी सांगलीतच होते. सकाळपासून माझा जीव खालवर होत होता. माझे टेन्शन वाढतच होते. शेवटी मी प्रा. डॉ. के. वा. आपटे यांना फोन केला. मी त्यांना सांगितले,'' अमित हा दादांचा अनुगृहीत आहे. आज त्याचे पुण्यात ऑपरेशन आहे. अमितसाठी मला दादांची प्रार्थना करायची आहे. ती मी कशी करू?'' डॉ. आपटे यांनी काय करावे ते सांगितले. तसे मी केले व घोरकष्टोद्धारण स्तोत्र १०८ वेळा म्हटले. रात्री ९.५० वाजता पुण्याहून फोन आला की अमितचे ऑपरेशन अगदी व्यवस्थित झाले आहे.'' गुरुकृपा काय नोहे ज्ञानदेव म्हणे '' या वचनाची मला आठवण झाली. आणि ''सद्गुरुवाचोनी सापडेना सोय'' या वचनाची खात्री पटली.

(२)

सौ. अपर्णा अशोक गोखले, एम्.ए., बी. एड्., खामला (नागपूर).

कारगील घटना घडत असताना जून १९९९ मध्ये आम्ही काश्मीरमध्ये ट्रिपला गेलो होतो. राजा ट्रॅव्हल्स, मुंबई यांची बस होती.जातानाच जम्मू ते श्रीनगर या प्रवासात आमच्या बसला अपघात झाला. पण अगदी काहीही न होता आम्ही बचावलो. त्यावेळी काश्मीर-मध्ये परिस्थिति वाईट होती. प.पू. दादांच्या कृपेने व्यवस्थित ट्रिप करून आम्ही परत आलो.

(३)

सौ. अनामिका मुकुंद गोरे, एम्, एस्. सी, निवृत्त प्राध्यापिका, पुणे.

विश्वास, अतूट श्रद्धा, आनंद, समाधान या गुणवृद्धीमुळे जीवनात सार्थकता वाटते.

(४)

सौ. अनिता सुहास क्षीरसागर, एम्. कॉम्,१, सांगली.

माझे लग्न झालेनंतर माझे मिस्टर सुहास क्षीरसागर यांनी मला दादांच्या दर्शनास नेले. मग मी वरचेवर दादांचेकडे जात होते. माझ्या पहिल्याच बाळंतपणात सुरवातीपासून मला भयंकर त्रास होत होता. दि. ४-७-२००१ रोजी मला बाळंतपणासाठी सकाळी ८ वाजता दवाखान्यात नेण्यात आले. बाळंतपण सुलभ होण्यास इंजेक्शन वगैरे देत होते. पण सायंकाळी ५ वाजले तरी यश येत नव्हते. या बाळंतपणातून मी काही वाचणार नाही असे मला वाटत होते. तेव्हा माझे मिस्टरांनी मला दिलासा दिला,''आपले दादा समर्थ आहेत. थोडासा त्रास सहन कर. दादा कीर्तनासाठी बसले की तुझी सुटका होईल.'' संध्याकाळी ६। वाजता डॉक्टरांनी सीझरिंग करणेचा निर्णय घेतला. ते म्हणाले, ''आणखी १५ मिनिटे नॉर्मलपणे बाळंतपण होण्याची वाट पाहू. नाहीतर सीझेरियन करू.'' ६।। वाजले. मी जीवाच्या आकांताने दादांचा धावा केला. आणि काय आश्चर्य! ६.३१ वाजता माझी नॉर्मल डेलिव्हरी झाली. हे दादांचेमुळे झाले.



(५)

सौ. अनुराधा दिनकरराव शिंदे, गोरेगाव- मुंबई.

प. पू दादांच्यामुळे जीवनाला एक दिशा प्राप्त झाली. नामस्मरणाची मनाला सवय जडली. भौतिक सुखापेक्षा आध्यात्मिक सुखाची गोडी वाढू लागली.

एक दिवस स्वप्नात, अतिभव्य स्वरूपात दादा पाटावर उभे आहेत व मी त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवले आहे असे दिसले. तेव्हापासून एक वेगळाच आनंद व समाधान यांचा अनुभव आला की जो शब्दांत वर्णन करता येत नाही.

(६)

सौ. अन्नपूर्णा (विजया) कृष्णाजी मायदेव, आजरा.

आमच्या घरात भूतबाधा होती. तिचा मला त्रास होत असे.आमच्या घराण्यावरील आणि माझ्यावरील एक जबरदस्त अरिष्ट श्रीदादामहाराजांच्यामुळे टळले. माझी पूर्व जन्माची काहीतरी पुण्याई म्हणून दादांची गाठ पडली.

(७)

अरविंद चिंतामण खाडिलकर, डी. ई. आर. ई., ए. एम. आय्. ई., टी. ई., विलेपार्ले- मुंबई.

कोणत्याही कठिण प्रसंगी शांतपणे प्राप्त परिस्थितीत आनंदाने सामोरे जाणे व परमेश्वरावर विश्वास ठेवून त्यातून मार्ग काढणे, हे श्रीदादांच्या मुळे मला जमले.

(८)

अरुण शंकर जोग. मिरज.

इ.स. १९८५ मध्ये मी सांगलीस रहात होतो. त्यावेळी मी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. त्यावेळी मी कोल्हापूरास जाऊन येऊन नोकरी करीत होतो. एके दिवशी नोकरी संपल्यावर मी चालत रेल्वे स्टेशनकडे निघालो. वेळ रात्री ८-८।। ची होती. पण त्या दिवशी काहीतरी वेगळे झाले. मी रेल्वे स्टेशनचे पुढेच गेलो. काही वेळाने स्टेशन मागे गेल्याची जाणीव झाली. मी पुन: मागे आलो. मी गाडीत कसा येऊन बसलो हे काहीच कळले नाही. श्री. खाडिलकर या माझ्या सहकाऱ्यानी मला सांगलीला घरी आणून सोडले. माझा चेहरा त्या वेळी

लोकांना भेसूर दिसत होता. दुसरे दिवशी सकाळी दादा आले व मला अंगारा लावून गेले. जाताना ''तीन दिवस यांना घराबाहेर पाठवू नका'' अशी त्यांनी घरच्यांना सूचना दिली. दादामहाराजांच्या अंगाऱ्यामुळे मी पूर्व स्थितीला आलो. केवळ महाराजांची कृपा म्हणूनच मी त्या कठिण प्रसंगातून बाहेर पडलो.

(९)

सौ. अर्चना अविनाश पाटील, बी.ए., कोल्हापूर

माझ्या विवाहानंतर मी गेली पंधरा वर्षे ती. दादांच्या दर्शनास येत आहे. तेव्हापासून मी पूर्ण शाकाहारी झाले. अंतर्मन शांत झाले. सहसा कुठल्याही विषयी तक्रार करावीशी वाटत नाही. शाश्वत काय आहे हे कळू लागले. नामस्मरणाची गोडी लागली.

(१०)

अवधूत सेवा मंडळ, सांगली

दर वर्षी माघ वद्य तृतीयेला दादांचे राममंदिरात आमचे भजन असते. त्यावेळी श्रीदादा'' आम्ही भोळे आम्ही भोळे । पिंड ब्रम्हांडावेगळे'' हे पद म्हणत. या पदातून 'ब्रह्मपदी नाचणारे आम्ही जिवाशिवापलीकडचे आहोत,' हे त्यांनी दाखवून दिले आहे.

(११)

अंबुबाई गोपाळ चव्हाण , सांगली.

मी दादांची अनुगृहीत आहे. एकदा मी अधिक मासात विष्णुघाटावर स्नान करण्यास गेले होते. तेथे नंदीची पूजा करताना माझ्यामागे दासराममहाराज उभे आहेत असे दिसले. त्यांना मी नमस्कार केला. तोवर ते दिसेनासे झाले होते.

(१२)

अंजली गजानन आठवले, कल्याण.

दि. २५ नोव्हेंबर १९९९ रोजी दासराममहाराज यांचा सहस्रचंद्रदर्शनाचा सोहळा पहावयास मिळाला. हा माझ्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग आहे.

(१३)

अशोक भास्कर पंडित, डी. सी. ई., निगडी- पुणे.

ती. दादा व सौ. वहिनी, ती. मामा व सौ. मामी यांनी मजवर पुत्रवत् प्रेम केले व प्रतिकूल परिस्थितीत धीर दिला. त्यामुळेच आजपर्यंतचे जीवन सुखी व समाधानी जगु शकलो.



(१४)

सौ. आरती अभय दीक्षित, बी. कॉम्., औरंगाबाद.

जेव्हा जेव्हा मी दादांचे स्मरण करते तेव्हा तेव्हा मला श्रीदादा महादेवाच्या पिंडीपुढे सोवळ्याने पूजा करत असलेले दिसतात.

(१५)

इंदुताई सहस्रबुद्धे, सांगली.

श्रीसंत बाबासाहेब मुजुमदार यांच्या पुण्यतिथि दिवशी दादांचे प्रवचन झाले. प्रवचनानंतर मी त्यांचे दर्शन घेतले. त्यांचेशी बोलताना मी सहज म्हणाले, ''मी काव्य- अभंग करते.'' तेव्हा ते मला म्हणाले,''अहो, एकादा अभंग म्हणा.'' मी रामाचा एक अभंग म्हणून दाखविला. त्यांना तो फार आवडला. मग ते मला म्हणाले,''असेच अभंग करीत जा.'' आणि काय आश्चर्य ! तेव्हापासून त्या संतवाणीचा प्रभाव माझ्या लेखणीवर पडला. माझी काव्यकला द्विगुणित झाली. त्यानंतर पाच सहा वर्षात माझे पाच सहा काव्यसंग्रह प्रकाशित झाले.

(१६)

सौ. इंद्रायणी सुनील पवळ, एस्, वाय्, बी. ए., डी. एड्., कवलापूर.

श्रीदादांच्याकडे गेले की मनाला एकप्रकारची शांति समाधान वाटते.

हल्लीच्या काळात नोकरी मिळणे हा एक मोठा प्रश्नच आहे. परंतु मला मात्र दादांच्या कृपेने श्रीसमर्थ दासराम ज्या संस्थेच्या शाळेत शिकले त्या शाळेत सुखाने आनंदाने नोकरी करण्याचे भाग्य लाभत आहे.

(१७)

सौ. उज्ज्वला प्रकाश पाटील, सांगली.

पति निर्व्यसनी होण्यामुळे सद्गुरूंच्या मोठेपणाची प्रचीती आली. व त्यामुळे त्यांचेवरील श्रद्धा आणखी दृढ झाली.

(१८)

सौ. उषा गो. कुमठेकर, बी.ए. (ऑनर्स), बारामती.

जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला व कोणत्याही प्रसंगी मन

ताब्यात ठेवण्याची शक्ति दादांच्यामुळे मिळाली.

(१९)

सौ. उषादेवी प्रतापसिंह रजपूत, बी.ए. सांगली.

श्रीदादांनी आमच्या सर्व अडचणी दूर केल्या. संकटाचे वेळी बळ दिले. जीवनाला मार्ग आखून दिला. इकडे तिकडे भटकत फिरत होतो, ते एकाच जागी एकाच पद्धतीने रहायला शिकविले. खऱ्या अर्थाने या संतशाळेतच आम्हाला शिस्त लागली. भक्तिमार्गात रहायला सांगितले. कितीही किंवा कसलाही प्रसंग असो, दादांना काही सांगितले व काम झाले नाही, असे घडले नाही. कारण श्रीदादा सगुणरूपात देवच होते.

माझ्या पुतणीला अर्धवट मुले दोनदा झाली. तिसऱ्या वेळी दादांनी ओटीत नारळ घातला. सुखरूपपणे तिला मुलगी झाली.

माझ्या दोन बहिणींवर अतोनात संकटे येऊ लागली. मी त्यांना दादांच्याकडे घेऊन गेले. दादांनी उपाय सांगितला. त्यामुळे त्या दोघींना गुण आला.

सध्या संसाराचा मोह थोडा कमी वाटतो. साधन करवून घेऊन सर्व विघ्ने-शारीरिक, मानसिक, व्यावहारिक - निवारली गेली आहेत.

(२०)

प्राचार्य क. श्री. काळे, एम्. ए., एम्. एड्., सांगली.

सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणासाठी निष्काम व निरपेक्ष वृत्तीने केलेले कोणतेही सत्कर्म, ऐहिक वा आध्यात्मिक कर्म-कर्तव्य (धर्म) म्हणजे यज्ञ या गीतेतील अभिप्रायाने श्रीदादांचे महानिर्वाणापर्यंतचे पूर्ण जीवन यज्ञमय होते.

(२१)

सौ. कांचन मनोहर अंतुरकर, बी. ए., पुणे.

स्वप्नात दादांचे दर्शन होते.

(२२)

सौ. कुमुद कृष्णा पावसकर, नवीन पनवेल.

इ.स. १९७६ साली माझा मोठा मुलगा काविळीने आजारी झाला आणि तो कोमात गेला. डॉक्टरांनी आशा सोडली. मी दादांना पत्र लिहिले. तिसऱ्या दिवशी पहाटे माझा मुलगा शुद्धीवर आला. कसलाही परिणाम



त्याच्या डोक्यावर झाला नव्हता. माझे पत्र पोहोचण्याच्या आतच दादांनी आमचे काम केले होते. ५-६ दिवसांनी दादांचे पत्र आले,''घाबरू नकोस. तुझ्या मुलाला काही होणार नाही.''

इ.स. १९८७ साली मी उत्सवासाठी सांगलीला गेले होते. माझ्या काही वैयक्तिक अडचणी होत्या. मी दादांना म्हटलं, ''दादा, माझे प्रश्न मुलांच्या लग्नाच्या आड येतील असं वाटतं. '' दादांनी उत्तर दिलं, ''कुठलाही प्रश्न निर्माण होणार नाही.'' पुढे माझ्या तिन्ही मुलांची लग्नं सुखरूपपणे पार पडली.

कीर्तनात अध्यात्माचे आकंठ भोजन श्रीदादा देत असत. श्रीदादांच्या कीर्तनात हातचं राखून काही नसे. अंतःकरणात जे स्फुरेल ते वाणीवाटे बाहेर पडे. माया-ब्रह्माचे विवरण, कुंडलिनी योगावरची कीर्तने आजही मनात ताजी आहेत.''कीर्तन हे करावे लागत नाही ते आपोआपच होत असते. ज्याचे तोचि करी,'' ही दादांची वाक्ये माझ्या अंतःकरणात कोरलेली आहेत.

आजपर्यंत दादांनी आम्हाला चैतन्याविषयी भरभरून ऐकविले. ''चैतन्याने चैतन्याचे द्वारा चैतन्याची अनुभूति घेऊन चैतन्याशी तादात्म्य पावणे हाच परमार्थ,'' ही दादांची शिकवण मी माझ्या मनावर कोरून ठेवली आहे. याची अनुभूति दादांनी मला द्यावी अशी प्रार्थना आहे.

(२३)

सौ. कुसुम सदाशिव माने, सांगली.

मी लग्नापूर्वी इ.स.१९६८ मध्ये दादांचा अनुग्रह घेतला. त्यावेळी मी दासराममहाराजांच्या कीर्तनास नियमित जात असे. एके दिवशी कीर्तन सुरू असताना, दादांच्या ठिकाणी मला परमेश्वररूप दिसले. शिवशंभो- शंकरांनी दासरामांच्या रूपात मला दर्शन दिले.

(२४)

कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे, पोलीस फौजदार, सांगली.

इ.स.१९७३ साली मी, माझी पत्नी आणि मुलगी गीता असे नृसिंहवाडीस गेलो होतो. पहाटे चार वाजता नदीत स्नान करून ओलेत्याने दत्तगुरूंना प्रदक्षिणा घातल्या. तेथे नारळ प्रसाद म्हणून मिळाला. मी दत्तगुरूंना

प्रार्थना केली की तुमच्या सारखेच सद्गुरु मला द्या. नंतर घरी परतलो. रात्री झोपलो असता पहाटे एक स्वप्न पडले,''मी नृसिंहवाडीस गेलो आहे. नदीच्या घाटावर आंघोळ करणेस उतरत असताना मी पडलो व पाण्यात बुडू लागलो. त्यावेळी दिव्य कांति असणाऱ्या एका गोऱ्यापान पुरुषाने मला हात देऊन वर काढले.'' मी जागा झालो. नंतर श्री. बाबूराव पुजारी यांच्या सांगण्यावरून मी अनुग्रह घेण्यास श्रीदादामहाराजांचेकडे गेलो. श्रीदादांना पहाताच ''याच पुरुषाने आपणास बुडताना काढले'' ही खूण पटली. इ.स.१९७४ साली मला श्रीदादांचा अनुग्रह झाला.

(२५)

कृष्णाजी शिवराम पटवर्धन, कुरुंदवाड.

दादा स्वप्नात येतात आणि ''येऊन जा'' असे सांगतात. त्यावेळी मी सांगलीस येऊन दादांचे दर्शन घेऊन जातो.

(२६)

केशव गणेश जोशी, पुणे.

इ.स.१९८५ मधील घटना. एका सकाळी मी दादांचेकडे गेलो. मी गप्पच होतो. दादांनी मला विचारले, ''कसला विचार करीत आहात?'' मी सांगितले, ''मी आणि चार शिक्षकांनी १५ वर्षापूर्वी माळगे नावाच्या सराफाकडून, निम्मी रक्कम करारापोटी देऊन, प्लॉट घेतले. पण पुढे माळगेंनी हे प्लॉट पैशाच्या लोभाने डॉ. चोपडे यांना विकले. त्या विषयाची केस चालू आहे. त्याची आज तारीख आहे.'' मग दादांनी थोडावेळ डोळे मिटले व मग ते मला म्हणाले, ''तुमची बाजू सत्याची आहे. डॉ. चोपडे व माळगे हे अगदी वरच्या कोर्टापर्यंत गेले तरी शेवटी निकाल तुमच्या बाजूने होणार. काळजी करू नका'', आमची केस सीनियर कोर्ट, मुंबई हाय कोर्ट, व तेथून सुप्रीम कोर्टापर्यंत गेली. सर्व ठिकाणी दादांनी सांगितल्याप्रमाणे सारे निकाल आमच्या बाजूनेच लागले.

(२७)

गजानन शंकर भंडारे, वानलेसवाडी.

आमच्या घरी चोरी झाली. पण मी आणि सौभाग्यवती दोघेही सुखरूप राहिलो.



(२८)

गणपतराव कोरे, सांगली.

अवधूत सेवा मंडळातून मी दादांचेकडे भजनसेवेस जात असे. त्यावेळी दादांनी जे आशीर्वाद दान दिले त्यामुळे मला आर्थिक अडचणीत कमतरता भासली नाही.

(२९)

कु. गंगा बजरंग हडदरे, सांगली.

''भगवान् शंकराचे मस्तकावरून गंगा तुमच्या घरी आलेली असून तिचे नाव गंगा ठेवा'', असे माझ्या बाबतीत श्रीदादांनी माझे वडिलांना सांगितले. त्याप्रमाणे माझे नाव गंगा असे ठेवण्यात आले.

(३०)

सौ. गायत्री गोविंद कुलकर्णी, बी.ए.,डी.एड्., कोल्हापूर.

ती. दादांच्या दर्शनास गेले असताना, मला उद्देशून श्रीदादा ''रुक्मिणी माता की जय'' असे म्हणाले.

(३१)

सौ. गीतादेवी पांडुरंग पवळ, कवलापूर.

श्रीदादांच्या कृपेने माझे लग्न १ मार्च १९९२ रोजी झाले. श्रीदादा व त्यांचे घरची सर्व मंडळी लग्नासाठी कवलापुरला आली होती.

इ.स.१९९५ मध्ये मी बाळंतपणासाठी सांगलीत माहेरी आले. एकदा सकाळी मी दादांच्या घरी गेले. श्री. रेगोडकर दादांना म्हणाले, ''दादा, या गीताची डेलिव्हरी आहे. तिला काय होणार?'' त्यावर सद्गुरु म्हणाले ''गीताला मुलगा होणार. सीझरिंग करावे लागणार नाही.'' त्याप्रमाणे सीझरिंग न होता मी बाळंत झाले व मला मुलगा झाला.

इ.स.२००१ मधील नागपंचमीचा दिवस होता. संध्याकाळी मला काही काम नव्हते. मी घराच्या टेरेसवर जाऊन 'श्रीराम जयराम जयजयराम' हा जप करीत होते. थोड्या वेळाने माझे लक्ष आकाशाकडे गेले. तेथे नागाचा फणा असणाऱ्या बिछान्यावर पहुडलेले दादा मला दिसले. त्यांच्या शेजारीच निंबरगीकरमहाराज होते. दादा सरकत तासगावच्या बाजूला जाऊ लागले. मला फार आश्चर्य वाटले. तितक्यात रात्री ८ वाजता सांगलीहून दादांनी

वैकुंठगमन केल्याचा फोन मला आला. मी दादांच्या अंतिम दर्शनासाठी तत्काळ सांगलीला गेले.

(३२)

गुरुनाथ कृष्णा शिंगाडे, सांगली.

मी सध्या वालचंद कॉलेजला शिकत आहे. दि.१५-८-२००२ चा दिवस. आज काहीतरी चमत्कारिक होणार अशी मला भीती वाटत होती. या दिवशी सकाळी दादांचे दर्शन घेऊन कॉलेजला गेलो. नंतर क्लासमध्ये जाण्यास मी मिरजेला सायकलने गेलो. क्लास संपल्यावर परत येताना समोरून येणारे एक वहान माझ्या सायकला धडकले. मी चेंडूसारखा उंच उडून, रस्त्याकडेच्या मारुती-मंदिराचे रस्त्यावर अलगद पडलो. मी अगदी फुलासारखा खाली पडलो. मला दादांनीच वाचविले.

(३३)

गुरुनाथ शरद आपटे, निगडी-पुणे.

मी दादांचा अनुगृहीत आहे. आत्तापर्यंत जीवघेण्या संकटातून सहीसलामत वाचलेलो आहे.

(३४)

गोविंद चिंतामणि ताम्हनकर, सांगली.

सद्गुरुंच्या सहवासात आलेपासून दैनंदिन कामांमध्येही गुंतलो असताना, सद्गरूंचे स्मरण व नामाची आठवण रहाते.

(३५)

चंद्रशेखर बसवराज पट्टणशेट्टी, सांगली.

बुधवार दि. २५-७-२००१ रोजी संध्याकाळी मी कीर्तन ऐकण्यास दादांचे रामनिकेतनमध्ये गेलो होतो. चंद्रशेखरअण्णा पडवीत कीर्तन वाचीत होते. श्रीदादा खोलीत होते. त्यांची सेवा करण्यास मी खोलीत गेलो.''आत्ता काय चालले आहे'' असे दादा मला विचारीत. '' कीर्तन चालले आहे'' असे मी सांगे. त्यावेळी ७.२० वाजता श्रीदादांच्या मस्तकाकडून डाव्या बाजूस 'नील प्रकाशाचा गोल' जात असताना मला दिसला.ते दृश्य पाहून मला अतिशय आश्चर्य वाटले.



दि. २३-८-२००२ रोजी श्रीसद्गुरु दासराममहाराजांनी माझ्या स्वप्नामध्ये श्रीगुरुलिंगगीतेतील 'जगवू मुट्टीवू' हे पद मला म्हणून दाखविले.

(३६)

चंद्रशेखर श्रीकांत ऊर्फ पुरुषोत्तमदास शेडजी, बी.कॉम्., डी. आय्. टी., सांगली.

माझ्या घरात असणाऱ्या दत्तमंदिरात मूर्ति नव्हती, फोटो होता. तिथे मूर्ति बसवावी अशी पाटीलमहाराजांची इच्छा होती. त्या मूर्तीची प्रतिष्ठापना दासराममहाराजांच्या हस्ते करावी, असे पाटीलमहाराजांनी सांगितले होते. नीलकंठभारती बाबांनी जयपूरहून दत्तमूर्ति आणवून घेतली. मग दादांच्या हस्ते दत्तमूर्तीच्या स्थापनेचा कार्यक्रम मोठ्या थाटात झाला. त्यावेळी मूर्तीच्या मिरवणुकीसाठी जो हत्ती आणण्यात आला होता, त्याने श्रीदादांना सलामी दिली.

मला वरचेवर पुण्यास जावे लागे. तिथे गेल्यावर गुंडांचा त्रास होत असे. ते मी श्रीदादांना सांगितले. तेव्हा दादा म्हणाले, ''चंद्रशेखर असे कर. पुण्यात गेलास की कामास जाण्यापूर्वी प. पू. सहस्रबुद्धेमहाराजांच्या मठात जाऊन, प. पू. काकामहाराजांचे दर्शन घेत जा.'' तसे मी करू लागलो. प. पू. काकामहाराजांचे दर्शन होवो अथवा न होवो, मला गुंडांचा त्रास होईनासा झाला.

अनेक अडचणी, संकटे आली. त्यावेळी स्वप्नात अथवा जागृतीमध्ये देहाविना येऊन श्रीदादांनी दर्शन दिले.

(३७)

चूडामणि दादासाहेब चव्हाण, सांगली.

माझ्या मुलाचे-सुहासचे-लग्न दादांचे कृपेने झाले. लग्नात दादा उपस्थित होते. याच लग्नात अपुरे वाटलेले अन्न दादांचे उपस्थितीमुळे पुरे पडले, अशी माझी श्रद्धा आहे.

(३८)

दत्तात्रय यशवंत कर्णेकर, सांगली.

दि. १० जानेवारी, १९९० सालची गोष्ट. मी काही कामासाठी मंगळवेढे येथे गेलो होतो. संध्याकाळी घरची सर्व मंडळी श्रीदादांच्या कीर्तनास गेली होती. इकडे आमचे घरी शॉर्ट सर्किटमुळे घराला आग लागली. तास

गल्लीतील लोकांनी कुलूप तोडून आग विझविली. त्याच वेळी कीर्तनात दादांच्या पायात कळा येत होत्या व ते पाय वर उचलून घेऊन चोळीत होते. आगीचा निरोप मिळाल्यावर घरची मंडळी परत आली. त्यांना आढळले की घरातील सर्व सामान जळून गेले आहे. तथापि त्यांना असेही आढळले की आमच्या घरी असणाऱ्या श्रीदादांच्या चर्मी पादुका, पांडुरंगमहाराज ताम्हनकरांच्या खडावा आणि श्रीस्वामीं समर्थांच्या गारेच्या पादुका हे जिन्नस जसेच्या तसे राहिले होते. हा चमत्कार पाहाण्यास लोकांनी गर्दी केली होती.

रात्री सर्व जण शेजारच्या घरी गेले. त्यावेळी कपडे, अन्न व काही पैसे घेऊन श्रीदादांचे चिरंजीव अनिलप्रभु व दादांचे नातू दीपक आमचेकडे आले. त्यानी सर्वांना धीर दिला.

दुसरे दिवशी सकाळी दादा आमचे घरी आले. त्यांनी शाबूत राहिलेल्या वरील तीन वस्तु पाहिल्या व हात जोडून, ''आमच्या कर्णेकरांचे रक्षण करा,'' असे बोलून ते परत गेले.

दादा मला म्हणत, ''कर्णेकर, काळजी करू नका. तुमचे सर्व काही चांगले होईल. तुमचे नवीन घर होईल.'' दादांनी सांगितल्याप्रमाणे आमचे नवीन घर झाले आहे.

(३९)

दाजीसाहेब शिरगुपकर, परमानंदवाडी.

कै. शंकरमामा शिपुरकर यांच्यामुळे मी प.पू. दादांच्या सांनिध्यात आलो. आणि अधून मधून त्यांच्या सहवासाचा लाभही मी घेतला. त्यामुळे माझी अध्यात्माची गोडी वाढली.

(४०)

दामोदर काशीनाथ थावरे, जी.डी.सी.ए., सोलापूर.

२३-२४ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. मी दासरामांच्या दर्शनास सांगलीस आलो होतो. दुपारी ३-३।। ची वेळ होती. दर्शन घेतले. प्रसन्नता वाटली.

माझा परिचय तत्पूर्वी थोर संत पूजनीय श्री. द. तथा मामा देशपांडे यांनी करून दिला होता.

मी थोडा वेळ दादांच्या पायाशी बसलो. त्यांच्या कीर्तनसेवेबद्दल मला मोठा आदर होता. मला दादा म्हणाले, ''आत्ता आला आहात तर अर्धा तास तरी प्रवचन करा.'' त्यांच्या कृपाशीर्वाद घेऊन मी ''नाम जपयज्ञु तो परम । बाधु न शके स्नानादि कर्म । नामे पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थे ।। '' या ज्ञानदेवांच्या ओवीवर संकोचून बोललो. कारण समोर हिमालयाच्या उंचीचा महापुरुष म्हणजे दासराम बसले होते. प्रवचनानंतर त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरविला. त्यावेळी माझे अंत:करण भरून आले. नयनभरल्या अवस्थेत त्यांचे दर्शन घेऊन मी परतलो. मी ज्या ज्या वेळी सांगलीस जाई, तेव्हा त्यांचे दर्शन घेणेचा माझा परिपाठ होता.



(४१)

दामोदर लक्ष्मण कुंटे, सांगली.

मी गेली २५-३० वर्षे श्रीमहालक्ष्मीचा उकडीचा मुखवटा करतो. त्यावेळी मानसिक ताण येऊन मी घामाघूम होत असे. तीन वर्षापूर्वी इचलकरंजीस मुखवटा करीत असताना, प.पू. श्रीदादा तेथे उपस्थित होते. त्यांचे पायांवर माथा टेकवून मी मुखवटा करावयास बसलो आणि आश्चर्य एकही घामाचा टिपूस न येता, २०-२५ मिनिटांत श्रीमहालक्ष्मी उभी राहू शकली.

(४१-अ)

दिलीप भा. कुलकर्णी, सांगली.

प.पू. दादांचेबद्दल मला लहानपणापासूनच आकर्षण असल्याने मी बराच वेळ त्यांच्या सांनिध्यात असे. दादांनी मला गजानन-विजय हा ग्रंथ वाचण्यास सांगितला. आपला संप्रदाय रामनामाचा, मग प.पू. दादांनी मला गजानन-विजयाचे वाचन करण्यास का सांगितले ही माझी शंका त्याच रात्री दादांनी स्वप्नात निरसन केली. दादा स्वप्नात मला म्हणाले, ''मी व गजाननमहाराज एकच आहोत.''

दादांनी संध्याकाळी देह ठेवला. त्यानंतर बऱ्याच वेळाने त्यांच्या कपाळावर घाम आलेला माझ्या पहाण्यात आला होता.

(४२)

दिलीप माधव लेले आणि सौ. सुप्रिया लेले, सांगली.

मला क्लासच्या जागेसाठी २ लाख रुपये भरावयाचे होते. श्री. डी. व्ही. जोशी यांनी सांगितले की दासरामांचेकडे जा. म्हणून आम्ही दोघेही

दादांच्याकडे गेलो. अनुग्रह घेतला. क्लासच्या जागेचे काम झाले.

आमची मुलगी खूप आजारी होती. दासरामांचेकडे गेलो. त्यांनी सांगितले की मुलगी बरी होईल. त्याप्रमाणे मुलगी बरी झाली.

प्रत्येक संकटात श्रीदादांचे स्मरण करतो. संकट निवारण होते. त्यांच्या आशीर्वादाने आत्तापर्यंत सारे काही सुरळीत पार पडले.

कठिण काळात आमच्या कुलदैवताचा जप करण्यास श्रीदासरामांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे केल्यावर कठिण प्रसंगातून सहीसलामत बाहेर पडलो.

(४३)

धनंजय सदाशिव भावे, कोल्हापूर.

ती. मामांच्या पुण्यतिथीच्या दिवशी आलेल्या भक्तांना महाप्रसाद असे. त्यावेळी श्रीमामांच्या घरच्या पलीकडील गल्लीतील बोर्डावर कुणीतरी लिहून ठेवले:- ''आज केळकारांकडे मुक्त द्वार जेवण आहे.'' परिणामी प्रसादाच्या पंक्ति संपेनात. संध्याकाळचे पाच वाजले. मग आम्ही श्रीदादांना विनंति केली. पुन्हा स्वयंपाकाची भांडी चुलीवर चढली. श्रीदादांनी खिरीचा रवा एका पातेल्यातून आणण्यास सांगितले. ते पातेले दादांनी मामामहाराजांच्या सिंहासनासमोर ठेवून प्रार्थना केली. मग दादांनी सांगितले,''आता तयार होणाऱ्या खिरीत या पातेल्यातील रवा घाला आणि स्वयंपाक झाला की पंक्ति वाढा''. त्याप्रमाणे पंक्ति वाढण्यास सुरवात झाली आणि आश्चर्य ! पुन्हा स्वयंपाक करावा लागला नाही. पंक्ति संपल्यावरही पुन: अन्न उरले.

तात्या कुलकर्णी यांच्या विनंतीवरून पुण्याचे गुळवणीमहाराज हे श्रीदादांचेकडे आले होते. त्यांच्या पायावर दादांनी मस्तक ठेवले. त्यानंतर गुळवणीमहाराज म्हणाले,''रामभाऊ, माझ्या कुणी पाया पडला की मी माझी शक्ति त्याच्यात घालतो. आता तुम्ही पाया पडला तेव्हा मी तसे केले. परंतु माझी शक्ति माझ्याकडेच परत आली.''

(४४)

न. ना. गोखले, एम्. ए., सांगली.

मी इ.स. १९८५ मध्ये विटे येथून सांगलीस बदली होऊन आलो. माझे मित्र रमेश देशपांडे यांच्या बरोबर मी दादांच्या कीर्तनाला गेलो. मला



जाणवले की दादा माझ्याकडे पहात आहेत. त्या दृष्टिद्वारे त्यांनी माझ्यासारख्या विकारांच्या गर्तेत सापडलेल्या माणसाला त्यांच्यापर्यंत येण्याइतका शुद्ध करून घेतला. पुढे एप्रिल १९८७ मध्ये मी दादांचा अनुग्रह घेतला.

माझ्या अंतरंगात त्यांच्या कृपेने खूपच फरक पडला.

एप्रिल १९९६ मध्ये मला जबरदस्त हार्ट ॲटॅक आला. मला मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. तेथे असताना आपले काही बरे वाईट होईल असा विचारसुद्धा माझ्या मनात आला नाही. माझ्या रक्तात गाठ झाली होती. दादांनी अंगारा पाठवून दिला होता व तो चहातून थोडा थोडा घेण्यास सांगितले होते. पुढे मला पुण्यास नेण्यात आले. तेथे ज्या तपासण्या झाल्या त्यामध्ये त्या गाठीचा मागमूसही नव्हता.

(४५)

नंदकुमार महीपत दिवाण, बी. कॉम्., सांगली.

श्रीगुरुमाऊली केळकरमहाराजांच्या कृपाछत्राखाली सर्व काही आबादी आबाद आहे.

(४६)

नारायण खंडो कुलकर्णी, डी. सी. ई., सांगली.

ब्रह्मचैतन्य गोंदवलेकरांचा मी अनुगृहीत आहे. मी सांगलीत रहातो. प.पू. दादा हे माझे श्रद्धास्थान झाले आहेत.

(४७)

नारायण रघुनाथ देशपांडे, बी. एस्. सी., एल्. एल्.बी., मिरज.

मेंदूवर असलेल्या अतिरिक्त विचारांचा प्रभाव कमी झाला. नामस्मरणावर श्रद्धा बसली. अध्यात्म हा केवळ संशोधनाचा विषय नसून तो जीवन- साधनेच्या अंगाने अखंड आत्मप्रचीतीचा भाग होतो, अशी समज व उमज आली.

(४८)

नारायण रामचंद्र बोर्गीकर, बी. कॉम्., जी. डी. सी. अँड ए, सांगली.

मी दादांचा अनुगृहीत आहे. एका गुरुपौर्णिमेच्या दिवशी मी कामानिमित्त परगावी गेलो होतो. त्यामुळे दादांचे दर्शन घेता आले नाही. पण

तेथेच रात्री स्वप्नात येऊन दादांनी मला आशीर्वाद दिला. जाग आल्यावर माझ्या डोळ्यात आनंदाश्रु आले.

(४९)

निवृत्ति वासुदेव बोधे, व सौ. निर्मला निवृत्ति बोधे, सांगली.

फलटण या गावी आमच्या द्वितीय पुत्राचे लग्न आटोपून आम्ही सांगलीस एस्. टी. ने परत येत होतो. वाटेत वादळ झाले व जोराचा पाऊस आला. एस्. टी. पुढे जाईना. वाटेतच थांबावे लागले. ती जागा चोर व लुटारू यांचा त्रास होणारी होती. आम्ही दासरामांचा धावा केला. हळुहळु पाऊस आणि वादळ थांबले. एस्. टी. निघाली. आम्ही सुटकेचा श्वास सोडला. दादांच्यामुळे आमचेवरचे संकट टळले.

(५०)

सौ. निशा बापट, डोंबिवली.

मंगळवार दि. १९-५-१९८१ रोजी रात्री बरोबर बारा वाजता अर्धवट निद्रित अवस्थेत असताना एका जुन्या वाड्याच्या प्रवेशद्वारात मी उभी होते. तेवढ्यात दादा समोरून येताना दिसले. मग जरा टप्प्यात आल्यावर मला म्हणाले,''कसे काय? व्यवस्थित चालले आहे ना? नीट सांभाळून रहा.''

(५१)

नीलकंठ हरि कुलकर्णी, रिटायर्ड डेप्युटी पोस्टमास्टर, सांगली.

मी मामासाहेब देशपांडे यांचा अनुगृहीत आहे. सांगलीत असल्याने मी दादामहाराजांचे कीर्तनास जाई. ५-६ वर्षापूर्वी आमच्या आटके या मूळ गावी जाऊन, मी गुरुचरित्राचे पारायण सुरू केले. दुसरे तिसरे दिवशी मला दृष्टांतात माझ्या समोर धोतर, शर्ट, टोपी व कोट परिधान केलेले दासराम दिसले. मी त्यांना नमस्कार केला. प.पू. दादांना कोट घातलेले मी कधी पाहिले नव्हते. सांगलीस परत आल्यावर मी दादांना सर्व सांगितले. ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी जवळच्या शेल्फमधील 'श्रीदासरामवचनामृत' हे पुस्तक मला दिले. मी घरी येऊन पुस्तक उघडून पहातो तो त्यामध्ये मला दर्शन दिलेल्या स्वरूपातील प.पू. दादांचा फोटो होता.



(५२)

सौ. नीलप्रभा रवींद्र भाकरे, बुधगाव.

मी अनुग्रह घेण्यापूर्वी दादामहाराज घरी आले होते. त्यानंतर ते आमच्या घरासमोर ज्ञानेश्वर-पारायण-प्रसंगी आले. पण तब्येतीच्या कारणाने ते आमच्याकडे आले नाहीत. त्यामुळे''माझ्या अनुग्रहानंतर दादा आमचे घरी आले नाहीत'' ही खंत माझ्या मनात होती. एकदा मला स्वप्न पडले. श्रीदादामहाराज आमच्या घरी येऊन कॅाटवर बसले आहेत. तेव्हा मी माझ्या यजमानांना म्हटले,''अहो जोशीमामांना बोलवा. आपण दादांची पाद्यपूजा करू.''

(५३)

सौ. पद्मजा श्रीनिवास देशपांडे, एम्. ए., माधवनगर.

माझ्या पतींचे प्रकृति अस्वास्थ्य निर्माण झाले होते. सांगलीतील बरेच डॉक्टर झाले. पण सर्वांच्या मते काही दोष नाही असे होते. पुढे दादांच्याकडे जाऊ लागल्यावर माझ्या पतीच्या प्रकृतीत आराम पडला. व मानसिक स्वास्थ्य लाभले.

(५४)

श्रीमती पद्मावती विनायक कुंटे, सांगली.

मी श्रीदादांची अनुगृहीत आहे. एकदा मी नाशिकला गेले होते. तेथे मला दासराममहाराजांनी दर्शन दिले.

(५५)

सौ. पुष्पलता विठ्ठल देवळेकर, सांगली.

मला पूर्वीपासूनच भक्तीची आवड होती. मी नवनाथाची पोथी वाचत असे. एक दिवस मला स्वप्न पडले. औंदुबराच्या राईत मला एक चेहरा दिसला. तो चेहरा कोठे दिसेल असा विचार त्या दिवसापासून माझ्या मनात येत होता. एके दिवशी सौ.भंडारे वहिनी माझ्याकडे आल्या, व बोलता बोलता त्या म्हणाल्या, ''मी दादांच्याकडे चालले आहे.'' तेव्हा मीही त्यांच्या बरोबर दादांच्या राममंदिरात आले. तेथे दादांना पाहिल्यावर हाच चेहरा औंदुबराच्या राईत मला दिसला होता हे लक्षात आले. त्या दिवसापासून मी रोज दादांच्या दर्शनास जाऊ लागले. घरात कुठेही संकटे आली की दादा मला मार्ग दाखवितात.

(५६)

पुष्पावती मनोहर बोधे, सांगली.

मी नेहमीप्रमाणे भिशी भरण्यासाठी रू.१५०००/- बरोबर घेऊन निघाले. जाताना बाजारात थोडी खरेदी करण्याचे ठरविले. भाजी घेऊन एका फरसाणाच्या दुकानातून थोडी शेव घेणेसाठी एका दुकानात गेले. तेथे दोन मुले होती. शेव घेऊन घरी आले. त्यावेळी भिशीची रक्कम असलेली पर्स त्या दुकानातच विसरली. घरी परत आल्यावर ५-६ तासांनी भिशीची आठवण झाली. पण घरी पर्स दिसेना. मी घाबरून गेले. घरातील दासरामांचे फोटोपुढे कापूर लावून पर्स परत मिळावी म्हणून प्रार्थना केली. मी पुन: बाजारात गेले. शेव घेतलेल्या दुकानात मुलांचे वडिल होते. मी त्यांना पर्सबद्दल विचारले. त्यांनी पर्सच्या खाणाखुणा विचारल्या, व पर्स असल्याचे सांगितले. पर्स घेऊन मी घरी आले व दादांचेकडे जाऊन त्यांना सांगितले.''दादा, तुमच्यामुळे मला पर्स मिळाली.'' दादांच्यामुळे मी संकटातून मुक्त झाले.

माझ्या आजारी पतींना दवाखान्यात ठेवलेले होते. त्यावेळी दादांचा फोन आला की काही अडचण आहे का ? मी सांगितले की जेवणाची अडचण आहे. 'सगळे ठीक होईल ' असे दादा म्हणाले. संध्याकाळी दादांची अनुगृहीत असलेल्या एका स्त्रीने शेवटपर्यंत आमच्या जेवणाची सोय केली.

(५७)

सौ. पूजा संजीव मराठे, बी. एस्.सी.(ऑनर्स), इचलकरंजी.

माझे वडिल श्री. शशिकांत गजानन मायदेव हे दादांचे अनुगृहीत. ते नागपूर मध्यवर्ती कारागृहात तुरुंगाधिकारी होते. आजारपणामुळे ते तेरा दिवस खासगी हॉस्पिटलात ॲडमिट होते. माझी आई रात्री दवाखान्यात रहात असे. मी रात्री घरात एकटी म्हणून आईला काळजी वाटायची. हे तिने मला बोलूनही दाखवले. त्यावेळी मी तिला सांगितले,''आई, रात्रभर दादा घरात आहेत असा अनुभव मला येतो.''

(५८)

प्रकाश शंकर पाटील, बी. ए., एल्. एल्. बी., सांगली.

निर्व्यसनी, निष्काळजी व निरोगी (शरीर व मनाने) झालो. परमार्थाविषयी आवड व जिज्ञासा निर्माण झाली.



(५९)

प्रसाद खंडेराव कुलकर्णी, बी.ई., मिरज.

माझ्या प्रत्येक संकटात दादांनी मला तारलेले आहे. आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी दाखविलेल्या मार्गाने रहाणे हेच माझ्या जीवनाचे उदिष्ट आहे.

(६०)

बजरंग रामराव हडदरे, बी. कॉम., सांगली.

मी, माझे आईवडिल, पत्नी व चारही मुले हे सर्व प. पू. दादांचे अनुगृहीत आहोत.

दि.५-४-८९, पाडवा, या रोजी प.पू. दादांनी आपणहून आपल्या चंदनाच्या पादुकांची आमचे घरी स्थापना केली आहे. व ते घरीच वस्ती करून राहिले आहेत. पुढे दर पाडव्यास दादा आमचे घरी येत. हेच आमचे खरे भाग्य आहे.

आम्ही घरची सर्व मंडळी दादांची परवानगी घेऊन, यल्लम्मादेवीचे दर्शनास जाऊन आलो. घरी रात्री मला स्वप्न पडले. स्वप्नात मी दादांचे घरी गेलो होतो. दादा खुर्चीवर बसले होते. त्यावेळी दादा एकदा स्वत:च्या रूपात आणि एकदा यल्लम्मादेवीच्या रूपात मला वरचेवर दिसले. सकाळी मी दादांचेकडे गेलो व त्यांना माझे स्वप्न सांगितले. तेव्हा दादा म्हणाले,''मी आणि देवी वेगळे नाही आहोत, ते आम्ही एकच आहोत, याचे दर्शन तुम्हांस झाले.''

(६१)

बाबासाहेब दादासाहेब महाजन, बुधगाव.

मी इ.स.१९७४-७५ सालापासून श्रीदादामहाराज यांचेकडे जात असे. मला व माझ्या पत्नीला दि. २३-११-७८ रोजी श्रीसद्गुरु दादामहाराज यांचा अनुग्रह मिळाला त्या दिवसापासून आमच्या जीवनास कलाटणी मिळाली. आमच्या कुटुंबास चांगले दिवस येणेस सुरवात झाली.

मी पूर्वी व्यसनाधीन होतो पण दादांच्या कृपाशीर्वादाने, त्यांच्या आध्यात्मिक आधिपत्याखाली असल्यामुळे मी व्यसनमुक्त झालो.

(६२)

बेबी लक्ष्मण चव्हाण, सांगली.

दादा असताना आम्हाला सुखासमाधानाचे अनुभव आले आहेत.

दासरामांनी देह ठेवल्यानंतर त्यांनी स्वप्नात येऊन मला सांगितले,''चंद्रशेखरअण्णांचेकडून श्रीगुरुलिंगगीता घे व तू ती वाचीत जा.''

(६३)

भ. रा. नाईक, एम, एड्., पुणे.

अनेक वेळा होणारे दासरामांचे समक्ष दर्शन आणि छायाचित्रातून होणारे सुप्रसन्न, बालसुलभ, दिलासा देणारे हास्य या, व अशा आनंददायी दर्शनाची गोष्ट ही एक पूर्व सुकृताने लाभलेली ठेव आहे असे वाटत आले.

(६४)

भाऊसाहेब अण्णासाहेब रसाळ, जुना बुधगाव रोड, सांगली.

मला कंबरेचे दुखणे होते. डॉक्टरी इलाज केला नाही. दादांचेकडे येऊन दोन वेळा हनुमान स्तोत्र पठण करणे व दादांनी दिलेले भस्म लावणे या नियमाने माझी कंबरदुखी बरीच कमी झाली.

(६५)

सौ. भागीरथी श्रीपती धोंगडे, सांगलीवाडी.

ध्यानाच्या वेळेला प.पू. दासरामांचे दर्शन नेहमी होते.

(६६)

भा. ल. रानडे, बी. ए. (ऑनर्स), सांगली.

दादांच्या सहस्रचंद्रदर्शन समारंभ प्रसंगी मी ११ रुपये दादांना देऊ लागलो. श्रीदादांनी आणखी दोन तीन रुपये त्यात घालून मला परत दिले.

दादांची दृष्टी संकुचित नव्हती त्यांचा लोकसंग्रह दांडगा होता. त्यांची स्थितप्रज्ञता व ज्ञानतपस्या आदरणीय होती.

(६७)

मकरंद यशवंत नानिवडेकर, बी.ई., विश्रामबाग, सांगली.

स्वप्नात दादांचे दर्शन होते.

(६८)

मधुकर शंकरराव शिपुरकर, एम्. ए., डी. आय्. टी., कोल्हापूर.

माझे वडील कै. ती. शंकरमामा शिपुरकर यांचे आज्ञेप्रमाणे मी दादांचेकडून अनुग्रह घ्यायचा असे ठरले. त्याप्रमाणे दादांचेकडे आलो. ती. दादांनी मला आपल्या समोर बसविले, मांडी घालून बसण्यास सांगितले. मी



तसे बसल्यावर, त्यांनी माझे डोक्यावर''हात'' ठेवला आणि ''हाता''चा तळवा बरोबर मध्यभागी हळुवार स्पर्श करेल असा ठेवला व थोडेसे वाकून माझ्या डाव्या कानात प.पू. दादा म्हणाले,''मधुकरराव, तुमचा नेहमीचाच मंत्र म्हणा बरं''. मी ''मंत्र'' पुटपुटला आणि काय ! एका क्षणात माझ्या शरीरातून एक वीज सळाळत गेली. मी ती. दादांच्या पायावर साष्टांग नमस्कार घातला. तसाच मी दादांच्या पायावर उत्ताणा झालो व मला माझ्या समोर चिमड संप्रदायाची सारी परंपरा गोलाकार उभी राहिलेली दिसली.... एकंदरीत हा अनुभव अभूतपूर्व व अननुभूत असाच होता.... ती दादांनी डोक्यावर हात ठेवल्यानंतर जो संचार झाला त्याला तोड नाही.

(६९)

महादेव रघुनाथ कुलकर्णी, चिंचवड.

मी रोज जेवणापूर्वी पुढील श्लोक म्हणतो:-

कुरुंदवाडी जन्म जयाचा। रामकृपेचाच प्रसाद साचा ।
म्हणोनीच रामराय नाव जयांना। वंदीन भावे चरण-द्वयांना ॥

मी जेव्हा सांगलीत होतो तेव्हा मी दादांचेकडे जात असे. आता मी चिंचवड येथे आहे. दादांचे दर्शन व्हावे अशी ज्यावेळी इच्छा होते, त्या त्या वेळी स्वप्नात श्रीदादांचे दर्शन होते.

(७०)

सौ. मंगल रमेश देशपांडे, विश्रामबाग, सांगली.

दादांनी रोज नामस्मरण करण्यास सांगितले. मी रोज नामस्मरण लिहून काढू लागले.

(७१)

सौ. मंगला प्रतापराव कदम, सांगली.

एके दिवशी दादांचे राममंदिरात रामपाठाचे पठण चालू असताना, मी दादांचे दर्शन घेत होते. त्यावेळी मी मनात म्हणत होते,''दादा, माझे मनातील त्रासदायक विचार काढून टाका. तुमच्या चरणांशिवाय मला काही नको.'' असे मनात म्हणत मी दादांचे पायावर डोके ठेवले. मला अश्रु आवरत नव्हते. दादांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. माझ्या मनातील सर्व वाईट विचार दादांनी काढून टाकले.

(७२)

सौ. मंजुश्री सुधीर कुलकर्णी, बी. ए., इचलकरंजी.

स्वप्नात दादांचे दर्शन होते.

(७३)

श्रीमती (माणिक) पार्वती शंकर चाळेकर, सांगली.

माझ्या माहेरातील सर्वजण दादांच्या या गुरुमार्गातच आहेत. माझे मिस्टर शंकर रा. चाळेकर हे सकाळी श्रीदादांच्याकडे आरतीला जात असत.

माझ्या घरामध्ये इ.स. २००२ साली ज्या वारंवार तक्रारी व भांडणे होत होती ती दासरामांच्या कृपेमुळे बंद झाली.

माझ्या सूनबाईला खूप मोठा आजार होता. दादांच्या कृपेमुळे माझ्या सूनबाईची तब्येत चांगली झाली.

(७४)

सौ. माधवी धनंजय भावे, कोल्हापूर.

इ.स. १९७९ मध्ये माझ्या दोन मुलांच्या मुंजी झाल्या. मुंजी झाल्यावर घरी बोडण भरण्याचे ठरले ''कार्याचे बोडण घरीच करा मंगळवारी. त्या दिवशी तुमच्या घरी काहीतरी विशेष घडेल,'' असे श्रीदादा म्हणाले. तसेच 'शिवलिंगव्वा या तळहातावर कापूर पेटवून सद्गुरूंची आरती करत' हा प्रसंगही दादांनी सांगितला.

आमच्याकडचा बोडणाचा कार्यक्रम झाला. आरतीचे वेळी मला संचार झाला, आणि मी ''माझे हातावर कापूर पेटवा '' असे सांगितले. परंतु तसे करण्यास जवळच्या मंडळींना धीर होईना. तेव्हा दादांनी सांगितलेली शिवलिंगव्वांची गोष्ट आठवून, माझे हातावर कापूर पेटवून मी आरती केली. आणि आश्चर्य म्हणजे माझ्या हाताला काहीसुद्धा झाले नाही.

(७५)

सौ. माधुरी महादेव भागवत,बी.ए., टी. डी., रत्नागिरी.

दि. १८ ऑगष्ट १९८२ या दिवशी माझे पति डॉ. महादेव भागवत यांना रात्री हार्ट अॅटॅक आला. त्यानंतर तपासणी करून घेण्यास आम्ही मिरजेस जाण्यास निघालो. वाटेत श्रीदादांचे दर्शन घेऊन, त्यांना सर्व सांगितले. श्रीदादा म्हणाले,''तुम्ही मिरजेला तपासणी करून घ्या. पण काही सापडणार नाही.'' पुढे मिरजेत तपासणी झाली. काही सापडले नाही. दादांचे शब्द तंतोतंत खरे ठरले.



सांगलीपासून दूर रत्नागिरि येथे मी रहाते. कधी वाटते की मी श्रीदादांचे चिंतन करते, पण त्यांचे आपणांकडे लक्ष तरी असेल काय? असा विचार एक दिवस मनात आला. दुसरे दिवशी पहाटे प.पू. दादा स्वप्नात येऊन म्हणाले,''आधी पूजा कर. मग मानसपूजा कर.'' त्या दिवसापासून आजपर्यंत मी सर्व पूजा झाल्यावर मानसपूजा करीत आहे.''

(७६)

सौ. माया केशव आपटे, बी. ए., हिंदी सनद, विश्रामबाग, सांगली.

इ.स. १९९८ च्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी दुपारी झोपले असता स्वप्न पडले. प.पू. दादा विश्रामबागेत कोणाकडे तरी आले होते. तेव्हा ते म्हणाले, ''आपण येथपर्यंत आलो आहोत तर आता केशवच्या घरी जाऊ.'' केशव हे माझ्या पतीचे नाव. त्याप्रमाणे दादा रिक्षाने आमचे घरी आले.

(७७)

मुकुंद शंकर सहस्रबुद्धे, सांगली.

तत्त्व पहाताना तपशील बाजूला केला नाही तर अनर्थ ओढवतो. अशा वेळी श्रीसद्गुरुच त्यातूनही सुटका करतात.

(७८)

कु. मुक्ता कृष्णा शिंगाडे, बी. ए., सांगली.

आमच्या घरात दादांच्या पादुका आहेत. त्यांचे दर्शन घेतले, त्यांचे नामस्मरण केले तर दिवस कसा गेला समजत नाही.

गेली अनेक वर्षे दादांच्या पादुकांची आरती व नेम घरी असल्यामुळे आमचे घरात सुख-शांति-समाधान आहे.

(७९)

सौ. मेधा लक्ष्मीकांत मोघे, बी.ए., कोल्हापूर.

पुढे काही संकट येणार असेल तर त्याची पूर्वसूचना वेळोवेळी मिळालेली आहे.

(८०)

कु. यमुना कृष्णा शिंगाडे, बी.एस्सी., सांगली.

दादांच्या छायेत आम्हा सर्वांना सुख-शांति-समाधान लाभते.

सुखाच्या वेळी दादांच्या स्मरणाने सुख द्विगुणित होते, तर संकटाच्या वेळी दादांच्या नामस्मरणाने ते संकट त्वरित दूर होते.

(८१)

सौ. यमुना नारायण आमणे, बुधगाव.

लातूर विभागातील खिलारी येथील दि. २३-३-९५ ची भूकंपाची घटना. भूकंपाच्या रात्री ५.४५ वाजता मला स्वप्न पडले. स्वप्नात दादामहाराज आले. दादा म्हणाले,''तुम्ही अजिबात भिऊ नका. मी त्रिकाल तुमच्या घरी वास्तव्य करून आहे. घाबरू नका.'' तेवढ्यात ५.५५ वाजता भूकंपाने मी जागी झाले. जणु दादा''सावध रहा'' असे सुचविण्यासाठीच आले होते.

आम्ही जप करण्यास बसल्यानंतर, दादा आमच्या समोर येऊन दर्शन देऊन जातात.

(८२)

सौ. रजनी शशिकांत मायदेव, एस्. एस्. सी., एस्. टी. सी., डी. एड्., कोल्हापूर.

ती. दादांच्या कृपेमुळे सौ. पूजा संजीव मराठे ही कन्या मला झाली. माझ्या पतीला झालेला अपघात, आजार हे सर्व दादांच्या कृपेमुळे दूर होऊन ते जीवनात उभे राहिले.

मी जेव्हा जेव्हा कलावती आईंचे भजनास जाते, तेव्हा तेव्हा मला सद्गुरु दादांचे दर्शन घडते.

(८३)

रमेश व्यंकटेश देशपांडे, स्थापत्य आभियांत्रिकी पदविका, विश्रामबाग, सांगली.

दादांनी रोज नामस्मरण करण्यास सांगितले. नामस्मरण रोज होत असलेने एक प्रकारचा आनंद मिळतो.

माझ्या स्वभावात किंचित् फरक होत आहे.

(८४)

र. रा. जाधव, सांगली.

दि.१६-११-७९ रोजी माझे वडिल गेल्यावर श्रीदादा मजकडे आले होते.



त्यांना पहाताच मला रडू कोसळले. तेव्हा दादा मला म्हणाले,''माझ्या इतर मुलांप्रमाणे तूही माझा मुलगा आहेस.''

रोज पूजनासाठी मला दादांच्या पादुका करून घ्यावयाच्या होत्या तसे मी दादांना विचारले. त्यांच्या संमतीने त्यांचे पायाचे माप घेऊन मी पादुका करवून घेतल्या. दि. १०-६-८८ रोजी पादुकांची माझ्या घरी स्थापना केली. तेव्हापासून मी रोज त्यांचे पूजन करतो.

(८५)

रविंद्र महादेव कुलकर्णी, बी. कॉम्.(ऑनर्स), कोल्हापूर.

ऑफिसच्या कामानिमित्त मी पुणे येथे गेलो होतो. माझ्या एका स्नेह्याने मला सांगितले की येथे रेणुका श्रीधर प्रतिष्ठान आहे, व तेथे आज आरती व प्रसाद आहे. मी तेथे गेलो. मला तीर्थ देताना पृथ्वीराज भालेराव यांनी मला सांगितले, ''दादांना माझा नमस्कार सांग.'' ते पुढे म्हणाले, ''तू तुझ्या गुरूंना दादा म्हणतोस ना?'' मी ''होय'' असे म्हणालो. ते आणखी मला म्हणाले ''अरे, तू ज्यावेळी देवाला नमस्कार करीत होतास त्यावेळी मी दादांना तुझ्या पाठीशी पाहिले. म्हणून मी तुझ्या बरोबर निरोप देत आहे. ''हे ऐकल्यावर मला गुरूंच्या सांनिध्याची प्रचीति आली, व माझे डोळे भरून आले.''

(८६)

रवींद्र विठ्ठल पाटील, प्राध्यापक एम्. एस्सी., विश्रामबाग, सांगली.

एकदा मी पत्नीबरोबर रामनिकेतनमध्ये गेलो. मी मधल्या दारात उभा होतो. दादा म्हणाले, ''या आत. तुम्हाला अनुग्रह द्यायचा आहे.'' पुढे कै. वि. गो. पाटील मास्तरांचा मी मुलगा आहे ही ओळख पटल्यावर श्रीदादा म्हणाले, ''पाटील मास्तर मला वर्गात मुलांसमोर उभे करून संतांच्या अभंगांचा आध्यात्मिक अर्थ सांगायला लावत.'' ही आठवण दादांनी सिटी हायस्कूलच्या सुवर्णमहोत्सवी अंकामध्येसुद्धा दिली आहे.

(८७)

रंगनाथ (आनंद) रघुनाथ धारवाडकर, बी. एस्सी., सांगली.

एके दिवशी मी दादांचे कीर्तनास गेलो असताना,''उद्या सकाळी ये'' असे दादा मला म्हणाले. तो दिवस होता सोमवार, ४ नोव्हेंबर १९८५. दादा जेथे झोपत त्या पडवीत दादांनी मला नेले व माझे डोक्यावर हात ठेवला.

मला वीजप्रवाह गेल्यासारखे झाले. अनुग्रह झाला.

मी सायन्सचा विद्यार्थी. स्वभावाने चिकित्सक. दुसऱ्याचे दोष लागलीच टिपणारा. रागीट, तापट असा मी. पण दादांचा अनुगृहीत झाल्यापासून ''राग आवर, नाम घे,'' असा बोध होऊन, माझा स्वभाव पालटण्यास सुरवात झाली.

(८८)

सौ. रंजना बजरंग हडदरे, सांगली.

मी एकदा दादांचे दर्शनास आले असता, दादांनी ''माझी लाडकी लेक आली आहे,'' असे म्हटले. त्यामुळे मला दादांचेकडे आले की माहेरी आलेचे समाधान मिळते.

आम्ही आमच्या घरी दादांची पहिली पाद्यपूजा केली; त्यानंतर दादांचे प्रवचन झाले. प्रवचनात दादा म्हणाले,''श्री. हडदरे यांचे घरी चैतन्याचा साक्षात्कार झाला. सगळीकडे चैतन्यच दिसत आहे.''

प. पू. दादामहाराजांचे पदस्पर्शाने आमचे सर्व घरच पावन झालेले आहे.

प.पू. दादामहाराज समर्थ सद्गुरु आम्हाला भेटले, हेच आमचे भाग्य आहे.

(८९)

रामचंद्र कृष्ण ऐनापुरे, विद्युत् अभियांत्रिकी पदविका, विजयनगर.

एकदा श्रीतुकाराम बीजेच्या दिवशी प. पू. दादांनी माझे घरी दुपारी तासभर प्रवचन केले. त्यात मी एकटाच श्रोता होतो. पण दादा सांगण्यात इतके रंगून गेले होते की त्यांनी मलाही त्यात सामावून घेतले. देहभान विसरून मी प्रवचन ऐकत होतो.

(९०)

रामचंद्र गोपाळ साळुंखे, सांगली.

आमचे घराणे माळकरी आहे. ज्ञानेश्वरी, भागवत यांच्या वाचनाने नामस्मरण घडू लागले. गु. दादांची भेट झाल्यावर खऱ्या अर्थाने साधन सुरू झाले. इ.स. १९४६ पासून मी मामांच्या कीर्तनास जाऊ लागलो. कीर्तन झाल्यावर दादांचे बरोबर समाधि मंदिरापर्यंत फिरावयास जात असे.



इ.स. १९५२ साली श्रीदादा पुण्यास नारद मंदिरात कीर्तनास गेले होते. त्यावेळीही त्यांचे बरोबर मी गेलो होतो.

इ.स. १९५२ पूर्वी काही काळ श्रीदादांचे डोके तापत असे. त्यांचे डोक्याला तेल चोळण्याची संधि मला मिळाली. तेल लावल्यानंतर शांत वाटते असे ते म्हणावयाचे.

१९६८ साली माझे घरी रात्री ९ते१० पर्यंत श्रीदादांची हरिपाठावर प्रवचने होत. त्यांतील काही मी लिहून घेतली व ती चंद्रशेखरअण्णांचे कडे दिली.

रामनिकेतनमध्ये तुकाराममहाराजांच्या बारा अभंगावर दादांची जी कीर्तने झाली त्यांच्या कॅसेट मी तयार करून घेतल्या व त्या चंद्रशेखरअण्णा यांना दिल्या आहेत.

दादांच्या कीर्तनातील काही महत्त्वाची वाक्ये अशी :–

सोऽहं ही अवस्था आहे. सोहंचा जप नाही. काहीच करावयाचे नाही इतकेच करावयाचे. गाढ निद्रेत आपण साधु असतो. जागे झालो की द्वैतात येतो.

(९१)

रुक्मिणी शामराव शिंदे, सांगली.

गेली ३५ वर्षे मी दादांच्या कीर्तनास जात होते. दादाही इकडे खण भागात आले की आमच्या घरी येऊन जात.

(९२)

लक्ष्मण नामदेव धुळे, ठाणे.

मी एकदा सांगलीहून ठाण्यास येत होतो. बसचे रिझर्व्हेशन नव्हते. गर्दीचे दिवस असल्याने बसमध्ये उभे रहावे लागले असते. दादांचेकडून निघताना दादांनी सांगितले, ''व्यवस्थित जागा मिळेल.'' बसमध्ये अचानक दोन जागा रिकाम्या झाल्या. माझी बसण्याची सोय झाली.

(९३)

लक्ष्मण भिकाजी कानडे, नौपाडा ठाणे.

काही संकट येणार असल्यास आगाऊ सूचना देणे व संकट निवारण करणे हा अनुभव आहे.

(९४)

लक्ष्मीकांत प्रेमजी शंकरवाला, सांगली.

माझे वडिल प्रेमजी हे दर एकादशीस दासरामांचे दर्शनास जात. एका एकादशीला श्रीदादांनी त्यांना विचारले, ''प्रेमजीभाई, तुम्हास काय पाहिजे ?'' तेव्हा वृद्ध प्रेमजी म्हणाले, ''आजारी वगैरे न पडता सुखाने मरण यावे एवढीच इच्छा आहे.'' श्रीदादा म्हणाले, ''काळजी करू नका. महाराज तुम्हाला सुखरूप सोडवतील.'' इ.स.१९८५ साली कार्तिकी पौर्णिमेनंतर माझ्या वडिलांना ठसका लागल्याचे निमित्त होऊन, ते देवाघरी गेले.

(९५)

लक्ष्मीबाई महादेव माळी, सांगली.

मी रोज दादांच्या कीर्तनाला जाते. परंतु एकाद्या दिवशी नाहीच जमले तर त्या दिवशी दासराममहाराज माझ्या स्वप्नात येऊन दर्शन देतात. दादांच्या दर्शनाने मानसिक शांति लाभते.

(९६)

वसंत म. बापट, मरीन इंजिनियर, डोंबिवली.

श्रीदादांशी माझा संबंध आलेपासून मला माझे वेगळेपण जाणवलेच नाही, व दादांनाही तसे वाटले नाही. ते वरचेवर म्हणत ''बापटलाल, तू तरी केळकर हो, नाहीतर मी बापट होतो.''त्यांचे माझे ऋणानुबंध कित्येक जन्मापासूनचे आहेत, असे ते नेहमी सांगत.

(९७)

वसंत केरोपंत कुलकर्णी, सांगली.

श्री. व. म. बापट हे दादांची कीर्तन-प्रवचने लिहून घेतात हे कळल्यावर मीही दादांची कीर्तने लिहून घेऊ लागलो. अशी असंख्य कीर्तने मजजवळ आहेत.

दादा मला सगुण-निर्गुण रूपात दर्शन देतात.

(९८)

सौ. वसुंधरा वासुदेव देशपांडे, बी.ए., एस्.टी.सी., डी.एड्. सातारा.

मी दादांची अनुगृहीत आहे. माझ्या मिस्टरांना ९ वर्षांपूर्वी मृत्युयोग आहे असे सांगितले होते. मी जप, पूजा-अर्चा सुरू केली. मी दादांना सांगलीस पत्र लिहिले, ''माझ्यावर कृपादृष्टि ठेवा. माझ्या सौभाग्याचे रक्षण करा.'' श्रीदादामहाराजांनी आपल्या सामर्थ्याने काळालाही मागे परतविले. मग आम्ही दोघे दादांच्या दर्शनास गेलो. ते आमचेकडे पाहून हसले.



दरवर्षी फेब्रुवारीत उत्सवासाठी सांगलीस दादांचेकडे येत असे. एके वर्षी ते शक्य नव्हते. तेव्हा दादांनी मला पहाटेच दर्शन दिले.

संकटकाळी व अनेक चांगल्या प्रसंगीही प.पू. दासरामांच्या कृपेचा वरद हस्त सतत माझ्यावर आहे याची मला जाणीव होते.

(९९)

विजय ऊर्फ नारायण नरसिंह जमखिंडी, बी. कॉम्. सांगली.

१९८३ साली मी गॅस्ट्रो कोलायटीस या आजाराने हॉस्पिटलमध्ये होतो. या आजारातून श्रीदासराममहाराज यांनी मला वाचविले.

(१००)

विजयसिंह गोपाळराव सुर्वे, कोल्हापूर.

श्रीदादांच्या होणाऱ्या भेटीगाठी हाच स्मरणीय प्रसंग

(१०१)

सौ. विजया अरविंद खाडिलकर, बी. ए., विलेपार्ले.

मी दादांची अनुगृहीत आहे. माझ्या मुलाचे लग्न संतांच्या उपस्थितीत व्हावे असे असे मला वाटत असे. आणि योगायोग असा की चंद्रशेखरअण्णा केळकर यांच्या अंजनी नावाच्या मुलीशी माझा मुलगा भूषण याचा विवाह झाला. आमच्या भाग्याबद्दल किती सांगू ?

(१०२)

विनोद अण्णाप्पा माने, सांगली.

प्रकृतीच्या व प्रापंचिक अडचणीचे वेळी प.पू. दादा आपले पाठीशी आहेत याची जाणीव होते व धीर येतो.

(१०३)

कु. विमल विठ्ठल मणेरीकर, सांगली.

डिसेंबर १९९७ मध्ये मला प. पू. दासराममहाराजांचा अनुग्रह

झाला. त्यांनी काही जप करण्यास सांगितले. तो आजयर्पंत मी करीत आहे. अशी माझी दिनचर्या चालू असताना मला मन:शांति मिळाली.

(१०४)

विलास मार्तंड कार्लेकर, एम्.बी.बी.एस्., सांगली.

प.पू. श्रीदादांचे सांनिध्यात आल्यानंतर वृत्तीत बदल झाला, व प्रपंचाबरोबरच परमार्थाकडे ओढा वाढला.

(१०५)

विश्वनाथ गो. कुलकर्णी, कोल्हापूर.

माझे मित्र धनंजय भावे यांच्या सूचनेनुसार मी सांगलीस गोविंद नवमीच्या उत्सवास येऊ लागलो. एके वर्षी मी माझ्या घरगुती अडचणीमुळे उत्सवास जाऊ शकलो नाही. नंतर पुढील वर्षी उत्सवास गेल्यावर ''विश्वनाथ, तू गेल्या वर्षी का आला नाहीस ? काही अडचण होती काय ?'' असा प्रश्न दादांनी मला केला. हे वाक्य त्यांनी अत्यंत तन्मयतेने उच्चारले आणि इतक्या गर्दीतही त्यांनी माझी चौकशी केली. अनेक माणसे त्यांचे दर्शन घेत असताना, दादांनी मला आठवणीने विचारले, हे एक विलक्षण स्मरण असेच मला वाटते.

(१०६)

विश्वनाथ दत्तात्रय देवधर, बी.ए., नागपूर.

प.पू. मामा व दादा यांची स्वप्नामध्ये मला अनेक वेळा दर्शने होतात.

(१०७)

सौ. वृंदा दामोदर दिवेकर, संगमनेर.

आम्ही प्रथम सांगलीत रहात होतो. त्यावेळी दादा आमचेकडे येत. एकदा दादा, मी व माझा धाकटा भाऊ शरद व श्री. व. म. बापट हे टांग्यातून तुंग गावच्या मारुतीला निघालो होतो. वाटेत कृष्णानदीच्या पुलावर अचानक शरद टांग्यातून खाली पडला. तथापि त्याला काही दुखापत झाली नाही.

(१०८)

वैशाली गजानन ताडे, एम्. कॉम्. डी. एच्. ई., सांगली.

स्वामी माधवनाथ पुणे यांची मी अनुगृहीत आहे. मी प्रथमच इ.स.१९८२ साली श्रीदादांचेकडे गेले. साधनेच्या दृष्टीने त्यांनी मला मार्गदर्शन केले. मला त्यांचा मोठा आधार वाटतो.



(१०९)

सौ. शर्मिष्ठा सुहास चव्हाण, बी.ए., सांगली.

इ.स.२००० साली गोकुळ अष्टमीचे दिवशी पाळण्यातील नारळ श्रीदादांनी माझे ओटीत घातला. त्यांचे आशीर्वादाने एका वर्षातच मला मुलगा झाला. आणि मग दादांच्या सांगण्याप्रमाणेच मुलाचे नाव श्रीराम असे ठेवले.

(११०)

शशिकांत गजानन मायदेव, एम्.ए., कोल्हापूर.

मी सिटी हायस्कूल, सांगली, मध्ये शिकत असताना ११ वी च्या फॉर्म परीक्षेत नापास झालो. मला फॉर्म मिळाला नाही. दुसरे दिवशी मी दादांचे कडे गेलो. ते पूजा करीत होते. ''फॉर्म भरलास का ?'' असे दादांनी मला विचारले. मी नाही म्हटले. तेव्हा त्यांनी विचारले ''का ? पैसे नाहीत काय ?'' मी म्हणालो ''पैसे नाहीतच. खेरीज मी फॉर्म परीक्षेत नापास झालो आहे. म्हणून मला फॉर्म मिळाला नाही.'' दादांनी मला थांबण्यास सांगितले. पूजा झाल्यावर मला घेऊन ते त्या वेळचे मुख्याध्यापक श्री. भा. द. सहस्रबुद्धे यांचेकडे घेऊन गेले. सहस्रबुद्धे सरांनी दादांना नमस्कार केला व ''काय काम आहे ?'' असे विचारले. दादा म्हणाले ''या मायदेवला फॉर्म मिळाला नाही. तेव्हा तुम्ही त्याला फॉर्म द्यावा असे सांगण्यास मी आलो आहे''. तेव्हा सहस्रबुद्धे म्हणाले, ''हा मायदेव दोन विषयांत नापास आहे. याला फॉर्म कसा देणार ?'' ''काय वाटेल ते झाले तरी तुम्ही याला फॉर्म द्यावा'', श्रीदादा म्हणाले. मग थोडी चर्चा झाली आणि नंतर सहस्रबुद्धे म्हणाले, ''रामा, केवळ तुझ्यामुळे सर्वांचा वाईटपणा पत्करून व नियम बाजूला सारून मी याला फॉर्म देतो.'' लगेच दादांनी आपल्या खिशातून पैसे काढून फॉर्मचे पैसे दिले. माझ्या माहितीप्रमाणे घरून निघताना दादांच्या खिशात पैसे नव्हते परंतु ऐनवेळी त्यांनी पैसे दिले हे खरे. पुढे मी परीक्षा देऊन पास झालो.

(१११)

शंकर कृष्णा फडणीस, सांगली.

माझा धाकटा मुलगा दादांच्याबरोबर बोलत बसला होता. बोलताना त्याच्या लग्नाचा विषय निघाला. मुलगा म्हणाला, ''मला लग्न करावेसे वाटत नाही''. तेव्हा दादा म्हणाले ''तू लग्न करणार आहेस. तुझी बायको

कोल्हापूरची आहे.'' दादांचे हे भाकित खरे झाले.

एकदा दादांचे कीर्तन चालू होते. अचानक कीर्तन थांबवून दादांनी आरती करण्यास सांगितले. दादा म्हणाले,''एक उच्च आत्मज्योति निमाली आहे.'' त्याचवेळी पावस गावच्या स्वरूपानंदानी निर्वाण केले, हे नंतर कळले.

पू. पाटीलमहाराजांचे प.पू. दादांवर अतिशय प्रेम होते. पाटीलमहाराज कधीही कोणाचे कीर्तन अथवा प्रवचन ऐकण्यास जात नसत. ते म्हणत,''कीर्तनकार किंवा प्रवचनकार सर्व काही पोटासाठी करतात, भगवंतासाठी नाही. मात्र याला अपवाद म्हणजे प.पू. दादा.'' अनेकदा पाटीलमहाराज, ''मला दादांच्या कीर्तनाला घेऊन चल'', असे म्हणत. मग आम्ही दोघे दादांच्या कीर्तनाला जात असू.

(११२)

शंकर दत्तात्रय कुलकर्णी, सोनई (जि. अहमदनगर).

श्रीरामराय केळकर यांनी अखंड ईश्वराची भरपूर उपासना व कथा-कीर्तन केले, हे फारच दुर्मिळ समजावे.

(११३)

सौ. शांताबाई संभाजीराव घाटगे, सांगली.

सकाळी मी दादांचे दर्शनास जात असे. दर्शन घेतल्यावर ते एक रुपया माझे हाती देत. व ''पुन: केव्हा येणार?'' असा प्रश्न मला विचारीत. त्यावेळी मी सांगे, ''संध्याकाळी कीर्तनास येणार आहे.''

(११४)

सौ. शालिनी सदानंद शेटे, सांगली.

दादामहाराजांचेकडे येण्यापूर्वी मला मानसिक त्रास होत होता. दादांच्याकडे येऊ लागल्यापासून तो त्रास आता होत नाही. मन संयमी आणि शांत शांत आहे.

(११५)

शिवाजी नि. चव्हाण, विश्रामबाग, सांगली.

दादांचे कीर्तनास गेलो की बॅटरी चार्ज झाल्यासारखे होऊन माझ्या मनाला प्रसन्नता मिळत असे.



माझ्या सौ. नंदिनीदेवी, चि. संग्राम व कु. अंबिका या सर्वांना दादांचा आशीर्वाद आहेच. आमच्या सर्वच घरावर श्रीदादांचे कृपाछत्र आहे, हे वेळोवेळी आम्हां सर्वाना कळून आले आहे.

माझ्या आयुष्यात दादांनी अनेकवेळा मला मार्गदर्शन केले आहे. अत्यंत अडचणीच्या वेळी दादांचे संरक्षक कवच मला लाभले.

भवसागर तरून जाण्यास दादांनी आमचे सर्व घरास दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.

दादांचे अनंत उपकार आमच्यावर आहेत. ते आम्ही कधीही विसरू शकत नाही.

(११६)

कु. शीतल विजय जोशी, बी.ई., सांगली.

प.पू. दासराममहाराजांमुळे निश्चिंत जीवनाची वाटचाल सुरू आहे. आपल्या पाठीशी दादांची जबरदस्त शक्ति उभी असल्याचे अनुभव वारंवार येतात.

(११७)

सौ. शैलजा प्रकाशबापू पाटील, सांगली.

सुमारे १०-१२ वर्षापूर्वी आम्ही श्रीदादांचेकडे आलो. त्यांच्याकडे जाणे येणे वाढले. दादा मला बहीण मानावयाचे. दादांच्यासारख्या महान् व्यक्तीने मला बहीण मानले यातच माझ्या जीवनाचे सार्थक झाले.

एकदा प्रकाशबापूंच्या वाढदिवसादिवशी आम्ही दोघे दादांचे पाया पडणेसाठी आलो होतो. पाया पडल्यानंतर दादा म्हणाले, ''थोडा वेळ लागेल. पण तुम्ही निवडून याल''. त्यानंतर निवडणुका आल्या. आणि प्रकाशबापू खासदार झाले आणि आजही दादांच्या आशीर्वादाने खासदार आहेत.

मा. प्रकाशबापूसाहेबांना दोन वर्षापूर्वी अचानक त्रास झाला आणि आम्हास लंडनला जाण्याची पाळी आली. जाण्यापूर्वी मी दादांच्याकडे आले व त्यांना सर्व काही सांगितले. दादा म्हणाले, ''काही काळजी करू नका. बापूंना काहीही होणार नाही.'' आम्ही लंडनला गेलो व मोठ्या संकटातून वाचून भारतात परत आलो. आज दादांच्या आशीर्वादाने बापूसाहेबांची तब्बेत चांगली आहे.

दादांच्या घराचे आशीर्वाद जन्मभर माझ्या, बापूसाहेबांच्या आणि मुलांच्या पाठीशी आहेत आणि जन्मभर असेच रहावेत हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

(११८)

श्रीनिवास महादेव देशपांडे, माधवनगर.

मी जेव्हा ती. दादांचेकडे जात असे, त्यावेळी त्यांच्या सहवासात एक वेगळा आनंद मिळावयाचा आणि मानसिक समाधान मिळायचे.

(११९)

श्रीपतीराव कृष्णाजी धोंगडे, सांगलीवाडी.

श्रीसद्‌गुरु धोंडीनाथ विनोद, पुणे, यांनी मला सांगितले की योग्य वेळेला तुला साधना मिळेल. त्याप्रमाणे श्रीसद्‌गुरु दासराममहाराजांचेकडून योग्य ती समाधान देणारी साधना मला मिळाली.

(१२०)

सचिन अरविंद खाडिलकर, विलेपार्ले.

सांगलीला माझे आजोळचे घर आहे. माझी आजी तेथे रहात होती. आजीच्या पुढची पिढी मुंबई-पुण्याकडे स्थायिक झाली. माझ्यासाठी सांगलीच्या आजीच्या वाड्याला महत्त्व होते. आजी निवर्तल्यानंतर वाड्याची वाताहात झाली. आजीच्या सामानाची काहीतरी व्यवस्था करावी या दृष्टीने माझ्या सौ. आईने पुढाकार घेतला. तेथले आजीचे सामान दुसऱ्या घरी नेऊन ठेवण्याचे ठरले. सामान हलवायची जबाबदारी मी घेतली. मी सांगलीला गेलो. गडी ठरविण्यास मी शिवाजी मंडईजवळ गेलो. सामान हलविण्यास कोणीच तयार होईना. पण आंध्र प्रदेशातला एक तगडा माणूस पुढे आला व हे काम मी करीन असे म्हणाला. 'सामान कितीही जड असले तरी मी ते एकटा हलवीन,' असे तो मला म्हणाला. १०-१२ खेपांत सर्व सामान हलविले. माजघरात आजीची एक 'खिडकी' म्हणजे कपाटासारखी वस्तु होती. तिला आजीने कुलूप लावलेले होते. कुलूप काढून आतले सामान काढावयाचे होते. किल्ली नव्हती आणि कुलूप मला तोडवत नव्हते. गडी तर सारखी घाई करत होता. कुलूप उघडण्याचे आमचे प्रयत्न अयशस्वी ठरले होते. या प्रसंगी मी दादांचा धावा केला. मी म्हटले, ''आजीचे हे सामान चोरांच्या हाती पडू नये ही माझी



भावना आहे. कुलूप मला तोडावयाचे नाही. आता तुम्हीच मला मार्ग दाखवा.'' हे मी म्हटले आणि दोन मिनिटांत ते कुलूप गळून पडले. ते पाहून गडी चक्रावून गेला.''हे कुलूप निघाले कसे?,'' तो मला विचारू लागला. मी सांगितले ''माझे गुरु दादा कायम माझ्या बरोबर असतात. आणि योग्य त्या गोष्टी करवून घेतात.'' हे सर्व आजही आठवले की अंगावर रोमांच येतात.

(१२१)

सचिन सुभाष मोहिते, बी. ई., व सौ. सुषमा सुभाष मोहिते, पुणे.

दादांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे आत्मविश्वास वाढला.

(१२२)

सतेज सुधाकर केळकर, एम्.ई.(मेकॅ.), सांगली.

काही वैयक्तिक कारणांनी अस्थिर व निराश झालेल्या माझ्या मनाला उभारी आली व माझा आत्मविश्वास वाढला.

(१२३)

सदानंद विठ्ठल बंकापुरे, बी. एस् सी., एअर फोर्स, श्रीनगर (जम्मू).

प. पू. श्रीदासराममहाराजांचे सतत अनुसंधान असते.

२८ एप्रिल २००१ या दिवशी मी श्रीनगरला होतो. मला तेथे मूळव्याधीचा त्रास सुरू झाला. एअर फोर्सचे डॉक्टर रजेवर होते. मला तेथे उपचार मिळेना. माझा त्रास एवढा वाढला की मला सांगलीला रजा घेऊन येणे भाग पडले. सांगलीला आल्यावर लौकरच दादांचे निर्याण झाले. पाच मिनिटे का होईना त्यांना खांदा देण्याचे भाग्य मला लाभले. त्यांनीच जणु मला या प्रसंगासाठी बोलावून घेतले.

(१२४)

सदाशिव बाबूराव माने, सांगली.

इ.स. १९९७ साली मी फार आजारी होतो. नऊ महिने अंथरुणात पडून होतो. अनेक औषधोपचार झाले. नंतर श्रीदादांनी स्वत: आपल्या हाताने माझ्यासाठी अंगारा दिला. माझा आजार दूर झाला. माझा पुनर्जन्म झाला. माझ्या जीवनात कधीही आर्थिक अडचण आली नाही. मला असे वाटते की त्यांचा आशीर्वाद माझ्या संसारावर सदैव आहे.

(१२५)

सौ. सरोज अशोक भिडे, एम्. एस् सी. (केमिस्ट्री), पुणे.

एम्. एस्सी करताना मी होस्टेलमध्येच रहात होते. रोज रात्री स्वप्नात नाग साप दिसायचे. मी घाबरून जात असे. त्यामुळे माझी झोप उडाली. शेवटी मी हे आईला सांगितले. आईने श्रीदादांना सांगितले. दादा म्हणाले,''यापुढे नाही तसे व्हायचे'', आणि त्या दिवसापासून माझ्या स्वप्नात कधीही नाग साप आले नाहीत.

(१२६)

सौ. सरोजिनी जयवंतराव मोरे, एस्.एस्. सी., डी. एड्., सांगली.

दादांची मूर्ति डोळ्यासमोर आली की सर्व क्लेश दूर होतात.

(१२७)

सौ. सविता गोविंद ताम्हनकर, सांगली.

श्रीदादा अनंतात विलीन झाल्यावर, ते वायुवेगाने अंतराळी जात असताना मला एकदा दिसले. तेव्हा मी त्यांना वंदन केले. त्यांनी मानेने प्रतिसाद दिला.

(१२८)

सौ. संपदा संदीप जोशी, विजापूर.

मी श्रीदादांची अनुगृहीत आहे. माझे सासर विजापूरला आहे. दि. ९-१२-९५ रोजी विश्रांतीसाठी मी माहेरी मिरजेला आले होते. दि.२०-१२-९५ रोजी संध्याकाळी आम्ही बोलत बसलो होतो. तेवढ्यात मला वेगळाच भास होऊ लागला. सर्व वस्तु अस्पष्ट व धूसर होऊ लागल्या. हे मी सांगताच बाबांनी मला पडून राहण्यास सांगितले. कसेतरी जेवण करून झोपले. पहाटेच्या सुमारास जाग आली. व आपल्या जवळ कोणीतरी आहे अशी जाणीव झाली. आणि माझ्या कानांवर शब्द आले, 'मी तुला न्यायला आलो आहे. तुझे आयुष्य आता संपत आले आहे.' यावेळी नाक-डोळे धूसर असणारा अस्पष्ट चेहरा मला दिसला. मी घाबरून गेले. तेवढ्यात मला ऐकू आले ''तू अजिबात घाबरू नकोस. मी इथे आहे. तो तुला नेऊ शकत नाही.'' मी पाहिले तो मला तेथे दासराम दिसले. ते मला म्हणाले ''घाबरू नकोस. तू रामनामाचा जप कर. मी इथेच आहे.'' मी श्रीराम जयराम जयजयराम हा जप



सुरू केला. सकाळी हे घरी सांगितले. तेव्हा आई व भाऊ दादांचेकडे गेले व त्यांनी दादांना सर्व सांगितले. दादांनी अंगारा व एक श्लोक दिला. श्लोक म्हणण्यास सांगितले. अद्यापि ती आकृति दिसत होती, व तिचे बोलणे ऐकू येत होते. तेव्हा संध्याकाळी भाऊ व बाबा पुन: दादांच्याकडे गेले व अंगारा घेऊन आले. तेव्हा श्रीदादा माझ्याजवळ आले आहेत अशी जाणीव मला झाली. आणि ती आकृति दिसेनाशी झाली. मग मला हलके वाटू लागले. मी दादांच्या कृपेने जिवंत राहिले. सौ. गीताकाकू त्याच वेळी मिरजेला आली. तिच्या रूपाने दादा माझ्याजवळ होते, म्हणून काळसुद्धा मागे फिरला.

(१२९)

श्रीमती सावित्रीबाई पांडुरंग पवार, सांगली.

श्रीदादांच्यामुळे माझ्या जीवनातील अनेक भीतिदायक प्रसंग टळू शकले, व त्यामुळे मला शांति मिळाली.

(१३०)

सिंधु आनंदराव पाटील, सांगली.

दादांच्याकडे येऊ लागल्यामुळे घरी सुख समाधान आणि मन:शांति लाभली.

(१३१)

श्रीमती सुगंधा विठ्ठलदास प्रभू, सांगली.

सुकृदिंद्रतीर्थ स्वामी कारीमठ यांच्याकडून मी अनुग्रह घेतला आहे. माझ्या गुरूंच्या गुरूंनी मला प्रसाद देऊन दासरामांकडून रोज साखरेचा प्रसाद घेऊन येण्यास सांगितले. भजनाची आवड असल्यामुळे व सद्‌गुरूंच्या आज्ञेवरुन मी दासरामांचेकडे नित्य जाऊ लागले.

(१३२)

सौ. सुचिता दत्तात्रय जोग, पलुस.

रोजच्या रोज साधनाला बसवून श्रीदासराममहाराज मजकडून साधन करवून घेतात.

(१३३)

सौ. सुप्रिया सदानंद दाते, बी.ए., सांगली.

थोडा वेळ का होईना ध्यानाला बसता येऊ लागले.

(१३४)

सुभाष बळवंत कुलकर्णी, जत.

दादा जतला आमच्या घरी आले होते. दादांच्यामुळे जतमध्ये बरेच धार्मिक व पारमार्थिक कार्यक्रम होऊ लागले.

(१३५)

श्रीमती सुलभा गजानन बोरवणकर, एस्.एस्.सी., डी.एड्., सांगली.

मी ज्या दिवशी दादांच्या अनुग्रह घेतला, त्याच रात्री दादांनी स्वप्नात येऊन ओंजळभर दाण्यांचा प्रसाद दिला.

मुलीच्या बाळंतपणासाठी मी जानेवारी १९९८ मध्ये विशाखापट्टण येथे गेले. त्यावर्षी उत्सव ४-५ फेब्रुवारी या दिवशी होता. आपण या वर्षी दादांच्याकडील उत्सवात नाही असे सारखे वाटत होते. त्याच दिवशी रात्री मला स्वप्न पडले. स्वप्नात मोठ्या मंडपात दादा खुर्चीवर बसले आहेत व मी त्यांना नमस्कार करीत आहे, असे मला दिसले.

(१३६)

सौ. सुलभा वसंत तांबडे, सांगली.

रोजच्या नियमाला बसल्यावर, समाधिस्थळ व श्रीदादांची प्रेरणा यांच्यामुळे रोज थोडा तरी नेम होतो.

(१३७)

सौ. सुवर्णा धनाजी पवार, सांगली.

आम्हाला रिक्षा विकत घ्यावयाची होती. पण पैसे नव्हते. माझी अडचण मी दादांना सांगितली. त्यांनी एक गोष्ट (मंत्र) लिहून दिली व ती १६ वेळा १६ दिवस वाचण्यास सांगितले. तसे मी केले. आणि आमचे काम झाले.

(१३८)

सौ. सुशीला बाळासाहेब चौगुले, सांगली.

सध्या मी पहाटे ५ वाजता साधना करण्यास बसते. दासराम गेल्यापासून, मी साधनेला बसले की माझ्या समोर  सद्गुरु दादा खुर्चीत बसलेले साक्षात् दिसतात. हा भास नव्हे. खरोखरच सद्गुरु दादा माझ्यापुढे असतात.



(१३९)

सुहास राजाराम क्षीरसागर, बी. कॉम्., सांगली.

मी बरेच दिवस दासरामांच्या कीर्तनास जात होतो. एक दिवस माझ्या मनात आले की कीर्तनात विश्रांतीचे वेळी पद म्हणावे. त्याच दिवशी दादांनी मला पुढे बोलावले आणि'पद म्हणा' असे सांगितले.

(१४०)

संजय मनोहर कदम, सांगली.

दादामहाराजांनी सांगितलेले साधन दररोज सकाळी करीत असलेमुळेच मनाला समाधान वाटते व शांति लाभते.

(१४१)

सौ. सुप्रिया देवदत्त गोखले, सांगली.

प.पू. दासराममहाराज आम्हां गोखले कुटुंबीयांना अत्यंत आदरणीय आहेत.

(१४२)

सौ. सुमन वसंतराव सावंत, सांगली.

मला दादांचा अनुग्रह आहे. मला व माझ्या घरच्यांना सदैव कोणत्या ना कोणत्या अडचणींना कायम तोंड द्यावे लागत असे. जेव्हापासून माझ्यावर दासराममहाराजांची नजर आहे, तेव्हापासून माझ्या अडचणी या दादांच्या दैवी नजरेपासून लांब पळाल्या.

(१४३)

सौ. सुजाता अरुण जोग, मिरज.

दि. १९ नोव्हेंबर १९८३ या दिवशी रात्री मला स्वप्न पडले. 'मी एकटीच एका जंगलातून जात होते. माझ्या कानावर टाळ मृदंगाचा आवाज, व श्रीराम जयराम जयजयराम हा नाम घोष ऐकू येऊ लागला.एका वेगळ्याच आनंदात मी डोळे मिटून घेतले व न कळत माझ्या तोंडातूनही श्रीराम जयराम जयजयराम हा जप सुरू झाला. मी स्वप्नातच डोळे उघडले. तेव्हा पांढरे धोतर, पांढरा शर्ट व काळी टोपी घातलेली एक व्यक्ति मला दिसली. किंचित् हसून त्या व्यक्तीने मजकडे पाहिले. आणि मग मला जाग आली. माझी जाऊ सौ. गीतादेवी हिने मला एकदा श्रीदादांच्याकडे नेले. दादांना बघताक्षणीच

प्रश्न सुटला. स्वप्नात दिसलेली व्यक्ति म्हणजे दादा हे लक्षात आले. नंतर मी दादांचा अनुग्रह घेतला.

(१४४)

सौ. सुनीता रामचंद्र बडवे, इचलकरंजी.

दादा आपल्या भक्तांना सम भाव आणि सम दृष्टि यांनी सांभाळतात, उंच- नीच मानीत नाहीत, हे मी पाहिले व ते मला जाणवले.

(१४५)

सौ. सुशीला बाळासाहेब चौगुले, सांगली.

सुमारे १७-१८ वर्षापूर्वी श्रीदादांच्या सांगणेमुळे, मार्गशीर्ष महिन्यात मी क्षेत्र नृसिंहवाडी येथे ५ गुरुवारी चालत जात होते. एका गुरुवारी प्रत्यक्ष श्रीदादा माझे बरोबर येत आहेत असे सतत वाटत होते.

(१४६)

कु. स्नेहल विजय जोशी, टी.ई. (सिव्हिल), सांगली.

मी अकरावी इयत्तेत विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकत असताना माझी सेमेस्टर परिक्षा झाली. रिझल्ट लागला. मला फिजिक्स-१ च्या पेपरात ५० पैकी फक्त १४ गुण मिळाले असे दिसले. हे कसे हे मला कळेचना. कारण मी पेपर व्यवस्थित सोडवला होता, व ४०-४५ मार्कांची अपेक्षा होती. मी त्या विषयाच्या मॅडमना भेटले. त्या माझ्यावर ओरडल्या व म्हणाल्या,''एकदा जी मार्कलिस्ट लागली ती फायनल. तू आता ते विसर व दुसऱ्या अभ्यासाला लाग. '' त्याच दिवशी मी संध्याकाळी दादांचेकडे गेले व त्यांची मनातल्या मनात प्रार्थना केली. 'भीमरूपी' स्तोत्र म्हणून अंगारा घेतला. दुसरे दिवशी मी कॉलेजच्या मॅडमना पुन: भेटले. काल चिडलेल्या मॅडम आज प्रेमळ स्वरात म्हणाल्या, ''जोशी, माझी चूक झाली होती. तुम्हाला ४१ मार्काऐवजी मी चुकून १४ असे लिहिले होते. तू हाय्येस्ट आहेस. अभिनंदन''. मॅडमच्या मनोवृत्तीत एवढा फरक पडला तो प.पू. दादांच्या असीम कृपेमुळेच.

(१४७)

सौ. स्नेहा प्रेमसिंग परदेशी, एम्.ए., एम्. फिल्., रावळगाव.

माझ्या यजमानांची नोकरी धोक्यात आली होती. तेव्हा सौ. उषा रजपूत या माझ्या बहिणीस मी श्रीदादांना कारण विचारणेस सांगितले. इकडे



माझ्या यजमानांची तब्येत बरी नव्हती . त्यांना श्रीदादांच्या दर्शनास आणले व त्यांची तब्येत बरी झाली.

(१४८)

सौ. स्मिता प्रमोद ठाकुरदेसाई , बी. एस्सी., इचलकरंजी.

माझा मुलगा प्रसाद. त्याच्या शिक्षणाची मला फार काळजी वाटत होती. दि.१२ डिसेंबर १९९८,रविवार , रोजी दादांच्या दर्शनासाठी आम्ही निघालो. वाटेत गाडीत तोच विचार मनात घोळत होता. दादांचे दर्शन घेतले. मनात प्रसादच्या शिक्षणाचा प्रश्न घोळत होताच. अचानक दादा म्हणाले,''हे बघ, हा मुलगा पुढे विद्वान् होईल. तुम्ही आईवडिल त्याच्यामुळे पुण्यवान् आहात. माझे शब्द खोटे व्हायचे नाहीत.'' माझ्या डोळ्यांत आनंदाश्रु आले. दादांनी सांगितल्याप्रमाणे माझा मुलगा आता प्रगतिपथावर आहे.

(१४९)

हरि वासुदेव गाडगीळ, सराफ, सांगली.

पुष्कळ वेळेला श्रीदादा स्वप्नांत येऊन पुढील सूचना देत असत.

(१५०)

हिराबाई कृष्णा शिंदे, सांगलीवाडी.

सकाळ संध्याकाळ नेमाला बसते. ध्यानामध्ये दादांचे दर्शन होते. माझ्या संकट प्रसंगी श्रीदादांचे स्मरण केले की दादांचे दर्शन होते.

(१५१)

हेमंत गोविंद गोडबोले, बी. कॉम्., एल्. एल्. बी., सांगली.

तीर्थरूप दादांचे बद्दल काय सांगावे ? दोन वर्षापूर्वी माझे वडिल गेले. आता तीर्थरूप दादांना मी वडिलांचे ठिकाणी मानतो.

(१५२)

सौ. स्नेहा अशोक कुलकर्णी, बी. कॉम्., सांगली.

प.पू. दासराममहाराज यांचेकडे येताच त्यांनी मला आपली कन्या मानले. यातच सर्व आले. त्यांच्याकडे आल्यापासून नामाकडे विशेष ओढ लागली आहे.

(१५३)

सौ. स्मिता मिलिंद देशपांडे, एम्. एस्सी., (गणित), माधवनगर.

माझ्या स्वत:च्या वृत्तीत, एकूण जीवनात आमूलाग्र बदल घडून आला, संसाराचा जीवनाचा खरा अर्थ कळू लागला.

प.पू. दादांचे कडून 'नाममंत्र' घेतल्यावर नमस्कार केला. तेव्हा मस्तकापासून पाठीवर फिरविलेला हात आठवला की अजूनही मस्तकातून मुंग्या आल्यासारखे होते, भारून गेल्यासारखे वाटते, जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

卐卐卐卐卐



# * श्रीदादांचेवरील काव्य-संपदा *

श्रीदासराम गौरवगीत आणि श्रीदासरामगीतम् ही मुद्रित पद्यबद्ध पुस्तके दादांचा महिमा वर्णन करणारी आहेत. तथापि श्रीदादांचे बालपणापासूनच महत्त्व जाणणारे लोक होते. त्यातील काहींनी दादांचे मोठेपण वर्णन करणारी काव्यरचना केली होती. इ.स. १९२९ ते इ.स. २००१ पर्यंतच्या प्रदीर्घ काळात श्रीदादांचेवर बरीच काव्यरचना झाली. ही काव्यरचना वही क्रमांक ४३,७३ व १५२, फाइल क्रमांक ४, लेजर क्रमांक ६, श्रीदासराम गौरवग्रंथ, कथा एका सूरदासाची, फूल चैतन्याचे, दासराममहाराज केळकर यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त प्रसारित पत्रक, चैतन्य रुपाय नमो नमस्ते ही पत्रिका, साप्ताहिक तुतारी श्रीरामरायमहाराज केळकर विशेषांक, इत्यादींमध्ये आलेली आहे. ती सर्व एकत्र करून येथे दिली आहे.

ही सर्व काव्ये देताना संस्कृत काव्यरचना प्रथम दिली आहे; कारण श्रीदादांना संस्कृत भाषा आवडत असे. त्यानंतर हिंदी व मराठी भाषेतील काव्य दिले आहे. मराठीतील काव्यबंध देताना पाळणा, निर्याणाचा अभंग, ओवी, संकीर्ण काव्य, पदे, श्लोक, आरती, शरणागति, भजन आणि शेवटी प्रार्थना असा क्रम पाळला आहे. आणि ज्या भक्ताचे काव्य आहे, त्याचे नाव त्याच्या काव्याच्या शेवटी दिलेले आहे.

## (अ) संस्कृत रचना

(१)

श्रीराम श्रीराम सदाशिवस्त्वं
श्रीराम श्रीराम नारायणस्त्वम् ।
श्रीराम श्रीराम महागुरुस्त्वं
श्रीराम श्रीराम नमो नमस्ते ॥१॥
श्रीरामेति सदा स्नानं श्रीरामेति सदा तप: ।
श्रीरामेति सदा ध्यानं श्रीरामेति सदा जप: ॥२॥
नमामि करुणायुक्तं रामराज-महेश्वरम् ।
तत्कृपालेशमात्रेण परमात्मा हि लभ्यते ॥३॥
रामो देवेश्वर: साक्षात् रामान्नास्ति परं पदम् ।

रामो नारायणश्चैव रामो ब्रह्मैव केवलम् ।।४।।
नमस्तस्मै महेशाय गुरवे शांतबुद्धये ।
गोविंदस्य सुतायैव नमस्कारो विधीयते ।।५।।
दासराम नमस्तुभ्यं राम राम नमो नम: ।
गुरुराज नमस्तुभ्यं राम राम नमो नम: ।।६।।
रामराज महाराज सर्व-श्रेष्ठ दयाघन ।
नि:संग कुरु मां देव निश्चिंतं चापि सर्वथा ।।७।।
राम राम महाराज निश्चिंतं मे मन: कुरु ।
राम राम महाराज निर्विघ्नं मे सदा कुरु ।।८।।
यावज्जीवामि हे राम नीरोगं मां सदा कुरु ।
शरणागतभक्तं मां पाहि सर्वत्र सर्वदा ।।९।।
इंदिरागोविंदसुतं शिष्यं हनुमतो वरम् ।
केशवो वंदते नित्यम दासरामं दयाकरम् ।।१०।।
गोविंदस्य सुतं श्रेष्ठं हनुमत्पादसेवकम् ।
इंदिरानंददातारं रामं वंदे परं गुरुम् ।।११।।

– के. वा. आपटे

(२)

**श्रीदासराम–पंचपदी**

आद्य: श्रीगुरुलिंगजंगमयति: ताताख्यदीक्षागुरु:
पूज्य: कीर्तनसद्गुरुश्च जनको मामाख्यया विश्रुत: ।
साध्वी संततवंदनीयचरणा श्रीरिंदिरा जन्मदा
एतेषां शिवकामनासमुदिता श्रीदासरामाकृति: ।।१।।
पायान्नो दुरितांधकारसविता श्रीदासराम: कृती
योगीन्द्र: परमार्थबोधविशदो वाग्मी च सारस्वत: ।
आबाल्याद् हरिकीर्तनं व्रतमिवाजीवं चचार व्रती
श्रीरामप्रभुभक्तिभावरसित: पूतात्मनामग्रणी: ।।२।।
अखंडकीर्तने रतिर्मतिर्निरुपणेऽतिगा ।
अलौकिकी धृति: शुभा विलक्षणा स्मृतिर्दृढा ।।३।।



सुधामृतैकवर्षिणी प्रसादमाल्यधारिणी ।
प्रभूतलेखनान्विता सरस्वती च पावनी ।।४।।
गुरोरुपासनारता प्रभो: कृपा प्रतिष्ठिता ।
विजृंभिता विरक्तपरोपकाररागिता ।।५।।
समस्तसिध्दिसंस्थितिर्न तत्प्रदर्शने रुचि: ।
अतुल्यरामदासता सुरम्यभक्तिभावना ।।६।।
वरा गुणत्रयोदशी हि दासरामरूपिणी ।
समस्ततापनाशिनी श्रियै भवे भवं श्रिता ।।७।।
सपर्येयं मुदा भक्त्या गुरुपद्भ्यां समर्पिता ।
प्रीयतामनया रामो दासराम नमो नम: ।।८।।

।। इति शम् ।।

विनीतश्रीद्वयेनेदं चरितं गुणकीर्तनम् ।
यथामति यथाशक्ति प्रीयतां तेन सद्गुरु: ॥

–पंडित श्री. पु. हिर्लेकरशास्त्री, अमरावती.

(३)

**श्रीदासराममहाराजस्य**

**आरात्रिकम्**

गुरुनाथो गुरुवर्यो हे गूढानंद ।
दासराम: सुविनीतो हे दत्तानंद ।
सांगली–कृत–वासो हे सिद्धानंद ।
निर्लेपस्त्वं मद–मुक्तो हे नित्यानंद ।।१।।
जय देव जय देव जय दासराम ।
आरात्रिकं कुर्वे तव दासराम ।।ध्रु।।
सुखकर्ता विमलात्मा विमल–स्वरूप ।
मुदितात्मा शुभकर्ता त्वं सत्तारूप ।
पादायातं दासं त्राहि मां राम ।
आर्तं तारय हीनं हे सीताराम ।।२।।

– के. वा. आपटे

(४)

**श्रीदासराम गायत्री**

दासरामाय विद्महे । गोविंदसुताय धीमहि ।
तन्नो राम: प्रचोदयात् ॥

– के. वा. आपटे

### (आ) हिंदी रचना

जय जय आरती रामजी तुम्हारी ।
राम जी तुम्हारी दासरामजी तुम्हारी ॥
सीतारामजी तुम्हारी ॥ध्रु॥
हनुमंत गुरुलिंग सदगुरू तेरे ।
तिनो लोकमें तुम हो प्यारे ॥१॥
कृपा करत है गोविंद पिता ।
आरती करत है इंदिरा माता ॥२॥
चंद्रानिल जो किर्तन गावे ।
सूर्यानल तो चवर डुलावे ॥३॥
देव सुरवर सन्मुख ठारे ।
दास भक्तीसे आरती उतारे ॥४॥

– प्रकाश सदाशिव भावे

### (इ) मराठी रचना

**श्रीदासरामांचा पाळणा**

(१)

जो जो श्रीराम, तव नामी आनंद ॥ध्रु॥
साधन आचरण्या, अवतार,
नाम हे जगदोद्धार ॥१॥
प्रेमे पालख हा, हलविला,
बाळा आनंद झाला ॥२॥
कीर्तन भक्तीचा, बडिवार
परमार्थाचा अधिकार ॥३॥



इंदिरापुत्र, बोधवितो
लोका हर्ष हा होतो ॥४॥

–के.वा. आपटे

(२)

आनंदी आनंद झाला ।
बालयोगी हा उदरी अवतरला ॥१॥
पालखी या जोजवुनी
ठेवू श्रीराम नामाला ॥२॥
कुलदेव तो प्रसन्न झाला
मम भक्तीला भुलला ॥३॥
प्रसन्न होऊनी हा प्रसाद
मम पदरी ओपिला ॥४॥

–के. वा. आपटे

**श्रीदादांचा निर्याणाचा अभंग**

शालिवाहन शके एकोणीसशे तेवीसात ।
वृष नाम संवत्सरात दक्षिणायन ॥१॥
श्रावण शुद्ध षष्ठी आणि बुधवार ।
रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ॥२॥
श्रीदासरामांनी केले हो निर्याण ।
मुखात वचन नित्य कीर्तनाचे ॥३॥
दासरामालागी कीर्तनाचा ध्यास ।
परमार्थी प्रकाश पाडियेला ॥४॥
लेखन प्रवचन नित्याचे कीर्तन ।
यामध्ये रममाण झाले साधु ॥५॥
जन्म तिथी षष्ठी निर्वाणतिथी षष्ठी ।
जन्म मरणाची गाठी पडियेली ॥६॥
आत्मारामी राम मिळोनिया गेले ।
स्मृतिरूपे उरले केशव मनी ॥७॥

– के. वा. आपटे

## (अ) ओवी
### [ १ ]
### रामचरितामृत

महाभक्त श्रीरामचंद्र । जे का करिती कीर्तन गजर ।
हरिनामाचा उच्चार । अंतर्यामी ॥१॥
मी तो फिरस्ता अनाम । आलो कर्नाटकाहून ।
अठरा भाषा पढून । आपुल्या केल्या ॥२॥
ना सांप्रदाय ना पंथ । परी जे जे भगवद्भक्त ।
हरिभक्ती जे निरत । त्यांचे चरण वंदितसे ॥३॥
सांगलीये आले वेळी । मन रमले हरिकीर्तन कल्लोळी ।
संत भक्तांचिये मेळी । अपूर्व सुख जहाले ॥४॥
धन्य धन्य रामानंद । प्रत्यक्ष ईश्वर सिद्धानंद ।
बापूराव सदानंद । सेविती जे ॥५॥
ऐशा संताचे जहाले दर्शन । दर्शनेचि निवाले मन ।
बालभक्ताचे पाहून । प्रसन्न चित्त जहाले ॥६॥
बापूराव केळकरांचा पुत्र । तो राम केळकर ।
आनंद ओसंडे अपार । संतांचेनि आशीर्वादे ॥७॥
कुरुंदवाडी चवदावे दिनी । तात्यासाहेबमहाराज संतमणी ।
कैचे पातले गृहालागुनी । बोलाविता अत्यादरे ॥८॥
महाराज येवोनी बैसले । बाळाते पुढे ठेविले ।
तया देखोनी हासले ।सिद्ध पुरुष ॥९॥
अंताजीपंत आजोबा प्रेमळ । तेव्हा बोलिले तत्काळ ।
आपुलाचि आहे बाळ । कृपा असावी ॥१०॥
हे बालक आमुचे निर्धारी । म्हणुनी बाळावरी ।
कृपा आहे मुळी खरी । सत्य सत्य त्रिवार ॥११॥
बाळाते मांडीवरी घेवोनी । दृष्टीस दृष्टी देवोनी ।
मस्तकी अमृतहस्त ठेवोनी । कृपा केली ॥१२॥
अंतरिया नामोच्चार । प्रगट केलासे साचार ।
आनंदले श्रीगुरुवर । आले प्रेमाश्रु नयनी ॥१३॥



कीर्तन करील बालपणी । ऐसे सहज गेले बोलुनी ।
ऐशा बालकाचे भाग्य वाणी । कोणी बोलावे ॥१४॥
दगडाचे देव करोनी । पूजा करावी तन्मय होवोनी ।
दगडाचे टाळ करोनी । कीर्तन करावे ॥१५॥
आरती करावी पालखी काढावी । भजनी वृत्ति रंगोनी जावी।
हरिनामी व्हावी । तन्मयता वृत्तीची ॥१६॥
ऐसा नवल चमत्कार । दाविती कैचा गुरुवर ।
बालकाचे भाग्य अपार । वैभव लाधले भक्तीचे ॥१७॥
बालकाचे वडिलासी । कीर्तन परंपरा निश्चयेसी ।
दिली सद्गुरुंनी परियेसी । तेचि सत्पुत्रा लाधली ॥१८॥
रामानंद महाराज थोर । त्यांचा लोभ बालकावर ।
असे सत्य अपार । काय सांगो ॥१९॥
बालाचे पाहोनी भक्तिप्रेम । त्यांना आनंद व्हावा परम ।
प्रल्हाद नामे सप्रेम । हाक द्यावी ॥२०॥
बालकाचे कीर्तनी । जावे स्वयेची रंगोनी ।
कवतूक करावे मागुनी । निरंतर ॥२१॥
भक्ती ज्ञान करोनी विशद । सांगे सकळा हा प्रल्हाद ।
म्हणोनी तेथे ब्रह्मानंद । प्रगट व्हावा ॥२२॥
जेव्हा होय नामघोष । तेव्हा सुटावा सुवास ।
आनंदाश्रु नयनास । येती तेव्हा ॥२३॥
आता काय बा प्रल्हाद । प्रगट करिसी तू गोविंद ।
ऐसे म्हणती रामानंद । कीर्तनामाजी ॥२४॥
कित्येक वेळी रामानंद । सांगती प्रेमे दासबोध ।
सर्वा करोनी विशद । बाबाण्णा घरी सांगलीसी ॥२५॥
तेव्हा राम गेलिया श्रवण । महाराज पोथी खाली ठेवून ।
म्हणती करावे कीर्तन । बाल साधूसी ॥२६॥
संतवंचनांचे ह्दग्दद । बोले म्हणती रामानंद ।
तव ते वेळी राम प्रल्हाद । काय बोले ॥२७॥
तुम्हासारिखे परम संत । तैसे हनुमंत सद्गुरु समर्थ ।

पिताजी गोविंद भगवद्भक्त । पाठीशी असता काय उणे ।।२८।।
ऐसे बोलोनी साचार । रामानंदा नमस्कार ।
करोनी घरी येवोनी सत्वर । रामे रामदासबोध ग्रंथ लिहिलासे ।।२९।।
ग्रंथ दाखविला रामानंदा । तव ते पावले आनंदा ।
म्हणती ऐसे बोलिजे हृद्गदा । पुढत पुढती ।।३०।।
नववे वर्षी रामदासबोध । रामराये केला विशद ।
सत्ता पाठीशी अगाध । भगवंताची ।।३१।।
जयापाठी सद्गुरु हनुमंत । रामानंद महासंत ।
गोविंदराय भगवद्भक्त । साधु पुरुष ।।३२।।
जे निळोबारायांचा अवतार । बापूराव केळकर ।
महाभक्त धुरंधर । रामानंद बोलिले ।।३३।।
तयांचे जे पुत्ररत्न । त्यांचा अधिकार सांगेल कोण ।
मुखी सदा नामोच्चारण । देवाजीचे ।।३४।।
हरिनामदास हरिनाम प्रेमी। दिले भूषण संती रामी ।
ते संत स्वयमेव ब्रह्मी । सिद्धानंद ।।३५।।
जे का सत्य ब्रह्ममूर्ती । जगामाजी पिशाच्चवृत्ती ।
कोणा दृष्टी न पडती । बहुतांचे ।।३६।।
ऐसा धन्य हा बालसाधु । तया नमन करितो आनंदू ।
सिद्रामप्पा मतिमंद। भक्तछंद ।।३७।।

– सिद्रामप्पा मैंदर्गी

### [ २ ]

(धन्य धन्य साधुराजा । रामानंदा महाराजा।
काय वर्णावे तव तेजा । आत्मयाचे ।।)

रामभाऊ केळकर । महाराजांचा त्यांचेवर ।
लोभ असे अनावर । सर्वापरी ।।१।।
हाक मारावी रामभाऊ लागून । महाराजांनी प्रल्हाद म्हणून ।
प्रेमे सांगावे कीर्तन । करावया ।।२।।
बहुत घडले त्यांचे साधन । थोडे राहिले ते करावया पूर्ण ।
आला म्हणोनी जन्मालागून । गुरुभक्त ।।३।।



म्हणूनी संत हनुमंत । वोळले समर्थ यथार्थ ।
मस्तकी फिरविला कृपाहस्त । चौदावे दिनी ।।४।।
जन्माचे चौदावे दिवशी । संत पातले घरासी ।
अहो ऐसिया पुण्यासी । जोड नाही ।।५।।
घेवोनी बालका मांडीवरी । पूर्ण कृपा केली निर्धारी ।
आत्मरूपा अंतरी । भेटविले ।।६।।
आमुचाची आहे बाळ । कीर्तन करील सोज्वळ ।
नाम अमृत चाखेल । आशीर्वाद बोलिले ।।७।।
तयांचे अंतरीचे कीर्तन । बालकाचे अंतरी भरोन ।
राहिले त्यांचे वचनाप्रमाण । धन्य धन्य ।।८।।
म्हणून पाचवे वर्षापासून । करू लागले कीर्तन ।
वैराग्य भक्ति आत्मज्ञान । विशद करोनी ।।९।।
बोलती परमार्थ विचार । सांगती अनुभव प्रकार ।
सद्गुरुकृपा अपार । संतांचे आशीर्वाद जयाते ।।१०।।
ऐसे महाराजांनी सर्वासी सांगावे । बालकाचे कीर्तनी रंगोनि जावे।
तल्लीन होवोनी नाचावे । कितीतरी ।।११।।
नववे वर्षी श्रीरामदासबोध । रामभाऊंनी केला विशद ।
ते ऐकोनी रामानंद । संतोषले ।।१२।।
जयांचे कीर्तनी अपार । सुवास सुटावा थोर ।
प्रसाद मिळावा अपार। परमेशाचा ।।१३।।
महाराजांनी सकळा सांगावे । रामभाऊ भगवद्भक्त होतील स्वभावे ।
तुम्ही तयांचे ऐकावे । मनोभावे कीर्तन ।।१४।।

– शिवाप्पा रामाप्पा सोनार

### [ ३ ]

**चैतन्यरूपाय नमो नमस्ते**

कुरुंदवाड ग्रामाशी । सन एकोणीसशे वीसाशी ।
विष्णुभक्त घे अवताराशी । या भूलोकी ।।१।।
वजीरबाबा अवलियाने । भविष्य वर्तवले वाणीने ।
यावे विष्णुभक्ताने । विधीची योजना ।।२।।

श्रीहनुमंत घेई अंकावर । कृपाहस्त फिरे मस्तकावर ।
अनुग्रह सद्‌गुरुवर । चौदावे दिनी ।।३।।
अमृतहस्त फिरता गुरूचे । कीर्तनी बालराम नाचे ।
बोलू लागला बोल नामामृताचे । बालवयी ।।४।।
बालवयी साधनात । साधी पवन रामनामात ।
रमू लागला नामभक्तीत । दिन प्रतिदिन ।।५।।
लक्ष याचे चैतन्याकडे । व्यवहाराशी याचे वाकडे ।
रामनामी जीवन घडे । ऐसा आगळा ।।६।।
श्रीमामा नामे ब्रह्मरूपात । संचरे अखंड कीर्तनात ।
राम वाढला कृपेच्या छायेत । या परब्रह्माच्या ।।७।।
बालपणापासुनी भक्तीत । रमला हरिरूपात ।
गुंग जो हरिसमाधीत । अहर्निश ।।८।।
दैनिक जप नित्याचा । तेरा सहस्र करण्याचा ।
हा निश्चय मनाचा । बालपणापासुनी ।।९।।
नामाचा रातंदिन केला गजर । कारण हरिकीर्तनावतार ।
उघडिले स्वर्गामधले व्दार । सर्वांसाठी ।।१०।।
१९३८ च्या पौष नवमीला । श्रीनारायणप्रभु प्रगट झाला ।
कानड्याने बोध केला । निजदर्शनाने ।।११।।
हेच कानडी अभंग । गुरुलिंगगीतेत नटले चांग ।
असोनी कलियुग । वेद प्रगटले ।।१२।।
जो देवाशी चाले संवाद । अभंगांत आला निर्विवाद ।
अभंग झाले जगद्वंद्य । श्रीदादांचे ।।१३।।
अंतरी ज्ञान भरोन वाहे । ऐशी सर्वज्ञता वरू पाहे ।
गायी परमेशाचे दोहे । बालवयी ।।१४।।
एक एक ग्रंथ दादांचे । जणू घास कैवल्याचे ।
दादांच्या सर्वज्ञतेचे । दर्शन घडेल ।।१५।।
पाहता मूर्त श्री दादांची । सय ये ज्ञानबा तुकोबाची ।
प्रचीती साच सत्याची । सद्‌भक्ताशी ।।१६।।
सूर्याला उपमा द्यावी कुणाची । मोजणी कैसी सागराची ।



दादांना उपमा दादांची । हेच बरे ।।१७।।
दादांना आवडी आत्मसुखाची । तैशीच हरिभजनाची ।
नाही हाव प्रसिद्धीची । या संतराजा ।।१८।।
नानापंथी येती जाती । परब्रह्माची घेती प्रचीती ।
पंथभेद मावळून जाती । श्रीदादांच्या दर्शने ।।१९।।
श्रीदादा म्हणजे एकाग्रता । श्रीदादा म्हणजे समता ।
श्रीदादा म्हणजे स्थिरता । सूर्या ऐसे ।।२०।।
शीतल चंद्रमा दादांचे रूपात । ज्यांचे लक्ष चैतन्यात ।
वस्ती सदाची हरिहरात । ह्रदयामाजी ।।२१।।
श्रीदादा म्हणजे भगवंत । दादा म्हणजे कृपावंत ।
श्रीदादा म्हणजे प्रसन्नचित्त । कौमुदीप्रमाणे ।।२२।।
श्रीदादा म्हणजे शांतिसागर । दादा म्हणजे कैवल्याचे आगर ।
श्रीराम मंदिराचे द्वार । सदा उघडेची ।।२३।।
अनेक संतांचे माहेरघर । बनून गेले दादांचे ह्रद्‌मंदिर ।
ज्याला त्याला दादांचे घर । आपुले वाटते ।।२४।।
निर्मळ नभासारिखे । अलिप्त त्याच्याच सारखे ।
म्हणोनी आत्मसुखाशी पारखे । नाही झाले ।।२५।।
संसारियाशी साऊली । अनाथ जीवांची माऊली ।
संतसज्जनांची गाऊली । बनले दादा ।।२६।।
देव ज्यावरी सदा प्रसन्न । शांती पुष्टी समाधान ।
हसत मुखाने हसते नयन । श्रीदादांचे ।।२७।।
ह्रदय भरले विशुद्धतेने । रोम रोम अभेदाने ।
देव नाचे आनंदाने । ऐसा योगी ।।२८।।
दादांच्या कीर्तनी रंग निराळा । जणू स्वर्ग ये धरेला ।
नाथांचा दरबार भरला । या निकेतनी ।।२९।।
कित्येक संकटे आली संत भेटीला । देह यातनांनी गांजिला ।
परी खंड नाही पडला । अखंड कीर्तनाला ।।३०।।
जोवरी चंद्रसूर्य अंबरात । तोवरी अखंड कीर्तन चालणार ।
अवनी प्रकाशात नाहणार । श्रीदादांच्या ।।३१।।

ही नाही अतिशोयक्ती । ही आहे वस्तुस्थिती ।
ती कथन करण्याची शक्ती । नाही माझी ॥३२॥
ऐशा जन्मजात ज्ञानियाचे । चरित्र कैसे सांगायचे ।
धिंडवडे माझ्या बुद्धीचे । श्रोते हो ॥३३॥
कैवल्याचे आदिपीठ । अध्यात्माचे विद्यापीठ ।
पवित्र अवघा कृष्णाकाठ । रामनिकेतनाने ॥३४॥
ऐशी कळवळ्याची जाती । करिती लाभावीण प्रीती ।
या मावलीची प्रचीती । ये रामनिकेतनी ॥३५॥
नमन माझे चैतन्याला । श्रीदादारूपी परब्रह्माला ।
विराम देतो शब्दकळेला । या ठायी ॥३६॥

– प्रकाश सदाशिव भावे

[ ४ ]

धन्य धन्य रामराय । आम्हां अनाथांची माय ।
अवतार स्वयमेव । श्रीरामप्रभूंचा ॥१॥
मूर्ति पहाता दिसे शांत । नाही अंतरी काम क्रोध ।
दर्शन होता मन शांत । होत असे ॥२॥
कुरुंदवाड गावी झाला जन्म । प्रेमे नाव ठेविले राम ।
आनंद झाला परम । सकळिकासी ॥३॥
जन्माचे चौदावे दिनी । कैंचे पातले दिनमणी ।
तात्यासाहेबमहाराजांनी । अनुग्रह केला असे ॥४॥
गेले सहज बोलून । की कीर्तन करील हा जाण ।
भाग्याची कैची गणती जाण । अपरंपार ॥५॥
म्हणून पाचवे वर्षापासून । कीर्तन सुरू केले जाण ।
झाले असे खरे वचन । महाराजांचे ॥६॥
प्रेमे करावे कीर्तन । कीर्तनात व्हावे एक जाण ।
त्या कीर्तनामाजी (जाण)। सुवास सुटावा ॥७॥
लहानपणीचे ते खेळ । दगडाचे देव करोन ।
जावे तन्मय होऊन । देवपूजेत ॥८॥
धन्य रामानंद महाराज । धन्य धन्य महाराज ।



ज्यानी प्रगटविले सिद्धानंद महाराज । कीर्तनात ॥९॥
रामरायप्रभूवर । त्यांचे प्रेम असे फार ।
कित्येकवेळा कीर्तन कर । म्हणोनी सांगती ॥१०॥
हाक द्यावी प्रेमे करून । प्रल्हाद ऐसे म्हणून ।
तेचि नाव जाण । खरे झाले असे ॥११॥
एके वेळी रामानंद । सांगत होते दासबोध ।
तेव्हा गेले प्रल्हाद। ऐकावया ॥१२॥
तेव्हा रामानंद सांगती । रामदासबोध कर म्हणती ।
त्यावेळी रामराय म्हणती । रामनंदप्रभूलागी ॥१३॥
तुम्हासारखे परम संत । संतराज पितया गोविंद ।
हनुमंतराय साक्षात। पाठी असता काय उणे ॥१४॥
मग आले गृहात । केला रामदासबोध ।
नेऊनी रामानंदाप्रत । दाखवलासे ॥१५॥
रामानंद सांगती लोकासी। हे पूर्वी सिद्ध पुरुष असती।
साधन पूर्ण करावयासाठी जाण । आले जाणा ॥१६॥
तुम्ही ऐकावे याचे कीर्तन । हे देव असती जाण ।
साक्षात अवतार जाण । सिद्ध पुरुषाचा ॥१७॥
सदा नाम मुखी स्मरत । मूर्ती दिसे फार शांत ।
दिसती प्रत्यक्ष साक्षात । परमेश्वर ॥१८॥
सिद्धानंदप्रभूंनी जाण । कानडी अभंग दिले जाण ।
वदविले काही जाण । त्यांचेकडून ॥१९॥

– नामदेव मोरेश्वर कुलकर्णी

[ ५ ]

बालयोगी दासराम असती । वायुसाधनी सदा रमती ।
स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगती । प्रवचनी नित्य नित्य ॥१॥

–श्रीमती आकुताई पाठक

[ ६ ]

माझे सद्गुरू । कीर्तनाचा महामेरू ।
बहुतजन भक्तांचा आधारू । कीर्तनयोगी ॥१॥

– गोविंद चिंतामण ताम्हनकर

## [ ७ ]
### स्मरणिका

राजाधिराज सद्‌गुरुराज । यांचे स्मरण करण्यास ।
ही स्मरणिका लिहिण्यास । स्फुरण त्यांनीच द्यावे ॥१॥
संकष्टीचा दिवस । मनीची आस पुरविण्यास ।
वंदितो श्रीगजाननास । करील पूर्ण कामना ॥२॥
स्मरण करावे सद्‌गुरूंचे । हे तो सार जीवनाचे ।
नाहीतरी जगणे कैचे । व्यर्थ या संसारी ॥३॥
स्मरण हाचि देव । सांगती सद्‌गुरु सदैव ।
नाहीतरी सर्व वाव । असे या भूतळी ॥४॥
ज्याच्यामुळे स्मरण । ज्याच्यामुळे विस्मरण ।
त्याचेच म्हणोन स्मरण । करू आधी ॥५॥
परमार्थ म्हणजे स्मरण । विस्मरण म्हणजे मरण ।
याचेच असावे स्मरण । सद्‌गुरुकृपे ॥६॥
परंतु हे विस्मरण । सदैव असे आवर्जून ।
म्हणोनि सद्‌गुरूंचे अवतरण । झाले या कलियुगी ॥७॥
असे सद्‌गुरुराज प्रेमळ । जे स्मरताच केवळ ।
पावतो विसावा तात्काळ । आपणा सर्वांसी ॥८॥
शके अठराशे बेचाळीस । श्रावण वद्य षष्ठीस ।
अवतरले कुरुंदवाडग्रामास । धन्य धन्य तो दिवस ॥९॥
नातू पहाताचि आजोबांस । पारावार न उरला आनंदास ।
पळत गेले बोलाविण्यास । आपुल्या सद्‌गुरूंना ॥१०॥
भगवान् तात्यासाहेबमहाराज । आले होते कुरुंदवाडास ।
कीर्तन सादर करण्यास । श्रीगणेश चतुर्थीला ॥११॥
कुरुंदवाडकर पटवर्धन । साक्षात्काराचा विचार मनी योजून ।
पावले कृतकृत्य दर्शन घेऊन । श्रीगजाननाचे ॥१२॥
नानांची विनंती आनंदूनी । मान्य केली सद्‌गुरूंनी ।
सत्वर घरी येऊनी । भेटले सत्‌शिष्याला ॥१३॥
घेवोनि आपुल्या कडेवर । महाराज बोलती अधिकारपर ।



हा असे केवळ अवतार । कीर्तनासाठीच या जगती ॥१४॥
हा तो आमुचाचि शिष्यवर । लहानपणापासोन कीर्तन करणार ।
राम नाव ठेवा सत्वर । जे असे चिमडमहाराजांचे ॥१५॥
त्याप्रमाणे राम नाव ठेवून । झाला सोहळा आनंदपूर्ण ।
काय असेल क्षण पावन । केवळ कल्पनातीत ॥१६॥
आशीर्वाद सज्जनांचा । नाही फुकट जायाचा ।
हा तो आशीर्वाद भगवंताचा । तो ठरला यथार्थ ॥१७॥
त्याप्रमाणे सद्‌गुरुराज । करू लागले कीर्तनास ।
वयाच्या पाचव्या वर्षास । सांगती ब्रह्ममाया ॥१८॥
वयाची पाच वर्षे पहाता । काय ब्रह्ममाया जाणता ।
परंतु येथे असे सहजता । केवळ सद्‌गुरुकृपे ॥१९॥
सहज सिंहासन । वरी मूर्ती विराजमान ।
झाले सद्‌गुरु विराजमान । साधिती सहज साधन ॥२०॥
सद्‌गुरूंचे साधन। कधी न कळले कोणास जाण ।
असोनि नसणे संसारी जाण । हीच खूण या महात्म्याची ॥२१॥
मुद्दाम नव्हे ते सहज। सांगती कीर्तनी सद्‌गुरुराज ।
जे असे सर्वदा सहज । तेची साधावे सद्‌गुरुकृपे ॥२२॥
नाही माळ घेतली हातात । परी राहिले तेरा हजार जपात ।
माळ घेवोनि हातात । कोणास न जमले जे ॥२३॥
तेरा हजार जपोनि । राहिले तेरा मणी जपोनि ।
करीती जप जास्त मनी । जेव्हा कार्यक्रम बाहेरी ॥२४॥
अशीच साधना सुरू असता । केल्या अनेक तीर्थयात्रा ।
केवळ संप्रदाय पीठापुरत्या । अन्यत्र कोठेही न जाती ॥२५॥
असेच एकदा चिमडास । गेले होते सद्‌गुरुराज ।
विचारिती परमार्थ प्रश्नास । नागाप्पाण्णामहाराजांना ॥२६॥
काही निरसन शंकांचे । नागाप्पाण्णामहाराजांनी केले साचे ।
काही निवारण शंकांचे । करितील थोरले महाराज ॥२७॥
संत महात्मे सहज बोलती । अधिकार काय जाणेल मती ।
सिद्ध करण्या वचनाप्रती । प्रगटले थोरले महाराज ॥२८॥

थोरले महाराज निंबरगीकर । अवतरले सद्गुरूंसमोर ।
म्हणती कानडी पद भराभर । उतरविले सद्गुरूंनी ।।२९।।
येनू इल्लदानू । याक नीन्न नीनू ।
सत्यचिदानंदू । आत्मारामा (गुरुलिंगगीता) ।।३०।।
असे अनेक संतवर । आले भेटण्या सद्गुरुवर ।
साक्ष देती सर्व थोर । पूर्ण ब्रह्म म्हणोनि ।।३१।।
अनेक पदे अनेक अभंग । म्हणता साधक होती दंग ।
अनेक आरत्या रचना तुरंग । असे सद्गुरूंची ।।३२।।
दीडशेवर आरत्या । असती बहुत संतांच्या ।
नाही कोठे मिळायाच्या । केवळ अद्वैतपीठ ।।३३।।
हे पीठ निंबरगीचे । सांगती कीर्तनी मामा साचे ।
म्हणोनि पाठविले लेणे स्वत:चे । निंबरगीमूळपीठासि ।।३४।।
असे शुद्ध पुण्यपावन । नाही कोठे मिळणार जाण ।
हेची जाणोनि आपण । यावे रामनिकेतनी ।।३५।।
बहुता सुकृताची जोडी । म्हणोनि विठ्ठली आवडी ।
आवडी म्हणोनि सवडी । मिळे सद्गुरुकृपे ।।३६।।
हेचि थोर भाग्य साचे । की हे सर्व पहाण्याचे ।
परंतु अमोलिक महत्त्व याचे । लक्षावे आपण सर्वांनी ।।३७।।
सत्ता मत्ता नव्हे भाग्य । धन संपत्ती नव्हे भाग्य ।
गुरुकृपा हेची भाग्य । असे थोर या जगती ।।३८।।
गुरुकृपेचा पुण्य क्षण । वाढविणेचा असे जाण ।
असेच सांगती सद्गुरुनिधान । वारंवार कीर्तनी ।।३९।।
असे सहज साधन । काय करोनि उपाय अन्य ।
प्राप्त होणार आपणास गहन । जे असे सद्गुरुवचनी ।।४०।।
वचने आपुल्या सद्गुरूंची । केवळ असती ब्रह्माची ।
जेथे पडो न शके मायेची । सावलीही कदा ।।४१।।
हीच सर्व ब्रह्मवचने । स्मरोनि व्यवहार करणे ।
आणि परमार्थ साधणे । पार होण्या भवसागर ।।४२।।
भाग्य फटफटीत वैराग्याचे । नाही आपणा पेलायाचे ।



साधा परमार्थ संसाराते । सांगती निंबरगीकरमहाराज ।।४३।।
संसार म्हणजे कुंपण । असे परमार्थ-बागेस पूर्ण ।
परंतु न खाईल बाग कुंपण । द्यावे लक्ष गुरुकृपे ।।४४।।
सोप्यातसोपा परमार्थ । सांगितला सद्गुरूंनी यथार्थ ।
घ्यावा याचाचि अन्वयार्थ । सद्गुरुकृपे ।।४५।।
जी शिकवण निंबरगीची । असे चिमडपीठाची ।
तीच सांगितली सुगमशी । कोटणीमहाराजकृपे ।।४६।।
श्रीनिंबरगीकरमहाराज । श्रीकोटणीसमहाराज ।
श्रीज्ञानेश्वरमहाराज । आणिले श्रीरामनिकेतनी ।।४७।।
कीर्तनाची परंपरा । जी आली चालोनि घरा ।
चालविती अवतारकार्या । आपुले सद्गुरुराज ।।४८।।
छत्तीस वर्षे कोटणीसमहाराज । अडतीस वर्षे मामामहाराज ।
एकोणचाळीसवर्षे सद्गुरुराज । करिती कीर्तनास ।।४९।।
तीच परंपरा भक्ती । चालविली असे जाण खरी ।
पुढे ती अण्णांनी घरी । करिती कीर्तन अलौकिक ।।५०।।
लौकिकासाठी कीर्तन । कधी न करिती हे संतसज्जन ।
नसे या लौकिकाचे भान । केवळ देवासाठी ।।५१।।
देवाच्या कीर्तनाची ठेव । साधिती एकमेव बापूराव ।
असेच वदती गुरुदेव । ऐकूनी कीर्तन एकट्यांपुढे ।।५२।।
अशी परंपरा खरी । जी नसे चराचरी ।
गुरुगृहीची मौज भारी । पाहण्या मिळतसे ।।५३।।
तूची श्रोता वक्ता । ज्ञानासि अंजन ।
सर्व होणे जाणे । तूझे हाती (श्रीतुकाराममहाराज) ।।५४।।
तबला ना पेटी । झांज ना मृदुंग ।
रंग तो श्रीरंग । आपण झाला (श्रीतुकाराममहाराज) ।।५५।।
असे अंतर्यामी कीर्तन । चाले चोवीस तास संपूर्ण ।
तेव्हा दिसे बाहेर कीर्तन । दीड दोन तास ।।५६।।
हे ज्यांनी साधिले । त्यांचे दर्शन लाभले ।
हेची भाग्य भले । सांगलीकरांचे ।।५७।।

नाम-संकीर्तन । वैष्णवाची जोडी ।
पापे अनंत कोडी । गेली त्यांची (श्रीज्ञानेश्वरमहाराज) ।।५८।।
कीर्तन अमोघ साधन । जेणे योगे देहाभिमान ।
गळोनि होतसे हरिरूप पूर्ण । सांगती तुकाराममहाराज ।।५९।।
परंतु ज्या अंगाने । व्हावे ब्रह्म ज्या साधनाने ।
हे तो सद्गुरुंचेची सांगणे । असे अधिकाराचे ।।६०।।
सर्व विषयांचा खरा अर्थ । सांगितला मामांनी यथार्थ ।
अमृतवाणी अभंगात । सांगोनि झाले अजरामर ।।६१।।
नित्यपाठाचे अभंग वीस । लिहिले मामांनी अभ्यासास ।
सुकळ असती सकळास । साधण्या संसार परमार्थ ।।६२।।
त्याच वीस अभंगावर । करिती कीर्तन सद्गुरुवर ।
निष्णात असती संत थोर । सोपा करण्या विषय ।।६३।।
विषय कोणता अभंग कोणता । त्याचे विवरण करण्याकरिता ।
लागत नव्हता अवकाश पुरता । कोणत्याही क्षणाचा ।।६४।।
अभंग कूट किंवा कठिण । सांगती विशद करून ।
ऐकोनी श्रोते समाधान । पावती नित्य कीर्तनी ।।६५।।
अशी मूर्ती अमोलिक । वावरली प्रसिद्धिपराङ्मुख ।
कळो न दिला काही एक । अधिकार आपुला ।।६६।।
हा तो निंबरगीपीठाचा परिपाठ । न करावा बोभाट ।
कळो द्यावा परमार्थ नीट । यथाशक्ती यथामती ।।६७।।
पानाआड फळ । पिको द्यावे सावकाश केवळ ।
मग मारिती टोचा सकळ । पक्षी त्यावरी ।।६८।।
परमार्थ केला भरोभरी । केली लयलूट आपणावरी ।
कारण संसाराची जबाबदारी । घेतली वहिनींनी ।।६९।।
प्रतिकूल परिस्थितीत । होत्या शांत आनंदात ।
वावरल्या सदोदित । हसत आणि हसतमुखे ।।७०।।
वहिनींशिवाय सद्गुरूंचा । अवतार नसे पूर्ण व्हावयाचा ।
अशीच वदे सद्गुरुवाचा । वेळोवेळी कीर्तनी ।।७१।।
वहिनी आराम बसल्या । किंवा दमल्या-भागल्या ।



कधीच ना पाहिल्या । कोणी एकाने ।।७२।।
अशाच एक दिवशी वहिनी । होत्या मंदिरी सेवा करोनि ।
स्तब्धल्या त्या दिनी । झाला साक्षात्कार ।।७३।।
सद्गुरु ध्यानी निमग्न । होते मंदिरी धन्य ।
वलय पाहिले देदीप्यमान । सद्गुरूंभोवती ।।७४।।
श्री विठूमाऊली साक्षात । असे पाठीशी वास्तवात ।
ऋषी मुनी थोर संत । कर जोडती सद्गुरुंपुढे ।।७५।।
असा आणण्या अधिकार । नसे बुद्धिज्ञान अपार ।
काय कळो दिला अधिकार । सद्गुरूंनी आपुला ।।७६।।
परंतु कोणताही देहधारी । जाणार एक दिवस केव्हातरी ।
सांगती सद्गुरु परोपरी । तेचि असे सत्य ।।७७।।
परंतु हे संत सकळ । दाखविती झलक शेवटी केवळ ।
कळोनि व्यर्थ निष्फळ । असे त्यावेळी ।।७८।।
देह ठेविला सायंकाळी । कीर्तन चालले त्यावेळी ।
सोहळा समाधीचा पर्वकाळी । नाही कळला आपल्याला ।।७९।।
अवतार कार्य एक्याऐंशी वर्षांचे । संपविले अवचित साचे ।
कळोनि दिले निर्याण कैचे । धन्य धन्य सद्गुरुराज ।।८०।।
अशी एक्याऐंशी ओव्यांची स्मरणिका । सद्गुरुरूपे पूर्ण देखा।
त्यांचेच चरणी भाव निका । ठेवोनिया अर्पितसे ।।८१।।

– श्री. प्रसन्न पां. गोखले.

## (आ) अभंग

### [ १ ]

(१)

धन्य धन्य सद्गुरुमूर्ती । नाम घेता पापे जळती ।।१।।
ते हे रामचंद्र जाण । आले अवतार घेऊन ।।२।।
ज्यांना चवदावे दिनी । कृपा केली गुरुरायांनी ।।३।।
धन्य ऐसे हे संतमणी । दास माणिक लोटांगणी ।।४।।

(२)

धन्य सद्गुरु रामचंद्र । यांची ख्याती असे थोर ।
अभंग ते प्रसादसार । दिधले सद्गुरूनी ॥१॥
दिले प्रसाद म्हणून । तेची हे अभंग जाण ।
जंगमप्रसादगीता गहन । देखोनिया भक्ती ॥२॥
ऐसे माझे श्रीसद्गुरु । यांचा महिमा किती थोरु ।
दास माणिक आरुवारु । चरण वंदीतसे ॥३॥

(३)

दिले अभंग प्रसाद गुरूंनी । सदा लागे त्यांचे चरणी ॥१॥
धन्य धन्य सदगुरु राम । नाम घेताची विश्राम ॥२॥
नामप्रेमी नामदास । म्हणती सिद्धानंद ज्यास ॥३॥
ऐसे श्रीसद्गुरु असती । माणिकाचे कौतुक करिती ॥४॥

(४)

रामचंद्र सद्गुरुनाथा । शरण तुज मी आलो आता ॥१॥
भीक एवढीच घालावी । तुझे पायी वृत्ति रमवी ॥२॥
मन चंचल न व्हावे । लक्ष तव पदी लागावे ॥३॥
दासाची विनवणी तुज । तुझे पदरी घेई मज ॥४॥

(५)

देखिली मूर्ती मूर्ती सद्गुरूची । समूळ भ्रांति गेली मनाची ॥१॥
भेदाभेद दोन्ही आटले । मग सद्गुरु मज भेटले ॥२॥
दास माणिकाची एवढीच आस । तुझे पायी स्थिर करी मनास ॥३॥

(६)

धन्य हे सिद्ध पुरुष असती। रामानंद प्रल्हाद म्हणती ॥१॥
गुरुवचनाप्रमाणे जाण । पाचवे वर्षी करिती कीर्तन ॥२॥
धन्य गुरु राम असती । बोलती ते खरे करिती ॥३॥
दास माणिकाची माता । आवडी पुरवी मनोरथा ॥४॥

(७)

सद्गुरु तू असससी समर्थ । पुरवी एवढे मनोरथ ॥१॥
तुझे चरणी विनंती । अहंकार न वसो चित्ती ॥२॥



मन धावो तुजकडे । न पडो वासनेचे वेडे ॥३॥
श्रीगुरु एवढेची देई । दास वारंवार विनवी ॥४॥

(८)

दीन बाळ शरण आले । त्या म्हणिजे हो आपुले ॥१॥
ऐसा असे तव महिमा । धन्य तू सद्गुरु रामा ॥२॥
माझे पूर्व पुण्य थोर । लाधलास तू सद्गुरुवर ॥३॥
काय द्यावे हे कळेना । बाळ माणिकाला जाणा ॥४॥

(९)

माझे भाग्य उदया आले । सद्गुरु मज भेटले ॥१॥
धन्य धन्य गुरु राम । मूर्ती देखिलिया विश्राम ॥२॥
धन्य तयाचे कीर्तन । असता सुटतो सुगंध ॥३॥
दास माणिक शरण गेला । निश्चळ धरूनी भावाला ॥४॥

(१०)

कस पाहू नको आता । कृपा करी गुरुनाथा ॥१॥
विनवणी रामा तुज । पदी ठाव देई मज ॥२॥
तुजवीण कोणी नसे । ध्यास मज तुझा असे ॥३॥
दास विनवी वारंवार । पदरज लागो सत्वर ॥४॥

(११)

श्रीगुरु अगाध तव महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥१॥
वेद जेथे मुके पडले । श्रुती बोलता नये झाले ॥२॥
तेथे मी कैसा दीन। वर्णी सद्गुरु गुणगान ॥३॥
ऐसा श्रीगुरुमहिमा असे । दासाचा कैवारी दुजा नसे ॥४॥

(१२)

धन्य गुरु समर्थ । केला पूर्ण परमार्थ ॥१॥
धन्य ऐसे राम गुरु । नाम घेता मन स्थिरु ॥२॥
जन उद्धराया येती। रामराय अवतार घेती ॥३॥
दास माणिक शरण गेला । नाममेवा घेऊनि आला ॥४॥

(१३)

श्रीसद्गुरु रामनाथा । होई कृपाळु बा आता ॥१॥

पतित मी कर्महीन । मज घेई उद्धरून ॥२॥
खट्याळ या बालकाची । दया येऊ दे हो साची ॥३॥
मूर्ती ठसो दे अंतरी । माणिकाचे हृन्मंदिरी ॥४॥

(१४)

सद्गुरु एवढे दान देई । अल्प भाव तडीसी नेई ॥१॥
वृत्ती साधनी रमवी । भीक घाली माझे आई ॥२॥
मी दीन अज्ञान बालक । सद्गुरु तूची चालक ॥३॥
दास माणिक खट्याळ । माते तुझा लडिवाळ ॥४॥

(१५)

तूची माझी माता पिता । गुरु रामा तूची आता ॥१॥
तुजवीण नाही सखा । तूची आता पाठिराखा ॥२॥
तुजवीण कोणा खासी । येई माझी दया साची ॥३॥
गुरु रामा तूची आता । दास माणिकाचा त्राता ॥४॥

– माणिक बिडेश गोसावी

**[ २ ]**

(१)

गोविंदरायाचे सत्पुत्र । असे ज्ञानमहिमा अगाध ॥१॥
सिद्धानंदमहाराज । दिले अभंग प्रगटच ॥२॥
गुरुकृपा पूर्ण जाण । चवदावे दिनी लागोन ॥३॥
ऐसा ज्यांचा महिमा असे । रामचंद्र नाम असे ॥४॥
पूर्ण रामचंद्र असती। दास नामा पूर्ण करिती ॥५॥

(२)

लहानपणापासून । कीर्तन भक्ति पूर्ण जाण ॥१॥
वेळो वेळा निशिदिनी । नमन तयांचे चरणी ॥२॥
त्यांचे नाम रामचंद्र । अवतरीले रामचंद्र ॥३॥
ऐसे गुरु जया लाधले । त्याचे भाग्य उदया आले ॥४॥
दास नामा लीन झाला । त्यांचे पदी शरण आला ॥५॥

(३)

पहा हो रामचंद्र सद्गुरु । जे रामचंद्र अवतारु ॥१॥



ते सुखाचे आगरु । शरण जाता सुख फारु ॥२॥
परमार्थाचे लावियले तारु । जड जीवा पैलतारु ॥३॥
ऐसा ज्यांचा महिमा थोरु । नामा म्हणे त्यांचा जयजयकार करु ॥४॥

(४)

कृपा करी आता त्वरे । प्रभु श्रीरामराया रे ॥१॥
तुमचे चरणी मन लागो। हीच माझी आस रे ॥२॥
तुमचे नाम चित्ती वसो । एवढीच दया करा रे ॥३॥
तुमचे चरणी दास नामा । एवढेच विनवी रे ॥४॥

(५)

धन्य धन्य रामचंद्र नाथ। घ्या पदरी दीन अनाथ ॥१॥
काय वर्णू तुमचा महिमा । वाचे वर्णवेना सीमा ॥२॥
तुम्हालागी सिद्धानंद । म्हणत असती प्रल्हाद ॥३॥
प्रल्हाद हो नामची सार्थ । केला रामदासबोध ॥४॥
ऐसे माझे श्रीगुरु समर्थ । दास नामा लोटांगण घेत ॥५॥

(६)

धन्य सद्गुरु रामचंद्र । पूर्ण केला परमार्थ ॥१॥
आता नमू त्यांचे चरणी । वेळोवेळा निशिदिनी ॥२॥
निशिदिनी त्यांना दंडवत । वेळोवेळा अखंडित ॥३॥
धन्य ऐसे गुरु समर्थ । बोलती ते खरे करीत ॥४॥
नामा म्हणे शरण जावे । आत्मस्वरूप समजुनी घ्यावे ॥५॥

(७)

धन्य श्रीगुरु रामचंद्रा । एवढी दया करा आता ॥१॥
माझी विनवणी ऐका । तुमचे चरणी भाव निका ॥२॥
भाव ठेविला ते तरती । ऐसी तुझिये प्रचीती ॥३॥
हे खुण सत्य जाणोनी। दास नामा लोटांगणी ॥४॥

(८)

रामचंद्र सद्गुरु दयाळा । घ्या पदरी आता कृपाळा ॥१॥
कृपा करी मजवरी आता । घे पदरी दीनानाथा ॥२॥
नको अंत माझा पाहू आता। तुमचा ध्यास लागला मम चित्ता ॥३॥

माझे मन लागो तव पायी । हीच माझी आस आता पुरवी ॥४॥
देई नामी मज प्रेमा । हेच विनवी वारंवार दास नामा ॥५॥

(९)

सर्व देवांचे हे देव । एक माझे रामराय ॥१॥
त्यांना आधी नमू आता । जे का आम्हा भक्तांची माता ॥२॥
त्यांचा महिमा न वर्णवे । जे जे बोलू ते कमी होये ॥३॥
काय वर्णू त्यांची महती । दास नामा पदरी घेती ॥४॥

(१०)

धन्य रामराय धन्य गुरु माय । ठेवियला भाव तुमचे पायी ॥१॥
तूची गुरुराय तूची ज्ञानदेव । तूची असे देव या जगती ॥२॥
तुम्ही आणि देव नव्हेची दोन्ही । दास नामा लीन तुमचे पायी ॥३॥

(११)

धन्य श्रीगुरु रामराय । डोळा दाविती देवदेव ॥१॥
एक निश्चयाचे काम। दृढ धरा रामनाम ॥२॥
रामनाम जे कोणी घेती । त्यांच्या भाग्या नाही गणती ॥३॥
म्हणूनिया श्रीगुरुपायी । दास विश्रामला पाही ॥४॥

– नामदेव मोरेश्वर कुलकर्णी

**[ ३ ]**

(१)

धन्य धन्य रामराय । तूची अससी सिद्धराय ॥१॥
तुला सांगतो माझी इच्छा । तूची पुरविशी सदिच्छा ॥२॥
तुझे पोटी जन्म यावा । मम देहोद्धार व्हावा ॥३॥
एवढी दासाची विनवणी । घ्यावी आपण गोड करूनी ॥४॥

(२)

मागणे मागतो रामराया रे। ते तू पुरव सद्गुरु राया रे ॥१॥
मान या जन्मी ठेवू नको रे । तुज पोटी झटी जन्म दे रे ॥२॥
ह्याहुनी काय मागू देवा रे । मज इच्छाचि उरली नाही रे ॥३॥
आता कसची वाट पहातोस रे । दास वसंत चरणी लोळला रे ॥४॥



(३)

धन्य रामराय झाले । तेचि ब्रह्मस्वरूप झाले ॥१॥
फार मोठे त्यांचे सुख । सांगतो देखोनी तन्मुख ॥२॥
ऐशा ब्रह्मरूपी गुरूला । दास वसंत शरण गे आला ॥३॥

(४)

महादेव आले रामरूप घेऊनी। संचार करोनी सांगली ग्रामी ॥१॥
केळकरवंशी आले हो जन्मासी । सकल जनासी माहीत आहे ॥२॥
जन्म घेऊनी वंश शुद्ध केला । कुलदीपक झाला सद्गुरुकृपे ॥३॥
महान असुनी म्हणविती लहान । तयांचे हे वचन कोण माने ॥४॥
सद्गुरुचिंतनी झाले हो तल्लीन । तयांचे हे महिमान फार मोठे ॥५॥
तयांचे कीर्तनी प्रगटे हनुमंत । आनंदे नाचत कीर्तनात ॥६॥
लहानपणापासुनी अभंग करीत । बहार उडवीत अभंगांत ॥७॥
अभंग असती बहु खोल खोल । म्हणुनी त्यांचे मोल करवेना ॥८॥
पाचवे वर्षापासुनी कीर्तन करीत । डोळे उघडवीत कीर्तनात ॥९॥
मग सकळजन येतसे शरण । श्रवणाचे मनन करोनिया ॥१०॥
नववे वर्षी केला महान् तो ग्रंथ । रामदासबोध नाम त्याचे ॥११॥
रामदासबोधी अर्थ गूढ असती । सर्व थक्क होती वाचूनिया ॥१२॥
सतरा ते बत्तीस वयाचे दरम्यान । गुरुलिंगगीता महान ग्रंथ मिळे ॥१३॥
श्रीगुरुलिंगगीता ग्रंथ हा अपूर्व । सकळ ग्रंथात अपूर्व असे ॥१४॥
हाची अपूर्व ग्रंथ श्रीरामरायाला । प्रगटोनी दिला नारायणे ॥१५॥
तोची नारायण आहे सर्व जगात । तेची आपुल्या मनात पटतसे ॥१६॥
श्रीज्ञानदेव तेहत्तिशीवर टीका लिहीत । एका दिवसात पूर्ण करिती ॥१७॥
त्यांचे वीस वय होते तये वेळी । बहु खोल लिहिली सानंद टीका ॥१८॥
सानंद ती टीका बहु खोल म्हणुनी। सर्व हार खाती टीकेमाजी ॥१९॥
आता मी सांगतो त्यांचा अधिकार । ऐकावया नकार देऊ नका ॥२०॥
तेचि हो स्वत: साधनसिद्ध झाले । सर्व जन बोले आहे खरे ॥२१॥
तयाचिया लीला श्रवण केल्यावर । येतसे शरण नास्तिक जन ॥२२॥
तयांचे हे ढोबळ चरित्र लिहिले । दास वसंताने तये कृपे ॥२३॥

(५)

मला सांगते सारखे मन । रामरायाचे गारे गुण
॥१॥
तया वेळची सांगतो खूण । वृत्ती कर रे तल्लीन ॥२॥
तुझा रामराय महान । तोचि खरा भगवान ॥३॥
तूचि आहेसी लहान । सदा रहा कर जोडून ॥४॥
अनुभव दिला रामरायानं । सोडू नको त्याचे चरण ॥५॥
एवढे मनाने सांगून । केले दासाचे समाधान ॥६॥

(६)

किती विनवू रामराया । सावध हो रे सद्गुरुराया ॥१॥
तूची साधनी रंगलासी । परी विसरू नको जनासी ॥२॥
तुझे द्वारी भक्त उभा । जरा तयाकडे बघा ॥३॥
त्याचे मागणे थोडकेच । परी आहे तेचि उच्च ॥४॥
जन्म दे रे तुझे पोटी । तया पदरी घे रे झटी ॥५॥
आता पाहू नको रे अंत । दास लोळला मनसोक्त ॥६॥

(७)

झाले झाले सिद्धानंद झाले रे । रामरायाचे गृही प्रगट रे ॥१॥
तये वेळी राम होते अस्वस्थ रे । तये स्थितीत केले वंदन रे ॥२॥
तये वेळी घडला एक चमत्कार रे । सिद्धानंदांनी आत्मरूप केले रे ॥३॥
सिद्धानंदांचा महिमा पाहुनी रे । दास वसंताला आनंद झाला रे ॥४॥

(८)

पहा पहा रामचरण । तुम्हा नेतील उद्धरून ॥१॥
खूण सांगतो पादुकांची । शांती होईल मनाची ॥२॥
ऐसे श्रीराम चरण । देखिले दास वसंतानं ॥३॥

– वसंत महेश्वर बापट

**[ ४ ]**

हिरेमंडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥१॥
कटी ल्याले पीतांबर । कंठी शोभे पुष्पहार ॥२॥
मुद्रिका दशांगुळी । कुंकुम तिलक शोभे भाळी ॥३॥
गरुड आणि हनुमंत । हात जोडोनी वाहत ॥४॥



नासाग्री स्थिर दृष्टी । आत्माराम हीच सृष्टी ॥५॥
ऐसा शोभे दासराम । मुखी राम राम नाम ॥६॥
दृढ धरितो चरण । येई मोरेश्वर शरण ॥७॥

–डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर

**[ ५ ]**

नमो नमो दासरामा । दयानिधे पूर्ण कामा ॥१॥
स्मरण करिता तुमचे । पाप हरते शतजन्माचे ॥२॥
जगदोद्धारा अवतार । नारायणची साचार ॥३॥
हनुमंते कृपा केली। विश्वा दासराम माऊली ॥४॥
वारे भरले नयनांत । ऐसे कीर्तनी सांगत ॥५॥
संतांचे संगती । आनंद अमित किती ॥६॥

– अमित कदम

**[ ६]**

इंदिरा गोविंद तनया । सीतापति रामराया ॥१॥
एक विनवणी तव पाया । आशीश द्या साधन साधाया ॥२॥
प्रल्हादा गर्भी अनुग्रह लाभला । तये परी श्रीरामराय याला ॥३॥
हनुमंत सद्गुरु लाभले । १४ व्या दिवशी पुनीत केले ॥४॥
रामानंद खटावकर । दासरामा म्हणती प्रल्हाद थोर ॥५॥
तेचि गुरुलिंगजंगमानी । प्रल्हाद संबोधिले अंतर्यामी ॥६॥
गुह्य प्रगट होते केव्हा । सहज साधन घडेल तेव्हा ॥७॥
तैसी परमार्थ प्रश्नोत्तरी । तये वेळी प्रगटेल अंतरी ॥८॥
दादा आपुली कृपा असेल जर । तरीच हे घडेल साचार ॥९॥
तैसी प्रगटावी आमुचे अंतरी । हीच एक आस खरी ॥१०॥
याचा अनुभव द्यावा आम्हा । प्रार्थीतसे आत्मारामा ॥११॥
आत्मारामा दासरामा । राम विनवीतसे तुम्हा ॥१२॥

– श्री. रामभाऊ साळुंखे

**[ ७ ]**

रामाचे कोदंड । पडियेले खाली ।
सृष्टीचा वाली। गहिवरला ॥१॥

हनुमंते केला । करुण भुभुःकार ।
शेषाचा भार । दुणावला ।।२।।
कीर्तनाचा श्वास । कीर्तन उःश्वास ।
कीर्तनात ग्रास । अंती केला ।।३।।
गुरू ते शरण । गुरू हेचि जीवन ।
गुरूंचे स्मरण । दशपिंडातही ।।४।।
नामाचा प्रेषित । पार्थिवा त्यजित ।
निघाला वैकुंठात । आपुल्या धामी ।।५।।
स्वरूप साम्राज्य अग्रणी । संतांचा तो शिरोमणी ।
उरी लावी चक्रपाणी । आपुल्या हाते ।।६।।
घाल बा चक्रपाणी । यासी गर्भवासी ।
केळकरांच्या वंशी । याच पुन्हा ।।७।।
कीर्तनात पाहू दे । पुन्हा गौर मूर्ति ।
पुरवाया आर्ती । असंख्यांची ।।८।।

– मधुसूदन शिपूरकर कोल्हापूर

**[ ८ ]**

हनुमंते रचिला पाया । नगर सांगलि उध्दराया ।।१।।
मामा तयाचा किंकर । तेणे केला बहु विस्तार ।।२।।
रघुनाथाची सेवा । पुष्टि कैवल्य वैभवा ।।३।।
दासरामांचे कीर्तन । लहान थोरा प्रभु चिंतन ।।४।।
रात्रंदिन राम ध्यास । दासराम झाला कळस ।।५।।
रामनामे देह भरा । चुकवा चौऱ्यांशीचा फेरा ।।६।।
राधासुत वैभव पाही । सर्वांपायी ठेवूनी डोई ।।७।।

– राधासुत (बापूसाहेब देशमुख) सांगली.

## (इ) संकीर्ण

**[ १ ]**

धन्य केळकर वंश । ज्या वंशात सिद्ध पुरुष ।
रामचंद्रनाथ । नाम तयांचे ।।१।।
जे का परमार्थाचे ईश । प्रथमारंभी नमू त्यास ।



जे परब्रह्मच । प्रत्यक्ष दिसे ।।२।।
ऐसे माझे गुरु समर्थ । न वर्णवे महिमा सार्थ ।
म्हणूनिया दास । लीन झाला ।।३।।

– नामदेव मोरेश्वर कुलकर्णी

**[ २ ]**

(१)

सगुण निर्गुण ब्रह्म आणि माया । दोन्ही तुझ्या लीला सद्गुरुराया ।।ध्रु।।
अगम्य तव माया वर्णावी कवणे । वेदशास्त्रपुराणे वदती नेति ।।१।।
राम आणि कृष्ण नर नारायण । तुझीच ही रूपे मायबापा ।।२।।
आदि आणि अंत स्थूल आणि सूक्ष्म । दृश्य अदृश्य तूचि एक ।।३।।
तुझी सर्व रूपे बुद्धीला अगम्य । गम्यागम्य भेद ना तुझिये ठायी ।।४।।
अनन्य शरण तुझीये पायाशी । धाव दासरामा हृषीकेशी ।।५।।

(२)

कैवल्याचा चंद्रमा उगवला नभी ।
सकलांच्या कल्याणा रामरूप ।।१।।
रामरूपे आजि ज्ञानियांचा राजा ।
लावी ज्ञानदीप घरोघरी ।।२।।
घरोघरी होय तोचि तुकाराम ।
देववितो दर्शन विठ्ठलाचे ।।३।।
विठ्ठलाचे नाम महती नामाची ।
सांगतो जनासी सांगलीते ।।४।।
सांगलीत रहातो चराचरी वसतो ।
दासराम चंद्रमा कैवल्याचा ।।५।।

(३)

माझ्या सद्गुरूचे नाम । देई मनासी विश्राम ।
नामावाचूनि अन्य । काम नाही ।।१।।
माझ्या सद्गुरूचे रूप । आहे लोचनीचा दीप ।
रूपावाचूनि अरूप । नाही नाही ।।२।।
माझ्या सद्गुरूचे गुण । हृदयीची साठवण ।

त्यांच्या वर्णनावाचूनि । जीव थोडा ॥३॥
माझ्या सद्गुरूंची मूर्ति । 'कोण' गावाची महती ।
मूर्तीवाचून मज । वेड नाही ॥४॥
माझ्या सद्गुरूचे वचन । प्रेमभक्तीचे गान ।
त्यांच्या वचनावाचूनि । वचन नाही ॥५॥
माझ्या सद्गुरूचे धाम । प्रेमसुखाचे निधान ।
धामावाचूनि आणिक । सौख्य नाही ॥६॥
माझ्या सद्गुरूचे चरण । तेथे मोरेश्वर शरण ।
त्यांच्या चरणावाचूनि । ठाव नाही ॥७॥

(४)

अनाथांचा नाथ दीनांचा दयाळ। तो हा दासराम मायबाप ॥१॥
काय त्याची कोणी वर्णावी महती । वेदशास्त्र पुराणे बापुडती ॥२॥
कीर्तनी बैसता नित्य आनंदित । ऐसा भक्तश्रेष्ठ दुजा कोठे ॥३॥
इंदिरा तनय गोविंद नंदन । तोचि परब्रह्म रामराय ॥४॥
हनुमंत सद्गुरु शिष्य त्याचा राम । राम हनुमंत अद्वैतचि ॥५॥
धन्य त्यांचे कुळ धन्य त्यांचा वंश । प्रल्हादाचा अंश प्रकटला ॥६॥
तेथे मी राहीन होवोनी अनन्य । दृढ चरणाशी मोरेश्वर ॥७॥

(५)

कैवल्याचा चंद्रमा आज झाकोळला । श्रीदासराम झाला विष्णुरूप ॥१॥
विष्णुरूप झाला वैकुंठासी गेला । श्रावण शुक्ल षष्ठी साधोनिया ॥२॥
साधोनिया खास लाविली उन्मनी। काया केली कीर्तनी कीर्तनरूप ॥३॥
कीर्तन कीर्तन हाचि छंद त्यांचा । अन्य छंद दुजा 'कोण' आहे ॥४॥
'कोण' गावी त्यांचा नित्य वास आहे । सोहंभावे पाहे शोधोनिया ॥५॥
शोधोनिया पाहे आत नांदताहे । गर्जोनिया सांगे दासराम ॥६॥
दासराम त्याचा नित्य नेम ज्याचा । विश्वास साधनाचा तयाजवळी ॥७॥
तयाजवळी गुरु कृपारूपे पाहे । देतो अनुभव स्वानंदाचा ॥८॥
स्वानंदाचा गाभा दावी मोरेश्वरा । तूचि होय चंद्रमा कैवल्याचा ॥९॥

– डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर



**[ ३ ]**

बालराम हा उभा निरंतर
कीर्तनकाली रमे निरंतर
दासराम गोविंद केळकर
रेवणनाथांचा प्रेमळ भक्त
सुगंध सागर हालसिद्धनाथ
जपे निरंतर श्रीराम जयराम जयजयराम ॥

– रंगनाथ रघुनाथ धारवाडकर

**[ ४ ]**

दासराममहाराजांनी कृपा केली
आम्हां केले दास भक्तीचे
मार्ग नव्हता गवसला
त्यांची कृपा झाली
आणुनी ठेविले भक्तिमार्गावर ॥
जैसी माता शिकविती
धरूनिया बोट बालकाचे
तैसे आम्हा चालविती
धरूनिया हात दासराम ॥
पडता अडखळून बालक जेव्हा
माता त्वरे घेई उचलूनी
तैसे जरी अडखळलो आम्ही
पाठी असती दासराम ॥
माता जैसे पाजविती प्रेमे
बाळकडू बालकाते
तैसे आम्हा पाजविले भक्तीचे
बाळकडु दासरामे ॥
केवळ नेत्र कटाक्षाने
किती जीव सुखाविले
मौन आशीर्वादाने

कीती जीव उद्धरिले ॥
इच्छा एकच चरणी तुमच्या
विसर न कधी पडू द्यावा
भक्तिमार्गात सदैव आमच्या
आपुला साथ असावा ॥

–सौ.स्मिता संजय रजपूत.

**[ ५ ]**

दासराम दासराम । मुखी ज्यांच्या रामनाम ॥ध्रु॥
कीर्तनाचा रंग न्यारा । रामनामाचा पसारा ।
रंगूनीया देह सारा । जागला संकीर्तनाला ॥१॥
दिव्य शक्ती भव्य काया । तोच अमुचा रामराया ।
तेजोमय हे रूप विराट । विठ्ठलाची होय वीट ॥२॥
एक संध्या पंचपदिला । देह अवघा राहीला ।
त्यागूनीया प्राण त्यातून । पंचपदीला तो निमला ॥३॥
नसती ते जरी देहरूपी । वरद आम्हा तव सदा लाभूदे ।
वंदूनीया त्या संतासी । पूर्ण करीतो या कवनासी ॥४॥

– विजय वासुदेव कुलकर्णी(चिंचणीकर), सांगली.

## (ई) पदे

**[ १ ]**

(१)

मनी असे आस फार मोठी । कधी मज सद्गुरु देती भेटी ॥ध्रु॥
परमात्मरूप दाविती डोळा । ही तो वेगळीच कळा ।
म्हणोनिया पायी वेळोवेळा । नमन करिती ॥१॥
काही घडेना काही कळेना । जीव मायेने हा भुलला ।
मायेपार नेती त्याला । धन्य ते गुरु असती ॥२॥
माझे पुण्य फळा आले । सद्गुरु चरण आज देखिले ।
नामा म्हणे धन्य मज केले । या जगती ॥३॥



(२)

तूची माता तूची पिता तूची सकल दाता ।
तुजवीण या मायाजाळी नाहीच उद्धरीता ॥१॥
तुजवीण कोणा माझी दया नयेच ये आता ।
अपराध माझे क्षमा करुनी घे पदरी आता ॥२॥
आता मज पदरी घेशील हाची भरंवसा ।
दास म्हणे माझा हाची निश्चयाचा ठसा ॥३॥

– नामदेव मोरेश्वर कुलकर्णी

**[ २ ]**

(१)

उच्चरवाने नाम गर्जुनी करशी जगदुद्धार ।
पतितपावना श्रीरामराया त्रिवार जयजयकार ॥ध्रु॥
श्रीहनुमत्प्रभु कृपाप्रसादे
अद्वय भजनी रंगुनी गेले
नामदेव तो गीता बोले
वीणा कंठी श्रीनामाची करी दिव्य झंकार ॥१॥
गुरुलिंगजंगम प्रसन्न झाले
प्रसादगीता अमृत आले
कलियुगीचे वेद जन्मले
निळ्या नभाचे अंबर डुलते किमया अपरंपार ॥२॥
श्रीरामा तव कोमल मूर्ती
पाहून चंदन लाजे पुढती
तव पदस्पर्शे पावन धरती
उद्धारक तू चराचराचा असा तुझा अधिकार ॥३॥
कीर्तनी तुझिया रंग वेगळा
भक्तिभाव हा दिसे आगळा
ब्रह्मवर्णनी रंग निराळा
देव नाचतो सुगंध उधळून नाथांचा दरबार ॥४॥
वणवण फिरलो शोधीत जगती

असता जवळी माणिकमोती
सर्वस्व वाहतो तुझिया पुढती
मुदित मनाने करितो गायन करी प्रभो स्वीकार ॥५॥

(२)

पवित्र आपुल्या पदास वंदना । वाहतो प्रार्थना आणि प्रेरणा ॥ध्रु॥
परमात्मा सर्वेश्वर जो जगी असे । तोच आपुल्या सदैव अंतरी वसे ।
रंग तो 'श्रीरंग' स्वये होय कीर्तना ॥१॥
अहर्निश कीर्तनात गुंग जाहला । स्वरूपात वसुनी नित्य देव पाहिला ।
दिनराती वैखरीत नामसाधना ॥२॥
निजरूपी निजानंदी नित्य रंगला । कैवल्यी चिन्मया सवेची डोलला ।
सोहंरूप मूर्त तुझी करी गायना ॥३॥
महाज्ञानी पूर्ण ज्ञानी पूर्णरूप जो । सूर्य होऊनी तमात वाट दावी जो ।
नादमयी जीवन हे सुफल आपणा ॥४॥
सूर्य चंद्र अंबरात येत जोवरी । कीर्तनात पाहू दे तुम्हास मंदिरी ।
प्रभुचरणी या समयी हीच प्रार्थना ॥५॥

– प्रकाश सदाशिव भावे

**[ ३ ]**

अध्यात्माचा मार्ग धुंडता दिसले चिन्मय धाम ।
हृदयी वसले दासराम माझ्या हृदयी वसले दासराम ॥ध्रु॥
साधे भोळे रूप अलौकिक प्रभा फाकते तया उजळीत ।
तेजाने त्या दूर पळाले जीवनातील क्रोध आणि काम ॥१॥
भाग्य केवढे माझे खरोखर सदा दिसावे रूप निरंतर ।
हीच आस मज सदा असावी दुःखा पडे नित्य विराम ॥२॥
सामान्यासाठी झिजला धरी उराशी तो पतिताला ।
परमेशाचा दूत असे हा देई जीवनास हा पूर्ण विराम ॥३॥

–प्रतापराव नानासाहेब कदम

**[ ४ ]**

धन्य सांगलीग्राम भूतळी जेथे अवतरले ।
संतराज श्रीरामराय हे तारक जगी झाले ॥१॥



चौदावे दिनी हनुमंतांची कृपा जया झाली ।
अशीर्वादे वृत्ती त्यांच्या कीर्तनात रमली ॥२॥
बालरामाचे ऐकुनि कीर्तन रामानंदा आनंद ।
बाल प्रभूला देई पदवी ऐशी प्रल्हाद ॥३॥
बालभक्तीने खूष होऊनि कीर्तनी सिद्धानंद ।
प्रगटचि झाले सकळा आला तेथे फार सुगंध ॥४॥
नागाप्पाण्णावचने करूनि नारायण वोळले ।
गीता गुरुलिंग प्रल्हादाला अभंग ते दिधले ॥५॥
ज्ञानेश्वरप्रभु ग्रंथावरती टीका बहु रचली ।
साधक लोका टीकावली ती उपयोगी ठरली ॥६॥
अखंड कीर्तनपरंपरा ती गोविंदी मिनली ।
प्रल्हादाने कीर्तनयोगे परंपरा धरली ॥७॥
रामराय ते अप्पावाडी क्षेत्री जैं गेले ।
सुवास सोडुनि देवाने त्या कौतुक बहु केले ॥८॥
अनेक साधु घरी येऊनि आदर दाखविती ।
रामदास हा विनम्र भावे माथा पदी ठेवी ॥९॥

– के. वा. आपटे

**[ ५ ]**

कृपा करी गुरुराया रामराया कृपा करी गुरुराया ॥१॥
पतितपावना पतित मी आलो शरण तुझ्या पाया ॥२॥
संसारी मी निशिदिनी रमलो ना सुटे मोह माया ॥३॥
विषयवासना सततची छळती बुद्धी जाई वाया ॥४॥
श्रद्धा नाही ध्यानही नाही मनी नाही गुण गाया ॥५॥
भक्ती मजला मिळेल कैसी मन जाते भटकाया ॥६॥
ध्यान जमेना साधन नाही पतित हो मन काया ॥७॥
तुझीच भक्ती व्हावी केवळ ध्यास असो हृदया ॥८॥
शरण तुजला मोरेश्वर हा धाव बा उद्धराया ॥९॥

–डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर

**[ ६ ]**

रामाचा दास खरा हाच दासराम ।
नाम राम नाम धाम नाम हा विराम ।।ध्रु।।
कृपाछत्र भक्तावर नित्य हा धरी ।
रघुनंदन भरत बंधु ठेवि अंतरी ।
शब्द शब्द वैखरीत वेद येई साम ।।१।।
मिटुनी नेत्र एकचित्त नेम हा करी ।
संकटात भक्ताला तोचि सावरी ।
नाम हेच श्रेष्ठ हाचि भाव असे ठाम ।।२।।
संसारी परम अर्थ ज्यास लाभला ।
मामांचा पुत्र दासराम शोभला ।
भक्तीने भक्तांचा भार वाही राम ।।३।।

– राम चिपळूणकर

**[ ७ ]**

माझ्या सद्गुरूचे पाय शिरीष सुमाचे केसर ।
गुलाबाचा रक्तिमा होई धुसर धुसर ।।१।।
माझ्या सद्गुरूचे पाय लाख मनांचे निधान ।
ठेवूनिया जाती येथे आपल्या कर्माचे विदान ।।२।।
माझ्या सद्गुरूचे पाय करीतसे ताप भंगा ।
अंगुष्ठातूनी वहात असे पापक्षालिनी ही गंगा ।।३।।
माझ्या सद्गुरूचे पाय साकारले हे निर्गुण ।
आकार लेवूनीया आले निराकाराचे गगन ।।४।।
माझ्या सद्गुरूचे पाय सम चरण विटेवरी ।
भवाब्धीची खोली दावी कर ठेवुनिया कटेवरी ।।५।।
माझ्या सद्गुरूचे पाय सदा वागवी मी अंतरी ।
झेलते ही शिवपिंडी ठेविता झणी भूमीवरी ।।६।।

– मधुकर शिपुरकर

**[ ८ ]**

रामनिकेतनी राम कीर्तना चला ।
दासराम गुरुवर मज लावती लळा ।।ध्रु।।



सतत सिताराम स्वयं येथे रहाती ।
भक्तकाजा धावुनी ये दास मारुती ।
पादुका देव्हारी भाळ ठेवला ।।१।।
सिंहासनी सद्गुरुपदी चित्त रंगले ।
सद्गुरु गुरुलिंग मनी भावे पुजिले ।
अंतकाळी जपलेला मंत्र हा भला ।।२।।
ज्ञानभक्ती आनंदे डोल कीर्तनी ।
अनुहाते झांज चिपळी झंकरे झणी ।
भाळ पदी ठेऊनिया राम पूजीला ।।३।।
दासराम अंतरी गुरुलिंग निशिदिनी ।
नित्य चंद्रशेखर सेवेस कीर्तनी ।
हरिहर भेटीचा लाभ लाभला ।।४।।
बहु भाग्ये निगूढ मठी भेटी जाहली ।
रामनामगंगा ही येथे पावली ।
लक्ष्मणा राम आजी येथे पावला ।।५।।

– ल. कृ. कुलकर्णी.

**[ ९ ]**

अनमोल अनामिक सुगंध उसळे रामराय कीर्तनी ।
निळ्या सागरी नील चमकतो फिकी त्यापुढे सुवर्णखाणी ।।ध्रु।।
गोविंदाच्या पुण्यतिथीशी
प्रेमपूर ये नामभक्तीशी
संचार जाहला आले दिवशी
साथ तयाची आज देऊनी गंध दिला उधळुनी ।।१।।
अप्पाचिये वाडी देऊळी
सिद्ध बोलले या राऊळी
रामदर्शने शंकर निवळी
कस्तुरी जैसा गंधित वारा वाहे ओसंडुनी ।।२।।
हालसिद्धाचे येता मंदिरी
कौल दिलासे सुपारीवरी

अखंड होईल कीर्तन भूवरी
मनामनांची फुले बहरली आनंदे उमलुनी ।।३।।
मनी असावे तुझेच चिंतन
नित्य घडावे अमूर्त दर्शन
तव चरणांचे अखंड पूजन
श्रीदादा मज तव नामाविण दुजे नावडो जनी वनी ।।४।।

–प्रकाश भावे

**[ १० ]**

(१)

होईन मी भिकारी । रामनिकेतनचा वारकरी ।।ध्रु।।
हाची माझा नेमधर्म । मुखी रामदादांचे नाम ।।१।।
हीच माझी उपासना । लागणे रामदादांच्या चरणा ।।२।।
सूरदास म्हणे दादा माऊली। नित्य धरी भक्तावरी साऊली ।।३।।

(२)

सासर माहेर विठ्ठल देव्हारी । एकच झाले गुरू हरी ।।ध्रु।।
रामदादांच्या हरिकीर्तन गजरी । कृष्णामाई तीरी सांगली गणेश नगरी ।
दादांच्या कीर्तनी डोले मंगलमूर्तीची स्वारी ।।१।।
नित्य दासबोध ज्ञानेश्वरी । माया ममता करी भक्तावरी ।
जशी माऊलीच्या परी ।।२।।
सूरदास सांगे बंधुभगिनीसी । चला जाऊ दादांच्या हरिकीर्तनासी ।।३।।

(३)

गणेशनगरी सांगलीत । दादा अखंड कीर्तन करतात ॥
कृष्णामाई तीरी । सांगली पवित्र नगरी ।
रामदादांच्या कीर्तनी सुपुत्र । चंद्रअण्णा हर्ष भरित ।
रामविजय वाचीत । भक्तजनास आनंद होत ॥
दादांच्या हरिकीर्तन गजरी । सांगली झाली पंढरी ।
सूरदास लोळे रामदादांच्या चरणी ॥

(४)

चला चला सख्या सुंदरी। मिळूनी जाऊ चला राम मंदिरी ।।ध्रु।।



मनुष्य जन्मा येऊनी । पाऊ रामदादांच्या हरिकीर्तन गजरी ।।
अनंत जन्मी फेरे फिरूनी । मनुष्य जन्म दिला ज्या देवानी ।
त्याचे वर्णन ऐकू रामदादांच्या कीर्तनी ।।१।।
लक्ष चौऱ्यांशीचा फेरा चुकवाया ।
सूरदास लागे रामदादांच्या पाया ।।२।।

(५)

कोण बनेल कैसी घटका । काळ क्षणात करील सुटका ॥
दादा सांगती हरिकीर्तनात । आल्या जन्माचे कराया सार्थक ।
हरिचरणी लावा चित्त ।।१।।
लक्ष चौऱ्यांशी योनि फिरूनी । मानव जन्मा आलो आपण ।
गीता ज्ञानेश्वरी करा पठण
दादांचा ऐकुनी हरिकीर्तन गजर । सूरदास लोळे दादांच्या चरणावर ।।२।।

– सूरदास ढेरे

**[ ११ ]**

नमो दासरामा नमो दासरामा । कृपाळू दयाळू चिदानंद रामा ।।ध्रु।।
सद्‌गुरु असती देवाहूनी थोर । चैतन्याचा वारा सर्वाहुनी थोर ।
दयेच्या सागरा भक्तपूर्ण कामा ।।१।।
सद्‌गुरुकारणे उमगतो देव । साधन करिता कळो येई ठाव ।
चैतन्य स्वरूपा दावी परब्रह्मा ।।२।।
देव उमगता सद्‌गुरु प्रचीती । साधकासी भेटे चित्कळा शक्ती ।
चिरंतन सुखा प्रल्हाद नामा ।।३।।
धन्य धन्य केले केळकर कुळा । राममंदिरी या परमार्थ शाळा ।
आत्मज्ञान प्रगटे सहजानंद रामा ।।४।।
आमुचे कुळीचा देव रामेश्वर । तयाची कृपा ही असो आम्हांवर ।
रोहिणी विनविते आत्मारामा ।।५।।

–सौ. रोहिणी चंद्रशेखर केळकर

**[ १२ ]**

दासराम हे सकला सोडुन निजधामाला गेले ।
रामावाचुन रामनिकेतन सुने सुने भासले ।।ध्रु।।

हास्यवदन ती प्रसन्न मूर्ती क्षितिज्यापल्याड गेली ।
नश्वर काया नाश पावली मातीत मिसळुन गेली ।
रामनाम हा मंत्र देऊनी भक्ता पावन केले ॥१॥
नियतीचा हा रहाटगाडा काळ ओढुनी नेतो ।
कर्तृत्वाच्या स्मृती जागत्या मागे ठेऊन जातो ।
दासराम अमर जाहले मरणा मारून गेले ॥२॥
सहवासाचे प्रेम तयांचे सकलांना आधार ।
कसे फिटावे ऋण हे आपुले, त्यांचे उपकार ।
कृतज्ञतेचे भावपुष्प हे चरणी अर्पण केले ॥३॥
दादांचा हा असे वारसा अण्णांच्या हाती ।
भक्तांचे हे प्रेम तयांच्या राहिल सदैव पाठी ।
राम राम हे रामनिकेतन तसेच पुढती चाले ॥४॥

– रा. न. चिपळूणकर

**[ १३ ]**

'दासराम' पूर्ण काम शांती धाम भक्तांचे ।
'सन्त' असुनी 'दास' म्हणवी थोरपण त्यांचे ॥१॥
भक्तिपंथ दाखविला अनुभवाच्या बोलांनी ।
कसे व्हावे उतराई डोई ठेवू त्या चरणी ॥२॥
तृप्त केले सकलांना आत्महित साधुनी ।
दादामहाराजासम नाही संप्रती कोणी ॥३॥
भाग्य थोर माझे म्हणूनी सहवास त्यांचा लाभला ।
आदारांजली वाही 'संतदास' हा दुबळा ॥४॥

– भाऊसाहेब ऐनापुरे, सांगली

**[ १४ ]**

मज आठवती, भेटतात मज कोणी । डोळ्यात दाटते पाणी ॥ध्रु॥
या वास्तूला रामनिकेतन वदती । बघ कसे कळस झगमगती ॥
या इथे मला मामा आमुचे दिसती । कीर्तन ते अजुनी करिती ॥
किती अभंग ते ओव्या किती ते म्हणती । स्वर त्यांचे अजूनी घुमती ॥
किती वर्षे ते येती आणिक जाती । किती कमळे उमलुनी मिटती ॥



दादांच्या शब्दांमधुनी मामाच बोलती अजुनी । मग गहिवर ये दाटूनी ॥
त्या खांबाशी बसल्या वहिनी । हरवल्या कीर्तनी अजुनी
मज आठवती, भेटतात मज कोणी । डोळ्यात दाटते पाणी ॥१॥
तो ज्ञानोबा कैवल्याचा पुतळा । चैतन्याचाच जिव्हाळा ॥
हा अभंग हो चव्हाण गाऊनी गेले । का अमुचे डोळे ओले ॥
मनी भक्तीचे सूर जिथे भरलेले । ते सूरदासही आले ॥
मग पंढरीच्या वाटेवरूनी सगळे । वारकरी नाचत गेले ॥
उपळाविकर नामक भगिनी देहाचे चंदन करूनी । मामांच्यासाठी झिजूनी ॥
निजधामाला क्षणात गेल्या निघुनी । उरल्यात अशा आठवणी ॥
मज आठवती भेटतात मज कोणी । डोळ्यात दाटते पाणी ॥२॥

– श्रीरंग विष्णू जोशी, सांगली

**[ १५ ]**

कीर्तनरंगी वाणी रंगली । रंग उधळितो नामाचा ।
काय उणे मग पडेल त्याला दास असे जो रामाचा ॥ध्रु॥
रामनाम हे सदैव वाचे । ध्यास कीर्तनी दुजा न साचे ।
नामामृत हे जना पाजण्या जन्म जाहला दादांचा ॥१॥
श्रीकोटणीस गुरुप्रसादे । कीर्तन गंगा अखंड वाहे ।
आशीर्वाद सद्गुरूंचा मिळता अखंड निर्झर नामाचा ॥२॥
शांत स्वभावे निर्मळ चित्ती । अखंड रंगे नामी वृत्ती ।
कित्येकांचे दुःख निवारी संदेश देऊनी नामाचा ॥३॥
मारुती दर्शन सदैव घेती । रंगी कीर्तनी सवे रामचि ।
रिध्दी सिध्दी इथे नांदती प्रसाद घेण्या भजनाचा ॥४॥
देहरूपाची नसे शाश्वती । अनंतात ते मिसळून देती ।
संत तुक्याचा ज्ञानोबांचा कळस चढविला ज्ञानाचा ॥५॥

– नंदकुमार दिवाण, सांगली

**[ १६ ]**

मन अधीर अधीर जाहले । पाहण्यां तव पावन पावले ॥ध्रु॥
मंदिरी येता शीत वात तो । तप्त मनाला शांत करितो ।
उदास विचारा दूर नेतो । मानस हर्षवितो माझे मानस हर्षवितो ॥१॥

गाभारी या गंध दाटतो । कीर्तिगंध हा मला भासतो ।
आसमंती भरुन उरतो । चित्ता तोषवितो माझ्या चित्ता तोषवितो ॥२॥
तीर्थ प्राशिता पाप नासते । तनू माझी ही शुचित् होते ।
मन आदरे भरुनी येते । नतमस्तक होते माझे नतमस्तक होते ॥३॥
राख नव्हे ती अंगारा तो । रक्षण माझे सदैव करितो ।
विश्वासा तो जागृत करितो । धीरही तो देतो मजला धीरही तो देतो ॥४॥
प्रदक्षिणा घालिता मंदिरी । शांत लहरी अुठती चित्ती ।
नाम तुझे हे येता ओठी । भावनांची दाटी माझ्या भावनांची दाटी ॥५॥
चरणांवरती भाल टेकिता । कृपादृष्टी माझ्यावरी पडता ।
भिऊ नको आश्वासन देता । गुरु माय ताता तुम्हीच हो गुरु माय ताता ॥६॥

सौ. आशा सु. केळकर.

## (उ) श्लोक

[ १ ]

वजीरकृपे अवतार झाला । नारायणाने हृदि वास केला ।
नित कीर्तनी देव श्रोता जयाला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥१॥
हनुमंत अंकी श्रीराम रमला । कृपादृष्टीचा ओघ नयनी मिळाला ।
जयाच्या घरी देव संनिध आला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥२॥
गुरूलिंग आले तेजो रूपाने । जया बोध केला निज दर्शनाने ।
कलीच्या युगी वेद ज्याचे मुखाला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥३॥
श्रीराम नामात अनमोल अर्थ । नारायणे ज्यास केला समर्थ ।
अहर्निश जो रामरंगी निमाला। नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥४॥
श्रीराम जय राम जय राम बोले। श्रीराम घोषे हृद पुष्प उमले ।
श्रीराम ज्याच्या हृदयात वसला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥५॥
सदा अंतरी ज्ञान जागे जयाचे । नसे हो तया भान त्या लौकिकाचे ।
सदा चित्तवृत्ती वदे नाम बोला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥६॥
सदा कीर्तनी जो तदाकार झाला। अहंभाव ज्याच्या पदी लीन झाला ।
ध्यानी मनी नाम ज्याचे मुखाला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥७॥
असा संतराजा योगी पुरुष। परमेश आला बदलोन वेष ।
स्वरूपी वसूनी करी साधनेला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥८॥



तू चंद्रमा पूर्ण कारुण्यसिंधू । त्रिलोकी तुझा थोर महिमा अगाधू ।
तुझ्या दर्शने मोद मोदित झाला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥९॥
गोविंदसुता प्रभु रामराया । प्रकाश भावे नमिता पदा या ।
लाभे विसावा जयाच्या पदाला । नमस्कार श्रीराम प्रभु रामयाला ॥१०॥

– प्रकाश सदाशिव भावे

**[ २ ]**

(१)

जयाचा जगी जन्म त्या सत्कुळात ।
जयाचे पिता मात दोन्ही महंत ।
गुरू तोषवीला हनूमंत राजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ॥१॥
जया वोळला श्रीगुरूलिंगराजा ।
मिळाली गिता कानडी रामराजा ।
असा थोर हा संत प्रल्हाद राजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ॥२॥
जयाची मती कीर्तनी गुंग झाली ।
जयाची कृती साधनी दंग झाली ।
जयाची रती हो सदा देवकाजा ।
नमस्कार श्रीदासरामासी माझा ॥३॥

(२)

राम राय राम राय राम राय राम राय ।
राम माय राम माय राम माय राम माय ।
राम तात राम तात राम तात राम तात ।
राम पायी दंडवत राम पायी दंडवत ॥१॥

(३)

जयाचे मनी सद्गुरू नित्य राहे ।
जनाच्या हिता जो सदा सिद्ध आहे ।
करी जो निजी संप्रदाया प्रणामा ।
नमस्कार माझा तया दासरामा ॥१॥

(४)
सती इंदिरेचा असे राम पुत्र ।
श्रीगोविंदरावो पिता तो सुपात्र ।
हनूमंत तो सद्गुरू दासरामा ।
करी केशवो दासरामा प्रणामा ॥१॥
–के. वा. आपटे

**[ ३ ]**

जननी इंदिरा सुपुत्र राम जनक गोविंद ।
बीज जैसे फलही तैसे हे झाले सिद्ध ॥१॥
पिता शुद्ध सात्त्विक ज्ञानी भक्त विनयवंत ।
सुत ही तैसा भक्त विवेकी कवी बुद्धिमंत ॥२॥
कीर्तनसमयी साथ करितो गातो वाजवितो ।
गोविंदाची सेवा करूनी आनंदा लुटतो ॥३॥
सोमेश्वरादि सिद्धमालिका राम शरण त्याला ।
सिद्धकृपेचे वारे भरले सिद्धभाव ठसला ॥४॥
कीर्तन करतो उड्या मारतो आपणा विसरतो ।
विसरा विसरूनि अनुसंधानी पांडुरंग रमतो ॥५॥
– पांडुरंगमहाराज ताम्हनकर

**[ ४ ]**

जिथे वाजती टाळ आणि मृदंग ।
जिथे मंद वीणेवरीही अभंग ।
जिथे संथ श्वासावरी रामनाम ।
आम्हाला तिथे भेटती दासराम ॥१॥
जिथे भक्तिभावे भरे नित्य ऊर ।
जिथे पापणीला अकस्मात पूर ।
अहंता सरोनी उरे जेथ नाम ।
आम्हाला तिथे भेटती दासराम ॥२॥
जिथे कोसळे दिव्य नक्षत्रमाळ ।
प्रकाशाविनाही प्रकाशे आभाळ ।



जिथे पौर्णिमेचे निराकार धाम ।
आम्हाला तिथे भेटती दासराम ॥३॥
जिथे नीरवातूनही नाद येतो ।
फुलावाचुनीही जिथे गंध येतो ।
सुखालाही जेथे सुखाचा विराम ।
आम्हाला तिथे भेटती दासराम ॥४॥
जिथे सांज नाही जिथे ना सकाळ ।
जिथे सूर्य नाही नसे चंद्रवेळ ।
जिथे शांतीचे नित्य कैवल्यधाम ।
आम्हाला तिथे भेटती दासराम ॥५॥
– श्रीरंग विष्णु जोशी.

**[ ५ ]**

श्रीरामराय इंदिरा गोविंद पुत्र। शिरी असे ज्यांच्या हनुमंत छत्र ॥
ध्यानी मनी चिंती जो रामनामा ।नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥१॥
दासराम तू गुरु माय ताता । तुजवीण माता कोण प्रार्थु आता ॥
बुडालो प्रपंची तारी हे पूर्णकामा । नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥२॥
तू एक देव दिससी मज डोळा । सदा संकटी धरावे करी तू मला ॥
धाव त्वरे हे सद्गुरु साईरामा । नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥३॥
पाप ताप व्याधी सर्व ती हरावी । विघ्ने क्लेश भिती सर्व निरसावी॥
कृपा करी हे सर्व मांगल्य–धामा । नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥४॥
दे धर्म प्रिती सन्मती आणि भक्ती । सत्संगती आणि सायुज्य मुक्ती॥
दे हर्ष, मती अन् दे नामप्रेमा । नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥५॥
पंच श्लोक हे नित्य पठण करावे । श्रीदासरामा सदा ते स्मरावे ॥
सद्गुरुकृपे होऊनी पूर्ण कामा । नमस्कार साष्टांग श्रीदासरामा ॥६॥
– सतेज सुधाकर केळकर.

**[ ६ ]**

दास्यत्व मानुनी श्री राघवाचे । सदोदित हे ध्यान त्या रघुपतीचे ॥
रात्रंदिनी चिंतनी राममूर्ती । मनी ठेवीली नित्य वैराग्य वृत्ती ॥१॥
मना रामरंगी सदा गुंतविले । हा राम त्राता जना बोधियेले ॥

रामांतरी विश्व ब्रह्मांड साठे । जना पटविले भक्तीने राम भेटे ।।२।।
दाता नियंता कृपावंत होई । सदा राम भजनात रंगुनी जाई॥
रामात विश्राम निष्काम होता । मनासी ही आराम मुखी नाम घेता ।।३।।
मना इंद्रिया जिंकिले रामनामे । हा रंगला कीर्तनी नित्य नेमे ॥
राही जरी तो जनी देहरूपी । जणु विष्णू साक्षात तो चित्स्वरूपी ।।४।।

– विकास जोशी, सांगली

**(ऊ) आरती**

(१)

आरती रामराया । ओवाळितो सिद्धराया ।
सगुण ब्रह्मस्वरूपा । अहो सद्गुरुनाथा ।।१।।
तूचि देवदेव झालासी। हे चि माहीत असे जनासी ।
लोक येती लोटांगणी। तुझा महिमा पाहुनी ।।२।।
हाचि तुझा महिमा मोठा । कोण म्हणेल का रे खोटा ।
म्हणेल त्याची जिव्हा झडो । तोचि तुझ्या चरणी पडो ।।३।।
तूची भक्त कल्पतरू । तुझा महिमा फार थोरू ।
इच्छिताला निरिच्छ करूनी । दोघांचाही दाता होऊनी ।।४।।
इच्छित होता दास वसंत । तया करूनी पसंत ।
तत्काल निरिच्छ करूनि । त्याची इच्छा पुरवुनी ।।५।।

– वसंत महेश्वर बापट

(२)

जय देव जय देव जय दासरामा ।
रामनामी रमुनी सेविसी आरामा ।।ध्रु।।
काळी टोपी डोई शुभ्र वसन धरिले ।
शांति प्रसन्नतेने मुखमंडल खुलले ।
रसाळवाणी श्रविता कर्ण चित्त धाले ।
भासे साक्षात् विष्णु येथे अवतरले ।।१।।
प्रपंच परमार्थाने एकनाथ स्मरला ।
गुणगणपति असुनीही त्रिगुणातीत झाला ।
फाटा दिधला तुम्ही गर्व वासनेला ।



चिमडपंथ झेंडा जपला गाजविला ।।२।।
भक्तांवरल्या प्रेमा नाही ती सीमा ।
सत् चित् आनंदाच्या जन येती धामा ।
आर्त रतीची आरती करणे ह्या नेमा ।
गुरुपदी ठेविलं भाल मोक्षा ये कामा ।।३।।

– भा. ल. रानडे

(३)

आरती दासरामा। गुरु प्रल्हाद नामा ।
अवतार गुरुलिंग । स्वामी चिन्मय धामा ।।ध्रु।।
साधु संत सिद्ध येती । पूर्ण ब्रह्म साक्ष देती ।
हनुमंत सद्गुरु हो । नाम श्रीराम तुम्हा ।।१।।
टीकार्थ भाष्य ग्रंथ । ब्रह्म दाविती यथार्थ ।
साधन संकीर्तन । नमो चैतन्य ब्रह्मा ।।२।।
गुरुलिंग सिद्गीता । श्रुती श्रवणात येता ।
दासानुदास प्रार्थी । प्रेमे प्रतिपाळी आम्हा ।।३।।

–प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी

(४)

आरती रामराया । स्वामी सद्गुरुराया ।
नेई तारूनिया अनाथा । मन राहो तुमचे पाया ।।१।।
गुरुलिंगजंगम स्वामी । तुम्हा म्हणती प्रल्हाद ।
सद्गुरु श्री हनुमंत । तुम्हा त्यांचा प्रसाद ।।२।।
संतश्रेष्ठ रामेश्वर । महिमा तव अपरंपार ।
कृपा होता भक्तावर। आत्मसुखी अनिवार ।।३।।
दास तुमचा रामतनय । अपराधी अनंत ।
हीन दीन मतिमंद । लागो तुमचाची छंद ।।४।।

– शशीकांत गजानन मायदेव

(५)

आरती रामराया । मूर्तिमंत कैवल्या ।
परब्रह्म परमेशा । सर्व तीर्थे तव पाया ।।ध्रु।।

राम आणि हनुमान । कोण गुरु कोण शिष्य ।
नवल येथ जाले । आले बदलोन वेष ।।१।।
अक्षरे चैतन्याची । गुरुलिंगगीता साची ।
कलियुगी वेद आले । ठेव असे संतांची ।।२।।
नानापंथी येती जाती । ब्रह्मानंदामध्ये धाती ।
पंथ भेद मावळती । तव दर्शने प्रचीती ।।३।।
सोहं ज्योती प्रकाशली । वाणी गोविंदी रंगली ।
हनुमंतसाधुकृपे । राम सीता पावली ।।४।।
अहर्निश देवकाजी। मुदे वर्तता सहजी ।
तव रूपे निर्गुणाची । मूर्ती सगुण सहजी ।।५।।

– प्रकाश सदाशिव भावे

(६)

आरती दासरामा । सर्व मांगल्यधामा ।
शरण तुला आलो । करी पावन आम्हा ।।ध्रु।।
पावन कुळी जन्म। धाम पावन झाले ।
पावन गणगोत। ग्राम पावन झाले ।।१।।
राव असो वा रंक। भक्त असो वा दांभिक ।
एक कृपाकटाक्षाने। सारे उद्धरोनी गेले ।।२।।
पितृदत्त परंपरा । ती ही कीर्तन गादी ।
अव्याहत नादब्रह्म । क्षेत्र केले हे पंढरी ।।३।।
अनंत जन्मीचे । पुण्य सफल झाले ।
ही काया कुरवंडाया । तव चरण लाभले ।।४।।

–श्रीमती लुब्धाताई आपटे

(७)

जय जय श्री सद्गुरुराज नामावधूता । नामावधूता ।
सिद्धानंद स्वरूपा स्वयंभू शिवनाथा ।।१।। जय गुरु जय
विष्णुरूप प्रल्हाद अवतार कलिमाजी। अवतार कलिमाजी ।
करुणाघन सद्गुरु नामामृत पाजी ।।२।। जय गुरु जय
शिव गर्भी ॐकार तेथे तू व्यक्त। तेथे तू व्यक्त ।



प्रणव ज्योतीरूपी नाद निरंत ।।३।। जय गुरु जय
गुरुलिंगस्वरूपी असशी तू लीन । असशी तू लीन ।
देव सुरवर कीर्तनी केले तल्लीन ।।४।। जय गुरु जय
नेति नेति मति कुंठित वदलीसे श्रुती । वदलीसे श्रुती ।
कैसे स्वरूप वर्णू मी तो मंदमती ।।५।। जय गुरु जय
शरण रामराया मी तुम्हासी शरण । तुम्हासी शरण ।
पतितोद्धारा स्वामी करीतो नमन ।।६।। जय गुरु जय

– हेमंत शिवदे

(८)

आरती रामराया । स्वामी सद्गुरु राया ।
कीर्तनानंद मूर्ति । लीन होय ब्रह्म माया ।।ध्रु।।
कीर्तनात नाद ब्रह्म । ब्रह्मानंद कीर्तनात ।
परब्रह्म पांडुरंग । नाचतसे कीर्तनी ।।१।।
चंद्रमा कैवल्याचा । कृष्णातीरी अवतारला ।
क्षेत्र केले सांगलीत । जगता उद्धराया ।।२।।
येणे कुळ उद्धरिले । शिष्य पद सिद्धि नेले ।
तिही लोकी डंका गाजे । सुरवर वंदी तया ।।३।।
श्रीराम जयराम जयजयराम । अमर गोविंद धाम ।
आत्मानंदी दासराम । सुख आले सुखा या ।।४।।
माय आणि लेकराचे । नाते जीवाशिवाचे ।
दीन झाला मोरेश्वर । मागे विश्राम पाया ।।५।।

– डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर

(९)

आरती रामराया । तुमची भक्तावरी माया ।
त्रिकाल साधनाने । तुम्ही हरविली माया ।।ध्रु।।
सद्गुरु हनुमंत । तेणे ठेविला वरद हस्त ।
सेवा ही कीर्तनाची । अखंड चाले सतत ।।१।।
निंबर्गीमहाराजे। गुरुलिंगगीता ही बोळली ।
रामदास वंदीतसे । त्रिकाल पद कमली ।।२।।

– श्री. सूर्यकांत रामराय केळकर

(१०)

आरती दासरामा । नित्य कीर्तन सप्रेमा ।
प्रल्हाद अवतार । हनुमंत शिष्योत्तमा ।।ध्रु।।
गुरुलिंगगीता श्रवणी । आपण धन्यचि झाला ।
वायू साधनाने । जीवन्मुक्त होऊनी ठेला ।।१।।
निर्याणाचे वेळी । कीर्तन स्मरण ।
अनिलासी जहाली । अनिलाची आठवण ।।२।।

– श्री. अनिलप्रभु रामराय केळकर

(११)

आरती रामराया । ब्रह्मरूप गुरुराया ।
प्रेमे आरती करिता । भक्ता येई उद्धराया ।।ध्रु।।
वजीरबाबा कृपे । तुमचा अवतार झाला ।
इंदिरा गोविंदासी। ब्रह्मानंद दाटला ।।१।।
गुरुलिंगजंगमांनी । गीतप्रसाद दिधला ।
जंगम प्रसाद गीता । आपण म्हणती त्याला ।।२।।
हनुमंत कृपेने । कीर्तन अखंड चाले ।
सोहळा पाहुनीया। मन आनंदे डोले ।।३।।
अखंड कीर्तन साधुनी । साधनी मन रमले ।
मन रमता साधनी । दासराम सुखावले ।।४।।
ब्रह्म आणि चैतन्य । तुम्ही अवतरोनी आला ।
मतिमंदा गुण गाया । सद्बुद्धी दे मजला ।।५।।

–श्री. नंदकुमार कुलकर्णी

(१२)

आरती दासरामा । स्वामी सद्गुरू धामा ।
सत्चिदानंदमूर्ती । पाऊले दाखवी आम्हा ।।ध्रु।।
दासरूपे जगी प्रगटला । गुरू हनुमंत तोषविला ।
दीन अनाथा उध्दरीला । सांगली गाव धन्य केला ।।१।।
कीर्तनानंद आगळा वेगळा । गाभारी हालसिध्द प्रगटला ।
वर्णवेना थोरपण तुमचा । मामा पायी लीन झाला ।।२।।



प्रेम दिले दादा नामे। दादा उच्चार जगीवेगळाला ।
सहजदृष्टी पाहता वैकुंठी । विष्णू पदी स्थिरावला ।।३।।
शिवपदी सेवा रूजू झाली । श्रावण पंचमी पावन झाली ।
दासानुदासा पुनित करूनी । श्रीगुरूलिंगजंगमी स्थिरावली ।।४।।
श्रीगुरूलिंगजंगम महिमा। जगदाकार करूनी ।
साधुसंता विनम्र होऊनी । गिरमल अंतरी वसती केली ।।५।।

– गि. न. कुंभार, सांगली

(१३)

आरती दासरामा । करी पूर्ण मनोकामा ।
दिगंत कीर्ती तुझी । प्रेमे प्रतिपाळी आम्हा ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरूंनी । दिला कृपाप्रसाद ।
अखंड कीर्तन करुनी । आपण झाला प्रसिद्ध ।।१।।
अखंड कीर्ती तुमची । राहो या भूतला ।
विवेक डोई ठेवी । आपुल्या पदकमला ।।२।।

–विवेक कान्हेरे, सांगली

(१४)

आरती त्रयमूर्ति । सगुण ब्रह्मज्ञान ज्योती ।
कलियुगी अवतरती । निखळ परमार्थ सांगती ।।ध्रु।।
हनुमंत सद्गुरुवर । मारुतीरायांचे अवतार ।
तीन तपे कीर्तन करुनी । पेठ वसविली थोर ।।१।।
मामामहाराज महासाधु । केला अमोलिक बोधु ।
रामपाठ परमार्थाचा । नेमका अर्थ सांगतू ।।२।।
रामराय गुरुमूर्ती । अधिकार थोर जगती ।
मुक्त हस्ते लूट करिती । कीर्तन महर्षी होती ।।३।।
ऐसे तिन्ही देवचि ते । अवतरले सांगलीते ।
दासा मनी कामनाते । नित्य अनुसंधानाते ।।४।।

– श्री. प्रसन्न पां. गोखले.

(१५)

आरती रामराया । करी कृपेची छाया ।

दावोनी दीनी दया। धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्गुरु हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे केशवाने । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

– के. वा. आपटे

## (ए) शरणागती

(१)

लहानपणापासुनी ज्यांनी साधन केले । ऐशा रामरायाला शरण शरण ।।१।।
ज्यानी वीस वर्षात पूर्ण साधन केले । ऐशा रामरायाला शरण शरण ।।२।।
गृहस्थाश्रमी जे साधनी रंगले । ऐशा रामरायाला शरण शरण ।।३।।
साधन करोनी साधनसिद्ध झाले । ऐशा रामरायाला शरण शरण ।।४।।
दास वसंताला ज्यांनी बोध केला । ऐशा रामरायाला शरण शरण ।।५।।

– वसंत महेश्वर बापट

(२)

बालरामा तव शरणं । दासरामा तव शरणं ।
प्रल्हादेश्वर गुरुराजा । गोविंदनंदना तव शरणं ।
इंदिरातनया तव शरणं । गोविंदात्मजा तव शरणं ।
हनुमत् शिष्या नारायणदासा । श्रीरामचंद्रा तव शरणं ॥

– शरद वामन आपटे

(३)

श्रीरामराया तव शरणं । दासरामा तव शरणं ।
कीर्तनरूपा कीर्तनछंदा । कीर्तनबोधा तव शरणं ।।१।।
ओंकाररूपा तव शरणं । ब्रह्मस्वरूपा तव शरणं ।
ज्ञानस्वरूपा इंदिरात्मजा । गोविंदतनया तव शरणं ।।२।।
प्रल्हादरूपा तव शरणं । अरूपरूपा तव शरणं ।
शिष्योद्धारा भक्तोद्धारा । जगदुद्धारा तव शरणं ।।३।।
हनुमत् शिष्या तव शरणं । नारायणरूपा तव शरणं ।
पतितपावना कृपावलोकना । भक्तपालका तव शरणं ।।४।।



हालसिद्धरूपा तव शरणं । रेवणरूपा तव शरणं
।
दत्तस्वरूपा संतस्वरूपा । देवस्वरूपा तव शरणं
।।५।।
आत्मानंदा तव शरणं । आत्मपददायका तव शरणं
।
कैवल्यात्मका कैवल्यरूपा । कैवल्यबोधा तव शरणं
।।६।।
नित्यानंदा तव शरणं । परमानंदा तव शरणं
। आत्मस्वरूपा नित्य स्वरूपा । श्रीगुरुबोधा तव शरणं
।।७।। शरणोध्दारा तव शरणं । भक्तनिवासा तव शरणं
।
कृष्णासंगमी सांगलीवासी । चिमडस्वरूपा तव शरणं
।।८।।

– डॉ. मोरेश्वर नारायण कुंभोजकर

## (ऐ) भजन

जय जय श्रीराम रामा । जय जय राम राम रामा ।।१।।
जय जय गुरुलिंग रामा । जय जय हनुमंत रामा ।।२।।
जय जय इंदिरा रामा । जय जय गोविंद रामा ।।३।।
जय जय सीता राम रामा । जय जय केशवा रामा ।।४।।

– के. वा. आपटे

## (ओ) प्रार्थना

आहे आता विनवणी । तुझा विसर मनी न आणी ।।१।।
अहंकार घालवावा । वासनेचा ताप न व्हावा ।।२।।
विकल्प ते मोडोनि जावे । भक्तीप्रेम वाढो द्यावे ।।३।।
माझा साधनी आचार । करवूनि घ्यावा सत्वर ।।४।।
ब्रह्मरूपी मजलागी। मिळवावे तुम्ही योगी ।।५।।
केशव प्रार्थितसे तुम्हा । नका विसरु रामा आम्हा ।।६।।

– के. वा. आपटे

## - श्रीदासराममहाराज कृत -
## श्रीनिंबरगीकरमहाराजांची आरती

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु।।

सद्गुरू काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन संप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।

गुरुलिंगजंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।
दासराम शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

## श्रीतात्यासाहेबमहाराजांची आरती

सद्गुरुभक्तीचा डंका गाजवुनी । कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करुनी । गुरुरूपी तन्मय झाले काया संहरुनी ।।१।।

जय देव जय देव जय गुरु हनुमंता । तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता ।।ध्रु।।

राम लीन झाला धन्य तुझे चरणी । ओवाळी आरती तन मन वाहुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीनवाणी । उरेल माझे पाशी सांगा देव धणी ।।२।।

## श्रीमामामहाराजांची आरती

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ॥
सच्चिदानंद-कंदा । गुरुलिंग साधुबोधा ।।ध्रु।।

हनुमंत-सद्गुरु-आज्ञे । केले अखंड कीर्तन ॥
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।१।।

ब्रह्मचैतन्यादि संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।२।।

श्रीराम जयराम जयजयराम । तेरा अक्षरे परम ॥
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे दासराम ।।३।।

*

# परिशिष्टे



# परिशिष्ट १

## भक्तानी सांगितलेले अनुभव

श्रीदादांच्या भक्तांचे बरेच अनुभव यापूर्वी या ग्रंथात दिलेले होते. आता भक्तांनी सांगितलेले काही अनुभव येथे प्रस्तुत केले आहेत.

**(१) बजरंग रामराव हडदरे, सांगली –**

(अ) डोळ्यांचे ऑपरेशनसाठी श्रीदादा डॉ.परांजपे यांचे हॉस्पिटलात होते. त्यावेळी श्री.हडदरे व त्यांचे बंधु श्रीदादांचेसाठी सकाळी दुध व बिस्किटे घेऊन जात असत. एकेदिवशी त्यांना श्रीदादा श्रीस्वामी समर्थ रूपात दिसले.

(आ) विद्यावाचस्पति क्षीरसागर हे प्रवचनाच्या निमित्ताने आंध्र प्रदेशात जात. तेथे ते प.पू.अम्मांचे दर्शनास जात. त्यांना अम्मांनी विचारले, 'तुम्ही सांगलीच्या केळकरमहाराजांचेकडे जाता काय?' ते नाही म्हणाले. तेव्हा अम्मा म्हणाल्या 'सांगलीला गेलात तर केळकरमहाराजांचे कडे जाऊन या.' त्याप्रमाणे क्षीरसागर हे श्रीदादांच्या दर्शनास आले होते. प.पू.अम्मा व श्रीदादा यांची समक्ष भेट कधीच झालेली नव्हती.

(इ) दत्तमहाराज कवीश्वर हे नृसिंहवाडीस येत. नदीत स्नान करताना त्यांचे कानावर शब्द आले, 'सांगलीस जाऊन श्रीदादा केळकरांना भेटून या.' त्याप्रमाणे ते सांगलीस आले. श्रीदादांनी त्यांना चार शब्द बोलावयास सांगितले. दत्तमहाराज म्हणाले, 'हे केळकरांचे स्थान हे अध्यात्माचे एक व्यासपीठ आहे. येथे आल्यावर मला खूप आनंद व समाधान वाटले. परमार्थाच्या रसाचे चार शिंतोडे केळकरमहाराजांनी आपलेही अंगावर शिंपडावेत.'

(ई) वीस वर्षापूर्वीची गोष्ट. गुरुपौर्णिमा झाल्यानंतर दोन दिवसांनी माणिकप्रभूंच्या हुमणाबाद नगरातील काही भक्त श्रीदादांना भेटण्यास आले होते. ते दादांना म्हणाले, 'महाराज, गुरुपौर्णिमेला माणिकप्रभूंच्या समाधि समोर आपले निरुपण झाले. ते सर्वांना आवडले. त्यावेळी भक्तांच्या गर्दीमुळे आपणांकडे फारसे लक्ष देता आले नाही. त्याची खंत वाटून आम्ही आपणांकडे आलो आहोत.' 'सर्व महाराजांचे इच्छेप्रमाणे होते,' असे श्रीदादा म्हणाले.

मग ती मंडळी श्रीदादांचा प्रसाद घेऊन परत गेली. याप्रसंगी मी उपस्थित होतो आणि दोन दिवसांपूर्वी झालेल्या गुरुपौर्णिमेच्या दिवशीही मी सकाळी ६.४५ पासून रात्री ९.३० पर्यंत श्रीदादांच्या जवळच होतो. त्या काळात श्रीदादांचा भौतिक देह सांगली सोडून कोठेही गेला नव्हता. परमेश्वररूप झालेल्या संताना काय अशक्य आहे, असे माझ्या मनात आले.

**(२) श्री. मुरलीधर गणपतराव माने, वकील, सांगली –**

चंद्रभागा सदाशिव सपकाळ या माने यांच्या सासूबाई. ज्ञानेश्वरी ऐकता ऐकता त्यांनी देहत्याग केला. ही गोष्ट माने यांनी श्रीदादांना सांगितली. तेव्हा श्रीदादांनी त्यांना पुढील काव्यपंक्ति लिहून घेण्यास सांगितल्या :–

झुळू झुळू वाहे चंद्रभागा । ज्ञानेश्वरी बिंबली सर्व अंगा ।
ज्ञानेश्वरी वाचिता देह ठेवी । पदांबुजी बालक राम राही ।।

**(३) उषा यशवंत सामक, सांगली :–**

एके दिवशी मला एक स्वप्न पडले. स्वप्नात मी एका कार्यक्रमास गेले होते. तेथे लख्ख प्रकाशात मला श्रीदादांचे दर्शन झाले. ही गोष्ट मी श्रीदादांची स्नुषा सौ. रोहिणी यांना सांगितली. त्यांनी मला श्रीदादांचा अनुग्रह घेण्यास सांगितले. मग मी श्रीदादांचा अनुग्रह घेतला. जेव्हा जेव्हा मी संकटात असते तेव्हा तेव्हा श्रीदादा कोणत्या ना कोणत्या रूपाने ते संकट दूर करतात.

**(४) श्री. नारायण रघुनाथ देशपांडे, सांगली :–**

तत्त्वज्ञान विषय घेऊन एम्.ए झाल्यानंतर, पी.एच्.डी.साठी 'श्रीदासराममहाराजांचे तत्त्वज्ञान' हा विषय त्यांना घ्यावयाचा होता. प्रबंधाचा स्थूल आराखडा घेऊन ते कोल्हापूरच्या एका प्राध्यापकाकडे गेले होते. ते त्यांना मार्गदर्शक म्हणून हवे होते. या विषयासाठी मार्गदर्शक होण्यास त्यांनी नकार दिला. परतण्यापूर्वी श्रीदासराममहाराजांचा फोटो त्यांना दाखवावा म्हणून त्यांनी स्वतःजवळ असणारे 'श्रीदासरामगाथा' हे पुस्तक त्यांना दाखविले. त्यांनी श्रीदादांचा फोटो पाहिला व पुस्तक उघडून एक अभंग वाचला आणि लगेच ते मला म्हणाले 'मी तुमच्या पी.एच्.डी.साठी मार्गदर्शक होण्यास तयार आहे.'

***



# परिशिष्ट २

## श्रीदादांचे काही अनुगृहीत भक्त

निंबरगीकरमहाराजांनी श्रुत केलेल्या श्रीगुरुलिंगगीतेत श्रीदादांना उपदेशानुग्रह देण्याची अनुमति मिळाली. त्यानुसार श्रीदादा अनुग्रह देऊ लागले. हळुहळु श्रीदादांच्या अनुगृहीत भक्तांची संख्या वाढत गेली. त्या सर्वांची नोंद नाही. म्हणून ज्ञात असणाऱ्या काही अनुगृहीतांची नावे (व माहिती) देण्याचा प्रयत्न यापुढे केला आहे. भक्तांची नावे मराठीतील अकारानुक्रमाने दिलेली आहेत.

अनल राम केळकर –श्रीदादांचे तृतीय चिरंजीव.सांगली बँकेत अधिकारी होते.

अनंतराव जोशी (दादर) – सौ.बाबीताईंचे यजमान. उत्सवास येत असत.

अनिलप्रभु राम केळकर – श्रीदादांचे चतुर्थ चिरंजीव. सांगलीतील स्टेट बँकेत नोकरी करीत.

सौ.अनुराधा कुलकर्णी – दा.वि.कुलकर्णी यांची पत्नी. या मराठीच्या प्राध्यापिका होत्या.

सौ. अंबुताई भावे – श्रीदादांची मेहुणी.

अलकनंदा कुलकर्णी – दा.वि.कुलकर्णी यांची कन्या. ही आयुर्वेदाची एम्.डी.आहे.

आनंद आपटे (सांगली) – आनंद टॉकीजचे मालक

डॉ. कार्लेकर – हे एम्.डी.होते. ते श्रीदादांची प्रकृति वरचेवर तपासत.

कृष्णाजी शिंगाडे – फौजदार. हे पोलिस खात्यांतून निवृत्त झाले. यांनी आरतीसंग्रह हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

केशव वामन आपटे – संस्कृत–अर्धमागधीचे प्राध्यापक आणि अनेक ग्रंथांचे लेखक व संपादक

सौ.गीतादेवी जोग (मिरज)– दरवर्षी उत्सवास येतात.

चंद्रशेखर राम केळकर – श्रीदादांचे ज्येष्ठ चिरंजीव. श्रीदादांचे उत्तराधिकारी. नित्य हरिकीर्तन करतात.

दा.वि.कुलकर्णी – हे मराठीचे प्राध्यापक होते. यांनी संत सहस्रनाम हा ग्रंथ रचला.

धनंजय सदाशिव भावे – अंबुताई भावेचे ज्येष्ठ चिरंजीव. कोल्हापुरात

शाहु मिलमध्ये नोकरी करीत.
न.ना.गोखले - हे स्टेट बँकेत अधिकारी होते. यांनी काही ग्रंथ लिहिले आहेत.
ना.बा.पाटणकर - हे सांगलीतील बी.एड्.कॉलेजचे प्राचार्य होते.
नामदेव मोरेश्वर कुलकर्णी- मराठी सातवी उत्तीर्ण. अकाली वारले. यांनी श्रीदादांचे वरून काव्य केले आहे.
नारायण केशव आपटे - हे एम्.कॉम्,सेट असून सांगलीच्या चिंतामणराव कॉमर्स कॉलेजात प्राध्यापक आहेत.
प्रकाश सदाशिव भावे - अंबुताई भावेंचे द्वितीय चिरंजीव. हे पटवर्धन हायस्कूलमध्ये शिक्षक होते.
बापूराव जोशी - वासुदेवराव जोशी यांचे बंधु. सांगली हायस्कूल, सांगली मध्ये शिक्षक होते.
सुधाकर (बाबा) रेगोडकर- हे गजाननमहाराजांचा उत्सव करतात.
बजरंग हडदरे - हे सांगली अर्बन बँकेत नोकरीस आहेत.
पांडुरंग(बाळू) गोखले - सांगली एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयात लेखनिक होते.
भरत वामन फाटक - श्रीदादांचे मामेबंधु. हे खडकीला मिलिटरी कार्यालयात नोकरी करीत होते.
भानुशाली (बोरिवली) - राजाराम बर्वे यांचे जावई. हे दरवर्षी उत्सवास येत.
मधुसुदन परचुरे - हे दरवर्षी उत्सवास येत.
म.वि.गाडगीळ - हे एल्.आय.सी.मध्ये लेखनिक होते.
मंगला जोशी (दादर) (सौ.बाबीताई) - या दरवर्षी उत्सवास येत.
माणिक बिडेश गोसावी - हे श्रीदादांच्या वाड्यात बिऱ्हाडाने होते. हे दादांचे पहिले अनुगृहीत. मॅट्रिक झाल्यावर कर्नाळ या आपल्या गावी रहाण्यास गेले.
माधव सदाशिव बर्वे - हे सी.ए.आहेत. हे श्रीदादांच्या कीर्तनास येत असत. त्यांचे सौभाग्यवतींनी श्रीदादांचे उत्तरगीतेवरील ज्ञानेश्वरांच्या टीकेच्या अर्थाचे पुस्तक प्रकाशित केले आहे.



माया केशव आपटे (सौ.)- या हिंदी सनद असून शिक्षिका होत्या.
यशवंत केशव आपटे - हे स्टेट बँकेत अधिकारी आहेत.
र.रा.जाधव - हे भूविकास बँकेत नोकरी करत होते. त्यांनी चिन्मय नित्यपाठ हे पुस्तक प्रथम प्रकाशित केले.
राजा गोखले - हे श्रीदादांच्या वाड्यात रहात. ते उत्तम बाइंडिंग करीत.
रा.द.बर्वे (बोरिवली) - हे दरवर्षी उत्सवास येत.
सौ. रेखा बर्वे (बोरिवली)- या दरवर्षी उत्सवास येत.
लक्ष्मण वामन फाटक - हे श्रीदादांचे मामेबंधु पुण्यास रहात.
वसंत महादेव बापट - हे मर्चंट नेव्हीमध्ये बॉयलर इंजिनिअर होते. यांनी श्रीदादांचे वरून काव्य केले आहे.
वासुदेवराव जोशी (निरुपणकार) - हे माधवनगर येथे रहात. ते उत्तम कीर्तन/निरूपण करीत.
विश्वनाथ शंकर कुलकर्णी - हे अर्बन बँकेत अधिकारी होते.
वृंदा दिवेकर (सौ.) (संगमनेर) - यांचा विवाह श्रीदादांनी ठरविला होता.
शरद वामन आपटे (निगडी)-हे पिंपरी येथे पेनिसिलीन फॅक्टरीत नोकरीस होते.
शरयु वामन फाटक - ही श्रीदादांची मामेबहीण.
शशिकांत मायदेव - हे पोलिस खात्यात जेलर होते.
शैला भिडे (सौ.) - या विश्वासराव भिडे यांच्या सौभाग्यवती.
श्यामला कृष्णराव पटवर्धन (सौ.) - या सांगली हायस्कूलमध्ये शिक्षिका होत्या. त्यांनी दासरामगाथा हा ग्रंथ प्रकाशित केला.
श्रीधर सहस्रबुद्धे - हे बी.एस्.सी. असून ते स्टेट बँकेत नोकरी करीत.
सप्तर्षी (पालघर) - हे शिक्षक होते.
सीतावहिनी राम केळकर (सौ.) - या श्रीदादांच्या सौभाग्यवती. यांनी निष्काम कर्मयोगाचे आचरण केले.
सौ. सुजाता अरुण जोग - यांना श्रीदादांनी स्वप्नात अनुग्रह दिला.

***

# परिशिष्ट ३

## श्रीदादांचेविषयी आदर व निष्ठा असणारी अनुगृहीतेतर मंडळी

श्रीदादांचा उपदेशानुग्रह घेणारे भक्त निष्ठावान होते व आहेत. तथापि श्रीदादांचा प्रत्यक्ष अनुग्रह नसणारे काही भक्त श्रीदादांचे संदर्भात आदर आणि निष्ठा व्यक्त करतात. अशा काही जणांची नावे या पुढे मराठीतील अकारानुक्रमाने दिलेली आहेत.

१) अंबुताई वाटवे :- या मामामहाराजांच्या अनुगृहीत. मामामहाराजांच्या वेळेपासून त्या सेवा करीत होत्या. आरत्या भरणे, स्त्रियांत प्रसाद वाटणे, इत्यादि कामे त्या करीत.

२) करंदीकर काकू :- या उमदी संप्रदायातील. या श्रीदादांच्या कीर्तनास नेमाने येत असत.

३) गणपतराव कानिटकर :- हे बाबूरावजी कोटणीसांचे अनुगृहीत. ते मामामहाराजांना पिता मानीत. श्रीदादांना ते अनेक पारमार्थिक शंका विचारून घेत. ते कीर्तन करीत. काही काळ त्यांनी औंदुबर येथे देवापुढे कीर्तने केली.

४) गणेशा केळकर :- हे दादांचे मित्र होते. उत्सवात श्रीदादा त्यांना तीन आरत्यातील एक आरती घेण्यास सांगत.

५) प्रा.डॉ.गं.वि.कुलकर्णी :- हे रमण महर्षींना मानीत. हे प्राध्यापक होत. श्रीदादांच्या रामनिकेतनात त्यांची प्रवचने होत. श्रीदासराम गौरव ग्रंथ यामध्ये त्यांचा श्रीदादांचे गौरवपर लेख आहे.

६) गो. वा. केळकर :- हे काही काळ सांगलीत ट्रेझरी ऑफिसर होते. हे श्रीदादांच्या निरूपणास येत असत.

७) चंपूताई :- यांनी ब्रह्मचैतन्यमहाराजांनी वापरलेल्या चिपळ्या दादांना प्रसाद म्हणून दिल्या.

८) श्री चिखलीकर :- हे ट्रेझरी ऑफिसमध्ये श्रीदादांचे समव्यवसायी. हे आवर्जून श्रीदादांच्या कीर्तनास येत.

९) वेदमूर्ति द.वा.बेडेकर :- हे सातारच्या हंस साप्ताहिकाचे प्रतिनिधी



होते. यांनीच श्रीदादांना श्रुत झालेल्या गुरुलिंगगीतेतील काही पदे हंस साप्ताहिकात प्रकाशित करून घेतली होती.

१०) नारायणराव पटवर्धन :- हे श्रीदादांचे आतेबंधु. ते उत्सवात येत. श्रीदादा त्यांना तीन आरत्यांतील एक आरती घेण्यास सांगत.

११) नारायणराव वाटवे :- हे गणपतराव कानिटकरांचे भाचे. हे श्रीदादांच्या कीर्तनास येत.

१२) पांडुरंगराव पतंगे :- हे वारकरी होते. श्रीदादांच्या निरूपणात हे वीणा धारण करीत.

१३) बर्वे मास्तर :- हे श्रीदादांच्या नित्य कीर्तनास येत. प्रसाद वाटणे, बुक्का लावणे व रोजची आरती घेणे या सेवा ते करीत.

१४) भगवान् बापू कुलकर्णी :- हे शाळा नं.२ चे हेडमास्तर. यांना श्रीदादांची बालपणीची कीर्तने आवडत. काही काळ ते परगावी होते. परत आल्यावर ते श्रीदादांच्या कीर्तनास येत श्रीदादांच्या पायावर मस्तक ठेवीत.

१५) भाऊराव पडसलगीकर :-यांनी श्रीदादांचा वायुलहरी हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

१६) प्रा.म.अ.कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद :- हे स्वामी अमलानंदांचे शिष्य. हे उत्सवात श्रीदादांच्या घरी प्रवचन करतात. यांनी श्रीदासराम गौरव ग्रंथात श्रीदादांचा गौरवपर लेख लिहिला आहे.

१७) श्रीमंत माईसाहेब दांडेकर :- या पालघरच्या दांडेकरांच्या श्रीमंत घराण्यातील. याही कीर्तन करीत. श्रीदादांची सटीक ज्ञानदेव तेहत्तिशी यांनी पुत्राच्या स्मरणार्थ प्रकाशित केली. श्रीदादांना पालघरला नेऊन आपल्या विठ्ठलमंदिरात त्यांची कीर्तने ठेवली.

१८) सौ. रमाबाई पडसलगीकर :- या भाऊराव पडसलगीकरांच्या मातोश्री. या श्रीदादांच्या कीर्तनास येत असत.

१९) रामभाऊ गायकवाड :- हे श्रीदादांच्या निरूपणात टाळाची साथ

करीत. हे कधी कधी सोंगी भारुडे करीत.

२०) रामभाऊ साळुंखे :- श्रीदादांचे शिरोमर्दन करीत.

२१) रामभाऊ चिपळूणकर :-हे शिक्षक होते. ते काव्यही करीत. अनेकदा ते श्रीदादांच्या कीर्तनात तबला वाजवीत.

२२) विनायकराव कानिटकर :- हे गणपतराव कानिटकरांचे धाकटे बंधु. हे कीर्तन करीत. काही दिवस त्यांनी पालघर येथे माईसाहेब दांडेकरांच्या विठ्ठल मंदिरात कीर्तने केली.

२३) व्ही. के. कुलकर्णी :-हे वामनराव गुळवणीमहाराजांचे शिष्य. श्रीदादांच्या कीर्तनात उपस्थित राहून ते कीर्तनाची टिपणे घेत. त्यांनी श्रीदादांच्या विवरणासह रामपाठ व नित्यपाठ हे ग्रंथ प्रकाशित केले. त्यांनी चिन्मय नित्यपाठाची नवीन आवृत्ति काढली.

२४) शरयु उपळावीकर :- मामामहाराजांच्या वाढदिवशी श्रीदादा तिला कीर्तनातील विश्रांतीचे वेळी तिने रचलेला मामांचा पाळणा म्हणण्यास सांगत.

२५) श्रीपतराव धोंगडे :- हे महर्षि धुंडिराज विनोद यांचे शिष्य. हे श्रीदादांच्या कीर्तनास येत. सौ. सीतावहिनींच्या निर्याणानंतर यांनी त्यांच्या पायाचे ठसे कागदावर घेतले.

२६) श्रीरंग जोशी :- हे कवि आहेत. त्यांना काही पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी 'श्रीरामनिकेतनची' स्तुति करणारे श्लोक रचले आहेत.

२७) सोनुताई माने :- या श्रीमंत घराण्यातील होत्या. या श्रीदादांच्या कीर्तनात विश्रांतीचे वेळी पदे म्हणत.

२८) हरिभाऊ गाडगीळ :- हे स्वामी माधवनाथांचे शिष्य. यांची सराफीपेढी होती. ते दर एकादशीस श्रीदादांचे घरी येऊन त्यांचेपुढे ज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ म्हणून दाखवीत.

२९) हरिभाऊ पटवर्धन :- हे श्रीदादाचे आतेबंधु. ते उत्सवात येत. श्रीदादा त्यांना तीन आरत्यांतील एक आरती घेण्याससांगत.

✻✻✻



# परिशिष्ट ४

## श्रीदादांचे भेटीस आलेले महनीय

श्रीदादा प्रवचने व कीर्तने करतात. तसेच ते रोज हरिकीर्तन करतात. ही गोष्ट अध्यात्मप्रेमी जनांना माहीत होती. त्यातील काही स्थानिक होते तर काही परगावचे होते. ज्यांच्या आगमनाविषयीच्या नोंदी आहेत अशा महनीय व्यक्तींची नावे मराठीतील अकारानुक्रमाने यापुढे दिलेली आहेत.

अजित कडकडे :- शास्त्रोक्त गायन करणारे आणि संतांच्या अभंगपदांचे गायन करणारे मुंबई येथील सुप्रसिद्ध गायक.

अण्णासाहेब गोटखिंडे (सांगली) :- हे खासदार होते.

अण्णासाहेब डांगे (इस्लामपूर) :- राजकीय कार्यकर्ते

अप्पासाहेब काटकर (सांगली) :- कृष्णाकाठ या साप्ताहिकाचे संपादक

(स्वामी) अमलानंद (पेण) :- स्वामी स्वरूपानंदांचे शिष्योत्तम

अशोक (काकामहाराज) जोशी (पुणे) :- पुण्याच्या दिगंबरदासमहाराजांचे अधिकारी वारस

(सौ.) आठवले (मुंबई) :- मा. जयंतराव आठवले यांच्या सुविद्य सौभाग्यवती

आर. के. पाटील :- माजी डी.वाय्.एस्.पी.

एस्.एस्.वैद्य (सांगली) :- गणपतरावमहाराज कन्नूर यांचे शिष्य. 'शांति कुटीर संदेश' या मासिकाचे संपादक आणि लेखक

कमलाकर वालावलकर (मुंबई) :- दिगंबरदासमहाराज पुणे यांचे शिष्य आणि प्रख्यात बिल्डर

काटकरमहाराज (कोल्हापूर) :- श्रीस्वामीसमर्थांचे नि:सीम भक्त

श्रीकाडसिद्धमहाराज :- निंबरगीकरमहाराजांचे पणतू

किशोरजी व्यास :- भागवत पुराणावर रसाळ प्रवचन करणारे

कुमारस्वामी (धारवाड) :- लिंगायत धर्माचे अध्वर्यु

ग.का.रायकर (मुंबई) :- 'दीपलक्ष्मी' मासिकाचे संपादक. यांनी मामामहाराज केळकरांचा विशेषांक काढला.

गणपतरावमहाराज कन्नूर (कन्नूर) :- हे श्रीसिद्धरामेश्वरमहाराज यांचे शिष्य असून कन्नूरमध्ये त्यांचा मठ आहे.

(ॲड.) ग.ब.देशमुख (सांगली) :- हे सुप्रसिद्ध वकिल असून ते चांगदेव पासष्टी या ग्रंथावर प्रवचन करीत.

गंगाधरसिंग दीक्षित (सांगली) :- हे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे शिष्य असून, यांनी हनुमान समाधिमंदिराची स्थापना केली.

(डॉ.) गं.वि. कुलकर्णी (कोल्हापूर) :- हे रमण महर्षींचे भक्त असून संस्कृत विषयाचे प्राध्यापक होते.

गुरुनाथ कोटणीसमहाराज (सांगली) :- हे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे नातू. हे दररोज कीर्तन करतात.

श्रीगुरुलिंगाप्पामहाराज (निंबरगी) :- निंबरगीकरमहाराजांचे पणतू

श्रीगुरुसिद्दप्पामहाराज (निंबरगी) :- निंबरगीकरमहाराजांचे पणतू

गो.नी.दांडेकर (पुणे) :- हे सुप्रसिद्ध लेखक होते. माजी मराठी संमेलनाध्यक्ष

डॉ. गो.रा.कुलकर्णी (सांगली) :- हे हिंदी विषयाचे प्राध्यापक असून ते काही काळ कन्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते.

श्रीगोविंदपंत घोसरवाडकरमहाराज (घोसरवाड) :- हे हालसिद्धनाथांचे भक्त होते. त्यांच्या अंगात देवाचा संचार होत असे.

गोविंदमहाराज कुलकर्णी (सांगली) :- अवधूतपंथी पांडुरंगमहाराज ताम्हनकर यांचे शिष्योत्तम

गोविंद हणमंत कोटणीस (सांगली) :- हे तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे चिरंजीव. ते डॉक्टर होते.

चिन्मयानंद स्वामी :- आद्य शंकराचार्यांच्या केवलाद्वैत वेदांताचे पुरस्कर्ते. ते प्रवचने करीत. त्यांची पुस्तकेही आहेत.

जयमाला शिलेदार :- सुप्रसिद्ध गायिका. नाटकांतून कामे करीत.

जयंतराव आठवले (मुंबई) :- सनातन प्रभातचे पुरस्कर्ते आणि अनेक ग्रंथांचे लेखक

झेंडेमहाराज (मिरज) :- हे श्रीकृष्ण सरस्वतीमहाराज यांचे उपासक आहेत.



डी. के. पाटील (सांगली) :- राजकीय व सामाजिक कार्यकर्ते आणि सांगली नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष

डोंगरेमहाराज :- भागवतावर प्रवचन करणारे

तात्याराव उदगांवकर (सांगली) :- वि.दा.सावरकर यांचे नि:सीम भक्त

तात्यासाहेब केळकर (सांगली) :- हे गुरुदेव रानडे यांचे शिष्य असून अध्यात्मिक विद्यामंदिराचे कार्य करीत.

तुकाराममहाराज काळे :- आजरेकर फडाचे प्रमुख

तेलीमहाराज (शिरोळ) :- हे विदेही सत्पुरुष होते.

दत्तमहाराज कवीश्वर (पुणे) :- वामनराव गुळवणीमहाराज यांचे शिष्योत्तम आणि त्यांचे उत्तराधिकारी

दत्तोपंत घोसरवाडकर (घोसरवाड):- गोविंदपंत घोसरवाडकर यांचे अधिकारी नातू

दादासाहेब रोटीथोर (तासगांव) :- हे प्रसिद्ध प्रवचनकार होते.

दिनकरअबा पाटील :- राजकीय कार्यकर्ते

नानामहाराज तराणेकर (इंदूर) :- गुळवणीमहाराजांचे शिष्य

नितीन शिंदे (सांगली) :- राजकीय कार्यकर्ते

नीलकंठ अनंत बर्वे (सांगली) :- जिल्हा न्यायाधीश

नीलकंठबुवा अभ्यंकर :- हे संगीत दिग्दर्शक होते.

नीलकंठमहाराज (विठ्ठलवाडी) :- यांनी पुष्कळ आध्यात्मिक कार्य केले. त्यांचा मठ विठ्ठलवाडी येथे आहे.

पंडितरावमहाराज यरगट्टीकर (चिमड) :- प.पू.सद्गुरु नारायणमहाराज यरगट्टीकरांचे चिरंजीव आणि त्यांचे उत्तराधिकारी

पांडुरंगशास्त्री आठवले (ठाणे) :- भगवद्गीतेचे थोर अभ्यासक आणि प्रवचनकार. स्वाध्याय परिवाराचे प्रवर्तक

पांडुरंगमहाराज ताम्हनकर (सांगली) :- हे अवधूतपंथीय असून दिमडीवरची एकतारी भजने करीत.

पांडुरंगराव यरगट्टीकर (चिमड) :- उद्धवरावजीमहाराज यरगट्टीकर यांचे चिरंजीव

(प्रा.डॉ.) पां.ना.कुलकर्णी (कोल्हापूर) :- मराठीचे प्राध्यापक. त्यांनी ज्ञानेश्वरीची अधिकृत संहिता संपादित केली.

पुरुषोत्तमानंद स्वामी :- स्वामी चिन्मयानंदांचे शिष्य आणि प्रवचनकार
प्रकाशबापू पाटील (सांगली) :- माजी खासदार
प्रज्ञानंद स्वामी (कोल्हापूर) :- प्रा.म.अ.कुलकर्णी हे अमलानंदाचे शिष्य आणि त्यांचे उत्तराधिकारी
बळवंत भारती (विठ्ठलवाडी) :- नीलकंठमहाराजांचे शिष्य आणि त्यांचे उत्तराधिकारी
बापूसाहेब चाफळकर (सांगली) :- स्वामी स्वरूपानंदांचे शिष्य
बापूसाहेब पुजारी (सांगली) :- सांगली अर्बन को ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष
बाबामहाराज सातारकर (सातारा) :- सुप्रसिद्ध प्रवचनकार
बाबूरावजी कोटणीसमहाराज (सांगली) :- प.पू. सद्‌गुरु तात्यासाहेब कोटणीसमहाराजांचे पुत्र, शिष्य आणि उत्तराधिकारी
बाबूराव गोखले (सांगली) :- चित्रकार आणि प्रवचनकार
भय्यासाहेब पैठणकर (पैठण) :- एकनाथमहाराजांचे थेट वंशज
भ.रा.नाईक (माधवनगर):- हे सांगली एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य असून काही काळ सिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक होते.
भाऊसाहेब ऐनापुरे :- हे शं.वा.दांडेकरांचे शिष्य. निरूपणकार.
भानुदास पडळकर :- सामाजिक कार्यकर्ते
भालजी पेंढारकर (कोल्हापूर) :- सिनेमा निर्माता व दिग्दर्शक
मदन पाटील (सांगली) :- माजी आमदार
मधुकरपंत शिपुरकर (कोल्हापूर) :- शंकरमहाराज शिपुरकर यांचे चिरंजीव. हे एल.आय.सी.मध्ये अधिकारी होते.
मनोहरपंत ऊर्फ दादा सबनीस :- सुप्रसिद्ध गायक
मन्सुरुल हसनसाब ऊर्फ बडे बाबा :- अवलिया सुफीशाह (मुलुंड, मुंबई)
महादबामहाराज पाटील (नृसिंहवाडी) :- हे विदेही असून त्यांची समाधी नृसिंहवाडी येथे आहे.
माधवनाथ स्वामी (पुणे) :- स्वामी स्वरूपानंदांचे अधिकारी शिष्य व उत्तराधिकारी



मामासाहेब देशपांडे (पुणे):- गुळवणीमहाराजांचे शिष्योत्तम
(सौ.) मुक्ता वैद्य (सांगली) :- गणपतराव कन्नूरमहाराजांच्या भक्त
मुजुमदार (सांगली) :- तत्कालीन जिल्हा न्यायाधीश
मोरोपंत कुलकर्णी (सांगली) :- शास्त्रोक्त भजन गायक
(माताजी) योगप्राणा :- शारदामठ निवासी
राजाभाऊ जगदाळे (सांगली) :- राजकीय कार्यकर्ते
रामण्णा कुलकर्णी (चिकोडी) :- यांनी उमदीकरमहाराजांचे चरित्र लिहिले आहे.
रामभाऊ घोडके (सांगली):-राजकीय कार्यकर्ते
लक्ष्मणबुवा निजामपूरकर :- सुप्रसिद्ध कीर्तनकार
वसंतराव गाडगीळ, पंडित (पुणे) :- 'शारदा' मासिकाचे संपादक आणि संस्कृतचे पंडित
वालदासजीमहाराज :- गुजराती समाजातील एक श्रेष्ठ संत
विठ्ठलमहाराज राणे (सांगुळवाडी, जि.कोल्हापूर) :- सांगुळवाडी येथील मठाचे मठाधिपती होते.
वि.ह. माईणकर (सांगली):-हे चांगले वकिल होते.
(शंकराचार्य) विद्याशंकर भारती :- करवीर पीठाचे शंकराचार्य
विष्णुअण्णा पाटील (सांगली) :- राजकीय व सामाजिक कार्यकर्ते
वि.स.पागे (तासगाव) :- राजकीय कार्यकर्ते आणि माजी विधानसभा अध्यक्ष
व्यंकाप्पा पत्की (सांगली) :- राजकीय कार्यकर्ते
(डॉ.) शंकर अभ्यंकर (पुणे) :- विद्यावाचस्पानि असून प्रवचन करतात. त्यांनी भक्तिकोश संपादित केला आहे.
शंकरबापू आपेगांवकर :- हे मृदंगाचार्य होते.
शंकरमहाराज टाकी (गोरेगाव) :- गोरेगाव येथे मठ आहे.तेथून सद्भक्तिप्रकाश हे नियतकालिक प्रकाशित होत असे.
शं.वा.दांडेकर (पुणे) :- स.प.महाविद्यालयाचे माजी प्राचार्य, वारकरी निरूपणकार आणि ज्ञानेश्वरीचे संपादक
शिवाजीराव शेंडगे :- माजी मंत्री व राजकीय कार्यकर्ते

शिरीष कवडे (पुणे) :- मामामहाराज देशपांडे यांचे उत्तराधिकारी
(सौ.) शैलजाभाभी पाटील :- प्रकाशबापू पाटील यांच्या सौभाग्यवती आणि राजकीय कार्यकर्त्या
श्रीपतीबुवा धोंगडे :- धुंडिराज शास्त्री विनोद (पुणे) यांचे शिष्य
(प्रा.डॉ.) श्री. भा. वर्णेकर (नागपूर) :- सुप्रसिद्ध संस्कृत पंडित आणि अनेक ग्रंथांचे लेखक
सखाराम वि. जोगळेकर (मुंबई) :- हे मामामहाराज केळकरांचे अनुगृहीत होते.
सच्चिदानंद ज्ञानेश्वर स्वामी:- कर्की धर्मपीठाचे प्रमुख
सदाशिवमहाराज नीलवाणी (निंबरगीकर) :- हे निंबरगीकरमहाराजांचे खापर पणतु
संजय पाटील (तासगाव) :- राजकीय कार्यकर्ते आणि आमदार
संभाजीराव भिडे (सांगली) :- शिवाजीमहाराजांचे भक्त आणि शिवप्रतिष्ठानचे संस्थापक
सिद्धराज माणिकप्रभू राजयोगी :- हुमणाबाद येथे मठाधिपति
सु.ग.शेवडे :- सुप्रसिद्ध प्रवचनकार
(संत) हरिकाका (हत्तरगी, बेळगाव) :- हे कृष्णभक्त होते.
हरेराम बोडस (मिरज) :- शं.वा.दांडेकरांचे शिष्य व निरूपणकार
विष्णुजी क्षीरसागर :- विद्यावाचस्पती व प्रसिद्ध प्रवचनकार
मारुतिबुवा रामदासी :- समर्थ भक्त
अण्णासाहेब घाणेकर :- शं.वा.दांडेकरांचे शिष्य व निरूपणकार
शिवाजीराव भोसले :- प्रसिद्ध वक्ते

***



# परिशिष्ट ५

## श्रीदादांचे शुभहस्ते झालेले कार्यक्रम

श्रीदादा हे परमार्थातील पूर्ण पुरुष होते. त्यांचे संपूर्ण शरीर पावन झालेले होते. त्यामुळे आपण करीत असणारा कार्यक्रम यथासांग व्हावा, किंवा तो तसाच पुढे यशस्वीपणे चालू रहावा यासाठी काही भक्तमंडळींनी आपले कार्यक्रम श्रीदादांच्या पवित्र हस्ते करवून घेतले. अशा कार्यक्रमांची सूची पुढे दिली आहे.

१) सिटी हायस्कूल, सांगली येथे शिक्षक दिनी मामामहाराज केळकर व गुरुदेव रानडे यांच्या तैलचित्रांचे अनावरण
२) सांगली अर्बन को ऑप बँक, सांगली, यांनी आयोजित केलेल्या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासाठी उभारल्या जाणाऱ्या मंडपाचा प्रारंभ आणि संतपूजन
३) बाबामहाराज ऊर्फ रावसाहेब सहस्रबुद्धे मंदिरात (पुणे) भूमिपूजन
४) श्री.जी.आर्.ताम्हनकर, सांगली, यांचे घरात तयार करण्यात आलेल्या ध्यानमंदिराचे उद्घाटन.
५) संत मामामहाराज केळकरमार्ग, गावभाग-सांगली, या नामफलकाचे अनावरण
६) तुकाराममहाराजांचे मंदिरात, खणभाग-सांगली, येथे तुकाराममहाराजांच्या मूर्तीची स्थापना
७) श्री.पाटणे यांच्या श्रीराममंदिराची स्थापना
८) सारडा प्रॉडक्ट्स (कुपवाड) या कारखान्यात हनुमान् मूर्तीची स्थापना
९) ज्ञानेश्वर विठ्ठलमंदिर (वसगडे) येथे मूर्तीची स्थापना
१०) श्री. बजरंग हडदरे यांच्या वास्तूचे भूमिपूजन
११) श्रीक्षेत्र पावस येथे श्रीराम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्तींची स्थापना
१२) मे. माळी स्वीट्स (विश्रामबाग) या फर्मचा शुभारंभ
१३) श्री. श्रीकांत शेडजी यांचे घरात श्रीदत्तमूर्तीची प्राणप्रतिष्ठा
१४) श्रीसमर्थ हनुमान मंदिरामध्ये (गुलाब कॉलनी, सांगली) मूर्तीची स्थापना
१५) श्री. शेखर पट्टणशेट्टी यांच्या श्रीदासराम इंडस्ट्रीजचे उद्घाटन

१६) बिनीवाले विठ्ठलमंदिरात (गांवभाग, सांगली) नूतन मूर्तीची स्थापना
१७) मे.विठ्ठलराव माळी (पलूस) यांच्या द्राक्ष बागेत द्राक्षे तोडण्याचा प्रारंभ
१८) बरडे विठ्ठलमंदिरात (सांगली) श्रीविठ्ठल रूक्मिणी मूर्तीची स्थापना.
१९) नीलकंठ भारती (विठ्ठलवाडी) यांचे उत्तराधिकारी बळवंतभारती यांचा गौरव/सत्कार.
२०) अखिल भारतीय गीतस्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त करून घेणाऱ्या मिलिंद कुलकर्णी यांचा गौरव.
२१) श्री. रामभाऊ सहस्रबुद्धे (गांवभाग, सांगली) यांच्या अमृत-महोत्सव प्रसंगी त्यांचा गौरव/सत्कार.
२२) भूविकास बँकेतील (सांगली) दत्तमंदिरात मूर्तीची स्थापना
२३) श्री.कृष्णा रा. शिंगाडे यांच्या पदोन्नतीनिमित्त त्यांचा गौरव.
२४) सांगलीच्या टिंबर एरियात सांगली अर्बन को-ऑप बँक या बँकेच्या शाखेचे उद्घाटन
२५) हरिपूर बाहेरील मारुति मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना
२६) उगार शुगर वर्क्सच्या परिसरात श्रीराममंदिराची मूर्ति स्थापना
२७) डॉ. प्रमोद परांजपे यांचे हास्पिटलचे (आंबेडकर रोड, सांगली) उद्घाटन
२८) दुर्गामाता मंदिरात (माधवनगर रोड, सांगली), देवीला मुकुट अर्पण
२९) श्री. ना. रा. बोर्गीकर जनरल मॅनेजर झालेबद्दल गौरव/सत्कार
३०) मोरेश्वर बेकरीचे उद्घाटन
३१) स्वस्तिक मेडिकलचे उद्घाटन
३२) श्री. श्रीकांत देशपांडे (माधवनगर) यांचे घरात मारुति मंदिराची प्रतिष्ठापना
३३) श्रीदासराम सांस्कृतिक भवन (सांगली) या सभागृहाचे उद्घाटन व त्याच्या शेजारील मारुतिच्या मूर्तीची स्थापना
३४) श्री. दत्तोपंत गोमेवाडीकर (सांगली) यांचे घरी ब्रम्हचैतन्यमहाराज मंदिराची स्थापना

***



# परिशिष्ट ६

## श्रीदादांची तीर्थक्षेत्री/पावनस्थानी झालेली कीर्तने/प्रवचने/निरूपणे

श्रीदादा हे वयाच्या पाचव्या वर्षीपासूनच कीर्तने करू लागले. पुढे स्थळ व प्रसंग पाहून ते प्रवचने अथवा निरूपणे करीत. श्रीदादांची ही वाग्गंगा अनेकदा तीर्थस्थानी/पावनस्थळी झाली. त्यांची यादी यापुढे दिली आहे.

१) श्रीक्षेत्र (देव) निंबरगी येथे गुरुलिंगजंगमस्वामीमहाराज ऊर्फ श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे समाधीसमोर
२) श्रीक्षेत्र चिमड येथे साधुमहाराजांच्या पांडवपंचमीच्या रथोत्सवात कीर्तन.
३) श्रीक्षेत्र घोसरवाड येथे कीर्तन
४) श्रीक्षेत्र अप्पाचे वाडी येथे कीर्तन
५) श्रीक्षेत्र रामेश्वर येथे रामेश्वर मंदिरात कीर्तन
६) श्रीक्षेत्र ब्रह्मनाळ येथे आनंदमूर्तींच्या समाधीपुढे कीर्तन
७) सेनामहाराज मंदिर (सांगली) येथे कीर्तन
८) ब्रह्मचैतन्य मंदिर (दत्तोपंत कुलकर्णी यांचे) (सांगली) येथे कीर्तन
९) श्रीक्षेत्र कन्नूर येथे कन्नूर मठात कीर्तन
१०) दत्तमहाराज समाधि मंदिर (आष्टा) येथे प्रवचन
११) राममंदिर (तासगाव) येथे प्रवचन
१२) बरडे यांचे विठ्ठलमंदिर येथे निरूपण
१३) गुंडुबुवा महाराज मठ (बुधगाव) येथे प्रवचन
१४) बिऱ्हाडसिद्ध (कवठेएकंद) येथे शिवमंदिरात प्रवचन
१५) माईसाहेब दांडेकरांचे प्रेमळ विठ्ठलमंदिर (पालघर) येथे कीर्तन.
१६) बापटांचे दत्तमंदिर (सांगली) येथे कीर्तन
१७) पाटणकरांचे विष्णुमंदिर (विष्णुघाट, सांगली) येथे कीर्तन
१८) श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे महादबामहाराज पाटील यांचे मठात कीर्तन
१९) नारदकीर्तनमंदिर (पुणे) येथे कीर्तन
२०) कोल्हापूरचे कुंभारस्वामी ज्या तेलिणीच्या घरात रहात होते तेथे कुंभारस्वामींचे समोर कीर्तन

२१) दादामहाराज किर्लोस्करांच्या दत्तमंदिरात (कोल्हापूर) कीर्तन.
२२) मळणगावकरमहाराज यांचे मठात (सांगली) निरूपण
२३) हनुमान् समाधि मंदिर (सांगली) येथे कीर्तन
२४) कोटणीसांचे कैवल्यधामात (सांगली) कीर्तन
२५) स्वामी माधवनाथ मठात (पुणे) प्रवचन
२६) गुळवणीमहाराज प्रतिष्ठान (सांगली) प्रवचन
२७) कुणकेश्वर येथील शिवमंदिरात प्रवचन
२८) बालाजीमंदिर (सांगली) प्रवचन
२९) मारुतिमंदिर (हरिपूर) प्रवचन
३०) नाईक विठ्ठल मंदिर (सांगली) प्रवचन
३१) साळुंखे विठ्ठल मंदिर (सांगली) प्रवचन
३२) लाळगे विठ्ठल मंदिर (सांगली) प्रवचन
३४) बरडे विठ्ठल मंदिर (सांगली) प्रवचन
३५) अध्यात्म विद्या मंदिर (सांगली) प्रवचन
३६) संत तुकाराम मंदिर (सांगली) प्रवचन
३७) पंचमुखी मारुति मंदिर (सांगली) प्रवचन
३८) श्री. गद्रे यांचे राधाकृष्ण मंदिर (हरिपूर) प्रवचन

❋❋❋



# परिशिष्ट ७

## श्रीदादांचे तुला-समारंभ

या आपल्या पृथ्वीवर कालाची गणना सूर्य-चंद्राच्या गतीवरून केली जाते. आणि ती दिवस, सप्ताह, महिना आणि वर्ष अशा स्वरूपात सांगितली जाते. भारतीय पुराणग्रंथांनी कृत/सत्य, त्रेता, द्वापार आणि कलि अशी चार युगे मानून त्यांची कालगणना दिली.

सध्या कलियुग चालू आहे. या कलियुगात मानवी जीवनाच्या आयुष्याची मर्यादा शंभर वर्षे आहे, असे 'जीवेत शरदः शतम्'(माणसाने शंभर शरद् ऋतु म्हणजे शंभर वर्षे जगावे), 'शत-संवत्सरं दीर्घं आयुः' अशा काही संस्कृत वचनांवरून वाटते.

शंभर वर्षांच्या या मानवी जीवनात ६० वे वर्ष, ७५ वे वर्ष आणि ८० वे वर्ष ही तीन महत्त्वाचे टप्पे मानले गेले आहेत. त्या त्या वर्षापुढील माणसाचे आयुष्य व्यवस्थित जावे, यासाठी भट्टभास्कर, शौनक इत्यादि शास्त्रकारांनी काही शांतिकर्मे करावीत असे सांगितले आहे. काही लोकांच्या बाबतीत ही शांतिकर्मे केली जातात आणि तेच निमित्त करून त्या त्या व्यक्तीचे सगे सोयरे, इष्टमित्र इत्यादि सोहळे/समारंभ साजरे करतात. त्यांना लौकिक भाषेत साठी-शांति/ षष्ट्यब्द पूर्ती सोहळा, अमृतमहोत्सव आणि सहस्रचंद्रदर्शन असे अनुक्रमाने म्हटले जाते.

श्रीदादा हे राजयोगी होते. त्यांच्या बाबतीत हे तीनही सोहळे/समारंभ यथासांग पार पडले. जरी श्रीदादा फारसे अनुकूल नव्हते तरी घरची मंडळी आणि भक्तमंडळी यांचा आग्रह पाहून, त्यांचे मन मोडू नये म्हणून श्रीदादा या सोहळ्यांना सामोरे गेले.

श्रीदादांचे दोन अमृतमहोत्सव साजरे झाले. या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांचे तुला-समारंभ साजरे झाले. तुला समारंभात मोठ्या तराजूच्या एक मोठ्या पारड्यात इष्ट व्यक्तीला बसविले जाते आणि दुसऱ्या पारड्यात त्या व्यक्तीच्या वजनाइतके काही जिन्नस घालून, दोन्ही पारडी समतोल केली जातात.

श्रीदादांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने श्रीदादांचे संदर्भात

पुढीलप्रमाणे तुला-समारंभ झाले :-

१) प्रा.डॉ.दा.वि.कुलकर्णी हे अनुगृहीत भक्त होते. त्यांनी आपल्या घरी श्रीदादांची शर्करा तुला केली. यावेळी त्यांनी आपले इष्टमित्र आणि श्रीदादांचे भक्त यांना आवर्जून बोलाविले होते.

२) श्री.सुधाकर (बाबा) रेगोडकर हे श्रीदादांचे आणखी एक अनुगृहीत भक्त. त्यांनी आपल्या घरी श्रीदादांची शर्करा तुला केली. यावेळी त्यांनीही श्रीदादांच्या अनेक भक्तांना आमंत्रित केले होते.

३) श्रीदादांच्या घरच्या मंडळींनी आपल्या रामनिकेतनच्या पुढील अंगणात श्रीदादांची केळे तुला केली. यावेळी श्रीदादांचे अनेक नातेवाईक, पै-पाहुणे, आणि मोठ्या संख्येने श्रीदादांची भक्तमंडळी हे सर्व उपस्थित होते.

***



# परिशिष्ट ८
## श्रीदादांच्या पाद्यपूजा

परमार्थात गुरूला अतोनात महत्त्व आहे. परमार्थात/अध्यात्मात गुरूइतके श्रेष्ठ कोणतेही तत्त्व नाही. या गुरूचे श्रेष्ठत्व गुरुगीता या ग्रंथात नाना प्रकारांनी कथन केलेले आहे. गुरुगीता ही भगवान् शंकरांनी पार्वती देवीला सांगितली, असे म्हटले जाते.

ही गुरुगीता सांगते :- गुरूपेक्षा श्रेष्ठ काही नाही (गुरोः परतरं नास्ति।।७७।।) गुरूपेक्षा अन्य कोणतेही श्रेष्ठ तत्त्व नाही (नास्ति तत्त्वं गुरोः परम् ।।२६।।). गुरु हा साक्षात् विश्वेश्वर आहे (गुरुः विश्वेश्वरः साक्षात्।।१६।।). गुरूखेरीज ब्रह्म म्हणून वेगळे काही नाही (गुर्रुविना ब्रह्म नान्यत् ।।५।।). गुरु म्हणजे तारक ब्रह्म आहे (तारकं ब्रह्म निश्चितम् ।।१६।।). गुरु हाच परब्रह्म आहे (गुरुरेव परब्रह्म ।।३२।।).

गुरूच्या कृपाप्रसादाने आत्मारामाची/ब्रह्माची प्राप्ति होते (गुरोः कृपा-प्रसादेन आत्मारामो हि लभ्यते ।।) म्हणून आराधना करून, गुरूची पूजा करून, गुरूला प्रसन्न करून घ्यावे लागते (गुरोराराधनं कार्यम्।। गुरुगीता,२७). गुरूचे चरणकमल हे संसाररूपी वणवा नष्ट करणारे आहेत (पादाब्जं सर्व-संसार-दावानल-विनाशनम् । गुरुगीता,५७). अशा या गुरुपदांची पूजा केली जाते. ही पूजा करताना, गुरूचे पाय हे पाणी इत्यादींनी धुतल्यावर गुरूचे पादोदक प्राप्त होते. हे पादोदक महत्त्वाचे आहे. गुरूचे पादोदक म्हणजे तीर्थराज प्रयाग आहे, असे गुरुगीता सांगते. (गुरोः पादोदकं यत् तु... तीर्थराजः प्रयागश्च ।।१७।।). या पादोदकाने पाप नष्ट होते, संसारातून सुटका होते, आणि ज्ञान व तेज वाढते (शोषणं पाप-पंकस्य दीपनं ज्ञानतेजसाम् ।। गुरुः-पादोदकं सम्यक् संसारार्णव तारकम् ।। गुरुगीता,१३०). अज्ञानाचे मूळ हरण करणारे, जन्म आणि कर्म यांना नष्ट करणारे, असे हे गुरूचे पादोदक ज्ञान आणि वैराग्य यांच्या प्राप्तीसाठी प्राशन करावे, असे गुरुगीतेचे सांगणे आहे (अज्ञान-मूल-हरणं जन्म-कर्म-निवारणम् । ज्ञान-वैराग्य-सिद्ध्यर्थं गुरु-पादोदकं पिबेत् ।।१४।।).

असे हे महत्त्वाचे गुरु-पादोदक प्राप्त करून घ्यावयाचे झाल्यास,

गुरूंच्या पायांची पूजा करावयास हवी. म्हणून भाविक गुरुभक्त आपल्या गुरूची पाद्यपूजा करतात.

श्रीदादा हे श्रेष्ठ गुरु होते. साहजिकच अनेक भक्तांनी त्यांची पाद्यपूजा केली. अशी पाद्यपूजा करणाऱ्या भक्तांची नावे पुढे अकारानुक्रमाने दिली आहेत.

| पूजकांची नावे | स्थळ |
|---|---|
| १) श्री. अनल केळकर व सौ. अर्चना केळकर | सांगली |
| २) श्री. अनिलप्रभू केळकर व सौ. अपर्णा केळकर | सांगली |
| ३) श्री. अश्विनीकुमार कुलकर्णी व सौ. कुलकर्णी | सांगली |
| ४) श्री. अरविंद पीतांबरे व सौ. पीतांबरे | सांगली |
| ५) श्री. आर्.आर्.जाधव व सौ.जाधव | सांगली |
| ६) श्री. कृ.रा.शिंगाडे व सौ.शिंगाडे | सांगली |
| ७) श्री. चंद्रकांत हडदरे व सौ. हडदरे | सांगली |
| ८) श्री. चंद्रशेखर आणि सौ.रोहिणी केळकर | सांगली |
| ९) श्री. दत्तात्रय कर्णेकर व सौ. कर्णेकर | सांगली |
| १०) श्री. दत्तोपंत गोमेवाडीकर | सांगली |
| ११) श्री. न.ना. गोखले व सौ.गोखले | सांगली |
| १२) श्री. ना.रा.बोर्गीकर व सौ. बोर्गीकर | सांगली |
| १३) श्री. नंदकुमार लोखंडे व सौ.लोखंडे | सांगली |
| १४) श्री. पी.एल्.रजपूत व सौ. रजपूत | विश्रामबाग |
| १५) श्री. प्रकाशबापू पाटील व सौ. शैलजा पाटील | सांगली |
| १६) श्री. बजरंग हडदरे व सौ. हडदरे | सांगली |
| १७) श्री. बाळासाहेब लोखंडे व सौ. लोखंडे | सांगली |
| १८) श्री. बाबासाहेब महाजन व सौ. महाजन | बुधगांव |
| १९) श्री. बाबूराव चव्हाण व विश्वासराव पाटील | वसगडे |
| २०) श्री. मुरलीधर माने व सौ. माने | सांगली |
| २१) श्री. रघुनाथ वसंतराव पोतदार व सौ. पोतदार | चिकुर्डे |
| २२) श्री. रामभाऊ सहस्रबुद्धे | सांगली |
| २३) श्री. रंगनाथ दुधाळ व सौ. दुधाळ | सांगली |



| | |
|---|---|
| २४) श्री. लक्ष्मण कुलकर्णी व सौ. कुलकर्णी | सांगली |
| २५) श्री. विलासराव काटकर व सौ. काटकर | सांगली |
| २६) श्री. शिवाजीराव ठोंबरे व सौ. ठोंबरे | सांगली |
| २७) श्री. शिवाजीराव चव्हाण व सौ. चव्हाण | विश्रामबाग |
| २८) श्री. शिवाजीराव हडदरे व सौ. हडदरे | सांगली |
| २९) श्री. संजयकाका पाटील व सौ. पाटील | तासगांव |
| ३०) श्री. सुधाकर रेगोडकर व सौ. रेगोडकर | सांगली |
| ३१) श्री. सूर्यकांत केळकर व सौ. सुनीता केळकर | सांगली |
| ३२) श्री. हरिभाऊ गाडगीळ व सौ. गाडगीळ | विश्रामबाग |

✲✲✲

# परिशिष्ट ९

## श्रीदादांच्या पादुका असणारी स्थाने

श्रीदादांच्या काही भक्तांना श्रीदादांच्या पादुका आपल्या घरी उपासनेसाठी असाव्यात असे वाटले. हेतु हा की त्या पादुकांची दैनंदिन पूजा,आरती,नमस्कार इत्यादि आपल्या हातून घडावेत. अश्या श्रीदादांच्या पादुका ज्यांच्या घरी आहेत त्यांची नांवे येथे अकारानुक्रमाने दिलेली आहेत.

| नाव | ठिकाण |
|---|---|
| १) अश्विनीकुमार कुलकर्णी, | सांगली |
| २) आर. आर. जाधव, | सांगली. |
| ३) कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे, | सांगली. |
| ४) चंद्रकांत हडदरे, | सांगली. |
| ५) दत्तात्रेय यशवंत कर्णेकर, | सांगली. |
| ६) नारायण केशव आपटे, | सांगली. |
| ७) प्रतापसिंह ल. रजपूत | सांगली |
| ८) प्रसाद कुलकर्णी, | पुणे. |
| ९) बजरंग रामराव हडदरे, | सांगली. |
| १०) मधुकर विलास काटकर, | सांगली. |
| ११) मधुकरपंत शंकरराव शिपुरकर, | कोल्हापूर. |
| १२) मुरलीधर गणपतराव माने, | सांगली. |
| १३) रघुनाथ वसंत पोतदार, | चिकुर्डे. |
| १४) राजू गुलाबसिंह रजपूत | सांगली |
| १५) ल. कृ. कुलकर्णी, | सांगली. |
| १६) शिवाजीराव ठोंबरे, | सांगली. |
| १७) संजयकाका पाटील, | सांगली. |
| १८) संजय गुलाबसिंह रजपूत | सांगली |
| १९) सुधाकर व्यं. रेगोडकर, | सांगली. |
| २०) सोनुबाई माने, | सांगली. |

***



# परिशिष्ट १०

## संजीवन लहरी (त्रैमासिक), मुंबई

### संतश्री दासराममहाराज केळकर (सांगली) विशेषांक, एप्रिल जून २००९

मुंबईच्या दादर चौपाटीवर श्रीजांभेकरमहाराज यांची समाधि व मठ आहे. या मठातर्फे 'संजीवन लहरी' नावाचे आध्यात्मिक विषयाला वाहिलेले त्रैमासिक निघते. श्रीजांभेकरमहाराजांचे एक भक्त श्री.अप्पा जगदाळे हे या त्रैमासिकाचे संपादक होते. श्री.अप्पा जगदाळे यांचे प्रा.डॉ.के.वा.आपटे यांना लेख पाठविण्यासाठी जानेवारी २००८ मध्ये पत्र आले होते. त्याप्रमाणे प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी या त्रैमासिकाकडे २ लेख पाठविले व ते जुलै-सप्टेंबर २००८ व दिवाळी अंक २००८ यांत प्रसिद्धही झाले. यानंतर प्रा.डॉ.आपटे यांनी 'श्रीदासराममहाराजांचे परमार्थसार' हा लेख सदर त्रैमासिकाकडे पाठवला. तो 'संजीवन लहरी'च्या जानेवारी-मार्च २००९ या अंकात प्रसिद्ध झाला.

इ.स.२००८-०९ च्या दरम्यान प्रा.डॉ.के.वा.आपटे यांचे चिरंजीव प्रा.नारायण केशव आपटे हे दादर येथील कीर्ति महाविद्यालयात प्राध्यापक होते. त्यांनी जांभेकरमहाराजांच्या मठाकडे जावे, असे प्रा.डॉ.आपटे यांनी त्यांना सुचविले. त्याप्रमाणे ते मठात जाऊन श्री.अप्पा जगदाळे व त्यांचे चिरंजीव श्री.रवि जगदाळे यांना भेटले. दासराममहाराजांच्या संदर्भातील लेख पाहून, श्री.रवि जगदाळे यांना अचानकपणे काही प्रेरणा झाली व ते प्रा.ना.के.आपटे यांना म्हणाले की, मी संजीवन लहरीचा 'श्रीदासराममहाराज विशेषांक' काढतो; त्यासाठी लेख द्या. त्याप्रमाणे त्यांना पुढील लेख देण्यात आले.

१) श्रीदासराममहाराज अल्पपरिचय (प्रा.डॉ.के.वा.आपटे)
२) पवन-विजय-स्मरणी (श्रीदासराममहाराज कृत)
३) श्रीदासराममहाराज प्रणीत श्रीदासरामपंचविशी (प्रा.डॉ.के.वा.आपटे)
४) बोलले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।। (म.शं.शिपुरकर)

हे चार लेख व अन्य दोन-तीन लेख एकत्र करून श्री.अप्पा

जगदाळे यांनी 'संजीवन लहरी'चा एप्रिल-जून २००९ हा अंक 'संतश्री श्रीदासराममहाराज केळकर (सांगली) विशेषांक' म्हणून प्रकाशित केला. त्याच्या मुखपृष्ठावर श्रीदासराममहाराजांचा मोठा फोटो, श्रीनिंबरगीकरमहाराजांचा फोटो व श्रीदासराममहाराजांच्या सिंहासनाचा फोटो आहे.

प्रा.डॉ.आपटे व श्री.जगदाळे यांचा प्रत्यक्ष परिचय नसताना हा विशेषांक निघाला, हे विशेष. या विशेषांकाच्या १०० प्रती प्रा.डॉ.के.वा.आपटे यांनी खरेदी करून त्या श्रीदासराममहाराजांच्या भक्तांना वाटण्यासाठी श्रीदासराममहाराजांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ चिरंजीव श्री.चंद्रशेखर अण्णा, सांगली यांच्याकडे दिल्या.

***



# परिशिष्ट ११

## श्रीदादांचे प्रकाशित साहित्य

उपजताच ज्ञानी असणाऱ्या पुरुषांमध्ये श्रीदादांचा समावेश होतो. श्रीदादांना वयाच्या सातव्या वर्षीच लेखनाची स्फुर्ति झाली आणि त्यांचे पारमार्थिक लेखन सुरू झाले. त्यातील काही गद्यात आहे तर काही पद्यात आहे. त्या लेखनांपैकी बरेचसे लेखन पुस्तकरूपाने प्रकाशित झालेले आहे. श्रीदादांच्या प्रकाशित ग्रंथांची सूची आता येथे दिली आहे.

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र.................१९४०
२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सान्‍द टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२
३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश, साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार.......१९६८
४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९
५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१
६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२
७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३
८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र................(सन दिलेला नाही)
९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४
१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र.....................................................१९७५
११) सिद्धस्तुती.......................................................१९७७
१२) अमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.........................१९७९
१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र.................................१९८३
१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र..............................(सन नाही)
१५) गुरुपाठ...........................................................१९८४
१६) सांप्रदायबोध.......................................................१९८४
१७) श्रीरामपाठामृत.....................................................१९८४
१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र....................................१९८४
१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र..............................१९८७

# परिशिष्ट १२

श्रीमामांनी इ.स.१९१४ साली आपल्या दैनंदिन आचाराचा वर्तन क्रम लिहून ठेवला होता. त्याच धर्तीवर श्रीदादांनी आपला दैनिक कार्यक्रम लिहून ठेवला होता. हा कार्यक्रम ते वापरीत असलेल्या 'श्रीलोकमान्य विद्यार्थी डायरी', सन १९३९, या डायरीमध्ये सापडतो. तेथे नित्यक्रम या शीर्षकाखाली श्रीदादांनी संक्षिप्त रूपात आपला दैनिक कार्यक्रम नोंदून ठेवला आहे, तो असा :-

**– नित्यक्रम –**

**सकाळी** :- अभ्यास, श्रीतुकाराममहाराजांचे बारा अभंग म्हणणे.

**दुपार** :- शाळा, जप.

**संध्याकाळ** :- कीर्तन[१], गीतेतला १५ वा अध्याय, श्रीगणेश स्तोत्र, श्लोक,शिकवणी

**(रात्री)** :- जेवण, झोप

वेळ सापडला की जप

( १ कीर्तन. येथे श्रीमामांचे कीर्तन अभिप्रेत आहे. श्रीमामांच्या कीर्तनात श्रीदादा पेटीची साथ करीत).

***

# परिशिष्ट १३

नाशिक येथील वाचस्पति मा. विष्णुजी क्षीरसागर हे पूर्वी काही वेळा श्रीदादांचेकडे येऊन गेले होते. मामामहाराजांनी रेखांकित केलेले ज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र पाहिल्यावर 'ज्ञानेश्वरमहाराज असेच असावेत' असे ते म्हणाले होते.

श्रीदादांना ७१ वे वर्ष लागल्यावर त्यांचे अभीष्ट चिंतन करण्यास त्यांनी एक छोटासा लेख 'श्रीचैतन्य चंद्रोदय' या नियतकालिकात दिलेला होता (वर्ष २, ज्येष्ठ शुद्ध १०, संवत् २०४९, दि.३१ जून १९९१). हा हिंदी भाषेतील लेख येथे दिला आहे.

## " पूज्य श्रीरामरायजी महाराज केलकर अभीष्ट चिंतन "

महाराष्ट्र में सांगली सुप्रसिद्ध ऐतिहासिक नगरी है। सनातन धर्मकी रक्षाके लिये स्वनामधन्य पटवर्धन कुलके कई महापुरुषोंने युद्ध क्षेत्रमे आत्मर्पण करके वीरगती प्राप्त की है। पटवर्धनोंके पूर्वज वैदिक मतानुयायी विख्यात तपस्वी थे। सांगली नगरीमे महानदी कृष्णाके किनारे साधुवर्य श्रीरामरायजीमहाराज केलकर का पवित्र निवासस्थान है । वह केवळ निवासस्थानही नहि किन्तु एक तपस्वी ऋषिका आश्रमभी है । धर्मसभाके कार्यको प्रारंभेही श्रीमहाराजजी का समर्थन तथा कृपाशीर्वाद प्राप्त हुआ है । कई वर्षोंसे मैं श्रीमहाराजजी के चरणदर्शनके लिये सांगलीक्षेत्र जाता रहा हूँ । उनका श्रीभगवद्‌भक्तीमें सदामग्न, शान्त सुप्रसन्न दर्शन सदा अपूर्व सुख प्रदान करता है ऐसा मेरा अनुभव है । श्रीरामराय महाराजजीके परमधार्मिक पिताजी पूज्य श्री.मामामहाराज केलकरने ६५ सालपूर्व अपने बाडेमे अखंड हरिनाम कीर्तनकी परंपरा शुरू की है। स्वयं पू.श्रीमामा महाराजजी हरिकीर्तन करते थे । उनका निवासस्थान केलकरबाडा अब एक हरिमंदिर पवित्र आश्रम बन गया है। अपने पूज्य पिताजीकी हरिकीर्तनकी परंपरा श्रीरामराय महाराजजीने अक्षुण्ण जागृत रखी है। नित्य नियमित रूपसे वहाँका कीर्तन कार्यक्रम चलता आ रहा है । अभीतक किसीभी कारणसे श्रीभगवत् कीर्तनमे खंड नही हुआ यह विशेषता है। शतावधी भाविकजन कीर्तनमें सहयोगी होते है । हरिनाम का आन्नद लेते हैं।

पूज्य श्रीरामरायमहाराज एक कुटुंबवत्सल गृहस्थी है । लेकिन जन्मतः संत है । अपना गृहस्थाश्रम उन्होंने परमार्थ स्वरूप बनाया है । परमधार्मिक आचारशील गृहस्थी उच्च पारमार्थिक जीवन कैसा व्यतीत कर सकता है उसकी एक आदर्शतम मर्यादा श्रीमहाराजजीने स्वयं निर्माण की है। जन्मेही वे श्रीभगवत्कृपा प्राप्त है । ज्ञान विज्ञान संपन्न, महाकवि, भगवत् भक्तिका दिव्यभाव शतावधी भक्तोके हृदयोमें संक्रमित करनेमे सदा प्रयत्नशील महात्मा इस बहुविध भावनाओंसे भरा हुआ उनका देवजीवन मैने प्रत्यक्ष देखा है । करुणामय भक्तिका प्रेमपूर्ण स्रोत सांगलीमे प्रवाहित करके श्रीमहाराजजीने महान धर्म कार्य किया है । व्यक्तिके हृदयमें भगवत्भक्तिका भाव जागृत करनेका कार्य असाधारण है । दैवी है ।

कालीमठके निर्माता ब्रह्मलीन पू. श्रीप्रणवानंद सरस्वती महाराजजीके साथ श्रीकेलकरमहाराजका निकटका ऋणानुबंध रहा है । यह उच्च कोटिके महापुरुष अब ७१ सालके हुए है । उनको अत्यंत नम्रता भावसे अभिनंदन करके श्रीभगवत् सेवाके लिये परम कारुणिक श्रीभगवान् श्रीरामराय महाराजजीको दीर्घ आयुरारोग्य प्रदान करे ऐसी हम प्रार्थना करते हैं ।

धर्मसभाध्यक्ष पूज्यपाद महन्तजी श्रीदीनबंधुदास महाराजजीने पू.श्रीरामरायमहाराज केलकरजीको **सन्त शिरोमणी** उपाधीसे गौरवान्वित करनेकी उद्घोषणा की है ।

****

# परिशिष्ट १४

## सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेने बांधलेल्या व्यापारी संकुलास श्रीदादांचे नाव

श्रीदादांचे महानिर्वाणानंतर,सांगली,मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेने बांधलेल्या व्यापारी संकुलाला श्रीदादांचे नाव देण्याचा ठराव केला, तो असा :-

'महापालिकेच्या सांगली येथील राजवाडा चौकातील सि.स.नं ९७१ येथे बांधण्यात आलेल्या महापालिकेच्या शॉपिंग सेंटरचे **'संत दासराम केळकरमहाराज व्यापारी संकुल'** असे नामकरण करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(९) नुसार मान्यता देणेत येते.नामकरण समारंभपूर्वक करण्यात यावे'(ठराव क्र.१४८,दि.१९-१०-२००१)

या ठरावानुसार या व्यापारी संकुलास **'संत श्रीदासराममहाराज केळकर व्यापारी संकुल'** असे नामकरण समारंभपूर्वक करण्यात आले.

नामकरण पाटीचे छायाचित्र चरित्रात दिलेले आहे.

****

२०) नित्यपाठामृत........................................................१९८७
२१) संजीवनपाठ........................................................१९८७
२२) श्रीदासरामवचनामृत................................................१९८७
२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति......................................१९८८
२४) श्रीगोविंददर्शन....................................................१९८८
२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८
२६) श्रीदासरामगाथा....................................................१९८८
२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण......................१९८९
२८) श्रीगुरुमहिमा........................................................१९९१
२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ..................................१९९७
३०) श्रीरामदासबोध....................................................१९९७
३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९
३२) परमार्थसार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)..२००२
३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२
३४) आरती संग्रह.......................................................२००२
३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ........................................२००२
३६) हरिपाठ संकीर्तन...................................................२००७
३७)श्रीदासराममहाराज : श्लोकरचना...................................२०१०
३८)अनुभवामृत, सम-ओवी-टीकेसह...................................२०१०
३९)परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी..................................२०१०
४०)आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०१०
४१) ग्रंथत्रयी...........................................................२०११
४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०११
४३) सद्बोध दशक......................................................२०११
४४) गुरुराजकथित ज्ञान आणि बोध ..................................२०११
४५) श्रीदासराममहाराजलिखित लघुचरित्रे .............................२०११



## श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम्

अस्य श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रस्य *केशवः* कविः । श्रीदासरामो देवता । अनुष्टुप् छंदः । श्रीसीता शक्तिः । श्रीदासराम-प्रीत्यर्थे जपे विनियोगः ।

।। अथ ध्यानम् ।।

गौरांगं मनसा ध्यायेद् दासरामं दयाकरम् ।
सीता-पतिं च श्रीरामं स्वरूपस्थं सुखप्रदम् ।।

।। इति ध्यानम् ।।

गुरुलिंग-प्रियं ध्यात्वा देव-सेवा-परायणम् ।
रक्षा-स्तोत्रं पठेद् भक्त इच्छन् सकल-रक्षणम् ।।१।।
महात्मा मस्तकं पातु भालं भक्तार्थ-पूरकः ।
इंदिरा-तनयो नेत्रे कर्णौ कैवल्य-कारकः ।।२।।
घ्राणं पातु गुणागारो मुखं गोविंद-पुत्रकः ।
दयालू रक्षतु दंतान् ओष्ठौ कीर्तन-कर्तृकः ।।३।।
जिह्वां बोध-निधिः पातु पुष्कराक्षः प्रियंवदः ।
वाणीं पातु प्रियालापी परमार्थ-प्रभाकरः ।।४।।
हनुं हर्ष-समायुक्तः प्रसन्न-वदनस्तथा ।
कंठं पातु कृतार्थश्च स्कंधौ पातु सदा शिवः ।।५।।
भुजौ पातु महाभक्तः करौ निर्वाण-दायकः ।
हृदयं पातु ह्री-युक्तो मध्यं माया-प्रभंजनः ।।६।।
उदरं पातु ऊर्जस्वी परमात्मा परात्परः ।
नाभिं पातु महानादः कटी कारुण्य-संयुतः ।।७।।
ऊरू साधूत्तमः पातु सक्थिनी सुर-संस्तुतः ।
जानुनी जपकृत् पातु जंघे काम-निवारकः ।।८।।

गुह्ये पातु सुधी: श्रेष्ठ: परेश: पातु मे पदे ।
प्राणान् पातु परात्मा च शरीरं पातु शक्तिमान् ।।९।।
आंतरं करणं पातु हनुमद्-गुरु-सेवक: ।
अंतर्बहिश्च मां नित्यं पातु संपूर्ण-साधन: ।।१०।।
देह-दु:ख-भयार्तिभ्य: सिद्धानंद-प्रिय: सदा ।
उपरिष्टादधस्ताच्च पातु वै पुत्र-पूजित: ।।११।।
पुरत: पृष्ठतश्चैव तथा देहस्य पार्श्वकौ ।
महाभाग्य: सदा पातु भव-भीति-विनाशन: ।।१२।।
कुप्रसंगाच्च दु:स्वप्नात् रक्षतु करुणार्णव: ।
अनारोग्यात् तथा चैव पातु वै परमेश्वर: ।।१३।।
सर्वस्वं दासरामो मे सर्वेश: सत्त्ववान् किल ।
दासरामं विना चान्यं नैव जानामि नैव च ।।१४।।
गुरवे दासरामाय सच्चिदानंद-रूपिणे ।
महा-मानव-नाथाय वारं वारं नमो नम: ।।१५।।

।। इति श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रं संपूर्णम् ।।

***



# श्रीदासराम-अष्टोत्तर-शत-नाम-स्तोत्रम्

गौरांगं मनसा ध्यात्वा दासरामं सतां वरम् ।
नाम-स्तोत्रं पठेद् भक्त इच्छन् रामकृपांजनम् ।।१ ।।
दासरामो दया-सारो दासो देवस्य दर्शक:।
गुणग्राही गभीरात्मा गुण-युक्तो गुणेश्वर: ।।२ ।।
सांगली-नगरी-वास: सदाचार: सदा शुभ:।
सत्त्ववान् सर्व-सारज्ञ: सिद्ध: साधन-संपदा ।।३ ।।
केळ्कर-कुल-संभूतो भव-बंधन-भंजन: ।
भक्तिमान् विष्णु-भक्तो हि भक्तस्याभीष्ट-दायक: ।।४ ।।
अंताजी-राव-पौत्रश्च अंत:स्थारि-विमर्दन:।
अज्ञान-तमसश्छेत्ता अपराध-क्षमाकर: ।।५ ।।
गोविंदस्यात्मजो गौरो गुरु-गौरव-तत्पर:।
गुणाकरो गुणाधारो गोविंद-गुण-वर्धन: ।।६ ।।
इंदिरा-गर्भ-संभूत इंदीवर-विलोचन: ।
इंद्रियेश्वर ईड्यश्च ईश-नामप्रसारक: ।।७ ।।
सीतापतिश्च श्रीराम: सर्व-पाप-प्रणाशन: ।
सुखदश्च स्मिताभाषी संप्रदायस्य संश्रय: ।।८ ।।
चंडीश-पाद-षट्पादश्चंद्रशेखर-सेवित: ।
चैतन्य-चिंतने मग्नश्चारु-चंद्रानन-प्रभ: ।।९ ।।
जनक: सूर्यकांतस्य जितमायो जितेंद्रिय:।
जगद्-रूप-परिज्ञाता जगदुद्धार-कारक: ।।१० ।।
अनिलानलयोर्धाता अस्तंगत-मनो-मल: ।
अनेक-विघ्न-हर्ता हि अंत:करण-शासक: ।।११ ।।
गुरुलिंग-महाभक्तो गौर-वर्णो गुरोर्गुरु:।
गुरुसिद्ध-प्रियालापी गुरु-भक्ति-परायण: ।।१२ ।।
भक्तिमद्-हनुमत्-शिष्यो भजनानंद-सेवन: ।
भक्त-पूजित-पादश्च भव-भीति-विनाशन: ।।१३ ।।

महाभागो महात्मा च मोक्ष-मार्गोपदेशक: ।
महाबोधिर्महाराजो महा-मानव-नायक: ।।१४।।
शुभद: शोभनाचार: शरणागत-रक्षक: ।
शरण्य: शौच-संपन्न: श्वासान्तर्नाम-बोधक: ।।१५।।
रामानंदस्य प्रह्लादो राम-दर्शन-प्रोत्सुक: ।
नागाप्पाण्णा-कृपा-पात्रं सिद्धानंदस्य सेवक: ।।१६।।
'ज्ञानदेव-तेहत्तिशी'-'सानंदा'-वृत्ति-कर्तृक: ।
ज्ञानी च ज्ञान-देवश्च ज्ञान-विज्ञान-देशिक: ।।१७।।
परमार्थी परं गन्ता पुष्कराक्ष: प्रियंवद: ।
गुरुलिंगस्य गीताया: श्रोता गुरु-प्रसादत: ।।१८।।
'अभंगानां' तथा कर्ता आत्मज्ञानी च आत्मवान् ।
अंतरात्मनि संलीन: अरिष्टानां निवारक: ।।१९।।
भक्तानुकंपन-ज्येष्ठो भव-बंध-विमोचक: ।
भव-रोगस्य वैद्यो वै भक्त-संतोष-कारक: ।।२०।।
शुभोपदेश-दाता च शरणागत-वत्सल: ।
शिव-नाम-श्रिया युक्त: शुद्धान्त:करण:शुचि: ।।२१।।
राजीव-लोचनो रामो राम-भक्ति-परायण: ।
रामानंद-प्रियो बालो राम-कीर्तन-कर्तृक: ।।२२।।
तत्त्वज्ञस्तत्त्ववादी वै तत्त्वात्मा तत्त्ववित्तम: ।
भावातीतो भवातीतो भाव-विघ्न-निवारक: ।।२३।।
कर्तानेक-प्रबंधानां कृत-संपूर्ण-साधन: ।
कृपासिंधु: कृतार्थश्च करुणाकर-सत्तम: ।।२४।।
वंदनीयो वरेण्यो वै वरदो वंद्य-वंदक: ।
स्वानंदस्थ: सर्व-वंद्य: स्वरूपस्थ: सुख-प्रद: ।।२५।।
इदं स्तोत्रं पठेत् प्राज्ञ: परमार्थ-परायण: ।
दासरामो गुरुर्देव: संतुष्ट: स्यान्न संशय: ।।२६।।

***



## साधकोपयोगी ग्रंथ

१) श्रीनिंबरगीकरमहाराज (चरित्र)
२) महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का (चरित्र)
३) चिमडमहाराज (चरित्र)
४) रघुनाथप्रिय साधुमहाराज यांचे चरित्र
५) नारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र
६) माईसाहेबमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र
७) श्रीदासराममहाराज चरितामृत
८) श्रीदासराममहाराज यांचे नित्यपाठ चरित्र
९) श्रीदासराममहाराज यांचे सहस्रनामस्तोत्र
१०) हनुमद्-गुरु-चरित्र-बोध-सार
११) गोविंद - चरित - मानस (चरित्र)
१२) मामामहाराज केळकर (चरित्र)
१३) अमृतवाणी
१४) श्रीदासराम-गौरव-ग्रंथ
१५) श्रीदासराम वचनामृत
१६) श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह
१७) श्रीगुरुलिंगगीता
१८) श्रीगुरुलिंग-गीतम्
१९) श्रीदासराम-गीतम्
२०) शंकराचार्यकृत आत्मानात्मविवेक

२१) शंकराचार्यकृत तत्त्वोपदेश

२२) शंकराचार्यकृत शतश्लोकी

२३) भगवद्गीता (संपूर्ण मराठीतून)

२४) भगवद्गीता (लेखसंग्रह)

२५) भगवद्गीता (निवडक श्लोकांवरील लेख)

२६) भगवद्गीता : तीन पदे

२७) सद्बोध-दशक (श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रासह)

२८) गुरुराजकथित ज्ञान व बोध

२९) श्रीदासरामकृत ग्रंथत्रयी

३०) पाठांतरसुलभ भगवद्गीता

३१) दासबोधातील तत्त्वज्ञान

३२) अभंग दरबार

३३) सन्मार्गदीप

३४) नारायणीय शिष्य प्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या

३५) श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांचे चरित्र (संतकृपा प्रकाशन)

***



## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज : आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना | १६ | २०१० |
| ज्ञानदेवकृत अनुभवामृत(ओवी टीकेसहित) | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |

## ❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक (श्रीदासरामरक्षास्तोत्रासह) | २७ | २०११ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र (आवृत्ति ३री) | २८ | २०११ |
| श्रीगुरुराज कथित ज्ञान आणि बोध | २९ | २०११ |
| प.पू.श्रीमाईसाहेब यरगट्टीकर यांचे चरित्र | ३० | २०११ |
| पाठांतरसुलभ भगवद्गीता (आवृत्ति २ री) | ३१ | २०११ |
| श्रीदासराममहाराज लिखित लघुचरित्रे | ३२ | २०११ |
| श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कृत मनोबोध व निवडक अभंग (विवरणासह) | ३३ | २०११ |
| प.पू. सद्गुरू श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर ऊर्फ श्रीचिमडमहाराज | ३४ | २०११ |
| महायोगिनी श्रीलक्ष्मीबाई अक्का | ३५ | २०११ |



## चरित्रातील ग्रंथ नाम सूची


ॐ चैतन्य (मासिक) - २५२
अखंड कीर्तनानंद - ५०, ७३, १०९, १९७
अग्रदूत (दैनिक) - १६५
अपरोक्ष ज्ञान व साक्षात्कार - २८२
अमृतवाणी - १०७, १४९, १५२, १९६
अमृतानुभव - १४३
आत्मलहरी - २७९
आत्माराम- ३२६
आनंदरामायण - ९
आरतीसंग्रह /श्रीदासराममहाराज कृत आरती संग्रह- १६, २६, २८७, ३३४, ३३५
एकनाथी भागवत - १८५
कर्नाटक-महाराष्ट्रातील समर्थ संप्रदाय - २८३
कीर्तनानंद मामा - ३४
केसरी (दैनिक) - १९७, २०२, ३२३
कै.मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचा अल्प परिचय - ५५, २८५
कैवल्यपुरुष - २७९, २८२
कैवल्यप्रसाद - १००, २८२, २८३
कैवल्यविधि - १००
कैवल्यवैभव - ६४, २७९
कैवल्यसंकीर्तन - २८३
गजानन आशिष - २२४
गणेशसहस्रनाम - १७७
गाथापंचक - ११५
गीता - १६२
गुरुचरित्र - १११
गुरुपाठ / श्रीगुरुपाठ - १७५, २८६
गुरुलिंगगीता - २६, ५०, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८३, ९३, ९५, ९६, ९८, १२६, १५१, १८२
श्रीगुरुलिंगगीता - २३०, २५०, २५४, ३२३
गोविंदकीर्तनगुणगान - २८२
गोविंदचरितमानस - २६, १०७, ११०, ११२, १२१, २८३
गोविंददर्शन /श्रीगोविंददर्शन - ११, १५, २२, २६, २७, १८६, २३३, २८६
गोविंदपंत दादा घोसरवाडकर यांचे चरित्र - २८३
चांगदेवपासष्टी - १२३, २२३, २८०

चांगदेवपासष्टी व इतर ग्रंथ - ११६, १२७, १५२, २८७, ३३४, ३३५
चिन्मय नित्यपाठ - १५३
तरुण भारत (दैनिक) -१६५, २६५, ३२३
तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र - २८६
तुकाराममहाराज चरित्र - २८३
तुतारी (साप्ताहिक) -५०, ५१, १२१, १८९, २५०, ३०१
दखल (साप्ताहिक) - २४९
दासबोध - ९, १७, ३९, १११, २२३, ३२६
दि सांगली न्यूज (साप्ताहिक) - २७८
दीपलक्ष्मी (मासिक) - १४, १२२, १६५, २५१, २८४
नमन स्तोत्र, भावार्थ नमनासह/श्रीज्ञानदेवकृत नमन स्तोत्र, भावार्थ नमनासह - १२४, १२७, १८५
नवसंदेश (दैनिक) - १४९, ३२३
नासदीय सूक्त : भावार्थ /नासदीय सूक्त भावार्थ संगति - ११६, २८६
नित्यनियमभजनविधि - २८३
नित्यपाठामृत - १६६, १८७, २८६
निष्काम कर्मयोगी - १३७
परमामृत - १७
परमार्थ प्रश्नोत्तरी /श्रीदासराममहाराजः परमार्थ प्रश्नोत्तरी - २८७, ३३३, ३३४, ३३५
परमार्थसार व अन्य ग्रंथ - २०, ३७, २८७
पवन-विजय-स्मरणी - १८०
पहिला दीप - २८३
पुढारी (दैनिक) - ३२३
पुरुषार्थ (मासिक) - १५२
प्रेमलहरी - २४०
फूल चैतन्याचे - ३६, ५०, ७३, १२६, २१७
बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र - २८६
भक्तिसंगम (मासिक) - १४९
मराठी संशोधन पत्रिका, ११४
महानिर्वाण - ७३, १६५
महाराष्ट्र टाईम्स (दैनिक) - ३२३
रामदासबोध / श्रीरामदासबोध - १८, १९, २८७
रामायण - १११
राष्ट्रशक्ती (दैनिक) - १४९



लोकमत (दैनिक) - ३२३
वायुलहरी - १९, ११७, ११९, २८५
आणि ज्ञानदेव आज्ञापत्र - २८५
विजयंत (साप्ताहिक) - ३२३
विवेकसिंधु - १७
विष्णुसहस्रनाम - १७७, २९५
शक्तिपात योगदर्शन - २८४
शांतिकुटिरसंदेश - २५२, २८४, २८५, ३२१
शिवसहस्रनाम - १७७
शुद्‌ध व सुलभ परमार्थ विचार - २८३
श्रीअमृतानुभव मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह - १४३, २८६
श्रीएकनाथी भागवत संक्षिप्त पाठस्तोत्र - १८५, २८६
श्रीगुरुगीता - १७५
श्रीगुरुतृतीयाकथा /गुरुतृतीयाकथा - ४४, १०४, २८३
श्रीगुरुमहिमा - २१२, २८७
श्रीगुरुलिंग - गीतम् - २०६
श्रीगुरुलिंगप्रसादगीता /गुरुलिंगप्रसादगीता- ५०, ६४, ९४, २८३
श्रीगोविंदस्मृति /गोविंदस्मृति - १२५, २८३
श्रीचांगदेवपासष्टीः एक नामकळा - १२४, २२४, २८७
श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ - २८६
श्रीतुकाराममहाराजांचे सदेह वैकुंठगमन - २८२
श्रीदत्तस्तुति /ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्‌ध टीकेसह- १२३, २८५
श्रीदासरामगाथा - १९, २६, ३४, ३६, ३८, ४३, ५५
दासरामगाथा - ५८, ५९, ६६, ६७, ६८, ६९, ७७, ७८, १०१, १०२, १०३, १३१, १३६, १९७, २०२, २०८, २३२, २५३, २८६, २८७
श्रीदासरामगीतम् - २०७
श्रीदासरामगौरवगीत /दासरामगौरवगीत- २२६, २४१
श्रीदासरामगौरवग्रंथ /दासरामगौरवग्रंथ- ६४, ७०, ७३, ११६, १४२, १४५, १४६, १५५, २४५, २८८, २९५
श्रीदासरामवचनामृत /परमार्थ प्रकाश - १८६, २८६
श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र - २८५
श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत - २८५
श्रीनीलकंठ भारती चरित्र - २७, १५६
श्रीबालमुकुंद बालावधूत लीलाचरित्र - २८३
श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज यांची चिन्मय यशोगाथा - १४३, २५०, २८४
श्रीरामपाठ /रामपाठ- ३८, १११, २८२, २९३

श्रीरामपाठामृत – १७२, २८६
श्रीसमर्थ पांडुरंग विजय – २८३
श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र – २८६
श्रीसाधुचरितामृतकथासार – २०
श्रीसिद्धचरित्र – २८४
श्रीज्ञानदेवतेहत्तिशी /ज्ञानदेवतेहत्तिशी – ६४, १२३, १९२, २१८, २५३
श्रीज्ञानदेवतेहत्तिशी सानंद टीकेसह – ६४, २३२, २७९
व तात्पर्यार्थासह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ – २८५
श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश /ज्ञानदेवमुद्राप्रकाश /मुद्राप्रकाश/साधनमुद्राटीकेसह
आणि ज्ञानेश्वरीसार – ११४, ११५, २७९, २८५
श्रीज्ञानेश्वरस्तोत्र – २८६
श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघु ग्रंथ – २१९, २८७
श्रीज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र/ज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र/श्रीज्ञानेश्वरी चिंतन स्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह) –१२९, २८६
सकाळ (दैनिक) – ३२३
सद्भक्तिप्रकाश – २३२, २७८
सनातन प्रभात – ३२३
सहजयोगदर्शन – २८५
संचार सोलापूर – ३२३
संजीवनपाठ – १८८, १८९, २८६
संतकृपा – २८५, २८६, ३३१
संतसहस्रनाम – १७१, १७७, १७८, १७९, २०६, २३२, २५०
सार्थक – २२
सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत – २८६
सांप्रदायबोध – १७५, २८६
सिटी हायस्कूल त्रैमासिक – २८४
सिद्धकथामृतसार – ४९
सिद्धगिरिसंदेश – ११६, १२४, १२७, २२३, २८४ (त्रैमासिक)
सिद्धमूर्ती प्राणप्रतिष्ठा घोसरवाड स्मरणिका – १३१
सिद्धस्तुति – १३९, २८६
हणमंतरावजी कोटणीस यांचे चरित्र – २८२
हनुमद्गुरुचरित्रबोधसार – २७, ३७, ४२, ७०, २८२, ३२६
हरिपाठ – १४१, २९२, ३१९
हंस (साप्ताहिक) – ५१, ६५, ९३
हि. हा.श्रीमंत चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन राजेसाहेब सांगली,गौरव ग्रंथ – २८३
ज्ञानेश्वरी – ९, १२९, २१४, २१५, २५१, २५३, ३२१

***



## चरित्रातील ग्राम नाम सूची

अकोळ – २१४
अप्पाची वाडी– १२७,१३४,१३५,१३८,१४३,२५५
अहमदाबाद – २३३
आचरे – २, ३, ६१
आजरे/आजरा – १५७, १६४, २२५, २६४
आळंदी – ८, १४९, ३२८
आंध्र प्रदेश – २५५
इचलकरंजी – ५९,७४,१५८,१६४,२५३, २६७, २६८,२६९, २७०,२७२, २७३
इस्लामपूर/ ईश्वरपूर –१०१
इंचगिरी – १७४
इंदूर – २७१
ओरिसा – १००
औदुंबर – ६५, ३२८
औरवाड – ११
औरंगाबाद – २६३
कणकवली – ६१
कन्नूर – २८४, २८५
कन्याकुमारी – २६९
कर्नाटक – ९९
कर्नाळ – ६८, २२५,२७६
कल्याण – २६२
कवठेएकंद – २७६
कागवाड – ९
कानपूर – १९६
काशी – ३२९
कुणकेश्वर – २२५
कुपवाड – २७३
कुरुंदवाड – ११, १२, १४, २२, ८१
केळशी – १७३
केळ्ये – १
केंबळी (मोजे) – २७५
कोकळे – २७१
कोतवडे – १
कोरेगाव – २७२

कोल्हापूर – ७३, ९५, १०२, १०९, १३१, १४०, १४१, १४२,१४३, १४७, १५२, १५८, १५९, १६४, २०६, २२५, २३६, २३८, २४७, २५५, २६४, २६७, २६८, २६९, २७४, २७५, २७६, २८३, २८४, ३३२, ३३३
खटाव – ६२
गांधीनगर – २६७
गुजरात – १५२, २६७
गोंदवले – ५
घोसरवाड – ३२, ७५ ,१३१, १३८, २१८, २२५
चडचाण – ९९, १५१
चंद्रपूर – १६४
चिकुर्डे – २०३, २६७, २६८
चिमड – ९, ३३, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ६०, ८८, ११२, ११७, १३८, १४२, १५३, १५७, ३३२
चिंचवड – २५२
जत – २२५
जयसिंगपूर – १५८, २५४
जोगेश्वरी – ६४, ८७
डहाणू – १६४
डोंबिवली – ३३३
तासगाव – ४, ९१, १००
तीरुपूर – २७३
तुंग – ६२
तेरदळ – ६
त्रिंबक – २
देहू – ९२
द्वारका – ३२८
नरसोबाची वाडी /नृसिंहवाडी/वाडी– ६०, १५३, १५७, १७४, २५१, ३२८
नागपूर – २२५, २७६
निंबरगी/देवनिंबरगी – ९९, १०४, १५१, १६५, २१६, २२५, ३३२
नेवरे – १
नौपाडा (ठाणे) – २६१
पंढरपूर – ५३, १५१, २०५, २१६, २३९, २४०, २५१, २९५
पंढरी – ३२८



पारडी– १५२
पालघर – ६४, ८९, ९१, ९२, ९५, ९८
पिंपरी – २१८
पुणे / पुण्यपत्तन – ६३, ९५, ९८, १०१, ११२, १३४, १३६, १५८, १६४, १७८, १९६, २०३, २१२, २१५, २१९, २२४, २२५, २४७, २५२, २५३, २५४, २६१, २६३, २६४, २६६, २६९, २७१, २७४, २७५, २७६, २७७, २८३, २८६, २८७, ३२२, ३३१, ३३३
पेण – १३९, १४२
पैठण – ८७, ८८, १४३
प्रयाग – ३२९
फलटण – २२५
बडोदा – १६४
बीड – २६१, २६५
बुधगाव – ३७, १३१, २६१, २६२, २७४, २७५, ३३०
बेळगांव – ६, २३१
बेंगलोर – ८९
भिलवडी – ६५
महाराष्ट्र – १, २५२
माधवनगर – ८१, १०४, १४०, १८३, २३९, २८३, ३०३, ३०४
मालाड – ८७
मिरज – १५१, २६०, २६२, २६८, २७२, २७३, २७४
मुधोळ – ६
मुंबई – ३८,९२, ९५, ९६, ९८, १०४, ११०, ११४, ११६, ११८, १२४, १४०, १४९, १६४, १६५, १७८, १८२, २२५, २३२, २४५, २५२, २६४, २६५, २६९, २७०, २७२, २७४, २७८, २८२, २८३, २८४, २८५, ३२८, ३३३
रत्नागिरी – १, १२८, २६८, २७७
राजस्थान – २१२, २६७
रावळगाव – २७२
रेणागिरी – ५८
वडगाव(बु) – २६०
वसगडे – २५१
वाडा ढोकमळे – १
वानलेसवाडी – २६९
वालचंदनगर – १४९

विठ्ठलवाडी – १५७
विश्रामबाग – २२६, २६५, २६८, २७३, २७५, ३३३
शहाबाद – २६३
शिरवली – २६५
शिरोळ – १७९
शृंगेरी – २५३
संगमनेर – २२५
सातारा – ३३, ३५, ५१, ६५, १५६, २७०
सांगली – २, ३, ४, ६, ७, ९, २१, २५, ३३, ३५, ३६, ४२, ५१, ६३, ६६, ७२, ९०, ९१, ९३, ९४, ९६, ९८, ११७, १२४, १२७, १२८, १३०, १३७, १४०, १४९, १५०, १५१, १५८, १५९, १६४, १७१, १७२, १७३, १७५, १८२, १८९, २०७, २१२, २१४, २१९, २२४, २२५, २२८, २४६, २४९, २५२, २५३, २५४, २५५, २६०, २६१, २६२, २६३, २६४, २६६, २६७, २६८, २६९, २७०, २७१, २७२, २७३, २७४, २७५, २७६, २७७, २८२, २८३, २८४, २८५, २८६, २८७, २९४, ३०४, ३२९, ३३०, ३३१, ३३२
सांगलीवाडी/सांगलवाडी– २६६, २७१, ३१९
सिकंदराबाद – २३३
सिद्धगिरी – ४८, ४९, ९५, १०३
सोमेश्वर – १
सोलापूर – २५५
हरिपूर – ३, ४, २६५, ३२८
हातकणंगले – ११८

***